मा. ५१ मासिक खंड ८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
सन १८७८ जा. अंक ४९ ले ६०
निबंधमाला.
काव्येतिहास संग्रह.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके (संदर्भ)

मराठी ग्रंथसंग्रहालय.
ठाणें.

सं.ग्रा. २५८

जानेवारी, फेब्रुवारी १८७८.

# निबंधमाला.

अंक ४९.

## काव्येतिहास संग्रह.

कष्टं शिष्टक्षातिक्रांति कलौ कार्यमृच्छंति विद्याः ।

वेंकटाध्वरि.

अंक ५०.

## पत्रें.

पुणें,

कृष्णाजी त्रिंबक रानडे यांच्या

'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापिलें.

किंमत आठ आणे.

## वर्गणीदारांस सूचना.

मुखपृष्ठावर १७८८ हा सन पाहून कित्येकांस कदाचित् आश्चर्य वाटेल; कां कीं गेल्या अंकांत सुचविलेल्या युक्तीची कल्पना सर्वांच्या सहजच मनांत येणारी आहे. आमच्याही मनांत ती येऊन चुकली; पण, तसें न करण्याचें कारण असें झालें कीं, सध्यां चार अंकांचा मजकूर पुरा होऊन पांचव्याचाही बहुतेक पुरा होत आला आहे. तेव्हां एक वर्ष पुढें ढकलल्यानें साहा महिने हात जोडून बसावें लागणार. त्यांतून आमचाही उत्साह आद्याप पूर्ववत् आहे; साहा महिन्यांची तूट भरण्याची पूर्वीची उमेद अजून नाहींशी झाली नाहीं. यास्तव पूर्व क्रम न मोडतां चालू सालच्या अखेरपर्यंत काय प्रकार होतो तो पहावा असें मनांत आणून हा दुहेरी अंक काढला आहे. मार्च व एप्रिल यांचाही असाच अंक लवकर येईल. पुढले नेहेमीच्या क्रमानें येतील.

जानेवारीचा अंक तयार होऊन पुष्कळ दिवस झाले; पण दोन अंक एकत्र करण्याच्या भरीस पडल्यानें जें प्रकरण लांबलें तें जातां जातां या थरावर पोंचलें स्थलांतरापासून होणाऱ्या ज्या अडचणी आम्हांस दिसत होत्या त्या या उशिराचें मुख्य कारण होत. यापुढें चांगली व्यवस्था राखण्याविषयीं तजवीज केली आहे.

या सालापासून वर्गणीची पोंच या पुस्तकांत दिली जाणार नाहीं. आमच्याबद्दल सह्या करण्याचा अधिकार ज्ञानप्रकाशच्या म्यानेजरांकडे सोंपविला असल्याबद्दल आम्ही गेल्या आक्टोबरच्या अंकांत कळविलेंच आहे. तर त्यांजपासून व आमच्या गांवोगांवच्या मुकत्यारांपासून ज्या पावत्या मिळतील त्या आमच्याच आहेत असें समजावें.

नव्या वर्गणीदारांचीं नांवेंही या पुढें येणार नाहींत. नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पत्राच्या शेवटीं आपलें नांव व पत्ता बाळबोध अक्षरांनीं लिहिण्याची मेहेरबानी करावी. कित्येक वेळां दोन्ही उमगण्यास पंचाईत पडते; तर ज्यांच्या दृष्टीस ही सूचना पडेल त्यांनीं वरील गोष्टीकडे अवश्य लक्ष द्यावें.

# निबंधमाला.

## अंक ४९.

---

### काव्येतिहास-संग्रह.

कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ कार्श्यमृच्छंति विद्या ।*

विश्वगुणादर्श.

१. आलीकडे दोन चार वर्षांत आमच्या भाषेंत पुष्कळ नवीं नवीं मासिक पुस्तकें निघूं लागलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या अंकांत आम्ही जें लिहिलें होतें कीं, वर्तमानपत्रांची स्थिति आलीकडे सुधारून मासिक पुस्तकें मागसल्यासारखीं झालीं आहेत, ती स्थिति दिवसांदिवस जात चालली आहे. पूर्वी एकादें दुसरें मासिक पुस्तक असे, व त्यांतच पाहिजेत ते विषय येत असत. पण हल्लीं लोकांत ज्ञानाचा प्रसार पुष्कळ झाल्यानें हरएक प्रकरणाचें निरनिराळेंच पुस्तक होऊं लागलें आहे. 'वेदार्थयत्न', 'षड्दर्शनचिंतनिका', 'वैद्यक संग्रह', 'सिद्धपदार्थ शास्त्र', 'शिल्पकलासंग्रह', 'एंजनियरिंग विषयाचें पुस्तक', 'उपयुक्त ज्ञानसार', 'अबलामित्र', 'सर्वसंग्रह', इत्यादि नांवांवरून वरील गोष्टीची प्रचीती येईल. अभिप्राय देण्यास घेतलेलें वरील पुस्तकही वरच्यांप्रमाणेंच देशहिताचें एक काम उचलून त्या संबंधाची न्यूनता पूर्ण करण्यास निमार्ण झालेलें आहे.

२. वरील मासिक पुस्तकाचें प्रसिद्धिपत्रक गेल्या डिसेंबर महिन्यांत आमच्या पुस्तकाच्या तिहिरी अंकाबरोबर जोडलेलें होतें हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. या पत्रकांत प्रकृत 'संग्रहा' चा उद्देश, त्याची व्यवस्था, वगैरे सर्व गोष्टींचा यथास्थित उल्लेख केलेला होता. त्याबरहुकूम सदरील पुस्तकाचे आजवर आठ अंक छापून प्रसिद्ध झाले आहेत. ते पुस्तकप्रकाशकांनीं

---

* "हर हर ! शिष्टांचा ऱ्हास करणारा जो कलि त्यांत विद्यांचा उत्तरोत्तर अपकर्ष होत चालला आहे !"

आमच्याकडे पाठविल्यावरून त्यांवर व या एकंदर उद्योगावर आमचें मत प्रगट करतों.

३. आतां प्रथमतः या उद्योगाविषयीं सामान्यतः विचार करून नंतर प्रस्तुत पुस्तकांतील तीन सदरें जीं महाराष्ट्र देशाचा इतिहास, मराठी कविता, व संस्कृत कविता त्यांविषयीं वेगळें वेगळें लिहूं. प्रस्तुत उद्योग हा पुनरुज्जीवनासारखा किंवा जीर्णोद्धार करण्यासारखा आहे हें उघडच आहे. जे जुने ग्रंथ सध्यां कांहीं खटपट न केली तर ठार बुडून जाणार आहेत त्यांस वांचविण्याचा प्रस्तुत यत्न होय. आतां हा यत्न करण्याचें येवढें काय! खोळंबलें आहे,-जुन्या काळच्या हकीकती व जुनीं काव्यें हीं राखून ठेवून काय करायाचें आहे,-असा प्रश्न कित्येक समंजस लोक कदाचित् करतील. जें गेलें मेलें त्याची आठवण करण्यांत काय फायदा आहे, जें चाललें आहे तें खरें, तसेंच इंग्रेजी सारखी कविता आयती वाचायाला असतां व तिच्या स्फूर्तीनें आलीकडील नवीन विद्वान् उत्कृष्ट उत्कृष्ट काव्यें रसिकजनरंजनार्थ स्वभाषेंत रचीत असतां, हजारों वर्षांमागलीं जुनीं संस्कृत काव्यें हुडकून काढा, तीं समजण्याकरतां संस्कृत भाषेचा पृथक् व्यासंग करा, व शेंकडों वर्षांमागली अज्ञान व अरसिक महाराष्ट्र-कवींनीं केलेली कविता पुनः उदयास आणा,-यांत काय हाशील आहे ? हे प्रश्न केवळ काल्पनिक आहेत असें कोणीं समजूं नये. पुष्कळांच्या वरच्या सारख्याच समजुती आहेत व तसे उद्गारही पुष्कळांनीं स्वतः ऐकले असतील. तर प्रस्तुतसारख्या पुस्तकाचा उपयोग ध्यानांत येण्याकरतां वरील शंकांचें अगोदर निरसन केलें पाहिजे.

४. प्रस्तुत मालेच्या सहाव्या अंकांत वरच्यांपैकीं पहिला जो इतिहासाविषयींचा आक्षेप त्याविषयीं बराच विचार केला आहे. त्यावरच येथें आणखी थोडा विस्तार करतों. इतिहास म्हणजे मेलेल्यांची किंवा गत गोष्टींची कथा होय हें उघडच आहे; पण यावरून त्याचा अभ्यास निरर्थक हें मात्र ठरत नाहीं. पहा कीं, **सॉक्रेटीस्** मरून आज दोन हजारांवर वर्षे होऊन गेलीं; सध्यां सारें भूमंडळ जरी शोधलें, तरी त्याचा गोत्रज वंशज किंवा कोणी कसलाही संबंधी एकही सांपडणार नाहीं. खुद्द आथेन्स येथें गेलें तरी त्याचें राहण्याचें ठिकाण ही

सांपडेल किंवा नाहीं याचा वानवाच दिसतो.* त्याचें शरीर तर केव्हांच मातीबरोबर मिळून पार झालें असेल! दुसरें उदाहरण रोम व कार्थेज यांच्या लढाईचें घ्या. याही लढाईस आज दोन हजारांवर वर्षें लोटलीं; व दोन्ही शहरांचें वैभव नष्ट झाल्यासही किती काळ लोटून गेला! कार्थेज तर वरील लढाई आटपल्यावर पन्नास वर्षांनींच धुळीस मिळून गेलें; व पुढें कितीक राष्ट्रें तो सारा प्रदेश एकामागून एक तुडवीत गेलीं. रोमची तरी कालांतरानें तशीच धूळधाण झाली; व सध्यां जरी तें शहर कायम आहे तरी हा त्याचा दुसरा जन्म म्हटला पाहिजे. पूर्वींची भाषा, पूर्वींचा धर्म, पूर्वींचा रीतरिवाज पूर्वींची लोकव्यवस्था, वगैरे सर्व कांहीं नाहींसें झालें आहे. तेव्हां असल्या दोन शहरांच्या त्रेतायुगांतल्या लढाईचा वृत्तांत हा सध्यां इसापनीतींतल्या पशुपक्ष्यांच्या युद्धासारखाच होय! म्हणजे वस्तुतः पाहतां इसापानें वर्णिलेल्या युद्धाचा प्रस्तुत काळीं चाललेल्या राहाटीशीं जितका संबंध आहे तितपतच वरील महायुद्धाचा ही होय. नुसता वरवर जो विचार करणारा आहे त्यास वरील दोन्ही सिद्धांत अत्यंत मान्य होऊन सॉक्रेटीसचें चरित्र व कार्थेजची लढाई हीं लिहिणारे व वाचणारे दोघेही मूर्ख असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण अंमळ खोल नर विचार केला तर कोणाच्याही ध्यानांत येईल कीं वरील महापंडित हा लोक सोडून गेल्यास जरी आज दोन हजार वर्षें होऊन गेलीं, व कार्थेजचें युद्धही जरी केवळ कर्मकथाच होऊन बसलें आहे, तरी दोहोंच्या वृत्तांतापासून होणारा जो वास्तविक उपयोग तो इतक्या काळानें-ही लवमात्र सुद्धां कमी झाला नाहीं. कोट्यावधि योजनें दूर असणारे जे

---

* येवढा विख्यात जो ग्रीस देश त्याच्या परम विख्यात शहरांची ही आज काय स्थिति आहे ती पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. हा जुन्या 'कोर्स् आफ रीडिंग्'च्या ७० व्या पृष्ठांत समग्र सांपडेल. एक फ्रेंच मुशाफर एका माहितगारास बरोबर घेऊन स्पार्टा शहर धुंडीत असतां तें शेवटीं अशा प्रकारें दृष्टीस पडलें:—

"Yonder, at Magoula," said the Cicerone, pointing to a white cottage with some trees about it, at a considerable distance in the valley. Tears came into my eyes when I fixed them on this miserable hut, erected on the forsaken site of one of the most renowned cities of the universe, now the only object that marks the spot where sparta flourished, the solitary habitation of a goat herd, whose whole wealth consists in the grass that grows upon the graves of Agis Leonidas!

तारागण त्यांचा स्वयंभू प्रकाश जसा इतक्या अगणित अंतरावरूनही आप-णांकडे सतत पोंचून जगाच्या आरंभापासून मार्गदर्शक होत आला आहे, त्याप्रमाणेंच आजपर्यंत साऱ्या देशांत ज्या ज्या ईश्वराच्या विभूति वेळोवेळां प्रगट होऊन पुनः निजधामास गेल्या त्यांचें चरित्रही लोकांस उन्नतिप्रदच होत गेलें आहे. वरील चरित्र व वरील इतिहास वाचून धीरोदात्त पुरुषांचा महिमा कोणाच्या हृदयावर ठसत नाहीं, व कोणाच्या मनास सदाचरणा-विषयीं व स्वदेशप्रीतीविषयीं स्फुरण होत नाहीं ? तर याप्रमाणें जे गतवृत्तांत अतज्ज्ञ जनांस बाह्यतः केवळ नीरस वाटतात त्यांच्या आंत नारिकेलपाकन्या-यानें अत्यंत आल्हादकारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो ! *

पण हें केवळ सामान्यतः झालें. कोणत्याही देशाच्या इतिहासाच्या वाच-नापासून कोणता लाभ आहे हें वर सांगितलें. मग यावरून आपला जिशीं अत्यंत निकट संबंध, जिचें वैभव तें आपलें वैभव, जिचें दूषण तें आपलें दूषण, जिची आपणांस सर्वांत अधिक माहिती, जी आपलें जन्मस्थान, त्या भूमीचा वृत्तांत समजल्यापासून तर किती फायदा आहे हें काय सांगावें !

---

* थोर पुरुषांच्या चरित्रानें उज्वल झालेल्या स्थलांचें दर्शन घडलें असतां सहृदय प्रेक्षकांची चित्तवृत्ति कशी होते हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. **जॉन्सन् व बॉस्वेल्** यानीं मिळून स्कॉटलंड देशाच्या पश्चिम भागावर सफर केली हें मागें ( अंक ३७ कलम ४ ) सांगण्यांत आलेंच आहे. यत्च प्रवासांत ऐओना नांवाच्या एका बेटावर गुरुशिष्य उतरले असतां त्या स्थलाचें वर्णन **जॉन्सननें** पुढें येणेंप्रमाणें लिहून ठेवलें:—

"We were now treading that illustrious island which was once the luminary of the Caledonian regions, whence savage clans and roving barbarians derived the benefits of knowledge and the blessings of religion. To abstract the mind from all local emotion would be impossible if it were endeavoured, and would be foolish if it were possible. Whatever withdraws us from the power of our senses, whatever makes the past, the distant, or the future predominate over the present, advances us in the dignity of thinking beings. Far from me and my friends be such frigid philosophy as may conduct us indifferent and unmoved over any ground which has been dignified by wisdom, bravery, or virtue. That man is little to be envied whose patriotism would not gain force on the plains of Marathon, or whose piety would not grow warmer among the ruins of Iona!"

*Journey to the Hebrides.*

इतर देशांचा इतिहास व आपल्या देशाचा इतिहास या दोहोंमधील भेद म्हटला म्हणजे अंतरालांतील अवघ्या इतर तारागणांत व आपापल्या ग्रहमालेचा जो अधिपति त्यांत जितका आहे तितका होय. समजा कीं, आपण वसंत ऋतूंतल्या एकाद्या निरभ्र रात्रीं गच्चीवर हवा खात बसलों असतां एकाएकीं आपल्या असें नजरेस आलें कीं, दहा पांच तारे आपण पाहतां पाहतां अकस्मात् जागच्या जागीं गडप झाले, तर त्याबद्दल आपणास काय वाटणार आहे? त्यांचें व आपलें अंतर कोट्यानकोटी कोस असल्यामुळें त्यांचा आपला कांहींच संबंध नाहीं. तेव्हां वरील प्रलयापासून फार झालें तर येवढेंच होईल, कीं त्या तेजोमय गोलांवर व त्यांच्या आकर्षणांत असलेल्या इतरांवर जर प्राण्यांची वस्ती असेल तर त्यांचा निःपात झाल्याबद्दल आपणांस क्षणमात्र विषाद वाटेल. तसेंच वरील नष्ट झालेल्या ताऱ्यांत व्याध अगस्त्य यांच्या सारखे कांहीं असले तर आकाशाची शोभा कमी झाल्याबद्दल आकाशप्रेक्षकांस वाईट वाटेल, व ज्योतिष्यांस आपले नकाशे नीट करावे लागतील. पण याच्या पलीकडे या गोलावरील लोकांस वरील प्रलयापासून दुसरी कोणतीही बाधा पोंचणार नाहीं. पण तोच प्रसंग आमच्या सूर्यावर येऊं द्या; म्हणजे एका सूर्याबरोबर प्रकाश गेला, उष्णता गेली, पर्जन्य गेला, धान्यें गेलीं,—सर्व कांहीं नाहींसें झालें! तर देशांतरांच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत इतका फेर आहे. पहा कीं, रोम व कार्थेज यांच्या युद्धांत सोफानिस्बा नांवाच्या सरदारकन्येची गोष्ट आहे, आणि इकडे भीमसिंगाची बेटी कृष्णाकुमारी हिचा वृत्तांत आहे; तिकडे सीज़राचा वध आहे, इकडेही नारायणराव पेशव्यास मारेकऱ्यांनीं मारला आहे; तिकडे नेपोलियन बादशाहाची जंगी स्वारी रशियाची खोड मोडून सगळें युरोपचें राज्य एकछत्री करण्याकरतां निघाली आहे, इकडे शिवाजीनें शंभर वर्षांपूर्वीं सुरू केलेल्या मंदिरावर कळस बसविण्याकरतां भाऊसाहेबांचा जरीपटका असंख्य महाराष्ट्र वीरांनीं वेढलेला होत्साता दिल्लीपदावर निघाला आहे; तिकडे ऑगस्टस् बादशाहा रोमक पत्तनच्या सिंहासनावर बसून **व्हर्जिल् हॉरेस्** यांच्या वाग्विसरांत आनंदभरानें वाहवत आहे, इकडे शकांचा आपल्या प्रतापकिरणांनीं विध्वंस करून विराजमान झालेला जो विक्रमादित्य तो कालिदासप्रभृति कविवरांचा प्रत्यक्ष वाग्देवीच्या वीणावादनपर हस्तास व नेत्रकमलांसही स्तिमित करणारा जो वीणारव त्यास लुब्ध होऊन डोलत आहे! वस्तुतः पाहतां वरील दोन्ही वृत्तांत हे समसमान आहेत. पण दोहोंचें एतदे-

शीयांच्या मनावर कार्य किती भिन्न होतें! दोन्ही गतवृत्तांत असतां दुसरे स्वदेशांत घडले असल्यामुळें त्यांची जणों काय प्रत्यक्षता आपणास भासते. सारांश, अगस्त्याच्या किंवा व्याधाच्या प्रकाशांत आणि उन्हांत किंवा चांदण्यांत जितपत अंतर तितपतच द्वीपांतरींच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत होय!

मग असला इतिहास जर नष्ट झाला, तर त्यापरती देशाची हानि कोणती! आमच्या पूर्वजांनीं गेल्या शेदोनशें वर्षांत येवढाले दिग्विजय गाजवून भारतवर्षाच्या पूर्वापार चालत आलेल्या कीर्तींत येवढी जी भर घातली, व शेंकडों स्थलांचा महिमा चिरकाल राहीसा करून टाकिला, तें सर्व आमच्या मूर्खपणानें व हयगयीनें जर होऊन न झाल्यासारखेंच झालें तर केवढी शोचनीय गोष्ट होय? युरोपांतल्या देशांत एकंदर देशाच्या इतिहासाविषयीं तर राहोच, पण प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, शहरांचीं वर्णनें, धर्म कलाकौशल्य ग्रंथसंग्रह इत्यादिकांचा इतिहास, यांविषयींही लोकांस जिज्ञासा असून ती तृप्त करणारांस हवा तितका लोकाश्रय मिळतो. पण इकडे कशी बहार आहे पहा! 'विद्यामृता'चा, 'देशसुधारणे'चा, 'आर्यजननी'चा आज कित्येक वर्षें चोहोंकडे घोष चालून त्याणें दाहीदिशा घुमूं लागल्या असतां 'आर्यजननी'चा स्वतंत्र इतिहास तर लांबच, पण त्याचा नुसता पाया ज्या जुन्या बखरी त्यांसही आश्रय मिळतांना जेमतेम पडते; कवींचीं चरित्रें व त्यांच्या गुणदोषांचें विवरण हें तर दूरच, पण अगोदर त्यांचीं काव्येंही आमच्या देशबंधूंस आश्रयार्ह वाटत नाहींत! एकंदरींत सध्यांची आमची स्थिति किती विलक्षण तऱ्हेची आहे पहा! नूतन विद्येनें आमची नजर सगळ्या भूमंडळावर फांकली असून कामश्चाटका कोठें आहे, टिंबक्टू शहराची वस्ती किती आहे, माजिलनूची सामुद्रधुनी कोणी शोधून काढली, वगैरे खडान् खडा आम्हांस पुसून घ्या; पण वस्तीच्या ठिकाणाहून दहा वीस कोसांवर नेऊन सोडलेंत तर परत आपल्या जागीं येण्याची आम्हांस मारामार पडेल! आपल्या आजापणजांचें नांव वेळेनसार आठवायाचें नाहीं, रामायणांतली महाभारतांतली अति प्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीही माहीत नसतील; पण ग्रीस व रोमच्या इतिहासांतील शक विचारा किंवा इंग्लंडची वंशावळ म्हणायाला सांगा, म्हणजे विल्यम राजापासून तों तहत केसर् ई हिंद्पर्यंत तडक आगगाडी! **मोरोपंता**ची सामान्य आर्या लागायाची नाहीं, **तुकारामा**चें साधारण

अवतरण लक्षांत यावयाचें नाहीं; पण इंग्रेजी कवितेंतली काय ती सर्व माहिती ! याप्रमाणेंच धर्माची ही गोष्ट. आतां कोणतेंही ज्ञान संपादन केलें तरी तें प्रशस्यच होय हें खरें; पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारों कोसांवरच्या मुलखांची हें हास्यास्पद होय यांत संशय नाहीं. शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार व त्यास सुधारणेची कळा आणणार त्यांस तर वरच्या सारखा दिव्याखालीं अंधेर अगदींच उपयोगी नाहीं. तर **मॉरिस्** साहेब सांगतील तो आमचा इतिहास, **मेकॉलेबोवा** सांगतील ती आमची नीति, डा० **विल्सन्** सांगतील तो धर्म, ही लज्जास्पद स्थिति आजपर्यंत जी चालत आली तीच पुढें चालू नसावी असें ज्यांच्या मनांत असेल त्यांनीं हल्लीं प्राचीन विद्येच्या उज्जीवनार्थ जे प्रकृत पुस्तकासारखे उद्योग आमच्या कांहीं देशबंधूंनीं हातीं घरले आहेत त्यांचा चांगला पुरस्कार करणें अत्यंत आवश्यक होय.

९. दुसरें सदर महाराष्ट्र कविता. यावरही पुष्कळांचे, व विशेषतः विद्वान् म्हणविणारांचे, कित्येक आक्षेप आहेत. यांपैकीं कांहींविषयीं यापूर्वीं प्रसंगोपात्त विवेचन केलेलें आहे. * यास्तव येथें त्यांविषयीं सामान्यतः निरूपण करतों म्हणजे बस आहे. सर्वांस ही गोष्ट मशहूरच आहे कीं, इंग्रेजी विद्येचा प्रसार आमच्या लोकांत प्रथमतः होऊं लागला तेव्हां लवकरच तिचा एक मोठा परिणाम असा दृष्टीस पडूं लागला कीं, एतद्देशीय धर्मावरून लोकांची श्रद्धा उडत चालली; आणि धर्मच काय, पण जें जें स्वदेशीय तें सर्व अप्रयोजक मूर्ख वेडगळ असें असलेंच पाहिजे ही एक जबरदस्त कल्पना लोकांच्या मनास खिळून राहिली. अद्यापही ती निघाली आहे असें नाहीं; पण तिचे वेढे आलीकडे बरेच सईल पडत चालले आहेत. तर हीच कल्पना वरील कवितेस अर्थातच बाधक झाली. त्यांतून दुसरें असें कीं, मराठी कवितेचा बहुतेक सर्व विषय धर्माचाच; तेव्हां ज्या लोकांचें मन मुळींच धर्मावरून उडालें त्यांस तदनुकूल किंवा तत्प्रतिपादक जी कविता ती कशी पसंत व्हावी? आतां खरोखरी पाहतां अर्वाचीन पाश्चात्य विद्येनें ज्यांची दृष्टि

---

* सदरील पुस्तकाचा १२ वा व ४६ वा अंक पाहा. माजी 'शालापत्रका'चा शेवटल्या वर्षाचा एप्रिलचा अंक पाहिला असतांही कांहीं आक्षेपांचें निरसन सांपडेल. या निरसनाचा लवकरच काय परिणाम झाला तो मागें ( अंक २७ पृष्ठ १५ टीप ) सांगण्यांत आलाच आहे.

परम सूक्ष्म व परम विमळ झाली त्यांच्या हें लक्षांत यावयाला पाहिजे होतें कीं, कवितेची योग्यता जी ठरते ती तींतील विषयाच्या खरेखोटेपणावरून ठरत असते असें नाहीं. प्रतिपादित अर्थ अत्यंत समंजस व केवळ सत्य असला म्हणजे कविता उत्तम झाली आणि असमंजस व असत्य असला म्हणजे नादान झाली असें मुळींच नाहीं. कारण तसें असतें तर **युक्लिड्** हा कविसार्वभौम व **होमर** हा कुकवींतला अत्यंत अधम असा ठरला असता. कां कीं, **युक्लिड्**नें जी सिद्धांतांची इमारत बांधली ती आज दोन हजारांवर पृथ्वीच्या सूर्याभोंवती प्रदक्षिणा झाल्या तरी जशीची तशी अजून कोरी करकरीत आहे. येवढालीं रोमच्या सारखीं राज्यें उभारलीं जाऊन उलथून गेलीं पण वरील इमारतीस येवढीशी चीर म्हणाल कां टवका उडालेला म्हणाल तर कोठेंही सांपडायाचा नाहीं. तर वरील भूमितिप्रवर्तकाची कृति इतकी सत्यानें ओतप्रोत भरलेली आहे! आतां तसेच यूरोपीय कवींच्या आजोबांनीं रचलेल्या आद्यकाव्याकडे उलटा,—म्हणजे काय गोंधळ आहे पहा? कोठला आकिलीस् आणि कोठला हेक्टर,—या नांवाचे मनुष्य तरी या पृथ्वीच्या पाठीवर कधीं जन्मास आले होते कीं नव्हते कोण जाणें! तर असल्यांच्या भाकड कथा आपल्या आजापंजांपासून चालत आलेल्या या खुळ्यानें खऱ्या मानून भलें थोरलें चोवीस सर्गांचें बाड रचून ठेवलें! त्यांतूनही 'बाबावाक्यं प्रमाणम्' या आडाणी न्यायानें त्यानें वरील सर्व हकीकतही खरी मानली समजा; पण हें हो काय!—आकाशांतला सूर्य उठला, ग्रीक लोकांच्या कंपूवर बाणांची वृष्टि करायाला लागला; शुक्राची चांदणी निघाली, लागली सोद्या राजपुत्राची व त्याच्या प्रियकरणीची गांठ घालून द्यायाला; मंगळ खालीं उतरला, लागला ग्रीक लोकांशीं लढायाला; बुध स्वर्गाहून निघाले, आले प्रायम् राजाच्या शिबिरीं आपल्या यजमानाचा निरोप घेऊन; आकिलीस् उठला तो दोन नद्यांशींच लढायाला लागला! वरील सर्व प्रकार ज्यानें वर्णिले त्यास जर खुळा म्हणूं नये तर मग खुळा तरी कोण? पण चमत्कार पहा काय आहे तो, कीं या कवींतल्यां वृद्धकपीस वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याची कोणी तजवीज न करतां कवित्वमंदिरांत त्यास उलटें अग्रासन दिलेलें आढळतें! याप्रमाणेंच 'उंदरांची सभा', 'पशुपक्ष्यांचें युद्ध' 'खटला उभा करणारीं माजरें' या गोष्टी ज्यानें लिहिल्या; किंवा भांड्यांतून पहिल्यानें धुराचा भपकारा निघाला आणि मग

सगळ्या धुराच्या लोटाचा एक राक्षस बनला, एकजण भुयारांतल्या बागेंत शिरला तों जिकडे पाहतो तिकडे सारीं झाडें आपलीं हिऱ्यामाणकांनीं लदलीं आहेत असें त्यानें पाहिलें, असल्या बातांचें ज्यानें एक जबरदस्त भारूड रचून ठेवलें, त्यांचे ग्रंथही वेडगळ म्हणून जे उकिरड्यावर झुगारून द्यावयाचे ते उलटे मोठमोठ्या शहाण्यांनीं आजपर्यंत उराशीं बाळगले! असो; वरच्यासारखे विचार आमच्या अर्वाचीन पंडितांनीं जर कांहीं मनांत आणले असते तर महाराष्ट्र कवितेची आजपर्यंत जी उपेक्षा झाली, व 'सर्वसंग्रहा'-सारखी सात वर्षांची इमारत एकाएकीं जी खचली, तसला प्रकार झाला नसता. सारांश, ज्याप्रमाणें बुद्धबळांच्या डावांत लाकडाच्या तुकड्यांस हत्ती घोडा उंट हीं नांवें दिल्यानें वेडगळपणाचा आरोप माथीं बसण्याची शंका नको, किंवा रंगभूमीवर स्त्रीचा अभिनय पाहत असतां त्या पात्राच्या स्त्रीपुंस्त्वाची मीमांसा करायाला पाहिजे असें नाहीं, त्याप्रमाणेंच कवि, नाटककार, कादंबरीकार, वक्ते इत्यादिकांची करामत पाहून तल्लीन होतांना आपणासमोर दिसतें आहे हें सर्व खरें आहे कीं सर्व भास आहे हेंही मनांत आणण्याची बिलकुल गरज नाहीं. 'भारत', 'इलियड्' किंवा 'प्याराडिज् लॉस्ट्' हीं वाचतांना आपल्या आनंदास वरील संशयवृत्तीनें व्याघात करणारा मार्मिक हा 'शाकुंतल' नाटकांतील नायक स्वनिर्मित चित्रांतल्या भ्रमराशीं बोलावयास लागून आपल्या हृदयवल्लभेच्या समागमाचें सुख अनुभवीत असतां त्रास जागें करणाऱ्या विदूषकाप्रमाणेंच महामूर्ख होय!

६. तिसरें सदर संस्कृत कविता. यावर सांगण्यासारखे आक्षेप वाचण्यांत किंवा ऐकण्यांतही येत नाहींत. याचें कारण उघडच आहे कीं जोन्स, विल्सन्, कोल्ब्रूक् सारख्यांनीं आमच्या गीर्वाण कवींचा महिमा मागेंच गाऊन त्यांची कीर्ति साऱ्या जगभर पसरविली, व त्यांचीं नांवें होमरप्रभृतींच्या पटांत सामील करून टाकलीं. त्यामुळें एतद्देशीय दूषकांचीं तोंडें तर मुळींच बंद होऊन स्वदेशनिंदेचें जें त्यांचें व्रत तें या ठिकाणीं तरी त्यांस तसेंच ठेवून द्यावें लागलें. तिकडील जी रसज्ञ मंडळी तिजपैकीं मेकॉले व मिल् या दोघां बहादरांनींच आमच्या कवींस कीर्तिमंदिरांतील अत्युच्च स्थलांवरून ढकलून देण्याचा काय तो यत्न केला; पण डोंगराशीं टक्कर घेणाऱ्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणें वरील महारसिकांनीं दंतभंग मात्र करून घेतला! बाकी त्यांच्या शुष्क आक्षेपांनीं आमचे कविवर आपल्या अढळ पदापासून कितपत ढळले

म्हणाल, तर त्यांच्या कृतींचे भोक्ते युरोपांत दिवसेंदिवस वाढतच आहेत, व त्यांस मोठमोठ्या लायब्ररींतून त्यांच्या योग्यतेनुरूप उच्चस्थानही मिळत आहे! तेव्हां या सदरावर विशेष लिहावयास नकोच.

७. याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकावर कित्येक अनभिज्ञ व अरसिक लोकांचे जे आक्षेप निघणारे आहेत त्यांचें निराकरण केलें. आतां त्याविषयीं विशेषतः प्रत्येक विभागाच्या संबंधानें लिहूं. या तिन्ही सदरांवर पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत बरेंच दिग्दर्शन केलें आहे. त्यावरच येथें अंमळ विस्तार करतों.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशकांनीं इतिहासाच्या उपोद्घातांत म्हटलें आहे कीं, ग्रांट डफ् यास जी सामग्री मिळाली होती तींतील कित्येक लेख त्यानें रचलेल्या एकंदर इतिहासा येवढाले होते. या गोष्टीचा कोणास चमत्कार वाटायाला नको. असें पहा कीं, एकट्या जॉन्सन्चें व एकट्या स्कॉट्चें चरित्र जर ग्रांट डफ्च्या इतिहासाच्या चौपट पांचपट झालें आहे, मेकॉलेनें रचलेल्या पांच मोठमोठ्या भागांत जर नुसता पंधरा वर्षांचा काय तो इतिहास आला आहे, व सामान्यतः कोणी मनुष्य कोठें पांच पन्नास कोस जाऊन आला तर तेवढ्यांतही आपल्या स्नेही मंडळीस चार घटका सांगत बसण्या-सारख्या जर गोष्टी घडून येतात, तर केवळ क्षुद्र स्थितीपासून साऱ्या हिंदुस्थानाच्या सार्वभौमत्वापर्यंत चढलेल्या अवघ्या राष्ट्राचा इतिहास सामान्य प्रतीच्या पांच सातशें पानांत यावयाचा म्हटला म्हणजे कोळ्याच्या गोष्टींतल्या प्रचंड राक्षसास लहानशा भांड्यांत कोंडून भरला होता त्यासारखीच अवस्था व्हावयाची! शिवाय कोणत्याही राष्ट्राचा इतिहास म्हटला म्हणजे केवळ राजांचे वृत्तांत व लढायांच्या हकीकती दिल्यानें होत नाहीं. वरील शब्दाचा अर्थ किती व्यापक आहे हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे.* तेव्हां या व्याप्तीप्रमाणें म्हटलें म्हणजे महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत पुढील सर्व गोष्टी आल्या पाहिजेत. प्रथमारंभीं मराठे लोकांची स्थिति शिवाजी महाराजांच्या पूर्वीं कशी होती, त्यांस पुढें जें येवढें वैभव प्राप्त झालें त्यास कारणभूत असे त्यांच्या अंगीं मूळचे गुण कोणते व कितपत होते व वरील राज्यस्थापकानें

---

* अंक ६. व्हॉल्टेर् नामें करून फ्रान्स देशांत जो महाविख्यात पंडित गेल्या शतकांत होऊन गेला त्यानें इतिहासाच्या व्याप्तीचें यथार्थ निरूपण करून त्याप्रमाणें स्वतः इतिहास रचले. याविषयीं माहिती पाहिजे असल्यास ती चकल्र्च्या इतिहासाच्या दुसऱ्या भागाच्या ६ व्या खंडांत सांपडेल.

त्यांचा विकास कोणते प्रकारानें केला, हिंदु धर्माची स्थिति त्या वेळेस कशी होती व तिनें यवनांच्या अपकर्षास कितपत साह्य केलें, इत्यादि गोष्टी मूळ उपोद्घातांत आल्या पाहिजेत. नंतर मावळे लोकांचें वर्णन, शिवाजीचे संवगडे तानाजी, बाजी, येसजी यांचे वृत्तांत, शिवाजीचें शिक्षण, सैन्य व्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार, आरमारी फौजेची तयारी, अवरंगजेबाचा दरबार, मोगली लष्कर, भगवा झेंडा, रामदासाचा राजनीतिपर व धर्मपर उपदेश, तुकारामबोवांचें कीर्तन, वामनाचें पांडित्य व कवित्व, परभू लोकांचें शौर्य, इत्यादि गोष्टी शिवराजाच्या वृत्तांतांत दाखल झाल्या पाहिजेत. नंतर संभाजीपासून शाहूपर्यंतच्या इतिहासांत सैन्यव्यवस्थेंत व राज्यव्यवस्थेंत झालेले फेर, कलुष्याचें वर्चस्व, फिरंग्यांची सत्ता, बेगम साहेबांची हकीकत व शाहूचें आपल्या शत्रूच्या घरीं वाढणें, चित्पावनांची पूर्वस्थिति व उत्कर्ष, ब्राम्हणांच्या व मराठ्यांच्या झटापटी, बाळाजीचें चातुर्य व वक्तृत्व, त्याचे दोघे बच्चे याज्ञिकीच्या किंवा कारकुनीच्या कामांत फार झाले तर वाकबगार व्हावयाचे ते हानिबल् व हास्डुबल् यांसारखे महावीर बनून शत्रूंचे काळ कसे होऊन राहिले तो प्रकार, दोघां भावांची परस्पर प्रीति, मस्तानी व समशेर बहादर, शूद्र अधिपतींचा अभ्युदय, महाराष्ट्रांतील जातिभेदजन्य वैमनस्य मोडून सर्वांचा कट करण्याविषयीं पेशव्यांचा कटाक्ष, शाहूच्या गळ्यांतील केवळ ताईत बनून गेल्यामुळें त्यानें अंतकाळीं सर्व राज्याधिकाराचें त्यांस केलेलें समर्पण, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागांत अंतर्भाव झाला पाहिजे. यापुढें तर मराठ्यांचा इतिहास म्हणजे साऱ्या हिंदुस्थानचाच इतिहास; कां कीं चारी मुलखांत त्यांचे सत्ताधारी कायम होऊन राहिले. तेव्हां नदीचें पात्र रुंदावत जातां जातां समुद्रसंगमाच्या स्थानीं जसें अफाट होऊन सागराशीं एकात्मक होऊन जातें, त्याप्रमाणें वरील काळाच्या इतिहासांत अवघ्या भारतवर्षाच्या इतिहासाचा अंतर्भाव होतो! यापुढें छत्रपतींचें किंवा पेशव्यांचें घराणें हें मागील सूत्र सुटून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पवार, बुंदेले, पटवर्धन इत्यादि शाखांच्या पृथक् विस्तारांत शिरावें लागतें. तेव्हां या सर्वांचें यथातथ्य वर्णन म्हटलें म्हणजे पुनः वरच्यासारखा प्रत्येकाचा अवांतर परिवार आला. सारांश, मराठ्यांचा इतिहास म्हणजे शिवाजीचे, बाजीरावाचे, किंवा यशवंतरावाचे पराक्रम वर्णिले किंवा नाना फडनवीसाच्या राजकारणाचें वर्णन केलें म्हणजे झालें नाहीं; तर वरील वीरांच्या मोहिमींबरोबर व मुत्सद्यांच्या मसलती बरोबरच रामशास्त्रीबोवांचा न्या-

यमनसुबा, रामचंद्र बाबाची जमाबंदी, बखतरामाची कारागिरी, दयारामाची सावकारी, गंगाविष्णूची वैद्यक्रिया, काशीनाथोपाध्यायांचा 'धर्मसिंधु' भवदेवमिश्राचें पांडित्य, अमृतरायाचें कीर्तन, मोरोपंताची आर्यावाणी, जोशीबोवांचा तमाशा, व्यंकटनरसीचें गाणें, बाळंभटदादाची कुस्तेगिरी, वगैरे सर्व प्रकार त्यांत इत्थंभूत आले पाहिजेत. त्याप्रमाणेंच त्या वेळची लोकस्थिति कशी होती,—म्हणजे बापलेक, नवराबायको, बहीणभावंडें, धनीचाकर, गुरुशिष्य इत्यादिकांचे परस्पर संबंध कसकसे होते; धर्मावर लोकांची कितपत श्रद्धा होती, त्यांचें आचरण कसें होतें; मेकॉलेप्रभृति तत्ववाद्यांच्या मताप्रमाणें सर्व येथून तेथून लबाड व मूर्ख होते किंवा कसें; त्याप्रमाणेंच शुभवर्तमानाची बातमी किंवा एकेश्वराचें वर्तमानही त्या वेळेस कानीं येण्याचा संभव नसून उलटा मूर्तिपूजेचा व पुराणांचा अंमल मात्र जारीनें सुरू होता, मग घरोघर व्यभिचार, लांडीलबाडी, मारामाऱ्या हे प्रकार सुरू असत किंवा काय; लोकांत कोणत्या विद्यांचा कितपत अभ्यास सुरू असे, व अभ्यासाची रीति कशी होती; मुसलमानी विद्येचा, भाषेचा, व रिवाजाचा कितपत प्रचार होता; मुल्ला साहेबांच्या पवित्र शास्त्रानें हिंदुधर्माच्या अंधकारांत सत्याचा प्रकाश कितपत पाडला होता, व 'न काशी मक्का वा शिवाशिव न हिंदुर्न यवनः' * ही स्थिति कितपत दृष्टीस पडत असे; याप्रमाणेंच लोकांतील उत्सव, रीतरिवाज, पेहेरावाच्या तऱ्हा, वगैरे सर्व कांहीं वरील इतिवृत्तांत समाविष्ट झालें पाहिजे. मराठे लोकांविषयीं अमुक प्रकारची एक माहिती यांत मिळत नाहीं असें जोंपर्यंत राहील तोंपर्यंत 'महाराष्ट्र देशाचा इतिहास' अपूर्णच समजावयाचा !

आतां हें खरें कीं, वरील मानानें पाहिलें असतां संपूर्ण इतिहास असा कधींही मनुष्याच्या हातून तयार व्हावयाचा नाहीं; कां कीं सर्व प्रकारची माहिती कोणाला असणार आहे ? व ती सर्व मिळावी तरी कशी ? पण असें आहे म्हणून इतिहासाचें यथार्थ स्वरूप सांगणें बरोबर नाहीं असें मात्र होत नाहीं. आकाश अनंत आहे म्हणून आपल्या आढ्याला आभाळ लागलें आहे असें म्हणून कसें चालेल ? वामनाचा श्लोक सर्वविश्रुतच आहेः—

---

* अंक ११ पृष्ठ २६ पहा.

आकाश अंत न कळोनि हि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ।

हाच न्याय धरून अर्वाचीन पाश्चात्य इतिहासकारांनीं. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास लिहितांना केवळ राजकारणाच्या उलाढालींविषयींच न लिहितां लौकिक स्थितींचें यथावत् स्वरूप उतरण्याविषयींही नेहेमी प्रयत्न केलेला आढळतो. † आतां डफ् साहेबांच्या ग्रंथांत वरील प्रकार कितपत आढळतो हें आमच्या वाचकांस सांगायास नकोच. आज पन्नास वर्षांत आमच्या महाराष्ट्राविषयींच्या माहितीचा ग्रंथ म्हटला म्हणजे काय तो त्यांचाच एक तयार झालेला आहे. त्यांत जो एकदां मजकूर आला आहे, व जीं मतें प्रगट झालीं आहेत, तीं कायम. तीं ताडून पाहण्यास दुसरा कोणताही ग्रंथ नाहीं. आतां येवढें एक बरें आहे कीं, आमचे इतिहासकार मेकॉलेच्या तालमींपैकीं नसल्यामुळें त्यांनीं आपल्या ग्रंथांत आपली फुशारकी व रिकामें अद्वातद्वा कांहीं तरी तर्कट जें भरून टाकायाचें तें न करतां आमच्या पूर्वजांचे बरेच गुण ओळखले आहेत, * व मिळवलेल्या विपुल सामग्रीचा यथार्थ उपयोग करून ती यथास्थित दिली आहे, पण वर जी अवांतर प्रकारची माहिती सांगितली तींतलें त्यांच्या बखरींत कोठें अक्षरही सांपडायाचें नाहीं. तर ती प्राप्त होण्याविषयीं जे उत्सुक असतील त्यांची इच्छा प्रस्तुत पुस्तकावरून पूर्ण होणार आहे. यांत पूर्वीचे जे जे लेख मिळतील ते सर्व छापण्याचा संकल्प असल्यामुळें वरील जिज्ञासा तृप्त होण्याचा हाच एक मार्ग

---

† आलीकडील सान्या लहान मोठ्या इतिहासांत वरील नवी पद्धति दृष्टीस पडते. त्यांतून गिबन् व मेकॉले यांच्या इतिहासांत तर ती भरपूर आढळते. मेकॉलेच्या अवांतर निबंधांचा, कवितांचा वगैरे जो एक तिसरा भाग छापलेला आहे त्यांत 'इतिहास' या विषयावर एक सविस्तर निबंध लिहिलेला आहे; त्यांत वरील पद्धतीच्या यथार्थ स्वरूपाचें प्रतिपादन केलें आहे. हा निबंध वरील ग्रंथकर्त्यानें पूर्ववयांत लिहिलेला आहे, तेव्हां यावरून स्पष्ट कळून येतें कीं, स्वदेशाचा इतिहास लिहिण्याविषयींची स्फूर्ति त्यास तेव्हांपासून होत होती !

* डफ साहेबांनीं आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच वरील अभिप्राय प्रगट केला आहे. त्याचा उतारा मागें एके ठिकाणीं (अंक २२ पृष्ठ १७) आलाच आहे; यास्तव तो पुनः येथें घेत नाहीं. प्राच्य राष्ट्रांचा इतिहास लिहिणारांनीं डफ साहेबांचेंच व्रत चालविलें असतें तर किती बरें होतें !

आहे हें उघड आहे. याशिवाय वरील इंग्रेजी इतिहासांतील जागोजागच्या खांचाखोंचा भरून काढण्यास व तो तपासण्यास वरील जुने लेख उपयोगी पडणारे आहेत व भाषाज्ञानाच्या दृष्टीनेंही ते इष्ट आहेत हें उघडच आहे. सदरील पुस्तकांत पहिलें प्रकरण जो इतिहास त्याच्या उपोद्घातांत वरील उपयुक्ततेच्या संबंधानें बराच मजकूर लिहिलेला आहे.

बाकीचे दोन भाग जे मराठी व संस्कृत कविता त्यांविषयीं विशेष कांहीं सांगायास पाहिजे असें नाहीं. पहिलीचा बराच अंश रा० माधव चंद्रोबा यांच्या हातून प्रसिद्ध झालेला आहे, व कित्येक 'ज्ञानेश्वरी' सारखे ग्रंथ भाविकजनांच्या आश्रयानेंही अनेक वेळां छापून निघाले आहेत. त्याप्रमाणेंच आलीकडे बाबू जिनानंद विद्यासागर यांनीं आपल्या छापखान्यांतून अनेक संस्कृत ग्रंथ छापून काढून सर्व संस्कृतज्ञांस सुलभ करून टाकले आहेत. तरी वरील कवितांचें कोठार अजून किती खल्लास व्हावयाचें आहे हें पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत सांगितलेंच आहे. प्रकृत मासिक पुस्तकांत आलीकडे त्यांस सांपडलेल्या तिन्ही ग्रंथांच्या यादी दिलेल्या असतात त्यांवरून, हरदासांच्या म्हणण्यांत प्रसंगवशात् जीं अश्रुतपूर्व प्रकरणें येतात त्यांवरून, व आमच्या पुस्तकाच्या २८ व्या अंकांत छापलेल्या यादीवरून, महाराष्ट्र कविता अद्याप किती प्रसिद्ध व्हावयाची आहे याची कल्पना वाचकांस बरीच करतां येईल. त्याप्रमाणेंच सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वीं छापलेलें जें 'कविचरित्र' त्यांत प्रत्येक ग्रंथकाराच्या कृतींचा उल्लेख करून शेवटीं जी एकंदर विल्हेवार याद दिली आहे तिजवरून व इतर अनेक संस्कृत ग्रंथांच्या यादीही छापलेल्या आढळतात * त्यांवरून या दुसऱ्या भागाचा विस्तारही कळून येईल. तर हे दोन्ही रसातळास मिळून नाहींसे न व्हावे, व इतक्या मोठमोठ्या ग्रंथकारांच्या परिश्रमांचें अमूल्य फळ होऊन न झाल्यासारखें न व्हावें असें जर आमच्या देशबंधूंस वाटत असेल तर

---

* जागोजागच्या पुस्तकसंग्रहांच्या यादी छापलेल्या आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं पाहिल्या असतीलच. एक याद काशीस निघणाऱ्या 'पंडित' नामक पत्रास जोडली असून ती आज कित्येक अंक सारखी चालली आहे. मुंबईस तर जुन्या संस्कृत ग्रंथांचें एक मोठें दुकानच आहे. त्यांचीही याद छापलेली आहे. हींत ६५१ संस्कृत ग्रंथ आहेत. त्यां पैकीं कित्येकांपुढें (दुष्प्राप्यम्) असा शेरा आहे. यावरून ते ग्रंथ किती टेंकीवर आले आहेत हें सांगावयाला नकोच !

तीही तजवीज सदरील मासिक पुस्तकांत होत असून रसिकांची विविधकाव्यास्वादनाविषयींची उत्कंठाही यांत पूर्ण होणार आहे.

८. येथवर प्रस्तुत पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं विवरण झालें. आतां त्याच्या विषयींच खुद्द जें लिहावयाचें तें अर्थातच फार लिहिण्यासारखें नाहीं. एकादा स्वतंत्र ग्रंथ असला म्हणजे त्याच्या भाषासरणीविषयीं, त्यांतील मजकुराच्या खरेखोटेपणाविषयीं, वगैरे लिहिणें अवश्य येतें; पण येथें तें अर्थात् कांहींच नाहीं. प्रस्तुत प्रकाशकांचा उद्योग केवळ प्रकाशनाचाच होय. जे जुने ग्रंथ आजपर्यंत अप्रसिद्ध राहिले ते सर्वांस सुलभ करून द्यावयाचे येवढेंच त्यांचें काम. त्यांचा असा या पुस्तकांतील मजकूर म्हटला म्हणजे ग्रंथारंभीं प्रसंगवशात् प्रस्तावना दिली तर ती व पृष्ठांखालच्या टिपा. यास्तव इतर पुस्तकांत बाह्य व्यवस्थेच्या संबंधाचा विचार जो केवळ अप्रधान असतो तोच येथें प्रधान होय. पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत वरील माहिती दिलीच आहे. यास्तव ती व्यवस्था आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकांत दृष्टीस पडते कीं नाहीं येवढें सांगितलें म्हणजे बस झालें.

पूर्वसंकल्पाप्रमाणें या पुस्तकांतील प्रत्येक प्रकरणाच्या पृष्ठांवर निरनिराळे अंक घातले आहेत; तेव्हां एक एक प्रकरण जसजसें पुरें होईल तसतसें तें निराळें बांधून संग्रहास ठेवतां येईल. तसेंच तिन्ही भागांतील मजकुरावर जागोजाग टिपा दिल्या आहेत. जुन्या बखरींची भाषा हल्लींच्या भाषेहून पुष्कळ प्रकारें निराळी असल्यामुळें मूळ रचना कायम ठेवून क्वचित् स्थलीं फेरफार केल्यास तो कौंसांत दाखविला आहे. अप्रसिद्ध शब्दांचे प्रसिद्ध पर्याय देऊन ठिकठिकाणीं ग्रंथांतरींची वगैरे अनंतर माहिती भरीस घातली आहे. जागोजाग ग्रांट् डफ् साहेबांच्या बखरीचा व मूळ लेखाचा विरोध किंवा दोहोंतील न्यूनाधिक्य हें दाखविलें आहे. याप्रमाणेंच मराठी व संस्कृत कवितेतही दुर्बोध शब्दांचा व्याख्या करून दोघा मराठी कवींचे यथोपलब्ध वृत्त दिलें आहे. अलीकडे दोन तीन अंकांत नवीन उपलब्ध झालेल्या ग्रंथांच्या यादीही मलपृष्ठावर दिलेल्या आहेत. असा क्रम ठेविल्यानें शोधक लोकांस शोध करण्यास सवड होणार आहे, व सदरील पुस्तक घेणारांसही प्रकाशकांपाशीं किती संग्रह होत चालला आहे हें कळल्यानें त्याच्या योग्यतेविषयीं व शाश्वतीविषयीं आश्वासन दिल्यासारखेंही होणार आहे.

सदरील पुस्तकास घेणारांच्या सोईकरतां जरी मासिक पुस्तकाचें स्वरूप

दिलें आहे, तरी वस्तुतः पाहतां त्यांत एक एक ग्रंथ संग्रहास ठेवतां येईल अशा रीतीनें प्रसिद्ध करण्याचाच उद्देश असल्यामुळें त्याचा कागद व छापणी हीं दोन्हीं तशींच ठेविलीं आहेत. कागद बराच जाड असून छापणीही सुरेख आहे. पहिल्या पहिल्या अंकांचा सांचा मात्र एकसारखा नसल्यामुळें व ते अगोदरच कापून ठेवल्यामुळें पुढें एकंदर ग्रंथ बांधतांना पंचाईत पडणार आहे; पण पुढील अंकापासून एक सांचा राखण्याची व पानें जशींच्या तशींच बांधण्याची तजवीज ठेवली आहे असें दिसतें. सातवा व आठवा हे अंक तर फारच सुरेख निघाले आहेत. तर हाच क्रम पुढें सुरू ठेवण्याविषयीं व वरील अंकांत अशुद्धेंही कोठें नजरेस येत नाहींत तर त्यांविषयींही तशीच खबरदारी पुढें ठेवण्याविषयीं पुस्तकप्रकाशकांस आम्ही सूचना करतों.

९. सदरील पुस्तक हें दोघा-उपपदधाऱ्याच्या परिश्रमाचें फळ होय ही हल्लींच्या काळाला एक मोठी लक्षांत ठेवण्यासारखीच गोष्ट होय. कांहीं काळापूर्वीं सुधारणा ऐन शिखरास जाऊन पोंचल्याचें जें मान दिसत होतें त्यास आतां कल पडून लोकांच्या मनानें उलट खाल्ल्याचीं जीं चिन्हें अलीकडे चोहोंकडे दृष्टीस पडूं लागलीं आहेत त्यांपैकींच हेंही एक होय. इंग्रेजी ग्रंथांचीं पुरश्चरणें करतां करतां ज्यांचे एकदांचे गंगेंत घोडे न्हाले, व या न्हाण्याबरोबर आपली अडाणी जन्म भाषा, वेडगळ आचार, अप्रयोजक व कुत्सित धर्म, या सर्वांचें पार क्षालन करून टाकून सुधारणेची शुद्ध तत्वें ज्यांनीं आंगीकारलीं त्यांनीं मराठी बखरी छापणें व **वामन मोरोपंतांचे** ग्रंथ प्रसिद्ध करणें हें दहापंधरा वर्षांपूर्वीं केवढें विलक्षण वाटलें असतें! हल्लीं ज्याप्रमाणें एकादा बी. ए. चड्डीकाच्या भिडवून आखाड्यांत खम ठोकून उभा राहिला असतां लोकांस आचंबा वाटेल, किंवा एकादा एम. ए. पुरा याज्ञिक बनून स्वाहाकाराला बसला असतां पाहणारे तोंडात बोट घालून राहतील, त्याप्रमाणेंच महाराष्ट्रदेशीय वीरांवर व कवींवर कीर्तिचामरें उडवून आपल्या युनिवर्सिटीच्या झग्यास कलंक लावणाऱ्या किताबवाल्याचाही सर्वांस कांहीं काळापूर्वीं अतिशय चमत्कार वाटला असता! झगेवाल्यांचीं कामें म्हटलीं म्हणजे

त्यांनीं सांजसकाळ लायब्ररीचें दर्शन चुकू देऊं नये; कधीं काळीं कोठें सभा झाली तर अध्यक्षस्थान पतकरून तेथून आपलें बिनचूक मत सर्वांच्या पुढें झोकून द्यावें,—तेंही बहुधा इंग्रेजींतच, पण अज्ञ श्रोत्यामंडळीची दया आलीच तर घेडगुजऱ्या भाषेंत; मराठी लेखणीला तर कधीं शिवायाचें नाहींच, फार मेहेरबानी झाली तर एकाद्या ग्रंथावर इंग्रेजींत अभिप्राय द्यावयाचा; त्यांतून चान्सलर साहेबांनीं बोळवणी करतांना दिलेल्या गुरुमंत्राची कोणास कधीं आठवण होऊन स्वदेशसेवा करण्याचें मनांत आलेंच, तर ती सेवा अशी छोटेखानी व्हावयाची नाहीं, तर नवे धर्म, कवितेच्या नव्या शाखा, पार्लमेंटास अर्ज, समग्र शास्त्रोदधीचें मथन,—असल्या कांहीं तरी दांडग्या प्रकरणावर उद्योग सुरू व्हावयाचा! खरेंच, ज्या मंदराचलानें अवघ्या महोदधीस गरगर फिरावयास लावून लक्ष्मी पारिजात चंद्र यांसारखीं रत्नें ढवळून बाहेर काढावीं त्यानें क्षुद्र नवनीता करतां दह्याच्या माथणींत कसें शिरावें? ज्या गजेंद्रानें सार्वभौम राजा जींत बसला आहे अशी अंबारी पाठीवर घ्यावी, त्यानें क्षुद्र पशूं प्रमाणें सामान्य व्यवहाराचीं कामें कशीं करावीं? मोठ्या अफाट दर्यावरून भर तुफानांत चालून ज्या महानौकांनीं एका देशाची संपत्ती दुसऱ्या देशांत नेऊन भरावी त्यांच्याकडून भिकार लहान नावांची कामगिरी कशी घडावी? तेव्हां आजपर्यंत युनिवर्सिटींत निपजलेल्या प्रचंड मंडळीकडून बारीकसारीक देशहिताचीं कामें झालीं नाहींत हें नीटच आहे. पण आम्हांस लिहिण्यास संतोष व अभिमान वाटतो कीं, प्रस्तुत पुस्तक चालविणाऱ्या आमच्या विद्यालयबंधूंनीं वरच्यासारख्या अस्मानू भराऱ्या मारण्याचें मनांत न आणतां आपल्या शक्तीप्रमाणें ही अल्प देशसेवा करण्याचें योजून ती बिलकुल कसर न करतां ते दर महिन्यास बजावीत आहेत. तर आतां आमच्या देशबंधूंस शेवटीं येवढीच प्रार्थना आहे कीं, त्यांच्या ठायीं या आर्यभूमीविषयीं जर खरी प्रीति व पूज्यबुद्धि वसत असेल, आपल्या पूर्वजांविषयीं खरें ज्ञान करून घेण्याची जर त्यांची इच्छा असेल, स्वभाषेच्या अभ्युदयाविषयीं जर ते कळकळ बाळगीत असतील, अनेक कवींचीं वाग्रत्नें जीं साऱ्या देशभर केरांत लोळत आहेत व कोंदणाविना ज्यांची प्रभा व्यर्थ होऊं पाहत आहे त्यांचा संग्रह करून काव्यरसाच्या अनुपम आस्वादास आपणास व आपल्या संततीस जर अक्षयीं अंतरावयाचें नसेल, तर या नव्या उभारलेल्या इमारतीस अर्थद्वारा व शोधद्वारा मदत करण्यास त्यांनीं बिलकुल अनमान करूं नये. प्रस्तुत उद्योग हा मोठा अवाढव्य असल्यामुळे

त्यास जसजसें लोकांचें आनुकूल्य दृष्टीस पडेल तसतसें पुस्तक वाढविण्याचा ही प्रकाशकांचा पूर्ण मनोदय आहे हें सांगून लेखणी ठेवतों.*

---

**सुभाषित**—( १ ) दीपो भक्षयते ध्वांतं कज्जलं च प्रसूयते ।
यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥

" दीप हा अंधकाराचें भक्षण करतो आणि काजळास प्रसवतो. ठीकच आहे, जसें नित्य अन्न खावें त्यासारखी प्रजा होते ! "

( २ ) ललाटे कस्तूरीतिलकमबलाः कज्जलरुचिं
दृशोः कर्णद्वंद्वे विमलमणिताटंकयुगलम् ।
गले मुक्तामालां शुचि वसनमंगे च सततं
वशीकर्तुं विश्वं दधति खलु बाह्योपकरणम् ॥

" ललाटाचे ठायीं कस्तूरीचा तिलक, डोळ्यांत अंजन, दोन्ही कानांत मणिताटंक ( रत्नांचीं तानिवडें ), गळ्यांत मुक्ताहार, शुचि वस्त्र निरंतर परिधान केलेलें,—या सर्व थाटावरून मला असें वाटतें कीं, स्त्रिया ह्या सर्व विश्वाच्या वशीकरणार्थ वरील साहित्य बाळगीत असतात ! " वशीकरणास तिलक, अंजन, मणि वगैरे सामग्री अवश्य असून निरंतर सोंवळ्यांत राहिलें पाहिजे हें लोकप्रसिद्धच आहे.

( ३ ) स्नेहोपपन्न इति पूर्णदशाविशेष—
शाली स्वमात्मनि वसुप्रकरं निधाय ।
लब्धोदये तमथ गृण्हति पद्मबंधौ
दीपा भवंति कलुषा बलवान् हि लोभः ॥

" सूर्यानें अस्तंगमनाच्या समयीं दीपांचे ठायीं आपला वसु-( तेज; द्रव्य )-

---

* प्रस्तुत पुस्तकाच्या मलपृष्ठांवर उपलब्ध झालेले म्हणून जे ग्रंथ आलीकडे दिलेले आढळतात त्यांवरूनच पाहतां ४८ पृष्ठांच्या मानानें सध्यां जमलेला साठा ही केवढा आहे याची कल्पना थोडी बहुत वाचकांस होईलच. दोनच उदाहरणें वरील उद्देशाच्या प्रत्ययार्थ देतों. **मुक्तेश्वराचें** ' वनपर्व ' सध्यां चालू आहे व **मोरोपंताच्या** ' मन्त्ररामायणा '-चा ही कांहीं भाग निघाला आहे; पण हे दोन्ही ग्रंथच समग्र निघण्यास हल्लींच्या मानानें ही दोन अडीच वर्षें तरी लागतील !

समूह जो ठेवला, कीं हे स्नेहयुक्त (पक्षीं, तैलयुक्त) आहेत व पूर्णदशेनें (संपन्नतेनें—वातीच्या अग्रानें) विराजमान आहेत असें समजून,—तेच दीप त्यानें आपल्या उदयकालीं आपला वसुप्रकर माघारी घेतला असतां ज्यापक्षीं मलिनमुख होतात त्यापक्षीं लोभ हा परम दुर्धर आहे असें म्हटलें पाहिजे!"

(४) मौनं कालविलंबश्च प्रयाणं भूमिदर्शनम्।
भ्रुकुटयन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः ॥

"आपलें कोणापाशीं कांहीं काम असलें आणि त्यानें बळकट मौन धरलें, किंवा कामास उशीर लावला, अगर न भेटतां चालता झाला, किंवा गांठ पडली असतां भुईकडे पाहूं लागला, अथवा त्याच्या कपाळावर आठी दिसली, किंवा मुद्दाम दुसऱ्याकडे पाहून बोलूं लागला, म्हणजे नन्नाचा पाढा समजावा. नकाराचे वरील सहा प्रकार आहेत."

(५) लज्जे त्वं मज्ज सिंधौ गिरिवरशिखरे त्वंच तिष्ठ प्रतिष्ठे
शांते प्रांते दिशांते कुरु वसतिमहो गर्व खर्वो भवाशु।
तेजः पातालमूलं भज भुवि भगवन् मान मा नाम तेऽस्तु
प्रेम्णैकामाश्रयंतीं सततमहमिमां तूर्णमाशां श्रयिष्ये ॥

"हे लज्जे! तूं समुद्रांत बुडी मार; हे प्रतिष्ठे! तूं एकाद्या मोठ्या पर्वताच्या शिखरावर जाऊन बैस; हे शांते! दिशांच्या प्रांतभागीं तूं वस्ती कर; हे गर्वा! तूं ठेंगणा होऊन रहा; हे तेजा! तूं पाताळाच्या तळवटीं जाऊन बैस; हे भगवंता माना! तुझें नांवही येथें राहूं देऊं नको;—कां तर मला प्रेमानें धरून राहणारी जी द्रव्यतृष्णा तिचाच मी इतःपर अंगीकार करणार!" तात्पर्य, धनलोभ म्हटला म्हणजे वरील साऱ्या मंडळीस पूर्ण रजाच मिळाली म्हणून समजावें.

(६) यः पठति लिखति पश्यति परिपृच्छति पंडितानुपासयति।
तस्य दिवाकरकिरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः ॥

"जो अध्ययन करतो, लिहितो, जगाच्या व्यवहाराचें किंवा पुस्तकांचें वरचेवर अवलोकन करतो, नेहेमी संशयनिवृत्ति करून घेतो, पंडितांच्या समागमें

असतो, त्याची बुद्धि सूर्यकिरणांनीं जशी कमलिनी तशी विकास पावत जाते!" *

( ७ ) पक्ष्माग्रग्रथिताश्रुबिंदुनिकरैर्मुक्ताफलस्पर्द्धिभिः
कुर्वंत्या हरहाससहारि हृदये हारावलीभूषणम् ।
बाले बालमृणालनालवलयालंकारकांते करे
विन्यस्याननमायताक्षि सुकृति कोऽयं त्वया स्मर्यते ॥

"हे बाले! मुक्ताफलांची स्पर्द्धा करणारे जे पक्ष्माग्रापासून गळणारे अश्रु-बिंदु त्यांनीं शिवहास्यतुल्य शुभ्र वक्षःस्थलावर मोत्यांचा जणूं काय हारच धारण करणारी जी तूं, ती कोंवळ्या कमलतंतूंच्या वलयांनीं सुशोभित केलेल्या हस्तावर आपलें मुख टेकून कोणत्या धन्य पुरुषाचें एकाग्रतेनें ध्यान करीत आहेस?"

( ८ ) साहजिकरूपवत्या भवति भवत्या विभूषणं भारः ।
सर्वांगसौरभिण्या दमनकवल्ल्याः किमालि कुसुमेन ॥

"साहजिक सौंदर्यानें मंडित जी तूं त्या तुला अलंकार हे केवळ भाररूप होत! पहा कीं, सर्वांगांहीं सुगंधपरिपूर्ण जी दमनवल्ली ( दवणा ) तिला हे सखि! पुष्पांचें काय प्रयोजन होय?"

( ९ ) कर्णलंघिगुणोत्कर्षास्त्यागिनो धन्विनस्तथा ।
निष्फलान्न विमुंचंति मार्गणान् संमुखे स्थितान् ॥

"( दातृपक्षीं ) दाते जे आहेत ते मार्गणांस ( याचकांस ) त्यांचा गुणो-त्कर्ष त्यांच्या कानावरून गेला असतां व ते संमुख आले असतां त्यांस निष्फल दवडीत नाहींत; म्हणजे अर्थात् त्यांची योग्य संभावना करून त्यांस बोळ-वितात!

"( धन्विपक्षीं ) धनुर्धर जे आहेत ते संमुख म्हणजे हातास आलेल्या

---

* बेकनचें वाक्य वाचकांस आठवेलच:—

"वाचनानें मनुष्य बहुश्रुत होतो; लिहिण्यानें ठाकठिकी येते, आणि संभाषणाच्या योगानें समयसूचकता येते."

( "Reading makes a man full, writing exact, and conversation ready." )

मार्गणांस ( बाणांस ), कीं ज्यांचा गुण ( दोरी ) आकर्षून कर्णप्रदेशापर्यंत आणला आहे, त्यांस निष्फल सोडीत नाहींत; म्हणजे नीट लक्ष्यावर योजून त्यांचें संधान करतात ! "

( १० ) विश्रांतो दूरादहमुपगतो हंत मलया-
त्तदेकं त्वद्गेहे तरुणि परिणेष्यामि दिवसम् ।
समीरेणोक्त्येवं नवकुसुमिता चूतलतिका
धुनाना मूर्द्धानं नहि नहि नहीत्येव वदति ॥

वसंतांतील वाऱ्यानें डोलणाऱ्या आम्रमंजरींवर उत्प्रेक्षा—

"हे प्रमदे ! हा मी येवढ्या दूरच्या मलयाचलापासून चालत आल्यामुळें अगदीं दमून गेलों आहें, तर एक दिवसभर तुझ्या घरीं मला राहूं दे,—याप्रमाणें वसंतवायूनें प्रार्थना केली असतां नवपुष्पित (श्लेषार्थ स्पष्टच आहे! ) जी आम्रलता ती शिरःकंपानें छे छे छे म्हणून जणों काय त्याचा निषेध करते ! "

( ११ ) यद्यपि धनेन धनिनः क्षितितलनिहितेन भोगरहितेन ।
तस्माद्वयमपि धनिनस्तिष्ठति नः कांचनो मेरुः ॥

"पृथ्वीच्या पोटांत पुरून ठेवलेलें जें अनुपभुक्त धन त्याच्या योगानें जर धनी आपणास धनवान् म्हणवीत असतील, तर मग आम्हीही श्रीमंतच आहों,—अवघा सुवर्णमेरु आमचाच आहे ! "

( १२ ) काचिन्मृगाक्षी प्रियविप्रयोगे
गंतुं निशापारमपारयंती ।
उद्गातुमादाय करेण वीणा-
मेणांकमालोक्य शनैरहासीत् ॥

"कोणी विरहिणी रात्र जाईना म्हणून सतार जवळ घेऊन आतां तिजवर गाणार तों मृगांकाकडे पाहून मंदस्मित करती झाली ! " अभिप्राय उघडच आहे कीं, रात्र जाण्याचा जो उपाय आपण करणार तोच ती लांबण्यास मात्र कारण होईल असें तिच्या तेव्हांच लक्षांत आलें. लांबण्याचें कारण 'मृगांक' शब्दांत सूचित होतें. मृग हे सुस्वरास अत्यंत लुब्ध असल्यामुळें तो थांबला असतां चंद्राची गति सहजच खुंटली !

(१३) उद्योगादनिवृत्तस्य ससहायस्य धीमतः ।
छायेवानुगता तस्य नित्यं श्रीः सहचारिणी ॥

"निरंतर नेटानें उद्योग करणारा, बुद्धिमान्, आणि ज्यास मित्रांची अत्यंत अनुकूलता आहे, अशा पुरुषाच्या मागोमाग संपत्ति ही छायेप्रमाणें सदोदित चालत असते !"

(१४) विरला जानंति गुणान् विरलाः कुर्वंति निर्धनस्नेहान् ।
विरलाः परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरलाः ॥

"गुणज्ञ लोक विरळ सांपडतात, निर्धन पुरुषाशीं स्नेह ठेवणारे विरळा, दुसऱ्याच्या कार्याला झटणारे थोडेच, आणि परदुःख पाहून कळवळणारेही थोडेच !"

(१५) का विद्या कवितां विनाऽर्थिनि जने त्यागं विना श्रीश्च का
कः सूनुर्विनयं विना कुलवधूः का स्वामिभक्ति विना ।
को धर्मः स दयां विना नरपतिः को नाम नीतिं विना
भोगाः के रमणीं विना क्षितितले किं जन्म कीर्तिं विना ॥

"कवितेशिवाय विद्येची काय शोभा ? याचकांस दान न केल्यास ती संपत्ति काय उपयोगाची ? विनयहीन पुत्र काय कामाचा ? नवऱ्यावर जिची भक्ति नाहीं अशा कुलवधूस काय करावें ? दया नाहीं तर धार्मिकता ती कसली ? नीति ज्यास अवगत नाहीं त्यास राजा काय म्हणावें ? रमणीय स्त्रीच्या व्यतिरिक्त भोगांत काय मजा ? कीर्तियुक्त नाहीं तर तें जिणें कसचें ?"

(१६) निष्पद्मं शिशिरेण धीवरगणैर्निर्मत्स्यनिःकूर्मकं
व्याधैर्निर्विहगं निरंबु रविणा निर्नालकं दंतिभिः ।
निःशालूकमकारि शूकरगणैर्नामैकमात्रं सरो
हे जीमूत परोपकारक पयोदानेन मां पूरय ॥

"हें सरोवर शिशिर ऋतूनें निष्पद्म करून टाकलें आहे, धीवरांनीं त्यांतील जलचर पार केले आहेत, व्याधांनीं त्याच्या तीरीं विहार करणाऱ्या पक्ष्यांचा संहार केला आहे, रवीनें जल शोषून टाकलें आहे, हत्तींनीं त्यांतील कमलिनी उपटून विध्वंस केला आहे, डुकरांनीं चिखलांतील गवत खाऊन

पार के आहे,--तेव्हां या सर्वस्व नाशामुळें हें केवळ नामशेष होऊन बसलें आहे; तर हे परोपकारक मेघा ? मजवर दया करून मला भरून टाक ! ”

( १७ ) बधिरयति कर्णकुहरं वदनं मूकयति नयनमंधयति ।
कुटिलयति गात्रयष्टिं संपद्दोषोऽ यमद्भुतो लोके ॥

“ संपत्तीचा विकार साऱ्या रोगांहूनही प्रबळ आहे. पहा कीं, याच्या योगानें कान बहिरे होतात, वाचा बसते, डोळ्यांनीं दिसेनासें होतें, आणि शरीर वाकडें होतें ! ” हें लाक्षणिक वर्णन सर्वांस समजण्यासारखेंच आहे.

( १८ ) यावच्छकलितो वायुरेकीभवितुमर्हति ।
तावदेव तुरंगोऽयमाजगाम जगाम च ।

कोणी घोड्याच्या वेगाचें वर्णन करतो:—

“ वायु दुभंग झाला असतां तो पुनः मिळून एक जों होतो न होतो, तोंच हा घोडा गेला आणि आला सुद्धां ! ”

( १९ ) चिकीर्षिते कर्मणि चक्रपाणे-
र्नापेक्ष्यते तत्र सहायसंपत् ।
पांचालजायाः पटसंविधाने
मध्येसभं यन्न तुरी न वेमा ॥

“ भगवंताच्या मनांत कोणतीही गोष्ट कर्तव्य असली म्हणजे तेथें साहाय्याची अपेक्षा असते असें नाहीं. पहा कीं, जेव्हां द्रौपदीच्या लज्जारक्षणार्थ तो धांवला तेव्हां सभेच्या मध्यें धोंट्या किंवा चात्या चालवाव्या लागल्या नाहींत ! ”

( २० ) अंब श्राम्यसि तिष्ठ गोरसमहं मथ्नामि मंथानकं
प्रालंब्य स्थितमीश्वरं रसभसं दीनाननो वासुकिः ।
सासूयं कमलालया सुरगणः सानंदमुद्वाष्पयं
राहुः प्रैक्षत यं स वोऽस्तु शिवदो गोपालबालो हरिः ॥

“ आई ! तूं दधिमंथन करतांना दमली आहेस तर थांब, मी अंमळ मंथन करतों—असें म्हणून मंथानकाचें ज्यानें ग्रहण केलें असतां ज्याच्याकडे वासुकि दीनमुख होत्साता पाहूं लागला, लक्ष्मी सवतीमत्सरानें पाहूं लागली, देवगण

आनंदित होत्साते बघूं लागले, आणि राहु सभय होत्साता पाहूं लागला, तो गोपालपुत्र हरि तुम्हांस कल्याणप्रद होवो!" वरील वृत्तींचीं कारणें उघडच आहेत कीं, वासुकीस पूर्वींच्या करकोच्यांची आठवण होऊन पुनः तो प्रसंग येतो कीं काय असें वाटलें; लक्ष्मीस वाटलें कीं, या मंथनाच्या योगानें मला सवत निर्माण होते कीं काय कोण जाणें; देव नव्या अमृताविषयीं सस्पृह झाले; आणि राहूस आपणावर पुनः काय प्रसंग गुदरतो कोण जाणें हा धाक पडला!

---

## पत्रें.

### तमाखु.

**भ्रातः कस्त्वं? तमाखुः, कुतइह गमनं? दूरमम्भोधिपारात्,**
**कस्य त्वं दण्डधारी? नहि तव विदितं? श्रीकलेरेव राज्ञः।**
**चातुर्वर्ण्यं विधात्रा सुचिरविरचितं दूर(?)भिन्नस्वभावम्**
**एकीकर्तुं बलात्तन्निखिलजगति रे शासनादागतोस्मि.॥**

मालाकार, आम्हां **षट्पदां**पैकीं पहिल्यास आपण स्थल दिलें. तेणेंकरून धीर येऊन मी दुसरा आज आपल्या दुसऱ्या एका पुष्पांत रिघाव करून घेण्यास सरसावत आहें. पहिल्या **षट्पदा**च्या गुंजारवांत एक दोन चुका झाल्या, त्या आपण तशाच ठेविल्यात. असो, पुढें मागें त्याचें पहातां येईल. माझ्या शब्दांमध्यें मात्र कोठें अशुद्ध किंवा विसंगत दिसल्यास तें नीट करण्याची आपणास सविनय प्रार्थना आहे.

मालाकार, मी एका उद्यानपरंपरेमध्यें इतस्ततः परिभ्रमण करीत असतां आपल्या मित्रास समोरून येतांना पाहिलें. आमची गांठ पडली. रामराम झडले. एकमेकांस कुशलवर्तमान विचारण्यास आरंभ झाला. तेव्हां माझ्या मित्रानें एक अपूर्व वर्तमान सांगितलें. तो म्हणाला, "तुला सांगण्याजोगी एक खबर आहे. **युरोपांत फराशीस** लोक आहेत त्यांणीं तमाखूस आपले देशांतून हद्दपार करण्याचा बेत केला आहे; व तमाखूस उचलून टाकण्यास जो कोणी यंत्रें बनवील, व तीस छिन्नभिन्न करण्यास जो कोणी शस्त्रें तयार करील त्यास योग्यतेनुरूप बक्षीस मिळेल म्हणून त्यांणीं जाहिराती लाविल्या आहेत." असें

विलक्षण वर्तमान सांगून त्याणें मला विचारलें, " कसेंकाय ? तुला कसें वाटतें ? आपल्या देशांतील लोकांनीं देखील अशी एक जाहिरात देणें अवश्य नाहीं काय ? " मी म्हटलें, " कां बुवा ? इतका गहजप त्या तमाखूवर कां ? " मित्र म्हणतो, " हें काय विचारतोस ? अरे या तमाखूनें सर्वांस वेडें करून सोडलें आहे. तेव्हां हें व्यसन सुटल्याखेरीज ह्या आमच्या अनिष्ट दशेस जाऊन पोंचलेल्या राष्ट्रास उन्नति यावी कशी ? आमच्या लोकांत जीं व्यसनें दृष्टीस पडतात त्यांत ह्या सारिखें दुसरें अहितकारक नाहीं. एकदां या बेटीचा छंद लागला कीं, मग तिजशिवाय चैन पडत नाहीं. जे हिच्या नादीं लागले त्यांस ' रजनी दिवस गमेना'सें होऊन त्यांचें मन कोठेंही लागत नाहींसें होतें. बरें हिच्या संगतीपासून तादृश सुख किंवा नफा होतो असेंही नाहीं. तेव्हां हा विनाकारण उपाधि पाहिजे कशाला ?तशांत तमाखू परदेशस्थ आहे. आपल्या देशांत या बाईचा जन्म नाहीं. ती **मांचेस्टर**च्या वस्त्रांप्रमाणें परदेशाहून येथें येऊन आपला अंमल आम्हांवर बसवते. हें आम्हांस मोठें लांछन नव्हे काय ? आणि हें लांछन दूर करण्यास आम्ही तमाखूचें उन्मूलनार्थ जाहिरात देणें हें अवश्य नाहीं काय! " हें सर्व ऐकून घेऊन मीं म्हटलें, " बाबा, अशा निश्चयाची गोष्ट सध्यां आमच्या लोकांत असो. पण तूं म्हणतोस ही बाई परदेशस्थ आहे. तर मग काय ही आमच्याकडे पूर्वीं नव्हतीच ? **रामरावणांचे** युद्धांत **लक्ष्मणास** शक्तिप्रहार होऊन तो मूर्छित पडला. त्या काळीं साक्षात् **बलभीमानें** समुद्राचे समुद्र ओलांडून औषधीभांडाररूप जो द्रोणपर्वत तो आणिला. तेसमयीं आकाशमार्गी **मारुति** वेगानें पर्यटन करीत असतां वरील खनिज, उद्भिज, व प्राणी सर्वच हडबडून गेले. तेव्हां ही बाई आमच्या देशांत पतन पावली, असें सांगतात. कोणी म्हणतात हिचें नांव तेव्हां अमृतवल्ली असें होतें. हिला **लंकेस** नेलें, व **सुषेणानें**[1] हिच्या स्तन्याचें याचन केलें. ती तें देईना. इकडे तर **लक्ष्मणाचे** प्राण कासावीस होऊं लागले तेव्हां वानरांनीं ' तूं मातेसमान आहेस ' असें तिला सांगून तिचें दुग्ध बलात्कारानें काढिलें व **लक्ष्मणाचा** प्राण वांचविला. इकडे ती अमृतवल्ली आपला अपमान झाला व परहस्तस्पर्श झाला, तें न साहून प्राणत्याग करण्यास गेली. तें **रामचंद्रानें** पाहून तिचें नानाप्रकारें समाधान केलें. पण ती आपला नाद सोडीना. तें पाहून **रामचंद्रानें** तिला वर माग म्हणून सांगितलें. तेव्हां

---

१ सुषेण हा वानर सैन्यांतील वैद्य होय.

त्या बाईनें असा वर मागितला कीं, " मी तर आतां प्राण देणारच, पण अन्य जन्मीं, ज्यांणीं माझा आज अपमान केला, ते व दुसरे मृत्युलोकचे लोक हे सर्व मला भजोत व माझ्या सेवेंत तत्पर होवोत, हा वर मला द्यावा. " **रामचंद्र** तथास्तु म्हणाले. नंतर बाईनें डोकें फोडून जीव दिला. तिचें कुणप **रामचंद्रानें लंका** बेटांतून काढून **सह्याद्री**च्या जवळ नेऊन टाकण्यास वानरांस आज्ञा केली. ती ही अमृतवल्ली तमाखु नावानें येथें अवतीर्ण झाली. तेव्हां अशी तमाखूची उत्पत्ति आणि तुम्ही तर ती परदेशस्थ म्हणून तिचें उत्थापन करण्याचा बेत मांडिला आहे, हें कसें? " हें माझें भोळसर बोलणें ऐकून मित्रास हसूं आलें, तरी तें दाबून तो म्हणाला, " तूं गोष्टी सांगितल्या त्यांत फारसें तथ्य नाहीं. अशा भाकड कथा किती ह्या देशांत पडल्या आहेत. तरी ह्या तुझ्या गोष्टींतच जो कांहीं अर्थ निघेल तो तिचे परदेशस्थत्व सिद्ध करण्यासच उपयोगीं पडेल. असो, इच्या परदेशस्थत्वाविषयीं तुला सप्रमाण माहिती सांगतों. **कोलंबसानें** प्रकट केलेल्या नूतन महाद्वीपामध्यें **युकाटन** ह्या देशांत **टोब्याको** नावांचा जो प्रांत आहे तेथील ही मुळची रहिवासी. म्हणून हिचें नांव 'तमाखू.' **अमेरिकें**तून ती इकडे आली. ही गोष्ट, तूं जें आतां सांगितलें कीं, **मारुतीनें** समुद्राचे समुद्र ओलांडून **द्रोणाचल** आणिला त्याशीं जमतेंच. असो, **युकाटन** देशांतून हिजला **स्पानिश** लोकांनीं **युरोपां**त प्रथम आणिलें. नंतर निरनिराळे लोक जसजशीं **अमेरिकें**त पर्यटणें करून परत **युरोपां**त येऊं लागले तसतसा हिचा प्रभाव फैलावत चालला. ही गोष्ट ह्या बाईस निरनिराळ्या देशांत जीं नामाभिधानें प्राप्त झालीं आहेत त्यांवरून सिद्ध होते. **डयानिश** लोक हिला 'टोब्याक्' म्हणतात. **रुशियाचे** लोक 'टबक्' असें नांव देतात. **इटालियन्** नांव 'टोबाको' असें आहे. आपले **इंग्रज**ही हिला हेंच नांव देतात. **तुर्की** लोकांची भाषा, जाति, उच्चाराची रीति निराळी; ते हिला 'डोखण' म्हणतात. **तेलगू** भाषेंत 'पोग्याको' असें रूप झालें. **मलयां**तील लोक 'तांम्राका' म्हणूं लागले. **लाटिन्** 'टब्याकुम्'. **संस्कृत** * 'ताम्रकूट'. मराठी 'तमाखु' **यूरोपीय** ग्रंथांतील शास्त्रीय नांव

---

* संस्कृत वैद्यकग्रंथांत तमाखूचें नांवें आहेसें माहीत नाहीं. 'ताम्रकूट, 'धूम्रपत्र' वगैरे नांवें जमवून जुळवून दिलीं आहेत. जर तमाखूस संस्कृत नांव खरें असतें तर वर व खालीं लिहिलेल्या श्लोकांत-ते बरेच जुनें असावे—तें घातलें असतें. श्लोक केले त्या वेळेस 'ताम्रकूट' वगैरे नांवें माहीत नवतीं, व तीं अगदीं आलीकडचीं आहेत हें सिद्ध होतें.

' निकोटिआना टब्याकुम् ' अशी इची नामपरंपरा आहे. ह्यावरून ही बाई **अमेरिकेंतून युरोप** व **एशिया** खंडांत आली असें होतें. **चिनांतून** ती आली असा कोणी तर्क करितात. पण निदान आमच्या देशांत तरी ती तिकडून आली नाहीं. पश्चिम दिशेनेंच तिचा प्रवेश झाला. **चिनांतून** आली असें म्हणावें तर संस्कृतांत ' चीनांशुक ' आहे तसें कोठें ' चीनौषधी ' किंवा ' चीनवल्ली ' ऐकिवांत नाहीं. तशांत माझे म्हणण्यास ऐतिहासिक पुरावाही सबळ आहे. **अकबराचा** पुत्र जो जगज्जेता **सेलिम** त्याणें ह्या बाईच्या संचारास प्रतिरोध करण्याकरितां कायदे करून हिचें सेवन करणारांस शिक्षा ठरविल्या. त्यावरून १६ व्या व १७ व्या शतकांत जे व्यापारी युरोपांतून हिकडे आले, त्यांजकडे ह्या चांडाळणीस आमचा दरवाजा दाखवून आमचा व तिचा संबंध जोडून दिल्याचें श्रेय येत नाहीं असें कोण म्हणेल ? असो, तेव्हां ह्या दुष्टेचें उन्मूलन करण्याविषयीं आमच्या देशबांधवांनीं अवश्य कंबर बांधिली पाहिजे. "

असा माझा मित्र स्वदेशसुधारणेच्या भरांत मोठ्या आवेशानें बोलत असतां, माझ्या मनांत त्याच्या अशा पोकळ आशांविषयीं पुष्कळ विचार घोळत होते. मी त्यास म्हणणार होतों, " अरे ' आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः ' अशी म्हण आहे, त्या ठिकाणीं 'आरंभशूराः खलु भारतीयाः' असेंही म्हणण्याचा काल येत आहे. तर ह्या निश्चयाविषयीं गप्पा कशास पाहिजेत ? देशी माल वापरण्याचा निश्चय, लहानपणीं लग्न न करण्याचा निश्चय, दारू न पिण्याचा निश्चय, तशांतलाच तुझा तमाखु-समुन्मूलनाचा निश्चय हो. " अशा प्रकारचें मित्रास कसें बोलावें असा विचार करीत मी चाललों होतों. माझा मित्रही " आणि-- " म्हणून पुढें तमाखून्मूलनाविषयीं आवेशानें बोलणार होता. इतक्यांत तेथें चमत्कारिक कर्कश ध्वनी उत्पन्न झाला कीं, " अरे ! जारे ! तुमची **भारतीयांची** कथा ती काय ? मी **फराशीस** लोकांचा देखील समाचार घेणार. करूं देत त्यांस काय करीत आहेत तें. मी कां अशी जावयाची आहें ? मीं जें झाड एकदां धरिलें तें कधीं सोडणार नाहीं. समजलां ? " इतके कर्कश घोगऱ्या गळ्याचे शब्द झाल्यावर **फरांशीस** लोकांच्या प्रयत्नांस उद्देशून खालीं लिहिलेली पद्यरचना कर्णीत ठांसून गेली:——

" मला घालवाया करी यत्न काय ?
करो स्वस्थ; त्याचा न चाले उपाय. "

नंतर अप्रतिहत संचाराविषयीं हें सूक्त बाहेर आलें:—

"जसा पाय मीं ठेविला बंदरांत
तशी थेट कीं धांवलें कंदरांत.
झटे मंडळी भूपतींची अशेष
मुखीं रोधण्यालाहि माझ्या प्रवेश;
परी तैल तोयीं, तसे देश सर्व,
अकुंठ प्रचारें; हरी भूपगर्व."

मालाकार! सावध व्हां. हा ध्वनी व मधून मधून त्या कर्कश किंकाळ्या ऐकून तुमचा पिशाचास्तित्वाचा निषेध व तदर्थ तुमचें सर्व प्रतिपादन— जीं सर्व शरीरभर पसरलीं होतीं तीं—एका निमिषांत गुंडाळून जाऊन त्यांस अतिसूक्ष्म रूप प्राप्त झालें. माझी तर पांचावर धारण बसली. सर्वांग लटलटां कापूं लागलें. मित्राचीही स्थिति फारशी चांगली होती असें नाहीं. तरी तो त्यातल्या त्यांत धीट पडला. त्याणें धैर्य करून, "तूं कोण?" म्हणून विचारलें. विचारतांच, "अरे मी कोण! तुम्हांस ठाऊक नाहीं? पूर्वी एका भारतीयानें असाच प्रश्न केला होता. तेव्हां त्याचा माझा जो संवाद झाला तो तुम्हास सांगते." असें म्हणून "भ्रातःकस्त्वं" इ० आजचा प्रतीकभूत श्लोक म्हटला; व पुढें "समजलें आतां मी कोण ती" असा प्रश्न झाला. हें ऐकून मीही जरा धीर करून म्हणालों, "होय, पण आपल्या बोलण्यावरून एक दोन शंका आल्या त्यांचा निकाल करावा म्हणजे समाधान होईल." "कोणती शंका, कोणती शंका? बोल लवकर." असा मोठा गडगडाट झाला. "होय महाराज," मी हळूच म्हणालों. "प्रथम 'आगतोस्मि' 'दण्डधारी' इत्यादि पदांवरून आपण पुरुष आहां असें वाटलें. पुढें 'मी कोण आहें ती' असें आपण बोललां. तेव्हां याचा निर्णय कसा?" तमाखू खिदखिदां हसून म्हणाली, "वा, तूं आहेस बचडा! असो, मी असाच एक विलक्षण पदार्थ आहें कीं मला पाहिजे तेव्हां स्त्रीरूप किंवा पुरुषरूप धारण करतां येतें. ही कलिराजाची मजमध्यें विशेष योजना आहे. मला पुरुष व स्त्रिया यां दोघांसही वश करणें आहे तेव्हां पुरुषास वश करण्यास मला स्त्री बनतां येतें, व स्त्रियांस माझ्या मोहपाशांत गुंतविणें असल्यास मी पुरुष बनतें. आतां हें खरें कीं, पुरुष जितके माझ्या स्त्रीरूपास लंपट झाले तितक्या स्त्रिया माझ्या पुरुषरूपास भुल-

त्या नाहींत. त्या बेटना स्वभावतःच मोठ्या चांच. तरी त्यांसही हळू हळू मी आपल्याकडे ओढणार. असो, तुझी दुसरी शंका काय?" हें तिचें उत्तर व प्रश्न ऐकून—'तिचें' म्हणतों याचें कारण ती मला स्त्रीरूपच दिसत होती—मीं पुढें विचारलें, "'अंभोधिपारात्' असें आपण म्हणालां तर आपलें मूलपीठ भरतखण्ड नव्हे काय? व जर नसेल तर आपली स्वारी कोणीकडून इकडे आली?" तमाखु म्हणाली, "नाहीं, बाबा, मी या देशची मूळची राहणारी नाहीं. मला रसातळांतून यूरोपीय लोकांनीं प्रथम आणिलें. नंतर त्यांणींच माझा येथें प्रवेश करवून तुम्हांवर मोठा अनुग्रह केला. हल्लीं तुम्हांला ठाऊक आहेच कीं, तुमच्या भरतखंडांत मी जिकडे तिकडे संचार करतें, व आपल्या स्त्रीच्या अगर पुरुषाच्या अनेक रूपांनीं सकल जनांस सुखवितें." माझ्या मित्राला हें बोलणें फार लागलें, पण करतो काय? वस्तुतः पहातां गोष्ट तशीच आहे. तो म्हणाला, "खरी गोष्ट बाई, पण मघां आपण म्हणालां 'झटे मंडळी' इ० हें क... कशी झटली ही भू...ळी आपल्या प्रवेशास अवष्टंभ करण्यास? ... कसा परिहार केल. आप..." तमाखु सांवरून उत्तर करते, "अरे ...त्रानें मजविषयीं तुम्हांस माहिती मुळींच नाहीं असें वाटतें. तर सांगतें हें नीट कान देवून ऐका. स्पानिश लोकांचा व माझा स्नेह प्रथम युकाटन येथें झालासें मला वाटतें. त्यांणीं लगेच युरोपांत आपल्या मित्रांशीं माझी मैत्री करून दिली. पुढें राले साहेब याणें मला इंग्लंडांत नेलें. तेथें थोडेच वेळानें 'पढतमूर्ख' या टोपण नांवाचा राजा झाला. त्याणें माझा प्रवेश बंद करावा व मला घालवून द्यावें म्हणून सख्त हुकूम सोडिले व लांब लांब शब्दांचे कायदे केले. पण व्यर्थ. मीं इंग्रज लोकांस वश करून त्यांची हल्लीं पूर्ण प्रीति संपादन केली आहे. आठवा अर्बन् व नववा इनोसेंट् म्हणून जे ख्रिस्ती लोकांचे धर्माध्यक्ष झाले त्यांणीं मला प्रतिबंध करण्याकरितां माझें सेवन करणारांस बहिष्कृत करूं म्हणून डांगोरा पिटण्यांत आपली गडगडाट करण्याची शक्ति होती तेवढी निःशेष खर्च केली. पुढें रशियाच्या झारानेंही कायदा केला कीं, जे लोक माझ्या सेवेंत तत्पर होतील त्यांस लूननासिक करून टाकावें—पण व्यर्थ. नंतर टर्कीचे सुलतान व त्यांचे धर्माधिकारी जे मौलवी त्याणीं मद्रोधार्थ "जे कोणी मृन्मय नलिकेनें माझे केशधूपाचा अग्निशीं संबंध करून तज्जात धू...नें पान करतील, अगर नासारंध्रानें धूमोत्सारण करतील, त्यांच्या घोणपुटांत

त्याच मृन्मय नलिका खुपसाव्या " असा नियम केला—पण व्यर्थ. तुमच्या हिंदुस्थानांतील इंग्रजी 'पढतमूर्ख' राजाचाच सोबती जो जहांगीर त्यानेंही हें खूळ आरंभिलें होतें म्हणून तुझ्या मित्रानें नुकतेंच सांगितलें. माझा प्रवेश युरोपियन लोकांनीं करून दिल्यावर माझा संचार बंद करून मला हद्दपार करा म्हणून त्यानें कडक कायदे केले–पण व्यर्थ. असो, तर असा आहे माझा अप्रतिहत संचार या जगांत. कोणत्या तरी रूपीं जन माझी सेवा करितात. कोणी माझ्या पिंगट केशांचा अग्नीशीं संबंध करून तत्संबंधजात जो धूम त्याचें पान करीत स्वस्थ पडतात—व कोणी तर अगदीं मुखांत मुख घालून मजवरील आपली प्रीति व्यक्त करितात. पूर्वी इंग्रजांचे खलाशी लोक माझें द्वितीय रूपानें सेवन करीत असत. पण त्यापासून गलबतांवर कधीं कधीं अनर्थ होऊं लागले. तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं माझ्याशीं तोडजोड करून तें रूप घालविलें, परंतु मी त्या नौकावाहकांस अगदीं सुटलें काय? नाहीं. द्वितीय रूप टाकून मी त्यांपाशीं तृतीय रूपानें गेले, व त्याच रूपानें सध्यां त्यांस अगदीं मोहित करून सोडलें आहे. तुमचे **महाराष्ट्रीय** लोकांचें माझ्यावर कांहीं विलक्षण प्रेम आहे. बघा! मी त्यांच्या खिशांत अगर कवनठीस अगर तोस्तानांत सदोदित वास करितें, व या अतिप्रेमाचें सूचक हें कीं मराठी लोक बहुधा माझ्या तिसऱ्या रूपीं माझी सेवा करितात, म्हणजे अगदीं मुखांत मुख घालून चूंबन घेतात–तें इतकें प्रेमानें कीं, त्यांचे व माझे अधरोष्ठ ह्या झपाट्यानें लाल होतात, व कधीं कधीं तर तो प्रेमरस त्या अधरोष्ठांस न आंवरून तो खालीं गळूं लागतो."

ही सर्व हकीगत ऐकून माझ्या मित्राचा स्वदेशसुधारणेच्छेचा ओघ जरा कमी होऊन तो म्हणतो, "तर मग बाई तुम्ही या आर्यभूमीस कधीं सोडणार नाहीं?" "सोडणार! छे!!" तमाखु म्हणाली, "मला अशी गोष्ट कधीं रूचली नाहीं. त्यांत कलिराजांची आज्ञा मोडतां येत नाहीं. आतां कांहीं लोक माझा अव्हेर अरितात. पण जे म्हणून एकदां माझ्या भुजलतापाशांत गवसले त्यांना 'एकोग्रहस्तु मीनानां नीलीमद्यपयोस्तथा' ह्या श्लोकांत 'एकोग्रहस्तमाखोश्च' असें नवीन पद घालावयास मीं लाविलें आहे, व लवकरच पेंडीचा खडा हातीं घेऊन पुढें गेलें म्हणजे म्हैस जशी मोठ्या उत्साहानें धांवत येते, तशी मी पुढें असतां मनुष्यमात्राची अवस्था व्हावी अशी माझी इच्छा

आहे, व ती मी सिद्धीस नेणार. बरें आतां मी जातें; माझे भक्त तिकडे माझें आवाहन करीत आहेत तिकडे मला अवधान दिलें पाहिजे."

असें म्हणून ती पिंगलांशुकाबाई अंतर्धान पावली. महाराज, हें तमाखु-माहात्म्य संपवितों. आतां मोरोपंताचें वर्णन करीत असतां जर तुम्हांस—स्वतः मालाकारांस—लोकांच्या 'अंगाई' चें भय, तर मग आपला आश्रयेच्छु जो मी यःकश्चित् भृंग, त्या म्यां तमाख्वाख्यान लाविलें असतां 'अंगाई' ची भीति नष्ट कशी होईल ? जातां जातां तमाखूच्या सपाटयांतून कोणी—रावापासून रंकापर्यंत—सुटला नाहीं अशाविषयीं माझ्या सुधारणेच्छु मित्रानें दोन श्लोक म्हटले ते मात्र आपलेकडे पाठवितों:—

'तमाखुपत्रं राजेंद्र भज मा[1]ऽज्ञानदायकम् ।
तम् आखु[2]पत्रं राजेंद्र भज मा[3]—ज्ञान—दायकम् ॥ १ ॥

'दारिद्र्यशीलोऽपि नर स्तमाखुं नैव मुंचति
निवारितोऽपि मार्जारस्तमाखुं नैव मुंचति' ॥ २ ॥

आपला

षट्पद ( २ )

---

## रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि० पुढील दोन ओळींस आपल्या लोकप्रिय मालेंत जागा देण्याची मेहरबानी कराल अशी आशा आहेः—

आपला बाणभट्टावरील गुणदोषविवेचक निबंध प्रसिद्ध होऊन बरेच दिवस झाले त्यावर 'विविधज्ञानविस्तारांत' टीकाही आली आहे. बाणप्रणीत 'कादंबरी 'च्या पूर्वार्धाच्या शैलीस अनुसरून बाणपुत्रानें आपल्या बापाच्या ग्रंथाचा उत्तरार्ध लिहिला आणि बापाची शेवटची इच्छा परिपूर्ण केली ही गोष्ट जनप्रसिद्ध आहे, पण ज्या रसिक पुरुषानें मूळच्या अत्युत्कृष्ट अशा रचनेस अनुसरून अशी नवीन रचना करून दोन्हींचा एक जीव करून

---

१ अज्ञानदायकं मा भजे त्यन्वयः

२ मूषक वाहनं—गणेश मीति.

३ लक्ष्मी.

दिला त्या पुरुषाचें नांव सुद्धां लोकांस माहित नसावें हें दुर्दैव होय. "ज्या प्रमाणें चंद्रकांताचा द्रव केवळ चंद्राधीन त्याप्रमाणें **बाण**भट्टाच्या पूर्वार्धाचीच हातोटी उचलून उत्तरार्ध सर्वथा रचला आहे यास्तव सर्व ग्रंथ आपल्या बापाच्याच नांवानें प्रसिद्ध असावा या उद्देशानें यानें आपलें नांव प्रगट न करितां बुध्याच नाहींसें होऊं दिलें असावें असें वाटतें. या गोष्टीवरून त्याची पितृभक्ति दिसून येते" इत्यादि मजकूर आपण तर्काच्या धोरणावर लिहिला आहांत, परंतु **बाणभट्टा**च्या पुत्राचें नांव समजलें आहे ही गोष्ट कळविण्यास आनंद वाटतो. मुंबई इलाख्याच्या वार्षिक रिपोर्टावरून पुढील उतारा घेतला आहे. डाक्तर ब्युलर म्हणतात:--"The only interesting news I obtained was the name of the son of the famous Banabatta who continued the Kâdambarî after his father's death. He was called Bhûshona Bhatta."

Bombay Administration Report for 1875-76 p. 314.

यावरून **बाण**पुत्राचें नांव 'भूषणभट्ट' होतें असें दिसतें. कळावें हे विनंती.

ता० १०-७-७८
नागपूर सिटी स्कूल. } वा० दा० ओ०.

# निबंधमाला.

## अंक ५०.

रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. आपल्या उपयुक्त पुस्तकांत खालीं लिहिलेल्या मजकुरास जागा मिळेल अशी आशा आहे. आक्षेपपर अथवा सूचनापर कोणी मजकूर लिहून धाडल्यास तो छापून प्रसिद्ध करण्याची आपली वहिवाट आहे, म्हणून प्रस्तुत पत्रकारावरही तेवढी मेहेरबानगी होईलच.

(१) मालेच्या ४२वे अंकांत 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' या ग्रंथावर आपला अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाचे गुणदोषनिरूपणाविषयीं मला कांहीं लिहावयाचें आहे असें नाहीं. मूळ ग्रंथकारानें फारसी व अरबी भाषेचे शब्द आपल्या ग्रंथांत न येण्याविषयीं सावधपणा ठेविला आहे. या मुद्यावर स्वाभिप्राय दर्शवितांना तुमचा लेख असा आहेः— "प्रस्तुत ग्रंथांतला विषय सगळा ऐतिहासिक व पौराणिक आहे, यास्तव भारतवर्षीय प्राचीन पुरुषांच्या कथांतून यवनी शब्दांचा प्रयोग होणें हें मोठें विलक्षण दिसेल हें खरें आहे, व हें जाणूनच महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतूनही वरील शब्दांचा पूर्ण अभाव आढळतो." आतां महाराष्ट्र कवींच्या संबंधानें त्यांच्या ग्रंथांत अरबी व फारसी या शब्दांचा पूर्ण अभाव आढळतो असें जें आपण उपपादन केलें आहे त्याच्या यथार्थत्वाविषयीं संशय येतो. प्रत्येक अर्थाचें विधान केल्याबरोबर तत्समर्थनाचीं कारणें देणें अशक्य होय; व तसें करण्याचें कोणी मनांत आणल्यास एक वाक्यही त्यास धड लिहितां येणार नाहीं हें खरें आहे. याच न्यायानें आपण स्वमतप्रतिपादक आधारांचा उल्लेख केला नाहीं असें दिसतें. महाराष्ट्र कवींचे ग्रंथ वाचीत असतां कित्येक फारसी व अरबी शब्द आढळले व शोध करितां ते अरबी व फारसीच आहेत असें त्या भाषा जाणणारानें कळविलें. तेव्हां आपल्या म्हणण्याच्या यथार्थत्वाविषयीं संशय दृढ झाला. परंतु आपल्या म्हणण्यास काय आधार आहे हें समजावें व सत्यासत्यतेचा निर्णय व्हावा म्हणून पुढील उतारे दाखल केले आहेत. यांवर आपला अभिप्राय कळविण्याची मेहेरबानी व्हावी. पुढें

अनेक उतारे दिले आहेत, तेणेंकरून पूर्ण अभाव आढळतो हें मत बरेंच खंडित होऊं पाहतें. तर खरें काय तें कळवावें म्हणजे झालें.

**मोरोपंत.**

मी पारिजातपुष्प ग्रथितां माला सदां **तुरे गजरे** ॥
भोगितसें परिहें बहु सांग तरुस्थान नाथ वा मजरे ॥

असतां समर्थ सारथि अरिची आम्हांस काय **परवाहो** ॥
शोणितपूरींगृध्रश्येनकृतग्रासकाय पर वाहो ॥ १ ॥

**द्रोणपर्व.**

होईल देह रंगीं सुरपति नरपति समक्ष न लगामी ॥
हा जन तुमचाचि असे इतरा कोणाचिया हिन **लगामीं** ॥ १ ॥

**वनपर्व.**

जाति सपुत्र सबांधव कर्ण न वधतां घडो अधःपतन ॥
जतन करीं पण आशीर्वादें बुध रक्षिती जसें **वतन** ॥

**कर्णपर्व.**

सजणा नाम जयाचें ज्या गाती साधुजन **कसायास** ॥
भगवान् पळ हि न विसरे ज्यातें विसरेन मी कसा यास ॥

**सन्मणिमाला.**

वरिचे वरि हस्तांहीं धरुनि प्रभुवर उरस्थळीं जिरवी ॥
**मिरवी** स्नेहातिशय प्रीति श्रीजानिची नव्हे हिरवी ॥

**हरिवंश.**

कर वळविला अजें जें विष्णुधृतस्त्री स्वरूप **कित्ता** तें ॥
चित्र तसोंचि उतरिलें चतुरें वाटे कवीन्द्रचित्तातें ॥

**आदिपर्व.**

कृष्णाग्रजावरज बळ कृष्णाश्रित करुनि कीर्तिला जतन ॥
कृष्णात्मज कुळनंदन कृष्णापति वीर पावले **वतन** ॥

**आदिपर्व.**

वाडव वडास पुत्र ज्येष्टस्त्रीचे स्वतुल्य नव होतें ॥
मिथुन कनिष्ठ स्त्रीचें त्यांत पुरुष भरत खाय जो गोते ॥

**मंत्र भागवत.**

देसी पुण्यें घेसी पापें या वस्तुच्या खरेदीनें ॥
श्री तुज अमृता तृप्तें आशीर्वादचि दिले खरे दीनें ॥

नामारामाचा तूं विश्वासू काय मुख्य जासूद ॥
पाठविला वाटाया अमृत शशी प्रथम तूं दुजा सूद ॥

**नामार्या.**

झाल्या प्रथम कथा मग चित्तज्ञ प्रभु म्हणे धरा देवा ॥
देवाट पाहिली बहु काय मला आणिला असे मेवा ॥

**सुदामचरित्र.**

म्हणवि गुमास्ता नामें सामळशा तो भरूनि जे हुंडी ॥
मुंडी होउनि जातें साधूंच्या नित्य धुंडिती झुंडी ॥

**नरसिंहमहता.**

शरणागतासि म्हणती निववुनि तुझियाचि पादुका नाचा ॥
सर्वत्र तुझीच तदपि महिमा निःसीम या दुकानाचा ॥

**व्यंकटेश प्रार्थना.**

**वामन.**

म्हणे शोक कां प्राप्त झाला महा हा ॥
अशी कष्टली कां शुभांगी अहाहा ॥
न बोलोचि कां आमुशीं आज राणी ॥
जिच्या बोलण्याचीच आम्हां शिराणी ॥

**तुकाराम.**

लोक फार वाखा अमंगळ झाला ॥ त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥१॥
रोजकीर्द जमा धरूनी सकळ ॥ खताविला काळ बरावरी ॥ २ ॥

माझ्या वडीलांची **मिराशी** देवा ॥ तुझी चरण सेवा पांडुरंगा ॥ ३ ॥
करि न फिरसी माघारा ॥ अझुनि तरी **फजितखोरा** ॥ ४ ॥
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं ॥ भार धन वाही **मजूरीचें** ॥ ५ ॥
**हिशेबें** आलें तें सकळाशीं प्रमाण ॥ तेथें नाहीं आन चालों येत ॥६॥
चोरासाठीं **रदबदला** आटा हास ॥ जळो जिणें दास्य बहुतांचें ॥ ७ ॥
केला पाहिजे विचार ॥ मन मित्र **दावेदार** ॥ ८ ॥
एका बोटाची **निशाणी** ॥ परीपाक नाहीं मनी ॥ ९ ॥
**हुकुमदाज** तुका ॥ येथें कोणी फुंदो नका ॥ १० ॥
उभ्या **बाजारांत** कथा ॥ देतों नावडे पंडरिनाथा ॥ ११ ॥

## रामदास.

माणुस् **राजी** राखूं नेणें ॥ त्यासि न मानीती शहाणें ॥ १ ॥
माया अविद्येचें **बंड** ॥ नाना प्रकारीं थोतंड ॥ २ ॥
कांता ज्याचें **बंदिखाना** ॥ नव महीनें पतना ॥ ३ ॥
दास म्हणे वारंवार ॥ बहुसाल **खबरदार** ॥ ४ ॥
आपुलें मन आटोपावें ॥ नाहीं तरी **फजित** व्हावें ॥ ५ ॥

## नामदेव.

आपुल्या बाळासी धरी आतां हातीं ॥ न करी **फजिती** जनांमध्यें ॥१॥
नामा म्हणे स्वर्गी **नगारे** वाजती ॥ .. .. .. .. ..
समस्तांची क्रीया करी उग्रसेन ॥ झालासे **दिवान** देव त्याचा ॥ २ ॥

## रघुनाथ पंडित.

वाजीचें मन जाणतां सकळ ही **राजी शिपाई** जया ॥
याजी होउनिया द्विजांसि म्हणतो याजी धनें घ्यावया ॥
त्यानी जो धनदा परी सुकृत जें त्याजीव ऐसें गणीं ॥
**गाजी** तो नळ भूप हूप धरूनी **गाजी** गुणींच्या गणीं ॥
क्रीडा करो तुज सवें ललना **पलंगीं** ॥

**जासूद** वदति नैषधासी ॥

**फौज** सारी बाहेर उभी राहे ॥

केली **विजार** वरि डौरही मौन सेवी ॥

## मुक्तेश्वर.

नौका यानीं यंत्र मारें पोत भंगिती पाणी भारें ॥
वात वेगीं पळावे त्वरें **फिरंगी** युद्ध या नांवें ॥
रथारूढ यादवभारी दुरोनि अवलोकी मुरारी ॥
जैसा राना माजी **जोहारी** रान पारखी आपुले ॥
हेम ठाणवयांवरी जडित **तबकें** ॥ त्यावरी रानाचे दीप अनेकें ॥
शुद्ध क्षालूनि हस्तकें ॥ अमृत अन्नें आणिलीं ॥

## रामजोशी.

**जिन्नस** लोखंडी । अशि **दुनिया** लुंडी । कुच **नगदी** । ही
**मसलत** खंदी ॥
नंदात्मज मंद मंद मायाहि । तुज **अबरुच** नाहीं ॥

( २ ) मालेच्या पहिल्या वर्षी 'भाषादूषण' या विषयावर एक निबंध प्रसिद्ध झाला होता त्यांत कित्येक शब्दांच्या संबंधानें तुम्ही स्वमत प्रकट केलें आहे. कित्येक शब्द अर्थाच्या धोरणानें पाहिलें असतां अप्रयोजक व हस्यास्पद असे असून त्यांचा ग्रंथांतरी रिघाव झाल्याचें दर्शविलें आहे, व असें करणें हें स्वदेशभाषेची खराबी करणें होय असा अभिप्राय दिसतो. आतां तेच शब्द, अथवा तशा प्रकारचे शब्द आपल्या मालेंतही आढळतात. यावरून आपला पूर्वीचा अभिप्राय खरा समजावयाचा किंवा पुढील व्यवहार खरा समजावयाचा ? या दोहोंतील खरा प्रकार कोणता हें निश्चितपणें समजण्याचा मार्ग नाहीं म्हणून तसदी देत आहें. पुढील शब्द आपल्या मालेंत आढळतातः-(१) स्वकपोलकल्पित अं० ४२ पृ० १९; (१) निद्रिस्त--अं० ४० पृष्ठ ९; निस्पृही अं० ३५ पृ० २०. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार व्यभिचारी प्रयोगांचा होय. त्याचींही एक दोन उदाहरणें देतों. 'कबरस्थान,' 'चिखलवृष्टि,' 'इलाखाधिपति' इत्यादि. हे शब्द गंगाजमनी

दिसतात यावर आपलें काय म्हणणें आहे ? असे सामासिक प्रयोग व्याकरण-रीत्या ग्राह्य आहेत काय ?

( ३ ) डाक्तर जानसन् याचें चरित्र चित्तवेधक झालें आहे, परंतु क्वचित ठिकाणीं पूर्वापर उल्लेखांत संगति दिसत नाहीं, असें वाटतें. उदाहरणार्थ येथें एकच गोष्ट दाखल करितों. जानसन्च्या सत्यप्रीती विषयीं लिहितांना आपण पुढील उल्लेख करितां:--" त्यास सत्य हें स्वभावतांच आवडत असे, व खोटें बोलणें लफंगेपणा करणें याचा त्यास तसाच अतिशयित तिरस्कार वाटे. ' चित्तेवाचे क्रियायांच महतामेकरूपता ' हें महाजनांचें लक्षण त्यावर पूर्ण लागू पडतें. त्याच्या बारीक सारिक भाषणापर्यंतही त्याच्या अगदीं अनेक चरित्रकारांनीं वृत्तांत लिहून ठेविला आहे, पण वरील वाक्यांस जेणेंकरून विरोध येईल असें त्या सर्वांत एक अक्षरही सांपडायाचें नाहीं. जसें त्यास वाटे त्याप्रमाणेंच तो बोलून दाखवी." ( अंक २९ पृ० ९ ). याप्रमाणें जानसन्च्या एका मोठ्या गुणाचें वर्णन आहे. याच अंकाच्या १३ वे पृष्ठावर जो मजकूर आढळतो तो असा:—"कधीं कधीं तो वादविवादाच्या भरांत अप्रमाण गोष्टीही बोलून जाई. व आपला पक्ष खोटा आहे असें आंतून पक्कें जाणत असतांही तो खरासा भासवून देण्याचा यत्न करी. त्याप्रमाणेंच आपली बाजू घसरते आहे असें त्यास एकादे वेळेस वाटूं लागलें असतां उगाच वितंडवादांत शिरून प्रतिपक्ष्यावर प्रखर भाषणांचा प्रयोग करणें...यांतही तो वेळेनसार मागें घेत नसे." हे दोन्ही उतारे माझ्या मतें परस्पर विरोधात्मक आहेत. जो मनुष्य आपला पक्ष खोटा आहे असें पक्कें जाणत असतां तो तो खरा आहे असें म्हणतो त्याच्या सत्यप्रेमाचें कायसें वर्णन करावें ? बुद्धिपुरःसर जर कोणी मनुष्य खोटें बोलतो तर त्यास सत्य हें स्वभावतःच आवडतें व असत्याचा तो अतिशयित तिरस्कार करितो हें म्हणणें कसें जुळतें ? समजून उमजून अप्रामाण गोष्ट बोलणारास महाजनांचें लक्षण कसें लागू पडेल ! आपण मात्र पूर्ण लागू पडतें असें एके ठिकाणीं म्हणतां याचा व्हावा तसा बोध होत नाहीं, अथवा खुलासा समजत नाहीं. आपले दोन्ही अभिप्राय खरे किंवा कसें याचा निर्णय व्हावा. प्रस्तुत गुणविशेषाच्या संबंधानें व चरित्र नायकाविषयीं येथें एक इंग्रजी उतारा सादर करितों. त्यावरून जॉनसन्च्या सत्य प्रीतीचें यथार्थ ज्ञान होण्यास कांहींसें साधन होईल:—

"With a lumber of learning and some strong parts, Johnson

was an odious and mean character. By principle a Jacobite, self-sufficient, and overbearing by nature, ungrateful through pride, and of *feminine bigotry*, he has prostituted his pen to party even in a dictionary, and had afterwards, for a pension, contracted his own definitions. His manners were sordid, supercillious, and brutal, his style ridiculously bombastic and vicious; and in one word, with all the pedantry he had all the gigantic littleness of a country school master."

Memoris of George III. Vol. IV. P. 297.

( ४ ) मोरोपंताचें 'मुक्तामाला' या नांवाचें संस्कृत काव्य छापून प्रसिद्ध करण्याचें श्रेय आपल्यास आहे. या काव्याचा अंक २२ यांत ७६ पर्यंत आर्या दिल्या आहेत व अंक २५ यांत ७८वे आर्येस आरंभ केला आहे. यावरून ७७वी आर्या उपलब्ध प्रतींतच नाहीं किंवा नजर चुकीनें देण्याची राहिली याचा खुलासा व्हावा.

( ५ ) आपल्या मालेंत येणारीं सुभाषितें रुचिभिन्नत्वानें कमज्यास्त आवडणारीं आहेत. हा प्रकार सदां असावयाचाच. खुद्द कालिदासाचेंच 'भिन्न रुचिर्हिलोकः' असें वचन आहे. तथापि तेंच तेंच सुभाषित पुनः यावें ही गोष्ट कोणाही वाचकास पसंत पडणार नाहीं असें दिसतें. अंक ४१ यांतील चवथें सुभाषित 'मूर्खस्य पञ्च चिन्हानि इ०' पूर्वींच येऊन गेलें आहे असें आठवतें. मालेचे सर्व अंक हाताशीं नसल्यामुळें पूर्वींच्या कोणत्या अंकांत तें आहे हें आतां सांगवत नाहीं. या पुढें असें न होण्याचा बंदोबस्त ठेवावा म्हणजे झालें. कळावें, लोभ असावा हे विनंती.

मुक्काम नागपूर' } निबंधमालाहितेच्छु
ता० १४ डिसेंबर १८७८ इसवी. } वा० दा० ओ०.

---

वरील पत्रकारानें काढलेल्या मुद्यांवर आमचीं उत्तरें येणेंप्रमाणें आहेतः—

[ १ ] यवनी शब्द. यांचा मराठी कवितेंत पूर्ण अभाव आढळतो असा जो आम्हीं ४२वे अंकांत उल्लेख केला आहे तो आम्ही माघारीं घेतों. 'हितेच्छूं'नीं सात आठ महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतून जीं अवतरणें दिलीं आहेत त्यांवरून पाहतां अरबी व फारसी शब्दांचा भरणा मराठी कवितेंत बराच आहे असें म्हणणें भाग येतें. हा इतका असेलसें आम्हांस पहिल्यानें वाटलें नव्हतें. तर ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां आमच्या पत्रकारानें घेत-

लेल्या मेहेनतीबद्दल त्याचे आभार मानणें अवश्य आहे. त्याप्रमाणेंच ही ही गोष्ट आमच्या वाचकांचे लक्षांत येईल कीं, कोणत्याही विषयावर अनेकांचे शोध चालले असतां किती उपयोग होण्याचा संभव असतो.

[२] अशुद्ध व अप्रयोजक शब्द. प्रस्तुत पुस्तकाच्या ९ व्या अंकांत भाषादूषणावर म्हणजे आलीकडे इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें आमच्या देशभाषेची जी खराबी होत आहे किंवा अंशतः झाली आहे तिच्या संबंधानें आह्मी आपले विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांवरून आमच्या आक्षेपकाचा उलट प्रश्न असा आहे कीं, तसेच अप्रयोजक व हास्यास्पद प्रयोग तुमच्या स्वतःच्याच लेखांत आढळतात हें कसें? उदाहरणार्थ 'स्वकपोलकल्पित', 'निद्रिस्त', 'निस्पृही', 'कबरस्थान', 'चिखलवृष्टि', 'इलाखाधिपाति' इत्यादि शब्द होत. वरील आक्षेपावरून असें दिसतें कीं, आमच्या पत्रकारानें सदरील ९वा अंक व पुढील १०वा हे नीट लक्षपूर्वक वाचले नसावे, किंवा वाचले असून त्यांतील अभिप्राय त्यानें समग्र ग्रहण केला नसावा. 'स्वकपोलकल्पित' या शब्दाचा निषेध आह्मी कोणत्या कारणास्तव केला आहे हें 'हितेच्छू'च्या लक्षांत आलें नाहीं. तो शब्द वस्तुतः खरा आहे, म्हणजे त्याची साधनिका व्याकरण शुद्ध असून अर्थांतही कांहीं दोष नाहीं. पण इतकेंही असून उपयोग काय? त्याचा जर अस्थानीं प्रयोग केला तर हातचें कंकण न समजतां तें कोणी पायीं घालूं लागला असतां जसें हास्यास्पद होणार तसाच वरील प्रयोगही होणार नाहीं काय? वरील शब्द वस्तुतः निंदार्थक आहे. मराठींत ज्याप्रमाणें 'खिशांतली गप्प', 'लोणकढी थाप' म्हणतात त्याप्रमाणें त्याचा मूळ संस्कृतांत प्रयोग आहे. ज्यास प्रमाण ना आधार असें एकादें वचन कोणी सभेंत झोकून दिलें असतां किंवा लेखांत घुसडून दिलें असतां त्यास वरील निंदाद्योतक विशेषण लावतां येईल. पण हें न समजून आमचे आलीकडील ग्रंथकार मोठें भूषण म्हणून मुखपत्रावर सर्वांस जाहिर करतात कीं, ही आमची कृति 'स्वकपोलकल्पित' आहे! त्यांस वाटतें कीं, इंग्रेजींतील original या शब्दाला हा लांबलचक संस्कृत शब्द चांगला ठीक जमण्यासारखा आहे. पण कस्तूरीच्या टिळ्याबद्दल आपण कोळसा कपाळाला फासून घेत आहों, किंवा धर्मशाळेंतल्या प्रसिद्ध नकलेप्रमाणें संभळीच्या जागीं घोकटी खांदाडीला बसते आहे हें त्यांस कळत नाहीं! तर यावरून आमच्या आक्षेपकाच्या लक्षांत येईल कीं, वादविषयक

शब्दाचा यथार्थ प्रयोग केला असतां हरकत नाहीं, व आह्मी जेथें जेथें तो केला आहे तेथें तेथें तो तसाच केलेला आहे.

'निद्रिस्त' व 'निस्पृही' या शब्दांविषयीं 'हितेच्छू'चा आक्षेप काय आहे तो चांगलासा समजत नाहीं. हे शब्द अशुद्ध ह्मणून आह्मी कोठेंही निवडले नाहींत; तसेंच संस्कृत शब्दांचे लोकांच्या बोलण्यांत जे अपभ्रंश होतात ते लिहिण्यांत येऊं नयेत असाही निषेध आह्मीं कोठें केला नाहीं. उलटें १००व्या अंकांत लेखनशुद्धीविषयीं लिहीत असतां आह्मीं असा अभिप्राय दिला आहे कीं, यथोच्चार वर्ण लिहीत जावे हाच एकंदरींत उत्तम पक्ष होय. वरील दोन्ही शब्द मराठी कोशांतूनही आढळतात, तेव्हां आमच्या पत्रकाराचें त्यांच्या संबंधानें काय म्हणणें आहे तें नीट कळत नाहीं. एक मात्र तर्क होतो कीं, 'निरूपद्रवी' हा शब्द आम्हीं अमान्य केला म्हणून 'निस्पृही' हाही अशुद्ध असें त्यास वाटलें असावें. पण असें असेल तर हा त्याचा गैरसमजच आहे. 'निरूपद्रवी', 'साल्हादाश्चर्य' वगैरे शब्दांवर पूर्वोक्त निबंधांत आम्हीं जी टीका केली आहे ती ते शब्द वस्तुतः अशुद्ध आहेत म्हणून नव्हे; तर इंग्रेजी शब्दांच्या भाषांतराच्या रूपानें असले विलक्षण शब्द आलीकडे मराठींत येऊं पहात आहेत हें दाखविण्याकरतां त्यांचा निर्देश केला आहे. वरील शब्द हे innocent आणि admiration यांशीं अनुक्रमेंकरून समानार्थक म्हणून योजलेले असतात. पण हे शब्द अगोदर एक तर कोणाच्या कधींही बोलण्यांत येत नाहींत. 'न्यायाधीश पक्षपाती असला म्हणजे निरूपद्रवी मनुष्यासही शिक्षा होते', 'पारव्याचे ठायीं देवानें निरूपद्रवीपणा ठेवला आहे', किंवा 'तिचें रूप पाहून सर्व साल्हादाश्चर्य पावतात', अशीं वाक्यें कोणी कधींही बोलत नाहींत. त्यांचें लोकभाषेच्या सरणीस अनुसरून म्हटलें म्हणजे असें रूप आढळतें:—'न्यायाधीश पक्षपाती असला म्हणजे निरपराधी मनुष्यासही शिक्षा होते', 'पारव्याचे ठायीं देवानें शांति हा गुण ठेवला आहे',* 'तिच्या रूपाची सर्व वाखाणणी करतात.' मग याप्रमाणें चालू

---

* वरील शब्द 'इसापनीती'च्या कर्त्यानें मोराच्या गोष्टींत योजला आहे हें कित्येकांस आठवतच असेल. या उत्कृष्ठ ग्रंथाची नुकती एक नवीन आवृत्ति निघाली आहे तींत नवीन 'नवनीता'प्रमाणें सगळा फेरफार करून टाकला आहे. एका गोष्टीचें तात्पर्य येणेंप्रमाणें घातलें आहे:—

"गरज ही युक्तीची जननी होय. गरज पडली म्हणजे युक्ति सुचते." या एका मासलेवाईक वाक्यावरून या नवीन आवृत्तीची कल्पना वाचकांस कांहीं अंशीं करतां येईल.

भाषेंत नर चांगले शब्द आयते आहेत, तर मुद्दाम वाकड्या वाटेंत शिरून असले वेडे बागडे शब्द भाषेंत काय म्हणून आणावे? ज्या वेळेस सारी भाषा धुंडून असें आढळेल कीं, अमुक अमुक शब्दाला महाराष्ट्र भाषेंत प्रतिशब्द मिळतच नाहीं तेव्हां मग टांकसाळेची प्रार्थना करणें अवश्यच होय. पण आमची भाषा इतकी दरिद्री खास नाहीं, कीं सामान्य विचार प्रदर्शित करण्या-सही इंग्रेजी टांकसाळेंतले कोरे करकरीत शब्द आणल्याखेरीज पुढें पाऊलच पडायाचें नाहीं. तर वर सांगितलेल्या ९ व्या अंकांत वरील गोष्ट सिद्ध कर-ण्याचाच कायतो उद्देश होता. त्यांत निषिद्ध केलेले शब्द व्याकरणरीत्या शुद्ध किंवा अशुद्ध आहेत हा विचार मुळींच कर्तव्य नव्हता.

'कबरस्थान' हा शब्द गंगाजमनी' दिसतो, तर यावर आमचें काय म्ह-णणें आहे म्हणून 'हितेच्छु' विचारतात. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, सारी भाषाच मुळीं गंगाजमनी नाहीं काय? गंगाजमनी तर काय, पण पंचरंगी गुलाब आहे असेंही म्हणायाला पाहिजे. 'कबरस्थान' जर आम-च्या पत्रकारास शोचनीय वाटलें, तर 'समुद्राकिनारा', 'वडिलोपार्जित', 'जांवईशोध', 'सुनमुख', 'तक्ताधिपति', 'जामीनपत्र', 'खानदेश', 'अहमदनगर', 'समशेरपूर', 'पोष्टखर्च' यांची तो काय वासलात करणार? स्पेनच्या राजानें साऱ्या मुसलमानांस स्पेनांतून घालवून देऊन सारी भूमि जशी एकदा सडासंमार्जन ( गंगाज़मनी शब्दच! ) करून पुनः पवित्र करून सो-डली तसा प्रकार करणें त्यास इष्ट किंवा शक्य वाटतें काय? असला वेडगळ सोवळेपणा सुरू केल्यास स्पेन देशास तो जसा लवकरच भोंवला तसाच तो आमच्या देशभाषेसही भोंवेल यांत संशय नाहीं! * तर असल्या ठिका-

* मुसलमानांनीं खिस्ती शका. . आठव्या शतकांत स्पेन देश सगळा एका सपाट्यास सर करून टाकला. शेवटीं पंधराव्या शतकाच्या अखेरीस खिस्ती राजांची सत्ता बळा-वून त्यांनीं आपला अम्मल स्वदेशावर पूर्णपणें स्थापित केला. त्यानंतर इकडील गोमां-तकांत फिरंग्यांनीं जो प्रकार केला तो स्पेनच्या राजानें मनांत आणून आपल्या मुल-खांतल्या एकून एक मुसलमानास बाटवून सगळा देश निवळ खिस्ती करून टाकला. पुढें तेथील पाद्री लोकांस वाटलें कीं, हे सारे खिस्ती तर बनले खरे, पण हे अंतर्यामीं अजून खोट्या पैगंबराचेच भजक आहेत; तेव्हां केवळ देहान्त प्रायःश्चित्तानेंच यांची शुद्धि होणार आहे. मग काय विचारतां! सरसकट साऱ्या मुसलमानांस सक्त ताकीद दिली कीं महिन्याच्या आंत हा देश सोडून तम्ही चालतें व्हावें, नाहीं तर तुम्हांस देहान्त शासन

( पुढें चालू )

णीं भाषाहितेच्छूंनीं काय नियम केला पाहिजे तो सर्वांस तेव्हांच कळणार आहे कीं, पूर्वीं जेवढी भेसळ झाली तेवढी सर्व भाषेचा भागच म्हणून कायम राखून ठेवली पाहिजे. तिजबद्दल यापुढें कुरकूर करून कांहीं उपयोग नाहीं. पूर्वींचे सर्व प्रयोग शिरसावंद्य धरूनच चाललें पाहिजे. पुढच्यांविषयीं मात्र काय खबरदारी ठेवणें ती ठेवावी; बंदरोबंदरीं पहारे ठेवून गंगाजमनी माल उतरूनच द्यावयाचा नाहीं असा बंदोबस्त केल्यासही तो पुढें चालणार आहे. पण पूर्वींचे जे धागे येऊन लोकांच्या अंगावर पडले ते पडलेच म्हणून समजावें. ते आतां काढायाचे म्हटले म्हणजे अंगाचा चट्टा घेतल्याखेरीज निघायाचे नाहींत !*

आतां शेवटचें मोठें प्रकरण 'चिखलवृष्टि' व 'इलाखाधिपति' या शब्दांचें राहिलें. या शब्दांस तरी निदान पूर्वींच्या वहिवाटीची वगैरे कसलीही सबब बिलकुल लागू पडत नसून हे खुद्द आमच्या विणेचे कोरे करकरीत धागे आहेत हें आम्हांस कबूल केलें पाहिजे. यांपैकीं दुसऱ्या शब्दाबद्दल आम्हांस कित्येकांनीं वेळोवेळीं हटकलें आहे कीं, तुम्ही दुसऱ्यांचीं दूषणें येवढीं डोळ्यांत तेल घालून पहात असतां येवढी ढोबळ चूक तुमच्या लक्षांत कशी आली नाहीं ? 'चिखला'चा व 'वृष्टी'चा संयोग करूं जातां व्यभिचार होणार

---

( मागील पृष्ठावरून. )

होईल. या ताकिदीप्रमाणें पुढें सर्व प्रकार कसा घडण्यांत आला व त्याच्या योगानें स्पेन देशाची लवकरच कशी हलाकी झाली याचें सविस्तर वर्णन बकल्‌चा इतिहास भाग १ अध्याय ८ यांत सांपडेल.

* वरील विषयावर मोलस्वर्थ साहेबांचा अभिप्राय त्यांच्या कोशाच्या प्रस्तावनेंत येणेंप्रमाणें दाखल झाला आहेः—

"Irregular formations, especially *compounds consisting of members from different languages*, have been objected to ; .................................... but do not in fact all dictionaries contain rule—breakers? Of the Marathi language how many hundreds of irregular (i. e. unclassical or inelegant) formations live and move in its very vitals, enjoying the freest currency amongst the educated and polished? Is it required to discard such compounds as वस्त्रगाळ, वडिलोपार्जित, समुद्रकांठ, दिशाभूल, गायमूख, पालखीपदस्थ, पोटशूल, वाघनख, कवडीचुंबक, तक्ताविपति, सवतीमत्सर, गैरउपाय, बदकर्म, साक्षीदार, जमीनधारा, &c., &c., &c,? Such discharge would be, let the public take notice, a discharge from the Dictionary of words maintaining their post, their service, and their kindly estimation in the language."

आहे असें असतां तो करतांना, तसेंच ‘ अधिपति ’ हें टोपण ‘ इलाखा ’ या यवनी शब्दावर तुम्ही बेलाशक बसवून दिलेंत तेव्हांही तुम्हांस विचार कसा झाला नाहीं ? आमचे वृद्ध ख्रिस्ती बंधु तर वरील संबंधानें आमच्यावर फारच कावले आहेत. हातांत शापोदक घेऊन आपली तीन तपांची तपश्चर्या खर्ची घालण्याचा व या राजद्रोही व ख्रिस्तद्रोही मालेस खाक करून टाकण्याचा त्यांचा आवेश त्यांच्या लेखांत दिसत आहे. * पण या दोन्ही गोष्टींचें आम्हांस नवल वाटलें नाहीं. ‘ ज्ञानोदय ’बोवा झाले तरी त्यांच्या अधिकाराच्या बाहेर त्यांचीही नजर कोठून पोंचणार असें समजून आम्ही स्वस्थ राहिलों. पण आमच्या नागपुरकर मित्रासही आमच्या ‘ इलाखाधिपती ’नें चकविलें याचें

---

* ‘ ज्ञानोदय ’——पुस्तक २६ अंक ३० पृष्ठ ३५०–५१:—“ यांच्या लेखांत कित्येक शब्द फार विलक्षण योजिलेले आढळतात. उदाहरणार्थ—‘ आजला ’, इ० इ० ... ... ... ... ... ... ... पण या सर्वांपेक्षां विलक्षण ‘ इलाखाधिपति ’चा समास होय ! दुसऱ्यांनीं जर प्राकृत व संस्कृत शब्दांचा समास केला तर त्याचा उपहास करावा, आणि आपण स्वतः हिंदुस्थानी किंवा फारशी शब्दांशीं संस्कृत शब्दाचा समास करावा ! त्यांस वाटत असेल कीं, आम्ही महाशास्त्रीपुत्र शास्त्री पडलों, म्हणून महाराष्ट्र भाषेचे शंकराचार्यच आहों. आम्ही दुसऱ्यांच्या लिहिण्यास नांवें ठेवूं, पण आमच्या लिहिण्यास कोणी नांवें ठेवूं नयेत. आम्ही कसेंही लिहिलें तरी सर्वांनीं निमूटपणें आमचें अनुसरण करावें. कारण आम्ही शहाणे व बाकी सर्व वेडे. असें त्यांस वाटत असावें असें त्यांच्या लिहिण्याच्या शेखीवरून स्पष्ट दिसतें. ”

परवां दुसरी उसळी येऊन आमच्या भाषामर्मज्ञ बंधूनें पुनः ( पृ० ३७—अं० ३० ) आमच्यावर वर्षाव केला आहे. ‘ इलाखाधिपति ’ हा आपणास एक मोठा किल्लाच हस्तगत झाला आहे असें समजून ते तेथून आम्हांवर भडिमार करतात:—

“ ... ... बरें असो; हा शब्द ( ‘ आजला ’ ) कांहीं कोंकणस्थ मंडळीच्या मताप्रमाणें उत्तम आहे असें क्षणभर कबूल करूं. पण ‘ इलाखाधिपति ’ वगैरे जीं दुसरीं उदाहरणें आम्ही दाखविलीं होतीं त्यांविषयीं काय ? तीं मालाकारासारख्या तरुण धेंडाच्या लिहिण्यांत आलीं येवढयावरून सर्वांनीं शिरसावंद्य करावीं ना ? ... ... ... ...

आमच्या दुराभिमानी बंधूंस वाटतें कीं, आपण ब्राह्मण, तशांत कोंकणस्थ, पुण्यपट्टणवासी, शास्त्री, शास्त्रीपुत्र, युनिवर्सिटीचे ग्राज्वेट, व हायस्कुलांतील मास्तर असून निबंधमालेसारख्या सर्वमान्य मासिकाचे कर्ते असतां आमच्या प्रगल्भ लेखांत हे ख्रिस्ती लोक नाकें मुरडून आम्हांस मराठी भाषेची चवढव सांगतील काय ? छि ! हें बंड अगदीं चालूं देऊं नये. ”

बरीक आम्हांस आश्चर्य वाटतें. असो; आतां ज्या अर्थीं वरील समासघटनेची उपपत्ति करणें प्राप्तच आहे त्या अर्थीं तिजबद्दलचा शास्त्रार्थ सांगतों. तो आमच्या आक्षेपकांस पुढील श्लोकांत सांपडेलः—

गडाच्च सास्वडं यामि सास्वडाच्च पुनर्गडम् ।
गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लडबडाम्यहम् ॥

ही महाश्रुति व्याख्याना व्यतिरिक्त वाचकांच्या हृदयांत उतरणें कठीण दिसतें यास्तव तें देणें आवश्यक आहे. शंभर वर्षांपूर्वीं पुण्याच्या कारभारांत जो मोठा बखेडा माजला होता त्या वेळेस एक द्रविडदेशीय ब्राम्हण सासवड मुक्कामीं येऊन दाखल झाले. तेथें त्यांनीं लाग करून पाहिला, पण त्यांस उत्तर मिळालें कीं, तुम्ही पुरंदरावर जा, तेथें तुमची संभावना होईल. आचार्य उठले ते गडावर गेले; तेथें मंत्रिमंडळ मुळीं आपल्या गडबडींत, तेव्हां यांची दाद कोठची लागते! तिकडून त्यांस परत टोला मिळाला कीं, दानाध्यक्ष सासवडास आहेत त्यांच्याकडेच जा म्हणजे काय ती व्यवस्था होईल. याप्रमाणें सासवड व गड यांच्या दरम्यान पंडितबोवांच्या बऱ्याच खेपा झाल्या; तेव्हां शेवटीं त्यांच्या तोंडून वरील विचित्र रूपानें सरस्वती प्रगट झाली! तर 'चिखला' चा व 'वृष्टी' चा जो राक्षसविवाह झाला तो कोणत्या स्मृतीच्या संमतीवरून झाला, व संस्कृत शब्द व यवनी शब्द हे एका पक्षीं सीमन्तविधि झाल्यावांचून किंवा दुसऱ्या पक्षीं उपनयन झाल्यावांचून सगोत्र कसे बनले, हें समजण्याविषयीं ज्यांस उत्कंठा असेल त्यांनीं वरील द्रविडोक्तीचें मनन करावें!

पण वरील शास्त्रार्थ प्रस्तुत प्रकरणावर कसा लागू पडतो हें सर्वांच्या चटकर लक्षांत येणार नाहीं, यास्तव त्याची अंमळ फोड करणें अवश्य आहे. वरील द्राविडदेशस्थ कवीस जर कोणी पुसलें असतें कीं, "आचार्य बोवा, आपण प्रति**पाणिनि** दिसतां, 'गडा'ला व 'सास्वडा'ला विभक्तिसंस्कार करणारे पहिले आपणच; तसेंच 'लडबड्' हा धातुही बावीसशें धातूंत आज एक नवाच सामील केला पाहिजे! **पाणिनि** प्रत्यक्ष ऋषि असून या धातूनें त्याची दिव्यदृष्टि चुकविली असें म्हटलें पाहिजे!" याप्रमाणें जर वरील महाकवीवर अपाणिनीय प्रयोगांबद्दल कोणी भडिमार केला असता तर त्यास सहज उत्तर देतां आलें असतें कीं, "बाबारे, तूं आलीकडील कांहीं वर्तमान ऐकलें नाहींस वाटतें. अरे, ब्रम्हलोकीं पाणिन्यादि शास्त्रकारांनीं नुकतेंच एक कान्फरन्स

भरवून एक ठराव केला तो तुझ्या कानीं अद्याप आला नाहीं काय ? तूं अर्वाच्य आहेस, त्यापक्षीं तुला हें अश्रुतपूर्व नसावें; पण ऐकिलेंच नाहीं म्हणतोस त्या अर्थी सांगणें भाग आहे. अरे, ठराव असा झाला कीं, सर्वांनीं आपआपले अंश देऊन षड्दर्शनांची शेषपूर्ति करण्याकरितां एक वडा पंडित भूलोकावर पाठवावा. तो नुकताच अवतीर्ण होऊन त्यानें 'अष्टाध्यायी'चें परिशिष्ट म्हणून एक नवा 'गडबडाध्याय' रचला आहे. तर तुला जो जो शब्दशास्त्रांतील चमत्कार पाहून घ्यावयाचा असेल तो तो त्यांत पाहून घे. 'मारतोंड' हें जमतां जमतां डार्विन्‌भट्टाच्या उपपत्तीप्रमाणें 'मार्तंड' कसें बनलें, मूळचा 'आर्य' शब्द जो होता तो इराण, तुर्कस्थान, ग्रीस, इटाली, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड इतक्या देशांवरून आपटत जातां जातां शेवटीं आफ्रिकेला वळसा घालून आयताच 'सर' होऊन पुनः भारतवर्षांत तीन हजार वर्षांनीं येऊन दाखल कसा झाला,—असे एक ना दोन, शेकडों चमत्कार वरील महाग्रंथांत तुला आढळतील ! मग वेड्या ! 'लडबडामि' या मिषंताचीच तुला येवढी पंचाईत कसली पडली आहे !!" सारांश, ज्याप्रमाणें वरील श्लोकावरून त्याच्या कर्त्याच्या व्याकरणज्ञानाविषयीं तर्क करणें शोभत नाहीं, किंवा कोणी रंगभूमीवर मुसलमानाचें किंवा साहेबाचें सोंग आणलें असतां त्याच्या शुद्धतेबद्दल संकेश्वरीं अर्ज पाठवून श्रीची आज्ञा आणवायाला नको, त्याप्रमाणेंच वरील गंगाजमनी शब्दांच्या शुद्धाशुद्धतेबद्दलही येवढी चर्चा करण्याची मुळींच गरज नाहीं. ते गंगाजमनी होण्याचें कारण लिहिणाराचा चित्तभ्रम नव्हे; तर ते उपहासपर होण्याकरितां मुद्दामच गंगाजमनी केलेले आहेत. हें तो तो प्रसंग लक्षांत आणला असतां व पूर्वोत्तर संदर्भ पाहिला असतां तेव्हांच लक्षांत येणारें आहे.

( ३. ) **जॉन्सन्**ची सत्यप्रीति. हिच्या संबंधानें आमच्या पत्रकारानें दोन उल्लेखांत जो विरोध दाखविला आहे तो त्यांतील शब्दांवरून भासमान आहे खरा. अंक ३९ पृष्ठ १२ यांत **जॉन्सन्**च्या कोटिक्रमाविषयीं जें लिहिलें आहे त्यावर पुढें असें लिहावयास पाहिजे होतें कीं, वादविवादाच्या भरांत जरी तो असत्य पक्षाचेंही मंडन करी, तरी वाद आटपल्यानंतर त्यानें आपल्या प्रतिपक्ष्यांस अनेक वेळां प्रांजलपणानें असें सांगितलेलें आढळतें कीं, मी मघांशीं तुमच्याशीं जो भांडलों तो सारा वितंडवाद होता; माझें खरें मत तुमच्या सारखेंच आहे. शिवाय असेंही लिहायाला पाहिजे होतें कीं, त्याच्या लेखांत त्याच्या स्वतःच्या वास्तविक मताहून बुद्धिपुरःसर विपर्यास

केलेला कोठेंही आढळत नाहीं. जें त्याच्या खात्रीस पटलें तेंच त्यानें आपल्या ग्रंथांत लिहून ठेवलें आहे. बोलण्यांत जशी त्याची वेळेनुसार लटपट दृष्टीस पडे तशी हातांत लेखणी धरल्यावर तो बिलकुल होऊं देत नसे. * हीं वाक्यें वरील दृष्टांत असतीं तर 'हितेच्छूंनीं दर्शविलेल्या विरोधाचा परिहार झाला असता; व **जॉन्सन्**च्या सत्यप्रेमाविषयीं साशंक होण्यास वाचकांस जागा न राहती. तर याप्रमाणें हाही आक्षेप आम्हांस एकंदरीनें कबूल आहे. तरी सरतेशेवटीं आपच्या पत्रकारानें आमच्या चरित्रनायकाविषयीं यथार्थ ज्ञान [illegible] साधनभूत म्हणून जो इंग्रेजी उतारा दिला आहे त्याचा अतिशयित हा इंद्रधनु [illegible] वाटल्यावांचून राहत नाहीं. या उताऱ्यांत आमच्या नायकाचें जें वर्णन आहे तें जर खरें आहे, तर आजपर्यंत मोठमोठ्या ग्रंथकारांनीं **जॉन्सन्**चा जो महिमा गाइला तो सर्व व्यर्थ, व ते ग्रंथकार सर्व महामूर्ख असें अवश्य झालेच; कां कीं, वरील उताऱ्यावरून पाहतां **जॉन्सन्**च्या अंगीं वाखणण्यासारखा गुण बहुधा कांहींच नसून तो दुर्गुणांचा मात्र पुतळा होता असें स्पष्ट दिसतें. हें अवतरण आम्ही जेव्हां प्रथमतः वाचलें तेव्हांच आमची खात्री झाली कीं, हें कोणा महामूर्खाचें वचन आहे, व ते वेळेसच भाषेच्या शैलीवरून वाटलें कीं, बहुधा **हॉरेस् वॉल्पोल्** साहेबांनीं हें शहाणपण पाघळलें असावें. याप्रमाणें पहिल्या तडाक्यास आमची गोळी बरोबर लागली तर खरीच, पण तिजविषयीं निश्चय करण्याचा आम्हांस मार्ग पुष्कळ दिवस सांपडला नाहीं. अगोदर Memoirs of George III या पुस्तकाचाच कोठें थांग लागेना. हें आमच्या ऐकण्यांतही नव्हतें, व 'सैक्लोपीडिया' वगैरे पुस्तकांतूनही त्याचा पत्ता लागेना. **मेकॉले** साहेबांनीं

---

* "Exulting in his intellectual strength and dexterity, he could, when he pleased, be the greatest sophist that ever contended in the list of declamation; and from a spirit of contradiction a delight in showing his powers, he would often maintain the wrong side with equal warmth and ingenuity; so that when there was an audience, his real opinions could seldom be gathered from his talk; though when he was in company with a single friend, he would discuss a subject with genuine fairness; but he was too conscientious to make error permanent and pernicious, by deliberately writing it; and, in all his numerous works, he earnestly inculcated what appeared to him to be the truth; his piety being constant, and the ruling principle of all his conduct."

*Boswell.*

वरील ग्रंथकारावर एक स्वतंत्र निबंध लिहिला आहे, पण त्यांतही वरील ग्रंथावर टीका तर काय पण त्याचा नुसता उल्लेखही केलेला नाहीं. इतकी सामान्यतः पाहतां वरील ग्रंथाची योग्यता आहे. * असो, शेवटीं बॉसवेल्च्या ग्रंथाच्या सूचीपत्रावरून पाहतां वरील उतारा व हे महारसिक ग्रंथकार यांचा सहजच सुगावा लागला. तेथेंही चरित्रप्रकाशकानें पूर्वोक्त अवतरण जें दिलें आहे तें त्याचा अप्रयोजकपणा दाखविण्याकरितांच केवळ दिलें आहे. असें असतां 'हितेच्छूं' नीं वॉल्पोल् साहेबांचा लेख येवढा प्रतिष्ठित म्हणून दाखल केला आहे याचा आम्हांस अचबा वाटतो. जें लॉर्ड न्सें वर्णन इंग्रेजी ग्रंथप्रकाशकासही लाजीरवाणें वाटलें तेंच आमच्या 'इटाक्कर मित्रानें मोठें यथार्थ म्हणून आपल्या लेखाच्या पुष्ट्यर्थ घेतलें आहे हें कसें झालें असेल तें असो !

( ४ )-( ५ ) यांवर फार लांब लिहिण्याची मुळींच गरज नाहीं. आम्हांस मिळालेल्या प्रतींत ७७ वी आर्या नव्हती असें वाटतें. मूळ प्रत ज्याची त्यांनीं परत नेल्यामुळें सध्यां कांहीं निश्चयात्मक सांगवत नाहीं. अंक ४१ यांतील सुभाषितांत 'मूर्खस्य पंच चिन्हानि' हा पूर्वीं एकदां आलेला श्लोक पुनः आला आहे असें 'हितेच्छु' कळवितात. या पुनरुल्लेखाची आम्हांसही पुष्कळ दिवस शंका आहे. 'सुभाषित' सदराखालीं जे श्लोक येतात ते एकाद्या पुस्तकावरून किंवा वहीवरून क्रमवार घेतले नसल्यामुळें असा प्रकार घडण्यांत येतो. आम्हांस ज्या खेपेला जे जे श्लोक आमच्या संग्रहांतून घेण्यासारखे वाटतात ते ते त्या वेळेस निवडून त्यांचें भाषांतर देण्याची आमची वहिवाट आहे. त्यामुळें क्वचित् पुनरुक्ति होण्याचा सहजच संभव आहे. हें जाणून आजपर्यंत

---

* मेकॉले साहेबांनीं वरील ग्रंथकाराची योग्यता एका निबंधांत सविस्तर वर्णिलीच आहे. सदरील निबंधांतला पुढील उतारा तर्त आम्हांस बस आहेः——

"His judgment of literature, of contemporary literature especially, was altogether perverted by his aristocratical feelings. No writer surely was ever guilty of so much false and absurd criticism. He almost invariably speaks with contempt of those books which are now universally allowed to be the best that appeared in his time; and, on the other hand, he speaks of writers of rank and fashion as if they were entitled to the same precedence in literature which would have been allowed to them in a drawing—room."

येऊन गेलेल्या सुभाषिताची विल्हेवारी करून ठेवण्याचेंही आम्ही मनांत आणलें होतें. तों आमच्या नागपुरकर मित्राचा बोभाटा आलाच कीं मूर्खांचीं लक्षणें एकदां आलीं असून माक्त्यान् तीं कशाला हावींत? असो; तर वरील वर्णानुक्रमवार याद लवकरच तयार केली पाहिजे!

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

विनंति कीं, आपल्या मालेच्या तेराव्या अंकांत 'चमत्कारिक माहिती' या सदराखालीं इंद्रधनुष्याविषयीं आपण जी माहिती दिली आहे तींत असें लिहिलें आहे कीं, "थबथबणारें धोतर दोहों टोकांशीं उंच धरून व खालीं हबकून त्यांतून तुषार झाडले असतांही त्यांवर इंद्र धनुष्यासारख्या शानदार लकेरी मारतात! इतकें मात्र केलें पाहिजे कीं सूर्याच्या दुसऱ्या बाजूला आपण उभें राहिलें पाहिजे, म्हणजे मध्यें तुषार, एका बाजूला सूर्य, व दुसरीकडे आपण.—यास्तवच संध्याकाळचें इंद्र धनुष्य पूर्वेकडे व सकाळचें पश्चिमेकडे असें नियमानें दृष्टीस पडतें." परंतु सहाव्या पुस्तकांत इंद्र धनुष्य ह्मणून जो धडा आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, "तोंडांत पाणी घेऊन सूर्याकडे पाठ करून कोणी तें जोरानें फुंकून बाहेर उडाविलें, तर त्याच्याही दृष्टीस हा चमत्कार पडतो." या परस्पर विरुद्ध अशा दोन्ही लेखांचा विचार करितां असें दिसून येतें कीं, "मध्यें तुषार, एका बाजूला सूर्य, व दुसरीकडे आपण" असें आपण जें लिहिलें आहे तें नीट नाहीं. कारण, आपोआप उत्पन्न होणाऱ्या सकाळ संध्याकाळच्या धनुष्यांविषयीं आपण जें लिहिलें आहे त्याचा व सहाव्या पुस्तकांतील लेखाचा विचार केला असतां असें स्पष्ट कळून येतें कीं, पाणी व सूर्य यांच्या योगानें उत्पन्न होणारें धनुष्य दृष्टीस पडण्यास सूर्य व तुषार यांच्या मध्यभागीं पाहणारा असला पाहिजे. आणि सकाळीं व संध्याकाळीं आपण इंद्रधनुष्य पाहात असतां सूर्य व धनुष्य यांच्या मध्यभागींच आपण असतों.

२. याच सदराखालीं विजेविषयीं जो मजकूर आहे त्यांत आपण असें लिहिलें आहे कीं, "अंधारांत मुकट्यावरून अंमळ जोरानें हात घांसटला असतां, किंवा डोक्यावरील केंसावर तो अंमळ चोळला असतां ठिणग्या उडूं लागतात. त्यांतून तो धुतला असल्यावर तर केवळ निऱ्या करतांनाही

शेंकडो ठिणग्या तडातड उडतांना उजेडांत नुसत्या ऐकूं येतात, व अंधारांत फुलबाजीसारखी मौज दिसते !" परंतु आम्ही हात धुवून आपण सांगितल्याप्रमाणें केवळ निऱ्या करून पाहतां आम्हांस कांहीं चमत्कार दिसला नाहीं, तेव्हां हें आपलें लिहिणें खरें कशावरून समजावें ?

३. अंक १४ पृष्ठ १७ यांतील शेवटल्या दोन ओळींत आपण लिहितां कीं, "मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्वप्रसिद्धच आहे." त्यास सर्व मनुष्यें भलीं आहेत असें प्रथमतः समजावें, म्हणून कायद्यांत कां नियम केला आहे बरें!

४. अंक १५ पृष्ठ १७ यांत सहृदयतेविषयीं विवरण करतांना आपण असें म्हटलें आहे कीं, "हा गुण असणें हें मनाच्या किंवा हृदयाच्या विशालत्वाचें चिन्ह होय, आणि त्याचा अभाव हा अर्थातच त्याच्या उलट गुणाचें म्हणजे वरील दोहोंच्या संकुचितत्वाचें दर्शक होय." आणखी, अंक १६ च्या आरंभीं "मनाच्या व हृदयाच्या ज्या नानाविध वृत्ति आहेत" अशी आपली उक्ति आहे. त्यास, मन व हृदय या दोन पदार्थांच्या स्वरूपाविषयीं जर आपण चार शब्द लिहाल तर मोठा उपकार होईल. दुसरें, मनुष्याच्या अंगीं सहृदयता असल्यानें त्याचें मन व हृदय या दोहोंतून एकच जर विशाल असतें, तर तिच्या अभावीं तीं दोन्ही काय म्हणून संकुचित असलीं पाहिजेत; या गोष्टीचेंही विवरण व्हावें.

५. आपल्या लिहिण्यांत प्रत्येक स्थळीं 'उदात्तरस' असे शब्द येतात; त्यास उदात्तरस म्हणजे काय आहे त्याचें स्पष्टीकरण मेहेरबानीनें करावें.

पत्रविस्ताराची माफी असावी. लोभ असावा ही विनंती.

वसई, तारीख २२ जानेवारी सन १८७८ इसवी.

आपला,
मी.

---

वरील पत्रास आमचें उत्तर येणेंप्रमाणें आहे:—

(१) पहिली शंका यथार्थ आहे. पाहणारा मनुष्य सूर्य व तुषार यांच्या मधेंच असला पाहिजे. सकाळच्या व संध्याकाळच्या इंद्र धनुष्यांवरून वरील गोष्टच सिद्ध होते.

( २ ) ही शंका मोठ्या चमत्कारिक गैरसमजानें उत्पन्न झाली आहे असें दिसतें. मुकट्यावरून उडणाऱ्या ठिणग्यांचा चमत्कार आम्ही शेंकडो वेळां प्रत्यक्ष अनुभविला असतां वसई मुक्कामीं तो 'कांहींच' दृष्टीस पडेना असें जेव्हां 'मी'च्या पत्रांत आम्हीं वाचलें तेव्हां विजेच्या धक्क्यानें जसें तटस्थ व्हावें तशी आमची स्थिति झाली! वरील इंद्र धनुष्यानें जसें आम्हांस थोडेंसें चकवलें त्याप्रमाणें विजेनें तर मुदलींच चकवून आम्हांस आलेली प्रतीति केवळ दृग्भ्रमात्मक होती कीं काय असेंही आम्हांस क्षणमात्र वाटून गेलें. पण आम्हीं लिहिलेला प्रयोग पुनः करून पाहतां पुनःही पहिल्यासारखाच विद्युत्तेजाचा साक्षात्कार झाला. तेव्हां जी वीज आमच्या मुकट्यांत येते ती आमच्या पत्रकाराच्याच कां येऊं नये याविषयीं आम्ही अगदीं बुचकळ्यांत पडलों. एका मित्रास वरील प्रकरणीं पुसतां त्यानें आम्हांस सल्ला दिला कीं, तुम्ही आपल्या पत्रकारास मुकटा रेशमी घेतला होता कीं तागाच घेतला होता म्हणून विचारा. याप्रमाणेंच सदरील प्रश्नावर उलट प्रश्न करण्याचें आम्हीं मनांत आणिलें व त्याप्रमाणें लिहिणार, तों प्रश्नांतील शब्द पुनः एकवार वाचून पाहतां विद्युत्प्रकाशाप्रमाणेंच एकदम शक्क होऊन आमच्या वसईकर मित्राचे प्रयोग सर्व वायां कां गेले याचें कारण आम्हांस चटकन् उमगलें. तें 'आम्ही हात धुऊन' या शब्दांकडे अंमळ विशेष लक्ष दिलें असतां आमच्या वाचकांसही बहुधा कळून येईल. वसईकर 'मी' नें मुकटा धुण्याबद्दल आपला हात धुऊन प्रयोगास आरंभ केला, तेव्हां सहजच विद्युल्लता त्याच्या वस्त्रांत संचरली नाहीं. 'तो धुतला असल्यावर' या वाक्यांत दर्शक सर्वनामाचा अन्वय 'मुकट्या' कडे जो करायाचा तो 'हाता' कडे करून आमच्या पत्रकारानें मोठ्या भाविकपणानें वरचेवर हस्तप्रक्षालन केलें असेल; पण त्याची ती सर्व मेहेनत फुकट जाऊन विजेच्या हट्टीपणाचा त्यास मोठा चमत्कार वाटला असेल! असो, झाली गोष्ट ती तर गेलीच; पण पुनः जर विद्युदेवतेचे वरील प्रयोगकारास आव्हान करायाचें असेल तर त्यानें हस्तप्रक्षालनाची किंवा नेत्रस्पर्शनाची बिलकुल खटपट न करतां मुकटा धुवून वाळवावा, आणि वाळल्यानंतर त्याच्या निऱ्या करूं लागावें. दिवस असेल तर निऱ्या करतांना नुसता तड्तड् असा शब्द होऊन विजेच्या वास्तव्याचें त्यास कर्णप्रत्यक्ष होईल; रात्रीं वरील कृति केली तर आमच्या लेखाची सत्यता कर्णद्वारें व नेत्रद्वारें अशा दोहीं प्रकारांनीं

त्याच्या प्रचीतीस येईल. शिवाय मुकटा केसांवर घांसला असतां किंवा त्यावर अंमळ जोरानें हात फिरविला असतांही विद्युत्संचार झालेला दिसेल!

( ३ ) कायद्याचा अभिप्राय काय आहे तो आम्हांस निश्चयानें सांगवत नाहीं; पण आमच्या पत्रकारानेंच 'समजावें' हा शब्द जो घातला आहे त्यावरूनही पाहतां बराच निकाल होतो. कोणावरही एकादा गुन्हा शाबीद होईपर्यंत तो कायद्याच्या दृष्टीनें भलाच समजला जातो व गेला पाहिजे हें उघडच आहे. 'धरला तर चोर नाहीं तर पाच्छाहाहून थोर' व 'चोर धरावा मोटे आणि शिंदळ धरावा खाटे' या दोन प्राचीन म्हणींवरून व 'कैदीस संशयाचा फायदा दिला पाहिजे' या अर्वाचीन वकिलोक्तीवरून वरील सिद्धांताचीच प्रचीती येते! पण ही केवळ कायद्याची गोष्ट झाली. कायद्यांत कोणी मनुष्य सांपडला नाहीं,* किंवा बाह्यतः कोणी दुराचरणी दिसला नाहीं, म्हणून त्याचें आचरण सर्वथा निर्दोषच असेल असें नियमानें सांगतां येणार नाहीं हें सर्वांस जगाच्या अनुभवावरून माहित आहेच. कायद्यानें केवळ सोयीकरतां वरील नियम केला असावा, व तसा करणें हेंच एकंदरींत प्रशस्तही खरें. जर पुरावाच नाहीं तर न्यायाधीशानें तरी काय करावें? केवळ आपल्या समजुतीवरून तो जर लोकांस शासन देऊं लागेल, तर मग कायद्याचें माहात्म अर्थातच आटपलें. पण हा विचार प्रकृत विषयास केवळ बाह्य होय. मनुष्य जातीविषयीं वस्तुतः विचार करतां तिच्यांत कितपत साधुत्व वसतें किंवा मनोनिग्रहाचें तींत कितपत सामर्थ्य आहे याविषयीं अगोदर ज्याची त्यास मनोमय साक्ष मिळेल, व शिवाय इतिहासाचें एकादें पृष्ठ जो उलटील किंवा जगाच्या व्यवहाराचा एकादा कोनकोपराही जो क्षणमात्र पाहील त्यास सुद्धां वरील गोष्टीविषयीं प्रमाण पुष्कळ मिळेल. आतां चांगलीं माणसें या जगांत मुळींच नाहींत किंवा सुशिक्षेच्या योगानें मनुष्याची स्थिति मुळींच सुधरत नाहीं असें मुळींच म्हणणें नाहीं; पण एकंदर जातीविषयीं

---

* स्विफ्ट नामें करून एक मोठा विख्यात ग्रंथकार गेल्या शतकांत होऊन गेला. यानें कायद्याविषयीं पुढील विनोदात्मक उक्ति प्रगट केली आहे:—

"कायदे हीं कोळ्यांचीं जाळीं होत. त्यांत माशांप्रमाणें साधे भोळे जे कोणी असतात, ते मात्र बिचारे गुंततात. पण गांधीलमाशीप्रमाणें जे अस्सल पट्टाईत लुच्चे असतात, ते त्यांतून तेव्हांच निसटून जातात!"

विचार करतां आमच्या मूळ लेखांतलाच सिद्धांत खरा ठरेल. सरतेशेवटीं दोन शाब्द प्रमाणें दाखल करून हें कलम पुरें करतों. 'गीतें 'त अर्जुन म्हणतोः—

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

कृष्णास ही वरील गोष्ट पटून तो आपली संमति पुढें देतोः—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येणच ग्रह्यते ॥

एक सुभाषित येणेंप्रमाणें आहेः—

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो न हि सर्वत्र चंदनो न वने वने ॥ *

दृष्टांत शतक.

( ४ ) मन व हृदय या दोहोंची इंग्रेजी भाषेंत जशी स्पष्ट भिन्नता आढळते तशी एतद्देशीय भाषांतून आढळत नाहीं. याचें कारण आपले लोक वरील दोहोंस सरासरी एकच समजतात हें होय. मन हें बुद्धीचें म्हणजे विचारशक्तीचें अधिष्ठान होय व हृदय हें स्नेहकरुणादि वृत्तींचें होय. तत्वज्ञा-

---

* गीतेचीं भाषांतरें अनेक आहेत. तीं सर्व दर एक श्लोकाखालीं 'गीतार्थबोधिनी' नामक ग्रंथांत छापलीं आहेत. त्या सर्वांत आमच्या शूद्रकवीचें अत्यंत सुबोध समजून तें खालीं देतों:—

मन हेंची कृष्णदेवा । चंचळ वागवी स्वभावा ॥
इंद्रियांत बलोत्तर । ब्रह्महरां अगोचर ॥
याचा निग्रह वायूची । मोट बांधूं शक्ती कैची ॥
तुका येतो काकुळती । येवढी वारावी फजिती ॥ १ ॥

हास्यमुखें दैत्यध्वंस । वदे खरेंच प्रश्नास ॥
तुवां केलें धनुर्धरा । महाबाहो पार्थवीरा ॥
मन चंचळ दुर्जय । आहे मजला प्रत्यय ॥
तरी अभ्यास वैराग्यें । मन वळिजे संतसंगें ॥
जिंकिजेल जेव्हां मन । तुका तेव्हां समाधान ॥ २ ॥

चे ठायीं बुद्धिगुणांचें प्राबल्य आढळतें व कवीचे ठायीं हृदयगुणांचें आढळतें. पहिल्यास यूक्लिड्चा ग्रंथ अत्यंत मनोरम वाटेल व होमरचें एकही पद्य त्यास पसंत पडणार नाहीं; दुसऱ्यास भूमितीचे सिद्धांत अत्यंत रूक्ष वाटून ग्रीक व ट्रोजन लोकांच्या युद्धचमत्कारांत तो अगदीं गढून जाईल. युरोपांतील एका महापंडितानें 'इलियड्' वाचून त्याच्या भक्तांस प्रश्न केला, "बरें, हा सर्व खटाटोप झाला, पण यांत शेवटीं प्रमेय काय निघालें? हेक्टर यास आकिलीसानें मारलें व हेक्टराचें दहन झालें;—पण येवढ्या चोवीस सर्गांत एकंदर ठरलें काय?" यूक्लिड्चा प्रतिपक्षीही असाच प्रश्न करील कीं, "बाराही बुकांतून * आम्ही पार पडलों, इतक्या वाकड्या तिकड्या रेघा ओढल्या, कोन साधले, वर्तुळें काढलीं, सर्व कांहीं केलें; पण रंजनाचा प्रकार येवढा तरी कोठें आढळला काय? समजलें कीं काटकोन त्रिकोणांत कर्णाचा वर्ग दुसऱ्या दोन बाजूंच्या वर्गांबरोबर असतो,—पण यांत मौज ती काय आहे?"† तर याप्रमाणें बुद्धिमत्त्व व सहृदयत्व हीं परस्परांहून भिन्न होत. न्यायाधीशाचे ठायीं किंवा सेनापतीचे ठायीं पहिलाच गुण प्रबळ असला पाहिजे, दुसऱ्याचें प्राबल्य त्यास कामाचें नाहीं; तीच साधूच्या ठायीं सहृदयता अत्यंत शोभा पावते. पुरुष व स्त्री यांचे ठायींही सामान्यतः पाहतां वरील गुण यथानुक्रम विधात्यानें ठेवले आहेत असें दिसतें, व दोहोंचा संयोग ह्या संसारास किती उपयोगी आहे हेंही उघडच आहे.

वरील विवरणावरून पत्रकाराच्या लक्षांत येईलच कीं, सहृदयता व बुद्धिमत्ता हे गुण भिन्न भिन्न होत. तरी हे दोन्ही एकत्र असूं शकणार नाहींत

---

* युक्लिड्नें गणितशास्त्रावर रचलेलीं बुकें मूळचीं बारा होतीं. त्यांपैकीं हल्लीं उपलब्ध म्हटलीं म्हणजे पहिलीं साहा व अकरावें बारावें अशीं एकंदर आठ आहेत. मधलीं चार गहाळ झालीं त्यांचा अद्याप थांग नाहीं. यांत अंकगणिताचा विषय होता असा लोकप्रवाद आहे.

† एका संस्कृत कवीनें वरच्यासारखाच उद्गार प्रगट केला आहे:——

वदंतु कतिचिद्धटात् खपफछठेति वर्णच्छटा
घटः पट इतीतरे पटु रटंतु वाक्पाटवात् ।
वयं बकुलमंजरीगलदलीनमाध्वीझरी—
धुरीणगणरीतिभिर्भणितिभिः प्रमोदामहे ॥

किंवा नसतात असें नाहीं. कोठें ते एकत्र सांपडतात, कोठें सांपडत नाहींत, किंवा कांहीं प्रमाणानें सांपडतात. यास्तव एकाच्या संकोचावरून दुसऱ्याचा संकोच अनुमित होतोच असें नाहीं हें आम्हांस कबूल आहे.

(५) 'उदात्त' हा नवा शब्द इंग्रेजींतल्या sublime या शब्दाचा पर्याय म्हणून आम्हीं योजलेला आहे. संस्कृत साहित्यांत या रसाचा वांचक शब्द असल्याचें माहीत नाहीं. भव्य वनश्रीचें, मोठमोठ्या पर्वतांचें, सागराचें, वगैरे ज्यांत वर्णन आहे, किंवा महापुरुषांच्या महात्मतेचें वर्णन ज्यांत केलें आहे, अशीं काव्यांतील स्थलें वरील रसाचीं उदाहरणें होत.

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

विनंति कीं, सांप्रत आपल्या महाराष्ट्र भाषेकडे बहुत नवीन लोकांचें दुर्लक्ष असतां आपण तिला 'अभियुक्त भाषांच्या' पदवीस चढविण्याचे कामीं उद्युक्त झालां आहां, व आपण तिला परम शुद्ध स्वरूप प्राप्त करून देण्याविषयीं झटत आहां, हें पाहून कोणाचेंही चित्त आनंदभरित होईल, यांत संदेह नाहीं. परंतु आपण जो भाषाशुद्धीचा मुख्य हेतु धरिला आहे तो हेतु, आपण विषय प्रतिपादनाच्या भरांत असतां, किंवा भाषाभिवृद्ध्यर्थ संस्कृत शब्दांस पाचारण करून आणण्याचे कामीं गुंतलां असतां, किंवा कल्पनाशक्तीच्या खेळानें वाचकांस थक्क करून सोडण्यांत निमग्न झालां असतां, आपल्या स्मरणांत राहत नाहीं, हें पाहून आम्हांस वाईट वाटतें. जे कोणी आपले लेख सर्वतः मान्य व्हावे म्हणून इच्छा धारितात त्यानीं, आणि विशेषतः जे कोणी आधुनिक विद्वत्पादारूढ झाले आहेत त्यानीं, हातीं लेखणी धरिली म्हणजे, आपल्या लिहिण्यांत व्याकरणदोष, अर्थदोष, व अलंकारदोष राहूं न देण्याविषयीं फार खबरदारी ठेविली पाहिजे. आपण भाषाशुद्धि करण्यास निघालां आहां, याकरितां आपलें लिहिणें किती निर्दुष्ट असतें हें पाहण्याचे इराद्यानें आम्ही आपल्या निबंधमालेचे १६ व १७ हे दोन अंक वाचून पाहतां, आम्हांस त्यांत जे दोष आढळले ते खालीं लिहितों, व ते बारीक सारीक नाहींत अशी आपली खातरी झाल्यास आपण तसे दोष पुढें आपल्या लिहिण्यांत घडूं देणार नाहीं अशी आशा करितों.

अंक १६.

पृष्ठ ३ कलम २.—यांत आपण ‘ मनोवृत्ती ’ या स्त्रीलिंगी नामाच्या ऐवजीं पुल्लिंगी सर्वनामाची योजना केली आहे.

पृष्ठ ६ च्या अंतींच्या व पृष्ठ ७ च्या आरंभींच्या वाक्यांत मनुष्य या एक-वचनी नामाबद्दल युक्त असें एकवचनी सर्वनाम कांहीं स्थळीं घालून कांहीं स्थळीं अनेकवचन योजिलें आहे, असा घोटाळा केला आहे.

पृष्ठ १२ यांत ‘ पृथ्वीचाच एकंदर पृष्ठभाग खुद्द पाहणें असल्यास तो चंद्रग्रहणसमयीं सर्वांस छायारूपानें प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतो. ’ असें वाक्य आहे; त्यांत ‘ एकंदर पृष्ठभाग खुद्द पाहणें असल्यास ’ या शब्दांनीं असें वाटतें कीं, आपण यावत्पृथ्वीचें दर्शन एक समयावच्छेदें करून होण्याची कांहीं युक्ति सांगत आहां, परंतु पुढील शब्द वाचले म्हणजे निराशा होते. पुढें आपण छायामात्र दिसतें म्हणून सांगितलें आहे. दुसरें, ‘ प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतो ’ यांपैकीं ‘ प्रत्यक्ष ’ शब्दाचा अन्वय ‘ पृष्ठभाग ’ याशीं केला असतां फिरून पूर्ववत् प्रकार होतो, आणि दृष्टिगोचर या शब्दाशीं केल्यास त्यास व्यर्थ-ता येते.

पृष्ठ १३ यांत ‘ त्यांस आपल्या ज्ञानाची ’ इत्यादि वाक्य आहे; परंतु ‘ त्यांस मनास प्रत्यय येऊन चुकला असतो ’ असें म्हणण्याची रूढि नाहीं.

पृष्ठ १९ यांत ‘ स्वभावतः दुसऱ्याचा उत्कर्ष ज्यांस देखूं सकत नाहीं ’ असें वाक्य आहे, त्यांत ‘ उत्कर्ष ’ शब्दाकडे देखूं सकणें या क्रियेचें जनकत्व येऊं पाहतें; परंतु तसें व्हावें असा आपला आशय नाहीं.

पृष्ठ १८ यांत ‘ वरील श्लोकाचें भाषांतर इंग्रेजींत ’ इत्यादि वाक्य आहे, त्यांतील ‘ दोहोंत ’ या शब्दाचा संबंध पाहूं लागल्यास त्या वाक्यांत कोठेंच सांपडत नाहीं. दुसरें, ‘ इतकें दोहोंत ’ इत्यादि वाक्यांशानें एकंदर वाक्या-चा कांहींच अर्थ होऊं नये असें झालें आहे.

पृष्ठ २९ यांत ‘ मानिनी स्त्रियांचा आपल्या रूपवत्त्वाचा अभिमान ’ इत्यादि वाक्य आहे, त्यांत स्त्रियांस रूपाचा अभिमान असल्यानें त्यांचें सौंदर्य त्यांवर लंपट असणाऱ्या पुरुषांस अधिक रमणीय वाटतें म्हणून आपण म्हटलें आहे. परंतु तसें होण्याचें कारण स्त्रियांचा अभिमान नाहीं. त्याचें वास्तविक कारण पुरुषांचा प्रेमातिशय अगर त्यांस कामानें लागलेलें वेड होय, असें आम्हांस वाटतें.

पृष्ठ ३१ यांत 'जगांत जेवढे म्हणून गुण आहेत त्यांपैकीं झाडून एकून एक आमच्या राज्यकर्त्यांनीं आपणाकडे ओढून घेऊन' इत्यादि वाक्य आहे, परंतु 'झाडून एकून एक' असें म्हणण्याची रूढि नाहींसें वाटतें. लोकांत नुसतें 'झाडून सारे' अगर नुसतें 'एकूनएक' असें म्हणण्याचाच परिपाठ आहे. दुसरें, 'त्यांपैकीं झाडून एकूनएक' असेंही म्हणणें बरोबर नाहीं. कारण 'पैकीं' शब्दानें सर्वदा अवशिष्टतेचा बोध होतो, आणि आपल्या मनांतून तर 'इंग्रेज लोक झाडून सारे गुण आपणाकडे ओढून घेतात' असें म्हणावयाचें आहे.

## अंक १७.

पृष्ठ ४ यांत 'या एकट्या पदार्थानें जगांत जेवढे चमत्कार झाले आहेत त्याचा शतांशही परीस खरोखरच सांपडल्यानें झाला असता काय?' असें वाक्य आहे, त्यांत प्रथम 'चमत्कार' अनेक वचनीं घेऊन पुढें शतांशाच्या वेळीं एकवचनीं कल्पिला आहे, यामुळें वाक्य हेंगाडें झालें आहे.

पृष्ठ ७.—'आतां चकमक उडावी इतक्यांत सूर्यास ग्रहण लागून खग्रास पडत चालला. होतां होतां पूर्ण ग्रास होऊन सगळ्या रणभूमीवर ठिक्कर काळोख पडला. नक्षत्रें पुनः दिसूं लागलीं. पशुपक्ष्यादि प्राणिजात व वनस्पतिवर्ग हीं एकाएकीं भयचकित झाल्यासारखीं होऊन क्षणभर व्यापारशून्य व स्तब्ध झालीं.'—यांत पहिल्या वाक्यांत 'खग्रास पडत चालला' असें जें म्हटलें आहे तसें म्हणण्याची रूढि नाहीं. तसेंच 'ठिक्कर काळोख पडला' असेंही कोणी ह्मणत नाहीं. ठिक्कर याचा क्रियाविशेषणासारखा मात्र प्रयोग पाहण्यांत येतो. तिसरें वाक्य 'नक्षत्रें पुनः दिसूं लागलीं' असें आहे. परंतु नक्षत्रें पूर्वीं दिसत असल्याचें आपण पूर्वीं कोठेंच लिहिलेलें नाहीं, याकरितां येथें 'पुनः' शब्द नको होता. शेवटल्या वाक्यांत वनस्पति भयचकित झाल्याविषयीं आपण लिहितां; परंतु झाडांस भय वाटल्याचें कोणी आजन्मांतही पाहिलें नसावें. तसेंच, या वाक्यांत 'व्यापारशून्य व स्तब्ध' असे दोन शब्द घालण्याचें कारण नव्हतें; कारण दोन्ही शब्द एकच अर्थ दाखवितात.

पृष्ठ १६ यांत 'बाकी, जो मनुष्य प्रांजल बुद्धीनें पटलेलीं व न पटलेलीं अशीं दोन्हींही उदाहरणें घेऊन त्या दोहोंवरून सत्यासत्यत्वाचा निवाडा करूं पाहील त्याच्या ध्यानांत खरें तथ्य तेव्हांच आल्यावांचून राहणार नाहीं.' असें

वाक्य आहे. यांत ‘ प्रांजल बुद्धीनें ’ या शब्दांचा ‘ पटलेली व न पटलेली ’ या शब्दांशीं अन्वय आहेसें दिसतें, परंतु अर्थबोध होत नाहीं. याकरितां त्यांचा अन्वय ‘ निवाडा करूं पाहील ’ या शब्दाशीं करावा लागतो व दूरान्वयाचा दोष घ्यावा लागतो. ‘ सत्यासत्यत्वाचा ’ या शब्दाचे ठिकाणीं ‘ सत्यासत्याचा ’ असा शब्द पाहिजे होता. ‘ दोन्हीही उदाहरणें ’ यांत ‘ दोन्ही ’ या पुढील ‘ ही ’ अक्षराची गरज नाहीं. या वाक्यांत एके ठिकाणीं ‘ खरें तथ्य ’ असें आपण म्हटलें आहे, त्यास ‘ खोटें तथ्य ’ आपल्या पाहण्यांत कधीं आलें आहे काय ?

पृष्ठ २० यांत ‘ हीं आतां पुष्कळांच्या ठायीं दूर झालीं असल्यामुळें ’ असें आपण लिहिलें आहे, त्यांत ‘ ठायीं ’ याच्या ठिकाणीं ‘ ठायींचीं ’ असें पाहिजे. नुसतें ‘ ठायीं ’ म्हटल्यानें इष्टार्थ प्रदर्शित होत नाहीं.

पृष्ठ २३ यांत अकराव्या ओळींत ‘ मानमरातब ’ शब्दास आपण स्त्रीलिंगी केलें आहे, पण तो पुल्लिंगी असावा.

पृष्ठ २४ यांत ‘ कवि, तत्वज्ञ, व ईश्वरपरायण अशा तिघां प्रकारच्या मनुष्यांस ’ असें आपण म्हटलें आहे, परंतु मनुष्याव्यतिरिक्त अन्य पदार्थांशीं ‘तीन’ या विशेषणाचा संबंध असतां त्याचें सामान्य रूप ‘ तिघां ’ असें होत नाहीं. याच पृष्ठांत ‘ हे जो मनांत आणील त्यास—लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं ’ असें वाक्य आपण लिहिलें आहे, परंतु ‘ त्यास लक्षांत आलें ’ ‘ मला लक्षांत आलें’ असें म्हणण्याचा परिपाठ नाहीं.

पृष्ठ २५ यांत १८ व्या ओळींत ‘ उभा राहिलेल्या मनुष्याची ’ असें आपण लिहिलें आहे, तेथें ‘ उभ्या राहिलेल्या मनुष्याची ’ असें पाहिजे. याच पृष्ठांत ‘ सृष्टीचे अनेक गुप्त व्यापार ’ इत्यादि वाक्य आहे. त्यांत एकाच नामाबद्दल कांहीं ठिकाणीं ‘ तो ’ व कांहीं ठिकाणीं ‘ हा ’ या सर्व नामांचीं रूपें योजून आपण गोंधळ केला आहे, व कित्येक अन्य पृष्ठींही आपणाकडून असा प्रकार झाला आहे; पण असें करणें ठीक नाहीं.

पत्राचा विस्तार फार झाला सबब लेखणी तूर्त आटपतों. लोभ असावा ही विनंति.

वसईकर.

वरील आक्षेपांवर आमचीं उत्तरें येणेंप्रमाणें आहेतः—

अंक १६

पृष्ठ २—यांत 'गर्वा' चा 'मनोवृत्ति' त्वेंकरून आरंभीं निर्देश करून पुढें पुल्लिंगी प्रयोग केला आहे हें आमच्या पत्रकारास अशुद्ध वाटतें. पण असे प्रयोग आपल्या भाषेंत होत नाहींतसें नाहीं. पुढील प्रयोग पहाः—

"त्या रेशमी झग्यांतले दोन तीन हळूच उचलून घेऊन, 'स्वारी' भयभीत होत्साती पळत पळत आपल्या खोलींत आली, आणि ते कपडे आपल्या गादीखालीं लपवून ठेवून वर स्वस्थ निजली. हें ज्यांनीं पाहिलें होतें, ते 'हा' सकाळच्या प्रहरीं काय करतो हें पाहण्यास फार उत्सुक झाले होते."

अंक २७ पृष्ठें ७-८ ('मधुमक्षिका')

"पण निदान एका 'व्यक्ती' चा तरी कैवार आमच्या 'हितेच्छु' म्हणविणारांनीं घ्यावयाचा नव्हता. ज्या 'अधमाधमा'नें .. .. .. .. .. .."

अंक २४ पृष्ठें ३३-४.

याप्रमाणेंच बोलण्यांतही पुढील प्रयोग हमेश अढळतातः—"या चिन्हाला कशाला बरोबर नेतां? याला कोठून आणलासें हा तुम्हांला करून टाकील!" "बरी पिडा गेली. काय उच्छाद मांडला होतान् सारखा!" "ही असामी कांहीं सामान्य समजूं नका. प्रसंग पडला तर चारचौघांना पाणी पाजण्यासारखा हा आहे!" याप्रमाणेंच 'व्याध' 'मूर्ति', 'ध्यान' वगैरे शब्दही अगोदरच्या वाक्यांत योजले असतां पुढल्यांत यथालिंग प्रयोग होण्यास अडचण पडत नाहीं हें सर्वांच्या ध्यानांत येईलच.

पृष्ठ ६—हा आक्षेप यथार्थ आहे.

पृष्ठ १२—'वसईकर' यांची निराशा झाल्याविषयीं त्यांनीं सुचविलें आहे, पण त्यास उपाय काय? आमच्या अंगीं सैतानाचें जर सामर्थ्य असतें तर त्यानें प्रभु येशूस जसें उंच पर्वतावर नेऊन पृथ्वीवरील सर्व राज्यें दाखविलीं तसें आम्हांसही करतां आलें असतें! पण तें अनकूळ नाहीं यास्तव पृथ्वीचा पृष्ठभाग केवळ छायारूपानेंच दृष्टिगोचर होण्याची आम्हीं युक्ति सांगितली.

'प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतो' या शब्दांवर, तसेंच पुढें 'व्यापारशून्य व

व स्तब्ध ', ' खरें तथ्य ', ' झाडून एकून एक ' यांवर आमच्या आक्षेपकाचें असें म्हणणें आहे कीं, असे द्विरुक्त्यात्मक प्रयोग करणें बरोबर नाहीं. मनुष्यें जीं बोलतात तीं सर्व साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत आपण उभे आहों असें समजून जर मोजके शब्द बोलतीं, व ग्रंथ लिहिण्याची पद्धत भूमितींतील सिद्धांतांप्रमाणें किंवा **पाणिनी**च्या सूत्रांप्रमाणें अगदीं बांधलेली असावी असें जर असतें, तर आमच्या पत्रकाराचें म्हणणें यथार्थ होतें. पण असा प्रकार फार करून मुळींच आढळण्यांत येत नाहीं. भाषेचा उपयोग मनांतील अर्थ यथास्थितपणें श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या लक्षांत उतरावा हाच असल्यामुळें वरच्यासारखी ढिलाई साऱ्या भाषांतून आढळते. ज्याप्रमाणें युद्धाच्या वगैरे कांहीं कामांखेरीज अंगाशीं घट्ट आंवळून बसणारा पोषाक कोणीही लोक करीत नाहींत, त्याप्रमाणेंच शास्त्रीय सिद्धांतांखेरीज इतर ठिकाणीं ही भाषेची ठाकठिकी व चापाचोपीही दृष्टीस पडत नाहीं. सामान्य ग्रंथाची भाषापद्धति म्हटली म्हणजे साधारण पोषाकाप्रमाणें फार पोकळ नाहीं व फार घट्ट नाहीं अशा तऱ्हेचीच असते. ' वसईकर ' यानीं वरील शब्दांवर जसे आक्षेप काढले आहेत तसे काढून भाषेची शुद्धाशुद्धता ठरवूं लागल्यास कोणत्याही भाषेची त्रेधा उडून जाणार आहे ! ' मी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं हा चमत्कार पाहिला ', ' तूं आपल्या कानांनीं हे शब्द ऐकलेस ? ' असले प्रयोग आमच्या आक्षेपकानें कधीं ऐकले नसतील काय ? मग या ठिकाणीं ही द्विरुक्तीचा व असमंजसतेचा प्रकार स्पष्टच आहे. ' पाहिला ' या शब्दांत ' डोळ्यांनीं ' व ' प्रत्यक्ष ' या दोहोंचा अंतर्भाव होतो हें उघडच आहे; शिवाय पाहणें व ऐकणें या क्रिया डोळ्यांशिवाय व कानांशिवाय होत असतात काय ? तेव्हां ज्यापक्षीं वरील प्रयोग अत्यंत रूढ असून चोहोंकडे चालतात त्यापक्षीं वरच्यांवर ही करडी नजर पुरवणें बरोबर नाहीं.

पृष्ठ १३—हा आक्षेप बरोबर आहे.

पृष्ठ १५—हा प्रयोग वसई प्रांतीं चालत नसल्यास नकळे. इकडे तर त्याचा अतिशय प्रचार आहे. ' दुष्ट मनुष्यास कोणाचें बरें देखूं सकत नाहीं ', वगैरे प्रयोग इकडे सर्वांच्या तोंडीं व ऐकण्यांत आहेत.

पृष्ठ १८—यांतील वाक्याचा बोध होण्यास आमच्या पत्रकारास जेवढी पंचाईत पडली तेवढी साऱ्या वाचकांस पडली असेलसें आम्हांस वाटत नाहीं.

पृष्ठ २९–यांतील आक्षेपाचें निवारण करणें बरेंच कठीण आहे; कां कीं असल्या विषयावर खात्री होण्यास अनुभवच कारण होय, येथें तर्काची गति होण्याचा संभवच नाहीं. यास्तव आमच्या आक्षेपकास आम्ही येवढेंच विचारतों कीं, पुरुषाचा प्रेमातिशय किंवा कामावेश येवढेंच कारण जर बस आहे, तर एकाद्या संगमरवरी पुतळीवरही कामिजनाची आसक्ति होईल काय? किंबहुना एकादी ग्राम्य स्त्री किंवा मुग्धा हीही तादृश प्रेमविषय होईल काय? मनसिजाचा पूर्ण विकास होऊन

तस्मिन् द्वये तत्क्षणमात्मवृत्तिः

समं विभक्तेव मनोभवेन ॥

अशी स्थिति जेव्हां पूर्ण प्राप्त होईल तेव्हांच शृंगाराची सांगता म्हणायाची. या संबंधानें अंक ३ पृष्ठ १९ श्लोक १३, व अंक ४ पृष्ठ ३० श्लोक ७ हेही कांहीं उपयोगी पडण्यासारखे आहेत.

पृष्ठ ३१–'झाडून एकून एक' या प्रयोगाविषयीं पत्रकारास संशय आहे. पण प्रत्येक प्रयोग लोकांच्या बोलण्यांत येतो कीं नाहीं हें समजणें पुष्कळ वेळां मोठें कठीण आहे. यास्तव ज्या अर्थी 'सारे' व 'एकून एक' हे शब्द केवळ समानार्थक होत त्या अर्थी एकाबद्दल दुसऱ्यांची योजना केल्यानें मोठासा दोष येईलसें वाटत नाहीं.–'पैकीं' विषयींचा आक्षेप खरा आहे; पण कांहीं अंशीं हा पिष्टपेषणाचाच प्रकार आम्हांस वाटतो!

## अंक १७.

पृष्ठ ४–दाखविलेला विरोध बरोबर आहे.

पृष्ठ ७–यांतील कांहीं आक्षेपांविषयीं वर विचार झालाच आहे. 'नक्षत्रें 'पुनः' दिसूं लागलीं' असें म्हणण्याचें कारण उघडच आहे कीं, सूर्योदयाबरोबर जीं मावळलीं होतीं तीं 'पुनः' उदयास आलीं. वनस्पति 'भयचकित' झालेल्या आमच्या आक्षेपकानें कधीं पाहिल्या नसतील, पण त्यांचीं पानें मिटतांना त्यानें पाहिलीं आहेत कीं नाहींत? मग हा प्रकार एकाएकीं झाला असतां त्यावर भयचकितेची उत्प्रेक्षा सहजच होत नाहीं काय?

यापुढें राहिलेले आक्षेप आम्हांस प्रायः मान्य आहेत. त्यांवर लिहिण्यासारखें विशेष कांहीं नाहीं.

## पत्रें.

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि०. गेल्या आक्टोबर महिन्याच्या आपल्या निबंधमालेच्या अंकांत 'स्मर्तव्योहं त्वया कान्ते' इत्यादि श्लोक सुभाषित या सदराखालीं आपण देऊन त्याचा अर्थही मराठी भाषेत लिहिला आहे. परंतु आपण केलेला अर्थ बरोबर नाहीं. आपण केलेल्या अर्थावरून असें दिसतें कीं, प्रस्तुत श्लोक कोण्या कामी पुरुषाची आपल्या प्रियेस उद्देशून उक्ति आहे. परंतु वास्तविक गोष्ट तशी नाहीं; कारण श्लोकांत 'भवता' असें जें पुल्लिंगीपद आहे त्याचा निर्वाह आपल्या अर्थांत होत नाहीं. आम्हांस असें वाटतें कीं, प्रस्तुत श्लोकांतील पहिला मात्र चरण पुरुषाची उक्ति असून पुढील तीन चरण त्याच्या प्रियेच्या उत्तराचे आहेत. प्रकृत श्लोकाचें भाषांतर खालीं पद्यरूपानें लिहितों.

### दिंडी.

॥ स्मरण माझें तूं धरीं हेंच मागें ॥<br>
॥ स्मरण नाहीं राहणें मला मागें; ॥<br>
॥ स्मरण चित्ताचा धर्म असे नाथा ॥<br>
॥ तेंच तुह्मी घेऊन सर्वे जातां ॥ १ ॥

आपण म्हणतां तसा अर्थ होण्यास प्रस्तुत श्लोकांत प्रथम चरण 'स्मर्तव्याहं त्वयाकान्त' असा पाहिजे होता. कळावें; लोभ असावा ही विनंती. पुणें, ता० १ फेब्रुवारी १८७८ इसवी.

आपला 'वसईकर'

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि०. खालीं लिहिलेल्या विषयास योग्य वाटल्यास आपल्या येत्या अंकीं मेहरबानीनें जागा मिळावी.

रात्रिमान पाहण्याविषयीं ज्योतिषांतर्गत

### श्लोक.

सूर्यभान्मध्यनक्षत्रं सप्तसंख्या विशोधितं ॥<br>
विंशतिघ्नंनवहृतं गतारात्रि स्फुटा भवेत् ॥ १ ॥

सूर्यनक्षत्रापासून स्वस्वस्तिकाच्या ( मध्याच्या ) नक्षत्रापर्यंतच्या संख्येंत सात वजा करून येणाऱ्या संख्येस २० नीं गुणून आलेल्या गुणाकारास नवांनीं भागावें; येणाऱ्या भागाकारा इतक्या घटिका भोग्य रात्र झाली.

प्रथमतः हा नियम कांहीं तरी ठोकताळ्याचा मात्र असेल असें मनांत येतें, परंतु यांत तथ्य किती आहे हें पुढील उपपत्तीच्या प्रयत्नावरून लक्षांत येईल.

भचक्राचे नक्षत्रात्मक २७ भाग ( अभिजिता शिवाय ) मानिले आहेत, तेव्हां अर्थात प्रत्येक भागांत $\frac{४०}{३}$ °अंशात्मक अंतर आहे. आतां ६० घटिकांनीं संपूर्ण भचक्राची प्रदक्षिणा होते यावरून $\frac{४०}{३}$ °भाग क्रमिला जाण्यास ( स्वस्वस्तिकीं एका नक्षत्राचे ठिकाणीं दुसरें येण्यास ) $\frac{२०}{९}$ घ० लागतील.

आतां नक्षत्राचें बरोबर गमन, कोठेंही समजण्यास सुलभ असें निश्चयात्मक स्थान स्वस्वस्तिक आहे, म्हणून सूर्यास्त समयीं स्वस्वस्तिकीं असणाऱ्या नक्षत्रापासून इष्ट वेळे पर्यंत किती नक्षत्रें जातात, त्या संख्येस $\frac{२०}{९}$ नें गुणिल्यानें भोग्य रात्र उघडच कळेल.

आतां सूर्यास्तसमयीं स्वस्वस्तिकीं असणारें नक्षत्र सूर्यनक्षत्रापासून सात नक्षत्रांच्या अंतरावर असतें, म्हणून सूर्यनक्षत्रापासून इष्ट मध्य नक्षत्रापर्यंत मोजल्यास हीं सात नक्षत्रें वजा दिलीं असतां सूर्यास्त समयींच्या स्वस्वस्तिकस्थ नक्षत्रापासून इष्ट मध्यनक्षत्रांमधीलच अंतर राहील. *( येथें सूर्यास्त स्वस्वस्तिकाच्या नक्षत्रज्ञानापेक्षां सूर्य नक्षत्राचें ज्ञान पंचांगावरून लौकर होईल) म्हणून ( सूर्य न० मध्यनक्षत्र–७ ) $\frac{२०}{९}$ ही रीती स्पष्ट आहे.

एक ज्योतिष विद्यार्थी.
ता० पनवेल.

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि०. आपल्या मालेचे ४५वे अंकांत 'जिज्ञासु व मालेचा हितेच्छु' या सहीचें पत्र छापलेलें पाहिलें. त्यांत पत्रकारानें आपणास कांहीं सूचना केल्या आहेत त्यांत त्यानें 'जॉनसनचें सर्व चरित्र' केवळ 'कर्मकथाच' आहे असें म्हटलें हें पाहून फार आश्चर्य वाटलें. एकंदर रुचि वैचित्र्याचा व मतवैचित्र्याचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे खरा! मला व माझे कांहीं येथील मित्रांस तें चरित्र फारच मनोरंजक वाटलें; व चरित्राचे शेवटील तीन

अंकांत जे विचार आपण सादर केले आहेत तेही अत्यंत ग्राह्य वाटले. तसेंच अपरिचितास इंग्लिश राष्ट्राचे संबंधानें बरीच माहिती या चरित्रापासून होईल असें वाटतें. असें असून व तो निबंध इतक्या खुबीदार व मार्मिक रीतीनें लिहिला गेला असून कित्येकांस महाभारतच वाटावा हें आश्चर्य आहे. आमचे नवीन होतकरू लोकांनीं व कांहींसा आपणही त्यांत लिहिलेल्या 'सतत उद्योग' या सदरांतील मजकूर फार ध्यानांत धरून त्याचें होईल तितकें अवलंबन करण्यांत चुकूं नये हीच माझी विनंती आहे; कारण आपल्या मालेचे अंकही दोन दोन महिने पर्यंत नजरेस पडत नाहींत, व वाचकांचीं बरीच निराशा झाल्यावर एकादा अंक दृष्टीस पडला तर पडतो. यास्तव ही अव्यवस्था मोडून टाकण्याविषयीं आपण मनापासून झटावें हीच आपणास प्रार्थना आहे. आपलें वाक्य "तर याप्रमाणें हरएक संबंधानें जगांत रुचि-वैचित्र्य व मतवैचित्र्य आहेच आहे" याची सत्यता लोकांचे लक्षांत यावी म्हणून हें पत्र आपल्या पुढील अंकांत योग्य वाटल्यास छापण्याची कृपा व्हावी. कळावें लोभ करावा ही विनंती.

मु० उज्जनी ता० २१ एप्रिल १८७८.

आपला एक भक्त.

ता० क० आपल्या मालेचे ४७वे अंकांत "निबंधमाला—दृद्धीच्छु" या सहीचें पत्र छापलें आहे; त्यांत पत्रकारांनीं एक दोहरा लिहिला आहे, त्याचे दोन अर्थ होतात. पहिला अर्थ तर सुगमच आहे; व दुसरा त्यानीं केलेला बोधपर अर्थ खराच हृदयंगम आहे, परंतु दुसऱ्या चरणाचें पहिलेंच पद 'अली' याचा अर्थ कांहींच दिलेला अढळत नाहीं. तेव्हां हा अर्थ लिहि-ण्याचा चुकून राहिला किंवा या पदाचा अर्थ कांहींच घेतां येत नाहीं, अथवा घेतां येत असल्यास तो कोणता घ्यावा ह्याचें स्पष्टीकरण पत्रकार किंवा आपले वाचकांपैकीं कोणी तरी करतील अशी आशा आहे. कळावें.

मुक्काम महतपूर ता० ९ मे १८७८.

# निबंधमाला.

## अंक ५१.

### नवीन पुस्तकें.

वैयाकरणकिरातादपशब्दमृगाः क्व यांतु संत्रस्ताः ।
यदि नटगणकचिकित्सकवैतालिकबदनकंदरा न स्युः ॥ *

आमच्याकडे कांहीं दिवसांपूर्वीं 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' व 'ज्ञानेश्वरी परिभाषा' हे दोन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं पाठविले. याबद्दल वरील ग्रंथकारांचे आभार मानून सदरील पुस्तकांविषयीं आम्ही आपलें मत वाचकांस कळवितों.

**अपभ्रष्टशब्दचंद्रिका**——हा ग्रंथ रा० प्रभाकर रामचंद्र पंडित यांनीं केला आहे. हे बडोदें येथील वरनाक्युलर कालेज ऑफ् सायन्स् नामक पाठशाळेंतील गुरु आहेत. या ग्रंथाचा उद्देश त्याच्या नांवावरून व्यक्त होतच आहे, कीं संस्कृत फारशी वगैरे भाषांतून अपभ्रंशरूपानें जे शब्द मराठींत आले आहेत त्यांचा यांत संग्रह केला आहे. या ग्रंथांत आरंभीं अपभ्रंशाचे ५२ नियम दिले आहेत. पुढें कोशांत येणेंप्रमाणें व्यवस्था आहे. आरंभीं अपभ्रष्ट शब्द, नंतर मूळ शब्द, पुढें अपभ्रंशाच्या नियमांचा आंकडा, आणि शेवटीं कोठें कोठें मूळ संस्कृत शब्दाचा धातु व अर्थ, व कोठें अपभ्रष्ट शब्दांवर विशेष व्याख्या. येणेंप्रमाणें सदरील ग्रंथांत सुमोर २००० शब्दांची व्युत्पत्ति केलेली आहे.

प्रस्तुत सारख्या ग्रंथाची सांप्रत काळीं फार आवश्यकता आहे हें उघडच आहे. हल्लीं महाराष्ट्रभाषेकडे सर्वांचें लक्ष लागून तिच्या अभिवृध्यर्थ अनेक प्रकारें उद्योग चालू आहे, यास्तव तिचे घटकावयव- ज्या संस्कृत, प्राकृत, फारशी, व आरबी भाषा त्यांतून तिचा शब्दसंग्रह कसकसा निष्पन्न झाला हें सम-

---

* "वैयाकरणावरून किरातापासून भय पावलेले जे अपशब्दरूप मृग त्यांनीं एरवीं कोठें जावें? जर नट, ज्योतिषी, वैद्य, व बंदिजन यांचीं मुखें या गुहा त्यांत लपण्यास नसत्या तर."

जणें या काळीं अत्यंत आवश्यक होय. मूळ धातूंचें किंवा मूळ शब्दांचें ज्ञान झालें असतां साधित शब्दांचें व अपभ्रंशांचें ज्ञान किती सुलभतेनें होतें हें सर्व भाषाभिज्ञांस माहीत आहेच. शिवाय ज्याप्रमाणें मूळ खोडावर नजर ठेविली असतां फांद्यांचा विस्तार तेव्हांच ध्यानांत येतो येवढेंच नाहीं, तर त्यांचा परस्परांशीं व मूळाशीं कसा संबंध आहे हेंही लक्षांत येतें, त्याप्रमाणेंच धातु व मूळ शब्द यांची ही गोष्ट होय. एक धातु समजल्यानें त्यापासून निघालेल्या अनेक शब्दांचें ज्ञान होतें व या शब्दांतील प्रत्येकास त्याचा त्याचा अर्थविशेष कसा प्राप्त झाला हेंही समजण्यास मार्ग होतो. अपभ्रंशांचीही अशीच गोष्ट आहे. अपभ्रंशांचे सामान्य नियम एकदां कळले म्हणजे शेकडों शब्द जे अगदीं पारखेरे वाटत होते ते एकदम परिचितसे भासूं लागतात. चिरवियुक्त आप्तजनांचीं भेट होऊन संबंधाची पूर्वपीठिका एकदा समजली असतां ती जशी आजन्मांत विसरण्याचा संभव राहत नाहीं, त्याप्रमाणें चालू भाषेंत वाहिवाटणाऱ्या शब्दांची परंपरा एकदां समजण्यांत आली म्हणजे तीही स्मरणांतून सहसा न जाई अशी मनांत दृढ होऊन जाते. शिवाय या अपभ्रंशांत राष्ट्राचे मनोव्यापारही कधीं कधीं प्रतिबिंबित झालेले दृष्टीस पडतात, यास्तव मन्वंतरींच्या प्राण्यांचे अस्थिपंजर जसे भूगर्भशास्त्रज्ञास उपयोगी, तसेच वरील शब्दही भाषाविवेचकास होत. त्यांत कधीं प्राचीन इतिहास, कधीं प्राचीन प्रचार, कधीं प्राचीन समजुती, यांचा ठसा उमटून राहिलेला त्याच्या नजरेस येतो !

तेव्हां हें अपभ्रंशशास्त्र जरी व्याकरणाचीच शाखा होय तरी तें त्यासारखें नीरस व रूक्ष नाहीं हें सहज ध्यानांत येईल. ही शाखा पल्लवांनीं सुशोभित होऊन फळांनीं लढण्यासारखी आहे. हल्लींचे प्रख्यात पदार्थविज्ञानवेत्ते प्रोफेसर **हक्सले** यांनीं इंग्लंडांतील एका मजूर लोकांच्या सभेपुढें जसें 'खडू' वर व्याख्यान दिलें, आणि नुसत्या खडूवरून हजारों वर्षांमागील पृथ्वीची स्थिति, तींत कालगत्या झालेले फेरफार, वगैरे विषयांवर पुष्कळ निरूपण केलें, *

* 'Lay Sermons, Essays and Reviews' या नांवाचें पुस्तक वरील ग्रंथकारानें निराळें छापलें आहे त्यांत वरील व्याख्यान सांपडेल. यांत वरील शास्त्रज्ञानें आपल्या श्रोत्यांस असें सिद्ध करून दिलें कीं, खडूची उत्पत्ति समुद्राच्या तळाशीं होते, व तेथें तो बनून राहण्यास पुष्कळ काळ लागतो. आतां सध्यांची स्थिति पाहिली तर खडू हा पर्वतांवरील प्रदेशांत सांपडतो; तेव्हां फार काळापूर्वीं मोठमोठे पर्वतही समुद्रांत बुडालेले होते असें अनुमान होतें. हें अनुमान पवित्रशास्त्रास किती विरुद्ध आहे हेंही वरील व्याख्यात्यानें शेवटीं सांगितलें आहे. तेव्हां एका खडूच्या खड्यावर केवढा विमु रचला गेला पहा !

त्याप्रमाणेंच प्राचीन शब्द कालप्रवाहाच्या बरोबर लोटत लोटत येतां हल्लीं त्यांस प्राप्त झालेल्या रूपांतरावरून पुष्कळ व्याख्यान करतां येणार आहे. या भाषाशास्त्राकडे आलीकडे यूरोपीय संस्कृतज्ञांचें किती लक्ष लागत चाललें आहे हें **मोक्षमुल्लर** साहेबांच्या Lectures on the Science of Language ( भाषा शास्त्रावर व्याख्यानें ) या सारख्या ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे. त्याप्रमाणेंच इंग्रजी भाषेंतील शब्दांवर **ट्रेंच** साहेबांचे Study of words ( शब्दांची व्याख्या ) Select glossary ( निवडक शब्दांवर व्याख्यान ), वगैरे ग्रंथ जे आलीकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरूनहीं प्रस्तुतसारख्या विषयावरील ग्रंथ किती व्यापक व चित्तवेधक करतां येणार आहे याचें सहज अनुमान होतें. असा ग्रंथ करूं जाणाराच्या जागीं पुढील गुण जितपत असतील त्या मानानें वरील गुण म्हणजे व्यापकत्व व चित्तवेधकता हे त्यांत येणार आहेत. हे गुण चालू भाषेचें ज्ञान, संस्कृत फारसी व आरबी यांची माहिती, इतिहासादि विषयाशीं परिचय, आणि विशेषतः लौकिक भाषाप्रकार व लोकव्यवहार यांकडे निरंतर लक्ष पुरविण्याची संवय, शिवाय सामान्य बहुश्रुतपणा आणि सुबोध व मनोवेधक अशी ग्रंथरचना करण्याची हातोटी, हे होत. आमच्या पुस्तकांतच कधींमधीं 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं जो मजकूर येत गेला आहे त्यावरून **ट्रेंच** साहेबांनीं केलेल्या ग्रंथांच्या नमुन्यावर महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ होण्यास किती साधन आहे हें भाषामर्मज्ञांच्या लक्षांत आलेंच असेल.

सदरील पुस्तकाची जाहिरात जेव्हां आमच्या दृष्टीस पडली, तेव्हां पुढें होणारा ग्रंथ वरील कलमांत दाखविलेल्या नमुन्याचा होईल असें आम्हास वाटलें होतें. रा० पंडित यांस फारसी व आरबी भाषांची माहिती कितपत आहे हें ठाऊक नाहीं, पण त्यांस संस्कृताचें ज्ञान चांगलें आहे असें दिसतें. तेव्हां या ज्ञानाचा उपयोग करून महाराष्ट्र भाषेंतील शब्दांविषयीं व प्रयोगांविषयीं पुष्कळ शोध करून चांगला व्यापक, उपयुक्त, व चित्तवेधक असा संग्रह ते विद्यार्थ्यांस व सामान्यतः सर्व विद्याप्रिय जनांस अर्पण करतील अशी आमची अपेक्षा होती. पण प्रकृत ग्रंथावरून पहातां वरील अपेक्षा व्यर्थ होती असें म्हणणें भाग येतें. 'चंद्रिका' कर्त्यांचा उद्देश फक्त मोलस्वर्थ, मॉनियर विल्यम्स्, विल्सन्, क्यांदी इत्यादि कोश कर्त्यांच्या परिश्रमांचें एकीकरण करून व प्राकृत भाषांचा प्रख्यात जैन वैय्याकरण हेमचंद्र यांचें साहाय्य घेऊन रा०

तळेकर यांच्या इंग्रेजी कोशाप्रमाणें किंवा रे० बाबा पद्मनजी यांच्या मराठी कोशाप्रमाणें एक लहानशी इमारत उठवून द्यावयाची येवढाच असावा असें दिसतें. मग असल्या कार्याला प्रस्तुत ग्रंथकारासारख्यानें श्रम करायाला पाहिजे होते, किंवा ते सिद्ध झाले असतां त्याची शिफारस करण्यास जुन्या पंडितांस तसदी देण्याची गरज होती, असें आम्हांस वाटत नाहीं. मोलस्वर्थ वगैरेंच्या कोशांचें चालन करून अपभ्रष्ट शब्दांची याद करण्याचें काम कोणीही सहज करूं शकता. एकादा ख्रिस्ती 'दीक्षित', किंवा 'सह्याद्रिखंड' कार एकादा फिरंगी डाक्तर, अगर 'गुलामगिरी' कर एकादा बहादरही दररोज चार घटका खपता तर दोन तीन महिन्यांत असली हवेली रचून देता! असो; आतां हा ग्रंथ जसा तयार झाला आहे तसाच घेऊन त्यांतील गुणदोषांचें विवरण करूं.

हें पुस्तक जर वर सांगितलेल्या कोशाप्रमाणें विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितांच केलें असेल, तर त्यावर अपूर्णतेचा आरोप सकृद्दर्शनींही येणार आहे हें उघड आहे. मोलस्वर्थचा कोश येवढाच मोठा असतां त्याचा येवढासा संक्षिप्त ग्रंथ कसा संभवेल? वरील दोन कोशांच्या खालोखाल तरी तो असला पाहिजे. कोणास अमुक शब्द कशाचा अपभ्रंश आहे हें समजून घेण्याची इच्छा झाली, आणि तो यांत सांपडला नाहीं, तर याचा काय उपयोग? त्याप्रमाणेंच अपभ्रष्ट शब्दांचें ज्ञान व्हावें हाच जर याचा उद्देश आहे, तर अठरा कारकानें, अठरा धान्यें, अठरा पुराणें, नऊ रत्नें, चौदा विद्या, चौसष्ट कला, वगैरेंच्या यादी ज्या यांत दिल्या आहेत, व 'कार्तिकस्वामीच्या भिडेचा', 'कफल्लक' इत्यादि शब्दांची यांत जी व्याख्या केली आहे तीही सर्व केवळ अप्रस्तुत होत. अपभ्रंशशास्त्राशीं वरील माहितीचा बिलकुल संबंध नसल्यामुळें इतकी जागा या पुस्तकांत व्यर्थ अडली आहे असें म्हटलें पाहिजे.

आतां दुसऱ्या पक्षीं असें जर म्हटलें, कीं अपभ्रंशाचे नियम विद्यार्थ्यांच्या व भाषाज्ञानेच्छुंच्या मनांत चांगले भरावे ह्मणून हा ग्रंथ केला आहे, तर इकडूनही त्यावर अनेक दूषणें येतात. पहिलें मोठें दूषण तर हें कीं, यांतील निमेशिमे शब्द अत्यंत मूढ विद्यार्थ्यांच्याही लक्षांत येण्यासारखे आहेत, 'ओठ', 'औक्ष', 'कठिण', 'कर्दळी', 'कल्होळ', 'कोकिळा', 'खार,' 'कापूर', 'दुकाळ', 'दीपमाळ', 'निळा', 'पद्धत', 'मीठ', 'मच', 'मरणें', 'मोर', 'रात्र', 'लक्षुमी', 'हरण', 'विख', 'शिंग', 'साप',

इत्यादि शब्द कशाचे अपभ्रंश होत याविषयीं कोणी कधींही बुचकळ्यांत पडणार आहे काय? ज्यानें महाराष्ट्र भाषेचा यत्किंचितही व्यासंग केला असेल, किंवा सामान्य संस्कृत शब्द ज्याच्या कधींमधीं कानावरून गेले असतील त्यासही वरील अपभ्रंशांची व्युत्पत्ति तेव्हांच करतां येईल. याप्रमाणेंच 'चार' (चत्वार), 'आठ' (अष्ठ) इत्यादि संख्यावाचक विशेषणांची एकदां व्युत्पत्ति समजली म्हणजे सगळ्या पाढ्याची पृथक् पृथक् व्युत्पत्ति देण्याचीही गरज दिसत नाहीं. तसेंच 'आईतवार', 'ऐतवार', 'अखातीज', 'कल्युग', 'उडू', 'धजा', 'शिणगार', 'चिकश्या', 'वर्णशंकर', हे शब्दही केवळ अडाणी लोकांच्या बोलण्यांतच येणारे असल्यामुळें त्यांचा समावेश प्रस्तुत पुस्तकांत शोभत नाहीं; आणि त्यांतून वरील शब्दांची मूळपीठिका तर इतकी सहज उमगण्यासारखी आहे कीं, तिचें ज्ञान होण्यास 'चंद्रिके'चें साहाय्य कोणासही लागेलसें दिसत नाहीं. याखेरीज वर सांगितलेल्या यादीः—म्हणजे आठ प्रधान, आठ सिद्धी, आठी अधिकार, पांच हत्यारें, पांच गौड, नऊ रस, दहा ग्रंथ चौदा रत्ने, बत्तीस गुण, चौसष्ट कळा, इत्यादि. या यादींचा 'चंद्रिके'शीं अगोदर मुळींच संबंध नाहीं; आणि त्यांतून त्या कोठेंही सांपडण्यासारख्या नसून प्रस्तुत ग्रंथकारानें जर प्रथमतःच लोकांस जाहीर केल्या असत्या तर एकापरी त्या चालवून घेतां आल्या असत्या; पण मोल्स्वर्थ साहेबांनीं पन्नास वर्षांपूर्वी खटपट करून त्या मिळवल्या असतां त्या आयत्या उतरून घेण्यांत मातब्बरी ती कोणती?

आतां प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य भाग जे अपभ्रंश ते कितपत खरे आहेत व ते कोणत्या तऱ्हेनें दिले आहेत याविषयीं विचार करूं. एक तर कोठें कोठें परस्पर विरोध आढळतो. जसें 'हौद' हा शब्द शेवटल्या (९९ व्या) पृष्ठांत 'ऱ्हद' शब्दापासून निघाला आहे म्हणून सांगितलें आहे; पण पृष्ठ ४५ यांत पाहतां वरील संस्कृत शब्दाचा अपभ्रंश 'डोह' म्हणून सांपडतो. पृष्ठ ९३ यांत 'सांज' शब्द 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश होय असें सांपडतें; तोच शब्द ९५ व्या पृष्ठांत 'सायम्' याचा अपभ्रंश म्हणून आढळतो. आतां खरोखर पाहतां 'हौद' हा यवनी शब्द आहे; व 'डोह' हाच 'ऱ्हद' शब्दाचा अपभ्रंश होय. तसेंच 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश 'मध्यगृह' (माजघर), 'वंध्या' (वांझ) यांप्रमाणें 'सांज' हा होय; 'सायम्' हें अव्यय होय. 'फाटणें' हें धातुसाधित 'स्फटनं' यापासून निघालें आहे; पण

'फाडणें' हें 'पाटनं' यावरून निघालें आहे असें ६६ व्या पृष्ठांत सांपडतें, पण ज्यापक्षीं 'फाडणें' हें 'फाटणें' याचेंच प्रयोजक रूप होय, त्यापक्षीं दोहोंची व्युत्पत्ति कोणत्या तरी एका धातूपासून झाली पाहिजे हें उघड आहे; मूळरूप एका धातूपासून व प्रयोजक रूप दुसऱ्यापासून मानणें असमंजस होय. 'जो' हा 'यः' याचा अपभ्रंश दिला असून 'याचा' व 'यानें' हीं रूपें 'यस्य' व 'येन' यांचीं अनुक्रमें करून दिलीं आहेत. 'य'चा 'ज' अपभ्रंश होतो हें जर खरें आहे, तर 'यस्य' व 'येन' यांचीं रूपें 'ज्याचा' व 'ज्यानें' हीं होत हें उघड आहे. 'याचा' व 'यानें' हीं रूपें 'अस्य' व 'अनेन' या दर्शक सर्वनामांचीं होत. 'पांयस्त' हा शब्द 'पांयस्थ' याचा अपभ्रंश म्हणून सांगितला आहे; पण संस्कृत शब्द 'पांथ' असा आहे, 'पांयस्थ' नव्हे. 'खटाटोप', 'शेप्ट' व 'थवा' हे शब्द 'घटाटोप', 'शेप' व 'जात' यांचे अपभ्रंश होत असें सांगितलें आहे. पण 'घटाटोपो भयंकरः' याचा अर्थही कांहीं होत नसून 'फटाटोपो भयंकरः' असा मात्र पाठ आढळण्यांत आहे. 'शेप' या शब्दाचा 'शेप्ट' असा दिढीनें अपभ्रंश कसा झाला हें समजत नाहीं; शिवाय 'शेप' हा प्राकृत शब्द तर घ्यावयाचाच नाहीं, कारण प्राकृत शब्दाचा प्राकृत अपभ्रंश होणें संभवत नाहीं; तेव्हां तो संस्कृतच घेतला पाहिजे, पण संस्कृत अर्थ काय आहे हें कोशांत पाहिलें असतां कोणासही कळणार आहे! 'जात' याचें 'थवा' हें रूप कसें बनलें हें 'चंद्रिके'तील २१ व्या नियमावरूनही कळत नाहीं. हा शब्द 'स्तव (–क)' शब्दाचा अपभ्रंश असावा असें आम्हांस वाटतें. 'खरवड' 'सचोटी' व 'बदक' यांचे मूळ शब्द 'खरवृत्त,' सत्योक्ति' व 'कादंब' असे दिले आहेत. यांत पहिला शब्द तर निवळ मराठीच आहे असें आम्हांस वाटतें. "खोटसाळ मनुष्यास 'खरवड' असें जें म्हणतात तें संस्कृतांतील 'खरवृत्त' शब्दाचा अपभ्रंश करून त्याची योजना वरील प्रयोगांत करतात असें नव्हे, तर तो केवळ लाक्षणिक प्रयोग होय. 'सत्योक्ति' शब्दाचा अर्थ 'खरें बोलणें' असा आहे, मग यावरून 'सचोटी' हें भाववाचक नाम कसें सिद्ध होईल! 'बदक' शब्द मोलस्वर्थकृत कोशांत अरबी म्हणून सांपडतो; वास्तव 'हंसा' पासून बदक निपजणाऱ्याचा जितपत संभव तितपतच 'कादंबक' शब्दापासून 'बदक' शब्द निघण्याचा ही होय! 'अदवशीर' शब्दाची व्युत्पत्ति आरबी शब्द 'अरब' व संस्कृत 'शील' अशी केली आहे; व 'का-

मगार' हें संस्कृत 'कर्मकार' यावरून निघालें आहे असें सांगितलें आहे. पण 'शीर' व 'गार' हे दोन्ही आरबी किंवा फारसी भाषेंतील प्रत्यय होत असें आम्हास वाटतें; व तसें मानलें म्हणजे पहिला घेडगुजरी समास करण्याचें व दुसऱ्याची संस्कृत व्युत्पत्ति मानण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. याप्रमाणेंच 'गदळ' (कदर्य), 'विघा' (विग्रह), 'बारदान' (बहिर्धान), 'डोला' (दोला), 'सोंग' (सु+अंग), 'भंडारी' (भंड+हारी), 'भगरा' (भंगुरः), 'विस्तू' (वीतिहोत्र) इत्यादि अनेक व्युत्पत्ति ज्या 'चंद्रिका' कारांनीं दिल्या आहेत; व 'बडोदें' (बटोदर), 'बेळगांव' (वेणुग्राम), 'भडोंच' (भृगुकच्छ), 'जाधव' (यादव) 'जोहार' (योद्धारः) अशा ज्या कित्येक मूळपीठिका दिल्या आहेत त्या तरी कितपत यथार्थ होत हेंही सांगणें कठीणच आहे! 'जातो' (याति), 'तरतो' (तरति) ही व्युत्पत्तिही अशुद्धच आहे. शालापत्रकांत प्रसिद्ध झालेल्या निबंधांत मराठी क्रियापदांची उपपत्ति कशी केली आहे हें आमच्या पुष्कळ वाचकांस माहीत असेलच.

प्रस्तुत पुस्तकांत दुसरा हा दोष दृष्टीस पडतो कीं, जेथें विशेषेंकरून विस्तार करायाला पाहिजे होता तेथें तो मुळींच केला नाहीं. 'खटाटोप', 'किंतू', 'यःपलाय', 'मनःपूतं समाचरे' 'अजागळ' इत्यादि शब्दांवरील व्याख्यान अगदीं कोतें आहे. "खटाटोपो भयंकरः—घटाटोपो भयंकरः", "किंतू–किंतु—परंतु", "यःपलाय स जीवति—यःपलायते स जीवति=जो पळेल तो जगेल", "अजागळ–अजागलस्तन ( बोकडाच्या गळ्याला असणाऱ्या स्तनासारखा निरुपयोगी मनुष्य )," "मनःपूतं समाचरेत्—मनास पवित्र वाटेल ते करणें. यथेच्छ वर्तन करणें असा अर्थ नव्हे," येवढ्याच व्याख्यानांवरून वरील शब्दांचें ज्ञान विद्यार्थ्यांस काय होणार? 'खटाटोपाचें' मूळ 'घटाटोप' सांगितल्यानें ज्यास्त काय समजलें? वरील शब्द प्रचारांत कसा आला हें समजण्यास संपूर्ण श्लोक दिला पाहिजे होता. 'किंतू' चा मराठींत कोणत्या अर्थी प्रयोग होतो तो कोशकारानें मुळींच सांगितला नाहीं; वरील मालिकेवरून प्रकृत शब्द उभयान्वयी अव्यय होय असें अपरिचितास वाटेल. 'यःपलाय' हे तुटके शब्द मराठींत कसे आले हें वाचकांस कळण्यास 'पंचोपाख्यानां' तील धूर्त कोल्ह्याची गोष्ट सांगणें जरूर होतें. 'अजागळ' याचा अर्थ 'निरुपयोगी' असा मूळचा खरा,

पण हल्लींचा अर्थ निराळा आहे; यास्तव तो देऊन त्याची उपपत्ति करायास पाहिजे होती. याप्रमाणेंच ' मनःपूतं समाचरेत ' या शब्दांचा अर्थ निश्चित करून त्यावर आमच्या कोशकारानें आपला शिक्का ठोकून दिला आहे खरा; पण याचा कितपत उपयोग होईल हें सांगणें नको. मराठीच काय, पण एकंदर भाषांची प्रवृत्ति ' मनःपूतं समाचरेत् ' या प्रकारची आहे. त्यांस वैयाकरणांनीं किंवा कोशकारांनीं आपला स्वैरक्रम सोडून मर्यादेनें वागण्यास सांगणें म्हणजे नद्यांच्या ओघांवर व पर्वतांच्या रांगांवर रूळ व कंपास चालविणें होय. ज्या आमच्या देशभाषेनें येवढे धुरंधर **क्यांडी** साहेब तिचें चाळीस वर्षें नियमन करीत असतां त्यांसही दाद दिली नाहीं, व जी त्यांच्या मेजरीच्या तरवारीस लवमात्रही वचकली नाहीं, ती ' बटोदर ' निवासी एतद्देशीय अध्यापकाची कदर कोठून जुमानणार *

याप्रमाणें सदर्हू पुस्तक जसें व्हावयास पाहिजे होतें तसें मुळींच झालें नाहीं. विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस कोणत्या प्रकारचा ग्रंथ विशेष उपयुक्त होईल. हें नीट मनांत आणून किंवा अर्वाचीन पद्धत जाणणाऱ्या कोणा विद्वानाचा सल्ला घेऊन प्रस्तुत ग्रंथकारानें जर उद्योग आरंभला असता, तर बरें झालें असतें. एक तर यांतला फाजील भाग निघाला असता; आणि त्याच्या जागीं उपयोगाची व मौजेची माहिती आली असती. आतां हल्लीं आहे अशा प्रकारचेंही पुस्तक निरुपयोगी आहे असें नाहीं. त्यापासून सर्वांस व विशेषतः नवीन विद्यार्थ्यांस बराच उपयोग होणारा आहे. अपभ्रंशाचे सामान्यतः सर्वव्यापक नियम यावरून त्यांच्या मनावर बरेच ठसतील; व पुष्कळ शब्दांची व्युत्पत्तीही त्यांस कळेल. याप्रमाणें कांहीं ठिकाणीं माहितीही बरीच

* वरील पंडिताची महाराष्ट्र भाषेवर केवढी जरब होती हें त्यांचे रिपोर्ट पाहिले असतां कळून येणार आहे. हे एज्युकेशनल रेकर्ड पत्रांत कोठें कोठें आढळतात. सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वीं Hints to Composition ( ग्रंथकर्त्यास सूचना ) या नांवाचें एक लहानसें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्यांत ' इसापनीती 'तील वगैरे कांहीं प्रयोग शुद्ध केले होते. याच सुमारास त्यांचा व ' ज्ञानप्रसारक ' मंडळीचा एक मोठा वाद झाला तोही पाहण्यासारखा आहे. त्या वेळचे विद्याभिमानी डायरेक्टर मे॰ हावर्ड साहेब यांनीं उभयपक्षींचा वाद प्रतिवाद Correspondence on the subject of the Dnyan Prasarak ( ' ज्ञानप्रसारका 'वरून झालेला पत्रव्यवहार ) या नांवानें पुढें लवकरच महाराष्ट्र भाषाविवेचकांच्या प्रीत्यर्थ प्रसिद्ध केला.

मिळेल. उदाहणार्थ 'कनोज', 'कफल्लक', 'कोटस्य कीटायते', 'खडाष्टक',* 'बसवण्णा', 'परोक्ष' हे शब्द पहा.

हल्लींच्या स्थितींत वरील पुस्तकाची वरच्यापेक्षां ज्यास्त तारीफ करवत नाहीं. तर सरते शेवटीं प्रस्तुत ग्रंथकारास आम्ही अशी सूचना करतों कीं, सदरील ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यांनीं पूर्वोक्त आक्षेपांकडे लक्ष पुरवावें. तसें करून या पुस्तकांत हवी तशी सुधारणा केली असतां त्यांचे एतद्देशीय विद्यार्थ्यांवर व सामान्यतः सर्व वाचकांवरही मोठे उपकार होतील यांत संशय नाहीं.

---

* वरील शब्दाची प्रस्तुत पुस्तकांतील व्याख्या बरोबर आहे. तरी तींत मुख्याची गोष्ट मुळींच गाळली आहे. ती ही कीं, वरील योग लग्नाच्या वेळेस मुलाचा व मुलीचा पाहत असतात; केवळ अचा व बचा कोणी पाहत नाहीं. मोलस्वर्थ साहेबांस वरील शब्दाची व्युत्पत्ति समजली नाहीं. त्यांच्या कोशांत पुढील शब्दापुढें 'खडा' + 'अष्टक' असे त्याचे अवयव देऊन A free formation असा शेरा दिला आहे. पण हा 'दांडगाईचा समास' हें नव्हे 'चंद्रिके'तील व्याख्यानावरून ध्यानांत येईल. वरील कोश प्रस्तुत पुस्तकाबरोबर ताडून पाहतां इतर कित्येक प्रमादही आमच्या लक्षांत आले ते येथें प्रसंगवशांत् देतों. 'कस' शब्दाची व्युत्पत्ति 'कषाय' म्हणून दिली आहे; पण खरी व्युत्पत्ति 'निषक' असावी. 'घरदार' हें 'घर' आणि 'दार' यांपासून झालें, म्हणजे हा समाहार द्वंद्व होय, असा कोशकाराचा अभिप्राय दिसतो. आमचें मत 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं पूर्वी (अंक १८ पृष्ठ २७) दिलेंच आहे. 'अणीक' हा शब्द 'अनेक' याचा अपभ्रंश म्हणून दिला आहे. पण दोहोंतील अर्थभेदावरून पाहतां वरील अभिप्राय खरा असेलसें दिसत नाहीं. अपभ्रंशांच्या नियमांवरून व अर्थसादृश्यावरून 'अन्यक' ही व्युत्पत्ति यथार्थ दिसते. 'कळी'चें संस्कृतांत 'कली' असें दीर्घ रूप कोठेंही आढळत नाहीं, नेहेमीचें रूप 'कलिका' हें होय. 'कष्टाळू' याचें मूळ संस्कृत रूप 'कष्टालु' असें दिलें आहे; पण 'कष्ट' शब्दाचा संस्कृतांत 'श्रम' या अर्थी कधींही प्रयोग होत असेलसें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां 'कष्टालु' तर दूरापास्तच. 'आई'चें मूळरूप 'अंबा' म्हणून दिलें आहे. आमच्या मतें 'मातृ'—'माई' 'आई' अशी व्युत्पत्ति होय. 'चंद्रिके'त 'आर्या' असें मूळरूप दिलें आहे; पण याचा अपभ्रंश 'आजी' हा असावा. 'जोहारा'चें मूळ 'योद्धारः' दिलें आहे. पण ही व्युत्पत्ति प्रस्तुत शब्द उच्चारणारे जे 'महा—अरि' त्यांच्या व्युत्पत्तीचेंच भावंड दिसतें! टीकाविषयक ग्रंथांत वरील सर्व व्युत्पत्ति प्रस्तुत महाकोशाच्या आधारावरूनच दिल्या आहेत हें उघडच आहे.

**ज्ञानेश्वरी परिभाषा**—हें पुस्तक रा० रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं केलें आहे. या ग्रंथकर्त्यांचें नांव आमच्या वाचकांच्या माहितींतलेंच आहे. अंक ४२ यांतील ग्रंथपरीक्षेंत आलेला 'प्राचीन भारतवर्षीय ऐतिहासिक कोश' या पुस्तकाचे हे कर्ते होत. प्रस्तुत विषयावरच विशेष व्यापक असा 'हंसकोश' नांवाचा ग्रंथ याच ग्रंथकारानें सुमारें वीस वर्षांपूर्वीं रचून प्रसिद्ध केला होता. तो हल्लीं अनुपलब्ध आहे.

वरील 'परिभाषा' हा नव्याच मासल्याचा ग्रंथ आहे. इंग्रेजींत ज्यांस Companion volume (जवळ ठेवायाचा किंवा जोडीचा ग्रंथ) म्हणतात त्यासारखा हा आहे. 'ज्ञानेश्वरी' चें जो अध्ययन करील त्यास उपयोगी पडण्याकरतां हा तयार केला आहे. रा० रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं कांहीं महिन्यांपूर्वीं 'ज्ञानेश्वरी' ची नवीन आवृत्ति आपल्या छापखान्यांत काढली. तेव्हां तिजबरोबर ही 'परिभाषा' ही तयार करवून छापली. ही नवीन योजना मनांत आणून ती वरील वाकबगार गृहस्थाकरवीं पूर्ण केली, याबद्दल रा० गोंधळेकर यांची तारीफ करणें रास्त आहे.

ही 'परिभाषा' सरसरी मूळ ग्रंथाच्या येवढीच झाली आहे. हिचा सांख्याही तेवढाच धरून ती पोथीप्रमाणेंच आडवी छापली आहे. प्रत्येक पृष्ठांत 'ओवी', 'काठिण शब्द' आणि 'अर्थ' अशीं तीन तीन सदरें पाडलीं असून अनुक्रमानें बहुतकरून प्रत्येक ओवींतील शब्द दिलेले आहेत. तेव्हां ही 'परिभाषा' सर्व प्रकारें 'ज्ञानेश्वरी' ची सहचारिणी किंवा परिचारिका झाली आहे असें म्हटलें असतां चालेल.

प्रस्तुत पुस्तकाची उपयुक्तता स्पष्टच आहे. 'ज्ञानेश्वरी' हा काल आजचा ग्रंथ नाहीं. इंग्रेजी भाषेचा आद्यकवि **चॉसर** त्याच्याही कांहीं मागले आमचे ज्ञानोबा होत. यवनी अमलाची रात्र ज्या वेळेस पुरती अर्धीही लोटून गेली नव्हती, व शेजारच्या पुण्यग्रामाचे अधिपति तर काय, पण त्यांच्या यजमानांचे कुलपति उदयास येण्यासही कित्येक शतकांचा ज्या वेळेस अवधी होता, त्यावेळेस महाराष्ट्र कवींचे व सन्मणिमंडलाचे कुलगुरु जन्मले. यांचा इतिहास सध्यां अर्थातच केवळ दंतकथाशेष राहिला आहे. यांची कीर्ति मात्र आजपर्यंत सारखी चालत आली आहे; ती भाविक लोकांत कितपत आहे ती आळंदीच्या वार्षिक यात्रेवरून दिसतच आहे, व रसिकजनांत कितपत

आहे याचें प्रमाण प्रौढ हरदासांचीं कीर्तनें होत.* यांचे ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' हे दोन आहेत; यांपैकीं पहिलाच अत्यंत प्रसिद्ध आहे. याचें अध्ययन करण्याची सोय सदरील पुस्तकाच्या द्वारें झाली आहे ही फार चांगली गोष्ट झाली. कां कीं, दिवसेंदिवस वरील जुन्या ग्रंथांचें सतत परिशीलन केलेला तर काय, पण नुसते ते वाचलेलाही गृहस्थ मिळणें दुरापास्त होणार. तेव्हां ही अनकूलता आहे तोंपर्यंत अशीं कामें जितकीं उठतील तितकीं चांगलीं!

'ज्ञानेश्वरी'च्या अध्ययनापासून अनेक लाभ होण्याजोगे आहेत. एक तर 'महाभारता'चें सार जी 'भगवद्गीता', जिचें महात्म्य या देशांत तर प्राचीनकाळापासून अतिशयित आहे, व जिच्या योग्यतेचें प्रमाण दुसरें नको,–बिचाऱ्या व्यासावर यूरोपिय पंडितांनीं आलीकडे जो चोरीचा जार्च आगला आहे तोच बस आहे,*–त्या 'भगवद्गीते' वर प्रस्तुत ग्रंथांत मनोरम

---

* ज्ञानेश्वराचे व तुकारामाचे जे सांप्रदायी आहेत त्यांच्या कीर्तनांत वरील ग्रंथाचें प्राबल्य विशेष दिसून येतें. नुकते निवर्तलेले भाऊ काटकर वगैरे मंडळी वरच्यांपैकीं होत. यांच्या कीर्तनाच्या संबंधानें येथें पढील गोष्ट लिहिणें अवश्य वाटतें कीं, ती कानीं पडली असतां जी चित्तवृत्ति होते ती आमच्या आलीकडील सुधारलेल्या धर्मव्याख्यानांनीं फार करून थोडीच होते! आम्ही ब्रह्मो बाबूंनीं मोठ्या सद्गदित स्वरानें केलेल्या प्रार्थना ऐकल्या आहेत, व त्यांची उपासना पाहिली आहे; प्रार्थनासमाजाचे वार्षिक उत्साह व त्यावेळचे पवित्र उपदेश हेही पाहिले व ऐकले आहेत; पण वरच्यांतला रंग येथें कांहींच वठत नाहीं असें आमच्या अनुभवास आलें. मग याची मीमांसा काय असेल ती असो!

*आमच्या आद्यकवींनीं ज्याप्रमाणें 'मूळ स्वभाव जाईना' या न्यायानें होमरवर दरवडा घालून त्यास लुटलें, त्याप्रमाणेंच 'भारत' वाल्यानेंही 'नव्या करारां'तून सगळा मजकूर उपटून 'भगवद्गीता' रचून दिली, हीं दोन अत्यंत समंजस मतें आलीकडे निघालीं आहेत. एकंदरींत आमच्या पाश्चात्य बंधूंचा हा महा सिद्धांत ठरून गेला आहे कीं, इकडे जें कांहीं म्हणून बरेंसें सांपडेल तें तिकडूनच उपटलेलें असायाचें; इकडच्या लोकांच्या वांट्याला अक्कल ती आली कधीं! मेकॉले साहेबांस आमच्या इकडील ग्रंथांचे केवढें अगाध ज्ञान होतें हें पूर्वीं अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे; तरी पुढील वाक्यांतील त्यांचा कटाक्ष पहा!—

"Voltaire seens, at this time, to have meditated a history of the conquest of Bengal. Had the plan been carried into execution, we have no doubt

(पुढें चालू)

व्याख्यान आहे. तेव्हां तिचें स्वरूप मनांत यथास्थित बिंबेल हा एक लाभ. दुसरा भाषेच्या दृष्टीनें. अलीकडील पंडितांस भाषाशास्त्राची फार आवड वाटूं लागली आहे; व नदीचा प्रवाह पाहत पाहत मुळापर्यंत जाणें यांत जशी मौज तशीच भाषेचा ओघ समग्र पाहण्यांतही आहेच; तर प्रस्तुत ग्रंथ हा वरील शास्त्राच्या अध्ययनासही उपयोगी आहे. साहाशें वर्षांपूर्वी आमची भाषा कशी होती, म्हणजे संस्कृत व प्राकृत या दोन मागल्या पिढ्या तुटून तिच्या स्वैरगतीस आरंभ झाला असतां तिचें स्वरूप कसें होतें तें या ग्रंथावरून पाहण्यास सांपडणार आहे. तिसरा लाभ प्रस्तुत ग्रंथाचेंच मनोरमत्व. ज्ञानेश्वरांनीं शेवटल्या महाराष्ट्र कवीप्रमाणें मूळ ग्रंथाशीं भीत भीत दुरून न वागतां* आपल्या अधिकाराप्रमाणें त्याशीं पुष्कळ सलगी केली आहे. किंबहुना बहुधा मूळ हें आधारमात्र करून वरील सर्व रचना आपली स्वतःचीच केली आहे. बाराव्या अध्यायांतील मूळच्या एका श्लोकावर १४७ ओव्या झाल्या आहेत हे पहिल्या 'नवनीता' वरून * पुष्कळांस माहीत असेलच; शिवाय मूळ ग्रंथ सगळा ७०० असून 'ज्ञानेश्वरी' ९००० आहे यावरूनही वरी-

---

( मागील पृष्ठावरून. )

that Voltaire would have produced a book containing much lively and picturesque narrative, many just and humane sentiments poignantly expressed, many grotesque blunders, many sneers at the Mosaic Chronology, much scandal about the catholic missioneries, and much sublime theo—philanthropy, *stolen from the New Testament, and put into the mouths of virtuous and philosophical Brahmins.*"

Lord Chive.

खरंच, यहुदी लोकांसारख्या परम ज्ञानसंपन्न व ईश्वरकृपा विशिष्ट लोकांस जें ज्ञान वरून आयतें प्राप्त झालें, तें ब्राह्मणांसारख्या अधम व मूर्ख लोकांस कसें मिळावें ! आमच्या गोवळकोंड्याच्या वगैरे खाणींतून जरी हिरे निघालेले आपण प्रत्यक्ष पाहिले, तरी त्यांची मूळ उत्पत्ति कॉर्नवेल् प्रांतांतील कोळशांच्या खाणींच होत असें पक्कें समजावें ! !

वरील दोन्ही मतांचें यथास्थित खंडन एका प्रसिद्ध नवीन पंडिताकडून इंग्रजी भाषेंत झालें आहे हें आमच्या बहुश्रुत वाचकांस माहीत असेलच.

*अंक ४६ पृष्ठ ४ टीप पहा.

* 'नवनीता'ची नुकतीच दुसरी आवृत्ति निघाली आहे हें कोणा कोणास माहीत असेलच. या आवृत्तींत वरील अध्याय पाहूं गेल्यास पाहणाराची निराशा होईल. या

( पुढें चालू. )

ल विस्तार स्पष्टच आहे. पण या विस्ताराची मौज अशी आहे कीं, त्याचा बिलकुल कंटाळा न येतां उलटें त्याकडे चित्त वेधूनच जातें. आम्हांस पूर्वीं ‘ नवनीता ’ च्या पहिल्या व दुसऱ्या भागांवरूनच काय ती प्रस्तुत कवीची माहिती होती; पण सदरील ‘ परिभाषे ’ च्या परीक्षार्थ मूळ ग्रंथाची कोठें कोठें जी आम्हीं उगीच चांचणी पाहिली तिजवरूनही त्याच्या वाणीच्या लावण्याच्या छटा आमच्या डोळ्यांत भरल्या, व समग्र ग्रंथाच्या वाचनाविषयीं उत्कृष्ट इच्छा उद्भवली. आमच्या येथील एका मित्रानेंही तोच आपला अनुभव आम्हांस सांगितला. तर आम्ही आमच्या वाचकांसही आनंदानें कळवितों कीं, कवित्वाच्या तरंगांत मौजेनें लोटत जाऊन उपमादृष्टांतादि कमलें ज्यांस लीलेनें खुडायाचीं असतील त्यांनीं प्रस्तुत ‘ परिभाषा ’ रूप तुंबीफलांचा आश्रय करून महाराष्ट्र भाषेच्या आद्यकवीच्या वाक्तरंगिणींत उडी घालावी. हिचें आजपर्यंत अपरिचितत्वास्तव जें दुरवगाहत्व वाटत होतें तेंही प्रत्यक्ष अनुभवावरून पुष्कळ अंशीं मिथ्याच अशीही आमची खात्री झाली. ज्यास संस्कृत व्युत्पत्तीचें अंग आहे त्यासही असाच अनुभव येईल असें आम्हांस वाटतें.

सदरील ‘ परिभाषे ’ विषयींच खुद्द आणखी ज्यास्त लिहिण्यासारखें अर्थात् कांहीं नाहीं. मूळ ग्रंथांत जेवढे शब्द अडण्यासारखे आहेत तेवढे प्रायः सर्व यांत आहेत. जे शुद्ध संस्कृत शब्द, कीं ज्यांच्या अर्थाची संस्कृतज्ञ वाचकांस गरज नाहीं, ते सुद्धां सामान्य वाचकांच्या सोयीकरतां यांत सामील केले आहेत. तेव्हां प्रस्तुत ग्रंथाच्या साह्यानें बहुधा कोणाचाही ‘ ज्ञानेश्वरी ’ त प्रवेश होईल असें वाटतें. येवढें मात्र आहे कीं, प्रस्तुत ग्रंथप्रकाशकानें

---

( मागील पृष्ठावरून. )

आवृत्तींत पुष्कळ चांगल्या सुधारणा केल्या आहेत; पण बिचाऱ्या मुकुंदराजास व ज्ञानेश्वरास मुळींच फांटा दिला आहे ही मोठी सुधारणा झाली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. वेदांताचा भाग जर महाराष्ट्र कवितेंत येवढा पुष्कळ आहे तर ‘ मराठी कवितांच्या वेंच्यांत त्याचा मागमूस ही उमगूं नये हें अंमळ विचित्रच खरें ! बाराव्या अध्यायांत बिचाऱ्या ज्ञानोबानें साधूंचीं लक्षणें दिलीं होतीं त्यांत येवढें दुर्बोध काय होतें तें कळत नाहीं. शिवाय येवढ्या चारशें पानांच्या ग्रंथांत कोठें कोनाकोपऱ्यांत थोडासा वेदांत आला असता तर ‘ नवनीता ’ च्या स्वादास कांहीं हिनत्व आलें असतें किंवा त्यानें पैठिक धर्म कांहीं कमी झाले असते असेंही आमचें मन घेत नाहीं !

जी 'ज्ञानेश्वरी' ची आवृत्ति काढली आहे तीच जवळ असली पाहिजे. आम्ही एका जुन्या हस्तलिखित पोथीवरून 'परिभाषें' तील शब्द पाहूं लागलों तों कशास कांहीं मेळ बसेना. जो शब्द 'परिभाषें' त एका ओंवींत आढळावा तोच आमच्या प्रतींत पांच पन्नास ओंव्या पुढें आढळावा. उदाहरणार्थ १४ व्या अध्ययांत 'हरिखाचा' (आनंदाचा) हा शब्द छापील प्रतींत ४१४ व्या ओंवींत व हस्तलिखित प्रतींत ४३१ व्या ओंवींत आहे; १५ व्या अध्यायांतील ५३२ व्या ओंवींतला 'अनारिसा' (वेगळा) हा शब्द आमच्या प्रतींत ५५६ व्या ओंवींत सांपडतो; 'निष्कर्षु' (शेवट) व 'वाक्यपूजा' (वाक्यरूप पूजा) हे शब्द वरील दोन प्रतींत अनुक्रमेंकरून ५२९ व ५५१ आणि ५९९ व ६२९ अशा ओंव्यांतून सांपडतात; सतराव्या अध्यायांत 'खेंव' (आलिंगन) हा शब्द एका प्रतींत ४१७ व्या व दुसरींत ४४५ व्या ओंवींत सांपडतो. त्याप्रमाणेंच शेवटली प्रसिद्ध ओंवी—

शके बाराशें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें।
सच्चिदानंद बाबा आदरें। लेखकु जाहला ॥

ही 'परिभाषें' त १८११ वी व हस्तलिखित प्रतींत १९५५ सांपडते. तर याप्रमाणें रा० गोंधळेकरांच्या आवृत्तींत व इतर प्रतींत पुष्कळ फरक पडण्याचा संभव दिसतो. आमच्या प्रतींत एकंदर ग्रंथ ९४८७ इतका आहे; तो वरील आवृत्तीहून ४६० ओंव्यांनीं ज्यास्त आहे. शिवाय 'परिभाषें' तील कांहीं शब्द आमच्या पोथींत न सांपडल्यावरून व कोठें निराळीं रूपें आढळल्यावरून असेंही वाटतें कीं, प्रस्तुत ग्रंथांत पाठभेदाचा प्रकारही पुष्कळ असावा. तर रा० गोंधळेकर यांस आमची अशी सूचना आहे कीं, 'ज्ञानेश्वरी' ची आवृत्ति पुनः काढणें झाल्यास तींत वरील अधिक ग्रंथाचा व पाठांतरांचा त्यांनीं समावेश करावा. ठिकाठिकाणच्या पांच साहा प्रती एकत्र केल्या असतां वरील दोहोंचा उलगडा होणार आहे. एका प्रतीहून दुसऱ्या प्रतींत ४६० ओंव्यांची जर भर दृष्टीस पडते आहे तर येवढा ग्रंथ बुडूं देणें हें कवीची व कवितेच्या भोक्त्यांची मोठीच हानि करणें आहे!

सरते शेवटीं सदरील पुस्तकाच्या छापणीबद्दलही दोन शब्द लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ठशांच्या छपाविषयीं मुंबईच्या गणपत कृष्णाजी.ची

जशी पहिल्यापासून प्रसिद्धि आहे, त्याप्रमाणेंच आलीकडे रा० गोंधळेकर यांचीही शिळाछापाविषयीं झाली आहे. यांच्या छापखान्यांत शिळेवरील काम जसें सुबक निघतें तसें दुसऱ्या कोठेंही निघत नाहीं. प्रस्तुत 'परिभाषा' जाड कागदावर चांगली स्वच्छ छापली असल्यामुळें तिजकडे वाचकांची प्रवृत्ति सहजावृत्त्या होणार आहे. मूळ ग्रंथाचीही अंगभूत वेधकता अशीच वाढली असेल यांत संशय नाहीं. तर भाविक जनांस व रसिक भाषाविवेचकांस वरील दोन्ही ग्रंथांविषयीं शिफारस करून हें परीक्षण आटपतों.

---

**सुभाषित**—( १ ) कुलरीतिप्रियप्रीतिस्तंभद्वयविलंबिनि ।
तन्वीहृदयहिंदोले हंत दोलायते स्मरः ॥

" कुलाचार आणि वल्लभाविषयीं प्रेम या दोन खांबांवर लोंबणाऱ्या स्त्री-हृदयरूप हिंदोळ्यावर मदन हा आंदोलन पावत आहे. " म्हणजे एकीकडे कुलरीतीचा भंग होईल असा धाक वाटतो, आणि एकीकडे हृदयवल्लभाकडे मन ओढतें; आणि त्यामुळें मदनाची स्वारी दोहोंकडे हेलकावे खात राहिली आहे.

( २ ) विधौ विरुद्धे न पयः पयोनिधौ
सुधौघसिंधौ न सुधा सुधाकरे ।
न वांछितं सिध्यति कल्पपादपे
न हेम हेमप्रभवे गिरावपि ॥

" दैव प्रतिकूळ झालें असतां जलनिधींतही जल सांपडायाचें नाहीं, अमृतौघाचा सिंधु जो चंद्र त्याच्या ठायीं सुधेचा बिंदुही मिळायाचा नाहीं, प्रत्यक्ष कल्पवृक्षाकडे गेलें तरी इष्टसिद्धी व्हावयाची नाहीं, आणि सुवर्णप्रभव जो मेरु त्याच्या ठायींही सोनें सांपडायाचें नाहीं ! "

( ३ ) मित्रे क्वापि गते सरोरुहवने बद्धानने ताम्यति
क्रंदत्सु भ्रमरेषु वीक्ष्य दयिताश्लिष्टं पुरः सारसम् ।
चक्राव्हेण वियोगिना बिसलता नास्वादिता नोज्झिता
कंठे केवलमर्गलेव निहिता जीवस्य निर्गच्छतः ॥

" सूर्य दिगंतरी चालता झाला असतां कमलवन हें निमीलित मुख होत्सातें दीनत्राणें दिसूं लागलें असतां, तसेंच हंसांस सत्प्रियांनीं आलिंगित पाहून भ्रमर दुःखानें आक्रोश करूं लागले असतां, चक्रवाक पक्षी स्त्रीवियुक्त होत्साता कमलतंतु तोंडीं धरीना व टाकूनही देईना, तर त्यानें ते कंठाचे ठायीं नुसते धारण मात्र केले, कीं प्राण जाऊं लागल्यास त्यांस त्यांनीं अटकाव करावा ! "

( ४ ) प्रियायाः प्रत्यूषे गलितकबरीबंधनविधा-
वुदंचद्दोर्वल्लीदरदलितचेलांचलमुरः ।
घनाकूते पश्यत्यथ मयि समंदाक्षिवलितं
नमंत्या यद्रुपं न हि लिखितुमीशो मनसिजः ॥

" प्रिया प्रभातसमयीं गलित कचभाराचें बंधन करूं लागली असतां तिच्या उन्नमित भुजांनीं किंचित् अस्ताव्यस्त झालेल्या अंचलाकडे व वक्षःप्रदेशाकडे मी सस्पृह पाहूं लागलों असतां तिनें खालीं लवून लज्जामंद कटाक्षांनीं जें मजकडे अवलोकन केलें तें रेखण्यास प्रत्यक्ष मदनही समर्थ होणार नाहीं ! "

( ५ ) सहस्रकरपुरणान्निखिलजंतुवक्त्रांबुज-
प्रकाशकरणादय प्रबलवैरितेजोवधात् ।
दरिद्रतिमिरोद्धृतेरखिलभूपचूडामणि-
र्जगन्मणिरहर्मणिर्जगदिदं च धत्तः समम् ॥

कोणी कवि राजाचा स्तव करतोः—

" सर्व भूपांत श्रेष्ठ व पृथ्वीचें रत्न असा हा राजा आणि सूर्य हे दोघे मिळून जगाचें धारण करीत आहेत; कसें ? तर सूर्य सहस्र किरण प्रगट करतो, व हा राजा हजारों याचकांचे हस्त दानपूरित करतो; सूर्य सर्व प्राण्यांच्या मुखकमलांस प्रकाशित करतो, व राजाही सर्वांचीं तोंडें प्रफुल्लित करतो; सूर्य इतर ग्रह जे त्याचे प्रतिस्पर्धी त्यांचा तेजोवध करतो, आणि राजा आपल्या शत्रूंस स्वप्रतापानें दिपवून टाकतो; आणि सूर्य जसा अंधकाराचा ध्वंस करतो त्याप्रमाणें राजा हा राष्ट्रांत दारिद्र्य म्हणून राहूं देत नाहीं ! "

( ६ ) सेयं सीधुमयी वा सुधामयी वा हलाहलमयी वा ।
दृग्भ्यां निपीतमात्रा मदयती मोदयती मूर्च्छयति च ॥

" ही मद्यमय आहे, अमृतमय आहे, किंवा विषमय आहे हें मला कळत नाहीं; पहा कीं डोळ्यांनींच हिचें प्राशन करतांच उन्माद येतो, हर्ष होतो, व मूर्च्छाही प्राप्त होते ! "

( ७ ) दोषमपि गुणवति जने दृष्ट्वा गुणरागिणो न खिद्यंते ।
प्रीत्यैव शशिनि पतितं पश्यति लोकः कलंकमपि ॥

" गुणवंताच्या ठायींचा दोष पाहूनही गुणाचे चाहते खेद पावत नाहींत; पहा कीं, चंद्रावरचा कलंकही लोक प्रीतीनेंच पाहतात ! "

( ८ ) अनवसरे गुणवानपि हृदयादवतार्यते स्त्रिया हारः ।
पश्य शलाकावसरे भूपेनापि प्रसार्यते स्वकरः ॥

" हार हा गुणवान् खरा तथापि अप्रसंगीं तो स्त्रियांकडून हृदयापासून दूर केला जातो, आणि दुसऱ्या पक्षीं म्हणजे प्रसंगाचे ठायीं राजा ही काडीकरतां आपला हात पसरतो ! " वरील दोन्ही प्रसंग सहज लक्षांत येण्यासारखे आहेत; पहिला रतीचा व दुसरा भोजनोत्तर आचमन समयींचा. 'गुणवान्' यावरचा नेहेमीचा श्लेष स्फुट करावयास नकोच.

( ९ ) संतु नाम भुवनेषु देवता
यास्तपोभिरपि दूरदर्शनाः ।
भाति गर्भशिशुरक्षणेऽप्यलं
यत्कृपा निरलसा स मे गतिः ॥

" भुवनांचे ठायीं असणाऱ्या ज्या अनेक देवता आहेत, कीं ज्या तपेंकरून ही दर्शन देत नाहींत, त्या एकीकडे असूं द्या; माझी श्रद्धा त्या परमेश्वरावरच आहे कीं, ज्याची कृपा गर्भींच्या बालकाच्या रक्षणाविषयींही समर्थ आहे ! "

(१०) अपूर्वरसनाव्याली खलाननबिलेशया ।
कर्णमूले दशत्यन्यं हरत्यन्यस्य जीवनम् ॥

" खलाचें मुख हेंच कोणी विवर यांत राहणारी जी जिव्हारूप विलक्षण सर्पीण, ती एकाच्या कानाला डसते आणि तिसऱ्याचाच जीव जातो!" अर्थ उघडच आहे कीं, चहाड लोक एकाच्या कानाला लागतात, आणि त्याचा परिणाम निराळ्याच मनुष्यावर घडतो.

(११) चरंतीनां सौधे नृपतिरमणीनां तनुरुचो
गवाक्षांतर्वांताः कतिचन गृहीत्वा जलमुचः ।
क्षणे गोपायंती क्षणरुचिमिषेण क्षणमहो
विवृण्वंति स्वर्णं करगतमिवाकिंचनजनाः ॥

" राजस्त्रिया आपल्या महालांतून फिरत असतां गवाक्षमार्गानें बाहेर पडलेल्या ज्या त्यांच्या शरीर प्रभा त्यांपैकीं मेघांनीं कांहीं लुबाडून घेऊन त्याच आतां विद्युल्लतेच्या मिषानें ते क्षणभर प्रगट व क्षणभर अप्रगट करीत आहेत; कीं ज्याप्रमाणें निर्धन पुरुष कोणाचा अपहार करून मिळविलेलें सोनें केव्हां लपवितात व केव्हां बाहेर काढतात!"

(१२) चंचत्कांचनशैलावस्या वक्षोरुही तन्व्याः ।
तौ चेत्तावधिरूढा कथमनिमिषतां भजेत मे दृष्टिः ॥

" या तन्वीचे वक्षोज हे कांचनशैल ( सुमेरु ) होत यांत संशय नाहीं; कां कीं, तसें नसतें तर त्यांवर आरूढ होतांच माझी दृष्टि अनिमिष झाली हें कसें?" *

---

अनिमिष म्हणजे जिचीं पातीं लवत नाहींत अशी. सुमेरूवर वास करणारे जे देव त्यांच्या लक्षणांपैकीं एक लक्षण हें आहे कीं, मनुष्यांप्रमाणें त्यांच्या डोळयांच्या पापण्या लवत नाहींत. तर यावरून कवि कल्पना करतो कीं ज्या अर्थी आरोहणमात्रेंकरून हें दैविक लक्षण दृष्टीस प्राप्त झालें,—म्हणजे ती तेथें निश्चळ झाली,—त्या अर्थी वक्षोज हे खरोखर सुवर्णाचल होत!

**विनोद, महदाख्यायिका—( दोन घांटा )**—इंग्लंडांत आगगाड्या निघण्याच्या पूर्वीं नुसत्या घोड्यांच्याच गाड्या वाटसरांच्या सोयीकरितां नेमलेल्या वेळीं निघत असत. एके समयीं एक गृहस्थ अशा गाडींत बसून निघाला असतां त्याजबरोबर दोन स्त्रिया त्याच गाडींत होत्या. या दोघी बोलणाऱ्या मोठ्या जहांबाज असून दोघींचे असे फुटाणे उडत होते कीं, एक पळभरही एकीचें सुद्धां बोलणें खळलें नाहीं. हा तिसरा गृहस्थ मुकाट्यानें दोघींची मौज पहात होता. शेवटीं एकजण त्यास म्हणते " काय हो, आमच्या बोलण्याची तुम्हांला कटकट तर होत नाहींना ? " गृहस्थ मुकाट्यानें उत्तर करतो, " छे छे ! तें कांहीं तुम्ही मनांत आणूं नका. आज वीस वर्षें मला स्त्रीचा समागम घडला आहे ! "

## नवीन उपपत्ति.

इंग्लंडांत सूर्याच्या दैनंदिन भ्रमणाविषयीं एकदां एका मित्रमंडळींत वाद निघाला असतां एकजण असें प्रतिपादन करूं लागला कीं सूर्य पृथ्वीच्या भोंवताली फिरतो ही गोष्ट खोटी आहे. या म्हणण्यावर दुसऱ्यानें असा आक्षेप काढला कीं, सूर्य भोंवताली फिरत नाहीं जर म्हणावें तर तो पश्चिमेस मावळतो आणि पूर्वेस उगवतो असें नेहेमी आढळतें; तेव्हां तो पृथ्वीच्या खालून पुनः वर येतो असेंच म्हणायाला नको काय ? " पहिला उत्तर करतो, " काय खुळा आहेस रे तूं ? तुला येवढें कसें कळत नाहीं ? अरे तो त्याच मार्गानें पुनः परत येतो; दिसत कां नाहीं म्हणशील तर रात्र असते म्हणून !! "

## वकिलाची फी.

एका वकील एका हजामाच्या घरावरून जात असतां हजामानें सात शिलिंगांचें एक सबंध नाणें त्याजपाशीं होतें तें वकील साहेबांस दाखवून पुसलें, " कां हो, हें चांगलें आहे कीं काय सांगा बरें ? " वकिलानें जातां जातां तें पाहून चांगलें आहे म्हणून सांगितलें, आणि मुकाट्यानें तें आपल्या खिशांत टाकून दिलें. हजाम घाबरा होऊन जों कांहीं बोलणार तों वकील साहेबांनींच निकाल सांगितला कीं, " तूं आपला मनुष्य आमच्या आफिसांत पाठवून दे, म्हणजे तुझे बाकीचे साहा पेन्स तुला परत मिळतील ! "

## पंढरपुरी भामटे.

एक श्रीमान् गृहस्थाची बायको चंद्रभागेवर प्रातःस्नानास जात असे. बरोबर एक गडी असून त्याच्या हवालीं ती आपले दागिने करी, आणि तो गडी ते दागिने नदीकाठच्या वाळूंत दडपून ठेवून त्यावर एक पाटी उपडी घालून तिजवर बसत असे. कांहीं भामट्यांनीं तें चाकराचें कसब पाहून त्या दागिन्यांवर डोळा ठेवला. मग एके दिवशीं त्यांच्या टोळींतील आठदाहा असामींनीं कावा काय केला कीं, वाळवंटावर नवसाचे पेढे वांटण्यास आरंभ केला! जेवढी मंडळी त्या वेळेस तेथें होती त्यांपैकीं प्रत्येकाकडे भराभर पेढ्यांचे पुडे ते झोकूं लागले. मग साऱ्या मंडळीचें पेढ्यांकडे चित्त वेधल्यावर एकानें वरील चाकराकडे ही त्याचा एक व त्याच्या यजमानणीचा एक असे दोन पुडे झोकले;—पण ते अशा खुबीनें झोकले कीं ते त्याच्या सहज हातीं येऊं नयेत. देवाचा प्रसाद आणि त्यांतून पेढे,—तेव्हां ते घेण्यास तो चाकर मोठ्या हौसेनें पुढें सरसावला. तरी यजमानणीच्या कामाची त्यानें हयगय केली नाहीं; पाटीवर बसला होता तसाच पुढें वांकून त्यानें ते दोन पुडे उचलले. पण तितक्यांत पेढे वांटणाऱ्यांच्या साथ्यानें आपला कार्यभाग उरकून घेतला. चाकर पुढें ओणवल्यानें पाटी जी उचलली तेवढ्यांत त्यानें हातचलाखी करून दागिन्यांवर ताव मारला! पुढें त्या चाकराची काय त्रेधा उडाली असेल व दोघांस केवढा आचंबा वाटला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी!

## न्यायाचा मासला.

रूमशामच्या एशिया खंडांतील मुलखाची राजधानी स्मर्ना नामक विख्यात शहर होय हें आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच. येथें एक मुसलमान वाणी राहत असे. याच्या मुलास तेथें नायब काजीची जागा मिळाली. या अधिकाराप्रमाणें नायब साहेबांची शहरांतील बाजारांतून देखरेख होऊं लागली. कोणाची कोणत्याही तऱ्हेची दगाबाजी नजरेस आली कीं पुरे, त्यास तावडतोब सक्त सजा होई. एके दिवशीं झाडून साऱ्या दुकानदारांच्या मापांची व वजनांची तपासणी सुरू झाली. नायबाचा बाप या संबंधानें मोठा निर्मळ होता असें नाहीं; खोटीं नाटीं मापें, वजनें बाळगून गिऱ्हाइकांस फसवण्याचा त्याचा नेहेमीचा धंदाच होता. त्यांतून त्याच्या मुलास नायबी झाल्यापासून तर तो आपल्या ठिकाणीं आदीं

निर्धास्त झाला होता. ज्या दिवशीं वरील तपासणी सुरू झाली त्या दिवशीं त्याच्या शेजाऱ्यांनीं त्यास सांगितलें कीं, तूं आपलीं नेहेमीचीं वजनें दडवून ठेवून खरीं दुकानांत ठेव, म्हणजे तीं तपासलीं तरी कांहीं धास्ती नाहीं. मियांनीं हें शेजाऱ्यांचें बोलणें झिटकारून दिलें, आणि आपलाच मुलगा तपासनीस आहे तेव्हां आपणास काय भय आहे या घमेंडीवर स्वारी राहिली. तपासणी होतां होतां त्याच्या दुकानाशीं नायब येऊन ठेपला; तरी त्याचा बाप खुशाल आंत टेंकून बसला होता. नायबानें इतरांप्रमाणें यासही सांगितलें कीं, तुमचीं दुकानांतील वजनें व मापें सारीं पुढें आणा, तीं आम्हास पाहिलीं पाहिजेत. बापानें हा हुकूम ऐकला न ऐकलासा करून सर्व हसण्यावारी नेण्यास आरंभ केला; पण नायबानें तावडतोब शिपायांस ताकीद दिली कीं, बेलाशक आंत जाऊन सारीं वजनें, मापें हुडकून बाहेर काढा. शिपायांनीं तसें करून तीं सर्व तपासून पाहतां अगदीं खोटीं ठरलीं. तेव्हां लागलीच तीं सर्व मोडून तोडून टाकण्याविषयीं हुकूम झाला. तो ऐकून वाण्यास मोठा आचंबा वाटला, व तो अगदीं गांगरून गेला; तरी त्यास येवढें वाटलें कीं, आतां यापेक्षां तरी आपला लेक ज्यास्त कांहीं करणार नाहीं. पण तें कांहीं नाहीं; नायबानें आपलेंतुपलें बिलकुल न ओळखतां पन्नास रुपये दंड व पन्नास फटके ही सजा त्यास देऊन ती तेथल्या तेथें अमलांत आणली.

शिक्षा आटोपल्यानंतर नायबानें घोड्यावरून खालीं उडी टाकली, आणि आपल्या बापाचे पाय धरले; आणि त्यांचें आपल्या अश्रूंनीं प्रक्षालन करून त्यास म्हणतो, “ बाबा, परमेश्वराच्या, सरकारच्या, स्वदेशाच्या व या हुद्याच्या संबंधानें जें माझें कर्तव्य होतें तें मी करून चुकलों; आतां पुत्रधर्माप्रमाणें तुझें ऋण जें माझ्या माथीं आहे तें फेडूं दे. न्यायदेवता ही अंध आहे, ती या पृथ्वीवर साक्षात् ईश्वराचीच विभुति आहे, ती आपपर हे संबंध ओळखीत नाहीं. गणगोताचे संबंध हे ईश्वराच्या नियमापुढें व राष्ट्राच्या कायद्यापुढें कांहीं नव्हत. यांचें तुझ्याकडून उल्लंघन झाल्यामुळें तूं शासनास पात्र झालास; हें शासन तुला कोणाकडून तरी पोंचायाचेंच, पण तें माझ्याच नशिबीं तुला देणें आलें याचा मला फार खेद होतो. तर शेवटीं येवढीच विनंती करतों कीं, यापुढें खऱ्या मार्गानें वाग; आणि मी जें केलें त्याबद्दलमजवर शब्द न ठेवितां असें करणें माझ्या कपाळीं आलें याबद्दल माझी तुला करुणा येऊं दे. ”

इतकें बोलून तो तपासनीस घोड्यावर चढला आणि आपल्या कामास

पुनः लागला. रयतेनें हें निःपक्षपात न्यायाचें उदाहरण पाहून त्याचा मोठा जयजयकार केला. ती लोकप्रशंसा सुलतानाच्या कानीं जातांच त्यानें त्यास काजी केला, व पुढें काजीचा मुफ्ती केला. हा मोठा अधिकार तो बजावीत असतां सारी प्रजा त्यास दुवा देऊं लागली.

## अति तृष्णा.

एका धनलोभ्याची हजार रुपयांची थैली सांडली. त्यावरून त्यानें असें जाहीर केलें कीं, जो कोणी ती सांपडून देईल त्यास मी शंभर रुपये इनाम देईन. एकास ती दैववशात् सांपडून त्यानें ती तिच्या मालकाकडे आणली, आणि ती सांपडून दिल्याबद्दल तो इनाम मागूं लागला. धनलोभ्यास आशा सुटली; त्यास वाटलें कीं, आपली थैली आपल्याला मिळाली, त्यांत याला काय द्यावयाचें आहे? असा विचार करून तो त्या पिशवी सांपडून देणारास अशा उलट्या गोष्टी सांगूं लागला कीं, हींत माझे अकराशें रुपये होते, यास्तव तितके जर रुपये निघाले तर तुला बक्षीस देईन, एरवीं देणार नाहीं. त्या मनुष्यानें हा प्रकार पाहतांच ती थैली सरकारांत हजर केली. पुढें त्या प्रकरणाची जेव्हां चौकशी सुरू झाली तेव्हां न्यायाधीशानें धनलोभ्यास पुसलें, "तुझी जी पिशवी हरवली तींत किती रुपये होते?" त्यानें उत्तर केलें, "अकराशें." तें उत्तर ऐकून न्यायाधीशानें त्यास निकाल सांगितला कीं, "ज्यापक्षीं तुझे अकराशें रुपये गमावले त्यापक्षीं ही पिशवी तुझी नाहीं हें सिद्ध आहे; आमच्यापुढें आलेल्या पुराव्यावरून पाहतां हींत हजारच रुपये असावे असें दिसतें, आणि या पिशवीची मोहोर कायम आहे व ती फोडल्याचें चिन्हही कोठें नाहीं यावरून कांहीं अफरातफर झाली असल्याची शंका घेण्यासही मुळींच जागा नाहीं. तेव्हां या पैक्याचा खरा मालक उमगेपर्यंत ही थैली फिर्यादीच्याच स्वाधीन करण्यांत येते!"

## वैद्याची हिकमत.

एका इंग्रेजी वैद्यानें एका उमरावास बरा केला. नंतर एके दिवशीं ते दोघे इंग्रेजी रिवाजाप्रमाणें टेबलाशीं खुर्च्यांवर बसले असतां वाकानिसानें एक पुडी आणून डाक्टर साहेबांपुढें ठेवली. त्यांनीं ती सहज उघडून पाहतां तीन गिनी दृष्टीस पडले. त्यावरून त्यांस असें वाटलें कीं, ही वाकनिसांनीं

आपली कारकुनी लढविली असावी. तेव्हां त्यानें पुढील युक्ति लढविली. ते गिनी हातांत खेळवीत असतां सहज खालीं पडल्याप्रमाणें त्यानें खालीं टाकले. ते लगेच चाकरानें उचलून हातांत दिले; तरी तो तसाच खालीं गोंधळल्यासारखा रुजाम्याकडे पाहत राहिला, आणि म्हणतो " अहो! पांच गिनी असावे; सांपडले तर तीनच; बाकीचे दोन काय झाले बरें ?" यजमानानें वैद्यबोवांचा अभिप्राय ओळखून दुसरे दिवशीं आणखी दोन गिनी त्यांच्या घरीं पोंचते केले!

## वकिलास उत्तर.

एक वकील एका साक्षीदाराची उलट जबानी घेत असतां त्यास विचारूं लागला, " अरे, ही गोष्ट जेथें घडली तेथून तूं किती अंतरावर होतास ?" साक्षीदार उत्तर करतो, " चार यार्ड, दोन फूट, आणि साहा इंच." वकील पुनः विचारतो, " इतकें तंतोतंत अंतर तुला कशावरून सांगतां आलें ?" साक्षीदार उत्तर देतो, " कशावरून म्हणजे ? मी प्रत्यक्ष मोजूनच पाहिलें; मला तेव्हांच समजलें कीं, कोणी तरी शहाणे असा प्रश्न करतीलच करतील!"

## दोघांची चुकी.

दोन गृहस्थ आगगाडींतून प्रवास करीत असतां एकजणाचा हातरुमाल नाहींसा झाला. त्यानें इकडे तिकडे पुष्कळ पाहिलें, पण कोठेंही तो सांपडेना. तेव्हां रुमालाकरितां अगदीं घाबरा होऊन त्यानें त्या दुसऱ्या गृहस्थावर बेलाशक नांव घेतलें, कीं तुमच्या खेरीज ही वस्तु हलली नाहीं. हा दुसरा गृहस्थ सभ्य होता; त्यानें सांगितलें कीं, मला आपला रुमाल माहीत नाहीं, त्यांतून आपणास संशयच असेल तर मी कांहीं कोठें गेलों नाहीं, आपण खुशाल शोध करावा. दुसऱ्या गृहस्थानें त्याप्रमाणें सर्व केलें, पण कांहीं थांग लागला नाहीं. शेवटीं सहज आपली टोपी त्यानें काढली तों आंत रुमाल! तेव्हां मोठा लाचार होऊन तो पहिल्या गृहस्थाची माफी मागूं लागला, आणि म्हणाला, " मी आपणांस चोर समजलों ही माझी मोठी चुकी झाली." दुसरा उत्तर करतो, " माझीही पण तशीच चुकी झाली, कीं मी आपणांस संभावित समजलों!"

## नाक दाबलें कीं तोंड उघडतें.

एका चितार्‍यानें एका मनुष्याची सबंध तजवीर काढण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें त्यानें ती तयार करून ठेवली. पुढें तो मालक आला; पण किंमत देण्याच्या वेळीं म्हणूं लागला कीं, मी जर ही तजवीर घेतली नाहीं तर ती तुझ्या निवळ अंगावर पडणार आहे; तर कबूल केल्यापेक्षां कमी किंमतीला ही तूं मला द्यावीस. हें त्या गृहस्थाचें म्हणणें बरोबर होतें, कां कीं शरीराच्या बांध्यांत व चेहेर्‍यांत तो केवळ कुरूप असल्यामुळें खुद्द मालकाखेरीज दुसरें गिर्‍हाईक त्यास मिळण्याचा संभव नव्हता. तो त्याचा कावा पाहून चितारी त्यास म्हणतो, " तुम्ही म्हणतां तें खरें नाहीं; याच तजबिरीची किंमत मी मागतों त्याहून दुप्पटही काढीन." मालक विचारतो, " ती कशी ! माझी तजवीर दुसरा कशाला विकत घेईल ? " चितारी उत्तर करतो, " अहो, तुमच्या लक्षांत आलें नाहीं; याच तजबिरीला मागें शेपूट जोडलें कीं, हीच वानराची शानदार तजवीर होईल ! " हे शब्द ऐकतांच त्या गृहस्थानें मुकाट्यानें कबूल केलेली किंमत त्या चितार्‍यास देऊन आपली तजवीर घरीं नेवविली.

## विलक्षण समज.

एका गृहस्थाचा असा पाठ असे कीं, दररोज सकाळीं शर्यतीचें सगळें रंगण हिंडून यावयाचें. हा त्याचा क्रम कित्येक दिवस चालला होता. एके दिवशीं त्याचा एक मित्र वाटेवर भेटला; तो त्यास पुसतो, " कां, अजून तुमचा क्रम पूर्ववत् चालला आहे कीं नाहीं ? " त्यावर हे फिरते गृहस्थ उत्तर करतात, " छे ! आतां पहिल्याप्रमाणें सगळें रंगण घेत नाहीं; निम्या टप्यापर्यंत जातों आणि मागून माघारीं येतों, इतकेंच. "

---

## पत्रें.

**रा० रा निबंधमालाकर्ते यांसः —**

## मोरोपंत.

वि० वि०. या महाराष्ट्र-कवि-शिखामणीचे काव्य-दूषक दुर्जनांचे मुखावर चपेटिका मारण्यास संधी सांपडावी म्हणून त्याचे काव्यावर निबंध लिहिण्याचें काम आपण धरिलें आहे हें पाहून सर्व रसिक जनांस आनंद

झाल्याखेरीज राहावयाचा नाहीं. पंतांच्या सर्व काव्यमहोदधीचें मंथन करून अमूल्य रत्नें काढणें हें मोठ्या मेहनतीचें काम असून त्या कृत्यास अवकाशही पुष्कळ पाहिजे. तथापि या कवीच्या कवितासागरांत कांहीं ठिकाणीं बुडी मारीत असतां जीं मौक्तिकें हातीं लागलीं तीं परीक्षकांपुढें मांडावीं या उद्देशानें आपलें साहाय्य मागत आहे. कारण तीं नुसतीं विसकळलेलीं पारख्या पुढें ठेवण्यापेक्षां आपल्यासारख्या मालाकारांकडून गुंफविल्यानें तीं विशेष शोभतील हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. वाचकांस कंटाळा येण्यासारखा ग्रंथ विस्तार करणें पंतांस आवडत नसे हें महाभारतांतील कित्येक मोठमोठीं आख्यानें समय विशेषीं त्यांनीं एक दोन आर्यांत देखील आटपून टाकिलीं आहेत यावरून उघड होतें. त्यांतून ह्या ग्रंथविस्तारभयाविषयीं त्यांनीं ठिक-ठिकाणीं स्पष्टपणें उद्गार काढिले आहेत त्यावरून तर सर्व संदेह निवृत्ति होते. पुढें दाखल केलेल्या सर्व आर्यांत हाच विषय आहे. महाभारताचे आरंभींच पंत ह्मणतातः—

व्यास-कृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी ॥
आर्यावृत्तें रचितों स्वल्पांत चि आणितों कथा सारी ॥ ९ ॥
अदिपर्व अ० ॥ १ ॥

आतां प्रथम भारतांतील कांहीं पर्वांत एतद्विषयक आढळलेल्या आर्या लिहून मग मंत्र भागवतांतील लिहीनः—

## अदिपर्व.

अमृतार्थ युद्ध दारूण केलें ती बहु कथा असो यत्नें ।
सिंधूंतूनि चतुर्दश-संख्याक प्रकट जाहलीं रत्नें ॥ ६३ ॥
अ० ॥ ४ ॥

दुर्योधनानुजन्मे पौलस्त्य तयां न साधु मानावें ॥
विस्तर-भयें तयांचीं मी सांगेना चि सर्वथा नांवें ॥ ५६ ॥
अ० ॥ ८ ॥

जनमेजय नृपति पुसे वैशंपायन कथी सविस्तर तें ।
बहु मी लेश चि गातों जग लेशें ही महद्यशें तरतें ॥ १ ॥
अ० ॥ ९ ॥

## वनपर्व

भीमाच्या विजयातें विदुर सविस्तर नृपासि आयकवी ।
तें ग्रंथविस्तराला भ्याला जो तो वदेल काय कवी ॥ ९६ ॥
अ० ॥ १ ॥

धौम्य हि विचार पुसतां सांगे धर्मासि तीर्थयात्रा त्या ।
कवि-विस्तर-भय न हरिति जरि हि हरिति भक्त-भव-भया त्रात्या ॥ ३ ॥
अ० ॥ ५ ॥

सेवी पांडव सिद्धाश्रमतीर्थांतें तदीय महिम्यातें ।
विस्तर-भयें न लिहिलें रसिकानुमतें मनोरम हि ग्यां तें ॥ १० ॥
अ० ॥ ५ ॥

मुनि सर्व तीर्थयात्रा करवुनि ने गंधमादन--नगातें ।
मातें मन्मति ह्मणते मानवतिल साधुपाद न न गा तें ॥ १२ ॥
अ० ॥ ५ ॥

सांगुनि सौगंधिक--वन-पुष्करिणीच्या सुनीतिच्या हि पथा ।
आटोपी मूर्तिमति मारुति हाकवि हि तद्विशाल कथा ॥ ७२ ॥
अ० ॥ ५ ॥

सांगुनि निजवृत्त तिचें वृत्त पुसे कोटिक तीस विहितसें ।
स्वल्पांत ती हि सांगे बोलें शकती न कोटि कवि हि तसें ॥ ५ ॥
अ० ॥ ९ ॥

त्यासि म्हणे सावित्री संपन्न असो पिता सु-तनय-शतें ।
हा लक्ष्मी-सुत कवि किति लिहिल सतीचें उमा-सुत न यश तें ॥ ७२ ॥
अ० ॥ १३ ॥

## अश्वमेध पर्व.

ऐसें परम प्रिय तो पार्थ स्व प्रियतमेसि आयकवी ।
वर्णिल सकल सविस्तर एके वदनें करूनि काय कवी ॥ १२८ ॥
अ० ॥ ५ ॥

## मंत्र भागवत.

सुरमाणि खड्ग सुदर्शन हरि विधि दे ब्रह्ममय तया कवच ।
हैम वरासन धनद हि बहु विस्तर–भीरु मी वदें न वच ॥ १०७ ॥
स्कंध ॥ ४ ॥

ते जरि पदार्थ इतरें वर्णावे ग्रंथ बहु न कां वाढे ।
रसिक हि निरलस सादर साधु सदा स्वस्थ थोडके गाढे ॥ ६१ ॥
स्कंध ॥ ५ ॥

वाखाणावें किति तें ग्या विस्तर–भीरुनें जयां न मन ।
विसरे क्षण हि कवींचें केलें साष्टांग हें तयां नमन ॥ १७५ ॥
स्कंध ॥ ७ ॥

यदुपतिच्या चरणाब्जीं वाहियला स्कंध लेश अष्टम हा ।
अल्प हि बहु फळ होतें कृष्णार्पित चुकवितें चि कष्ट महा ॥ १५४ ॥
स्कंध ॥ ८ ॥

मोठें चरित परि तसें तें देवें थोडक्यांत आठविलें ।
कीं सुख तज्ञ जनाला काय श्री वामनें न वाटविलें ॥ ६८ ॥
स्कंध ॥ ९ ॥

ते रामकृष्ण आले त्यांच्या पोटासि भाग्य अर्णव तें ।
न चतुर्मुखासि वदवे कैसें एका मुखासि वर्णवतें ॥ ३६९ ॥
स्कंध ॥ ९ ॥

वाचा शुद्ध कराया थोडें ही वर्णिलें पुरे यश तें ।
वर्णन सरेल कल्पावधि करितां आननाचिया न शतें ॥ ३७० ॥
स्कंध ॥ ९ ॥

वाढेल ग्रंथ म्हणुनि आंवरितों मी बळें च रसनेला ।
परि म्यां भागवतानें भागवतांतील फार रस नेला ॥ ४२८ ॥
स्कंध ॥ १० ॥

वाढेल ग्रंथ बहु प्रणति करुनि सोडिला चि म्या गातां ।
तत्वें पुरुष प्रकृती भक्त पुसे लिहिन किमपि तें आतां ॥ ४४७ ॥
स्कंध ॥ ११ ॥

भव्या भगवंताच्या कथिल्या लीला कथा अशा कांहीं ।
त्या विस्तरें वदाया सामर्थ्य नृपा अजास ही नाहीं ॥ ८० ॥

स्कंध ॥ १२ ॥

मंत्र-भागवतांत "नमो भगवते वासुदेवाय" हीं अक्षरें अनुक्रमें आर्यांचे आरंभीं साधण्याचा नियम केल्यामुळें सविस्तर कथा लिहिण्यास मोठी अडचण पडूं लागली तेव्हां पंचम स्कंधाचे शेवटीं पंत म्हणतातः—

वानावीं पाताळें सप्त बळि--श्री अनंत वानावे ।
परि मंत्र-वर्ण अडविति आदरिले गुरु कसे न मानावे ॥ ६२ ॥
सुज्ञ-समाज सुरशिक श्रीहरिच म्हणेल न लघु पृथु कांहीं ।
स्वल्पार्थ-स्कंधांहीं तृप्तचि होईल जेविं पृथुकांहीं ॥ ६३ ॥

येथवर विस्तर-भयोद्गार-दर्शक कांहीं आर्या दाखल करण्यांत आल्या. आतां एका आर्येंत आख्यानाचें आख्यान किंवा एकींत दोन चार आख्यानांचा उल्लेख करून स्वारी पुढें तडक चालती झाल्याचीं थोडीं उदाहरणें देतोंः—

## वनपर्व.

एक कृषीवळ-पीडित दुर्बळ वृष पाहतांचि महिवरती ।
ख्याता सुरभी देवी स्नेहें झाली उदंड गींहवरती ॥ ६० ॥

अ० ॥ १. ॥

तो ब्राम्हण- माहात्म्य क्षत्रिय-माहात्म्य त्यासि आयकवी ।
वर्णी पतिव्रतेचें माहात्म्य हि सर्व योगिराय कवी ॥ ९९ ॥

अ० ॥ ६.॥

धर्मव्याध स्कंद-प्रभवादि कथा उदंड तो बोले ।
श्रवणें धर्म ब्राम्हण--गण नारद फार देव ही डोले ॥ ९६ ॥

अ० ॥ ६. ॥

या तीन आर्यांपैकीं पहिलींतील सुरभीचें आख्यान हें मूळ भारतांत मोठें असून मुक्तेश्वरी वनपर्वांतही बरेंच सविस्तर दिलेलें आहे. बाकीच्या दोन

आर्यांत तर पुष्कळच आख्यानांचा उल्लेख करून टाकिला आहे. तीं आ-ख्यानें मूळ भारतांत फारच मोठीं आहेत. कळावें लोभ असावा हे विनंती.

मु० रत्नागिरी,
ता० १ जून १८७८.

आपला मित्र,
ज० बा० मो०.

---

ता० क० वरील मजकूर लिहून आटपल्यावर याच मुद्यावर ज्या आर्या आढळल्या त्या खालीं दाखल केल्या आहेत:—

**आदि पर्व.**

विस्तर भयास्तव कणिक–नीत्यंतर्गत कथा चि अशि कांहीं ।
लिहिली ईच्या श्रवणीं आदर करिजेल साधु रसिकांहीं ॥ २६ ॥
अध्याय ॥ २६. ॥

झाला नृपति वसिष्ठ–स्वर्द्धेनें विप्र तें असो आतां ।
विस्तर–भय दे नाहीं तरि काळाचें हि भय नसे गातां ॥ ४० ॥
अ० ॥ ३२. ॥

रण–विस्तर काशाला हेमाक्ष–रणीं महा किरी टिकला ।
कीं अर्जुन कर्ण–रणीं अरिस हि बहु तोषवी किरीटि–कला ॥ ६९ ॥
अ० ॥ ३३. ॥

**सभा पर्व.**

नित्य नवे चि महोत्सव–कोटींचे त्या सभेंत भर भरती ।
विस्तर कशास परि हरि–दास–गृहींची उदंड भरभर ती ॥ ११ ॥
अध्याय ॥ १. ॥

विस्तर असो, तयासीं भीमासीं बाहुयुद्ध आरंभे ।
पूर्वागत म्हणति किती हा उर्वशि हा घृताचि हा रंभे ॥ १११ ॥
अ० ॥ १. ॥

इतुक्या चि राजसूय–क्रतुच्या या वर्णनें रसिक हर्षो ।
काय डरडरां ढेंकर देउनि चातक म्हणेल बहु वर्षो ॥ २४ ॥
अ० ॥ २. ॥

शोभे बहु या वचनें त्याला उपमान दुष्ट कुतरें च ।
विस्तर असो तयाचा उत्तरी शिर हरूनि शौरि-सुत रेंच ॥ ३९ ॥

अ० ॥ २. ॥

## विराट पर्व.

खळकृत गुरु-निंदेतें वर्णील कधीं न विस्तरें सुकवी ।
कीं ती श्री गुरु-भक्ति-प्रेमामर-पादपांकुरा सुकवी ॥ १७ ॥

अ० ॥ ४. ॥

तें किती वर्णावें म्यां, पाहत होते विचित्र समरा जे ।
कर्णाच्या अपयानावधि ते गमले चि चित्र-सम राजे ॥ ९७ ॥

अ० ॥ ४. ॥

## उद्योग पर्व.

पूजा करितां शल्य स्तुति करितां धर्म ही वसे उगला ।
पूज्यत्वें स्तुत्यत्वें ते न परि ग्रंथ मात्र हा फुगला ॥ १७ ॥

अ० ॥ २. ॥

ऐसें आजात रिपु-मुख शशिमंडल अमृत तेंचि वाचिक वी ।
तें बहु असो चि विस्तरवद्ग्रंथ प्राकृतीं न वाचि कवी ॥ ७३ ॥

अ० ॥ ३. ॥

इत्यादि बहु वदे तें सोडुनि आली कथा चि आर्यांत ।
निज परिवार त्यागुनि जसि भगवन्मूर्ती गोप-भार्यांत ॥ ९९ ॥

अ० ॥ ३. ॥

ऐसें धर्मानुमतें कृष्णानुमतें उदंड वदला हो ।
तें बहु काय वदावें शीघ्र अजातारि राजपद लाहो ॥ १७ ॥

अ० ॥ ९. ॥

## हरिश्चंद्राख्यान.

होउनि पुल्कस-दास द्वादशमास क्षितीश तो राहे ।
पाहे स्वप्न तयावरि तें हें संक्षिप्त वर्णिलें आहे ॥ ४ ॥

अध्याय ॥ ३. ॥

सकळ नरक शत वर्षें भोगविले पापयोनि मग नाना ।
पाहे हे श्रोत्यांच्या तद्विस्तर कांपवील बहु काना ॥ १३ ॥

अ० ॥ ३. ॥

## बृह दशम.

इत्यादि देवकी मृदु बोले चित्तीं प्रभूसि कर जोडी ।
गोडी कथेंत बहु परि विस्तर भीरूनि मानिली थोडी ॥ ४९ ॥

अध्याय ॥ ८५. ॥

नंद कुरु–क्षेत्रांतूनि गेला यदुवीर ही निजावासा ।
या सार कथा गातां आंवरितो ग्रंथ–विस्तर चि दासा ॥ ४९ ॥

अ०॥ ८४. ॥

ऐसें हरिहर–चरित प्रेमें विस्तर–भयें यथाशक्ती ।
गाउनि हरिहर–चरणीं अर्पूनि मी मागतों सती भक्ती ॥ ८५ ॥

अ० ॥ ८८. ॥

मु० मजकूर, ता० १ आगष्ट १८७८. } आपला. ज० बा० मो०.

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

विनंती विशेष—पेशवाईचे अखेरीस आपले दक्षिणदेशीं सर्वत्र पुंडाई माजली होती; त्याबद्दल अनंदफंदी कवीनें कटावरूपानें निरूपण केलेलें मी एका वृद्ध गृहस्थाचे मुखानें ऐकिलें. तो कटाव अप्रसिद्ध आहे असें मला वाटतें; म्हणून तो प्रसिद्ध व्हावा या हेतूनें आपलेकडे पाठविला आहे; तरी आपणांस योग्य वाटल्यास प्रसिद्ध करण्याची तसदी घ्यावी. कळावें. लोभ ठेवावा ही विनंती.

रत्नागिरी, तारीख १९ मार्च सन १८७८ इ०. } आपला सेवक सदाशिव विठ्ठल.

## कटाव.

( आनंदफंदीकृत. )

जिकडे तिकडे माजले टोळ । दुनियेचें वाटोळें झालें । मुलुखकुल उजाड

हलकल्होळ । आंगावरती कंवचाची ओळ । घालतील कुठवर हळदी बोळ । राहिना कोठें मैंकाला [ क्या ? ] डोळ । कालीं भेड्या वांगें पडवळें । जसा माल बापाचा बापाचा । बांधिति मोटारे मोटा । सत्कर्माचा तोटा । समय खोटारे खोटा ॥ १ ॥ कलिमहात्म उफराठें । होऊं लागलें खऱ्याचें खोटें । खाट मार ऐकिलात कोठें ! । ज्यांला न भरवतिं आपुलीं पोटें । ते जसे मोंगलाचे बेटे । फिरवुनि ठेवितात पागोटें । माहार पोरग्याच्या गळ्यांत गाठ्ये । हुर्डी खाउनि बनले बेटे । फार माजले गांठे गोंटे । उलटा दमाना आयाजी आया । सेवक स्वामीचें मानिना ॥ २ ॥ धामधूम चोहोंकडेच गर्दी । पठाण कंपु आरब गारदी । जिकडे तिकडे फांसे पारधि । लोक मिळाले माहा बेदर्दी । ज्यांला मिळेना भाकर अर्धी । त्याला बसाया घोडी जर्दी । त्यासिं बडेजाव आठ चारर्दि । सर्वांचि झाली भाऊ गर्दी । तशामध्यें जे होते दर्दी । पार पडले मर्दोमर्दी । दुनियेचा फुटाणा झालारे झाला । सेवक स्वामीचें मानीना ॥ ३ ॥ हे धर बिगारी भलताच धरावा । ब्राम्हण शूद्र शोध न करावा । जेथिल मुक्काम तेथेंच न्यावा । वस्त्रें घेउन नागवावा । त्याला माघारा बोडका लावावा । त्याला दुसरा शिपाइ भेटावा । त्याणेंच पुढें दामटावा । असा अवघि वेळ यावा जावा । ज्यावा गहूं हरभरा लुटावा । तोच बिगारि पुढें पिटावा । गांवकऱ्यांचा प्राण आटावा । पाटिलबावा पळोनि जावा । गरिब एखादा हातिं लागावा । त्याचे मदें पाटिलबावा । माराखालीं भोत (?) भरावा । खंडणीचा ठराव ठरवावा । त्याचे जिवाला हा प्रळय झालारे झाला ॥ सेवक स्वा० ॥ ४ ॥ हातांत भाला जेऊं घाला । कोण कुणाचा गुरु ना चेला । भलताच धमकावी भलत्याला । चोर दंडितो कोतवालाला । हा एक दाखला मिळाला । पातिव्रता मुकली प्राणाला । शिनळ चढली लौकिकाला । सांगत फिरते ज्याला त्याला । एकजात टोपीवाला । मीं नाहिं भ्यालें पंन्नासाला । अनंदफंदी सांगे जनाला । उलटा दमाना आयाजी आया । सेवक स्वा० ॥ ५ ॥

# निबंधमाला.

## अंक ५२.

### मोरोपंताची कविता.

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेह बिंदु ही फार ।
सारज्ञ असूयोज्झित त्यांला माझा असो नमस्कार ॥

**मंत्ररामायण.**

१. प्रस्तुत विषयावरील गेल्या तीन अंकांत **मोरोपंतावर** येणाऱ्या कित्येक आक्षेपांविषयीं विचार केला. आतां बाकीच्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

२. प्रस्तुत कवीविषयीं आलीकडील पंडितांची एक मोठी समजूत अशी होऊन गेली आहे कीं, त्याची कविता म्हणजे पराकाष्ठेची कृत्रिम. जो पाहिजेल तो प्रकार तींत पाहून घ्यावा. जसें स्वैरिणीचें पाऊल उजू म्हणून चुकूनही पडायाचेंच नाहीं, त्याप्रमाणेंच या कवीच्या वाग्देवतेची ही पद्धति होय. श्लेष, कोट्या, कूटें, शब्दचित्र, लांब व बिकट समास यांतच कवित्वाचें सर्वस्व आहे असें समजून वरील गौडबंगाल रचण्यांत त्यानें आपला काळ घालवला. या सिद्धांताच्या प्रत्यापनार्थ एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडिताचे उल्लेख येथें घेतों. त्यांपैकीं पहिला हा:--

"With authors who mean only one thing, and whose sole object is to give an expression to that meaning without casting any side-glances, there is no difficulty. But in works of art of our national poetry, like the one under consideration, it may be counted upon as a rule that the author did intend to be variously understood. This capacity of being diversely rendered is deemed to be a great merit, and authors take very considerable pains to succeed in this line."

" जे ग्रंथकार ( कवि ) एकमार्गी असतात, म्हणजे मनांत एकच अर्थ धरून तो सरळ रीतीनें व्यक्त करायाचा इतकेंच ज्यांस माहीत, जे इकडे तिकडे कधींही वांकडी नजर करायाचे नाहींत, त्यांच्याविषयीं मुळींच पंचाईत नसते. पण आमच्या देशांतील कवींचीं प्रस्तुतच्या सारखीं ( 'केकावली'

सारखीं ) जीं कृत्रिम काव्यें आहेत तीं वाचतांना हें आपले नेहेमी लक्षांत ठेवावें कीं, कवीचा उद्देश केवळ एकच अर्थ आपल्या काव्यांतून निष्पन्न व्हावा असा नसायचाच, तर त्यांतून अनेक अर्थ निघावे अशाच बुद्धीनें तीं रचलेलीं ! हा अनेकार्थसंभव म्हणजे कवितेचा मोठा गुण मानला असून एतद्देशीय कवींनीं तो साधण्याकरतां मोठी खटपट केलेली आढळते. "

दुसरा उल्लेख येणेंप्रमाणें:—

"Moropant has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimes prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters introducing the conjunction परंतु (but) into every line, and by commencing each line of his verse by the last word of the preceding line."

"महाराष्ट्र भाषा ही **मोरोपंता**ची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे; पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला आढळतो. तो असा कीं, कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतींचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,—इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात."

वरच्या दोहोंपैकीं पहिला उतारा 'एज्युकेशनल् रेकर्ड्' नामक इंग्रेजी शालापत्रकांतील होय. हा सन १८६७ सालाच्या नोवेंबर महिन्याच्या अंकांतून घेतला आहे. या सुमारास रा० ब० महादेव गोविंद रानडे हे अक्टिंग मराठी ट्रान्स्लेटर असल्यामुळें कै० परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या 'केकादर्शा'वर त्यांनीं सरकारी नात्यानें आपला अभिप्राय प्रगट केला. तो कवितामर्मज्ञांच्या अवलोकनांत यावा म्हणून त्या वेळचे डायरेक्टर मे० ग्रांट साहेब यांनीं वरील पत्रकाच्या कर्त्याकडे पाठविल्यावरून त्यानें तो सदरील अंकीं आपल्या वाचकांस सादर केला. तर वरील वाक्यांत सामान्यतः महाराष्ट्र कवींविषयीं व त्यांतून विशेषेंकरून **मोरोपंता**विषयीं जें मत दाखल केलें आहे तें वरील नामांकित विद्वानाचें होय. दुसरा उतारा माजी डा० विल्सन, इकडील प्रख्यात मिशनरी, यांच्या लेखांतला होय. मोलस्वर्थकृत कोशाच्या आरंभीं साहेब मजकुरांनीं मराठी भाषेवर व तींतील ग्रंथांवर लिहिलेला एक निबंध आहे त्यांत प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या संबंधानें वरील मजकूर आला आहे. असो, आतां वरील दोन्ही मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करूं.

पहिलें मत रा० ब० रानडे यांचें. राव बहादुरांचा महाराष्ट्र कवितेवर कितपत व्यासंग आहे हें आम्हांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी निदान शोधकपणा व मार्मिकपणा हे गुण त्यांच्या अंगीं पूर्ण असून, त्यांचा अभिप्राय लिहिण्यांत, किंबहुना बोलण्यांतही कधीं लेचापेचा बाहेर पडायाचा नाहीं, तर तो नेहेमीं यथान्याय व पोक्त असाच असायाचा, याविषयीं पहिल्यापासून प्रसिद्धी आहे. तेव्हां या ख्यातीवरून पाहतां वर त्यानीं एकंदर महाराष्ट्र कवींविषयीं व **मोरोपंतां**विषयीं जो येवढा निक्षून अभिप्राय दिला आहे त्याचा आम्हांस अत्यंत विस्मय होतो. त्यांच्यासारख्या बड्या विद्वानाच्या लेखावर आक्षेप घेणें हें कांहीं अंशीं मोठें साहसच होय; पण स्वपक्षाची चांगली बळ-कटी पाहूनच या साहसास आम्ही प्रवृत्त होत आहों. आतां इतकेंही करून आमची कोटि जर त्यांच्यावर लागू झाली नाहीं व आमचाच पक्ष खोटा ठरला, तर आम्ही आपले आक्षेप माघारी घेऊं.

प्रस्तुत आक्षेप दोन प्रकारचा आहे. एक एतद्देशीय कवींच्या संबंधानें व एक **मोरोपंतां**च्या संबंधानें. आतां पहिल्याविषयीं विचार करतां ‘ एत-द्देशीय ’ या शब्दानें आमचे महाराष्ट्र कवीच जर घेतले तर त्यांजवर तर वरील ‘ कटाक्षप्रेक्षणा ’चा आक्षेप बहुधा मुळींच लागू पडत नाहीं. **ज्ञानो-बा, तुकोबा, एकनाथ, नामदेव, महीपति, श्रीधर,** यांची तर बिचाऱ्यांची गोष्टच नको. यांच्या वाग्वधूंचा नेत्रकटाक्ष म्हटला म्हणजे अरुंधती लोपा-मुद्रादि महा सत्यांच्या कटाक्षाप्रमाणें दुर्लभ ! ‘ब्रह्मानंदीं लागली टाळी ’ अशी अवस्था होऊन ज्यांस देहभानही पुरतें नसायाचें त्यांस वरील चाळे करण्यास कोठून फावणार ! गरुडपक्षी जसा अस्मानीं राहून सूर्यावर एक टक लावतो त्याप्रमाणें परब्रह्मरूपावर ज्यांचें लक्ष निश्चल होऊन राहिलेलें व केवळ अंतःप्रे-रणेनें ज्यांचे वनपक्ष्यांप्रमाणें सुस्वर निघणारे त्यांच्या वाणींत श्लेषास कोठून जागा मिळणार ! तेव्हां या साऱ्या भाबड्या मंडळीस तर नाशाबितीवरून राव बहादूर एकदम खुले करून देतीलच. आतां राहतांपैकीं **मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, रघुनाथपंडित** व **रामजोशी** ही जराशी चवचाल मंडळी राहिली. यांस संस्कृताचें विशेष वारें लागून त्यांतील कांहीं चमत्कार त्यांनीं आपल्या काव्यांत उतरून देऊन महाराष्ट्र कवितेस विशेष प्रगल्भता आणली. तेव्हां वरील आरोप यांच्यावर ठरण्याचा अधिक संभव आहे. पण यांच्या-ही ग्रंथांत पाहूं जातां यांस धरायास फारसें सांपडत नाहीं. पहिल्या दोघांनीं

श्लेषप्रयोग केलेला तर आमच्या आठवणींत एकही नाहीं; तिसऱ्याविषयीं पुढील कलमांत पृथक् विचार करावयाचाच आहे; आणि शेवटल्या दोघांविषयीं पाहिलें तर पहिल्याच्या 'नलोपाख्याना'त आठ दहा ठिकाणीं श्लेषरचना आहे, व **जोशीबोवां**च्या लावण्यांपैकीं एक छेकापन्हुति मात्र श्लिष्ट आहे.* हा महाराष्ट्र कवींचा प्रकार झाला.

'एतद्देशीय' या शब्दानें संस्कृत कवि जर घेतले, तर गीर्वाणवाणीचें लावण्य अपार असल्यामुळें आणि शब्दप्राचुर्यास्तव व समासरचनेस्तव श्लेषघटनेची तींत अतिशयित सुलभता असल्यामुळें मधुर कटाक्षांची तींत वृष्टि आहे हें खरें; पण तींतही जो ग्रंथ हातीं घ्यावा त्याच्या पृष्ठोपृष्ठीं वरील सडा सांपडेल असें नाहीं. वरील शिडकाव ज्यांत मुळींच नजरेस येणार नाहीं, किंवा आलाच तर कोठें एकादा दुसरा शिंतोडा, बाकी सर्व पृष्ठें धुतल्या मोत्यांसारखीं स्वच्छ, अशीं काव्यें संस्कृतांत पुष्कळ आहेत हें संस्कृतज्ञांस सांगायाला नकोच. त्याप्रमाणेंच वरील प्रकाराचें प्राबल्य जससें आलीकडे येऊं लागावें तसें विशेष आढळतें हेंही अनेक वेळां पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां वादविषयक शब्दाचा वरील अर्थ घेऊनही निर्वाह लागणार नाहीं. आतां प्रस्तुत आक्षेपकास दोन्ही अर्थ विवक्षित असून आमच्या देशांतल्या एकंदर कवितेचें स्वरूप जर वरील इंग्रेजी वाक्यांत सांगितलें असेल, तर इकडूनही कोणती अडचण येणार आहे ती उघडच आहे. जो आक्षेप एकंदर संस्कृत

---

* **रामजोशाचा** 'छंदोमंजरी' म्हणून एक छंदःशास्त्रविषयक ग्रंथ आहे. यांत त्या त्या वृत्ताचें नांव शेवटीं श्लेषानें आणून त्याच वृत्तांत पद्याची रचना **कालिदासा**च्या 'श्रुतबोधा'प्रमाणें केली आहे. तसेंच **वामनानें** **भर्तृहरी**च्या शतकांचें भाषांतर केलें आहे त्यांतही क्वचित् श्लेष आलेले आहेत. पण या दोहोंनीं वरील उल्लेखास बाध येणार नाहीं हें उघडच आहे. 'छेकापन्हुति' म्हणजे काय हें साहित्यशास्त्रज्ञांस सांगायास नकोच. वरील लावणी किती बहारीची आहे हें ती वाचली असतां मार्मिकांस कळणारच आहे; शिवाय तिच्या चित्तमोहकत्वाचें दुसरेंही आम्हांपाशीं एक चमत्कारिक प्रमाण आहे. अकरा वर्षांपूर्वीं पुण्यांत नानांच्या एका घराला रात्रीं आग लागली होती, त्याच वेळेस जवळच पन्हाळकर गोसाव्यांचें कीर्तन चालू असून त्यांनीं वरील छेकापन्हुति त्या समयास काढली होती. बोवांची म्हणण्याची रीत जोशीबोवांच्या अस्सल धाटणीची मोठी चटकदार असल्यामुळें मंडळी इतकी गर्क होऊन गेली होती कीं, सगळें कीर्तन आटपून विडा विरावत होऊन खुशालपणें लोक जों बाहेर पडतात तों आगीचा डोंब त्यांच्या दृष्टीस पडला!!

कवितेवर अंशतः मात्र लागू पडतो, व मराठी कवितेवर तर बहुधा मुळींच लागू पडत नाहीं, तो दोघींचें एकीकरण केल्यानें विशेष दृढ होईल असें नाहीं हें स्पष्टच आहे. शिवाय संस्कृत भाषेवरून जरी मराठी भाषा निघाली तरी संस्कृत कवितेंत व महाराष्ट्र कवितेंत किती अंतर आहे हें नुकतेंच एका निबंधांत आम्हीं दाखविलेंच आहे.* राजाच्या मंदिरांत व ऋषीच्या आश्रमांत जितका भेद, किंवा उपवनांत व वनांत जितका भेद, तितकाच वरील दोन्ही कवितांमध्यें आहे. तेव्हां दोहोंविषयीं साधारणतः कोणतेंही विधान करणें उचित नव्हे.

आतां **मोरोपंतास** स्वतः वरील आक्षेप कितपत लागू पडतो हें पहायाचें. याविषयीं पुढें पुरतेपणीं विवेचन करायाचेंच आहे. सध्यां येवढें सांगतों म्हणजे बस आहे कीं, आमच्या देशाच्या संबंधानें मोठमोठ्या विद्वानांचे ठायींही ने कित्येक भ्रम आज वर्षानवर्षें नांदताहेत त्यांपैकींच हाही एक होय. उदाहरणार्थ प्रस्तुत ग्रंथ 'केकावली' हाच पहा. यावर अभिप्राय देण्यापूर्वी **दादोबांची** 'यशोदापांडुरंगी' टीका, तिजवर 'ज्ञानप्रसारकां'त व 'इंदुप्रकाशां'त आलेली चर्चा, व अभिप्राय देण्याकरतां हातीं घेतलेला 'केकादर्श', हीं सर्व पुस्तकें रावबहादुरांनीं अगोदर वाचलीं असें त्यांनीं सदरील 'रिपोर्ट'च्या आरंभीं कळविलें आहे. पण याप्रमाणें चारदां प्रस्तुत काव्याचें पर्यालोचन झालें असतां त्याविषयीं त्यांचा अभिप्राय वर दाखल केल्याप्रमाणें पडला. तो हा कीं, हें काव्य कृत्रिम होय, यास्तव आमच्या कवीनें आपल्या राष्ट्राच्या अभिरुचीस अनुसरून जेथें जेथें दुहेरी अर्थ आणण्याची तजवीज केली असेल तेथें तेथें दोन्ही अर्थ जे सांगायाचे ते 'केकादर्श' कारानें सांगितले नाहींत. या दुटप्पी अर्थाविषयीं राव बहादुरांचा फार आग्रह दिसतो. असा अर्थ 'केकावलीं'त अवश्य असलाच पाहिजे याविषयीं त्यांची पक्की खात्री असून रा० परशुरामपंत यांनीं तो दिला नाहीं हा त्यांच्या ग्रंथाविरुद्ध त्यांचा काय तो मोठा मुद्दा आहे. या महादोषास्तव 'केकादर्शा'ची योग्यता फार कमी झाली असल्यामुळें तो पुढील आवृत्तींत काढून टाकण्याविषयींही शेवटीं ग्रंथकर्त्यास शिफारस केली आहे.

आतां या अर्थबाहुल्याच्या संबंधानें प्रथमतः ही गोष्ट वाचकांस कळविणें जरूर आहे कीं, 'केकावलीं'त **मोरोपंतां**विषयींच्या सामान्य प्रसिद्धीप्रमाणें

---

* अंक ४७ पृष्ठ ८ पहा.

अनेक अर्थ जर खरोखरच निघण्यासारखे असते तर रा० परशुरामपंत हे ते दिल्या विना राहते असें आह्मांस वाटत नाहीं. या पंडिताचा सारा व्यासंग काय तो महाराष्ट्र कवितेवर होता हें सर्वांस माहीत आहेच. मराठी कविता वाचणें, लिहिणें, ऐकणें, शोधणें, छापविणें यांतच त्यांचा बहुतेक काळ गेला असल्यामुळें प्रस्तुत विषय हा केवळ त्याचाच होऊन जसा काय राहिला होता. त्यांतून परशुरामपंत तात्या हे जर जुन्याच हरदासांसारखे केवळ असून अर्वाचीन पद्धतीविषयीं अनभिज्ञ असते, म्हणजे एकाद्या ग्रंथाची आवृत्ति काढणें आहे तर तींत काय काय असणें अवश्य आहे हें जर त्यांस माहीत नसतें, तर एक निराळी गोष्ट होती. पण या कसबांत तर ते पहिल्यापासून वाकबगार; संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, 'नवनीत,' वगैरे अनेक ग्रंथ त्यांनीं स्वतः तयार केले असून शिवाय जेथून नवे ग्रंथ पसार व्हावयाचे तेथली सर्व घडामोड नेहेमी त्यांच्या नजरेखालीं; मग इतकें असून 'केकावली' सारख्या शतशः वाचलेल्या ग्रंथावर व्याख्यान करतांना त्यांच्यांतून वर सांगितल्यासारखी मोठी चूक होईल काय? आणखी दुसरें हेंही लक्षांत आणलें पाहिजे कीं, वरील गृहस्थ हे आलीकडील पद्धतींत जरी वागलेले होते तरी कालमानाप्रमाणें त्यांच्या मनावरचा संस्कार जुन्या पद्धतीचाच होता; यास्तव पंतांच्या काव्यांत अर्थांतराचा संभव जर लेशमात्रही असता तर तो त्यानीं मोठ्या आनंदानें व धन्यतेनें प्रगट केला असता. आमची आलीकडील मंडळी एकधोरणी असल्यामुळें, व त्यांच्या नव्या अभिरूचीस अनुसरून केलेल्या महाकाव्यांत दोन दोन तीन तीन अर्थ तर कोठचे पण कोठें कोठें एका अर्थासही पंचाईत असल्यामुळें, त्यांची दृष्टि अर्थांतरावर न पोंचली तर हें संभवनीय आहे; पण वरील पंडितासारख्या जुन्या अभिरूचीच्या व्याख्याकाराचे ठायीं वरील श्लेषानभिज्ञत्व किंवा श्लेषविमुखता मुळींच संभवत नाहीं. मल्लिनाथासारख्यांनीं 'नैषधा' वर टीका केली आणि येथून तेथून एकही श्लेष त्यांनीं उलगडला नाहीं, किंवा 'राघवपांडवीय' काव्यावर टीका लिहून एक रामायणपर अर्थ मात्र टीकाकारानें लावला व दुसरा भारतपर अर्थ द्यावयास तो मुळींच विसरला हें जितकें संभवदुक्तिक, तितकेंच प्रस्तुत महाराष्ट्र टीकाकाराचें प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या संबंधाचें विस्मरण होय. त्यांतून राव बहादुरानीं आपल्या मताच्या पुष्टयर्थ 'केकावलीं' तील कांहीं स्थलांचा नुसता निर्देश जरी केला असता, कीं या या ठिकाणीं दोन अर्थ

स्पष्ट असतां रा० गोडबोले यांनीं ते दिले नाहींत, तर टीकाकारावरील आरोपाची शाबिती झाली असती. पण हें ज्यापक्षीं त्यांनीं केलें नाहीं त्यापक्षीं आपल्या वृद्ध पंडिताची योग्यता नीटशी मनांत न आणतां केवळ वरिष्ठपणाच्या नात्यावर जाऊन त्यांनीं कांहीं तरी अभिप्राय झोंकून दिला असें म्हणणें भाग आहे !

ही टीकेची गोष्ट झाली. आतां मूळ काव्याविषयीं जर विचार केला तर त्यावर तरी ‘कृत्रिम’ त्वाचा आरोप त्यांनीं कोणत्या आधारावरून केला आहे हेंही बरोबर समजत नाहीं. **मॉनियर विल्यम्स्** वगैरे कांहीं आर्वाचीन संस्कृतज्ञ पंडितांनीं **कालिदासादि**कांच्या कवितेसही Artificial Poems (कृत्रिम काव्यें) या सदराखालीं ओढलें आहे, तशाच कांहीं रीतीनें ‘केकावली’ चें ही कृत्रिमत्व जर राव बहादुरानीं स्थापित केलें असेल, तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. कां कीं, छंदोभंगाचा, व व्याकरण भंगाचा अभाव, सुंदर रचना, अलंकारांची ठाकठिकीनें योजना, हीं सर्व जर ‘कृत्रिम’ त्वाचीं अंगें ठरतील तर पृथ्वीवरील सर्व भाषांतील हजारों वर्षे जगन्मान्य होऊन राहिलेलीं सारीं मोठमोठीं काव्येंही याच वर्गांत येणार. मग या वर्गांतच आमच्या कवीच्या ‘केकावली’ ला कोनाकोपऱ्यांतही जरी थोडीशी जागा मिळाली तरी कांहीं हरकत नाहीं. शब्दरचनेवरून जर प्रस्तुत काव्यांस वरील विशेषण मिळालें असेल म्हणावें, तर **पंतानीं** याच काव्यांत कांहीं विशेष शब्दचमत्कार केले आहेत असें नाहीं. त्यांच्या काव्यांचें उगीच वरवर ज्यानें अवलोकन केलें असेल त्यांस सुद्धां सहज कळून येणार आहे कीं, या काव्यांत प्रस्तुत कवीच्या वाग्वधूचें स्वरूप जें प्रगट झालें आहे तें,

लज्जा व्यालोल दृष्टीं स्मित रुचिर मुखीं भ्रूयुगी नृत्य नर्म
व्याहारीं कोमलांगीं अभिनव मिरवे घर्मरोमांच वर्म ।

अशा शृंगारवेषाचें नसून उलटें एकाद्या व्रतस्थ राजस्त्रियेप्रमाणें,

कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता
विराजे सिंदूरें धवलवसनें भूपवनिता ।

असेंच आहे. प्रास तर प्रस्तुत काव्यांत प्रायः मुळींच नसून यमकेंही चार चार पांच पांच अक्षरांचीं म्हणजे शिकस्त! असें असतां राव बहादुरानीं

'केकावली' वर जें मिनिट लिहिलें आहे त्याच्या शेवटल्या वाक्यांत प्रस्तुत काव्याचें गुण सर्वस्व म्हणून जें त्यांस वाटलें तें येणेंप्रमाणें दाखल केलें आहेत--

As a work of art there is not another equal to it in the language.

"चित्रकाव्याच्या दृष्टीनें पाहतां प्रस्तुत काव्याच्या तोडीचें महाराष्ट्र भाषेंत दुसरें कोणतेंही सांपडणार नाहीं." या अभिप्रायावरून पाहतां असें म्हणणें भाग येतें कीं, आमच्या नेटिव ट्रान्स्लेटरानीं 'ब्रह्मदशम' व 'अष्टोत्तरशत रामायणें' यांची वार्ता ही ऐकली नसावी. फार तर काय, पण 'नवनीतां' तलें एकादें आख्यान जरी त्यांनीं उलटलें असतें तरी वरील वाक्य येवढें 'धडाकून लिहितांना त्यांस पंचाईतच पडती! *

आतां अर्थदृष्ट्या 'केकावली' चें कवित्व कितपत सिद्ध होतें तें पाहूं. प्रस्तुत काव्य आज बारा तेरा वर्षें § आमच्या अवलोकनांत असून

---

* याच समयीं (सन १८६७) पुस्तकें नोंदण्याचा एक नवा आक्ट होऊन जुन्या सर्व पुस्तकांचा सरकारानें संग्रह करविला. यांपैकीं साऱ्या मराठी ग्रंथांवर राव बहादुरानीं जो रिपोर्ट केला तो सदरील नोंदणीपत्राच्या आरंभीं छापलेला आहे. त्यांत मोरोपंताच्या अष्टोत्तरशत रामायणांवर जो अभिप्राय प्रगट झाला आहे तो वरील वाक्याशीं फारसा जमण्यासारखा दिसत नाहीं. तो येणेंप्रमाणें आहे:

"His (Moropant's) Ramayans, with their fantastic principles of arrangement, are a curiosity in literature."

(मोरोपंतानें तऱ्हेतऱ्हेचीं जीं अनेक रामायणें रचलीं आहेत तीं सर्व मिळून एक चमत्कारिक चीजच होय!).

§ 'केकावलि' हा ग्रंथ सन १८६५ या सालीं रा० ब० दादोबा पांडुरंग यांच्या आवृत्तीवरूनच पहिल्यानें सुप्रसिद्ध झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या पुढें ज्या दोन तीन आवृत्ति निघाल्या त्या वरलीच्या मुळेंच निघाल्या. राव बहादुरांच्या आवृत्तींत पुष्कळ विलक्षण प्रमाद आहेत हें खरें; तरी त्यांच्या सारख्या प्रख्यांत विद्वानानें आमच्या कवीच्या अत्यंत रमणीय कृतीचा पुरस्कार करून 'यशोदा पांडुरंगी' सारख्या महाराष्ट्र टीकेचा अपूर्व प्रकार प्रथम सुरु केला याबद्दल सर्व रसिकांनीं व महाराष्ट्र भाषेच्या हितचिंतकांनीं त्यांचे आभार मानणें अवश्य होय. वरील टीकेचें नांव आम्हांस तर अत्यंत प्रिय आहे. आमच्या वाचकांस येथें सांगण्यास फारशी हरकत दिसत नाहीं, कीं मयूर कवीचा 'अपूर्व टाहो' आमच्या कानीं समग्र पडण्यास सदरील टीका ग्रंथच कारण झाला; आणि तेव्हांपासून आमचें प्रेम पंतांच्या कवितेवर जें स्थिरता पावलें तें उत्तरोत्तर तेथें दृढतरच होत गेलें. तेव्हांपासून आजपर्यंत प्रस्तुत कवीवर जे जे आक्षेप आम्हीं ऐकिले त्यांनीं आम्हांस १०१ त्या केकेच्या उत्तरार्धाची मात्र आठवण होत गेली!

त्याजवर आमची कितीएक वेळां आवृत्ति झालेली असेल. पण 'एज्युकेशनल रेकार्ड' तील वरील लेख वाचीतोंपर्यंत या काव्यांत अर्थाच्या लटपटीबद्दल आमच्या महाराष्ट्र कवीनें कांहीं खटपट केलेली आहे ही गोष्ट कधीं आमच्या ध्यानींमनींही वागली नाहीं. आमची समजूत अशी होती कीं, हा प्रबंध एकसंधी आहे; यांत कोठेंही सांधा किंवा चीर म्हणून बिलकुल मिळायाचीच नाहीं. पण वरील अभिप्राय जेव्हां आम्हीं पाहिला, व तो कोठून निघाला आहे हें मनांत आणिलें, तेव्हां आमची बुद्धि कुंठित झाली. 'हितोपदेशां' तील तीन धूर्तांच्या गोष्टींतील बिचाऱ्या याज्ञिकाप्रमाणें प्रत्यक्ष दर्शनाचें प्रमाणही आम्हांस आभासवत् भासूं लागलें. प्रस्तुत पुस्तकाच्या तेराव्या अंकांत छापलेल्या आमच्या एका मित्राच्या पत्रावरून जसें आम्हांस व आमच्या वाचकांस अकस्मात कळलें, कीं **मोरोपंतानें** आपल्या भारतपर्वांच्या आरंभीं एक एक अक्षर मुद्दाम योजून एक भगवत्पर वाक्य साधलें आहे, त्याप्रमाणेंच 'केकावली' तही आजपर्यंत कोणास कळून न आलेल्या कांहीं हिकमती त्यानें कशावरून करून ठेवल्या नसतील असेंही क्षणमात्र आम्हांस वाटलें. शेवटीं हा संदेह दूर करण्याकरितां सदरील काव्यग्रंथ आम्हीं पुनः एकवार बारकाईनें निरखून निरखून पाहिला. गूढ अर्थसंचयाच्या भ्रमानें कोणी जशी सगळी घरांतली जमीन ठोकठोकून वारंवार पाहावी, कीं कोठें तरी पोकळ आवाज होऊन हांडा हातास लागेल, त्याप्रमाणें प्रकृत काव्यांतील पदना पद आम्हीं छडून पाहिलें, पण आम्हांस तर अद्याप राव बहादुरांच्या लिहिण्याचा प्रत्यय आला नाहीं. मग हा काय चमत्कार असेल तो असो ! *

वरील संदिग्ध अवस्था आमची जोंपर्यंत राहील तोंपर्यंत आम्हांस असा निर्वाह करणें भाग आहे कीं, आमच्या देशाच्या प्रकरणीं मागील मंडळीचे जे कायमचे ग्रह होऊन राहिलेले आहेत त्यांपैकींच हाही एक होय. यापेक्षां दुसरी तोड आम्हांस सुचत नाहीं.

---

* राव बहादुरांचा अर्थद्वैता विषयीं येवढा पक्का ग्रह कशावरून झाला असावा याचा आम्हांस तर्कही होत नाहीं. कदाचित् पहिल्या केकेचा दुसरा वेदांतपर अर्थ लावण्याचा यत्न दादोबांनीं केला आहे येवढ्यावरच त्यानीं वरील कल्पना बसवून दिली असेल तर न कळे! पण हा अर्थही किती मुख्या रीतीनें सगळ्या पद्यावर बसतो हें कोणासही तेव्हांच वाचनांनीं कळणार आहे.

येथवर पहिल्या आक्षेपाविषयीं विचार झाला. आतां दुसरा आक्षेप डा० विल्सन् साहेब यांचा. या पाश्चात्य पंडिताची माहिती आमच्या कांहीं वाचकांस कदाचित् असेल; पण सर्वांच्या करितां त्यांचें थोडें वृत्त येथें सांगणें जरूर आहे. आमच्या देशाच्या निरनिराळ्या भागांत श्वार्त्स, डफ्, केरी वगैरे मोठमोठे मिशनरी जसे येऊन राहिले होते, व या देशास त्यांनीं आपणास वाहून घेऊन प्रभू येशूच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यांत आपले जन्मचे जन्म घालविले, त्याप्रमाणेंच डा० विल्सन् यांनींही मुंबई इलाखा पतकरून इकडील लोकांस सद्धर्माचें ज्ञान व्हावें एतदर्थ आपलें बहुतेक आयुष्य खर्चिलें. या देशांत प्रसिद्ध कोशकार क्यांडी व इतिहासकार मेडोज् टेलर यांच्या प्रमाणें मिशनरी मजकुरांनीं चाळीस वर्षें घालविलीं; व त्यांचें देहावसानही येथेंच झालें. इतक्या काळांत त्यांचा एतद्देशीय लोकांशीं अत्यंत परिचय होऊन येथील भाषा, रीतरिवाज, वगैरेही त्यांस चांगलीं माहीत झालीं होतीं हें सांगावयास नकोच. शिवाय अनेक लौकिक प्रकरणीं त्यांचा लोकांस पुष्कळ उपयोग होत असून विद्याप्रसाराच्या कामींही त्यांनीं फार मदत केली हेंही सर्वसंमत आहे. तर अशा प्रकारची बडी असामी आमचे दुसरे आक्षेपक होते. तेव्हां त्यांच्या लेखाला किती महत्व येणारें आहे, व तो चुकीचा असल्यास खोडून टाकणें किती अवश्य होय हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच.

डा० विल्सन् साहेबांस दीर्घकाल वास्तव्यामुळें आमच्या भाषेचें ज्ञान चांगलें झालें असेल असें आम्हांस वाटतें; पण आमच्या ग्रंथांचें ज्ञान त्यांस कितपत होतें याविषयीं कांहीं निश्चयात्मक सांगवत नाहीं. पाश्चात्यजनांच्या व विशेषतः मिशनरींच्या बाण्याप्रमाणें त्यांची गति सर्वत्र होतीच,—कां कीं, हिंदु शास्त्राचें, पारशी शास्त्राचें, व मुसलमानी शास्त्राचें त्यांनीं खंडन केलेलें आढळतें; व 'जाति' या मिशनरीप्रिय विषयावर त्यांचा एक मोठा ग्रंथ आलीकडे त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेला आहे. शिवाय युनिवार्सिटींतली ही अशी मौज ऐकण्यांत येते कीं, आरबी हिब्रू चिनी वगैरे भाषांत कोणी उमेदवार हजर झाला असतां कोणी परीक्षक न मिळे तर विल्सन् साहेबांनीं आपला त्याचा पतकर घ्यावा! आतां असलें चतुरस्रत्व संपादन केलें असतां त्यापासून दोष कोणता उत्पन्न होतो हें कोणासही सांगावयास नकोच. तो पुढील विवेचनावरून वाचकांच्या चांगला लक्षांत येईलच.

साहेब मजकुरांचा आमच्या कवीवर असा आक्षेप आहे कीं, त्यानें शब्दचित्र रचण्यांत व यंत्रें* बांधण्यांत आपल्या भाषाप्रभुत्वाचा अपव्यय केला. आतां हा आरोप त्याच्यावर लागू होण्यापूर्वीं दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक वरील प्रकार **मोरोपंतानें** केले आहेत कीं नाहींत; दुसरें, ते केले असतां बुद्धीचा अपव्ययच होतो कीं काय ?

वरच्यांपैकीं पहिल्या प्रश्नाचा निकाल आमचे बहुतेक वाचक करतीलच. कां कीं, 'नवनीता'वरूनही 'निरोष्ठ रामायण', 'दाम रामायण', व 'परंतु रामायण' हीं पुष्कळांनीं पाहिलीं तरी असतीलच. शिवाय माजी 'सर्वसंग्रहा'वरून 'मंत्ररामायण', 'नामांक रामायण', 'मंत्रमय रामायण' हेही प्रकार कित्येकांस अवगत असतीलच. तर आमच्या महाराष्ट्र कवीनें वरील कृत्रिम रचना केली आहे येवढा मुद्दा खरा आहे; व केवळ शब्दशः पाहतां डॉक्टर साहेबांचा आक्षेप यथार्थ होय.

आतां वरील कृत्रिमताही कितपत दोषरूप होय याचा विचार केला असतां प्रथमतः येवढें कबूल करणें भाग आहे कीं, संस्कृत साहित्यांत चित्रकाव्याची गणना शेवटली आहे, § व सामान्यतः कोणत्याही भाषेत पाहिलें असतां तसाच प्रकार आढळेल. यमक व अनुप्रास हे शब्दालंकार ही रसदृष्ट्या जर गौण होत, तर अक्षरबंध तर त्या दृष्टीनें फारच हलके ठरतील यांत संशय नाहीं. कां कीं, शब्दालंकार हे अर्थसौरस्यास जितके प्रतिबंधक होत त्यापेक्षां यंत्रें हीं तर फारच असून त्यांच्या योगानें अर्थ जसा काय जखडून टाकलेला असतो. तेव्हां सामान्यतः पाहिलें असतां येवढें

---

* कांहीं नियत अक्षरें साधून रचलेल्या प्रबंधास वरील नांव आहे. **मोरोपंतानीं** 'मंत्रमय रामायणा'च्या शेवटीं म्हटलें आहेः—

चोविस आर्यांचें हें रामायण यासि नाम मंत्रमय ।
अंतर्गतारिमारक सार कवि रचिल असें न यंत्रमय ॥

§ काव्याचे तीन प्रकार साहित्यशास्त्रांत सांगितले आहेत; एक ध्वनिकाव्य, दुसरें गुणीभूत व्यंग्य' आणि तिसरें चित्र. या तिहींची गणना उत्तम मध्यम व कनिष्ट अशी आहे. 'ध्वनि' किंवा 'व्यंग्य' ह्मणजे शब्दार्थांहून भिन्न असा मार्मिक अभिप्राय. हा ज्यांत स्पष्ट असतो तें उत्तम काव्य, तादृश प्रधान नसतो तें मध्यम, व मुळींच नसतो तें कनिष्ट. चित्रकाव्याचे दोन प्रकार आहेत. एक अर्थचित्र व शब्दचित्र. पहिल्यांत अर्थाचा चमत्कार केलेला असतो व दुसऱ्यांत केवळ पदरचनेचा.

खरें आहे कीं, रसिकपर जे कवि व वाचक असतील त्यांची वरील शब्द-चित्राविषयीं तादृश भक्ति असणार नाहीं. सर्व भाषांतील अति प्राचीन जे सर्वमान्य कवि त्यांचीं काव्यें पाहिलीं असतां वरील गोष्टीची प्रचीती येईल, व मोठमोठ्या रसिकांचाही तसाच कटाक्ष आढळेल. आमच्या देशांतील वाल्मीक व व्यास यांच्या काव्यांत तर काय, पण कालिदास व भवभूति यांच्या किंवा जगन्नाथराय गोवर्धनाचार्य यांच्या ग्रंथांतही वरील प्रकार कोठेंही आढळणार नाहीं; व रसिकांस तो कितपत संमत होय याचें प्रमाणही मागील दोन महदाख्यायिकांवरून मिळणार आहे.* तेव्हां कृत्रिम रचनेच्या विरुद्ध येवढा आक्षेप मात्र काय तो आणतां येणार आहे. पण दुसऱ्या पक्षीं जर पाहिलें तर असें आढळून येईल कीं, प्रस्तुत कृत्रिम पद रचनाही मोठमोठ्या सर्वमान्य कवींच्या कृतींतूनही दृष्टीस पडते. 'किरातार्जुनीय' व 'शिशुपालवध' यांची पंचकाव्यांत गणना आहे हें सर्वप्रसिद्धच आहे, शिवाय '**भारवेर्थ गौरवम्**' व 'माघे संति त्रयो गुणाः' हीं वचनेंही सर्व विश्रुत आहेत. पण असें असतां **भारवीनें** व **माघानें** आपआपल्या महाकाव्यांत एक एक सगळा सर्ग वरील तऱ्हेचा घातलेला आहे हें यापूर्वीं प्रसंगोपात अनेक वेळां वाचकांस कळविलेलेंच आहे. 'विदग्धमुखमंडन' म्हणून एक असेंच कूटात्मक प्रसिद्ध काव्य संस्कृतांत आहे. तेव्हां या उदाहरणांवरून पाहतां आमच्या महाराष्ट्र कवीच्या तर्फेनें येवढें सहज म्हणतां येईल कीं, त्यानें वर सांगितलेल्या कांहीं तऱ्हा जरी कोठें कोठें केलेल्या असल्या तरी त्यांबद्दल तो विशेष दोषास पात्र होतो असें नाहीं. निदान त्यांवरून त्याच्या अरसिकतेचें मोठेंसें प्रमाण धरतां येत नाहीं.

**मोरोपंता**च्या कृत्रिम रचनेच्या तर्फेनें केवळ सामान्यतः वरील आधार दाखविण्यांत आला. वस्तुतः पाहतां त्याच्या अष्टोत्तरशत रामायणांस वरील तरफदारीचीही गरज नाहीं. कां कीं, वरील रामायणेंही आमच्या कवीच्या वाग्देवतेची केवळ स्वतंत्र लीला आहे. **होमर**च्या महाकाव्यांतील वीरयुद्ध आटपल्यानंतर जसे रंगयुद्धांत परस्पर झगडले व नाना तऱ्हेच्या कसरती करून त्यांनीं करमणूक करून घेतली, किंवा चितार्‍यानें मुख्य चित्र तयार झाल्यानंतर जशी भोंवताली नक्षी व वेलबुट्टी काढण्यांत आपली करामत खर्चावी, त्याप्रमाणेंच आमच्या कवीनें 'भारता'दि मोठमोठ्या ग्रंथांनीं आपल्या जन्मभाषेस अलंकृत करून शेवटीं आपल्या उपा-

---

* अंक १ पृष्ट ३१, व अंक ११ पृष्ठ २७ पहा.

स्य देवतेच्या प्रीत्यर्थ आपल्या सरस्वतीचा ओघ जलयंत्रोद्गारांप्रमाणें चित्रविचित्रतेनें प्रगट केला आहे. वास्तव राजमंदिराच्या भोंवताली कारंज्यांची शोभा केली असल्यास कारागिरास नांव ठेवणें जसें शोभणार नाहीं, व जलतुषारांचें वैचित्र्य पाहून तटस्थ राहणाराच्या आंगींहि विशेष रसिकता मानण्याची गरज नाहीं, त्याप्रमाणेंच प्रसंगवशात् कृत्रिमतेचा प्रकार केल्यानें व चाहिल्यानें कवि व रसिकही दोषास पात्र होतो असें आम्हांस वाटत नाहीं. सागराचा अफाट विस्तार, नद्यांचे उंच प्रदेशावरून दृष्टिगोचर होणारे सर्पवत् ओघ, नायगारा नदीचा 'रसातलास विदारणारा तटप्रपात', हिमालयाच्या ज्येष्ठ कन्येनें आपल्या 'प्रियपात्र रत्नाकरा'स जेथें सहस्र भुज प्रगट करून सरभसलिंगन केलें आहे तेथला विचित्र व भव्य देखावा, यांच्या अंगीं कवीचें व रसिकाचें मन तल्लीन करून टाकण्याची शक्ति खरी, व वाग्देवतेचीं मुख्य विहारस्थानें हीं होत हेंही खरें. पण सागरावर दूर दूर नजर पोंचवून डोळे दुखूं लागले असतां, व नायगारेच्या धबधब्यांच्या प्रलय गर्जनेनें कर्णविवरें बधिर झालीं असतां, जलयंत्रावर नाचणाऱ्या तुषारांची व त्यांवर मारणाऱ्या इंद्रधनुष्यांच्या लकेरींची शोभा पाहणें व सुखस्पर्श तुषारवृष्टींचा अनुभव घेणें हें त्याच देवीस केवळ तुच्छ वाटेल असें आमचें मन घेत नाहीं !

तर डा० विल्सन् साहेबानीं आमच्या कवीवर वरील आक्षेप दाखल करून त्याच्या कीर्तीची हानि करण्याचा यत्न करण्यापूर्वीं वरील कांहीं विचार मनांत आणावयाचे होते. शिवाय त्यांच्या लेखावरून तिऱ्हाईत वाचणारास असें वाटण्याचा संभव आहे कीं, आमच्या कवीनें आपल्या ग्रंथांत लहर लागेल तेथें वरील कृत्रिम प्रकार आणून आपलें भाषाप्रभुत्व गाजविलें आहे; तर या संबंधानेंही त्यांनीं वाचकांस कळविणें जरूर होतें कीं, **मोरोपंतानें** शब्दचित्राचे प्रकार जे केले आहेत ते **भारवि** व **माघ** यांच्या प्रमाणें आपल्या मोठमोठ्या ग्रंथांच्या मध्येंच न करतां अगदीं निराळे केले आहेत. शिवाय ते म्हणण्यासारखे कृत्रिमही नाहींत. खड्गबंध, गोमूत्रिकाबंध, मुरजबंध, समुद्गसमक, सर्वतोभद्र, हे किंवा असले दुसरे प्रकार त्याच्या रामायणांत मुळींच नाहींत. अष्टोत्तरशतांपैकीं सुमारें पाऊणशें रामायणें छापून निघालीं आहेत; यांतील बहुतेक तर निरनिराळ्या छंदांत रचिलीं आहेत येवढेंच काय तें त्यांचें वैचित्र्य; कित्येकांत 'उमा', 'काशी', 'शिव', अशीं नांवें व कोठें कोठें ऋषींचीं नांवें, तीर्थांचीं नांवें वगैरे साधलीं आहेत. तेव्हां एकंदर रामायणसमूहांत

अंमळ करामतीचीं म्हटलीं म्हणजे 'परंतु रामायण', 'दाम रामायण', 'लध्वक्षर रामायण', 'ओवी रामायण', 'मंत्ररामायण' व 'निरोष्ठ रामायण' येवढीं-चें कायतीं होत. * पण हीं साधण्यासही आमच्या कवीचे श्रम म्हटले म्हणजे हत्तीस आपल्या शुंडादंडावर पुष्पमाला खेळविण्याचे जितके श्रम तितकेच बहुधा होत!

असो; येथवर **मोरोपंता**च्या कवितेवर एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडितानें काढलेल्या आक्षेपांचा विचार झाला. पुढील खेपेस वरील दोन पंडितांच्याच प्रस्तुतविषयक लेखावर आणखी कांहीं विचार करायाचा आहे.

---

**उत्कृष्ट उतारे**——[पुढील उतारा गदापर्वांतील आहे. भीमाचें व दुर्योधनाचें गदायुद्ध होऊन भीमानें युद्धच्छल करून आपल्या चिरंतन वैऱ्याच्या मांड्यांवर प्रहार करून त्यास भूतळीं पाडल्यावर कांहीं वेळानें संजयाची व त्याची गांठ पडली आहे. त्या विलक्षण प्रसंगीं दोघांचें जें बोलणें झालें तें संजय धृतराष्ट्रास निवेदन करीत आहे. एकंदरींत हें सर्व पर्वच फार उत्कृष्ट साधलें आहे. चंद्रसमुद्रन्यायानें सत्कवींच्या हृदयाब्धि महाप्रसंग वर्ण्य

---

* वरच्या सहांपैकीं तीन रामायणांचें स्वरूप 'नवनीतां'तल्या वेंच्यांवरून वाचकांस कळेलच. यास्तव बाकीच्या तिहींचें मात्र येथें सांगतों. 'लघ्वक्षररामायण' सारें एकमात्रक आहे; उदाहरणः——

दशमख–वध–मति विधि–सुर–नुत–पद जगदधिप अजित वरद हरि।
परम करुण म्हणवुनि दशरथ–नरवर–तनुज–मनुज–रण हि धरि॥ १॥

'ओवी रामायणां'त आर्या व ओवी हीं दोन्हीं छंदें साधलीं आहेत; उदाहरणः—

वंदुनि सरस्वतीला ध्याती कुलदेवतेस कवि सर्व।
गाती निजपूर्वजगुरु–मूर्ती हरि गुरु तथैव कवि शर्व॥ ३॥
(वंदुनि सरस्वतीला ध्याती कुलदेवतेस कवि सर्व गाती।
निजपूर्वजगुरुमूर्ती हरि गुरु तथैव कवि शर्व॥)

'मंत्रमय रामायणा'चें उदाहरणः—

श्रीमान राजशिरोमणि दशरथ जो निजयशें बरा महित।
द्विजसेवक यज्ञनिरत जनभयहर्ता धरा निकामहित॥ १॥

वरील आर्येंत संपूर्ण त्रयोदशाक्षरी मंत्र श्रीकारापासून मकारापर्यंत साधला आहे हें लक्षांत येईलच.

असतां नेहेमी क्षुब्ध होत असतो; त्याप्रमाणेंच आमच्या कवीची प्रतिभाही या महापर्वांत अत्यंत उज्वलता पावली आहे. जो अकरा अक्षौहिणींचा स्वामी, शंभर भ्राते ज्याच्या सवेंत, कर्णासारखे प्रतापी सेनानी ज्याची आज्ञा शिरसावंद्य करणारे, जो स्वतः शूर व मानधन, तो प्रथम दिल्लीपति संपूर्ण सागर आटून एकटा राहिलेल्या महातिमीप्रमाणें किंवा ग्रहमंडळ तोडून टाकून निराळा केलेल्या प्रलयकालीन ग्रहाधिपतीप्रमाणें एकेच काळीं अत्यंत निस्तेज व तेजस्वी असा होत्साता एकाकी अवशिष्ट राहिला, आणि तसल्याही प्रसंगीं त्याची मानग्रंथि लवमात्रही शिथिलत्व न पावतां तो सत्क्षत्रियाप्रमाणें भीमाशीं स्यमंतपंचकाचे ठायीं द्वंद्व युद्धांत भिडला आणि केवळ छल प्रयोगानें जिंकला गेला,-- हा सर्व प्रसंग केवढा भव्य व उदात्तरसभरित आहे! आम्हांस वाटतें कीं, 'प्याराडैज् लास्ट' मधले सैतान महाराज, 'इलियड' मधला हेक्टर, किंवा आमच्याच आदिकाव्यांतील प्रतिनायक, हेही वरील महाक्षत्रियापुढें कांहीं नाहींत! प्रस्तुत पर्वांत दुसरेही मोठे चमत्कारिक प्रसंग आहेत. दुर्योधन विश्रांतीस्तव डोहांत दडून राहिला, नंतर दोघा शिष्यांनीं आपल्या गुरुपुढें आपला भयंकर पाठ म्हणून दाखविला, बलराम क्रोधास चढून शेवटीं त्याच्या प्रिय शिष्याचाच नक्षा होऊन देवांच्या पुष्पवृष्टीनें पांडम लज्जित झाले, व दुर्योधनाचें आणि कृष्णाचें परस्पर भर्त्सनपर भाषण झालें, वगैरे सर्व प्रसंग मोठे चित्तवेधक आहेत. ते आमच्या महाराष्ट्र कवीच्या ग्रंथांत अनुभविले असतां त्यानें सरते शेवटीं मूळच्या कर्त्याशीं जें आपलें साम्य सूचित केलें आहे तें बहुधा थोड्यांसच अयथार्थ वाटेल! ]

धृतराष्ट्र म्हणे सूता भीमानें मस्तकीं दिला पाय।
भग्नोरु[1] पांडवाहित[2] मानी[3] मत्पुत्र बोलिला काय ॥ १ ॥

सूत म्हणे काय पुससि ज्याचें न कधीं हि पादतळ मळलें।
तें राजरत्न तैसें जैसें धूळींत यादं[4] तळमळलें ॥ २ ॥

ज्याच्या अंगीं अयुत–द्विपबळ ऐसा समर्थ लोकेश।
जो परशतानियमनपटु नियमी कष्टें करूनि तो केश ॥ ३ ॥

रडत मजकडे पाहुनि निंदुनि धर्मासि सोडूनि श्वास।
वदला भूप असें कीं न धरावा साधुचा हि विश्वास ॥ ४ ॥

---

१ मांड्या मोडलेला. २ पांडवशत्रु (दुर्योधन). ३ मानधन. ४ जलचर.

भीष्म द्रोण जयद्रथ मद्रप भूरिश्रवा कृपाचार्य ।
शकुनि अश्वत्थामा कृतवर्मा कर्ण वीरवर आर्य ॥ ५ ॥

हे सर्व नाथ होते तरि हि अवस्था पहा कशी झाली ।
दुरतिक्रम काळ अशी वृद्धोक्ति तिची प्रतीति मज आली ॥ ६ ॥

एकादशसेनापति मी या कुदशेसि पावलों आजी ।
काळापुढें तृणचि तो शक्रशताशीं हि करिल जो आजी[1] ॥ ७ ॥

लंघुनि समय[2] गदेनें भीमें केलें मदूरुयुगमथन ।
असतील वांचले जे त्यांसि करावें असें तुवां कथन ॥ ८ ॥

कपटें श्रीभीष्मप्रभु गुरु हि जयद्रथ हि पांडुतनयांहीं ।
भूरिश्रवा हि कर्ण हि मथिला बहु साधु शूरजन यांहीं ॥ ९ ॥

मोडुनि मदूरु पाडुनि मज माझें मर्दिलें शिर पदानें ।
यापरिस चित्र दुसरें काय करावें अधार्मिकमदानें ॥ १० ॥

तातातें मातेतें नमुनि असें सांग संजया बा कीं ।
केलें राज्य अकंटक पुष्कळ सुख भोगिलें जसें नाकीं ॥ ११ ॥

विष्णुपदीं पिंड तसा शत्रुशिरीं पाय दे जोडावा ।
तो म्यां दिला अधिक या-हुनि जन्मुनि अर्थ काय जोडावा ॥ १२ ॥

होउनि पराजित पर-मेध्य[3] न मीं जाहलों न हें थोडें ।
अरिहृत[4]पदोपजीवन खाजविलें जेंवि आपलें घोडें ॥ १३ ॥

हें बहुबरवें मजवरि असतां मी श्री कधीं न रागेली ।
देती लाज तशी हे त्यागुनियां स्त्री जशी नरा गेली ॥ १४ ॥

आमरण पांडवांसीं माझा निर्विघ्न चालला दावा ।
दैवें सुपुरुषपुंगव अभिमानभरें असाचि लादावा ॥ १५ ॥

सुक्षात्रियांसि जी गति बहुमान्या तीच हे मला घडली ।
तनु मनुपूत[5] घृताहुनि मखशिखिकुंडीं[6] तशी रणीं पडली ॥ १६ ॥

---

१ युद्ध. २ संकेत. ३ दुसऱ्याचा चाकर. ४ शत्रूनें हरण केलेल्या अधिकारावर से-वकभावानें उपजीवन. ५ मंत्रपूत. ६ यज्ञकुंडांत.

शस्त्रें विषें वधावा जैसा सुप्त प्रमत्त अनयानें ।
वधिला तसा अधर्में हा तेजस्वींद्र पांडुतनयानें ॥ १७ ॥

या छळवधें परांचें दुर्यश माझें जगीं सुयश झालें ।
आजन्म सदाचारें यावें तें सुफळ शेवटीं आलें ॥ १८ ॥

कृप कृतवर्मा अश्व-त्थामा यांतें निरोप सांग असा ।
पांडव खळ छळबळें वध करितिल फार सावधान असा ॥ १९ ॥

गुरु सुतबंधुसुहृज्जन गेले स्वर्गासि सर्व ही नीट ।
मी हि निघालों आला [1]प्रांतविरस विषय समजतां वीट ॥ २० ॥

व्याकुळ होईल माता तात सुनांच्या सदा विलापानें ।
शोकें बहु न विषाच्या बहु ताप त्रास दाविला पानें ॥ २१ ॥

पतिबंधुलयें दीना होइल धीरा पर[2] [3]स्वसा माजी ।
मज मायसी म्हणे बा कर गा देऊनि [4]परस्व [5]सीमा जी ॥ २२ ॥

होइल लक्ष्मणाची बहुधा पृथुले[6]चना प्रसूँ नाहीं ।
वज्रप्रहार सोसिल कसि व्हावी मूर्च्छिता प्रसूँनाहीं ॥ २३ ॥

जरि काय वाग्[9]विशारद येता [10]चार्वाक बहु बरें होतें ।
करिता [11]अपचिति माझी दुःसाध्य हि कार्य साधिता हो तें ॥ २४ ॥

ऐसे विलाप बहुविध केले सांगों नृपा किती काय ।
बहु जन ऐकुनि रडले पडले शोकांत बोलिले हाय ॥ २५ ॥

सचराचरा धरा ही त्या समयीं कांपली नरवरा हे ।
लोक पळे मृग हि खग हि ऐकुनि तन्निकट तो नरव राहे ॥ २६ ॥

अश्वत्थाम्यातें तो युद्धव्यवहार त्या जनें कथिला ।
कीं भीमें उरुद्वय भंगूनि गदायुधें नृपति मथिला ॥ २७ ॥

---

१ अंतीं विरस वाटणारे. २ अत्यंत. ३ बहीण. ४ दुसऱ्याचें द्रव्य. ५ संधि. ६ विशालनेत्री. ७ आई (इंदुमती). ८ पुष्पांहीं. ९ वाक्पटु. १० सेवक. ११ पूजा.

**सुभाषित**——(१) वालिः पातालनिलयोऽधः कृतश्चित्रमत्र किम् ।
अधःकृतो दिवस्थोऽपि चित्रं कल्पद्रुमस्त्वया ॥

" हे राजा ! पातालांत असणाऱ्या बलीस तूं दानशूरत्वांत खालीं केलास यांत नवल तें काय ? पहा, स्वर्गस्थ कल्पतरूस तूं खालीं करून टाकला आहेस ! "

( २ ) यदेतच्चंद्रांतर्जलदलवलीलां वितनुते
तदाचष्टे लोकः शशक इति नो मां प्रति तथा ।
अहं त्विंदुं मन्ये त्वदरि विरहाक्रांततरुणी–
कटाक्षोल्का पातव्रणकणकलंकांकिततनुम् ॥

चंद्रगत कलंकावर उत्प्रेक्षा——

" हे राजा ! चंद्राच्या ठायीं लहानशा ढगासारखें जें दिसतें त्याविषयीं लोक अशी कल्पना करतात कीं, तो ससा आहे, पण मला तसें भासत नाहीं; माझी कल्पना अशी होते कीं, तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया या पतिविरह असह्य हो-ऊन चंद्राकडे जे निर्भर्त्सनपर तीव्र कटाक्ष फेंकतात त्यांच्या योगानें त्यास व्रण पडले असावे "

( ३ ) रे रे रासभ वस्त्रभारवहनात्कुग्रासमश्नासि किं
राजाश्वावसथं प्रयाहि चणकाभ्यूषान् सुखं भक्षय ।
सर्वान् पुच्छवतो हयानिति वदंत्यत्राधिकारे स्थिताः
राजा तैरुपदिष्टमेव मनुते सत्यं तटस्थाः परे ॥

" हे रासभा ! तूं परटाच्या घरीं राहून पांघरुणांचे भारे वाहण्याचे कष्ट क-रून उगाच कुग्रास कां खातोस ? तर तुला सांगतों असें कर. राजवाड्यांत प्रवेश कर, म्हणजे तुला शानदार हरभऱ्यांची चंदी मिळत जाईल. कसें म्हणशील तर अश्वशालेवरील अधिकाऱ्यांची परीक्षा इतपत आहे कीं, शेपूट असली कीं, त्या जनावरास घोडा म्हणून ते बाळगतात, राजाचा पूर्ण भरंवसा त्यांच्यावर, आणि इतर तर केवळ उदासीन, त्यांस कसचीच फिकीर नाहीं ! "

( ४ ) यत्पूर्वं पवनाग्निशस्त्रसलिलैश्चीर्णं तपो दुश्चरं
तस्यैतत्फलमीदृशं परिणतं यज्जातरूपं वपुः ।

मुग्धापांगकपोलचुंबनसुखं संगश्च रत्नोत्तमैः
प्राप्तः कुंडल वांछसे किमपरं यन्मूढ दोलायसे ॥

"हे कुंडला ! वायु, अग्नि, शस्त्रें आणि उदक या सर्वांचें सेवन करून जें तूं दुर्धर तप आचरलेंस त्याचें फळ हें तुला प्राप्त झालें आहे कीं, तुझी सुवर्णरूप काया बनली, तरुणीच्या नेत्रप्रांतभागाचें व कपोलाचें चुंबन तुला घडतें, आणि उत्कृष्ट रत्नांशीं तुझा सहवास झाला आहे; मग इतकें भाग्यही पुरेसें न होऊन तूं अजून जें झोके खात आहेस त्या तुझ्या मनांत वेड्या! आणखी ती हाव कसली आहे ?" सोनें हें मूळच्या खनिज स्थितींत असतां त्याजवर त्याची खरी कळा आणण्यास अग्न्यादि संस्कार त्यास व्हावे लागतात हें प्रसिद्धच आहे; व त्याप्रमाणेंच पंचाग्निसाधन वगैरे तपश्चरणाचे मार्ग आहेत हेंही प्रसिद्धच आहे. कुंडलाचें आंदोलन हें स्वभावसिद्ध असतां त्यावर ही वरील कल्पनाच केली आहे. धूम्रपानाविधि कसा करतात हें वाचकांस सांगायाला नकोच.

( ५ ) मांधाता च महीपतिः कृतयुगालंकार भूतो गतः
सेतुर्येन महोदधौ विरचितः क्वासौ दशास्यांतकः ।
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते
नैकेनापि समं गता वसुमती नूनं त्वया यास्यति ॥

'भोजप्रबंध.'

मुंजराजानें भोजाच्या वधार्थ जे पुरुष पाठविले होते ते पुढील लेख घेऊन त्याच्याकडे परत आले. आपला वध निश्चित होणार असें पाहून पुढील निर्भर्त्सन गर्भित श्लोक भोजानें रचून आपल्या चुलत्याच्या हवालीं करण्यास सांगितलें:––

"हे राजा ! कृतयुगास अलंकारभूत जो मांधाता राजा तो गेला; ज्यानें महोदधीवर सेतु रचना केली तो दशाननांतक राम तरी कोठें आहे ? दुसरे जे युधिष्ठिरादि राजे मोठे मोठे होऊन गेले तेही सर्व स्वर्गाचा मार्ग धरते झाले;––पण इतक्यांपैकीं एका बरोबरही ही पृथ्वी गेली नाहीं. ही बहुधा तुजबरोबर मात्र येईल असें वाटतें !"

( ६ ) मुरली महदीयवंशजा परपुंसा परिचुंबिता सती ।
विजने विपिने भयातुरा परमेशं स्मरती ररास सा ॥

" महावंशापासून ( पक्षीं, वेळूपासून ) उत्पन्न झालेली मुरली ही परपुरुषानें ( पक्षीं, कृष्णानें ) चुंबिली गेली असतां, आपण एकीकडे रानीं आहों असें जाणून भयभीत होत्साती परमेशाचें स्मरण करूनच जणो काय आक्रोश करती झाली ! "

( ७ ) विद्वद्राजशिखामणे तुलयितुं धाता त्वदीयं यशः
कैलासंच निरीक्ष्य तत्र लघुतां निक्षिप्तवान् पूर्तये ।
उक्षापं तदुपर्यमासहचरं तन्मूर्ध्नि गंगाजलं
तस्याग्रे फणिपुंगवं तदुपरि स्फारं सुधादीधितिम् ॥

" हे सुज्ञ शिरोमणि राजा ! तुझ्या यशाचें परिमाण करण्याचें मनांत आणून ब्रह्मदेवानें पहिल्यानें सगळा कैलासचा कैलास पारड्यांत घातला; पण तेवढ्यानें होत नाहींसें पाहून नंतर त्यावर नंदी उभा केला; त्या पुढें शिव व पार्वती हीं नंदीवर बसविलीं; पुढें शिवाच्या जटेवर गंगेस ठेविलें. नंतर सर्प व सरते शेवटीं देदीप्यमान चंद्र यांचें आरोपण केलें ! "

( ८ ) दारिद्र्यानलसंतापः शांतः संतोषवारिणा ।
याचकाशाविघातांतर्दाहः केनोपशाम्यतु ॥

" दारिद्र्यरूप अग्नीचा संताप संतोषरूप उदकानें शमन पावला; पण दारीं आलेल्या याचकाच्या आशाभंगानें जो अंतर्दाह होतो तो कशानें शांत व्हावा ? " तात्पर्य हें कीं, स्वतःचें दैन्य सज्जन हे धैर्यैकरून सोसतील; पण दुसऱ्याच्या दैन्याचें निवारण करण्याचें जें असामर्थ्य दारिद्र्याच्या पोटीं येतें त्याचे दुःखावेग कसे सहन करावे ?

( ९ ) धन्या सा गृहदेहली स्पृशति या त्वत्पादपद्मप्रभां
जाता सा सरसी रसाद्विशति सा यस्यां विहारेच्छया ।
वंद्यः कोऽपि स एव यः खलु तया नेत्रेण संभाव्यते
धिग्धिग्बंधेसमेषु मां यदनयन्नैकं कथंचित्कथम् ॥

कोणी उत्कंठित म्हणतो:--

" तिच्या चरणाची प्रभा ज्याच्यावर पडते तो उंबरठा धन्य होय; ज्या पुष्करिणींत ती विहार करण्यास हौसेनें उतरते ती स्पृहणीय होय; व जो कोणी तिच्या प्रेक्षणानें धन्यत्व पावतो तो वंद्य होय; पण ब्रम्हदेवास धिक्कार असो कीं, त्यानें या तिहींपैकीं एके ठिकाणींही माझा योग होऊं दिला नाहीं ! "

( १० ) स्फुरसि बाहुलते किमनर्थकं
त्वमपि लोचन वाम भवस्थिरम्
तमहाम् गतमप्य पराधिनं
न परिरब्धुमलं नच वीक्षितुम् ॥

" हे भुजलते ! तूं उगीच कशाला स्फुरण पावतेस ? हे वामनेत्रा ! तूंही स्थिर हो कसा ! कां कीं तो अपराधी मजकडे आला तरीही मी त्यास आलिंगन करणार नाहीं किंवा त्याच्याकडे नुसती पाहणार देखील नाहीं ! "ही अर्थातच खंडित झालेल्या मानिनीची उक्ति होय.

( ११ ) याः पश्यंति प्रियं स्वप्ने धन्यास्ताः सखि योषितः ।
अस्माकं तु गते कांते गता निद्रापि वैरिणी ॥

" ज्या स्त्रियांस आपल्या वल्लभाचा समागम स्वप्नांत घडतो त्या धन्य होत; पण आमची तर विरहसमयीं अशी स्थिति होते कीं, वैरीण निद्राही आम्हांस पारखी ! "

( १२ ) राजन् दौवारिकादेव प्राप्तवानस्मि वारणम् ।
मद्वारणमिच्छामि त्वत्तो ऽ हं जगतीपते ॥

" हे राजा ! तुझ्या द्वारपालापासूनच मी वारण ( गमनप्रतिबंध--पक्षीं, हत्ती ) पावलों; तेव्हां आतां तुजपासून मदवारणाची ( माझ्या अप्रतिबंधाची--पक्षीं, मदोन्मत्त हत्तीची ) मी अपेक्षा करतों ! "

( १३ ) अर्था न संति नच मुंचति मां दुराशा
त्यागे रतिं वहति दुर्ललिते मनो मे ।
यांचा च लाघवकरी स्ववधे च पापं प्राणाः
स्वयं व्रजत किं परिदेवितेन ॥

कोणी दरिद्र आपली दुःखस्थिति वर्णितोः--

"मजपाशीं पैसा नाहीं; इकडे पाहावें तर द्रव्यतृष्णा मला सोडीत नाहीं. माझें लाडकें मन दुसऱ्याची धनाशा पूर्ण करण्याविषयीं उत्सुक होतें; पण इकडे यांचा तर लघुत्व आणणारी आहे. बरें, या दोहेरी त्रासापासून आपणास मुक्त करून टाकीन म्हटलें तर आत्महत्येचें महापातक धरलें आहे. तेव्हां हे प्राणां-नो! तुम्ही आपोआपच मला सोडून ना कसे! व्यर्थ शोक करून फळ काय?"

( १४ ) कूपे पानमधोमुखं भवति मे नद्यो वराक्यः स्त्रियः
सारंगैर्बकटिट्टिभैः सह सरस्येवं समालोकयन्।
नादत्ते तृषितोऽपि हीनसलिलं क्रूरैर्वृतं जंतुभिर्मानादुन्नतकंधरः
सुरपतिं तच्चातको याचते ॥

चातकाच्या दिव्यजलपानावर उत्प्रेक्षाः--

"विहिरींचें पाणी पिण्यास अधोमुख व्हावें लागतें, नद्या तर काय बिचाऱ्या स्त्रियाच आहेत, सरोवर हें हंस बक आणि टिट्टिभ यांनीं परिपूर्ण असतें; तेव्हां क्रूर प्राण्यांनीं व्याप्त अशा कुजल संचयापासून जें उदक घ्यावयाचें तें तृषा समयींही घेण्याचें न पतकरून मानी जो चातक तो गर्वानें ऊर्ध्वकंठ होत्साता देवाधिदेव जो इंद्र त्यापाशीं काय ती याचना करतो."

( १५ ) भयारण्यं भीमं तनुगृहमिदं छिद्रबहुलं
बली कालश्चोरो नियतमसिता मोहरजनी।
गृहीत्वा ज्ञानासिं विरतिफलकं शीलकवचं
समाधानं कृत्वा स्थिरतरदृशो जागृत जनाः ॥

"हे जन हो! हें संसारारण्य भयंकर आहे, शरीररूप गृह सुरक्षित असेल ह्मणावें तर हें मुळींच बहुच्छिद्र आहे, मृत्युरूप चोर हा बलिष्ट आहे, मूढत्व-रूप रात्रिही केवळ अंधकार व्याप्त आहे; तर ज्ञान हाच खड्ग, शांति हीच ढाल, शील हेंच कवच अशीं तीन घेऊन मोठ्या खबरदारीनें जागत बसा!"

[ १६ ] दैवे समर्प्य चिरसंचितकर्म जालं
सुस्थाः सुखं वसत किं परयाचनाभिः।
मेरुं प्रदक्षिणयतोऽपि दिवाकरस्य
ते तस्य सप्त तुरगा न कदाचिदष्टौ ॥

"चिरसंचित जें कर्मजाल त्याचा दैवावर हवाला ठेवून स्वस्थपणें करून सुखानें राहा; परयाचना करून काय प्राप्त होणार आहे ? पहा कीं, येवढा सूर्य सुवर्णमेरूस प्रदक्षिणा घालीत असतां त्याचे जे सात घोडे आहेत ते आहेत; साताचे आठ कधीं तरी झाले आहेत काय ?"

---

**विनोद महदाख्यायिकाः——( राजाच्या हातचा भोपळा. )**

फ्रान्सचा राजा अकरावा लुई* हा लहान असतां त्याचा व एका माळ्याचा परिचय जडला होता. त्याच्या बागेंत उत्तम फळफळावळ होत असे, यास्तव वरील राजपुत्र वरचेवर तेथें जात असे. पुढें लुई हा राजपदारूढ झाला असतां त्या माळ्यानें एक मोठासा भोपळा पाहून तो राजाच्या भेटीला नेला. ती नजर पाहून राजा हसला, पण पूर्वीच्या आनंदाच्या दिवसांची आठवण होऊन त्यानें त्या माळ्यास हजार क्रौन द्यावयास सांगितले. ती गोष्ट दुसऱ्या दिवशीं माळ्याच्या गांवच्या इनामदारास कळली. तेव्हां त्यानें असा विचार केला कीं, एका भोपळ्यावर जर या माळगंडाला राजाकडून हजार क्रौन मिळाले, तर आपण एक उमदा घोडा राजास नजर करावा म्हणजे झालें आपलें काम ! असा विचार मनांत आणून त्याप्रमाणें त्यानें केलें. लुईनें त्या नजर आलेल्या घोड्याची फार तारीफ केली, व त्याविषयीं त्याच्या मालकास पुष्कळ विचारलें. तेणेंकरून तर तो फारच चढून त्यास वाटलें कीं, आपलें काम तर फत्ते झालें. इतक्यांत राजानें आपल्या सेवकाकडे वळून त्यास सांगितलें, "अरे जारे, तो परवांचा भोपळा घेऊन ये." मग तो आणतांच राजानें त्या इनामदाराच्या हातीं तो दिला, आणि म्हणाला, "हा भोपळा असा तसा नव्हे, याला हजार क्रौन पडले आहेत, तर तुमच्या घोड्याच्या ऐवजीं हा तुम्हास देतों !"

**जशास तसें.**

एक पोर एका भटाऱ्याच्या दुकानीं गेलें, आणि एका आण्याचा पाव दे म्हणून त्यानें भटाऱ्यास सांगितलें. भटाऱ्यानें एक लहानसा पाव उचलला आणि त्याच्या पदरांत टाकला. तो पाहून पोर म्हणतें, "अरे, केवढासा पाव

---

* हा राजा पराकाष्ठेचा धूर्त व कपटी होता. याच्या स्वभावाचें वर्णन स्कॉट्नें 'क्वेंटिन डर्वर्ड' या नांवाच्या कादंबरींत जें केलें आहे तें कांहीं अप्रतिम आहे !

दिलास हा; याहून मोठा देशील कीं नाहीं !" भटाऱ्यानें उत्तर केलें "अरे जा, तेवढाच पुरे, तुला नेण्याला ओझें तरी कशाला पाहिजे." पोरानें तें ऐकून घेऊन चाराच्या जागीं तीनच पैसे थाळ्यांत टाकले, आणि चालतें झालें. भटारी त्याच्या मागून ओरडतो, "अरे, तीनच पैसे टाकलेस चवथा कोठें आहे?" पोर दुरूनच उत्तर देतें, "अरे, तुला तरी मोजण्याची दगदग कशाला पाहिजे?"

## सवाई शिकंदर.

इंग्लंडांत बड्या मंडळींत जुगाराचा फार प्रचार आहे. एके समयीं एक गृहस्थ वरील खेळांत गुंतला असतां त्याचा मुलगा शेजारी उभा राहिला होता. कित्येक डाव होऊन गेले, पण त्या सर्वांत वरील गृहस्थ हरतच गेला. तें पाहून मुलगा रडूं लागला. बाप विचारतो, "बेटा रडतोस कां?" मुलगा उत्तर करतो, "बाबा, मी इतिहासांत वाचलें आहे कीं, फिलिप् राजा अनेक नगरें, प्रांत, व देश जेव्हां काबीज करीत चालला तेव्हां शिकंदरास रडूं आलें कीं, हाच सारी पृथ्वी जिंकतो आहे, मला कांहींच ठेवीत नाहीं; मला शिकंदराच्या उलट असें भय पडलें आहे कीं, तूंच सर्व पैसा हरून जाऊन माझ्या वांट्यास कांहींच ठेवीत नाहींस कीं काय कोण जाणें?"

## स्वातंत्र्याची आवड.

एक राजा आपल्या मुलखांतून हिंडत असतां एका मोठ्या शहरांत कांहीं दिवस मुक्काम करून राहिला होता. तेथें एक अशी चमत्कारिक गोष्ट त्यास कोणीं कळविली कीं, येथें एक गृहस्थ आहे तो आज सत्तर वर्षें या शहरांतून बाहेर पडला नाहीं, लहानपणापासून जसा येथें आहे तसा अद्याप आहे! ही हकीकत ऐकून राजास आचंबा वाटून त्या मनुष्यास बोलावणें धाडलें. तो आल्यावर त्यास विचारतां हकीकत खरी आहे असें ठरलें; तेव्हां त्याची गरीबी पाहून राजानें त्यास वर्षासन करून दिलें. पण वर्षासनाची अट ही कीं, शहराबाहेर पाऊल ठेवलें कीं वर्षासन बंद! त्या मनुष्यानें ती अट व वर्षासन पतकरलें. पण पुढें मौज काय व्हावयाला लागली कीं, सत्तर वर्षें जी गोष्ट त्याच्या कडून सहज होत होती तीच आतां वरील बंधनामुळें त्यास दुःसह होऊं लागली. शेवटीं सहा महिने वर्षासन भोगलें न भोगलें तों

शहराबाहेर गेल्यावांचून त्यास चैन पडेनासें होऊन तो एकदांचा बाहेर पडला; व त्यामुळें अर्थांतच पेनशन बुडालें!

### जुक्ती.

एका मनुष्याच्या मरणाविषयींची अवई उठून ती पुढें खोटी ठरली असें अनेक वेळां झालें. हा प्रकार पाहून एकजण म्हणतो, "अतःपर असली बातमी मी कधीं खरी मानणार नाहीं, विना तो मनुष्य आपल्या तोंडानें ती सांगेपर्यंत!"

---

### पत्रें.

**रा० रा निबंधमालाकर्ते यांसः—**

मालाकार, आपल्या मालेंत "मुक्तांची माला" ही गुंफून काढलीत, पण त्यांतील कांहीं मुक्तें आबडधोबड दिसल्यामुळें इतर मुक्तांच्या पंक्तीस बसण्यास योग्य नाहींत असें जाणून दुसरी एक "मुक्तामाला" मोठ्या प्रयासानें मिळवून तींतून हीं मुक्तें वेंचून काढून आपल्याकडे पाठविलीं आहेत, तर आपल्या रत्नपारख्या दृष्टीस पसंत वाटल्यास आपल्या मालेंत ओंवून काढाल अशी आशा करितों.

ह्या आर्या एकंदर ११५ आहेत आपण ११६ आहेत असें लिहिलें ती चूक आहे हें आपल्या लक्षांत आलें असेल; कारण ७७ वी आर्या आपल्याकडे मुळींच मिळत नाहीं.

आर्या–६ 'भगवान्' याचा अर्थ आपण 'परशुराम असा केला आहे; पण' आम्ही जी प्रत मिळविली आहे तींत 'भगवान्' या शब्दाखालीं 'विश्वामित्र' अशी टीप दिली आहे. यावरून रा० पाटणकर यांनीं सुचविलेल्या अर्थाचें दृढीकरण होतें.

आर्या १६–यांत 'बत' या शब्दाबद्दल 'तं' असा पाठ आहे व हा पाठ बरा दिसतो. कारण येणें करून '०रंब तं ब०' असा प्रास जुळतो व प्रास जुळत असला तरी ती संधि दवडूं नये असें पंतांचें बिरुदच आहे.

आर्या २४–यांत 'परोपकृतिषु' येथें कृतोपकातिषु असा पाठ आहे अर्थही सरळ होतोच.

आर्या २८–यांत 'विश्वासैः' या चुकीबद्दल 'निःश्वासैः वाचावें.

आर्या ३२–'अपि' शब्दाचे ठिकाणीं 'हि' असें आहे. पण आपलाच पाठ बरा.

आर्या ३५–'श्रिया स्वया' याबद्दल 'स्वया श्रिया' असा आमच्या पोथीप्रमाणें पाठ आपण रा० पाटणकर यांस सुचविलाच आहे.

आर्या ४२ 'मुनिभिः' याबद्दल 'वनिभिः' असें आहे. दोन्ही एकच.

आर्या ४५– 'हरिणा' या ठिकाणीं 'प्रभुणा' असें आहे, परंतु आपला पाठ प्रासाला वगैरे बरा जमतो–'जंबुकेनापि' याचेबद्दल 'वंचकेन केनापि' असा पाठ आहे तेव्हां छंदोभंगही होत नाहीं व सगळ्या शंका निवारण होतात.

आर्या ४८– 'भुक्तमेव' येथें 'भुक्तयेव' असाच पाठ आहे—'कथनमनघः' येथें 'कथमनघः' असें वाचावें.

आर्या ४९–'नूनं' याबद्दल 'दूरं' आहे.

आर्या ५२–'पत्रशाले' बद्दल 'पर्णशाले' आहे. पण आपलाच पाठ प्राससंगतीमुळें विशेष ग्राह्य.—'लब्धा' येथें 'लुब्धां' आहे अर्थ आपला पाहून घ्या.

आर्या ५६--आमच्या प्रतींत 'गुणलवजितोऽमृत द्युतिहरिणः' असेंच आहे.

आर्या ५७–'नोदीक्षितुं' बद्दल 'नो वीक्षितुं' एकूण एकत्त.

आर्या ५९–'सत्यंचलन्नोऽतरेऽपि' येथें 'सत्यं चेतोऽतरेऽपि' असें आहे अर्थ काय ?

आर्या ६७–'धर्मेण' येथें 'अधर्मेण' आहे,

आर्या ६९–'अमृतफलमदरं' बद्दल 'अमृतफलवदरं' आहे. चुकी नसेलना ?

आर्या ७१–'वासववैभवं' याबद्दल 'वासकगौरवं' आहेः—'अहोऽद्भुतं' बद्दल 'अदोऽद्भुतं' (=अदः अद्भुतं=हें अद्भुत) आहे.

आर्या ७९–'तरेत' बद्दल 'स्मरेत' आहे.

आर्या ८२–'अनुक्तोऽग्निः' बद्दल आनिलोऽग्निः आहे. पण छंदोभंग होतो म्हणून आपलाच पाठ ग्राह्य.

आर्या ८५–'नक्तंचरवरबलं' या ठिकाणीं 'नक्तंचरबलं,' आणि पुढें 'कपिसैन्य०' बद्दल 'कपिपतिसैन्य०' आहे. पण अर्थास जुळत नाहीं.

आर्या ८८– 'बद्धयो लंघ्यः' बद्दल 'बद्धोल्लंघ्य' आहे. अर्थ एकच.

आर्या ८९–‘ विषयरत्तः ’ याबद्दल ‘ विषयरक्तः ’ असें आहे. हा पाठ अर्थास व प्रासासही नमून आपल्या पाठाप्रमाणें छंदोभंगही होऊं देत नाहीं.

आर्या ९५ --‘ खगमाः ’ येथें टिपेंत ‘ क्षिप्ता ’ अथवा ‘ स्वमानिनी ’ असें लिहिलें आहे. अर्थ काय असेल तो असो—‘ सिंधो ’ येथें ‘ सिंधौ ’ असा पाठ घेऊन अर्थ जुळतो काय पहावें. आपण तर हा शब्दच सोडून दिला आहे.

आर्या ९९–‘ स्पृष्टः यापेक्षां ‘ स्पृष्टं ’ हाच पाठ अर्थास विशेष जुळतो.

आर्या १०६–‘ पेयवारी ’ बद्दल ‘ वासराणि ’ आहे पण आपलाच पाठ बरा दिसतो. कारण स्पष्ट आहे.

आर्या ११०–‘ पातुं ’ बद्दल ‘ कालं ’ आहे. मग आपण पाहून घ्यालच.

आर्या ११३–‘ स्वतांडवपंडितं ’ याबद्दल ‘ स्वं तांडवपंडितं ’ असा आमच्या प्रतीप्रमाणें पाठ घेऊन सध्यां छंदोभंगाच्या दोषांतून तर मुक्त व्हा. मग पुढें अर्थाचीच भानगड राहिली.

आर्या ११५—‘ विधेयं ’ याचा अर्थ टिपेंत ‘ कीर्तिकरं ’ असा दिला आहे. मग काय असेल तें असो.

शेवटचीं पद्यें आमच्या प्रतींत नाहींत.

याप्रमाणें मिळालेले पाठभेद आपणाकडे पाठविले आहेत. त्यांतून ग्राह्य कोणते, त्याज्य कोणते याविषयीं आपण स्वमत द्यालच कळावें लोभ असावा हे विनंती. *

मुंबई. ६ जानेवारी १८७८.

का० पां० प०.

* वरील पत्रावर कांहीं लिहावयास सांपडेल या बुद्धीनें तें आजपर्यंत ठेवलें होतें. पण एकंदरींत पहातां त्यावर अभिप्राय दिला किंवा न दिला तरी सारखाच आहे. जें आम्ही लिहूं तें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांच्याही सहज लक्षांत येणारच आहे. यास्तव वरील पत्रकाराचे श्रमाबद्दल अभार मानतों म्हणजे बस आहे.

नि० मा० क०.

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि०. आपल्या मालेच्या पंचेचाळिसाव्या अंकापासून "**मोरोपंताची** कविता" या विषयावर निबंध लिहिण्याचें आपण योजिलें आहे हें पाहून या महाराष्ट्र कविशिरोमणीच्या भक्तांस आनंद होणार आहे, या कवीच्या काव्यांत शब्द चमत्कार आणि अर्थ चमत्कार जितके आहेत तितके इतर महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांत बहुधां आढळणार नाहींत असें वाटतें. **पंतांचा** अर्थालंकारावर जसा भर दिसतो तसाच शब्दालंकारावरही दिसतो असें वाटतें. यांच्या काव्यांतील एकेक खुबी पाहून या कवीच्या अपूर्व कृतिविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. 'मंत्र रामायणाच्या' उपोद्घातांत

"केवळ उत्तरकांड, श्रीरघुपतिमंत्ररत्न मंजूषा"।

असें उत्तरकांडाविषयीं **पंतांनीं** विधान केलें आहे "श्रीरघुपतिमंत्ररत्न मंजुषा" या पदाचा अर्थ खरोखर खोल असावा असें दिसतें. असें ह्मणण्याचें कारण पुढच्या मजकुरावरून सहज कळेल. उत्तरकांडाच्या आरंभीं "रामरक्षे" तील दोन श्लोक पहिल्या सत्रा आर्यांमध्यें सन्निविष्ट केले आहेत असें दिसतें:—

"रामो दाशरथिःशूरो लक्ष्मणानुचरोबली"
"काकुस्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूतमः॥"
"वेदांतवेद्यो यज्ञेशः पुराण पुरुषोत्तमः।"
"जानकी वल्लभः श्रीमान् नप्रमेयो— "

तसेंच उत्तरकांड आर्या ३१-३३ यांतः-

"ओंनमो भगवते वासुदेवाय"।

हा मंत्र साधला आहे. पुढें आर्या ३४-५० यांतही एक मंत्र साधला आहे तो असाः—

"राम राम हरे राम हरे राम हरे हरे।"
"हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥"

या शिवाय १८-३० आर्यांत कोणते सूचक शब्द साधिले आहेत हें सदहू सर्व आर्या आपल्या उपयुक्त पत्रीं प्रसिद्ध होण्याकरितां पाठविल्या आहेत त्यांवरून समजेल. आमच्या एका मित्राचें असें म्हणणें आहे कीं, सर्व

" रामरक्षा " स्तोत्र मंत्र रामायणांत **पंतांनीं** गुंफिलें असावें. रामरक्षेचे अनेक पाठभेद आहेत म्हणून **पंतांच्या** रामरक्षेचा कोणता पाठ होता हें समजेपर्यंत आमच्या मित्राचा तर्क तसाच राहणार असें दिसतें. प्रसंगवशात पंतांचा पाठ उदयास आल्यास या गोष्टीचा निर्णय करण्यास बरेंच साधन होईल. हें पत्र व सदर्हू आर्या छापून प्रसिद्ध होण्याची कृपा व्हावी हे विनंती.

नागपूर सिटि स्कूल  
ता० २ दिसेंबर १८७८. — निबंधमाला हितेच्छु. वा० दा० ओ०

---

**मंत्ररामायण उत्तरकांड.**

रामप्रेक्षाकामें श्री म द ग स्त्या दि पुण्यकीर्ति मुनी ॥  
येती त्यांला पूजी राजा निज मस्तकीं पदें नमुनी ॥ १ ॥  
म्हणती त्व द्विध राजा पूर्वी आम्ही न देखिला कोणी ॥  
दारुण शत्रू निशाचर मथिला केली सुखाकरा क्षोणी ॥ २ ॥  
क्षाळायाला जन मळ भगीरथें आणिलीचि देव धुनी ॥  
चंद्रांशू परि कीर्ति वि निर्मिली त्वांही सुर रिपू वधुनी ॥ ३ ॥  
विमलगुणा तुज वांचुनि सूक्ष्मदृशांला न देखणा ठाव ॥  
अनुदिनिं तव चरणाब्जीं ह्मणउनि त्यांचा द्विरेफसा भाव ॥ ४॥  
हें ऐकुनि विनयज्ञ प्रभु वंदुनियां म्हणे अहो स्वामी ॥  
बहुमान कीर्ति शाली भवत्प्रसादें करुनियां आम्ही ॥ ५ ॥  
लंकेशनिशिचराधिप मेला तुमच्या तपः प्रभावानें ॥  
कारुण्या कुल हृत्स्थल मजला स्तवितां स्वपुत्र भावानें ॥ ६ ॥  
हा दशमुख अमरांचा रिपु दारुग जन्मला कसा दुष्ट ॥  
दोष निधीला याला वरदाता कोण जाहला तुष्ट ॥ ७ ॥  
हें पूर्व वृत्त मजला सांगा आकर्णनस्पृहा आहे ॥  
ऐसें पुसतां हर्षे अगस्त्य सांगे कथा तयालाहे ॥ ८ ॥  
चतुरास्य तनय रामा पुलस्त्यनामा अखंडित ज्ञान ॥  
देवाब्धि पावकौजास्तकैवल्येक्ष गेय विज्ञान ॥ ९ ॥  
संसार सिंधुचें जल केलें लंघूनि जेविं तृण बिंदु ॥  
त्यासत्तमासि मग दे कन्या राजर्षिनाथ तृण बिंदु ॥ १० ॥

त्याला झाला तनय ख्यातमुनि विश्रवागुणें हद्य ॥
वेदांतसारवेत्ता सर्व जना मानि मान्य सद्विद्य ॥ ११ ॥
तद्वनिता रघुराया सती भरद्वाज कन्यका झाली ॥
यक्षमनुजेश्वर सख शमघन वैश्रवणनाम स्तुतत्याली ॥ १२ ॥
त्या प्रति लंका नामक पुरातन स्थान अर्पिलें तातें ॥
द्रविण स्वामित्वासह पुष्पक विधिदे स्वभक्ति मंतातें ॥ १३ ॥
भवपुर काल श्रीगल गौरी गुरु भक्त कामना कर्त्ता ॥
झाला शूल विषोरग धर वित्तप मित्र काम संहर्त्ता ॥ १४ ॥
त्यावरि सुमाली राक्षस जाणुनि जनगीत कीर्ति विश्रवस ॥
कन्येसि म्हणे कैकसि सल्लक्षण विप्र हा भजोनिवस ॥ १५ ॥
गेली प्रदोष समयीं दैवानें विप्र सत्तमा जवळी ॥
अर्क श्रीस शिखीपरि सत्सेवा प्रीति मान्मुनी कवळी ॥ १६ ॥
अतिबल तनुज प्रथमचि झाला तीतें उमेशि गुह काय ॥
नील पयोधरसप्रभ शक्र तसा वीर तो महा काय ॥ १७ ॥
दुसराही तनयबलि कैकसिका प्रसवली विशालशिर ॥
तो लोक प्राणांतें तत्काळहरी करीचना उशिर ॥ १८ ॥
तिसरी कृतिम राशिच शूर्पणखी योग्य ठेविलें नाम ॥
जीचें सतृष्ण मानस मनुष्य मांसाशनी महोद्दाम ॥ १९ ॥
ध्रुव ज्यापरि विमल चरित मेधावी सुकृत पुंजसा चरम ॥
अविलंबित धर्मीरत सदभीष्ट अदोषवृत्ती गुण परम ॥ २० ॥
जो सुर जन पूजनरत सामग्री शांति भक्ति हे ज्याची ॥
वाहेन नंदनेच्छा करील वार्त्ता किमर्थ राज्याची ॥ २१ ॥
जो प्रथम तनय त्याला दशमुख हें विश्रवा करीनाम ॥
तो कुंभकर्ण बळिवर विग्रह कर्त्ता दुजा महोद्दाम ॥ २२ ॥
तिसरा जो आत्मज तो बिभीषणाख्यें करूनि गौरविला ॥
तो परम पुण्य कर्मी मातिमान् धीर प्रसिद्ध कीर्ति भला ॥ २३ ॥
जनक पदद्वय नमना समस्त यक्षेंद्र एकदां आला ॥
गुर्वाज्ञेला घेऊनि जाय महात्मा स्वकीय वासाला ॥ २४ ॥
त्यास विलोकुनि राक्षस कन्या चित्तीं अखर्व खेद धरी ॥
सापत्नभाव लक्ष्मी वैभव कामें सुतासि बोधकरी ॥ २५ ॥

मग विश्वसृद समर्चुनि तुष्टि कराया महाहट स्थितिनें ॥
अत्यंत तनुश्रम कृत्तपकरि दशकंठ भूतिच्या रतिनें ॥ २६ ॥
गोकर्णी ते सारे श्रीविधिला तोषवावया तपति ॥
केवळ निरशन होऊनि भुवनपतीतें स्वमानसीं जपती ॥ २७ ॥
दिक्शत समानिराकुल निर्वाह करूनि निश्चयें धीर ॥
कार्यज्ञ एक मस्तक तो यज्ञ यज होमी दशास्य तो वीर ॥ २८ ॥
वर्षे अयुत समर्थें धैर्याच्या पर्वतें अशीं नेलीं ॥
पंचाग्नि साधनस्थें आतपहिमवृष्टि तुच्छसी केली ॥ २९ ॥
दशम शिरीं बुज्ञ हवनीं समजुनि यां तच्चिकीर्षितासी तदा ॥
हरिनंदन विधि आग्रह वारूनि म्हणे स्वयोग्य माग पदा ॥ ३० ॥
ओजःसंपन्न प्रिय परमो दार त्वदीय बलराहो ॥
आकृति असो यथास्थित वर मागायासि सिद्ध वीराहो ॥ ३१ ॥
शुभ वचनें तो राक्षस अति कामितांचि बोलिल्या विधिला ॥
सांगसमर्चीं वन्यें तेव्हां अमरत्वदे म्हणे विधिला ॥ ३२ ॥
द्रुहिण म्हणे अमराच्या भावाला पात्र अन्य जन नाहीं ॥
सुखकर वर देतों घे वाचे वद होय योग्य जें कांहीं ॥ ३३ ॥
यक्षसुपर्ण भुजगसुर दितिदनुसुत राक्षसादि जे कांहीं ॥
यांपासुनि मरण नसो नरादिकीं भीति तो म्हणे नाहीं ॥ ३४ ॥
ऐसें ऐकुनि तो यज्ञ भव त्यासि म्हणदिलें प्रपौत्राला ॥
अन्यदुरा सदता घे समर्पिली कामरूपतात्राला ॥ ३५ ॥
मग जलरुह जन्मा तो बिभीषणाला म्हणे पुरे शांता ॥
पंचसहस्र समातप केलें सत्य व्रत स्थिता दांता ॥ ३६ ॥
सूर्यालोकननियमें केलें संपूर्ण हो नय प्राज्ञा ॥
मागवरातें सुमते वत्सा मी देतसे स्वयें आज्ञा ॥ ३७ ॥
विनवुनि चतुरास्यातें म्हणें असो हर्ष साधुच्या भजनीं ॥
दे ब्रह्मास्त्र अशिक्षित सुरेश्वरा हाची लाभ मुख्य जगीं ॥ ३८ ॥
त्याला म्हणे पितामह फार बरा काम हा तुझा साधो ।
राक्षस असोनि शुभमति यास्तव अमरत्वही दिलें साधो ॥ ३९ ॥
तदुपरि गेला श्रीविधी घटकर्णाला वरासी देयातें ॥
दुष्टासि वर समर्पण अनुचित म्हणती समर्त्य तों यातें ॥ ४० ॥

मगमुख विवरामध्यें घट कर्णाच्या सुरार्थ ते वाणी ॥
शीघ्रपितामह वाक्यें शिरे गुहे माजि चंचले वाणी ॥ ४१ ॥
घटकर्णाला कमलज माग म्हणे तें अभिष्ट जें सारें ॥
अयुताब्द काल दुःसह नियमबरें पाळिले निराहारें ॥ ४२ ॥
दशवदनानुज तेव्हां व्यामोहद भारती हतस्वांत ॥
सर्व सुरेशासि म्हणे निद्रादे जाहलों तपःश्रांत ॥ ४३ ॥
वर देउनि तो यजभव जातां संध्यापयोद समवर्ण ॥
सुरकृत वचना जाणुनि सोडी विश्वास उष्ण घटकर्ण ॥ ४४ ॥
मग मातामह राक्षस सुमालिनामा दशाननास म्हणे ॥
वर साधिले बरें तरि घे लंकास्थान शीघ्र वीरमणे ॥ ४५ ॥
तेव्हां प्रहस्त नामक दूतद्रविणा धिपाकडे प्रेषी ॥
प्राकृत पर स्व हरणीं सतृष्ण दिकूतुंड तो जगद्वेषी ॥ ४६ ॥
त्या घटकर्णाग्रजनिज दूतोक्तांचें करूनियां श्रवण ॥
विकृति न धरितां बोले सौभ्रात्रीं जो सतृष्णविश्रवण ॥ ४७ ॥
मी अग्रज तनय तसा तूं मज एका स्थळीं कृतस्नेह ॥
पवमान कृष्णवर्त्मा तसे वसों हे ये तुझेंचि हें गेह ॥ ४८ ॥
हें दूत मुखें निजमत कळवी अनुजासि हटप्रकृती ॥
त्या उत्तरेश्वराशीं इच्छी ना स्नेह निर्दयोपकृती ॥ ४९ ॥
तातास यक्षनायक एकांतीं हें समस्त आयकवी ॥
सस्नेह भूसुरेश्वर तें ऐकुनि सूनुला असें शिकवी ॥ ५० ॥

# निबंधमाला.

## अंक ५३.

### नवीं पुस्तकें.

जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी
कसें हो ह्मणावें तयालागिं वाणी ॥

वामन.

१. 'तुकाराम बावाचे अभंगांतील निवडक वेंचे,' 'अमोलिक वैद्यकचातुर्य' आणि 'शकावली' या तीन पुस्तकांविषयीं या खेपेस अभिप्राय देतों. पहिलीं दोन पुष्कळ दिवसांपूर्वीं आह्मांस पोंचलेलीं आहेत; तिसरें मात्र नुकतेंच पोंचलें.

२. **तुकाराम बावाचे अभंगांतील निवडक वेंचे**— हें अठ्ठावीस पानांचें लहानसें पुस्तक आहे. **तुकारामा**च्या साडेचार हजार अभंगांचा गाथा फार मोठा, त्याची किंमत ही फार, ह्मणून एक आणा किंमतीचें हें पुस्तक कोणीं रचून कवितेच्या भोक्त्यांस व भक्तिपर जनांस अर्पण केलें आहे. इंग्रेजी भाषेंत Beauties ( सुंदर स्थलें ) या नांवांचीं पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथकारांचीं व विशेषतः कवींचीं पुस्तकें आढळतात. नुसता **शेक्सपीयर** घेतला, तर त्याच्या काव्यकमलवनाचा मकरंद आजपर्यंत किती मधुकरांनीं काढून मधाच्या शिशा तयार करून दिल्या असतील ! असा मकरंदसंचय इकडे ही पुष्कळ होण्यासारखा आहे. आमच्या संस्कृत कवितेच्या अपार भांडारांत व महाराष्ट्र कवितेचा ही आजपर्यंत जितका संग्रह झाला व पुढें होत आहे त्यांत रसिकमधुव्रतानें भरारी मारली असतां दलांच्या सौंदर्यानें, रजांच्या सौरभानें, व मरंदाच्या माधुर्यानें तो किती गोंधळून जाणार आहे ! तर अशा प्रकारचीं पुस्तकें एतद्देशीय रसिकांकडून रसज्ञजनांस या काळीं अर्पण होणें फार योग्य होय. कांकीं, हल्लीं संस्कृताचा चोहोंकडे बराच प्रसार झाला आहे; व होत आहे; व महाराष्ट्र भाषेकडे ही लोकांचें लक्ष बरेंच लागत चाललें आहे. अशा प्रकारच्या ग्रंथांनीं लोकाभिरुचि वृद्धिंगत होण्यास मोठें साहाय्य होतें.

एक तर थोड्या किमतींत कवीच्या कवित्वाचें सार प्राप्त होतें; दुसरें, समग्र ग्रंथ वाचण्याचे श्रम वांचतात; आणि तिसरें असें कीं, असे निवडलेले भाग पाहिले असतां रसज्ञसंमत स्थलें कोणतीं तीं समजल्यानें वाचकांस काव्यांतील सारासारभाव कळूं लागतो. शिवाय बहुश्रुत वाचकास व लिहिणारास असला संग्रह भाषणसमयीं किती उपयोगी पडण्यासारखा असतो, व ग्रंथरचनेस तो किती शोभावह होय, तसेंच वाचलेल्या ग्रंथांची उपस्थिति चांगली राहण्यास त्याचा किती उपयोग आहे, हें ही सर्वांच्या सहज लक्षांत येणार आहे. तर याप्रमाणें अशा संक्षेपरूप ग्रंथांचा अनेक प्रकारचा उपयोग आहे.

आतां सदरील पुस्तकाविषयीं पाहिलें तर त्याच्या अत्यल्प किमतीच्या मानानें त्यांत बराच संग्रह आहे व वेंचे ही एकंदरींत बरे असून कांहीं चांगले चित्तवेधक ही आहेत; तरी वर सांगितलेल्या इंग्रेजी नमुन्याच्या धाटणीवर ह्मटलें ह्मणजे हा ग्रंथ फार निराळ्या तऱ्हेचा झाला पाहिजे. एक तर **तुकाराम**-बोवांच्या कवित्वाचें समग्र स्वरूप ह्मटलें ह्मणजे तें किती ही थोड्यांत आणलें तरी असल्या लहानशा पुस्तकांत त्याचा समावेश होण्याचा संभव नाहीं. शेकडों प्रकारचे उद्गार ज्याच्या प्रासादिक वाणीच्या द्वारें प्रगट झाले त्याच्या कवितेचा सारभूत अंश छोट्याशा पंचवीस पानांत येणें ह्मणजे सागरानें अत्यंत संकुचित होऊन मूषकांजलींत समाविष्ट होऊं पाहण्यासारखेंच होय! तर एक विस्ताराच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकावर आक्षेप येणारा आहे. दुसरा आक्षेप विषयवैचित्र्याच्या संबंधानें. हें वैचित्र्य प्रस्तुत कवींत पुढील प्रकारचें आढळणारें आहे. त्याच्या अभंगांचे विभाग भक्तिपर अभंग, बोधपर अभंग, मनोरंजनपर अभंग, इतिहासपर अभंग, असे करतां येतील. आणि या सर्व सदरांत जर निवडक वेच्यांचा संग्रह केला तर असें पुस्तक सर्वांस प्रिय होण्याजोगतें होईल. जे जुन्या पद्धतीचे निवळ भक्तिमार्गी आहेत त्यांस पहिलें सदर पसंत पडेल, आलीकडील समाजवाल्यांस व बुभुत्सु जनांस दुसरें मान्य होईल, रसिकांस व बहुश्रुत लोकांस तिसरें आवडेल, आणि इतिहासाच्या भोक्त्यांस व चरित्रपरांस चवथें प्रिय होईल. तुकारामाची वाणी विद्वान् अविद्वान्, भक्त अभक्त, लहान थोर, वगैरे सर्वांस मान्य असल्यामुळें वरील संग्रह जर मिळतो आहे तर चार आठ आण्यांकडे कोणी बघेल असें आह्मांस वाटत नाहीं.

अशा संग्रहांत विवक्षित स्थलीं टिपा ही दिलेल्या असाव्या. जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांतून हल्लीं प्रचारांतून गेलेले बरेच शब्द आढळतात; यास्तव

त्यांवर व समयविशेषीं इतर संबंधाच्या ही टिपा असणें जरूर आहे. त्याप्रमाणेंच आरंभीं कवीविषयीं कांहीं माहिती असल्यास ही चांगली. आमच्या देशाच्या दुर्दैवेंकरून हा भाग असल्या पुस्तकांच्या आरंभीं जोडण्यास प्रायः थोडेंच साधन सांपडेल; तरी जी माहिती असेल ती व ग्रंथांविषयीं कांहीं विवेचन हें असल्यास विद्यार्थ्यांस व बहुश्रुत जनांस पुढील वेच्यांची अधिक गोडी लागेल हें उघड आहे.

तर अशा प्रकारची स्वदेशसेवा करण्याचें जे कोणी रसिक व विद्वान् मनांत आणतील त्यांनीं वरील सूचनांकडे लक्ष पुरवावें अशी विनंति करून हा लेख पुरा करतों.

३. **अमोलिक वैद्यक चातुर्य**— हें पुस्तक रा० रा० बाळकृष्ण दिनकर वैद्य यांनीं रचलें आहे. हें कांहीं वर्षांपूर्वीं दक्षिणा प्रैज कमिटीकडे पाठविलें असून कमिटीकडून ग्रंथकारास बक्षीस मिळालें. पुढें रा० रा० पांडुरंग गोपाळ डाक्तर यांनीं तें छापवून प्रसिद्ध केलें. सदरील पुस्तक 'आयुर्वेदशोधक मंडळी'स अर्पण केलें असून मुंबईच्या दोन तीन प्रसिद्ध नेटिव डाक्तरांचे अभिप्राय यास जोडले आहेत.

सदरील ग्रंथकाराची जी आह्मांस कांहीं माहिती आहे तिजवरून वाचकांस कळवितों कीं, रा० वैद्य हे एतद्देशीय वैद्यकाशीं बरेच परिचित असून औषधक्रिया चालवीत असतात. नेटिव डाक्तरांच्या सहवासानें त्यांस इंग्रेजी वैद्यकाची ही कांहीं माहिती झाली आहे. शिवाय ग्रंथरचनेचा ही त्यांस अभ्यास असून सदरील ग्रंथाखेरीज आणखी एक दोन ग्रंथांबद्दल त्यांस वर सांगितलेल्या कमिटीकडून बक्षिसें मिळालीं आहेत. शिवाय सामान्यतः बहुश्रुतपणा ही यांच्या अंगीं बरा आहे. सदरील ग्रंथावरून ही वरील गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येणारच आहेत. याचा उद्देश त्याच्या नांवावरून स्पष्टच आहे, कीं प्रसंगविशेषीं वैद्यानें चमत्कारिक उपाय योजून रोग्यास रोगमुक्त कसकसें केलें तें यांत सांगितलें आहे. असें असतां प्रस्तुत पुस्तक केवळ वैद्यलोकांच्याच उपयोगीं पडावें ह्मणून केलें आहे असें नाहीं. ग्रंथकार प्रस्तावनेंत लिहितोः—

"आतां जर या पुस्तकाचा विषय असा आहे तर हें वैद्यलोकांच्याच उपयोगी आहे असें होईल. पण तसें नाहीं. ज्या ज्या वेळेस वैद्यानें हे दुर्घट प्रसंग युक्तीनें निभावले आहेत, त्या त्या वेळची ती ती युक्ति ज्यानें वैद्यशास्त्र

कालक्रम ' हें होय. इंग्रेजी भाषेंत अशीं पुस्तकें आहेत हें सांगायास नकोच. तीं सदरील ग्रंथापेक्षां फारच मोठीं असून त्यांत इंग्लंड देशांतल्याच काय, पण सगळ्या देशांतील गतगोष्टींचें टिपण असतें; शिवाय केवळ राज्यप्रकरणी हकीकतीच त्यांत नसून हरएक प्रकरणाविषयींची शकवार माहिती ही असते. याखेरीज प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सांगितलेल्या शिवापूरकर देशपांड्यांच्या रोजनिशीप्रमाणें* इंग्रेजींत **पेपीज्** व **एव्हिलिन्** या दोघांनीं लिहून ठेवलेल्या रोजनिशा सर्वप्रसिद्ध आहेत. हे दोघे ग्रंथकार सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं इंग्लंडांत होऊन गेले. यांच्या रोजनिशांत दुसरा चार्लस व दुसरा जेम्स यांच्या कारकीर्दींत घडलेल्या गोष्टींचें वर्णन आहे. यांचें महत्त्व किती आहे याविषयीं एक प्रमाण बस आहे कीं, **मेकॉलेनें** आपल्या सर्वमान्य इतिहासास वरील टिपणांचें पुष्कळ साह्य घेतलें आहे.

रोजनिशी असणें हें व्यक्तिमात्राच्या संबंधानें पाहतां जसें करमणुकीचें साधन असून फायदेशीर आहे, त्याप्रमाणेंच राष्ट्राच्या संबंधानें ही शकावली ही मनोरंजनावह व लाभदायक होईल हें उघडच आहे. अशा शकावली जर प्राचीन काळापासून अखंडित असत्या तर केवढी मौजेची गोष्ट होती ! पण हा प्रघात आमच्याकडे पहिल्यापासून नव्हताच यामुळें ह्मणा, अथवा कालगतीनें व राष्ट्रविप्लवांमुळें असले लेख उच्छिन्न झाल्यानें ह्मणा, जुन्या माहितीचें साधन हल्लींच्या काळाला फारकरून उरलेंच नाहीं. ही महाहानि लक्षांत आणून इत:पर आपण सावध असलें पाहिजे. यापुढील काळाची व पूर्वींचा जेवढा अजून आटोक्यांत येईल तेवढ्याची खबरदारी ठेवून तो मागल्याप्रमाणें नष्ट होऊं देतां कामास नये. तर याप्रमाणें वरील पद्धतीच्या पुस्तकांची हल्लीं आवश्यकता आहे हें उघड आहे.

आतां प्रस्तुत ' शकावली 'पासून वर सांगितलेलें कार्य कितपत होणार आहे याचा जर विचार केला, तर तींत अनेक न्यूनता असल्यामुळें तें हवें तसें होणार नाहीं हें उघडच आहे. एक तर सदरील पुस्तक लहान असल्यामुळें

* या रोजनिशींत पेशवाईत झालेल्या गोष्टींची चांगली तपशीलवार माहिती होती असें समजतें. वरील दोन्ही इंग्रेजी रोजनिशा तर इतिहासग्रंथच बनून राहिल्या आहेत. **एविलिन्च्या** ग्रंथाविषयीं असें लिहिलें आहे कीं, तो कांहीं सांकेतिक चिन्हांनीं लिहून ठेवला होता; व त्यामुळें तो शंभर दीडशें वर्षें तसाच लोळत पडला असून शेवटीं कोणीं मोठ्या मेहनतीनें तो उकलला आणि प्रसिद्ध केला !

त्यांत विषय फार थोडा आला आहे. सुमारें ८०० वर्षांची हकीकत शिळाछापाच्या अघळपघळ अक्षरांच्या पन्नास पृष्ठांत कशी येईल ? गेल्या पंचवीस सत्तावीस वर्षांत इतक्या गोष्टी घडल्या असतां त्यांची सारी माहिती काय ती वर सांगितल्यासारख्या अवघ्या दोन पानांत आली आहे. आतां ग्रंथकारास आपल्या तर्फेनें दोन सबबी सांगतां येतील हें खरें आहे. एक तर ही कीं, आठ आणे किंमतीच्या पुस्तकांत इतका मजकूर कसा आणायाला सांपडेल ? ही सबब खरी आहे; कां कीं, आमच्या देशांत पुस्तकांचा फार खप नसल्यामुळें व कोणत्या पुस्तकाचा किती खप होईल याचा ही सुमार करवत नसल्यामुळें, शिवाय ज्यांस पुस्तकें तयार करण्याचें सामर्थ्य व इच्छा त्यांस द्रव्याची अनुकूलता ही बहुधा तितपतच असल्यामुळें वरच्यासारखी अडचण उत्पन्न होते. पण ही अडचण उत्पन्न होते ह्मणून पुस्तक कसें असायाला पाहिजे हें सांगण्यास बाध नाहीं, व तें सांगितलें ही पाहिजे. दुसरी सबब ही कीं, ही 'शकावली' 'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडींची' असें मुखपृष्ठावरच वाचकांस कळविलें आहे; तेव्हां या दोन सदरांखेरीज माहिती सदरील पुस्तकांत अर्थात् यावयाचीच नाहीं. या सबबींत आह्मांस फारसें हांशील दिसत नाहीं. कांकीं, वरील 'घडामोडींत' जर महाराष्ट्र कवींचें जन्ममरण, जंगबहादुराचा मृत्यु, कृष्णाबाईचा पूर, उमाजीनाईकाचें बंड, कोंकणांतील वादळ, मृगनक्षत्राचा पाऊस, वगैरे अनेक गोष्टी खपल्या जातात, तर इतर लोकप्रसिद्ध गोष्टींचा ही त्यांत समावेश कां होऊं नये ? मुसलमान व पारशी यांचा दंगा, पुनर्विवाहाच्या शास्त्रार्थाबद्दल झालेला वाद, दयानंदजींचीं व्याख्यानें व गर्दभाचार्यांचा छबिना, साबरमतीचा विलक्षण पूर, गुडघेमोडीचा नवा आजार, ब्यांकेचा खटला, बायजाबाईचें लक्षभोजन व चोहोंकडे उदक सुटल्याच्या एकदम ग्वाल्हेरीस तारा, वगैरे गोष्टींचा उल्लेख ही वरच्यांच्या सारखाच येथें असता तर शोभला नसता असें नाहीं. पण या सर्वांपेक्षां आचंब्याची गोष्ट ही कीं, सन १८५७ साल आमच्या देशांतच काय पण साऱ्या जगभर ही येवढें दणाणलें असतां, व त्या सालच्या हकीकतींवर शतावधि ग्रंथ इंग्रेजी भाषेंत झाले असतां, 'शकावलीं'त पुढील दोन ओळी मात्र त्या सालाच्या वांट्यास आल्या आहेत:—

"१८५७ १७७९ (शके)—कोलापूरचे चिमासाहेब महाराज यांस बंडाचे संशयावरून कंपनी सरकारानें कराचीस नेऊन ठेविलें."

'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडी' अशी मर्यादा जरी 'श-

कावली 'कारानें आपणाकरतां रेखून घेतली असली तरी पहिल्या सदरांत दिल्लीस झालेली गडबड व दुसऱ्यांत ब्रह्मावर्त, झांशी, ग्वाल्हेर, नरगुंद या ठिकाणचे बंडावे हे येत नाहींत काय ? साऱ्या हिंदुस्थानांत येवढी धामधूम झाली असतां व अनेक राज्यांची उलथापालथ झाली असतां एका करवीराकडेच आमच्या ग्रंथकाराची नजर पोंचून ती तेथेंच कशी ठरून राहिली याचा आह्मांस चमत्कार वाटतो ! या चमत्काराची उपपत्ति पुढील उताऱ्यांवरून होणारी आहे असें आह्मांस वाटतें:—

" १८५० १७७२— पौष शुद्ध १२ रोजीं ( ता० २८ जानेवारी सन १८५१ ) बाजीराव रघुनाथ पेशवे ब्रह्मवर्तांत मरण पावले. त्यांचें वय सुमारें ७५ वर्षांचें होतें. त्यांचें पेनशिन ह्यांचे ' दत्तक चिरजिवां' कडे कंपनी सरकारानें चालविलें नाहीं.............. "

" १८७६ १७९८— मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडला. इंग्रेज सरकारानें जमिनीचा धारा रयतेस माफ केला नाहीं. लोकांचे हाल फार झाले. ' कांहीं ' लोक मेले. "

" १६२९ १५५१— या सालांत दक्षिणेंत दुष्काळ पडला. माणसें ' फार ' मेलीं.... .... .... — "

" १७९२ १७१४— .... .... ... महादजी शिंदे दिल्लीची नालकी घेऊन पुण्यांत आले. या सालांत पुणें प्रांतांत दुष्काळ पडला. पायलीची धारण झाली. माणसें ' फार ' मेलीं. "

या उताऱ्यांवरून 'शकावली 'च्या कर्त्याची लेखणी केवळ सर्व प्रसिद्ध वृत्तांतांचा उल्लेख कर्तव्य असतांही अडखळते हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच !

रा० सरंजामे यांनीं इंग्रेजी पुस्तकांचा नमुना पाहून मग जर या पुस्तकाच्या रचनेस ते लागते, तर वरील गोष्टी त्यांच्या सहज लक्षांत येऊन चुकल्या असत्या. राज्यांच्या घडामोडींची हकीकत जितकी महत्त्वाची तितकीच इतर लौकिक गोष्टींचीही होय. गेल्या जानेवारीच्या अंकांत महाराष्ट्राच्या इतिहासाच्या वास्तविक स्वरूपाविषयीं जें आह्मीं निरूपण केलें आहे त्यावरून अर्वाचीन इतिहासकारांचा हा महासिद्धांत वाचकांच्या बराच लक्षांत येईल. त्यास अनुसरून ह्मटलें ह्मणजे वरच्यासारख्या अनेक लौकिक वृत्तांतांचें टिपण सदहू पुस्तकांत असणें जरूर होतें. प्रस्तुत पुस्तक पाहतां प्रथमत: आह्मांस असें वाटलें कीं, त्याच्या कर्त्यास जुनी माहिती मिळवण्याची पुष्कळ दिवसांपासून

हौस असल्यामुळें व ती त्यानें पुष्कळ मिळवून ठेविली असल्यामुळें या ‘ शकावलींत ’ सुद्धां ती वरीच घातली असेल. पण पुस्तक सबंध वाचून पाहतां तसें फारच थोडें आढळलें. **ग्रांटडफचा** इतिहास, किंवहुना ‘ महाराष्ट्र देशाचें वर्णन,’ यावरून ही कोणी सहज आपल्या स्मरणार्थ जसें टिपण करून ठेवावें त्यासारखेंच सरासरी हें पुस्तक आहे. या भागांत पुस्तककारानें निराळी माहिती दिलेली ह्मटली ह्मणजे कायती येवढीच आहे कीं, पेशव्यांच्या बायकांचीं नांवें बहुतेक सगळ्यांचीं दिलीं आहेत, सगळ्या सालांचे शक दिले आहेत, कोठें प्रसंगविशेषीं महिना, तिथि व कचित् वार ही दाखल केलेला आहे, आणि टिपांत वगैरे कोठें कोठें कांहीं नवा मजकूर सांपडेल. मराठ्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वीच्या भागांत बरीच नवीन माहिती दिलेली आहे; पण हा ही भाग पुष्कळ मागल्या काळचा असल्यामुळें त्याविषयीं कोणास विशेष जिज्ञासा होईल असें वाटत नाहीं.

एकंदरींत पाहतां ज्यास हिंदुस्थानच्या इतिहासाची विशेष माहिती नसेल त्यास प्रस्तुत पुस्तकापासून थोडक्यांत बरीच माहिती होईल, व ज्यास तो अगोदर अवगत असेल त्यास यांत कांहीं नवी माहिती मिळेल. तरी ग्रंथकाराच्या बहुश्रुतत्वाप्रमाणें व शोधाप्रमाणें हें काम उठलें नाहीं असें आह्मांस वाटतें. सदरील पुस्तकास ‘ शकावलीचें ’ रूप दिल्यानें हा घोटाळा झाला आहे. तो असा कीं, ग्रंथकारापाशीं जी नवी माहिती होती ती ‘ शकावलींत ’ खुद्द सामील करतां न आल्यामुळें टिपांच्या दाखल व परिशिष्टांच्या दाखल ती पुस्तकास जोडावी लागली. शिवाय ‘ शकावली ’ या रूपानें पाहतां ही हा ग्रंथ पूर्ण झाला नाहीं. एक तर इंग्रेज लोकांची शंभर सवाशें वर्षें या देशांत येवढी उलाढाल चालली असतां व शेवटीं त्यांस सार्वभौम अधिकार प्राप्त झाला असतां त्यांचा येवढा महत्त्वाचा भाग या ‘ शकावलींतून ’ अजीच वेगळा झाला आहे; शिवाय ‘राज्यांच्या घडामोडी ’ शीं ज्यांचा मुळींच संबंध नाहीं अशा गोष्टी तींत येऊन त्या ही सगळ्या आल्या नाहींत. ‘ हें पुस्तक गतगोष्टींचें पंचांग आहे असें ह्मटल्यास चालेल ’ असें ग्रंथकर्त्यानेंच प्रस्तावनेंत ह्मटलें आहे; पण हें पंचांग असें चमत्कारिक आहे कीं, ‘ तिथिवारं च नक्षत्रं योगं करणमेव च ’ हें लक्षण यावर पूर्ण लागू पडत नाहीं. कोठें नक्षत्र आहे तर योग नाहीं, योग आहे तर वार नाहीं, अशी याची त्रुटित अवस्था आहे. ‘मुसलमानी व मराठी राज्यांच्या घडामोडी ’ त जंगबहादुराचा मृत्यु येतो तर लॉर्ड मेयो साहेबांचा कां

येऊं नये ? कृष्णानदीचा पूर येतो, तर पर्वतीचें तळें एका रात्रींत भरून वाहिलें व पाण्याचा दुष्काळ पडणार होता तो ऐन अखेरीस सुकाळ झाला ही गोष्ट कां येऊं नये ? उमाजी नायकाचें बंड येतें तर तिमिंगिलाचार्यांनीं सोनारांस द्विजत्व देऊं केल्यानें त्यांचीच चांदी होण्याचा समय आला होता व त्यांस 'ब्रह्मपुरीं'तून पलायन करावें लागलें ही गोष्ट, किंवा नुकताच सुलतान महमदाचें अल्लोपनिषत् उपदेशण्यास जो महापंडित पुण्यास आला होता त्यावर हजारों मूर्तिपूजकांनीं कर्दमास्त्राचा प्रयोग करून 'आठ महिन्यांचा उन्हाळा व चार महिन्यांचा पावसाळा' या न्यायानें दोन महिन्यांची सद्धर्मोन्नति एका चार घटकेंत पार चेपून टाकली, हीही गोष्ट कां येऊं नये ? असो; तर 'शकावली' हें रूप पुस्तकास दिल्यानें ही दुहेरी अडचण आलेली आहे. यास्तव आमची प्रस्तुत ग्रंथकर्त्यास अशी सूचना आहे कीं, त्यानें 'शकावली'चा नाद मुळींच सोडून द्यावा. एक शक सांपडतो आणि एक सांपडत नाहीं अशी शकावली काय कामाची ? चार शब्द सांपडतात आणि चार सांपडत नाहींत असा कोश जसा निरूपयोगी, किंवा हिंग मिळतो आणि जिरें मिळत नाहीं असें वाण्याचें दुकान जसें कुचकामाचें, त्याप्रमाणेंच वरच्यासारखें पुस्तक हीं होय. तर रा० सरंजामे हे जर 'लोकहितवादीं'चें अनुकरण करून 'ऐतिहासिक गोष्टी' किंवा 'जुनी माहिती' असें कांहीं नांव देऊन ग्रंथरचना करतील, व इंग्रेजी इतिहासांतून न आढळणाऱ्या गोष्टींचें ज्ञान आपल्या देशबंधूंस करून देण्याची तजवीज करतील, तर त्यांच्या श्रमांचें खरें चीज होणार आहे. इंग्रेजी भाषेंत अशा माहितींचीं स्वतंत्र पुस्तकें रचलेलीं असतात. हल्लींचे प्रख्यात प्रधान **डिझ्राएली** यांचा बाप मोठा शोधक असून त्यानें Curiosities of literature ( ग्रंथकारांविषयींच्या ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी ) अशा प्रकारचे दोन तीन मोठे सर्वमान्य ग्रंथ केले आहेत हें आमच्या कांहीं वाचकांस माहीत असेलच. यांत जुन्या इतिहासाच्या संबंधाची जी माहिती मोठा शोध करून वरील ग्रंथकर्त्यानें जमा केली आहे ती केवढ्या योग्यतेची आहे याची प्रचीती एका गोष्टीवरून येणार आहे कीं, **सर वॉल्टर स्कॉटच्या** कित्येक मनोरम कादंबऱ्या वरील आधारावर रचल्या गेल्या आहेत! तर प्रस्तुत ग्रंथकारानें अशा तऱ्हेचा जर उद्योग केला, तर 'शकावली'चा बहुतेक भाग सर्वांस माहीत असणाऱ्या किंवा सहज सांपडणाऱ्या गोष्टींनींच जो

भरला आहे, तें नाहींसें होऊन सर्वांनीं संग्रह करून ठेवण्यासारखें पुस्तक तयार होईल अशी आह्मांस उमेद आहे.

९. याप्रमाणें वरील तिन्ही ग्रंथांचें परीक्षण झालें. ‘ तुकारामबोवांच्या अभंगांतील वेंचे ’ ‘ अमोलिक वैद्यक चातुर्य ’ व ‘ शकावली ’ अशीं परस्परांहून अत्यंत विसदृश पुस्तकें अभिप्रायास एकदम घेतलीं हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण हे तिन्ही ग्रंथ एके रीतीनें पाहतां एकाच स्वरूपाचे आहेत. तें स्वरूप हें कीं, हे बहुश्रुतत्वाचे वर्धक होत. असले ग्रंथ कोणत्या ही देशांत पुष्कळ असणें हें इष्ट होय; त्यांतून जेथें विद्येचा प्रसार नुकताच होऊं लागला आहे तेथें तर ते अल्प मूल्यानें प्रसिद्ध होणें हें अत्यंत आवश्यकच होय. इंग्लंड देश हल्लीं सुधारणेंत अग्रगण्य आहे व मोठमोठे विद्वान् तेथें सहस्रावधि असून सामान्य लोकांत ही विद्येचा प्रचार पुष्कळ झालेला आहे, तथापि तेथें ही सर्व शास्त्रांतील प्रमेयांचीं लहान लहान पुस्तकें, मोठमोठ्या इतिहासांचे संक्षेप, कवींच्या व गद्यकारांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे, मनोरंजक चुटके, नकला, चमत्कारिक माहिती, शहरांचीं वर्णनें, ह्मणी, नानाविषयांवर कोश, वगैरे शेकडों तऱ्हेचीं पुस्तकें तेथें हरहंमेश छापलीं जातात व खपतात. उघडच आहे कीं, कोणत्या ही देशांत पाहिले तरी विद्येच्या परम पदवीला पोचलेले लोक एकंदरींत फारच थोडे असतात; कां कीं, तितका व्यासंग, तितकी बुद्धि, तितक्या सोई या थोड्यांसच असणें संभवतें. बाकी एकंदर जनसमूह पाहिला तर एक तर बुद्धीच्या मानानें कमी व शिवाय संसारकृत्यांत सदोदित रावलेला; तेव्हां अशा एकंदर लोकांच्या शिक्षणार्थ व रंजनार्थ ह्मटलें ह्मणजे वरच्यासारखींच पुस्तकें पाहिजेत. या पुस्तकांत पुढील गुण असले पाहिजेत. एक थोडी किंमत; दुसरें, थोडा विस्तार; तिसरें, सुबोधपणा—ह्मणजे ज्यास त्या विषयाची पूर्वींची माहिती थोडी किंबहुना मुळींच नाहीं त्याच्याही लक्षांत त्यांतील निरूपण भरावें अशा तऱ्हेची त्यांची रचना असावी. आमच्या भाषेंत आजपर्यंत पाहतां वरील प्रकारचे ग्रंथ कांहीं झाले आहेत; तरी ते एकंदरींत पाहतां व्हावे तसे चांगले झाले नाहींत हें एक, आणि शिवाय त्यांची विशेष योग्यता कोणी न मानल्यामुळें त्यांचा प्रचार ही ह्मणण्यासारखा झाला नाहीं. ज्यांस इंग्रेजीच्या नमुन्यावरून ग्रंथरचनेची माहिती होण्याचा संभव, व ज्यांच्यावर एकंदर देशाची फार दिवसांपासून भिस्त, त्यांच्या हातून आपल्या

देशबांधवांच्या हितार्थ वरील उद्योग व्हावयाला पाहिजे होता. पण तो न होण्यास अनेक कारणें झालीं. एक देशभाषेविषयीं अप्रीति, व तिजमुळें अर्थात् तिच्या व्यासंगाचा अभाव; आणि दुसरें हें कीं, कोणास कधीं काळीं तसली प्रेरणा झालीच तर ग्रंथ जो रचावयाचा तो वाचकांकडे नजर पुरवून करायाचा नाहीं, तर आपल्याकडे पाहून आपणांसाठीं करायाचा. ह्मणजे आपले अल्पज्ञ जे देशबंधु त्यांस तो कितपत समजेल किंवा रूचेल याविषयीं तादृश विचार नाहीं, तर आपल्या विद्वत्तेला साजण्यासारख्या बड्या विषयावर बड्या तऱ्हेनें तो झाला पाहिजे! असो; गेली गोष्ट ती गेलीच; पण इतःपर पुढें तरी आमच्या नवीन मंडळीनें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याविषयीं जपावें. **मिल्टन्नें** व्याकरणाचा पूर्वभाग जो शब्दविचार त्यावर ग्रंथ लिहिला, **कालिदासानें** उत्तर भागांतील विषयावर ‘ श्रुतबोध ’ रचिला, **शंकराचार्यांनीं** ‘ चर्पटपंजरी ’ सारखे चुटपुटते लहानसान ग्रंथ केले, **मोरोपंतानें** जात्यावर ह्मणण्याकरितां ‘ ओवीरामायण ’ रचलें, परवांचे **बाळगंगाधर शास्त्री** यांनीं ‘ बालव्याकरण ’ मुलांकरतां तयार केलें, इत्यादि उदाहरणांवरून पाहतां बराच बोध घेण्यासारखा आहे. थीबन् लोकांचा प्रख्यात सेनापति इपामिनाँडस् याची त्याच्या देशबंधूंनीं जेव्हां रस्ते झाडणाऱ्या लोकांवर एके प्रसंगीं नेमणूक केली, तेव्हां ती त्यानें संतोषानें पतकरून ह्मटलें कीं, ‘ या कामानें जर मला थोरवी येण्यासारखी नाहीं तर माझ्या योगानें याला प्रतिष्ठा आणण्याकरितां मी झटेन,’ अशाच दुसऱ्या एका प्रसंगीं त्यानें ह्मटलें कीं, ‘ मोठें काम हातीं घेऊन तें वाईट रीतीनें बजावण्यापेक्षां हलकेंच घेऊन तें चांगल्या रीतीनें बजावणें यांत भूषण आहे.’ तर आमच्या देशांतील विद्वज्जनांनीं याचप्रमाणें देशहिताचा उद्योग केला असतां फार उपयोग होणार आहे. प्रस्तुतच्या काळांत वर सांगितल्यासारखे ग्रंथ हलके मानले जाणार नाहींत इतकेंच नव्हे, तर त्यांचीच अतिशयित आवश्यकता आहे. लहान मुलांस जशीं पंच पक्वान्नें कांहीं कामाचीं नाहींत तर बोंडल्यांतलें दूधच त्यांस पाहिजे, त्याप्रमाणें नुकती अक्षर ओळख होऊन विद्यांगणाचा नुकता उंबरठा उतरून जे पलीकडे गेले त्यांच्या करतां अर्थानें सुलभ ह्मणजे समजण्यास सोपीं व थोड्या पैशानें मिळणारीं अशींच पुस्तकें झालीं पाहिजेत. तर असलें खाद्य तयार करण्याकडे ग्रंथकारांनीं व देशहितेच्छूंनीं चांगलें लक्ष पुरवावें हें त्यांस उचित होय.

**विनोद, महदाख्यायिका**——(**अजब चष्मा**)—इंग्लंडांत सर्वांस हवा खाण्याकरतां केलेले येथल्यासारखे सार्वजनिक बाग आहेत. अशा ठिकाणीं एकदां असें झालें कीं, एका बाईची गाडी बागेच्या दाराशीं येऊन थडकली. तेव्हां ती बाई, तिच्या बरोबरचीं माणसें, आणि एक कुलुंगें कुत्रें, अशीं आंत जाऊं लागलीं. रखवालदारानें कुत्र्यास आंत नेण्याची मनाई केली, आणि सांगितलें कीं, कुत्रें आंत नेण्याचा हुकूम नाहीं. बाईनें लागलींच खिशांतून दोन शिलिंग काढले, आणि त्याच्या हातावर ठेवून ह्मणाली, "भल्या माणसा, नीट पहासील तर खरें, हें कुत्रें आहे कां मांजर आहे तें." रखवालदाराची मूठ दावली गेल्यानें तो लागलीच वाटेवर येऊन बाईस ह्मणतो, "बाईसाहेब, माफ करा, माझी नजरचूक झाली. आपण दिलेल्या चष्म्यांतून पाहतां आतां मला साफ दिसतें कीं, तुह्मी बरोबर आणलेलें कुत्रें नव्हे, मांजरच आहे!"

## फुकटया.

इंग्लंडांतील एका उमरावाच्या घरीं चार पांच दिवस मेजवानीचा थाट चालला असतां एक जण आमंत्रणचिठ्ठीची पंचाईत न करतां खुशाल चार दिवस मेजवान्या झोडून आला. परत आल्यावर त्याच्या स्नेह्यांनीं त्यास विचारिलें, "हा लाग तुझा कसा रे साधला?" फुकऱ्यानें उत्तर केलें, "तसेंच संधान पाहून मी आंत गेलों. यजमानांची व यजमानीण बाईंची नुकतीच कुरबुर झाली आहे; तेव्हां मला पक्कें माहित, कीं, दोघांस ही वाटणार आहे कीं, दुसरीकडून हें बोलावणें झालें आहे!"

## जगाची रीत.

चवदावा लुई ह्मणून एक मोठा विख्यात फ्रेंच राजा होऊन गेला. त्याचें एक मार्मिक वचन असें आहे कीं, "जेव्हां मी एकादी जागा कोणास देतों, तेव्हां शंभर असंतोषी होतात आणि एक माजोरी होतो." ह्मणजे ज्यांस चुरमुरे खात जागच्या जागीं बसावें लागतें ते कुरकुरूं लागतात, आणि ज्या एकाची नेमणूक करावी त्यास वाटतें कीं, माझी तशीच योग्यता आहे ह्मणून मला जागा दिली, यांत मेहेरबानी ती कसची!

## अन्योन्याश्रय.

बर्मिंगूहम ह्मणून एक इंग्लंडांत मोठ्यांपैकीं शहर आहे. तथील रहिवाशी एक गृहस्थ परस्थलीं गेला असतां वरील शहराची निंदा करून मंडळीं-

त असें सांगूं लागला कीं, "बर्मिंगहम् शहरचे लोक सारे लबाड हो; मी तेथला खरा, पण वरील गोष्ट मी तुह्मांस निक्षून सांगतों कीं असले खोटें बोलणारे लोक साऱ्या दुनियेंत मिळायाचे नाहींत!" तें ऐकून एकजण त्यास ह्मणतो, "बाबा, असें जर आहे तर असें ह्मणायाला पाहिजे कीं, हें जर तूं खरें सांगत असशील तर तूं लबाड बोलतो आहेस, आणि खोटें सांगत असशील तर खरें बोलतो आहेस!!"

## आचरट.

दोघे भाऊ शेतकामावर गुंतले असतां एकजण जेवण तयार करण्याकरतां लवकर घरीं गेला. नंतर कांहीं वेळानें त्यानें आपल्या भावास तेथूनच जेवणाची आरोळी दिली. ती ऐकून दुसरा शेतांतून उत्तर करतो, "आलों रे आलों, येवढी कुदळ कोठें तरी दडवून ठेवतों, कीं, आलोंच." नंतर त्याप्रमाणें करून तो घरीं गेला. घरीं येतांच भावानें त्यास रागें भरून सांगितलें कीं, "अरे मूर्खा, आपल्याला एकादी वस्त लपवून ठेवायाची असली तर कोणीं ओरडून सांगतो काय? सांगायाचेंच झालें तर हळू सांगावें, कां मोठ्यानें आरोळी द्यावी? सगळ्यांनीं ऐकिलें ह्मणजे कोणी ती चोरून नाहीं का नेणार?" हा उपदेश या अडाणी भावानें मुकाट्यानें ऐकून घेतला. नंतर जेवण झाल्यावर तो पुनः शेतावर गेला; पण ठेवलेल्या जागीं पाहतो तों कुद्दळ नाहीं. राहते आहे कशाला? मागील पुकारा ऐकून कोणी तितक्यांत तिजवर ताव मारला. तेव्हां कुदळीचा धनी मुकाट्यानें आपल्या भावाकडे गेला आणि कानगोष्ट करूं लागला;—— ह्मणतो, "दादा, कुदळ कोणीं चोरून नेली!!"

## डोळे उघडणें.

एका श्रीमंत कुणब्यानें आपल्या तर्फे वकील होण्याविषयीं एका वकिलास विचारिलें. त्यानें सांगितलें; "मी दुसऱ्या पक्षकाराचें वकिलपत्र घेतलें आहे, तेव्हां तुमचें मला घेतां येत नाहीं; तुमची मर्जी असल्यास मी आपल्या एका स्नेह्याला तुमच्या हातीं पत्र देतों." तें कुणब्यानें कबूल करतांच त्यानें एक पत्र खरडलें आणि त्याच्या स्वाधीन केलें. त्यानें तें घरीं नेलें, आणि सहज काय लिहिलें आहे ह्मणून उघडून पाहिलें, तों पुढील मजकूर सांपडला:— "या दोघां लठ्ठ मेंढ्यांची झुंझ लागली आहे, तर ही बरी शिकार आहे. तुह्मी एकाला धरा आणि मी एकाला पकडतों, आणि दोघांवर कात्रीचा प्रयोग क-

रून दोघांस ही लख्ख करून सोडूं. ह्मणजे दोघांचा आपोआप वाद मिटेल." हा मजकूर वाचतांच त्या कुणब्याचे लखकन् डोळे उघडून त्यानें आपल्या दावेदाराशीं समेट केलें, आणि वकिलद्वयास चुरमुरे खात बसविलें.

## रहस्याचें रक्षण.

एकानें आपल्या मित्राजवळ आपली गुप्त गोष्ट सांगितली, आणि त्यास बजाविलें कीं, ही तूं कोणाला सांगूं नको हो! पुढें कांहीं दिवसांनीं वरील मनुष्यास असें उमगलें कीं, आपल्या मित्रानें रहस्यभेद केला. त्यानें ही आपल्या एका मित्रापाशींच ती सांगितली. तेव्हां हा गृहस्थ आपल्या मित्रावर रागें भरून त्यास ह्मणतो, "काय पाजी आहेस रे तूं, अरे, नाहीं सांगणार ह्मणून मजपाशीं कबूल करून ही तूं ही गोष्ट फोडलीस?" त्यास त्याचा स्नेही उत्तर करतो, 'अरे, तूं येवढा संतापला कां आहेस? मी गोष्ट फोडली हें खरें; पण तुला हें कळत नाहीं काय, कीं एकाद्या अमोलिक वस्तूचें रक्षण करायाचें असल्यास एकाच्या जागीं तीन रक्षक झाले तर चांगलें कां वाईट!"

## बादशाहाचें चातुर्य.

एका व्यापाऱ्यानें बादशाहाकडे अशी फिर्याद केली कीं मी वाटेनें एका खाणावळींत* उतरलों असतां तिच्या मालकानें माझी पिशवी चोरून ठेविली. या कृत्यास कोणी साक्षीदार आहे कीं काय ह्मणून विचारतां कोणी नाहीं ह्मणून व्यापाऱ्यानें सांगितलें. तेव्हां बादशाहानें त्या पिशवीच्या खुणाखाणा विचारल्या, त्या सर्व व्यापाऱ्यानें सांगितल्या. नंतर त्या व्यापाऱ्यास पलीकडच्या खोलींत जावयास सांगून बादशाहानें मनांत आणिलें कीं, आतां त्या खाणावळवाल्यास बोलावणें पाठवावें. पण इतक्यांत काय झालें कीं, त्याच संधीला तो मनुष्य व त्या गांवचे दुसरे कांहीं संभावित लोक असे मिळून कांहीं कामानिमित्त दरबारांत आले. याप्रमाणें जी गोष्ट करायाची होती ती आयतीच घडली असतां बादशाहानें त्या मनुष्यास जवळ बोलावून जसें काय सहज मौजेनें त्यास ह्मटलें, "वा:! ही तुमची टोपी तर मोठी नामी आहे. ती इकडे आणा पाहूं. ही आमची तुह्मी आपल्याला घ्या." खाणावळवाल्यास वरील पूर्वी झालेला प्रकार काय माहीत? त्यास वाटलें कीं, स्वारी आज भारी खुषींत आली आहे!

ग

* या देशांत जशा वाटेनें उतरण्यास धर्मशाळा बांधून ठेवलेल्या असतात, त्याप्रमाणें युरोपांत खाणावळीच असतात. तेथें वाटसरांची सर्व प्रकारची बरदास्त ठेवली जाते.

असें वाटून त्यानें मोठ्या आनंदानें आपली टोपी काढून बादशाहाच्या हवालीं केली. नंतर अंमळशानें खासा स्वारी अंतर्गृहांत गेली. तेथून लागलाच एक चांगला विश्वासुक व वजनदार मनुष्य बादशाहानें वरील खाणावळवाल्याच्या घरीं पाठविला. त्यानें बरोबर आणलेली टोपी वरील गृहस्थाच्या बायकोस दाखवून तीस सांगितलें कीं, तुमच्या नवऱ्यानें या घटकेस घरांतली रुपयांची पिशवी मागितली आहे, तर ती तावडतोब माझ्या हवालीं करा. बायकोनें त्याप्रमाणें वरील पिशवी बिनदिक्कत त्या मनुष्याच्या स्वाधीन केली. त्यानें ती आणून बादशाहापाशीं हजर करतांच बादशाहानें ती फिर्यादीस दाखविली. त्याच्या ती दृष्टीस पडतांच त्यास मोठा आनंद झाला, आणि हीच ती असें त्यानें खात्रीनें सांगितलें. मग खाणावळवाल्यास आंत बोलावून आणिलें; तो येतांच बादशाहा त्यास ह्मणतो, "या मनुष्याचा तुमच्यावर असा आरोप आहे कीं, याची पैशाची पिशवी तुह्मी दगाबाजीनें आपणाजवळ ठेविली आहे; तर यावर तुमचें काय ह्मणणें आहे?" हा आरोप ऐकतांच त्यानें धीटपणानें उत्तर दिलें, "हा मनुष्य लबाड असावा, किंवा वेडा असला पाहिजे; याजपाशीं आजपर्यंत माझा कधीं ही कांहीं व्यवहार झालेला नाहीं." हें ऐकून बादशाहानें वादाचें कारण जी पिशवी ती आणायास सांगितली. ती दृष्टीस पडतांच खाणावळीच्या मालकाचें तोंड खरकन् उतरलें, आणि तू–तू पु–पु करून त्यानें आपला गुन्हा कबूल केला. बादशाहानें लागलीच ती पिशवी तिच्या धन्याच्या स्वाधीन केली; आणि खाणावळवाल्यास त्याच्या गुन्ह्याबद्दल पुष्कळ दंड केला. ही वार्ता चोहोंकडे पसरतांच साऱ्या जर्मनी देशभर बादशाहाच्या चातुर्याची तारीफ झाली.

## चित्रकाव्य.

चित्रकाव्य ह्मणजे काय हें वाचकांस माहीत झालेंच असेल. ज्यांत दोन दोन चार चार अर्थ संगृहीत केलेले असतात किंवा वर्णांची चमत्कारिक रचना ज्यांत केलेली असते त्यांस वरील संज्ञा आहे. काव्यरसाचे खरे भोक्ते जे असतात ते वरील प्रकारास तादृश मान देत नाहींत हेंही वाचकांस अनेक प्रसंगीं कळविलेंच आहे. एकेचाळिसाव्या अंकांत वरील सदराखालींच एका फ्रेंच पंडिताची आख्यायिका दिली आहे ती वाचकांस स्मरतच असेल. तशीच एक आख्यायिका रघुपत्याचार्य ह्मणून एका कर्णाटकाख्य पंडिताविषयीं ही ऐकण्यांत आली आहे. कोणी शिष्यानें 'चैतन्यं

सुमनं मनं मनमनं ' किंवा ' या माता ममता माया ' अशा विचित्र तऱ्हेचा श्लोक वरील आचार्यांकडे नेला, आणि अर्थ ऐकण्याची इच्छा प्रगट केली, ह्मणजे आचार्य बोवांनीं दुसरें कांहीं करूं नये,— मुकाट्यानें कागदाच्या चिंध्या कराव्या आणि अर्थश्रवणेच्छूच्या डोक्यावर ठेवाव्या ? त्यानें असें कां ह्मणून विचारलें ह्मणजे त्यांनीं सांगावें, " अरे, आतां आपण तिघे शाहाणे झालों; असला श्लोक सबंध असता ह्मणजे तो रचणारा मूर्ख, तूं तो विचारणारा मूर्ख, आणि मी सांगणारा मूर्ख, अशा तिघांवर मूर्खत्व येत होतें. आतां तिघेही वरील कोटींतून मुक्त झालों ! "

## नवी ओळख.

एक अट्टल चोर मोठा नकल्या असे. तो एकदा किल्ल्यावर आपल्या एका स्नेह्याला भेटायास गेला. ती वेळ कैद्यांच्या जेवणाची होती; यास्तव अंमळ बाहेर फिरत असतां, त्यानें असें पाहिलें कीं कोणा उमरावाच्या जेवणाची गडबड सुरू आहे. ती गडबड अशी चालली होती कीं, रुप्याचीं ताटें, पेले, चमचे वगैरे पात्रें, तशाच दारूच्या बाटल्या, ही सर्व सामग्री वर एका खोलीकडे जात होती. तें पाहतांच स्वारी त्यांजबरोबर खुशाल निघाली, आणि उमरावाच्या बरोबर जेवायाला जी मंडळी जमली होती त्यांत या स्वारीनेंही आपलें घोडें ढकललें. मग सर्वांबरोबर यथास्थित चम्मा मारल्यावर व गप्पा झोंकल्यावर वरील उमरावानें आपल्या एका स्नेह्यास हळूच पुसलें, " तो मनुष्य कोण हो, कोणाबरोबर आज हा नवाच आला आहे ? मी मघांपासून पाहतों आहें, पण याची ओळख तर येथल्यांपैकीं कोणाची दिसत नाहीं. " चोरसाहेबांनीं वरील कुजबुज ऐकली, व तींतील मतलब त्यांस सहज समजण्यासारखाच होता. मग लागलीच ड्यूक साहेबांकडे वळून ह्मणतात, " काय महाराज, आपण मला ओळखलें नाहीं वाटतें. " ड्यूक ह्मणाला, " नाहीं. " चोर पुनः ह्मणतो, " असें कसें होईल, आपली व माझी तर जोडी आहे, आपण दोघे मिळून इंग्लंडांतले सारे तुरुंग पाहिले आहेत. " ड्यूक ह्मणतो, " छे, मी साऱ्या जन्मांत याखेरीज दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नव्हतों. " चोर हसून उत्तर करतो, " तें खरें महाराज, पण बाकी सगळ्यांतून मी हिंडून आलों आहें. " हें समयोचित भाषण ऐकून त्या ड्यूकास व साऱ्या मंडळीस हसतां हसतां पुरेसें झालें.

## धोरण.

एका गृहस्थानें एका हपशाला रस्त्यानें भीक मागतांना पाहिला. हा गृहस्थ स्वत: चांगला खाऊन पिऊन सुखी होता, यास्तव त्याच्या मनांत आलें कीं या भिकाऱ्यास विचारून पाहावें, व याच्या हातून कांहीं कामगिरी होण्यासारखी असली तर यास आपल्यापाशीं ठेवावा. याप्रमाणें मनांत आणून त्यानें त्यास आपला हेतु कळवितांच तो मोठ्या खुषीनें काय पाहिजे तें काम करण्यास कबूल झाला. या गोष्टीस कांहीं दिवस होऊन गेले. एके दिवशीं या नव्या चाकरानें आपल्या धन्यास विचारिलें, "धनी साहेब, आपणांस मी कधीं कांहीं काम करतांना पाहत नाहीं हें कसें?" धन्यानें उत्तर केलें, "अरे, मी हातांनीं काम करीत नाहीं खरा, पण माझें डोकें काम करीत असतें." पुढें कांहींका दिवसांनीं धन्याच्या लक्षांत आलें कीं, आपला नवा शिद्दी चाकर पराकाष्ठेचा आयदी झाला. कांहीं काम करीत नाहीं. तें पाहून त्यानें एक दिवस असा विचार केला कीं, याच्याविषयींची परस्पर कांहीं तजवीज केली पाहिजे. मग त्यानें त्यास जवळ बोलावून त्याच्या हातीं एक चिठ्ठी दिली, आणि त्यास सांगितलें कीं, ही आमच्या कारखानदारास नेऊन दे. शिद्दी चाकर हा सुशिक्षित जरी नव्हता, तरी जात्या मोठा गुलाम होता. त्यानें जाणलें कीं, कारखानदाराकडे आजच चिठ्ठी जाण्याचें काम काय आहे? तेव्हां कांहीं तरी काळें बेरें असलें पाहिजे. असा विचार करून त्यानें ती चिठ्ठी आपल्या एका सोबत्याच्या हातीं तिकडे पाठविली. सोबत्याचें परस्पर तिकडे चांगलें कांडात निघालें. दुसऱ्या दिवशीं धन्यास कळलें कीं आपल्या चाकरानें आपला मार चुकवून तो भलत्यावरच घालविला. तेव्हां त्यानें त्यास विचारिलें, "अरे, हें काय केलेंस रे?" हबशी उत्तर करतो, "धनीसाहेब, डोकें काम करतें."

## अंधपंगुन्याय.

इंग्लंडांत एक अमीर होता तो पक्का दारूबाज होता. मद्यसेवनाची परमावधि ह्मणजे साहावी बाटली रिचविणें ही मानली आहे. तर या सहाव्या यत्तेपर्यंत अध्ययन केलेले वरील बडे गृहस्थ होते. यांच्याशीं कादंबरीसख्यानें जडलेला असा एक फार खालच्या पायरीचा मनुष्य होता. यांचा परस्पर येवढा दृढ स्नेह होण्याची उपपत्ति लोक अशी करीत कीं, अंधपंगुन्यायानें हे

परस्परांस अत्यंत अगत्याचे झाले आहेत. वरील उमरावाचें काय असे, कीं दोन तीन बाटल्या झोकल्या कीं त्याचें बोलणें बंद होई, पण हातपाय शाबूत रहात; आणि या स्नेह्यावर बाटलबाईचा असा अंमल चाले कीं, ती त्याचे हातपाय लुले करून टाकी, पण घसा कायम ठेवी. तेव्हां येथपर्यंत मजल येऊन ठेपली ह्मणजे अमीरसाहेबांनीं घांट वाजवावी, आणि सेवक येऊन हजर झाला ह्मणजे त्यांच्या स्नेह्यानें 'और बाटली लाव' ह्मणून हुकुम फर्मावावा.

## कडीवर कडी.

एक पाटील मोठे गप्पीदास होते. त्यांच्या घरीं एके दिवशीं एक दूरचा पाहुणा आला. संध्याकाळीं शिळोप्याच्या वेळीं दोघे ओटीवर बसले असतां गोष्टी निघाल्या. पाटील ह्मणाला, "दादा, यंदा जो जो का पाऊस पडला तो कांहीं अपरंपार, आणि आमच्या वाडग्यांत असे भोपळे लागले कीं त्यांची गणतीच नाहीं, आणि एकेक भोपळा कसलाला ह्मणतां— एकेकाच्या खेंवेंत ही पुरता माऊं नये !" पाहुण्यास पाटीलबोवांची लकब पुरी माहीत होती. त्यानें पाहिलें कीं, यांशीं सरळ बोलून उपयोगी नाहीं, यांजवर आडवाटेनेंच छापा घातला पाहिजे. मग तो ह्मणतो, "पाटील, मी ही आपल्या गांवीं एक अजब चीज पाहिली. एक दिवस सहज एका तांबटाच्या दुकानावरून जात होतों, आणि काय सांगूं दादा, कसला सपाटा हांडा तो तयार करवीत होता ! चोवीस जण त्याजवर काम करीत होते, आणि ते एकमेकांपासून इतके दूर दूर होते कीं, एकाचा ठोका कांहीं दुसऱ्याला ऐकूं जात नव्हता." पाटील ह्मणतो, "अबब ! येवढा अगडबंब हांडा ! पण येवढा कोण कशाकरितां करवीत असेल बरें ?" पाहुणा उत्तर करतो, "दुसऱ्या कशाकरतां ? तुमचे भोपळे शिजत टाकण्याकरतां !"

## स्त्रियांची कल्पना.

जेथें पुरुषाची गति कुंठित होते तेथें सुद्धां कधीं कधीं स्त्रिया कल्पना काढतात.* एक शस्त्रवैद्य आपल्या कर्मांत मोठा निपुण होता. एके दिवशीं

* स्त्रियांच्या स्वाभाविक कल्पकतेविषयीं दोन विख्यात संस्कृत नाटकांत येणेंप्रमाणें वचनें आहेतः—

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीणा संदृश्यते किमुत याः परिबोधवत्यः ।
प्रागन्तरिक्षगमनात् स्वमपत्यजातमन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयंति ॥
शाकुंतल ५.

एक मजूर त्याच्याकडे आला, आणि मोठी काकळूत करून ह्मणूं लागला, " डाक्टर साहेब, माझ्या डोळ्यांत लोखंडाचा लहानसा धलपा उडाला आहे, व डोळ्यास भारी इजा होत आहे, तर मेहेरबानी करून तो काढून मला दुःखांतून सोडवा." सर्जन साहेबांनीं लागलीच आपली पेटी उघडून बारीक सळया काढल्या, व तो धलपा काढण्याचा इलाज करूं लागले, पण कांहीं उपाय चालेना. शेवटीं हातटेकीला येऊन घरांत गेले, आणि बायकोला सांगूं लागले, " काय करावें, तो मनुष्य तर पराकाष्ठेचा पीडला आहे, आणि माझें तर कांहीं चालत नाहीं. जों जों इलाज करूं जावें तों तों त्याला ज्यास्त इजा मात्र होते." बायकोनें लागलीच सांगितलें, "अहो लोहचुंबक घ्या, ह्मणजे आपोआप तेव्हांच धलपा बाहेर पडेल." ही युक्ति येवढी सोपी व उत्कृष्ट असतां शस्त्रवैद्यास सुचली नव्हती. तिच्या योगानें त्या मजुराचें त्यानें तेव्हांच दुःख दूर केलें.

## खुबीचें विचारणें.

एका राजाची एका सोंगाड्यावर वहाल मर्जी झाली होती. एके दिवशीं तो राजाच्या मेजवानीच्या वेळेस भेटीला आला. तेथें अनेकपात्रें पक्वान्नांनीं भरलेलीं होतीं, त्यांपैकीं एका जिलब्यांच्या ताटावर त्याची दृष्टि गेली. तें पाहून राजास वाटलें कीं, यास हें पक्वान्न फार आवडतें वाटतें, ह्मणून त्यानें तें ताट त्यास देण्याविषयीं हुकूम केला. तो ऐकून सोंगाड्या ह्मणतो, " महाराज, जिलब्यांसकट ताट देतां ?" राजानें त्याच्या विचारण्याचा रोंख समजून सुप्रसन्नतेनें ह्मटलें, " हो, हो, जिलब्यांसकट !" ताट ह्मणजे अस्सल चांदी होती.

---

**भाषापरिज्ञान**----- ' झक मारणें '-- हे शब्द सहृदयांनीं ग्राम्यसे भासतात. ह्मणजे आमच्या भाषेंत अंमळ ठांसून बोलायाचें असल्यास तें जसें

---

(मागील पृष्ठावरून)

स्त्रियो हि नाम खल्वेता निसर्गादेव पंडिताः ।
पुरुषाणां तु पांडित्यं शास्त्रैरेवोपदिश्यते ॥

मृच्छकटिक.

उपस्थविषयक कांहीं निर्देश केल्याखेरीज बहुतकरून होत नसतें,* त्याप्रमाणेंच हा ही कांहीं प्रकार असावा असें वाटतें. पण तसें बिलकुल नाहीं. 'झक' हा हिंदुस्थानी शब्द असून याचा अर्थ 'मासा' असा आहे. संस्कृतांतील 'झष' शब्दाचा हा अपभ्रंश असावा. तेव्हां 'झक मारणें' ह्मणजे 'मासे मारणें.' एरवीं जसें ह्मणतात, "तो काय तुला सांगतो, तो केळीं खातो," त्याप्रमाणेंच या ह्मणीचा ही प्रयोग करतात.

'मूळपदावर येणें'—— हा प्रयोग हरदासांच्या कीर्तनावरून भाषेंत रूढ झाला आहे. हरदासांची अशी वहिवाट आहे कीं, आरंभीं अभंग किंवा पद ह्मणायाचें व त्यावर जो उपदेश करायाचा तो करतां करतां मधें मधें त्या अभंगावर किंवा पदावर यावयाचें; तसेंच अभंगाच्या चरणांचा व पदाच्या कडव्यांचा ही अर्थ विशद करून शेवटीं कथाभाग आटपल्यावर ही पुन: आरंभींच्या वचनावर आणून सोडायाचें. ही या शब्दांची मूळपीठिका असतां सध्यां त्यांचा प्रयोग 'ये रे माझ्या मागल्या' किंवा 'पालथ्या घागरीवर पाणी' या ह्मणींसारखा होतो. मूर्खास उपदेश कर कर करून कांहीं वाटेवर आणला असतां तो पुन: बिथरला, किंवा रोग्याचा चांगला बंदोबस्त करून व पथ्य पाण्याची नीट तजवीज करून त्यास गुण पडत चालला असतां त्याच्या अविचारामुळें किंवा माणसांच्या सुस्तीमुळें रोगानें पुन: उलट खाल्ली, अशासारख्या प्रसंगीं वरील भाषणप्रकार येतो.

'पंचाईत'—— पूर्वींच्या राज्यांतील अशी वहिवाट होती कीं गांवांत कांहीं तंटे उपस्थित झाले असतां त्यांचा निकाल तेथल्याच चार शिष्टांच्या संमतीनें करायाचा. हे निर्णायक प्राय: पांच असत ह्मणून त्यांच्या कचेरीस वरील नांव पडलें. तेव्हां प्रस्तुत शब्दाचा मूळ अर्थ 'पांचांची सभा' असा होय. पुढें सभेपासून तिच्या कार्यावर प्रस्तुत शब्दाचा अर्थ रूढ झाला. आणि त्यापुढें

---

* **मोलस्वर्थ**च्या कोशांत 'गांड' या शब्दाखालीं जी एक टीप दिली आहे तींत महाराष्ट्र भाषेंत आढळणाऱ्या वरील प्रकाराविषयीं यथार्थ उल्लेख केला आहे:——

"Note. Phrases in use— in use with the vulgar and the *polished*, with the illiterate and the learned, with males and females, with the man of hoary head and the yet lisping child, and in ordinary, familiar, accepted, and most approved use— amount to hundreds. They are heard in the market and on the road, in the field and in the house, in the discussion of matters of sober business and in angry altercations or fightings... ... ... ..."

'अडचण,' 'दुःसाध्यत्व' येवढ्याच अर्थीं त्याचा प्रयोग होऊं लागला. 'तूं आपला उगाच बसेनास, तुला त्यांची कोणी पंचाईत सांगितली आहे?' 'तुला काय त्याची पंचाईत!,' 'त्यांस सध्यां खाण्याची पंचाईत आली आहे,' 'तो त्या वेळेस मोठया पंचाइतींत पडला' या उदाहरणांवरून स्पष्टच आहे कीं हल्लीं शेवटल्या दोन अर्थींच वरील शब्दाचा प्रयोग होतो.

'खटाटोप'— हा शब्द 'फटाटोप' यावरून महाराष्ट्र भाषेंत आला असावा असें दिसतें. 'फटाटोप' ह्मणजे फटेचा (फडेचा) आटोप ह्मणजे आविर्भाव. संस्कृतांत एक श्लोक आहे—

निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फटा।
विषं भवतु मा वास्तु फटाटोपो भयंकरः॥

"सर्प निर्विष असला तरी त्यानें मोठी फणा बाहेर काढावी. कां कीं, विष असो नसो, तुसत्या मोठया फणेनेंच पाहणारा वचकतो" तेव्हां प्रस्तुत शब्दाचा मूळ रूपाचा अर्थ 'फडेचा डौल' येवढाच आहे. चालू भाषेंतील अर्थ बराच निराळा झाला आहे. जसें 'यज्ञाचा खटाटोप,' 'लग्नसमारंभाचा खटाटोप' इत्यादि.

'मात्रागमनी'— हा शब्द 'मातृगमन' यावरून निघाला आहे. याच अर्थाचा हिंदुस्थानी शब्द 'मादरचोद' याचा ही अर्थ स्पष्टच आहे. पण चमत्कार असा आहे कीं, या दोन्ही शब्दांतील अर्थ येवढा भयंकर असतां मराठींत त्याचा मागमूस ही उरला नाहीं. वरील शब्दांचा अर्थ 'हुशार,' 'चलख,' 'धूर्त' येवढाच काय तो चालू भाषेंत आहे. जसें 'असला पोऱ्या मात्रागमनी आहे; काय सांगूं!' 'कोल्हा हें जनावर मोठें मात्रागमनी असतें,' 'ती मात्रागमनी पोर अशी सुध्या रीतीनें कोठली ऐकायाला,' 'महा मादरचोद तो, तो आह्मांला बधतो कीं, काय.' वरील प्रयोगांवरून हें ही लक्षांत येईल कीं, वरील शब्द प्रशंसापर व विनोदात्मक होत. असेच दुसरे ही कित्येक शब्द आहेत; जसें, 'चोर,' 'रामोशी,' 'बेरड,' 'बिलंदर' इत्यादि.

'भांडकुदळ'— या शब्दाची व्युत्पत्ति चमत्कारिक दिसते. 'भांडखोर' या शब्दावरून वरील शब्द साधला असावा असें वाटतें. 'भांडखोर' हें रूप महाराष्ट्र भाषेंतील धातु आणि फारसी प्रत्यय 'खोर' यांचा संयोग हो-

ऊन झालेलें आहे. पण हें न समजतां पुरुषास ' भांडखोर ' आणि बायकोस ' भांडकुदळ ' अशीं रूपें प्रचारांत आलीं असावीं असें दिसतें.

' कार्तिकस्वामीच्या भिडेचा '— वरील विशेषण ज्या ब्राह्मणास वेदपठनादि संस्कार कधींही घडला नाहीं, जो केवळ नांवाचा मात्र ब्राह्मण, त्यास लावतात. ही ह्मण प्रचारांत येण्याचें कारण असें आहे कीं, जो कोणी कार्तिक स्वामीचें एकदां दर्शन घेईल तो सात जन्म ब्राह्मण होईल असें पुराणवचन आहे; तेव्हां वरच्या प्रतीचा ब्राह्मण हा केवळ वरील देवाच्या शिफारशीनें ब्राह्मणत्व पावला आहे असा बोलण्याचा भावार्थ.

' किंतू '— या शब्दाचा मराठींत ' विकल्प ' या अर्थीं प्रयोग होतो. जसें, ' त्याच्या मनांत मजविषयीं किंतू आलासा दिसतो, तेव्हां त्यानें माझ्या हवालीं रुपये केले नाहींत.' संस्कृतांत या शब्दाचें रूप ' किंतु ' आहे; 'किं' आणि ' तु. ' आक्षेप काढायाचा असल्यास वरील अव्ययाचा प्रयोग करतात. तेव्हां मराठींत हें अव्यय नामरूप होऊन त्याचा अर्थही वरच्यासारखा झाला आहे.

' विकल्प '— या शब्दाचा संस्कृतांतील अर्थ ' विभाषा ' हा होय. मराठींत ही वरील अर्थीं प्रकृत शब्दाचा प्रयोग करतात. जसें, "' तरवार', ' बखर ' वगैरे शब्दांचीं अनेकवचनें विकल्पेंकरून ' तरवारी, ' ' तरवारा' 'बखरी', ' बखरा ' यांप्रमाणें होतात." पण व्यवहारांत या शब्दाचा प्रयोग वरील शब्दाप्रमाणेंच होतो.

' चकारशब्द '— हा वस्तुत: द्विरुक्तीचा प्रकार आहे. ' चकार ' ह्मणजे ' च ' हें अक्षर. ' कार ' प्रत्ययाचा प्रयोग असाच होत असतो.' जसें ' अकार,' 'ककार, ' 'पकार' इत्यादि. ' अहंकार ' ह्मणजे ' अहं' हा शब्द, ' श्रीकार ' ह्मणजे ' श्री ' हें मंगलात्मक पद, ' हुंकार ' ह्मणजे ' हुं , असा उच्चार.* तेव्हां ' त्यानें माझ्या बोलण्यावर चकारशब्द सुद्धां काढला नाहीं ' याच्या जागीं त्यानें '........चकार सुद्धां काढिला नाहीं ' असेंवस्तुत: पाहिजे.

' हत्ती '— या शब्दावरून अपभ्रंश कसे चमत्कारिक होतात व भाषें-

* वरील प्रत्ययाचीं दुसरीं ही कांहीं चमत्कारिक उदाहरणें आहेत:— स्वाहाकार(यज्ञ), स्वधाकार ( श्राद्ध ),, देकार ( दानधर्म ), इत्यादि. 'मृच्छकटिक' नाटकांतील 'शकारां'ची ही आमच्या कित्येक वाचकांस माहिती असेलच. हे राजश्यालक येवढे विद्वान् होते कीं, ' वसंतसेने'च्या जागीं ' वशंतशेने ' ह्मणत. ह्मणून कवीनें त्यांस वरील नांव दिलें.

तील शब्दसंग्रह कसा वाढत जातो हें चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. मूळ नक्षत्रवाचक शब्द ' हस्त ' आहे. ' अश्विनी, ' ' मृग ' हीं नांवें जशीं आकृतिसादृश्यावरून पडलीं आहेत त्याप्रमाणेंच ' हस्त ' हें नांव ही हाताच्या आकृतीवरून वरील नक्षत्रास मिळालें आहे. पण अशी मूळ स्थिति असतां मराठींत प्रयोग पहा कसे दृष्टीस पडतात !—' हत्ती गर्जायाला लागला, ' ' कोसळेल हत्ती तर पाडील भिंती.' हा चमत्कार होण्यास दोन तीन कारणें झालीं आहेत. एक तर अगोदर ' हस्त ' आणि ' हस्ती ' ( हत्ती ) हें वर्णसादृश्य. दुसरी गोष्ट ही कीं, मघें वीज जी बंदींत पडली असते ती वरील नक्षत्र लागतांच पुनः गर्जायाला जाते. तेव्हां गर्जनाची कल्पना साहजिक रीतीनें ' हत्ती ' वर बसतेच. तिसरें असें कीं, हत्तीच्या दणक्याप्रमाणेंच वरील नक्षत्राची गर्दी असते. हत्ती मोकळा सुटून जर बोकळला तर गंडस्थलाच्या धडकांनीं जसें कांहीं राहूं देणार नाहीं व सारा विध्वंस करून टाकील, त्याप्रमाणेंच हस्ताच्या अमलांत ही धडाधड घरें पडताहेत, वाऱ्याच्या सपाट्यानें मोठमोठे वृक्ष उपळताहेत, विजांचा कडकडाट चाललाच आहे, मुसळासारखे धोधाटे चालून चोहोंकडे जळबंब होऊन गेलें आहे, हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडतो. याखेरीज ही ही एक कल्पना लोकांच्या मनांत बिंबलेली आहेच, कीं मेघांचा स्वामी जो इंद्र त्याचे हत्ती समुद्राचें पाणी सोंडेनें शोषून घेऊन चोहोंकडे त्याची वृष्टि करतात !

---

**अर्थसादृश्य—**

( १ )सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्रबिंबाननाः ।
उन्मत्तः सच राजपुत्रानिवहस्ते बंदिनस्ताः कथाः
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः* ॥

**भर्तृहरि.**

* वरील श्लोकाचें भाषांतर पूर्वी ' वैराग्यशतकां 'त आलेंच आहे. तें असें:—
"गेला तो नृप ते प्रधान अवघे जे पंडितांची सभा
गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा ।
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्व जें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे ॥"

The boast of heraldry, the pomp of power,
And all that beauty, all that wealth e'er gave
Await alike th' inevitable hour:—
The paths of glory lead but to the grave."

*Gray.*

( २ ) गाहंतां महिषा निपानसलिलं शृंगैर्मुहुस्ताडितं
छायाबद्धकदंबकं मृगकुलं रोमंथमभ्यस्यतु ।
विश्रब्धैः क्रियतां वराहपतिभिर्मुस्ताक्षतिः पल्वले
विश्राम लभतामिदं च शिथिलज्याबंधमस्मद्धनुः* ॥

'शाकुंतल.'

" Lay thy bow of pearl apart
And thy crystal-shining quiver;
Give unto the flying hart
Space to breathe, how short so-ever:
Thou that mak'st a day of night,
Goddess excellently bright!"

*Ben Jonson's Hymn to Cynthia.*

( ३ ) अंजलिरकारि लोकैर्म्लानिमनाप्यैव रंजिता जगती ।
संध्याया इव वसतिः स्वल्पापि सखे सुखायैव† ॥

" It is not growing like a tree
In bulk, doth make Man better be;
Or standing long an oak, three hundred year,
To fall a log at last, bald, dry and sere:

---

*" शिगांनीं वारंवार हलविलेल्या डबक्यांतील पाण्यांत महिष हे बुडी मारून स्वस्थ बसोत; वृक्षच्छायेंत पडून राहिलेले हरणांचे कळप रंवथ करोत; रेंदाळांत उगवलेलें गवत वराह स्वस्थपणें खाऊन कमी करोत; आणि ज्याची दोरी सईल करून ठेविली आहे असें हें धनुष्य ही विश्रांति घेवो !"

† "संध्यासमयाची स्थिति जरी अल्पकाल असते, तरी लोकांनीं हात जोडले आहेत, स्वतःचें तेज मलिन न होऊन त्यानें सारी पृथ्वी रंजित झालेली आहे अशा रीतीनें त्याचा लय होतो; तर याप्रमाणें थोरांची स्वल्पकालिक वसती ही सुखप्रद होते !" संध्याकाळचा अर्घ्यदाननिमित्तक अंजलिप्रकार व दिग्रंजनप्रकार हे सर्वप्रसिद्धच आहेत !

A lily of a day
Is fairer far in may,
Although it fall and die that night—
It was the plant and flower of Light.
In small proportions we just beauties see;
And in short measures life may perfect be."

*Ben Jonson.*

---

**साहित्य—( स्वभावोक्ति )—** एकाद्या व्यापाराचें जेथें हुबेहूब वर्णन केलेलें असतें तेथें वरील अलंकार होतो. जसें:—

पृथु नितंब नितंबिनिचा वरी कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ।
कनककंकणवृंद हि वाजती मुखिं सुखश्रमबिंदु विराजती ॥१॥
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती गळति गुंफिलिया शिरिं मालती ।
घुसळितां कुचकुंभ हि हालती अमृत ज्यांतिल घे कमलापती ॥२॥

**वामन.**

खलबलजलनिधिमग्ना धेनु उसळल्या अलावु जाल्या हो ।
हांसुनि विजय मनिं ह्मणे कां गोपसख्या मला बुजाल्या हो ॥ ३ ॥
गेल्या पळोनि गाई पृष्ठावरि पुच्छभार वाहोनी ।
राहूनि निश्चल क्षण विजय निवे त्यांकडेचि पाहोनी ॥ ४ ॥

**मोरोपंत.**

भवचरणकन्यका निरखितां मला आपगा
ह्मणे अगइ ऐकिलें हि न कधीं असें पापगा ।
कर श्रवणिं ठेविते नुघडि नेत्र घे भीतिला
न घालिन भिडेसि मी जरिहि कार्यलोभी तिला ॥ ५ ॥

**मोरोपंत.**

---

(१) (२) हे श्लोक सर्वप्रसिद्ध आहेत. तेव्हां त्यांचा संदर्भ सांगायास नकोच.

(३) (४) यांचा संदर्भ ही सर्वांस माहीत असण्यासारखाच आहे. अर्जुनानें आपलें स्वरूप प्रगट करून विराटाच्या गाई कौरवांपासून सोडविल्या हें कथानक आहे.

(५) 'केकावलीं'त आरंभींच कवीनें गंगेविषयींचें गाऱ्हाणें तिच्या पित्यापाशीं गाइलें आहे.

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला
जो भागला जलविहार विशेष केला ।
पोटींच एक पद लांबविला दुजा तो
पक्षी तनू लपवि भूप तया पहातो ॥ ६ ॥

टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी
केली विजार वरि डौर हि मौन सेवी ।
हस्तीं करी वलय उंच अशा उपायीं
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ॥ ७ ॥

कलकल कलहंसें फार केला सुटाया
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया ।
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू ॥ ८ ॥

रघुनाथपंडित.

ऐसें वदे मग तयास धरावया हे
ते होय हंसगमना पहिलीच आहे ।
वाजेच ना वलय नूपुरनाद नोहे
तो तद्गतीस निरखूनि कसा न मोहे ॥ ९ ॥

रघुनाथपंडित.

वियोगें जिणें वर्जिलें अन्नपाणी मुखातें सदा वाहते खिन्न पाणी ।
करें पूर्ण तारापती अर्ध जाला घना दाटि त्याही वरी मूर्द्धजाला॥१०॥

वामन.

ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनः पुन्हा चाटी ।
अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची धाटी ॥ ११ ॥

---

( ६ ) ( ७ ) ( ८ ) यांचा संदर्भ ही स्पष्टच आहे. नलराजा आपल्या उपवनांत विरहदुःखास्तव विहार करीत असतां त्यानें त्याचा भावी दूत जो हंस त्यास हळूच युक्तीनें पकडलें आहे.

( ९ ) वरील हंसाचा व दमयंतीचा प्रसंग.

( १० ) 'राधाभुजंग'— राधेची विरहावस्था व चिंतातुरता.

रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती किति दडती कितिएकांचीं धृतायुधें गळती ॥ १२

मोरोपंत.

शल्य सुयोधनवाक्यें कोपे चोळी करें करा डोळे ।
आरक्त करी चावे अधरातें फार तो मनीं पोळे ॥ १३ ॥

मोरोपंत.

## व्यतिरेक.

जेथें उपमान आणि उपमेय यांमध्यें एकाचें दुसऱ्याहून आधिक्य किंवा न्यूनत्व वर्णिलें असतें तेथें हा अलंकार होतो. जसें:—

चंद्रासि लागति कळा उपराग येतो
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो ।
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला
नाहीं समान नलराजमहायशाला ॥ १ ॥

रघुनाथपंडित.

हे वामनैकपद भूमि नसोनि जंघी
ऐके दिशींच दिनराज नभासि लंघी ।
वाराशि वानरविलंघित होय तो कीं
लोकीं नसे नलयशस्तुलना विलोकीं ॥ २ ॥

रघुनाथपंडित.

राया तिचें मुख सुधाकर या द्वयाला
नाहींच वेगळिक हें गमतें मनाला ।
संपूर्ण नित्य असता नसता कलंकी
हा चंद्र हें मुख असें मग कोण शंकी ॥ ३ ॥

रघुनाथपंडित.

---

( ११ ) ( १२ ) दुःशासनरक्तप्राशनाचा भयंकर प्रसंग.
( १३ ) दुर्योधनानें कर्णाचें सारथ्य करण्याविषयीं प्रार्थना केली तेव्हांची स्थिति.
( १ ) ( २ ) नलाच्या यशाचें वर्णन.
( ३ ) दमयंतीच्या मुखाचें वर्णन.

नवपीयूषसमुद्रीं पतन चकोरींसि जरि घडे विधिनें ।
तदपि अमृतकरचि तया प्रिय सुख त्यां त्याचियाचि संनिधिनें ॥४॥
मोठा शुद्धोद असो घनाविना चातकीस तो मरुची ।
तैसें सगुणावांचुनि निर्गुण गोपींस लेश दे न रुची ॥ ५ ॥

मोरोपंत.

मागें पाहों न दिलें तीं बारा कोस पळविलीं कटकें ।
यश हारविलें तेथें किति रत्नें हार कुंडलें कटकें ॥ ६ ॥

मोरोपंत.

असो दीप असो अग्नि असोत मणि सर्व रे ।
अंधकार विना कांतामुखचंद्रें न संहरे ॥ ७ ॥

भर्तृहरि.

न मंत्रा आटोपे किमपि न जया औषध दिसे
व्रतें दानें होमें उपशम न ज्याचा घटतसे ।
स्मरापस्माराख्य प्रबलतर हा रोग भुलवी
पिसें लावी त्यानें नर विकल तो नेत्र फिरवी ॥ ८ ॥

भर्तृहरि.

कथा सुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती
शिशूंस जरठांस ही निरखितां रसें दाटती ।
दुहोत भलते सदा तरि न लेश ही आटती
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती ॥ ९ ॥

मोरोपंत.

---

( ४ ) ( ५ ) 'मंत्रभागवत '— उद्धवानें गोपींस कृष्णाचा संदेश पोंचवून उपदेश केला त्यावर कवीचें ह्मणणें.

( ६ ) 'आदिपर्व '— वसिष्ठाच्या धेनूनें आंगापासून प्रगट केलेले जे म्लेंछशबरादिक त्यांनीं विश्वामित्राच्या सैन्याची धूळधाण उडविली तो प्रसंग.

( ७ ) 'शृंगारशतक.'

( ८ ) 'शृंगारशतक.'

( ९ ) 'केकावलि '— भगवत्कथेच्या माहात्म्याचें वर्णन.

सुविद्य धन मेळवी वचन आइके आवरी
प्रपंचभर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी ।
असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण
तसा तुजचि आवडे करिसि तूंचि तद्रक्षण ॥ १० ॥

मोरोपंत.

कथा भुवनमोहिनी अशि न मोहिनी होय ती
हरो असुरधी हिणें भुलविले किती हो यती ।
नव्हे न ह्मणवे असो जरि विमोहिला दक्षहा
प्रिया बसविली शिरीं मुनिपथीं कसा दक्ष हा ॥ ११ ॥

मोरोपंत.

---

## पत्रें.

रा. रा. निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. आपण मोरोपंत कवीविषयीं निबंध चालविला आहे हें पाहून फार समाधान वाटलें. एक दिवस आपला ६१-६२ हा दुहेरी अंक एका वृद्ध गृहस्थानें पाहिला, तेव्हां मोरोपंताच्या कवितेंत दोन दोन तीन तीन अर्थ निघत नाहींत, असा आपला लिहिण्याचा झोंक त्यास आवडला नाहीं; त्यानें याबद्दल मजजवळ बराच वाद केला, परंतु अशा आर्या दाखविण्याचें त्याच्यानें न घडल्यामुळें तें बोलणें अर्थात् तसेंच राहिलें. माझे मनांत मात्र याबद्दल विशेष चटपट लागली, पण काय करावें, मला कोठेंच तशी आर्या सांपडेना ! इतक्यांत एक दिवस ते गृहस्थ व मी एका ठिकाणीं कीर्तनास गेलों होतों. तेथें बोवांनीं पुढील आर्या ह्मणून तिचे दोन अर्थ सांगितले. तेव्हां मी तर अगदीं भांबावून गेलों, कारण मी तर ती आर्या शेंकडोवेळां वाचली असतां माझे मनांत तिचा दुसरा अर्थ कधीं ही आला नव्हता. असो, तर तात्पर्य काय कीं, 'केकावली' विषयीं अशीच आपली स्थिति झाली नसेल ना ! असो ती आर्या व तिचा दुसरा अर्थ पुढें लिहितों. पहिला अर्थ

---

( १० ) पित्यापेक्षां परमेश्वराचें कारुणिकत्व अधिक होय याविषयीं कवीची उक्ति.

( ११ ) भुवनमोहिनी कथा आणि समुद्रमंथनप्रसंगीं प्रगट झालेली मोहिनी यांची तुलना.

उघड आहेच. मग त्या दुसऱ्या अर्थात कांहीं लटपट असल्यास आपली आपण पाहून घ्यावी.

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ।
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे ॥ १ ॥

ह्या आर्येचा दुसरा अर्थ बोवांनीं प्रश्नोत्तररूप ( किंवा संवादरूप ) असा लाविला:-

**अर्जुन**---कृष्णा, अनुजा सुभद्रा लग्नाला योग्य ?

**कृष्ण**-- जा.

**अर्जुन**-- हली आहे.

**कृष्ण**-- हलधर स्वमतें तीतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे.

येथें 'धृतराष्ट्र' याचा अर्थ 'पंडु' असा घेऊन त्याचा मुलगा अर्जुन ह्यास तो 'पाहे' ह्मणजे 'शोधितो आहे' असा बोवांनीं अर्थ सांगितला.

एकंदर अर्थ.

**अर्जुन**-- हे कृष्णा, तुझी धाकटी वहीण सुभद्रा लग्नाला योग्य झाली आहे.

**कृष्ण**-- बरें तर, तूं तिच्याशीं लग्न करण्याकरितां जा.

**अर्जुन**-- कृष्णा, तें खरें पण बलराम आहे ना ? तो मला तिच्याशीं लग्न लावूं देणार नाहीं, कारण त्यानें तिला धृतराष्ट्राच्या मुलाला देण्याचा निश्चय केला आहे.

**कृष्ण**-- छे छे, तसें नव्हे; तो पंडूच्या मुलासच ती देण्याकरितां शोधितो आहे.

वरील अर्थात कांहीं भानगड असल्यास तिचा आपण निकाल करालच.*

ता० १ फेब्रुवारी १८७९. )
नेरे, तालुके पनवेल. )

आपला एक वाचक,
**मोरो गणेश लोंढे.**

---

**रा. रा. निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि०. आपल्या मालेच्या ६२ वे अंकांत 'उत्कृष्ट उतारे' या सदराखालीं आलेली बाविसावी आर्या——

* या कृष्णार्जुनसंवादावर यथास्थलीं टीका होईलच.

नि. मा. क.

पतिबंधुलयें दीना होइल धीरा 'पर' स्वसा माजी ।
मज मायसी ह्मणे वा करु ना देउनि परस्व सामा जी ॥ २२ ॥

ही असून ह्या आर्येच्या पूर्वार्धांतील 'पर' या शब्दाचा अर्थ आपण टिपेंत 'अत्यंत' असा दिला आहे, परंतु माझे मतें ही आपली चूक आहे. मला वाटतें 'पर' याचा अर्थ परंतु असा धरून, "माजी स्वसा धीरा, पर पतिबंधुलयें दीना होईल;" असा अन्वय करावा. 'परंतु' या शब्दाचे ठिकाणीं 'पर' हा शब्द समंजस लोकांचे बोलण्यांत कधीं ही येत नाहीं. शूद्रादिक अडाणी लोक मात्र या शब्दाचा प्रयोग करितात; व इतर महाराष्ट्र कवींचे काव्यांत ही हा शब्द आढळत नाहीं, असें जरी आहे तरी **पंतांनीं** या शब्दाचा पुष्कळ ठिकाणीं प्रयोग केलेला आढळतो. पुढें पहा:—

कुरुकुंजरासि गेला होता यदुसिंह तो खरा खाया ।
परते पर तेथूनी प्राणप्रियमित्रतोख राखाया ॥ १ ॥

**भीष्मपर्व.**

तसेंच:—

श्री बुडविली महेंद्रश्रीतुल्या मज तिची नसे परवा ।
पर वामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलापरवा ॥ १ ॥

**सभापर्व.**

याशिवाय:—

कपटादरें वळो पर पर परमेश्वर कसा वळेल हरी ।
कृष्णकृपामृतनिधिची अकपटविनताकडे वळे लहरी ॥ १ ॥

**उद्योगपर्व.**

आणखी:—

उत्सुक झाले होते अंकारोहार्थ पुत्र पर तो न ।
प्रभु घे मग मातेप्रति गेले रोदन करीत परतोन ॥ १ ॥

**आदिपर्व.**

कळावें, लोभ असावा हे विनंति.*

मु० माहाड. मिती माघ शुद्ध ११
शके १८००.

आपला वाचक,
**अं० रा० ह०**

---

* सदरील पत्रांतील अर्थ बरोबर आहे. पूर्वीच्या अर्थांत दूरान्वयाचा दोष येत होता.
नि. मा. क.

# निबंधमाला.

## अंक ५४.

### मोरोपंताची कविता.

अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् ।
प्राप्नुयाद् बुद्ध्यवज्ञानमपमानं च शाश्वतम् ॥*

१ मागील खेपेस दोघां पंडितांचे आमच्या कवीवरील आक्षेप दाखल करून त्यांवर आह्मीं आपलें मत वाचकांस कळविलें. आतां त्याच पंडितांनीं **मोरोपंता**विषयीं आणखी जो मजकूर लिहिला आहे त्यांत कितपत तथ्य आहे याविषयीं विचार करूं.

२ रा. ब. रानडे यांनीं आपल्या रिपोर्टाच्या अखेरीस 'केकावली'विषयीं आपला एकंदर अभिप्राय येणेंप्रमाणें दाखल केला आहे:—

"A few words upon the subject-matter of the poem itself before I conclude this rather long Report. It is, as I have said, a hymn addressed to the Deity, and belongs to the devotional class of poetry. The devotional breathings are, however, of a sort which can be understood and relished in this country alone. There is no awe about the Deity, nothing of terror surroundinging his glory, no humiliation of spirit on the devotee's part, no dazzling of sight at the awful vision. The relations between the worshipper and the worshipped are exceptionally free; every now and then there is a side-thrust and a push at the Deit[illegible]ch can be understood, if not relished, in a country where both t[illegible] prevailing philosophy and theology place man almost on an equality with God, and advocate either his present unity with or his future absorption in God. This kind of philosophy is destructive of all real devotion. The poem, however, partakes of this fault in common with many other works existing in the language, which possess the same characteristics as the Gopi Gita, Ganga Lahari, Mahimna Stotra, Gita Govind, and many others of the like des-

---

* "अप्रासंगिक असें जें वचन तें प्रत्यक्ष बृहस्पति जरी बोलला, तरी त्याच्या योगानें तो अवज्ञेस व निरंतर अपमानास प्राप्त होईल!"

cription. The highest and most impassioned outbursts of devotion in our poetry all partake of this character. Those attributes of the Deity which have a prominent bearing on the devotional aspect of human faith, his all-forgiving temper, his zeal to serve those who seek his help and place their faith in him, bountifulness and extreme condescension, all these are celebrated as they deserve in successive stanzas of this hymn. There are five passages in the way of episodes in praise of Dhruva, Vyas and Narad, and the other Puranic saints and heroes. The all paramount importance of the sacred story of God's exploits, performed in the course of his various incarnations, is described in a succession of fourteen beautiful stanzas at the end. And the hymn closes with a recital of what the author sums up as the highest boon he craves at the hands of the Almighty. As a work of art there is not another equal to it in the language. As a devotional hymn it does not strike harsh to the orthodox reader, but it is disqualified for any higher acceptance by the fault above pointed out."

( "हा रिपोर्ट बराच लांब झाला; आतां प्रस्तुत काव्याच्या ( 'केकावली'-च्या ) विषयांवर चार शब्द लिहून लेखणी आटपतों. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, हें काव्य ईश्वराचें स्तोत्र आहे, व याची गणना भक्तिपर ग्रंथांत होणारी आहे. या स्तोत्रांत जो ईश्वरविषयक भक्तीच्या उद्गारांचा प्रकार आढळतो तो एतद्देशवासी लोकांखेरीज इतर कोणास समजावयाचा नाहीं व रुचावयाचा ही नाहीं. ईश्वराविषयीं भक्ताच्या मनांत ज्या वृत्ति स्वभावतः उत्पन्न व्हाव्या— ह्मणजे त्याचें ऐश्वर्य पाहून भयचकित होणें, आपली क्षुद्रता मनांत येऊन अत्यंत नम्र होणें, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष जाऊन आश्चर्यानें थक्क होऊन जाणें, आपल्या पापमग्नतेमुळें धाक वाटणें,— त्या या काव्यांत बिलकुल दृष्टीस पडत नाहींत. उलटा भज्य आणि भजक यांजमधील संबंध यांत अत्यंत निकटतेचा आढळतो. जागोजाग ईश्वराशीं अतिप्रसंग केलेला व त्याच्यावर कोटी लढवलेली, हा प्रकार प्रस्तुत काव्यांत आहे. यास्तव या देशांतील तत्त्वज्ञानाचें व ईश्वरज्ञानाचें स्वरूप जे जाणत असतील,— ह्मणजे मनुष्य व देव हे समसमान असून ते एकरूपच होत किंवा पुढें तरी त्यांचा अभेद होणारा आहे,— हें ज्यांस माहीत असेल त्यांसच प्रस्तुत काव्यांतील भाषणप्रकार अगोदर कळेल; मग तो आवडणें न आवडणें ही तर स्वतंत्र

गोष्ट आहे ! वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय. आतां हें खरें आहे कीं, वर सांगितलेला दोष प्रस्तुत काव्यांतच आढळतो असें नाहीं; 'गोपीगीत,' 'गंगालहरी,' 'महिम्नस्तोत्र,' इत्यादि काव्यांत वरीलच प्रकार आहे. आणि सामान्यतः पाहतां आमच्या देशांतील कवितेंत भक्तीचे अत्यंत प्रेमळ उद्गार जे जे आढळतात त्या सर्वांत हीच तऱ्हा नजरेस येते. मनुष्यास भक्तीविषयीं प्रेरणा करविणारे जे ईश्वराचे अनेक गुण,—ह्मणजे त्याचें अत्यंत क्षमाशीलत्व, शरण आलेल्या भाविकांच्या साहाय्यार्थ धांवण्याविषयींची त्याची आतुरता, सर्वांवर कृपादृष्टि, आणि दयोदारता,—हे सर्व या काव्यांतील अनेक पद्यांत यथास्थितपणें वर्णिले आहेत. ध्रुव, व्यास, नारद, वगैरे पुराणप्रसिद्ध पुरूषांचा स्तव कथानुषंगानें मधें मधें आणला आहे. तसेंच देवानें निरनिराळ्या अवतारीं जीं चरित्रें केलीं त्यांच्या कथेचें माहात्म्य शेवटच्या चवदा पद्यांत सुंदर रीतीनें वर्णिलें आहे. आणि सरतेशेवटीं कवीच्या समजुतीनें परमेश्वरापाशीं मागायाचें जें अत्युत्कृष्ट वरदान त्याविषयीं प्रार्थना करून या काव्याचा उपसंहार केला आहे. काव्यरचनेच्या करामतीपुरताच विचार केला, तर याच्या तोडीचें काव्य महाराष्ट्रभाषेंत दुसरें नाहीं. भक्तिपर स्तोत्र या दृष्टीनें पाहिलें, तर जुन्या धर्मांतील मतें ज्यांस मान्य आहेत अशा वाचकांस त्यांत कांहीं गैर दिसत नाहीं; पण त्यांच्याहून वरच्या पायरीचे जे असतील,—ह्मणजे ज्यांस ईश्वराविषयीं यथार्थ ज्ञान झालें असेल,— त्यांस पूर्वोक्त दोषास्तव तें मान्य होण्याजोगें नाहीं.'')

३ वरील लेख हा अनेक रीतींनीं पाहतां चांगला मनन करण्यासारखा आहे. आमच्या देशांत पाश्चात्त्य विद्येचा रिघाव होऊन तिचा एतद्देशीय लोकांच्या मनावर दृढ संस्कार व्हावयाला लागून जुनी अडाणी समजूत व नवी सुधारलेली समजूत ही दुफळी जेव्हांपासून व्हावयाला लागली तेव्हांच्या पहिल्या भट्टींत जी मंडळी तयार झाली तिच्या मनाची स्थिति वरील उताऱ्यांत स्पष्ट रेखल्यासारखी दिसत आहे. ती अशी. वरील मंडळीनें इंग्रेजी विद्येच्या प्रकाशानें शोधून काढलेलें महातत्त्व एक हें होय कीं, आमच्या देशांत नांवाजण्यासारखें ह्मणून फारकरून कांहींच झालें नाहीं. आमची विद्या घ्या, कलाकौशल्य घ्या, रीतरिवाज घ्या, राजकारण घ्या, शिपाईगिरी घ्या,— चोहोंकडे आमच्या मूर्खपणाचा जसा काय ध्वजच उभारला आहे ! त्यांतून आमच्या धर्माची गोष्ट तर मुळींच काढूं नका. असला अप्रयोजक व पाजीपणाचा धर्म

तर कधीं कोठेंही झाला नसेल!! या महातत्त्वाअन्वयेंच रावबहादुरांनीं सदरील रिपोर्टांत आमच्या विचाऱ्या कवीवर व त्याच्या टीकाकारावरही साहेबी पेनाची फर्डेशाई उडविली आहे. रावबहादुरांची इंग्रेजी विद्येंतील निपुणता सर्वविश्रुतच आहे; तेव्हां तिजप्रमाणें वरील इंग्रेजी लेख मोठ्या सफाईनें लिहिलेला आहे यांत संशय नाहीं. आणि ज्यांनीं ज्यांनीं 'एज्युकेशनल् रेकर्ड्' पत्रांत सदरील रिपोर्ट वाचला असेल त्यांनीं या सफाईवरूनच परीक्षा करून रावबहादुरांच्या मतास बहुधा मान डोलविली असेल. दुसऱ्या एका रावबहादुरानें 'केकावलीं'तील कांहीं चरणांचा अर्थ फिरविला येवढ्याबद्दल त्या बिच्याऱ्यावर वर्तमानपत्रांतून, मासिक पुस्तकांतून जसा काय गहजब उडाला. पण सगळ्या काव्यावर ज्यांनीं इंग्रेजी पेन फिरविलें त्यांच्या अभिप्रायाबद्दल कोणीं कोठें हूं कां चूं सुद्धां केलें नाहीं. ट्रान्सलेटर साहेबांच्या खुर्चीला पोपमहाराजांच्या खुर्चीप्रमाणें प्रमादराहित्याचा* ताईत बांधलेला आहे कीं काय न कळे! किंवा युनिवर्सिटीच्या कितावांत ही कांहीं बीरमंत्र आहे कीं काय कोण जाणें! एकंदरींत या प्रकरणीं माघकवीचाच अभिप्राय लागू पडण्यासारखा आहे:—

तुल्येऽपराधे स्वर्भानुर्भानुमंतं चिरेण यत् ।
हिमांशुमाशु ग्रसते तन्म्रदिम्न: स्फुटं फलम्† ॥

असो; आतां रावबहादुरांच्या वरील टीकेवर आली आपली टीका आमच्या वाचकांस सादर करतों.

प्रस्तुत काव्याच्या ह्मणजे 'केकावलीं'च्या संबंधानें रावबहादुरांचा आमच्या महाराष्ट्रकवीवर असा टपका आहे कीं, त्यानें सर्व विश्वाचा नायक जो परमेश्वर त्याच्या पुढें जें अगदीं भयभीत होऊन जावयाचें व आपल्या अपरिमित क्षुद्रत्वास्तव वर मान करण्याचें ही धैर्य न होऊन त्यानें पुरतें ब्र ही जें काढूं नये, तें सर्व गुंडाळून ठेवून 'इसापनीतीं'तील कोल्ह्याच्या तिसऱ्या आचरणास अनुस-

* रोमच्या पोपाचा एक परंपरागत चाललेला महान् अधिकार प्रमादराहित्य (infallibility) हा होय; ह्मणजे जो सेंट पीटरच्या खुर्चीवर बसेल त्याच्या तोंडांतून असत्य ह्मणून निघावयाचेंच नाहीं असा भाविक क्याथलिक लोकांचा सिद्धांत आहे. सेंट पीटर हा ख्रिस्ताच्या प्रेषितपरिवारापैकीं असून रोम येथील गादी थेट त्याच्या पासून आज-पर्यंत चालत आली आहे असा ही समज आहे.

† "चंद्र आणि सूर्य यांचा सारखा अपराध असतां राहु हा चंद्रास वारंवार ग्रासतो व सूर्यास एकादे वेळेस ग्रासतो, हें फळ पहिल्याच्या मृदुत्वाचें व दुसऱ्याच्या तीव्रत्वाचें होय!"

रून त्यानें परमात्म्याशीं खुशाल हवी तितकी सलगी किंबहुना हास्यविनोद ही केला आहे. या अतिप्रसंगाच्या प्रकारास्तव सदरील काव्य सुधारलेल्या समाजाच्या लोकांस पसंत होण्याजोगें नाहीं असा रावबहादुरांचा सिद्धांत आहे. आतां आमच्या आडाणी कवीनें आपल्या वेडगळ लडिवाळपणानें अलीकडील बड्या बड्या विद्वानांची आपणावर इतराजी होण्याचा प्रसंग आणला हें त्याचें कमनशीब तर खरेंच; पण आह्मांस असें वाटतें कीं, आमच्या रावबहादुरांनीं वरील निकाल कागदावर नमूद करण्यापूर्वीं आमच्या बिचाऱ्या कवीच्या संबंधानें कांहीं गोष्टी ध्यानांत आणल्या असत्या तर बरें होतें. एक तर ही कीं, कैदीस संशयाचा फायदा देण्याची जशी त्यांची वहिवाट आहे त्याप्रमाणें प्रस्तुत कवीस मागील काळाचा फायदा द्यावयाचा होता. ह्मणजे ज्या पक्षीं तो मागील काळीं जन्मास आला त्या अर्थीं अर्वाचीन काळचें सुधारलेलें ईश्वरज्ञान त्याच्या स्तोत्रांत न आल्याबद्दल त्यास कांहीं गय करायाची होती. **मिल्टन्** कवीनें आपल्या महाकाव्यांत पृथ्वीस स्थिर केली आहे व सूर्यास फिरावयास लावलें आहे, **शेक्सपीयर** बोवांनीं तर बोहेमिया देशाच्या किनाऱ्यावर जहाज उतरविलें आहे, आमच्या कविकुलगुरूंनीं मेघास स्त्रियांच्या 'केशसंस्कारधूपांनीं' पुष्ट होण्याची तजवीज सांगितली आहे, महाभारतवाल्यानें कुरूंच्या तृतीय सेनानीकडून 'सप्तद्वीपा' पृथ्वी रथचक्रासह वर उचलविली आहे, **ड्रायडन्**नें आपला फलज्योतिषावरील विश्वास आपल्या ग्रंथांत प्रगट केला आहे, **गोल्डस्मिथ्**नें आपल्या जन्मभूमीवरील काव्यांत अर्थशास्त्रदृष्ट्या जे अपसिद्धांत होते त्यांचें प्रणयन केलें आहे; त्याप्रमाणेंच **कोलंबस** बाहामा बेटांस हिंदुस्तानाचा भाग समजला, **सीजरा**च्या वेळेपर्यंत ब्रिटन्‌ची गणना कल्पित बेटांत होत होती, ग्रीक व रोमन लोकांच्या वेळेस हिंदुस्थान हा पृथ्वीची सीमा होऊन राहिला होता, चारशें वर्षांपूर्वीं आटलांटिक महासागराच्या पलीकडे कांहीं नाहीं असें सर्व समजत असत, **आरिस्टॉटल्** हा येवढा पंडितशिरोमणि असतां पदार्थविज्ञानाचे त्याचे सिद्धांत कित्येक अगदीं वेडगळ आहेत— इत्यादि अनेक ठिकाणीं अर्वाचीन पंडित आपली तीव्रता कमी करून मागल्या अडाणी काळांत होऊन गेलेल्या मंडळीची जशी कीव करतात तशी कांहीं मेहेरबानी रावबहादुरांनीं **पंतां**वर करणें रास्त होतें. प्रस्तुत कवीनें प्रार्थनासमाजांत जर आपलें नांव नोंदलें असतें व मोठमोठ्या पंडितांच्या उपासनांच्या वेळेस हजर असून ईश्वरस्वरूपाचें मार्मिक ज्ञान जर संपादन केलें

असतें, किंवा दयानंदजींची तेहेतीस कोटी देवांवरची मोहीम पहिल्यानें मूर्तिपूजाजन्य पातकांचें क्षाळन होऊन सद्धर्मोन्नति जर त्याच्या अंगीं संचरती, तर त्याच्या हातून हल्लींच्या 'केकावली'च्या तोडीचें काव्य उतरतें कीं नाहीं याची शंकाच वाटते; पण जें उतरलें असतें त्यांत मराठी ट्रान्सलेटरांस नापसंत होण्याजोगें कांहीं आलें नसतें, यांत संशय नाहीं. 'रत्नमाला,' 'प्रार्थनासंगीत' या महाकाव्यांत खऱ्या देवाविषयीं खरा भक्तिरस जसा प्रगट झाला आहे तसाच 'केकावलीं'त ही संचरून आमच्या सुधारलेल्या भाविक जनांच्या पवित्र नेत्रांतून प्रेमाश्रूंचा प्रवाह चालविण्यास वरील केकारव कदाचित् कारणभूत झाला असता; तरी असल्या पवित्र व सुधारलेल्या काव्यांत कवित्वरस कितपत उतरता याचा मात्र आम्हांस संशय वाटतो! असो; पण ज्या अर्थीं आमच्या बिचाऱ्या कवीचा ग्रंथ पेशवाईच्या अमदानींतच आटपला, व पुढील सुधारलेल्या राज्याचा व धर्माचा आमच्या गाढांधकारमय देशांत उदय होऊं लागण्याच्या पूर्वींच त्याचा अस्त झाला, त्या अर्थीं वादविषयक काव्यांत ईश्वरभक्तीचा प्रकार परिपक्व बुद्धीच्या लोकांस मान्य होई अशा प्रकारें वठला नाहीं याबद्दल आमच्या हीनभाग्य कवीवर टपका ठेवणें बरोबर नाहीं. ही एक गोष्ट झाली. दुसरी अशी कीं, 'केकावलीं'त मयूरानें ईश्वराची करुणा भाकून जरी टाहो फोडला आहे, तरी त्याच्या ईश्वरांत व रावबहादुरांच्या ईश्वरांत अतिशयितच अंतर आहे. आमच्या कवीचा देव साकार, मनुष्यदेहधारी, 'गदारिदरनंदकांबुजां'नीं विराजमान, भक्तांच्या साह्यार्थ गरुडावर स्वारी करून धांवणारा, विदुराच्या कण्या, शबरीचीं बोरें, सुदाम्याचे पोहे, हे खाणारा, एका अवतारीं कडकडीत एकपत्नीव्रत आचरणारा आणि पुढल्यांत गोकुळवृंदावनांत—

> श्लिष्यति कामपि चुंबति कामपि कामपि रमयति रामाम् ।
> पश्यति सस्मितचारु परामपरामनुगच्छति वामाम् ॥ * ( १ )

अशा प्रकारचा धुमाकूळ करून देणारा, क्षणांत ' प्रियाकुचतटीं ' व क्षणांत ' नृपमखांत ' ' पत्रावळी ' काढणारा, भृगूनें उरावर लात हाणली अ-

---

* वरील अष्टपदी जयदेवकवीच्या सर्वप्रसिद्ध ' गीतगोविंदां'तील होय. तिचा अर्थ ही सुगमच आहे;--

" कोणास आलिंगन देतो, कोणाचें चुंबन करतो, कोण्या स्त्रियेस रमवितो, एकीकडे सस्मित अवलोकन करतो, व दुसरीच्या मागून चालतो ! "

सतां तिचें चिन्ह भूषणत्वेंकरून वागविणारा, अशा प्रकारचा होय. आमच्या टीकाकर्त्यांचा आलीकडील देव ह्मटला ह्मणजे त्याला रंग नाहीं, रूप नाहीं, तो कधीं अवतरलेला नव्हे, कधीं कोणाच्या दृष्टीस पडलेला नाहीं, कोणाशीं बोललेला नाहीं, डोळे मिटले ह्मणजे दिसायाचा, वीणारवानें जागृत व्हावयाचा, अशा प्रकारचा आहे. त्याचीं चरित्रें ह्मटलीं ह्मणजे त्यानें आमच्या देशांत सद्धर्मोन्नतीसाठीं शाक्यमुनीस उत्पन्न करून त्याचा धर्म चोहोंकडे पसरविला व शेवटीं ब्राह्मणांकरवीं त्याच धर्माचें उन्मूलन करविलें, इस्राएल लोकांत प्रभु येशूस उत्पन्न करून त्याच लोकांकडून त्याचे हाल हाल करून त्यास मारविलें, महंमदास आरबस्थानांत पाठवून त्याच्या चेल्यांकडून ख्रिस्ती धर्म मलिन करविला व आमच्या देशांतल्या मूर्ति फोडविल्या, पुढें युरोपांत महंमदाचें मतेरें करवून इकडे ही शिवाजीच्या हस्तें पुनः मूर्तींचें स्थापन करविलें, आलीकडे राममोहनराय व दयानंद सरस्वती यांच्या हृदयांत सद्धर्मप्रकाश फांकवून आर्यांच्या उन्नतीस आरंभ होतो न होतो तों एकाचें श्वेतद्वीपांतच देहावसान झालें व दुसऱ्यावर एकाएकीं गहजप गुदरून त्या वावटळांत देशसुधारणेचें जहाज कोणीकडच्या कोणीकडे हेलकावे खात भडकलें! असो; तर कवीची ईश्वराच्या विषयींची समजूत व टीकाकर्त्याची त्याजविषयींची समजूत ह्या परस्पर इतक्या भिन्न आहेत; मग इतका स्पष्ट विरोध असतां 'केकावलीं'तील वर्णन आमच्या रावबहादुरांच्या मनांत भरेसें उतरलें नाहीं यांत नवल कसचें? व यांत आमच्या बिचाऱ्या जुन्या कवीचा दोष तरी कसचा? इंग्रेजी चिताऱ्यानें जर स्त्रीपुरुषांच्या जोडप्याचें चित्र काढलें तर मडम साहेबाच्या पायांत बूट, डोक्यावर टोपी, अंगांत झगा वगैरे सर्व जामानिमा इंग्रेजी तऱ्हेचा, नवऱ्यानें हलकीशी नाजुक छत्री डोक्यावर धरलेली असून स्वतः स्वारी ऊन खाते आहे, मुखकमलांतून जो जो शब्द खालीं पडेल तो तो झेलण्यास जसा काय तो तत्पर होऊन राहिला आहे,— अशा तऱ्हेचें तें उठेल हें उघडच आहे; तोच आमचा हिंदु चितारी असला कीं बायकोला लाजतां लाजतां पुरेसें होतें आहे, नवरा यथास्थित जामानिमा करून चालत असतां बायको अनवाणी व छत्रीशिवाय अशी त्याजपासून दूर चालली आहे, पेहेराव इकडच्याप्रमाणेंच अर्थात् असून इकडच्या चालीप्रमाणेंच हातापायांत वगैरे भूषणें आहेत,—वगैरे सर्व प्रकार असायाचाच! मग असें एकादें जुन्या कारागिरानें काढलेलें चित्र पाहून जर इंग्रेजी रसिकता पावलेले एकादे मर्मज्ञ ह्मणूं लागले, कीं "हें काय

हो ! स्त्रियांचे पाय उघडे दाखविणें हें किती अप्रशस्त आहे ? वक्षःप्रदेश उघडा दाखविला जर तो चालेल, कांकीं सुधारलेल्या देशांत मोठमोठ्या समारंभांत तशा वेषानें स्त्रिया वावरतात; तसेंच कपाळीं कुंकू लावलें आहे हें तरी किती अमंगळ आहे ! जे रानटी लोक असतात त्यांस आपलें शरीर रंगवावेंसें वाटतें, खरें सुधारलेलें माणूस आहे त्याच्या कपाळीं कधीं कांहीं दृष्टीस पडायाचें नाहीं; त्याप्रमाणेंच नाक व कान टोचून शरीरास इजा करून तेथें भूषणें घालणें, हातावर तोंडावर गोंदणें हें तरी किती अभद्र आहे ! पण या सर्वांत बायकोचें लाजणें हें तर फारच विचित्र आहे; येथें तर चितान्यानें आपल्या अडाणीपणाची शिकस्त केली आहे !* बायका जर अशा लाजूं लागल्या तर मग त्यांची व त्यांच्या द्वारें देशाची सुधारणा होणार कशी ? **मिल्ल** सारख्यांनीं स्त्रीजातीचा कैवार घेऊन त्यांस पार्लमेंटांत बसविण्याची खटपट करावी; आणि आमच्या खुळ्या देशांत तर बायकांस नवऱ्याच्या समोर उभें राहण्याचा ही धीर नसावा ही केवढी शोचनीय गोष्ट आहे बरें !" अशा प्रकारची टीका वरच्यासारख्या तजविरीखालीं कोणी लिहून ठेवली तर ती कितीशी समंजस ह्मणून आपण समजूं ! तर याप्रमाणेंच आमच्या कवीच्या हृदयांत ईश्वराचें स्वरूप ज्या रीतीचें लहानपणापासून ठसलें होतें त्या रीतीचीच त्याची तजवीर त्याच्या काव्यांत उठली हें उघडच आहे. प्रस्तुत टीकाकारास आवडे अशा प्रकारच्या चित्राची त्याजपासून अपेक्षा करणें हें त्यास इंग्रेजी येत नसल्याबद्दल त्यास नांव ठेवण्यासारखेंच समंजस होय.

आतां वरील आक्षेपच वस्तुतः कितपत यथार्थ होय याविषयीं जर विचार केला, तर इकडून ही प्रस्तुत काव्याच्या तर्फेनें कांहीं बोलतां येणार नाहीं असें नाहीं. रावबहादुरांनीं आपल्या टीकेंत ईश्वराच्या संबंधाचें वर्णन जसें असावें ह्मणून सांगितलें आहे तसें 'केकावलीं'त मुळींच नाहीं असें कोणाच्यानें ही ह्मणवणार नाहीं. आपण ईश्वरस्वरूपच आहों असें जर आमच्या कवीस वाटतें, व त्याच्या ठायीं नम्रभाव व स्वतःच्या पापमलिनतेविषयीं खेद या वृत्ति जर मुळींच नसत्या, तर वादविषयक काव्याचा प्रादुर्भावच मुळीं होताना! 'कृतांतकटका'ची पांढरी सफेत पताका फडकूं लागली असतां त्यानें प्रस्तुत ग्रंथ जो रचला तो दक्षिणाप्रैज कमिटी किंवा मराठी–ग्रंथ-उत्तेजक मंडळी यांच्या बक्षि-

* **सुबंधु** कवीवरील निबंध, पृष्ठ ३७ पहा.

सांच्या लालचीवर अथवा पेशव्यांनीं देऊं केलेल्या इनामास भुलून रचला असें नाहीं; तर केवळ अंतःप्रेरणेस वश होऊनच तो लिहिला हें सर्वांस माहीतच आहे. हें या काव्याच्या सर्वसंमत उत्कृष्टत्वावरूनच सिद्ध होतें. आतां यांत सलगीचा जो प्रकार आहे तो रावबहादुरांस बिलकूल पसंत पडत नाहीं; कां कीं परमेश्वर केवढा थोर व मनुष्य हा त्याच्या पुढें किती पराकाष्ठेचा क्षुद्र ! हा अभिप्राय एका पक्षीं पाहतां खरा आहे हें कोणी ही कबूल करील. पण दुसरी एक गोष्ट रावबहादुरांच्या कशी लक्षांत आली नाहीं, किंवा त्यांनीं कशी आणली नाहीं, याचा अंमळ चमत्कार वाटतो. मनुष्य हा ईश्वरापुढें अत्यंत क्षुद्र हें खरें; पण तसेंच हें ही खरें आहे कीं, त्याचा उत्पन्नकर्ता व जनक ही तोच. तेव्हां आमच्या कवीनें देवापुढें किती ही 'लुब्रे'पणा केला असला, तरी त्याचा अपराध ह्मटला ह्मणजे बापापाशीं मुलानें अल्लडपणा केल्याप्रमाणेंच होय. हा पुत्रजनकभाव कवीनें ही कित्येक पद्यांत सुरस रीतीनें वर्णिला आहे. त्यांतून हिंदु धर्म हा प्रार्थनासमाजाच्या धर्माप्रमाणें अभावरूप व मनोमय नसून त्यांतील देव डोळ्यानें दिसणारा, त्याचीं चरित्रें लिहून ठेवलेलीं, त्यांचा गजर नेहमी कानावर येणारा, असा प्रकार असल्यामुळें कवीच्या वाणीस स्फूर्ति होण्यास, किंबहुना तिचें चापल्य प्रगट होण्यास, त्याची अनुकूलता किती अधिक आहे हें ही सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. प्रार्थनासमाजीय भक्तानें ईश्वराचे गुण गाणें ह्मटलें ह्मणजे **बिशप् हूकर** यांनीं आपल्या सर्वप्रसिद्ध ग्रंथाच्या आरंभीं ह्मटलें आहे तशीच अवस्था—

"Our safest eloquence concerning Him is our silence."

"आमचें ईश्वराविषयीं यथार्थ वक्तृत्व ह्मटलें ह्मणजे मौन हें होय."*अशा

---

* आमचे अर्वाचीन सामाजिक हे कोणतें ही धर्मपुस्तक ईश्वरदत्त ह्मणून मानीत नाहींत हें सर्वप्रसिद्धच आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं सृष्टींत जेवढें ईश्वराचें स्वरूप प्रगट झालें आहे तेवढ्यावरून त्याचे सर्व गुण व्यक्त होतात, व भजकांस येवढें साधन बस आहे. या त्यांच्या मतास कितपत आधार आहे हें आमच्या मतें माजी **जान् स्टुअर्ट मिल्ल्** याच्या धर्मविषयक 'निबंधत्रया'वरून बरेंच दिसून येईल. **मिल्ल्** हा कोणत्याच धर्माचा नसून त्यानें केवळ मनुष्यबुद्धीनें वरील विषयावर जे विचार शोधक मनुष्याच्या मनांत येण्यासारखे आहेत तेच सदरील ग्रंथांत दाखल केले आहेत. पण असें असतां वरील ग्रंथांतील ईश्वरज्ञान व सामाजिकांचें ईश्वरज्ञान यांचा परस्पर थोडाच जम बसेल ?

ठिकाणीं वाग्देवीचा रिघाव करणें हें वातकर्षक यंत्रानें निर्वायु केलेल्या स्थलीं घंटानाद करूं पाहण्यासारखेंच होय !

येथवर **मोरोपंताच्या** तर्फेनें जे जे आह्मी विचार सुचविले ते रावबहादुरांच्या प्रतिकूळ टीकेपासून होणाऱ्या भ्रमाचें बरेंच निवारण करतील असें वाटतें; तरी वरील सर्व निरूपण हें वरील टीकेच्या शाखाविस्ताराचेंच केवळ खंडन झालें. पूर्वोक्त लेखावर केवळ 'मूले कुठारः' असा एक विचार अद्याप राहिलाच आहे. हा ह्मणजे आह्मी रावबहादुरांसारख्यांस सुचवावा असें नाहीं; पण त्यांच्या व बहुतेक जुन्या मंडळीच्या लेखांत व भाषणांत असा प्रकार आढळतो कीं आमच्या देशाची गोष्ट आली ह्मणजे अगदीं डोळ्यांपुढें असणाऱ्या गोष्टींकडे ही त्यांचें दुर्लक्ष होतें. ज्या साक्षी व जो पुरावा पाश्चात्यांच्या प्रकरणांत पुरून उरेसा होतो तोच आमच्या प्राच्यदेशीय प्रकरणांत कोता पडूं लागतो, किंबहुना त्याचें स्वरूप उलटेंसुद्धां भासायाला लागतें. पाश्चात्यानें ताडावर चढणाऱ्या ताडीवाल्यास गोळी घालून ठार केला तरी बिचारा ताडीवाला मनुष्यजातीच्या खापरपंजोबाच्या ह्मणजे वानराच्या स्वरूपास मिळतो व साहेब दोषमुक्त होतात, किंबहुना त्यांच्या अग्नियंत्रशौंडत्वाची तारीफ ही व्हावयाला वेळेनसार चुकायाची नाहीं; तेंच इकडे कोणी खऱ्याखुऱ्या वानरावर चाप झाडला कीं वानराचा मनुष्य होऊन त्याच्या मानेला तात बसते ! तेव्हां असा प्रकार आढळत असल्यावरून प्रस्तुत टीकाकर्त्यासारख्या पंडितांस ही अगदीं सामान्य सिद्धांताची ही कधीं कधीं आठवण देणें जरूर पडतें. प्रकृत प्रकरणीं लागू पडणारा सिद्धांत ही असाच कांहीं मोठासा गूढ आहे असें नाहीं. तो हा होय कीं, काव्यांची परीक्षा जी करायाची ती रसिकजन त्यांतील सिद्धांतांच्या खरेखोटेपणावर तादृश करीत नसतात. केवळ अपसिद्धांतांचें ज्यांत प्रतिपादन केलें आहे, व ज्यांत सत्याचा लवलेश ही नाहीं, असें काव्य केवळ अमोलिक असूं शकेल; आणि ज्यांत सात गाळण्यांतून काढलेलें निवळ सत्य ओतप्रोत भरलेलें आहे असलेंही काव्य कोणी कवडीला सुद्धां विचारूं नये अशा वसुलाचें असेल. **युक्लिड**च्या प्रमेयांवर कोणी छंदोबद्ध रचना केली तर तींत कितीसा रस उतरेल? प्रत्यक्ष **भर्तृहरीनें** व्याकरणावर कारिका रचल्या आहेत; पण त्यांतील रसाचें माधुर्य कोणत्या प्रकारचें आहे हें पाहण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यानें संस्कृत भाषेच्या दुसऱ्या पुस्तकांत दाखल केलेल्या पांच सहा कारिकांचा आस्वाद घ्यावा. तो घेतला असतां सत्यदेवतेचा केवढा ही भक्त असला तरी

तो लवकरच पुरे ह्मटल्याविना राहणार नाहीं! तीच मोठमोठ्या काव्यांची व नाटकांची गोष्ट पहा; त्यांतील बहुधा सर्वांचीं कथानकें केवळ कल्पित असतात, व जगांत कधीं दृष्टीस न पडणाऱ्या गोष्टी ही त्यांत वर्णिलेल्या आढळतात. पण इतकें असून ही कवित्वरसानें वरील ग्रंथ जसे काय उचंबळत असतात! याचें कारण उघडच आहे कीं, असत्यता हीं मनोरंजकतेस स्वभावत: मुळींच विरुद्ध नसून उलटी तीस पुष्कळ अंशीं अनुकूल ही आहे. तर आमच्या कवीचीं धर्मविषयक मतें रावबहादुरांच्या मतांहून किती ही भिन्न असलीं, किंवा वादविषयक काव्यांत त्यानें ईश्वराचें वर्णन कोणत्या ही पद्धतीनें केलें असलें, तरी कवित्वदृष्ट्या हे सर्व विचार केवळ बाह्य होत हें रावबहादुरांनीं लक्षांत आणायाचें होतें. प्रार्थनासमाजांत माजी भास्कर दामोदर पाळंदे यांची 'रत्नमाला' चालते, व तींतील पद्यें रावबहादुरप्रभृति विद्वान् भक्तजन दर आठा दिवशीं तालसुरावर गातात, तेव्हां तींतील ईश्वरवर्णन किती चोख असेल हें उघडच दिसतें; पण असें आहे ह्मणून वरील 'माले'स आमचे टीकाकार 'केकावली'वर, 'प्याराडैज् लॉस्ट्'वर, व 'इलियड्'वर नेऊन बसवितील काय? आमच्या **पंतांस** किंवा **होमर**साहेबांस डी. डी.च्या परीक्षेस बसवून ईश्वरज्ञान या विषयावर एक पेपर दिला असता तर दोघांस ही बेताबाताचेच मार्क मिळून 'नापास' हा टिळा दोघांस ही लागता यांत संशय नाहीं. कांकीं, आलीकडील सुधारलेल्या काळांतला व विशेषत: एकोणिसाव्या शतकांतील देव ह्मटला ह्मणजे तो दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसायाचा, पृथ्वीच्या पोटांतील थरांत व वृक्षपर्णावरील रेषांत प्रगट व्हावयाचा, असा आहे. पण विचाऱ्या **होमर**च्या वेळेस तर त्याच्या साऱ्या देशभर व एका देवप्रिय लोकांखेरीज बाकीच्या साऱ्या जगभर अज्ञानजन्य व मूर्तिपूजाजन्य अंधकारच चोहोंकडे पसरला होता. त्यांतून कविमहाराजांस एक सोडून सात दुर्बिणी आणल्या असत्या तरी एकीचा ही उपयोग न होता! ईश्वरज्ञानाचा दुसरा मार्ग ह्मटला ह्मणजे पवित्रशास्त्र व कुराण हे ग्रंथ होत. यांपैकीं पहिल्याचा कांहीं भाग कदाचित् **होमर**च्या वेळेस असेल नसेल! दुसऱ्या कवीस मात्र दुसरा ग्रंथ सहज प्राप्त होण्याजोगा होता. पण त्यास त्याचे तेहेतिस कोटी देव सोडतील तेव्हां पैगंबर साहेबांच्या देवाकडे जाण्याची त्यास बुद्धि होणार! त्यांतून 'पंधरा आणे निवळ बाष्कळपणानें भरलेल्या' ग्रंथांवर त्याचें उपजीवन असल्यामुळें व अरसिकत्वास्तव त्यांतील भाकड कथांचीच त्यास गोडी लागल्यावर मग ईश्वराविषयीं चोख माहिती

करून घेण्याचें त्यास कोठून सुचणार! अठरा पुराणांनीं ज्यास ग्रासलें त्यास बिचारें एकटें कुराण काय करतें! बाकी आमची पक्की खातरी आहे कीं, अकबर बादशाहाच्या रंगेल पंडितरायांनीं जसा यवनीशीं समागम करून इहलोकींच्या सुखसर्वस्वाचा अंगीकार केला, त्याप्रमाणें आमचे महाराष्ट्र कवि जर—

'श्रीराम याच नामीं न ह्मणुनि अल्ला खुदा नवी रमला' ।

या आर्येचा विपर्यास करून एकाद्या सुंदर मशिदींत इमाम होऊन बसते, व आपलें पूर्वपातक समग्र झाडून एक खरा अल्ला ओळखून राहते, तर 'केकावलीं'त त्यांनीं ज्या चुका केल्या आहेत त्या ते न करते, व सुधारलेल्या विद्वान् वाचकांनीं ही नाक मुरडूं नये असें काव्य त्यांच्या हातून निपजलें असतें. पण त्यांविषयीं आतां खेद करून काय उपयोग आहे? ग्रीक भाषेतील आद्यकाव्याचें विवेचन करतांना जसा कोणी ही वाचक कधीं हा विचार करीत बसत नाहीं, कीं ज्युपिटर हा खरा देव होता कीं नाहीं, एक ग्रीक वीर मार्स् देवाशीं व व्हीनस् देवीशीं लढला आहे असा प्रकार कवीनें घालणें हें बरोबर आहे कीं नाहीं, मार्स् व व्हीनस् यांचा व्यभिचारसंबंध, व्हीनसूनें काव्याच्या नायिकेस तिच्या जाराकडे नेऊन पोंचविणें, ज्युपिटर येवढा देवाधिदेव असतां जूनो देवीनें त्याला जादूनें भारून रतिनिद्रापर करून फसविणें, वगैरे प्रकारांवरून **होमर**च्या देवविषयक कल्पना किती अप्रशस्त होत्या— हे सर्व विचार रसिक वाचकांच्या जसे कधीं ही मनांत येत नाहींत; किंवा 'प्याराडैज् लॉस्ट' वाचतांना जसा कोणी ही वाचक शेजारीं **मिल्**साहेबांचे 'धर्मावर तीन निबंध' किंवा **टॉमस् पेन्** याचा नास्तिकवाद ठेवीत नाहीं, व मूसा पैगंबरानें 'बैबल्'च्या आरंभीं केलेलें सृष्टयुत्पत्तीचें वर्णन खरें कीं अर्वाचीन ज्योतिषसिद्धांत व भूगर्भशास्त्र हीं खरीं, आडम् हा मनुष्यजातीचा पूर्वज खरा कीं **डार्विन्** साहेबांच्या मताप्रमाणें वानर हा खरा, हे सर्व विचार ही जसा तो खुशाल खिशांत घालून ठेवितो, व काव्यरसभरांत निःशंक वाहवतो; तशीच आमच्या महाराष्ट्र कवीच्या अत्युत्तम कृतीची ही गोष्ट आहे. जो खरा रसिक आहे तो रावबहादुरांनीं काढलेल्या आक्षेपांचा कधीं विचार ही करणार नाहीं व ते त्याच्या मुळींच मनांत ही यावयाचे नाहींत. कोहिनूर हिरा पहावयास सांपडला असतां जसा कोणी ही असा विचार करणार नाहीं, कीं हा कोळशाचा भाऊ आहे, हा मूर्तिपूजकांच्या देशांत सांपडला असून जगन्नाथाच्या मूर्तीवर होता, तस्मात् हा कवडीचा माल आहे; **फिडियस्** नामक ग्रीक कारागिरानें केलेला ज्युपिटराचा पुतळा

पाहिला असतां हा खोटा देव आहे, तेव्हां सुधारलेल्या समजाच्या मनुष्यास संतोष करण्याचें यांत सामर्थ्य नाहीं असें जसा कोणी सामान्य मनुष्य ही ह्मणणार नाहीं; व्हीनसूची उघडी पुतळी पाहिली असतां 'स्त्रियश्चरित्रं' या श्लोकावर जसा कोणी पांडित्य करीत बसणार नाहीं, व कोणीं करूं लागल्यास त्यास त्या देवीच्या अवकृपेंतल्या मंडळींत निवडण्यास फारशी अडचण नको; किंवा एकाद्या स्त्रीच्या रूपाची जी परीक्षा करावयाची ती तिच्या धर्मावरून करणें, अथवा स्वराची करावयाची ती तिच्या रूपावरून करूं पाहणें, हें जसें अत्यंत असमंजस; त्याप्रमाणेंच 'केकावली' हें पुस्तक ट्रान्सलेटरांच्या टेबलावर असतां व त्यांच्या पेनाच्या सपाट्यांत सांपडलें असतां त्याच्या गुणदोषांचें मान करण्यास काव्यविवेचनाचा जो कांटा काढावयाचा तो न काढतां रावबहादुरांनीं त्याच्या ऐवजीं आपल्या प्रार्थनासमाजांतली धर्माधर्मविवेचनाची पवित्र तुला काढून आमच्या बिचाऱ्या नेटिव कवीच्या पदरांत त्यांनीं धर्मविषयक अज्ञानाचें व दांडगेपणाचें त्रेलाशक माप झोकून दिलें, याचा आह्मांस अत्यंत विस्मय होतो!

प्रस्तुत काव्याविषयीं आपलें मत प्रगट करतांना रावबहादुरांनीं आणखी असा ही एक मोठा विचार मनांत आणणें अवश्य होतें कीं, मूर्तिपूजेच्या धर्मापेक्षां अमूर्त देवाची उपासना ही किती ही उत्कृष्ट असली, तरी पहिल्या धर्मांतील काव्याची परीक्षा कर्तव्य असतां हा दुसरा उंच प्रतीचा धर्म विशेष उपयोगी पडणारा आहे असें नाहीं. पाद्री साहेबांच्या पवित्र धर्मोपदेशानें व 'पवित्र शास्त्रां'तील तत्त्वज्ञानानें सद्धर्माचीं तत्त्वें आमच्या अर्वाचीन विद्वानांचे ठायीं बिंबलीं असतील खरीं; तरी ज्याप्रमाणें परिसाशीं संघट्टन होऊन लोखंड सोनें बनलें खरें, पण लोहचुंबकाची व त्याची संगत तुटली व त्यामुळें लोहचुंबकाचें सामर्थ्य ओळखण्याची त्याची लायकी ही पण गेली, तशीच वरील पंडितांची स्थिति आहे. ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, ब्राह्मांचा धर्म, प्रार्थनासमाज, या सर्वांतील देवाकडे जितकें सन्निध जावें व तन्मय व्हावें, तितका इकडचा संबंध तुटला, व महाराष्ट्र कवींच्या कृतींवर अभिप्राय देण्याचा तितका अधिकार ही कमी झाला.* पोरपणाचा अनुभव जसा तरुणपणीं नाहीं, तरुणपणाचा वार्ध-

* दादोबांनीं 'यशोदापांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत असाच अभिप्राय दर्शविला आहे:—

"ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि देण्यास, त्याच देशाचे डोळे आणि जीभ

क्यांत नाहीं, वीराचें बाहुस्फुरण भित्र्यास नाहीं, कामिजनाचा रोमांचानुभव क्लीबास नाहीं, तसेंच मूर्तिपूजकांच्या काव्यांतील प्रेम इतर धर्मांच्या लोकांस कळायाचें नाहीं, व त्यांच्या काव्यांतील रसानुभव मूर्तिपूजकांस घेतां येणार नाहीं. यास्तव ज्यानें त्यानें आपला जितका अधिकार आहे तितकाच सांभाळून त्याचें अतिक्रमण न करणें हें फार बरें. आमच्या रावबहादुरांस व त्यांच्या सद्धर्मानुसारी समाजबंधूंस आमच्या मूर्तिपूजक कवींचें काव्य पसंत न झालें ह्मणून तें वाईट ठरलें असें मुळींच होत नाहीं. जोंपर्यंत हजारों महाराष्ट्रजनांच्या हृदयास आमच्या सरस्वतीप्रिय **मयूरा**चा टाहो भेदून जात आहे, जोंपर्यंत त्याचा सारा पिसारा उभारलेला पाहून त्याच्या अप्रतिम वैचित्र्यानें जनसमूह चकित होऊन राहत आहे, जोंपर्यंत मेघदर्शनजनित हर्षभरांत तो नृत्य करीत असतां वाग्देवीच्या नूपुरांचा मंजुल रव रसिकजनांस त्यांच्या कर्णांची धन्यता वाटवीत आहे, तोंपर्यंत किती ही रेवरेंड साहेबांचे, मुल्लासाहेबांचे किंवा रावबहादुरांचे अभिप्राय त्यास प्रतिकूळ पडले तरी त्यास तिळमात्र ही धाक वाळगायाला नको. एका कवीनें ह्मटलें आहे:—

उदितवति द्विजराजे कस्य न हृदयं मुदं परां धत्ते ।
संकुचसि कमल यदयं हर हर वामो विधिर्भवतः ॥

"चंद्राचा उदय झाला असतां कोणाचें हृदय आनंदभरानें व्याप्त होत नाहीं? पण अशा वेळीं ही जेव्हां तुझा संकोच होतो, तेव्हां हे कमला! तुझें दुर्दैव बलवत्तर ह्मटलें पाहिजे!" याप्रमाणेंच आमच्या 'द्विजराजा'च्या वाणीचा रसानुभव घडण्यास ज्यांस समाज आडवा येतो ते एकेश्वरभक्त ही अत्यंत अनुकंपनीय मात्र होत!

---

असला पाहिजे. इतर लोकांच्यांनां तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें ह्मणणें नाहीं. कदाचित् ते विशालबुद्धीचे परीक्षक असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील. परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सुज्ञांस आनंद होईल, त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानांस होणार नाहीं. याचीं कारणें बहुत आणि सूक्ष्म आहेत. ज्या लोकांत वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापर व्यवहार, रीति, भाती, विद्या, ज्ञान, आचार, या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात, ह्मणून त्यांच्या काव्यानें जे हर्षशोकादि विकार त्यांच्या मनांवर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं मनें तशीं रंगलीं नसतात त्यांजवर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे."

सुभाषित—

(१) परस्परं संवदतां जडानां मौनं विधेयं सततं सुधीभिः ।
कोलाहले काकजनस्य जाते विराजते कोकिलकूजितं किम् ॥१॥

"मूर्खांचें परस्पर भांडण लागलें असतां बुद्धिमान् पुरुषांनीं नेहेमी मौन धारण करावें हें बरें; कावळ्यांचा कलकलाट चालला असतां कोकिलाचें कूजित शोभतें काय?"

(२) उपभुक्तखदिरवीटीजनिताधररागभंगभयात् ।
पितरि मृतेऽपि हि वेश्या रोदिति हा तात तातेति ॥

"विडा खाऊन कातानें तोंड रंगलें असतां अधरोष्ठाची लाली मोडेल या भयानें वेश्या ही आपल्या बापाच्या मरणाची बातमी ऐकून निरोष्ठ शोक करते, "हा तात! हा तात!" ('हा पितः' ह्मणेल तर ओठाला ओठ लागून अधररागाचा भंग होईल!)

(३) किमंगारवद् गां खुरैः स्पर्शयंत. कुरंगा इवांगानि संकोचयंतः ।
अटंतो नटंतो भटं तोषयंतस्तुरंगाः सुरंगाः पुरं गाहयंति ॥

"पृथ्वीवर जणों काय निखारेच पसरले आहेत अशा भावनेनें तिला खुरां-नीं स्पर्श करणारे न करणारे, हरणांप्रमाणें अंगसंकोच करणारे, फिरणारे, नाचणारे, आणि राउताच्या मनांत भरणारे, असे चांगल्या चांगल्या रंगाचे घोडे नगरींत प्रवेश करिताहेत!"

(४) यदि प्रभुरुदारधीः सुरसकाव्यकौतूहल-
स्तथैव च सभासदः सदसि तद्गुणग्राहिणः ।
सुवर्णसदलंकृतिर्भवति तत्र नृत्योद्यता
मदीयरसनानटी रसघटीयमानंदभूः ॥

"जर प्रभु उदार असेल आणि सुरस काव्याच्या श्रवणाविषयीं त्यास हौस असेल, त्याप्रमाणेंच सभासद हे काव्यगुणग्राहक असतील, तर रसाची केवळ पात्रीच आणि आनंददायक अशी जी माझी जिव्हारूप नटी, ती सुवर्ण-(सोनें; उत्तम वर्ण)—घटित अलंकारांनीं ( श्लेष स्पष्टच आहे ) युक्त होत्साती सभेंत नृत्य करण्यास तयार आहे!"

( ५ ) यन्नाम्नः प्रथमाक्षरं विजयते भानौ द्वितीयाक्षरं
नृत्यं नृत्यति सत्कवींद्रवदने भूत्वांत्यवर्णद्वयम् ।
रामो रावणमाजघान समरे शंभोः शिरःशालिनी
सा सर्वाक्षरमालिनी भवतु मे भाग्याय भागीरथी ॥

" जिच्या नांवाचें पहिलें अक्षर ( भा—' तेज' ) सूर्याचे ठायीं विराजमान होतें, दुसरें ( गी—' वाणी' ) सत्कवींच्या वदनाचे ठायीं नृत्य करतें, आणि शेवटलीं दोन अक्षरें ( रथी ) होऊन रामानें रावणास रणांगणीं मारिलें, ती शंभुशिरीं शोभणारी सर्वाक्षरयुक्त भागीरथी माझा भाग्योदय करो !"

( ६ ) स्वयं स्थाणुरपर्णा स्त्री विशाखस्तनयः स्मृतः ।
तथापि कुरुते छायां भवतापापहारिणीम् ॥

" शिव हा स्वतः स्थाणु ( शंकर; झाडाचा बुंधा ) आहे, स्त्री अपर्णा( पार्वती; पर्णरहिता ) आणि पुत्र विशाख ( कार्तिकेय; शाखारहित ) होय, तरी शिवाची छाया संसारतापास दूर करते !"

( ७ ) बिडौजाः पुरा पृष्टवानब्जयोनिं धरामंडले सारभूतं किमस्ति ।
चतुर्भिर्मुखैरुत्तरं तेन दत्तं तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ॥

" पूर्वी एके समयीं असें झालें कीं इंद्रानें ब्रह्मदेवास प्रश्न केला, कीं पृथ्वीतलावर सर्वोत्कृष्ट वस्तु आपण कोणती निर्माण केली आहे ? ब्रह्मदेवानें चारी मुखांनीं एकदम उत्तर केलें , " तमाखु, तमाखु, तमाखु, तमाखु !"

( ८ ) कीटोऽयं भ्रमरी भवेदविरतध्यानात्तथा चेदहं
रामः स्यां त्रिजटे तथाह्यनुचितं दांपत्यसौख्यच्युता ।
एवं चेत्कृतकृत्यतैव भविता रामस्तव ध्यानतः
सीता त्वं च निहत्य राक्षसपतिं सीतांतिके यास्यति ॥

सीता अशोकवनिकेंत असतां तिनें व त्रिजटेनें एका भ्रमरानें एक किडा धरलेला पाहिला. त्यावरून सीता त्या राक्षसीस ह्मणते:—

" हे त्रिजटे ! या किड्यास भ्रमराचें ध्यान सारखें लागलें असल्यामुळें हा भ्रमर होईल, तद्वतच मी ही जर राम बनलें तर मोटें अनुचित होऊन मी दंपत्यसौख्यापासून भ्रष्ट होईन." त्रिजटा ह्मणते, " असें जर घडेल तर कृ-

तद्रूपता होईल; कां तर राम तुझ्या ध्यानेंकरून सीता होईल, आणि तूं राम होत्साती रावणास मारून सीतेच्या भेटीस जाशील !"

(९) जन्मप्रभृति वक्रस्य हलस्य च खलस्य च ।
सोढुं तयोर्मुखाक्षेपं भवत्येकैव सा क्षमा ॥

" जन्मापासून वक्र जो हल (नांगर) आणि खल त्यांच्या तोंडाचा तडाखा सोसण्यास एक क्षमाच (पृथ्वी; क्षांति) समर्थ !"

(१०) धत्तूरधूर्त तरुणेंदुनिवासयोग्ये
स्थाने पिशाचपतिना विनिवेशितोऽपि ।
किं कैरवाणि विकसंति तमः प्रयाति ।
चंद्रोपलो द्रवति वार्धिरुपैति वृद्धिम् ॥

" हे शहाण्या धोतऱ्या ! जें स्थान बालचंद्राच्या वसतीस योग्य तेथें शंकरानें तुला ठेविला असतां ही तुझ्या योगानें कैरवें विकास पावतात काय? अंधकाराचा नाश होतो काय ? चंद्रकांत द्रवतो काय ? आणि समुद्र वाढतो काय ?"

(११) तथ्यं पथ्यं सहेतु प्रियमितमृदुलं सारवद्दैन्यहीनं
साभिप्रायं दुरापं सविनयमशठं चित्रमल्पाक्षरं च ।
वह्वर्थं कोपशून्यं स्मितयुतघनदाक्षिण्यसंदेहहीनं
वाक्यं ब्रूयाद्रसज्ञः परिषदि समये सप्रमेयाप्रमत्तम् ॥

" रसज्ञानें सभेंत समय पाहून जें वाक्य बोलायाचें तें अशा प्रकारचें असावें:-- खरें, हितकर, सप्रमाण, प्रिय, मित, मृदु, अर्थयुक्त, धीटपणाचें, साभिप्राय, दुर्लभ, विनययुक्त, प्रांजल, मनोहर, स्वल्प, प्रौढ, शांत, सस्मित, दाक्षिण्ययुक्त, निःसंदेह, प्रमेयसहित, आणि प्रमादरहित."

(१२) पदशब्दलीनहृदयो रूपालंकारभावनाचतुरः ।
कविरिव विनिहितनिद्रस्तरुणि तवार्थे स्थितस्तरुणः ॥

दूती नायिकेस सांगते:--

" हे तरुणि, जसा कवि पदांच्या व शब्दांच्या रचनेंत गढून गेला असतो व रूपकालंकार साधण्याविषयीं चतुर असतो, त्याप्रमाणें नायक हा निद्रेचें मिष करून तुझ्याकरतां संकेतस्थानीं येऊन बसला आहे; कसा तर तुझ्या

पावलाचा शब्द ऐकण्याविषयीं परमोत्सुक आणि तुझें रूप व अलंकार यांची मनोमय भावना करण्यांत चूर होऊन गेलेला असा!"

(१३) उद्भिन्नं किमिदं मनोभवनृपक्रीडारविंदद्वयं
सूते तत्कथमेकतः किल लसद्रोमावलीनालतः।
चक्रद्वंद्वमिदं क्षमं तदपि न स्थातुं मुखेंदोः पुरो
लावण्यांबुनि मग्नयौवनगजस्यावैमि कुंभद्वयम् ॥

कोणी कवि स्तनद्वयावर उत्प्रेक्षा करतो:—

"मदन नृपाचें हें क्रीडाकमलद्वय उत्पन्न झालें आहे काय! पण असें ह्मणावें तर उदरस्थलावर शोभणारी जी रोमावलीरूप वेली ती एक असतां या पुष्पद्वयास कशी प्रसवेल? तेव्हां ही कल्पना जमत नाहीं. बरें, हें चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें आहे ह्मणावें तर मुखचंद्राच्या समोर हें वियुक्त झाल्याखेरीज कसें राहील? तेव्हां माझा असा तर्क होतो कीं लावण्यरूप जलाशयांत बुडी मारून राहिलेला जो यौवनरूप गज त्याचें हें गंडस्थल होय!"

(१४) दंता विश्लथदंताः केशाः काशप्रसूनसंकाशाः।
नयनं तमसामयनं तथापि चित्तं धनांगनायत्तम् ॥

"दांत हालूं लागले, केश हे काशपुष्पांप्रमाणें पांढरे झाले, डोळे हे अंधकाराचें स्थान झालें, तथापि चित्ताची आसक्ति धन आणि स्त्री यांवरील कमी होत नाहीं!"

(१५) तप्ता मही विरहिणामिव चित्तवृत्ति-
स्तृष्णाऽध्वगेषु कृपणेष्विव वृद्धिमेति।
सूर्यः करैर्दहति दुर्वचनैः खलो नु
छाया सतीव न विमुंचति पादमूलम् ॥

उष्णकालांतील मध्यान्हाचें वर्णन:—

"विरही पुरुषांच्या चित्तवृत्तीप्रमाणें पृथ्वी ही अत्यंत तप्त झाली आहे, कृपणांचे ठायीं जशी (धन—) तृष्णा वाढत असते त्याप्रमाणें पांथांची या वेळेस वाढत आहे, जसा दुर्जन हा दुर्वचनांनीं दुसऱ्यास जाळीत असतो त्याप्रमाणें सूर्य हा आपल्या किरणांनीं संताप करीत आहे, आणि छाया ही साध्वीप्रमाणें चरणांची मिठी सोडीत नाहीं!"

(१६) जीवंतु मे शत्रुगणाः सदैव तेषां प्रसादात्सुविचक्षणोहम् ।
ये ये यथा मां प्रति बाधयंति ते ते तथा मां प्रति बोधयंति ॥

"माझे शत्रुगण चिरकाळ जिवंत असोत; त्यांच्या प्रसादानें मला बुद्धि प्राप्त झाली आहे. जे जे मला बाधा करतात ते ते मला त्याच मानानें बोध ही करतात."

(१७) रोलंबो मधुपः पिकस्तु परभृद्रंध्रानुसारी मरुद्
हंसाः केवलपक्षपातनिरताश्चंद्रोऽपि दोषाकरः ।
चेतो नैति शुकस्त्विहैकपठिताख्यायी पयोदो जडः
कं वाहं प्रहिणोमि हंत कठिनस्वांताय कांताय मे ॥

कोण्या विरहिणीची उक्तिः—

"कठिनहृदय जो वल्लभ त्याच्याकडे दूत तरी कोण पाठवावा! भ्रमर तर मधुप (मद्यप), कोकिल दुसऱ्याचे घरीं वाढलेला, वायु हा रंध्रान्वेषी, हंस हे केवळ पक्षपात करणारे (नेहेमी पंख हलवणारे), चंद्र हा दोषाकर (दोषांची खाण; निशाकर), मनाच्यानें तर जाववतच नाहीं, शुक पढविलेलें तेवढें बोलणारा, आणि मेघ हा जड (मंदबुद्धि) होय!"

(१८) बहुनिष्कपटद्रोही बहुधान्योपघातकः ।
रंध्रान्वेषी च सर्वत्र दूषको मूषको यथा ॥

खल आणि मूषक यांचें साम्य—

"(खलपक्षीं)—जे अत्यंत निष्कपट त्यांचा द्रोह करणारा, प्रायः दुसऱ्याच्या नाशाविषयीं उद्युक्त, आणि सर्वत्र छिद्रान्वेषणाविषयीं तत्पर, असा खल असतो."

"(मूषकपक्षीं)—अत्यंत मूल्यवान् वस्त्रांचा नाश करणारा, धान्याचा विध्वंस करणारा, आणि जिकडे तिकडे भोकें पाडणारा."

(१९) आजन्मानुगतेऽप्यस्मिन्नाले विमुखमंबुजम् ।
प्रायेण गुणपूर्णेषु रीतिर्लक्ष्मीवतामियम् ॥

"जन्मापासून अनुगत ह्मणजे मागें असणारें जें नाल त्याशीं ही कमल हें विकसित होऊं लागलें असतां विमुख होतें; तेव्हां लक्ष्मी ज्यांस प्राप्त होते त्यांची गुणवंतांविषयीं ('गुण' शब्द श्लिष्ट होय) अनास्था व्हावयाचीच!"

(२० ) तवैव प्रावीण्यं जलद जगदानंदकरणं
यदंभःपालीराहरसि खलसत्त्वाज्जलनिधेः ।
निसर्गात्क्षारास्ता नयसि च कथंचिन्मधुरता-
मथासारैस्तासां युगपदुपकर्तासि जगतः ॥

"हे मेघा ! तुझेंच कौशल्य या जगास आनंद करणारें आहे. तें असें कीं, दुष्टसत्त्व ( दुष्टस्वभाव, पक्षीं दुष्ट आहेत जलचर ज्यांत ) जो समुद्र त्यापासून उदकसमूहाचें तूं हरण करतोस, आणि तीं उदकें स्वभावतः क्षारयुक्त असतां त्यांचे ठायीं तूं चमत्कारिक रीतीनें माधुर्य उत्पन्न करून त्यांच्या वृष्टींनीं जगाचें हित करतोस !"

---

विनोद, महदाख्यायिका——( सेवकांची रीत )—"एकच चाकर असला, तर आपलें काम होण्यास हरकत पडणार नाहीं; दोन असले, ह्मणजे तें निम्में झालें ह्मणून समजावें; तीन असले, ह्मणजे मग तें आपलें आपणच करावें हें बरें !"

## चोराचोरांत अंतर.

• • एका गांवांत एक पोलिसचा शिपाई रात्रीची गस्त घालीत असतां तेथील पलटणींतल्या कांहीं सोजरांनीं त्यास एकटा गांठून त्याचा डगला काढून घेतला, व त्याजपाशीं कांहीं रुपये होते ते ही उपटले. तो शिपाई दुसरे दिवशीं कपतानाकडे गेला आणि रात्रींच्या चोरीची हकीकत त्यानें त्यास कळविली. कपताननें त्यास पुसलें, "ही तुझ्या अंगांत जी बंडी आहे ती रात्रीं होती काय?" शिपायानें होय ह्मणून सांगितलें. तें ऐकून कपतान् उत्तर करतो. "असें ज्या पक्षीं आहे, त्या पक्षीं माझ्या पलटणींतल्या सोजरांनीं तुला खास लुबाडला नाहीं. कांकीं त्यांचा हात पडल्यावर डगला राहायाचा नाहीं व बंडी ही राहायाची नाहीं !"

## गप्पीदास.

एके प्रसंगीं एका इटालियनाची व फ्रेंचाची गांठ पडून कोणाचा देश ज्यास्त सुपीक ह्मणून दोघांचा वाद लागला. फ्रेंच मनुष्य ह्मणाला. "फ्रान्सांतील जमीन इतकी सुपीक आहे कीं, आदल्या दिवशीं गवत कापून तींत जर घोडा चरायास सोडला तर दुसऱ्या दिवशीं त्याच्या खुराइतकें गवत उग-

वलेलें आढळतें ?" त्यावर इटालियन उत्तर करतो, "अं:, यांत काय आहे ? आमच्या इटालींत तर असें आहे कीं, आदल्या दिवशीं घोडा सोडून दिला तर तो दुसऱ्या दिवशीं सांपडत ही नाहीं !"

## बारा वर्षांनीं भेट.

दोघा स्नेह्यांची फार दिवसांनीं गांठ पडली. तितक्या काळांत एकजण खूप लठ्ठ झाला होता व दुसरा तितकाच रोडला होता. तेव्हां पहिला दुसऱ्यास ह्मणतो, "काय रे बाबा, आपली मागें गांठ पडली होती तेव्हांपासून आजपर्यंत तूं मुळींच जेवला नाहींस कीं काय असें तुला पाहिलें ह्मणजे वाटतें !" त्यास दुसरा उत्तर करतो, "तुजकडे पाहिलें ह्मणजे ही असेंच वाटतें कीं, तेव्हांपासून तुझें जेवण ह्मणून सुटलेंच नाहीं. आपला सारखा बकाणे मारीत होतास कीं काय कोण जाणे !"

## चमत्कारिक समज.

एक अलगुज वाजवणारा पैसा घेऊन अलगुज शिकवीत असे. एकजण त्याजकडे गेला आणि ह्मणाला, "मला अलगुज वाजवायाला शिकायाचें आहे, तर काय फी पडेल ?" अलगुजवाल्यानें सांगितलें, "मी पहिल्या महिन्याला दोन गिनी व दुसऱ्याला एक याप्रमाणें फी घेत असतों." हें ऐकून वरील गायनविद्येचे शौकीन त्यास ह्मणतात, "बरें तर, मी पुढल्याच महिन्याला एक गिनी घेऊन येईन !"

## द्वाड पोर.

एका द्वाड पोरानें आपल्या आजोबाचा चष्मा घेऊन त्याचीं भिंगें काढून ठेवलीं आणि चष्मा जसाचा तसा पिशवींत घालून ठेवला. आजोबांनीं दुसरे दिवशीं नेहेमींप्रमाणें चष्मा नाकाला लावला, आणि पाहूं लागले तों कांहींएक दिसेना. तेव्हां ह्मातान्यास वाटलें कीं आपली दृष्टि अगदीं मंद झाली. पण इतक्यांत त्याच्या मनांत आलें कीं, न जाणों भिंगांवर मळ सांचला असेल. मग तो काढून टाकण्याकरतां त्यानें चष्मा खालीं काढला, आणि भिंगें साफ करणार तों तीं ही हाताला लागेनाशीं झालीं. हें पाहून तर वरील गृहस्थ फारच घाबरला, आणि ह्मणतो, "अरे, हें काय ? माझें स्पर्शज्ञान ही नाहींसें झालें !"

## जुनीं कुळें.

एका गृहस्थाच्या घरीं मेजवानी होती. तीस एका वैद्यास बोलाविलें होतें. वैद्यबोवा आले तेव्हां जेवणास बराच अवकाश होता. यास्तव ते जवळच श्मशानभूमि* होती तींत अंमळ फिरायाला गेले. तेथील थडगीं पाहण्यांत व त्यांवरील लेख वाचण्यांत ते गुंतले आहेत तों इकडे सारी मंडळी येऊन मेजांवर ताटें येऊन पडलीं. घरचा यजमान सारी मंडळी आली कीं नाहीं ह्मणून पाहतो तों एक वैद्यबोवा मात्र नाहींत. शोध करतां समजलें कीं स्वारी सर्वांच्य आधीं दाखल होऊन जवळच्या कबरस्थानांत गेली आहे. तें ऐकून तो ह्मणतो, "वाः, जेवायाचें टाकून याच वेळेस ही काय लहर लागली आहे?" एक बुभुक्षु उत्तर करतो, "आपल्या जुन्या कुळांपैकीं कांहीं असामींची भेट घेत असतील!"

## सर टॉमस् मोअर.

आठव्या हेन्‌री राजाच्या कारकीर्दींत वरील नांवाचा एक मोठा प्रसिद्ध मनुष्य होता.* हेन्‌री व फ्रान्सूचा राजा फ्रान्‌सिस् यांची लढाई लागली असतां एके प्रसंगीं हेन्‌रीनें त्यास एक कामगिरी सांगितली; ती ही कीं, फ्रेंच राजाच्या गोटांत जाऊन त्यास हेन्‌रीच्या तर्फेनें एक खडखडीत जबाब करून यावयाचें! फ्रान्‌सिस् राजा हेन्‌रीच्या सारखाच अतिशय तापट होता; यांस्तव **मोअरनें** आपल्या धन्यास विनंति केली कीं असला निरोप मी त्याजकडे नेला असतां तो मला जिवंत माघारी येऊं देईलसें वाटत नाहीं. हेन्‌री ह्मणतो, "अंः, त्याची कांहीं फिकीर नाहीं, फ्रान्‌सिस्‌नें तुझें डोकें मारलें, तर लंडन् शहरांतल्या प्रत्येक फ्रेंचाचा मी चांगला खरपूस समाचार घेईन." मोअर उत्तर करतो, "महाराज, तें खरें; पण मला सध्यां पंचाईत येवढीच वाटते कीं, आपण पारिपत्य केलेल्या फ्रेंचांपैकीं एकाचें तरी डोकें माझ्या धडाला उपयोगीं पडेल कीं नाहीं कोण जाणें!"

## आगाऊ शिक्षा.

**पीटर दि ग्रेट्** यानें इराणावर स्वारी केली असतां एका शिपायास कामांत हयगय केल्याबद्दल दुसऱ्याच्या बद्दल गैरसमजानें फटके बसले. ही गोष्ट पुढें **पीटर**

---

* याविषयींची एक आख्यायिका मागें ( अंक २ ) आलीच आहे.

यास समजल्यावर त्यानें वरील शिपायास सांगितलें कीं, "झालेल्या गोष्टीस इलाज नाहीं, पण असा प्रसंग तुजवर कधींमधीं येणारच, तर तुला येवढेंच सांगून ठेवतों कीं पुन: सजा होण्याचे वेळेस आह्मांस कळव, ह्मणजे हे तुकते मिळालेले फटके त्या वेळेस हिशेबांत धरूं." त्याप्रमाणें पुढें घडून आलेंच; तेव्हां मागील वजावाट त्या वेळेस करून घेतली !

## शुद्ध ना बुद्ध.

एक बाप एका वैद्याकडे गेला आणि ह्मणाला, "वैद्यबोवा, आमची मुलगी आज सकाळीं दोन घटका भूल येऊन पडली, तर यावर कांहीं औषधाची योजना करा. तिची अगदीं शुद्ध बुद्ध नाहींशी झाल्यानें आह्मी फार घाबरलों." वैद्य उत्तर करतो, "अहो, दोन घटकेच्या प्रसंगाला तुह्मी इतके भ्यालां. कित्येक लोक तर असे बहादर आहेत कीं, साऱ्या जन्मांत त्यांना शुद्ध ना बुद्ध!"

## सोईची तजवीर.

फ्रान्स देशांत क्याथलिक धर्माचा प्रचार आहे. तेव्हां येथें वसई गोवें वगैरे ठिकाणीं जसे समारंभ होतात तसेच तिकडेही होतात. वरील देशांतील एका खेडेगांवच्या मजुरांनीं आपआपसांत वर्गणी करून एक बरीच रक्कम उभी केली, आणि असें ठरविलें कीं, प्रभु येशूच्या शूलारोपणाचें चित्र काढवून तें देवळांत लावावें. मग त्यांपैकीं कांहीं जण एका चिताऱ्याकडे गेले आणि त्यांनीं आपला संकल्प त्यास कळविला. चिताऱ्यानें विचारिलें, "ख्रिस्ताची तजबीर जी काढायाची ती जिवंतपणाची काढायाची कां मेला आहे अशी काढायाची ?" हा प्रश्न ऐकून वरील भाविक मंडळी क्षणभर स्तब्ध झाली; कांकीं ही गोष्ट त्यांच्या पैकीं एकाच्या ही मनांत आली नव्हती. मग सर्व आपआपसांत कुजबुजूं लागले आणि याला उत्तर काय द्यावें ह्मणून विचार करूं लागले. शेवटीं सर्वांच्या तर्फेनें एकानें चिताऱ्यास सांगितलें कीं, "येशू जिवंत आहे अशीच तजबीर काढा; ती जर आमच्या मनांत चांगली भरली नाहीं तर मग त्यास मारतां येईल !"

## नीरक्षीरभेद.

विलायतेंत एक बुटलेर साहेब दारावरून दूधवाला जातांना पाहून दोन

भांडीं घेऊन रस्त्यांत धांवले. गवळ्यानें विचारलें, “ हीं दोन भांडीं कशाला? दोन्हीं भरूं कीं काय ?” बुटलेर उत्तर करतो, “ छे छे, तसें नव्हे; हें भांडें दुधाकरतां आणि हें पाण्याकरतां, यांत दूध व पाणी हीं निरनिराळीं घातलींस, ह्मणजे मग आह्मांस पाहिजे तशीं तीं मिसळायाला सांपडतील!”

## पक्का शाहाणा.

एक मनुष्य जहाजावर नुकताच चाकरीस राहिला होता. एके समयीं जहाज हाकारण्याच्या संधीस त्यास त्याच्या धन्यानें सांगितलें, “ अरे जा, खालच्या मजल्यावर जा आणि एक दारूचा करंडा आण.” नवीन चाकर उत्तर करतो, “ धनी साहेब, जहाज हाकारण्याची तयारी चालली आहे, आणि आतांच मला खालीं जाण्यास आपण सांगतां. मी खालीं गेलों आणि इतक्यांत जहाज चालू झालें तर फुकट मी तेवढा एकटा मागें राहणार आहें!”

## वरच्याचा सोबती.

एक गृहस्थ प्रवासाला निघाला असतां त्याच्या पिशवींत एक बद्दू गिनी होता. तो त्यानें पुष्कळ वेळां चालवून पाहिला होता, पण कोठें ही चालला नाहीं. तेव्हां त्यानें विचार केला कीं, ही संधी बरी आहे, वाटेच्या कामांत हा कोठें तरी खपला जाईल. मग त्यानें तो आपल्या चाकराच्या हवालीं केला, आणि त्यास सांगून ठेवलें कीं कोठें तरी हा लाटून दे. पुढें दोन दिवसांनीं धनी चाकरास पुसतो, “ काय रे, तो गिनी चालला का कोठें ?” चाकर उत्तर करतो, “ चालला तर काय झालें, पण लई हिकमत करावी लागली. खाणावळींतून तो कोणी ही घेईना, जो तो चटदिशीं माघारी फेकून देई. शेवटीं काल जकातीच्या नाक्यावर केली लटपट,—केलें काय, तेथें चार पेंन्स द्यावयाचे होते. तेव्हां दोन पेन्स काढले आणि त्यांच्या मधें दिला गिनी दुसडून ! जकातवाल्यानें तीं तिन्हीं नाणीं घेतलीं, आणि चटदिशीं खिशांत टाकून दिलीं. मी मनांत ह्मटलें, झालें काम ! !”

## पत्रें.

राº राº निबंध–माला–कर्ते यांस––

विº विº. मागें मी राशींचे उत्पत्तीविषयीं पाश्चात्त्य ज्योतिष्यांचे काय विचार आहेत ते आपले उपयुक्त पुस्तकद्वारें महाराष्ट्र जनास कळविले. ( अंक ३८ पृº २९ पहा ). त्या पत्रांतच बाराही राशींचीं कथानकें, प्राचीन काळीं विद्या व ज्ञान यांचे संबंधानें नांवाजलेले जे ग्रीक व रोमन लोक त्यांचे पुराणांचे आधारें लिहून पाठवीन असें अभिवचन दिलें होतें. तें आज अंशत: तडीस न्यावें असें योजून पुढील कथानकें पाठविलीं आहेत. तर त्यांस आपल्या येते अंकीं जागा देण्याची कृपा करावी. कळावें, लोभ असावा हे विनंति.

मुº रत्नागिरी.
ताº ४ फेब्रुवारी १८७९.

आपला मित्र,
जº बाº मोº

### १ मेष–कथानक.

या राशींत ६६ तारे आहेत. त्यांपैकीं एक दुसऱ्या प्रतीचा, एक तिसऱ्या प्रतीचा, दोन चवथ्या प्रतीचे, व बाकीचे खालच्या प्रतींचे आहेत. एके ठिकाणीं ह्मटलें आहे:––

First from the East, the Ram conducts the year;
Whom Ptolemy with twice nine stars adorns;
Of which two only claim the second rank;
The rest, when Cynthia fills the sign, are lost.

ग्रीस देशांतील थीब्ज नगरचा राजा आथमस् ( Athamas ) यास दोन स्त्रिया होत्या. त्यांपैकीं थोरलीचें नांव नेफली ( Nephele ) व धाकटीचें नांव ऐनो (Ino ) असें होतें. थोरलीचीं फ्रिक्सस ( Phryxus ) व हेली ( Helle ) अशीं दोन मुलें होतीं. राजाचे पश्चात् थोरलीचा मुलगा वडीलपणामुळें राज्यावर बसणार हे सहन न होऊन ऐनो सवतीच्या मुलांना जाच करूं लागली. तेव्हां फ्रिक्सस हा आपली बहीण हेली इला बरोबर घेऊन आपले सख्खे आईनें दिलेल्या सुवर्णलोम-मय मेषावर बसून घर सोडून निघाला, तो आपले बापाचा मित्र व खुद्द आपला सासरा जो कोल्किस (Colchis).

चा राजा ईटिस ( AETES) त्याजकडे येऊन दाखल झाला. वाटेंत मेंढ्याचे अतिवेगामुळें हेली समुद्रांत पडली. तेव्हांपासून त्या समुद्रास हेलीस्पांट ह्मणूं लागले. इकडे फ्रिक्सस यानें मेंढ्याचे आंगावरची सोन्याची लोंकर कापून घेतली व यज्ञ करून त्या यज्ञांत मार्स ( Mars ) देवाप्रीत्यर्थ त्या मेंढ्याचा बळी दिला. तेव्हां त्या मेषास देवाच्या प्रसादानें राशिचक्रांत जागा प्राप्त झाली. पुढें सोन्याचे लोंकरीचे लोभानें ईटिज यानें प्रत्यक्ष आपल्या जांवयाचा वध केला. नंतर ती लोंकर ईटिज याजपासून हिरावून घेण्याकरितां आर्गो ( Argo ) नामक नौकेंत बसून जेसन्* ( Jason ) प्रभृति योद्धे कोल्किस एथें येऊन विजयी होऊन ती लोंकर परत घेऊन गेले.

## २ वृषभ-कथानक.

ह्या राशींत एकंदर १४१ तारे आहेत. त्यांपैकीं कृत्तिकांचे ( Pleiades ) सहा तारे वृषभाचे खांद्यावर आहेत व रोहिणींचे ( Hyades ) पांच तारे बैलाचे तोंडावर आहेत. एके ठिकाणीं ह्मटलें आहे:-

A star of the first magnitude illumines
His radiant head; and of the second rank
Another star beams not far remote.

फिनिशियाचा ( Phœnicia ) राजा आजेनार ( Agenor ) याची युरोपा ( Europa ) ह्मणून एक अति लावण्यवती कन्या होती. तिचें रूप पाहून ज्युपिटर ( Jupiter ) देव अगदीं वेडा होऊन गेला. पुढें एके प्रसंगीं युरोपा ही आपल्या सख्यांसहवर्तमान बागेंत फुलें वेंचीत असतां ज्युपिटर

* जेसन हा थिसेली ( Thessaly ) देशांतील ऐओल्कास ( Iolchos ) प्रांताचा राजा ईसान ( AESON ) याचा पुत्र होता. तो बापाचे मरणसमयीं लहान असल्यामुळें त्याचा काका पेलियस ( Peletia ) यानें राज्य बळकावलें. पुढें मोठा झाल्यावर पुतण्या राज्य मागूं लागला तेव्हां कांहीं तरी निमित्तानें त्याला बाहेर पाठवावें या हेतूनें पेलियस यानें त्यास सांगितलें कीं आपला आप्त फ्रिक्सस याचा वध ईटिस यानें करून सोन्याचे लोंकरीचा अपहार केला; तर तूं आपलें शौर्य प्रकट करून ती परत घेऊन येशील तर तुला राज्य देईन. तें ऐकून जेसन बरोबर पुष्कळ वीर घेऊन निघाला तो कोल्किस एथें पोंचला. तेथें ईटिस याची कन्या मेडिया ( Medea ) इचें प्रेम याच्यावर जडल्यामुळें तिचे साहाय्यानें सुवर्ण-लोम-रक्षक व्यालाचा नाश करून जेसन आपल्या प्रियेसहवर्तमान विजयी होत्साता परत येऊन राज्य करूं लागला.

हा पांढऱ्या शुभ्र बैलाचा वेष धारण करून आजेनार याचीं गुरें जवळच चरत होतीं त्यांत जाऊन मिसळला. त्या शुभ्र बैलास पाहून युरोपा प्रथम त्यास मोठ्या कौतुकानें कुरवाळूं लागली. नंतर कांहीं वेळानें हळूच उडी मारून मौजेनें त्याचे पाठीवर बसली. हें पहातांच तो बैल तेथून निसटला तो समुद्र वलांडून क्रीटी ( Crete ) बेटांत येऊन दाखल झाला. तेव्हां ज्युपिटराचे प्रसादानें राशिचक्रांत वृषभास स्थान प्राप्त झालें असें ग्रीक लोकांचे पुराणांत आहे. परंतु ग्रीक लोक ज्योतिषाचा अभ्यास करून त्यांत वाकबगार होण्यापूर्वी होऊन गेलेले जे ईजिप्तदेशी व ख्यालडी लोक यांचे ग्रंथांतील राशिचक्रांत ही वृषभ आहे. यावरून ईजिप्तदेशी लोक व ख्यालडी लोक यांनीं आपला एपिस ( Apis ) नामक जो वृषभ-रूपी देव त्याची योजना राशिचक्रांत केली असावी असें दिसतें.

## ३ मिथुन-कथानक.

या राशींत ८९ तारे आहेत. त्यांपैकीं एक पहिल्या प्रतीचा, दोन दुसऱ्या प्रतीचे, तीन तिसऱ्या प्रतीचे, व सहा चवथ्या प्रतीचे आहेत.

मिथुनापैकीं क्यास्टर ( Castor ) याचे मस्तकावर पहिल्या प्रतीचा तारा आहे व पालक्स ( Pollux ) याचे मस्तकावर एक दुसऱ्या प्रतीचा तारा आहे. याविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

——— of the famed Ledean pair,
One most illustrious star adorns their sign,
And of the second order shine twin lights.

ग्रीस देशांतील स्पार्टा ( Sparta ) शहरचा राजा टिंडेरस ( Tyndarus) याची स्त्री लेडा( Leda ) इला ज्युपिटर देवापासून कास्टर व पालक्स असे दोन जुळे मुलगे ( मिथुन) झाले. त्यांनीं प्यालेना ( Pallena ) एथें युद्ध-शास्त्राचा अभ्यास केला. पुढें कोल्किस देशाचा राजा ईटिज यानें आपला जांवई फ्रिक्सस याचा वध करून सोन्याची लोंकर संपादिली होती ती त्याजपासून हिरावून घेण्याकरितां आर्गो नामक नौकेंत बसून जेसन् हा योद्धा निघाला तेव्हां हे उभयतां जुळे भाऊ त्याचे बरोबर गेले. युद्धांत त्यांचें अद्वितीय धैर्य व शौर्य दिसून आलें. पालक्स हा शस्त्रप्रयोग व मल्लयुद्ध यांत आणि क्यास्टर हा अश्वविद्येंत कुशल होता. याविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"Fair Leda's twins in time to stars decreed
One fought on foot, one curbed the fiery steed."

*Virgil.*

Castor alert to tame the foaming steed,
And Pollux strong to deal the manly deed.

*Martial.*

टिंडेरस राजाचा भाऊ ल्युसिपस ( Leuciphus ) याच्या कन्या फीबी ( Phœbe ) व टेल्यारिआ ( Telaria ) यांचा अनुक्रमें लिन्स्युस ( Lynceus) व ऐडास ( Idas) यांचे बरोबर विवाह होऊं लागला तेव्हां त्या समारंभास हे उभयतां ( क्यास्टर व पालक्स ) आमंत्रण आल्यावरून गेले. पुढें सदरहू वधूंस आपण वरावें असें मनांत आल्यावरून क्यास्टर यानें युद्ध करून लिन्स्युस याचा वध केला. परंतु ऐडास् यानें उलटा क्यास्टर याचा वध केला. त्यामुळें पालक्स यानें ऐडास् याचा जीव घेतला. पालक्स याची आपले भावावर फार प्रीति होती. परंतु तो अमर असल्यामुळें आपले भावाप्रीत्यर्थ त्याला प्राणत्याग करणें अशक्य झालें. तेव्हां त्यानें ज्युपीटरची प्रार्थना केली कीं, माझा भाऊ जिवंत कर अथवा मला मृत्यु दे. तें ऐकून ज्युपिटरानें क्यास्टरास सजीव करून त्याला ही अमरत्वाचा वर दिला. आणि दोघां भावांची अतिप्रीति पाहून त्या दोघांस राशिचक्रांत एकेच स्थानीं स्थापिलें.

## ४ कर्क—कथानक.

ह्या राशींत ८६ तारे आहेत. त्यांपैकीं एक तिसऱ्या प्रतीचा व सात चवथ्या प्रतीचे आहेत.

एस्ने ( Esne ), डेंडेरा ( Dendera ), व ईजिप्त देशांतील इतर ठिकाणें एथें सांपडलेल्या राशिचक्रांत कर्काच्या स्थानीं बीटल ( Beetle) कीटक काढिलेला आहे. तसेंच इतर पूर्वदेशीय राशिचक्रांत या स्थानीं दोन गर्दभ आढळतात. ख्यालडी भाषेंत गर्दभवाचक जो शब्द आहे, त्याचा अर्थ गढूळपणा असा ही होतो. त्यावरून या राशींत सूर्यानें प्रवेश केला ह्मणजे पूर येऊन नील नदीचें पाणी गढूळ होत असे या गोष्टीस अनुलक्षून हें नांव कदाचित् या राशीस दिलें असेल असें वाटतें. ग्रीक लोकांचे राशि-

चक्रांत ही हीं जनावरें ( गर्दभ ) आढळतात. राक्षसांचा संहार करण्याचे कामीं हे पशु जुपिटराचे फार उपयोगी पडले त्यामुळें त्यांस राशिचक्रांत स्थान प्राप्त झालें असा ग्रीक पुराणाचा आशय आहे. सारांश, या राशीचे स्वरूपाविषयीं मोठा मतभेद आहे. तथापि सर्वसंमत कथा अशी आहे कीं, हर्क्युलीस ( Hercules ) हा महावीर लर्निया वनांतील ( Learnean ) शतमुखी नागाबरोबर युद्ध करण्यास गेला तेव्हां त्यास यश प्राप्त होऊं नये ह्मणून हर्क्युलिसाची सावत्र आई ज्यूनो ( Juno ) देवी इनें सागरांतील एका कर्कास हर्क्युलिसाचे पायांस दंश करण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें तो दंश करूं लागला तेव्हां हर्क्युलिसानें त्याला एका क्षणांत चिरडून टाकिलें. तेव्हां आपली कामगिरी बजाविण्याचे कामीं कर्काचा जीव गेला हें जाणून त्याला ज्यूनो देवीनें राशिचक्रांत जागा दिली.

## ५ सिंह-कथानक.

या राशींत ९५ तारे आहेत. त्यांपैकीं एक पहिल्या प्रतीचा, एक दुसऱ्या प्रतीचा, ६ तिसऱ्या प्रतीचे, व पंधरा चवथ्या प्रतीचे आहेत. एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

“ One splendid star of highest dignity,
One of the second class the Lion boasts,
And justly figures the fierce summer's rays. ”

नेमिया ( Nemæa ) अरण्यांत एक भयंकर सिंह राहत होता. त्याचा वध हर्क्युलिसानें केला. तेव्हां त्या सिंहाला जुपिटरानें राशिचक्रांत जागा दिली असें कित्येक ह्मणतात. कित्येकांचें असें मत आहे कीं, हर्क्युलिस हा साक्षात् सूर्याचा अवतार होय. व त्यानें जे बारा महापराक्रम केले ते सूर्याचे बारा राशिक्रमणाचे सूचक होत. परंतु ग्रीस देशांत हर्क्युलिस अवतीर्ण होण्यापूर्वींचे ईजिप्त देशांतील राशिचक्राचे नकाशांत सिंह रास आढळते. यावरून असें दिसतें कीं, या राशींत सूर्यानें प्रवेश केला ह्मणजे अतिशय ताप होतो, हें दर्शविण्याकरितां ईजिप्त देशी लोकांनीं आपल्या भाषेच्या सांप्रदायानुरूप सिंहाचें चित्र काढून सूर्य-तापाचा अतिशय दाखविला असावा. तसेंच उष्णकाळीं डोंगरांतील आपल्या राहण्याच्या गुहा सोडून तृषाक्रांत झालेले सिंह ईजिप्त देशांतील नील नदीचें पाणी पिण्याकरितां येऊं लागले ह्मणजे त्यांजपासून लोकांना

फार उपद्रव होत असे हें ही त्या समयीं सूर्य राशिचक्रांत जेथें असे त्या स्थलास सिंह हें नांव ईजिप्तदेशी लोकांनीं दिलें याचें कारण संभवतें.

### ६ कन्या–कथानक.

या राशींत एकशें दाहा तारे आहेत. त्यांपैकीं एक पहिल्या प्रतीचा, साहा तिसऱ्या प्रतीचे, व दाहा चवथ्या प्रतीचे आहेत.

न्याय-देवता आस्ट्रिया ( Astræa ) ही सत्य ( सुवर्ण ) युगांत भू-तलावर होती. पुढें पित्तल युग ( द्वापर ) व लोहयुग ( कलि ) यांत लोक पापी झाले. तेव्हां पृथ्वीवरील पापाला भिऊन ती भू-लोक सोडून स्वर्गीं गेली व एका हातांत तराजू ( तूल रास ) व दुसरे हातांत तरवार घेऊन राशिचक्रांत राहाती झाली. एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"Faith flies, and piety in exile mourns;
And Justice here oppressed, to heaven returns."

कित्येकांचें असें मत आहे कीं आथेन्स शहरीं ऐकेरस ( Icarus) ह्मणून एक गृहस्थ राहात होता. कांहीं सुरा-प्राशनानें मत्त झालेल्या कुळंब्यांनीं त्याचा वध केला. तेव्हां त्याची कन्या एरिगान् ( Eregon ) इला तिचा विश्वासू कुत्रा मीरा ( Mæra ) यानें जेथें तिचे बापाचें प्रेत पडलें होतें तेथें नेलें. बापाची ती अवस्था पाहातांच तिनें गळफांस लावून प्राण-त्याग केला. तेव्हां तिची परम पितृभक्ति पाहून तिला राशि-चक्रांत स्थान प्राप्त झालें. याविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"Thus once in Marathon's impervious wood,
Erigone beside her father stood,
When hastening to discharge her pious vows,
She loosed the knot, and culled the strongest boughs."

ईजिप्त देशी लोकांत या राशीविषयीं अशी कथा आहे कीं, ओसिरिस ( Osiris ) नामक देवाचा वध त्याचा भाऊ टैफान ( Typhon ) यानें केला तेव्हां त्याची स्त्री ऐसिस ( Isis ) ही पति-वियोगामुळें इतकी रडली कीं, तिचे अश्रूंनीं नील नदीस पूर आला. नंतर या पतिव्रतेस राशि-चक्रांत स्थान मिळालें.

रा. रा. निबंधमाला कर्ते यांस—

वि० वि०. पुढील कवन येथें ऐकण्यांत आल्यावरून आपणाकडे पाठविलें आहे. यांत नामदेव, तुकाराम, कबीर वगैरे चट साऱ्या मंडळीनें आपापली देवापुढें हजिरी दिली आहे. शिवाय वर्णन ही चमत्कारिक आहे. तर आपल्या सुंदर मालेंत ही सन्मणिमाला ओंवाल अशी आशा आहे.

उठा उठा कमल-नयना । उघडीं स्वरूपलोचना ।
अवघे भक्त-राज मिळून । देवा आले दर्शना ॥ ध्रु० ॥
भक्ती-भावें घेउनि शेला । नामा अंगीं शिऊं आला ॥
मेज द्यावें वा विठ्ठला । स्वरूपाला अवलोकीं ॥ १ ॥
तुझा भक्त तुका वाणी । आणिली खोबऱ्याची गोणी ॥
माळ वैजयंती घेउनी । माळी सावंता आला ॥ २ ॥
दूध शर्करा तूप साई । वाटी घेउनी मिरा बाई ।
करुनि खिचडीची नवलाई । कर्माबाई तिष्ठत ॥ ३ ॥
भक्ती-भावें हारा डेरा । घेउनि आला तुझा गोरा ॥
उठा स्वामी विश्वंभरा । मुख प्रक्षाळा वेगेंसीं ॥ ४ ॥
करुनि जडित अलंकार । आला नरहरि सोनार ॥
शेला घेउनिया कबीर । बहुत सादर भेटीशी ॥ ५ ॥
शिउनी लाल सुरंजी जोडा । रोहिदास करितसे पुढां ॥
उठा स्वामी दृष्टि उघडा । भ्रांती फेडा दासांची ॥ ६ ॥
शुद्ध झाडुनियां दर्बार । आला चोखामेळा महार ॥
स्वामी करितसे जोहार । दर्शन द्यावें जी यासी ॥ ७ ॥
हुर्डा वैराग्य भाजला । कुणबी बोधला आला ॥
भक्ती-भावें निवटला । प्रेमानंदें डोलत ॥ ८ ॥
चुवा चंदन गंध अक्षत । घेउनि आला मालोपंत ॥
कूर्म हका पैं मारीत । बहूत आर्त भेटीसी ॥ ९ ॥
हातीं घेउनियां दर्पण । न्हावी सेना आला आपण ॥
उठा स्वामी पहावें वदन । निंब-लोण उतरिती ॥ १० ॥
शुद्ध अलंकारें शोभली । कानूपात्रा नृत्या आली ॥
महाद्वारीं उभी ठेली । उठूनी बैसा स्वामिया ॥ ११ ॥

ऐशी संतांची मंडळी । उभी असे जी वनमाळी ॥
त्यांच्या चरणींची रज-धूळी । नारायण वंदीत ॥ १२ ॥

मुक्काम पंढरपूर,
२३ । २ । ७९.

आपला वाचक,
क्ष.

श्रीः

भो निबंधमालाकाराः

भवद्ग्रथितमालाकुसुमीभूतस्योनपञ्चाशत्तमाङ्कस्यैकविंशे पृष्ठे समुद्धृतस्य काचिन्मृगाक्षीति पद्यस्य महाराष्ट्रभाषया लिखितोऽर्थो न कविसंमत इति भाति ॥ तादृगवस्थायां मृगाक्ष्यां मन्दास्मितकर्तृत्वारोपकल्पनाया अशक्यत्वात् ॥ किंच 'अहासीदिति' प्रयोगो न 'हस्' धातोस्तस्यैदित्वाद् ह्यन्तेति सूत्रेण वृद्धिनिषेधात् ॥ परं जौहोत्यादिकात्त्यागार्थाद् हाधातोर्लुङि 'यमरमनमातां सक्चे' ति सूत्रेणेदं रूपं सिद्ध्यति ॥ तृतीयचरणगतेनादायेति पदेन वीणां गृहीत्वात्याक्षीदित्येवार्थः समंजसो भवत्कथिततात्पर्यानुकूलश्चेति सहृदया भवन्तो विदांकुर्वन्त्वित्यलं पल्लवितेनेति प्रणतिपूर्वा विज्ञप्तिर्निबंधमालारसास्वादलोलुपस्य कस्यचिद्वाचक—

अहमदनगर, तारीख १७
दिसेंबर सन् १८७८.

मधुकरस्य*

---

*संमतं नः ॥
नि. मा. क.

# निबंधमाला.

## अंक ५५.

### मोरोपंताची कविता.

सुचिंत्य चोक्तं सुविचार्य यत्कृतं
सुदीर्घकालेऽपि न याति विक्रियाम् । *

१. मागील अंकांत रा. ब्र. रानडे यांच्या 'केकावली' विषयक लेखावर आह्मी आपले विचार वाचकांस सादर केले. आतां त्यांतील एका वाक्यावर मात्र चर्चा करणें राहिली आहे तेवढी करून दुसरे आक्षेपक जे डा. विल्सन् साहेब त्यांचा आमच्या कवीविषयींचा लेख कसा काय आहे तो पाहूं.

२. वरील वाक्य हें होयः-- "वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय." आमच्या देशांत द्वैत व अद्वैत या दोन मतांचा प्रचार प्राचीन काळापासून आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहित असेलच. द्वैत मत ह्मणजे जीवात्मा व परमात्मा हे भिन्न होत हें होय, अद्वैत ह्मणजे ते अभिन्न ह्मणजे एकरूपच होत हें होय. पहिल्या मताचे प्रतिपादक असें ह्मणतात कीं, जीव हा अल्पज्ञ, अल्पसामर्थ्य, विकारवश असा असतां सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, व निर्विकार जो परमात्मा त्याशीं त्याचें ऐक्य कसें संभवेल? यास्तव त्यांची सदोदित भेदस्थितीच राहणार, व दोहोंमधला सेव्यसेवकभाव हाही नित्य होय. जीवात्म्यास मुक्ति तीनच, सलोकता, समीपता, आणि सरूपता; सायुज्य मुक्ति त्यास कदापि होणार नाहीं. अद्वैतवाद्यांचें ह्मणणें असें कीं, एका परमात्म्यावांचून अवघ्या विश्वांत दुसरा पदार्थच नाहीं, अवघें चराचर हा त्याचाच आविर्भाव असून सर्व जीव हे त्याचेच अंश होत.† ज्याप्रमाणें

---

* "चांगला विचार करून जें बोलावें व करावें तें दीर्घकालानें ही विकार पावत नाहीं."

† मुकुंदराजानें म्हटलें आहेः—

तुझिये इच्छेचा विस्तार विस्तारिलें हें चराचर ।
जीव अंशें अपार स्फुरसी तूं ॥
प्रतिबिंबीं आभासक जैसा का तरणी सर्वत्र एक ।
तैसा सर्व जीवांसीं प्रकाशक परमात्मा तोची ॥

लाटा, बुडबुडे व गारा हे तिन्ही विकार एका उदकाचेच होत, व तिघांस ही पूर्वस्वरूपास मिळण्याची योग्यता आहे, त्याप्रमाणेंच सर्व जीवमात्र एका परब्रह्माचेच अंशभूत असून त्यांचा पृथग्भाव सरला असतां ते परमात्मस्वरूपास सहजच मिळणारे आहेत. हा पृथग्भाव अहंवृत्तीच्या ह्मणजे 'मी' पणाच्या योगानें झालेला आहे. ह्मणजे वस्तुतः परमात्म्याशीं तादात्म्य असतां जीवानें 'मी निराळा' अशी भावना बळकट धरल्यानेंच कायतो भिन्नभाव आलेला आहे. ज्या वेळेस त्यास स्वस्वरूपाचा बोध होईल त्या वेळेस गार विरून जसें पाणी होतें, त्याप्रमाणेंच अहंवृत्ति ही नष्ट होऊन जीवात्मा परमात्म्याशीं अभेद पावेल. तसेंच चोहोंकडे अफाट पसरलेलें जें हें चराचर विश्व तें ही परमात्म्याच्या केवळ इच्छामात्रेंच उत्पन्न झालेलें असून जसा कोळी आपणच आपल्या शरीरापासून केलेल्या विस्तारास आवरूं शकतो, त्याप्रमाणें साऱ्या जगाचा आपल्या ठायीं लय करण्याचें ही परमेश्वरास सामर्थ्य आहे!

वरील वाद आज शेकडों वर्षें या देशांत चालू आहे. शैव व वैष्णव या मतभेदाचें बीज वरील वादच होय; पहिले अद्वैतवादी व दुसरे द्वैतवादी होत. माध्व व रामानुज हे द्वैतमती आहेत; आणि शंकराचार्यांचे अनुयायी सर्व अद्वैतमताचा अभिमान बाळगतात. आमच्या महाराष्ट्र देशांत पाहिलें तर अद्वैताचाच सर्वत्र प्रचार आहे. महाराष्ट्र कवींपैकीं एक ही द्वैतवादी नाहीं. हिंदुस्थानाच्या बाहेरील राष्ट्रांत पाहतां प्रायः द्वैतमताचाच प्रसार आहे; तरी मुसलमान लोकांत 'सूफी' ह्मणून एक पंथ आहे त्याचीं मतें व ग्रीक लोकांतला मोठा तत्त्वज्ञ जो **प्लेटो** त्याचे तत्त्वविचार हे अद्वैतालाच पुष्कळ अंशीं अनुसरून आहेत. तसेंच सुमारें दोनशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत होऊन गेलेला प्रख्यात तत्त्ववेत्ता **बर्क्‌ले** याच्या उपपत्ति ही वेदांतालाच अनुकूल आहेत.

३. वर येवढा विस्तार करण्याचें प्रयोजन हें कीं, 'वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग' ह्मणजे कोणता तो वाचकांच्या चांगला लक्षांत यावा. तेव्हां यावरून वाचकांस कळून आलेंच असेल कीं, रावबहादुरांचा रोख अद्वैतमतावर आहे. हें मत ईश्वरभक्तीचें विध्वंसक होय असा त्यावर आक्षेप होय.

रा. ब. रानडे हे प्रार्थनासमाजाचे एक अध्वर्यु आहेत हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. या समाजास ख्रिस्ती धर्मांतील तत्त्वें किती संमत आहेत, किंबहुना समाजाच्या उत्पत्तीचा ह्या धर्माशीं कितपत संबंध आहे, हें ही पुष्कळांस बहुधा सांगायाला नकोच. तेव्हां 'पृथ्वीवरील अत्यंत सुधार-

लेल्या राष्ट्रांचा जो धर्म' त्यास परमसंमत जें द्वैतमत तें प्रस्तुत आक्षेपकांच्या मनांत कितपत विंबलें असेल, व त्यामुळें तद्विरुद्ध मत त्यांस कितपत मान्य होण्याजोगें असेल, याची ही कोणास सहज कल्पना होईल. आतां आमच्या महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांतून ओतप्रोत भरलेलें जें अद्वैतमत त्याच्या तर्फेनें रावबहादुरप्रभृति आक्षेपकांस आमचें एक तर हें सांगणें आहे कीं, अनेक पवित्र व सत्य धर्मांस तें कितीही असंमत असलें, व मिशनरी साहेबांनीं त्यावर किती ही नाकें मुरडलीं, तरी जोंपर्यंत जीवात्म्याचें स्वरूप अमुक व परमात्म्याचें अमुक असें कोणाच्या ही प्रत्ययास आलें नाहीं तोंवर अद्वैतमत हें असत्यच असें कोणास ही ह्मणण्यास अधिकार नाहीं. ज्या दिवशीं रसायनज्ञांचीं यंत्रें आध्यात्मिक विषयांवर चालू होतील, व पंचमहाभूतांचें जसें आलीकडे पृथक्करण झालें आहे तसें चैतन्याचें व जगच्चालक शक्तीचें ही होईल, त्या दिवशीं द्वैताद्वैतप्रकरणाचा चोख निकाल होणार आहे. पण हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत अमुक खरें व अमुक खोटें असें आग्रहानें पाहिजे तर ह्मणावें, पण 'जुक्तीं'स धरून कोणासही ह्मणतां येणार नाहीं. त्यांतून ज्या मताचे प्रतिपादक शंकराचार्यांसारखे शेकडों महान् महान् तत्त्वज्ञ होऊन गेले व ज्याची छाया द्वीपांतरीं ही कोठें कोठें दृष्टीस पडते, त्याविषयीं निश्चयात्मक विरुद्ध उल्लेख करणें हें कांहीं अंशीं साहसात्मकच होय.

४. पण हें केवळ प्रस्तुत आक्षेपाच्या सामान्य स्वरूपाविषयीं झालें. साक्षात् त्याविषयींचा विचार तर याहून ही जड जाण्यासारखा आहे. रावबहादुरांच्या ह्मणण्याप्रमाणें पाहिलें असतां अद्वैत मत आणि खरी भक्ति यांचा परस्पर अत्यंत विरोध आहे; ह्मणजे ज्यानें अद्वैत मत अंगीकारिलें त्याच्या हृदयांत भक्तीनें ठाव सोडलाच ह्मणायाचें ! खरेंच, जो येवढा 'निपट धृष्ट' बनला कीं आपण व ईश्वर एकच असें मानायाला लागला, त्याच्या ठायीं भक्ति कशी वास करील? जो दांडगा भक्त,

आधीं होता संतसंग तुका झाला पांडुरंग ।

असें ह्मणायाला चुकत नाहीं,

त्याचें भजन राहीना मूळ स्वभाव जाईना ॥

हें संभवेल तरी कसें? तेव्हां 'विवेकसिंधु'कारापासून तों 'केकावली'कारापर्यंत 'पायलीचे पंधरा व अधोलीचे सोळा झालेले सर्व महाराष्ट्र कवि,' तसेच अळंदी, पंढरपूर, काशी वगैरे ठिकाणीं आजपर्यंत यात्रेस गेलेले कोट्यावधि लोक, जगद्गुरु आचार्यांसारखे सर्व अद्वैतवादी, हे चट सारे अभक्तिमान् झाले ! नि-

दान यांच्यांत ‘ खऱ्या ’ भक्तीचा तरी लवलेश ही मिळायाचा नाहीं ! या ‘ खऱ्या’ भक्तीचें स्वरूप काय असावें याविषयीं आह्मी पुष्कळ विचार करून पाहिला, पण अद्याप आह्मांस उमज पडत नाहीं. तुकाराम नामदेव वगैरे मंडळी ‘ खरे भक्त ’ नव्हेत, ‘ केकावली 'सारख्या काव्यांत ‘ खरी भक्ति ’ नाहीं, तर मग ही भक्तीची चीज आहे तरी कोठें? असें तर नसेल ना, कीं बाप्तिस्मोदकाचें सेचन, त्वगग्राचें लवन, यज्ञसूत्राचें छेदन, अपूपसेवन, हीं महासाधनें जवळ केल्याव्यतिरिक्त ‘ खऱ्या भक्ती 'चा बोध होणेंच नाहीं! अशी कांहीं गुरुकिल्ली असेल तर मग आह्मांस कबूल आहे, कीं आमचे सारे महाराष्ट्र कवि ‘ खऱ्या भक्ती 'चें स्वरूप न जाणतांच निजधामास गेले, व तें आमच्यासारख्यांस ही समजण्याची बहुधा गोष्टच नको !

वरील वाक्य हें इंग्लंडांतल्या एकाद्या त्रैमासिकांत किंवा मिशनरींच्या एकाद्या पत्रांत आलें असतें, तर फारसा चमत्कार वाटण्यास कारण नव्हतें. कारण विलायतेंत मोठमोठ्या ग्रंथकारांस ही इकडच्या अगदीं साधारण गोष्टींचें ही ज्ञान कितपत असतें, व त्यांतून मिशनरी साहेबांच्या मनांत तर आमच्या देशाविषयीं किती पवित्र कल्पना सदोदित घोळत असतात, हें सर्वांस महशूरच आहे. तेव्हां अशांनीं आमच्या देशांतल्या अद्वैतमताची वातमी ऐकली ह्मणजे त्यांस सहजच त्याची तेव्हांच उपपत्ति करतां येणार आहे, कीं हा ख्रिस्तशत्रूचा प्रताप होय ! त्याचा साऱ्या मनुष्यमात्रावर संमोहनास्त्र टाकण्याचा पहिल्यापासून उद्योग सतत चालूच आहे, आणि त्यांतून आमच्या हिंदुस्थानावर तर त्याची जी कृपा आहे ती कांहीं अतोनात! तेव्हां पूर्वीं त्यानें आपण स्वतः जसा देवाशीं धट्टाईनें साम्ना केला व आपणास स्वपरिवारासह अक्षय नरकाग्नींत पाडून घेतलें, त्याप्रमाणेंच बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंच्या मनांत आपण व देव हे एकच आहों अशा अत्यंत धृष्टतेच्या व पातकाच्या कल्पना तो भरवून देत असेल यांत नवल कसचें ? याप्रमाणे तेव्हांच उपपत्ति करून एकाद्या पाश्चात्त्य पंडितानें जर असा सिद्धांत ठोकून दिला असता, कीं असलें दांडगाईचें मत ज्यांचे ठायीं बिंबलें त्यांच्या ठायीं ईश्वरभक्तीचें नांव कशाला पाहिजे, तर तें शोभून गेलें असतें. कांकीं, दूरस्थ मनुष्यास कोणत्या ही गोष्टीचा एकदेशच प्रायः समजत असतो; तेव्हां त्याजपाशीं तर्कशास्त्र कडकडीत असलें ह्मणजे मग तो काय उपपत्ति करूं शकणार नाहीं ? हव्या तितक्या करील. पण तसलें पांडित्य खुद्द तद्देशीयांनीं ही करणें हें अत्यंत असमंजस होय. इकडील मनुष्यानें कोणीं ऐकिलें, कीं विला-

यतेंत व्हिग् पक्षाचे लोक आहेत ते राजाला व प्रजेला समसमान लेखतात, या पक्षाच्या लोकांनीं एका राजावरच राजद्रोह शाबीत करून त्याचें डोकें तोडलें, व त्याच्या पुत्रास पुढें कांहीं वर्षांनीं देशोधडीस लावलें, **जूनियस्** ह्मणून एक बहादर होता त्यानें तर खुद्द राजाला प्रजेच्या तर्फेनें पाहिजे तसें चापून पत्र लिहून वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें,—या सर्व गोष्टी ऐकून इकडे जर कोणी असा तर्क केला, कीं इंग्रेज लोक हे आपल्या राजाला केराबरोबर मानतात, तर त्यास फारसें नांव ठेवतां येणार नाहीं; कांकीं वरील गोष्टी अगदीं विलक्षण असून त्यांवरून दूरस्थ मनुष्यानें वरील अनुमान काढणें हें सहजच आहे. पण तिकडची स्थिति ज्यास नेहेमीं डोळ्यांपुढें दिसते आहे त्यानें ही वरीलच अभिप्राय प्रगट केल्यास चालेल काय? तर याप्रमाणेंच अद्वैतमताचें पुरतें स्वरूप लक्षांत न आणतां, व त्यास अनुसरणाऱ्या लोकांचा आचार पाहतां आपल्या उपपत्तीस ताळा मिळतो कीं नाहीं याचा ही फारसा विचार न करतां, केवळ आग्रहपूर्वक एकादा उल्लेख साऱ्या राष्ट्राच्या संबंधानें करणें हें केवढें साहस होय! अद्वैतवाद्यांनीं केवळ उपपत्तीच्या द्वारें जीवात्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य मानलें ह्मणून व्यवहारदृष्ट्या कोणता भेद झाला? रसायनवेत्त्यांनीं हिऱ्याचें आणि कोळशाचें ऐक्य स्थापित केलें ह्मणून जवाहिऱ्यांचीं दुकानें बसलीं काय? किंवा हिऱ्यांचे दागिने आंगावर घालतांना कोणास आपलें आंग काळें होईल असा धाक वाटला काय? कोणी पदार्थविज्ञान शिकून तयार झाला, आणि हें तत्त्व त्याच्या मनांत पक्कें बिंबलें, कीं पदार्थ निराधार असले ह्मणजे पडतात हें अगदीं खोटें आहे; तर असला मनुष्य आपल्या घरच्या आढ्यावर चढून किंवा एकाद्या कड्यावर जाऊन तेथून खालीं उडी मारील हें संभवतें काय? त्याला जर कांहीं अक्कल ह्मणून असेल तर त्यास सहज कळेल कीं, **न्यूटन्**चा सिद्धांत कितीही खरा असला तरी वरच्यासारखी उडी मला मारतां कामा नये. जोंपर्यंत मी या पृथ्वीवर आहें व तिजपासून कोट्यावधि कोस दूर अंतरालांत जाऊन राहण्याचें मजमध्यें सामर्थ्य आलें नाहीं, तोंपर्यंत माझ्या अंगीं पतनोन्मुखता असली काय किंवा पृथ्वीच्या अंगीं आकर्षणशक्ति असली काय, मला दोन्हीं सारखींच आहेत. **आरिस्टाटॅल्**चें मत खरें असलें किंवा **न्यूटन्**चें खरें असलें, तरी माझी तंगडी मोडायाची ती मोडेलच! हीच गोष्ट द्वैत व अद्वैत या मतांस ही लागू आहे. कोणतें ही मत घेतलें तरी देव व मनुष्य यांचा पूज्यपूजकभाव सुटत नाहीं. द्वैतवाद्याच्या मतें वरील भाव तर सिद्धच आहे; अद्वैतवाद्याच्या मतें तरी द्वैत घा-

लविण्याचा उपाय ईश्वरभजनच होय! अद्वैतवादी असें ह्मणणारा तर कोणी अद्याप निपजला नाहीं, कीं मी सर्व सृष्टि निर्माण केली, सारीं महाभूतें माझ्या सत्तेनें आपापलें काम बजावीत आहेत, मी सर्वशक्तिमान् व सर्वज्ञाता आहें? येवढे अद्वैतवादधुरीण **शंकराचार्य**, पण त्यांनीं ही आपल्या शिष्यवर्गाकरतां ईश्वरोपासनानिमित्त अनेक स्तोत्रें करून ठेविलीं आहेत. उघडच आहे कीं, सोनें ह्मणून कोणापुढें जर अशोधित धातूचें एक ढेकूळ आणून टाकलें, तर त्यानें लागलीच सोनारास बोलावयास जाऊं नये; अगोदर भट्टी तयार करून रसायनक्रियांच्या तजविजीस लागावें, मग जशी भट्टी उतरेल तसें सोनें बनेल. आमच्या शूद्रकवीनें ह्मटलें आहेः–

ब्रह्मज्ञान नव्हे लेंकराच्या गोष्टी । तेथें व्हावा पोटीं अनुताप ॥
दगडाहुनी जीव करावा कठीण । अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥
मेल्या मनुष्याची न धरती आस । तैसा हो उदास संसारासी ॥
तुका ह्मणे येथें कराराचें काम । मग आहे राम जवळींच ॥

तसाच पुढील जनभाषेंत रूढ झालेला अभंग:—

चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचे ॥

तेव्हां केवढा ही निःसीम अद्वैतवादी असला तरी त्यास भक्ति सुटत नाहीं; द्वैताचें मालिन्य झडून अद्वैत सिद्ध होण्यास वरीलच काय तो उपाय होय. व्यवहारांत पाहतां हाच प्रकार आढळतो. वैष्णवांपेक्षां शैवांत कर्मकांडाचा प्रचार कमी आहे असें नाहीं; तसेंच आमच्या महाराष्ट्र देशांतील कवींनीं अद्वैतावर किती ही कटाक्ष ठेवला तरी त्यांनीं भक्तीचा निषेध कोठें ही केला नाहीं. उलटें जेथें तेथें तिचें माहात्म्यच वर्णिलेलें आढळतें. मग इतकें सर्व असून 'हें तत्त्वज्ञान भक्तीचें केवळ विध्वंसक होय' या वाक्याचा अर्थ काय समजायाचा? उपपत्तिदृष्ट्या वरील विध्वंसकता सिद्ध होत नाहीं, आणि व्यवहार तर वरील वाक्याच्या अगदीं उलट नजरेस येतो; मग उक्त वाक्याची प्रतीति घ्यावयाची तरी कोठें?

आतां प्रस्तुत आक्षेपकांचा असा आशय असला तर न जाणों, कीं, खऱ्या एकेश्वरास सोडून सतराशें साठ देवांस जें भजणें ती भक्ति कसची? आलीकडील एकोणिसाव्या शतकांतल्या देवाची सुधारलेल्या रीतीनें उपासना न करतां माजी नेटिव देवांस जुन्या खुळ्या रीतींनीं भजणें हें काय कामाचें? असा कांहीं रावब-

हादुरांचा अभिप्राय असल्यास मग कांहीं बोलणें उरलें नाहीं. जर आमच्या अद्वैतवाद्यांस खरा देव मुळीं सांपडलाच नाहीं, तर मग ते खरी भक्ति करतात तरी कसची? मृगजळच जर मुळीं खोटें, तर मग त्यांत स्नान केल्याची प्रतिष्ठा ती काय वर्णायाची आहे? या आक्षेपांवर येवढें मात्र ह्मणतां येईल, कीं ईश्वराचें स्वरूप सर्व जग जें सामान्यतः समजतें त्यावरून पाहतां, कोणी कशा ही रीतीनें त्याचा स्तव केला तरी तो त्यास मान्य व्हावा असें वाटतें. ऐहिक प्रभूंकडे कोणास अर्ज करायाचा असला तर तो जसा अमुक तऱ्हेनेंच गेला पाहिजे, त्यावर मायना अमुक तऱ्हेचाच असला पाहिजे, अशा शेकडों भानगडी असतात, व तसें कांहीं नसलें ह्मणजे अर्जदारावर अर्द्धचंद्रप्रयोग होण्याचें भय असतें, तसा कांहीं प्रकार या थोरल्या दरबारांत बिलकूल नाहीं असा एकंदर जगाचा अभिप्राय दिसतो. आतां हें खरें, कीं 'जुना करार,' 'नवा करार,' 'कुराण,' 'जेंदावेस्ता,' 'वेद' या सर्वांचें आपल्या परिपक्व बुद्धीनें घाटण करून आमचे नूतन सामाजिक जसें आपल्या एकेश्वरास भक्तीचें मसालेदार खाद्य देतील, तसलें आमच्या जुन्या भक्तमंडळीकडून कोठून मिळणार? त्यांस धड ना व्युत्पत्ति, ना शास्त्रज्ञान, ना व्याकरण; जसे अर्धवोवडे दोन शब्द वेडेवांकडे त्यांस सुचतील तसे त्यांनीं बोलायाचे! तरी पण 'भक्ती'चा अर्थ आह्मांस जो कळतो त्यावरून पाहतां तिचा अंश आमच्या भावड्या भक्तमंडळींत जितका सांपडेल तितका मोठमोठ्या सुधारलेल्या समाजांतून आढळेल कीं नाहीं याचा आह्मांस संशयच आहे. पूर्वीं सोमनाथ मथुरा वगैरे ठिकाणीं कुराणवाल्यांनीं जशी खऱ्या देवाप्रीत्यर्थ धुमाळी केली, तसें एकादें वावटळ पुढें कधीं काळीं पुनः सुटलें ह्मणा; तर अशा प्रसंगीं विश्वेश्वर, महाकालेश्वर, जगन्नाथ, विठोबा, वगैरे देवांच्या संरक्षणार्थ जितकी मंडळी गोळा होईल, तितकी प्रार्थनासमाजमंदिराच्या किंवा दयानंद स्वामी, जोतीबा फुले यांच्या पुतळ्यांच्या बचावाकरितां जमेल काय? आमच्या जुन्या वेडगळ धर्मानें सुलतान महंमद, अवरंगजेब, टिपू सुलतान असल्या जाडी इमामांचा छळ सोसला, व पोप साहेबांच्या शिष्यांनीं ही शक्त्यनुसार त्याचा बराच उच्छेद मांडला असतां त्यांतून ही तो पार पडला; तसला उगीच थोडासा प्रयोग आमच्या 'खऱ्या भक्तिमान्' अर्वाचीन मंडळीवर होण्याचें जर चिन्ह दिसूं लागलें, तर ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, यांच्या दप्तरांतील पटांवर कितीशीं नांवें उरतील बरें? उद्यां जर 'इसापनीतीं'तील वायुसूर्यांच्या भांडणाप्रमाणें विठोबाचा व एकेश्वराचा वाद जुंपून कोणावर आपल्या भक्तांचें

अधिक प्रेम आहे हें त्यांनीं पाहण्याचें मनांत आणलें, आणि पंढरपुरच्या देवळाच्या गाभाऱ्यांत व प्रार्थनामंदिराच्या सभास्थानीं असा नाद घुमला कीं पुढील सालाच्या अमुक अमुक दोन दिवसभर आमच्या भक्तांनीं कडकडीत उपास करावा, तर पारण्याचा तिसरा दिवस उजाडेपर्यंत कोणत्या देवाच्या भक्तांचा धीर निघेल? आह्मांस खचीत वाटतें कीं, तिसऱ्या दिवशीं देवापुढें हजर होण्याचे वेळेस कोणी भक्त जन तरी त्यास असें सांगणारे भेटतील कीं, 'असल्या विलक्षण अटी आह्मीं कधीं सोसणार नाहीं; त्यांतून आह्मी समाजांतील उपासक असलों ह्मणून इतकी घस आह्मी आपल्या अंगाला लावून घेतलीच पाहिजे असें कांहीं ठरत नाहीं!' सारांश, आमच्या नवीन भक्तांस ईश्वराविषयीं कदाचित् अधिक यथार्थ ज्ञान झालें असेल, त्यांनीं दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शकांतून त्याच्या चातुर्याची व सामर्थ्याची अधिक पारख केली असेल, सेंटपॉलच्या देवालयांतील व्यासपीठावर नेऊन उभे केले असतां ते मोठें रसभरित 'सर्मन्' देतील, 'दी. दी.'च्या परीक्षेंत शेंकडा नव्वद मार्क झोडतील, हें सर्व त्यांच्या ठिकाणीं संभवेल; पण 'खरी भक्ति' ही जर शब्दार्थज्ञानापलीकडे कांहीं असेल, तिचा संबंध मानसिक वृत्तींपेक्षां हृदयवृत्तींशीं जर विशेष असेल, ती केवळ भाषणानें जर सिद्ध होत नसेल, तर तिचें वास्तव्य घेरेदार मंडळींत व बूटस्टाकिंगवाल्या खाशा विद्वानांत फारकरून थोडेंच दृष्टीस पडेल;–

देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो ॥

असल्या अटीचे बाणेदार शिपाई जर पाहावयाचे असले तर तुकोबा ग्यानोबा यांच्या कंपूंतच ते आढळणार!

आतां 'खऱ्या भक्ती'चें एक मात्र स्वरूप सांगण्यासारखें राहिलें आहे तेवढें सांगून प्रस्तुत प्रकरण आटपतों. मागील अंकावरून वाचकांस कळलेंच आहे कीं, 'केकावलीं'त **मोरोपंतानें** ईश्वरांत व आपणांत किती अंतर आहे तें न ओळखून त्याशीं सलगी केली आहे. ही सलगी अद्वैतमताचा परिणाम होय व 'खऱ्या भक्तीस' विरुद्ध होय असा रावबहादुरांचा रोख दिसतो. आतां या आक्षेपाच्या संबंधानें पूर्वीं एक गोष्ट तर वाचकांस कळविलीच आहे कीं ईश्वरामध्यें व मनुष्यामध्यें किती ही अंतर असलें तरी तें अंतर सार्वभौम राजामधें व त्याच्या मुलामधें जसें असतें तसें होय. भर दरबारांत बाप आपल्या अमीरउमरावांबरोबर बसला असतां मुलानें बापाकडे दुडदुडां धांवत जाऊन अंकारोहण केलें, किंवा कांहीं लडिवाळपणाचें भाषण केलें, तरी त्या सलगीबद्दल मु-

लाचें पारिपत्य होण्याचें जसें भय नको; त्याप्रमाणेंच आमच्या देशांतील कवींनीं ईश्वराचा गुणानुवाद करतांना प्रसंगानुसार जरी कांहीं अतिप्रसंग केला असला तरी त्यांवर ह्मणजे मोठा दोष येतो असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांतून 'केकावली' काव्य पूर्वींच्या एकंदर पद्धतीवर व तशा लोकांकरतांच रचिलें असल्यामुळें त्यांत अर्वाचीन भक्तजनांस अतिप्रसंग वाटण्यासारखा जरी प्रकार मधें मधें असला तरी काव्याची रसहानि होत नाहीं, हें ही मागें सांगण्यांत आलेंच आहे. आतां ही सलगी अद्वैतमतापासून झालेली आहे हें जें ह्मणणें आहे त्यावर एक तर अशी अडचण येणार आहे कीं, आमच्या देशांत वैष्णवांचीं काव्यें पाहिलीं असतां तीं तरी प्रकृत दूषणापासून मुक्त आहेत असें नाहीं. त्यांत ही वादविषयक काव्यांतला प्रकार किंबहुना त्याहून ही अधिकच आढळेल. उदाहरणार्थ **वेंकटाध्वरीचें** 'लक्ष्मीसहस्र' घ्या. या काव्याची पंडित लोकांत पुष्कळ ख्याति आहे. यांतील भक्त्युद्गारांविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, 'चंडिकाशतक' रचल्यानें **बाणभट्टास** जसे पुनः पाय आले व 'गंगालहरी'च्या श्रवणानें सुप्रसन्न होऊन भागिरथीनें **जगन्नाथरायास** यवनीसहवर्तमान प्रत्यक्ष पावन करून घेतलें, त्याप्रमाणें 'लक्ष्मीसहस्रा'नें वरील द्राविड कवीस पुनः डोळे आले! ही आख्यायिका, प्रस्तुत काव्य वैष्णवांस किती प्रिय आहे हें दर्शविते. दुसरा वैष्णवप्रिय ग्रंथ पाहिजे असल्यास 'गीतगोविंद' आहे. यांतील अष्टपद्या कर्नाटकांत आबालवृद्धांस येत असतात व स्त्रिया सुद्धां गातात. आतां या दोन्ही ग्रंथांत उपास्य देवतेविषयींचा कवीचा भाव पाहिला असतां तो रावबहादुरांस आवडण्यासारखा आहे असें नाहीं. तो प्रार्थनासमाजांतील उपासनेसारखा मोठा मर्यादेचा व नम्रपणाचा नसून प्रस्तुत 'केकावलीं'तल्यासारखाच अत्यंत सलगीचा आहे. फार तर काय, पण पहिल्या काव्यांतील शृंगारस्तवक व दुसऱ्यांतील बहुतेक भाग यांतील वर्णनास 'सलगी' हा शब्द तरी मोठ्या मुरवतीनेंच लावायाचा! असो; तर या दोन उदाहरणांवरून अद्वैतावर जें प्रस्तुत दूषणाचें जनकत्व घातलें आहे तें बरोबर नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

आमच्या कवीच्या तर्फेचा दुसरा पुरावा 'पृथ्वीवरील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचें जें पवित्र धर्मपुस्तक' त्यावरून ही घेण्यासारखा आहे. वेदांतशास्त्राचा व 'बैबला'चा किती विरोध आहे हें सांगावयास नकोच. पहिल्याचा सिद्धांत जो कीं सर्व जीव व एकंदर विश्व हें परब्रह्माचाच आविर्भाव होय, त्याच्या अगदीं विरुद्ध 'बैबलां'तील लेख आहेत. 'पवित्र शास्त्रा'च्या पहिल्याच दोन अध्यायांत

एकंदर सृष्टि व मनुष्यजाति यांची उत्पत्ति वर्णिली आहे; तिजवरून वरील विरोध स्पष्ट लक्षांत येण्यासारखा आहे.* तेव्हां सदरील ख्रिस्ती शास्त्र हें पूर्ण द्वैतमय आहे हें उघडच आहे. पण असें असतां रावबहादुरांनीं खऱ्या भक्तीचीं लक्षणें ह्मणून सांगितलेल्या ज्या हृदयवृत्ति—ह्मणजे भयचकितता, अत्यंत नम्रीभाव इत्यादि–त्या वरील पवित्र ग्रंथांत सर्वत्र दृष्टीस पडतातच असें नाहीं. पहिला मनुष्य जो आदम त्यापासून तों त्याची पुढील संतति जे देवाचे आवडते लोक यहुदी त्यांच्या वृत्तांतापर्यंत पाहतां देव हा मनुष्याचा सवंगडी होय किंवा पुढारी होय अशी कल्पना 'पवित्र शास्त्रा'वरून होते. देव हा संध्याकाळच्या थंडगार वेळीं आपण नवीन केलेल्या बागेंत हवा खावयास येत असे तेव्हां आदम व त्याची स्त्री हव्वा या उभयतांचा समाचार घेई,‡ त्यांचा मुलगा हाबेल यानें कोंवळीं व पुष्ट कोकरें देवास अर्पण करावीं तीं त्यानें प्रीतीनें घ्यावीं, नोहास त्यानें नौकेची कल्पना सांगून त्यास एकट्यास जलप्रलयांतून वांचविलें, मोश्यास सीना पर्वतावर त्यानें दहा आज्ञा सांगितल्या, मिसरी लोकांच्या दास्यांतून सोडवून यहुदी लोकांस स्वदेशास आणतांना त्यानें तांबडा समुद्र दुभंग केला, आणि कधीं 'जळत्या झुडुपांत दिसून, कधीं 'ढगाचा खांब' व कधीं 'अग्नीचा खांब' होऊन तो त्यांस मार्गदर्शक झाला,–या सर्व वृत्तांतांवरून पाहतां रावबहादुरांच्या देवाची प्रतीति होत नाहीं. आकाशांतून क्षणोक्षणीं आपल्या आवडत्या लोकांच्या साह्यार्थ खालीं उतरणारा, व त्यांशीं अतिपरिचिताप्रमाणें बोलणारा देव ह्मटला ह्मणजे आमच्या अर्जुनाचे घोडे खाजवणारा, विदुराच्या गृहीं जेवणारा, बेदरचें पोतें भरणारा जो आमचा हिंदु देव त्यासारखाच 'जुन्या करारां'तला देव झाला. ख्रिस्ती लोकांस विशेषसंमत जो 'नवा करार'

---

* "प्रारंभीं देवानें आकाश आणि पृथ्वी हीं उत्पन्न केलीं" (उत्पत्ति–अध्याय १ ओवी १).

"तेव्हां परमेश्वर देवानें भूमींतील मातीचा माणूस घडिला, आणि त्याच्या नाकपुड्यांमध्यें जिवाचा श्वास फुंकिला, मग माणूस श्वासवान् जीव झाला." (कित्ता—अ० २—ओ० ७).

‡ "नंतर दिवसांतील वाऱ्याच्या वेळेस परमेश्वर देव बागांत चालत असतां त्याचा शब्द त्यांनीं ऐकिला; तेव्हां आदाम व त्याची बायको हीं परमेश्वर देवाच्या दृष्टीपासून बागांतील झाडांच्यामध्यें लपालीं. तेव्हां परमेश्वर देव आदामाला हाक मारून त्याला बोलला, तूं कोठें आहेस ? तेव्हां तो बोलला कीं, म्या बागामध्यें तुझा शब्द ऐकिला आणि मीं नागवा यास्तव भ्यालों व लपालों... ... ... ... ..." (उत्पत्ति–अध्याय ३).

त्यांत पाहतां ही देवाचा सुलतानी थाट फारसा दृष्टीस पडत नाहीं. त्यांत तर मुळीं देव जो भूलोकावर अवतरला तो रूमशामसारख्या बादशाहाच्या पोटीं येऊन मोठ्या समारंभानें प्रगट झाला असें मुळींच नसून एका गरीब कुमारीचे पोटीं आला व गवताच्या गव्हाणींत जन्मास आला. पुढें तरी ईश्वराचें किंवा ईश्वरपुत्राचें त्यानें वैभव चोहोंकडे मिरविलें ह्मणावें तर तें ही नाहीं. तीस वर्षांपर्यंत विशेष प्रसिद्धीस न येतांच येशूनें दिवस घालविले; नंतर शेवटल्या तीन चार वर्षांत लोकांस स्वर्गमार्गाचा उपदेश करून व त्यांच्यापासून छळ पावून शेवटीं त्यानें मनुष्यजातीकरितां देहांत प्रायश्चित्त भोगलें ! या शेवटल्या वर्षांत येशूचा व त्याच्या शिष्यांचा परस्पर संबंध जो शुभवार्तिकांच्या लेखांवरून दिसून येतो तो वरील 'भयचकिततें'चा व 'अत्यंत नम्रीभावा'चा मुळींच नसून **सॉक्रेटीस** व त्याचें शिष्यमंडळ यांच्यासारखाच केवळ दिसतो,* तेव्हां एकंदरींत सांगायाचें काय कीं, जर 'पवित्र शास्त्रां'त ही देवाविषयींच्या समजुती वर सांगितल्याप्रमाणें दृष्टीस पडतात, तर आमच्या अपवित्र नेटिव शास्त्रांतून व नेटिव काव्यांतून त्या तशाच आढळल्यास नवल कसचें !

९. आतां दुसरे आक्षेपक डॉ. विल्सन् यांचा लेख वाचकांस सादर करतों. हे साहेब कोण व पुढील लेख कशांतला हें मागें सांगितलेंच आहे.

"If the reign of Shivaji, the Maratha, was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the common orders of the people, the reign of the first Brahman Peshwah,— who was established in his administration in the year 1717— was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the priestly order. This was Mayur Pandit, or Morepant, of Baramati in the Deccan. He belonged to a tribe of Brahmans, the Karhadi, having no great preeminence in the Maharashtra, but he has

* सॉक्रेटीस् व ख्रिस्त यांच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आढळतें. दोघांचा जन्म हलक्या कुळांत होऊन दोघांनीं ही आपलें आयुष्य लोकांत सन्मार्गाची प्रवृत्ति करण्याकडे खर्चिलें. दोघांचा ही शिष्यपरिवार त्यांचे ठायीं अत्यंत भक्ति धारण करणारा असा होता. दोघांनीं लोकांचा छळ सोसून दोघांचा शेवट देहांतशासनानेंच झाला. सॉक्रेटीस् यास forerunner of Christ ( ख्रिस्ताचा जासूद ) असें जें ह्मणतात तें वरील चरित्रसादृश्यावरूनच होय.

become the great favourite of all the Brahmans since his day.* He is the lord of the Arya metre, in which he copiously writes, with power and ease, drawing his ideas from the Ramayana, Mahabharata and Bhagwata, so often mentioned as the sources of Marathi excitement, and but seldom improved upon either in thought or feeling. He has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimed prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters, introducing the conjunction परंतु (but) into every line, and by commencing each line of his verse by the last word of the preceding line. Though a follower of Vishnu, he wrote with respect for the other deities, for whom, such as Shiva, the acute and intelligent Konkani or Chitpawan Brahmans, in full power at Poona, had a special regard. The rise of the Peshwas, indeed, was the signal for the Marathi bards,— who had nothing like the heavenborn light and fire of the Hebrew prophets,— altering their tune. Moropant is said to have lived to the age of sixty, and to have died about a hundred years ago. One of his books held in most estimation is the Mayur Kekawali, the Trumpeting of the Peacock, so called from his own name. It is devoted principally to the extolment of Krishna."

( "शिवाजीच्या राज्यांत ज्याप्रमाणें शूद्र लोकांत उत्पन्न झालेल्या महाराष्ट्र-कवींमध्यें अत्यंत विख्यात जो **तुकाराम** तो निपजला, त्याप्रमाणें पहिल्या पेशव्याच्या कारकीर्दींत, कीं जिचा आरंभ इ० स० १७१७ त झाला, तींत ब्राह्मणज्ञातींतला अत्यंत विख्यात कवि जो **मोरोपंत** तो जन्मास आला. या कवीचें वास्तव्य बारामती मुक्कामीं होतें. तो कऱ्हाडा होता. या ब्राह्मणज्ञातीचें महाराष्ट्रांत मोठेंसें वजन नाहीं; तरी प्रस्तुत कवि निवर्तल्यापासून तो सर्व ब्राह्मणांस अत्यंत प्रिय झाला आहे.‡ यास आर्यापति ह्मणतात; या छंदांत त्यानें पुष्कळ

* "Parashuram Pant Godbole says of him ( Navanit, p. 165 ), प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं. So much for the conquest of prejudice by the talent of the poet !"

‡ "परशुरामपंत गोडबोले यांनीं ( नवनीत— पृष्ठ १६५ ) वरील कवीविषयीं असें लिहिलें आहे:— 'प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं.' या वाक्यावरून स्पष्ट दिसतें कीं, प्रस्तुत कवीच्या जातीवरून उत्पन्न होणारा जो मह तो त्याच्या काव्यचातुर्याच्या योगानें आलीकडे नाहींसा झाला आहे."

कविता केली आहे; ती चटकदार असून अगदीं सहज केल्यासारखी दिसते. रामायण, महाभारत, आणि भागवत, हे ग्रंथ महाराष्ट्रवासी जनांस अत्यंत आल्हादप्रद होत हें सुप्रसिद्धच आहे; याच ग्रंथांतील विचार घेऊन प्रस्तुत कवीनें ते मराठींत उतरून दिले आहेत. तरी या ग्रंथांपेक्षां अधिक प्रौढ विचार किंवा विशेष सरस वर्णन हीं त्याच्या काव्यांत फार करून आढळत नाहींत. महाराष्ट्रभाषा ही प्रस्तुत कवीची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे; पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला अढळतो. तो असा कीं, कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतीचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,— इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात. तो जरी विष्णूचा भक्त होता तरी इतर देवतांविषयीं ही त्यानें आपली पूज्यत्वबुद्धि प्रगट केली आहे; या देवांतीलच एक जो शिव त्याविषयीं पुण्यास भरभराट पावलेले जे चाणक्ष व कुशाग्रबुद्धि चित्पावन ब्राह्मण ( पेशवे ) त्यांची विशेष भक्ति होती. महाराष्ट्र कवींचे ठायीं यहुदी भविष्यवाद्यांच्या प्रमाणें ईश्वरप्रेरित ज्ञान व स्फूर्ति हीं बिलकूल नव्हतीं; तेव्हां पेशव्यांचा अभ्युदय होतांच त्यांनीं त्यांच्या आवडत्या देवांकडे आपल्या भक्तीचा ओघ वळविला यांत कांहीं आश्चर्य नाहीं! मोरोपंत हा साठ वर्षांचा होऊन वारला व या गोष्टीस आज ( सन १८९७ ) सुमारें शंभर वर्षें होऊन गेलीं आहेत असें ह्मणतात. त्याचा अत्यंत मान्य असा ग्रंथ ह्मटला ह्मणजे 'केकावली' हा होय. या शब्दाचा अर्थ 'मोराचा टाहो' असा आहे, व हें नांव कवीच्या नांवावरूनच दिलें आहे. या ग्रंथांत मुख्यतः कृष्णाचें माहात्म्य वर्णिलें आहे." )

---

**सुभाषित**—( १ ) अक्षराणि परीक्ष्यंतामंबराडंबरेण किम् ।
शंभुरंबरहीनोऽपि सर्वज्ञः किं न जायते ॥

" कोणाच्या विद्वत्तेची परीक्षा कर्तव्य असतां त्याची विद्या पहावी; पोषाखाचा थाटमाट काय करायाचा आहे? पहा कीं, शंभु हा वस्त्रहीन असल्यानें त्याची सर्वज्ञता नाहींशी होते काय?"

( २ ) इह रूपमात्रसारे चित्रगते कनककल्हारे ।
न रसो नापि च गंधो मधुकरबंधो वृथा परिभ्रमसि ॥

" हे मूढ मधुकरा ! हें चित्रांतील सुवर्णकमल केवळ रूपानें मात्र खऱ्या कमलासारखें आहे! यांत मकरंद नाहीं व सुगंध ही नाहीं; मग उगीच कशाला भोंवतालीं हिंडत आहेस ?"

(३) कवयति पंडितराजे कवयंत्यन्येऽपि विद्वांसः ।
नृत्यति पिनाकपाणौ नृत्यंत्यन्येपि भूतवेतालाः ॥

**पंडितराय** आपली व स्वकालीन कवींची तुलना करतातः—

"पंडितराज कविता करीत असतां दुसरे विद्वान् ही कवित्व करीत आहेत; ज्याप्रमाणें शिव तांडव करूं लागला असतां भूतवेतालादि मंडळी ही नाचूं बागडूं लागते!"

(४) च्युता दंताः सिताः केशा वाङ्निरोधः पदे पदे ।
पातसज्जमिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति ॥

" दांत पडले, केस पांढरे झाले, आणि प्रत्येक शब्दाला जीभ अडखळते; पण याप्रमाणें हा देह पतनोन्मुख झाला असतां आशा ही साध्वी स्त्रियेप्रमाणें त्यास सोडीत नाहीं!"

(५) अलमतिचपलत्वात्स्वप्नमायोपमत्वात्
परिणतिविरसत्वात्संगमेनांगनायाः ।
इति यदि शतकृत्वस्तत्त्वमालोकयाम-
स्तदपि न हरिणाक्षीं विस्मरत्यंतरात्मा ॥

" क्षणभर टिकणारा, स्वप्नदर्शनाप्रमाणें आभासरूप, आणि परिणामीं विरस, असा जो स्त्रीसंगम तो पुरे झाला, असें शंभर वेळां जरी आपणास तत्त्व कळलें, तथापि जीव हा हरिणाक्षीपुढें पुनः लुटपुटतोच !"

(६) औत्सुक्यात्परिमिलतां त्रपया संकोचमंचतां च मुहुः ।
नवसंगमयोर्यूनोर्नयनानामुत्सवो जयति ॥

" उत्सुकतेनें एके ठिकाणीं मिळणारे आणि लज्जेनें पुनः संकोच पावणारे असे जे नूतन विवाहित स्त्रीपुरुषांचे नेत्र त्यांचा विलास हा अत्यंत शोभा पावतो !"

(७) वयोवृद्धास्तपोवृद्धा ये च वृद्धा बहुश्रुताः ।
ते सर्वे धनवृद्धस्य द्वारि तिष्ठंति किंकराः ॥

" वयोवृद्ध, तपोवृद्ध, आणि विद्यावृद्ध हे सर्व धनवृद्धाच्या द्वारीं दास होऊन राहतात!"

(८) तल्पे प्रभुरिव गुरुरिव मनसिजशास्त्रे श्रमे भुजिष्येव ।
गेहे श्रीरिव गुरुजनपुरतो मूर्तेव सा व्रीडा ॥

"शय्यास्थानीं ती मला प्रभूप्रमाणें होय, कामशास्त्रांत गुरुप्रमाणें, गृहकृत्यांत सेवकाप्रमाणें, घरांत लक्ष्मीप्रमाणें, आणि वडील माणसांपुढें जणों मूर्तिमती लज्जाच!"

(९) यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः ।
स न जानाति शास्त्रार्थान् दर्वी पाकरसानिव ॥

"ज्याला स्वतः विवेचनाचें सामर्थ्य नाहीं त्यानें जरी बहुत अध्ययन केलें तरी त्यास शास्त्रांतील गम्य असत नाहीं. ज्याप्रमाणें सैपाकांतल्या पळीला जातीनें तिखट मीठ गोड वगैरे कांहीं कळत नाहीं, तिचें काम नुसतें ढवळण्याचें!"

(१०) अर्थो नराणां पतिरंगनानां वर्षा नदीनामृतुराट् तरूणाम् ।
स्वधर्मचारी नृपतिः प्रजानां गतं गतं यौवनमानयंति ॥

"अर्थसंचय हा पुरुषांचें, पति स्त्रियांचें, वर्षर्तु नदींचें, ऋतूंचा राजा जो वसंत तो वृक्षांचें, स्वधर्मास अनुसरून वागणारा राजा प्रजांचें यौवन पुनः पुनः त्यांस आणितो."

(११) गौरवं प्राप्यते दानान्नतु वित्तस्य संचयात् ।
स्थितिरुच्चैः पयोदानां पयोधीनामधः स्थितिः ॥

"गौरव जें प्राप्त होतें तें द्रव्याच्या दानानें होतें, संचयानें होत नाहीं. पहा कीं, मेघांची स्थिति आकाशांत आणि समुद्रांची भूमीवर!"

(१२) वसु यच्छतु वा नवा नरेशो मम कर्णेऽपि च भारतीं करोतु ।
रतिमिच्छतु वा नवा नवोढा यदि केलीगृहदेहलीमुपैतु ॥

"राजा हा मला द्रव्य देवो किंवा न देवो, माझ्याशीं त्यानें कानगोष्ट मात्र करावी ह्मणजे झालें; नूतन स्त्री ही रतेच्छा मनांत धरो अथवा न धरो, क्रीडामंदिराच्या उंबरठ्यावर तिनें पाऊल ठेवावें ह्मणजे झालें!"

(१३) रे कूप जीवनागार यदि दातृत्वमिच्छसि ।
तदा त्वं गुणवत् पात्रमेकं वा संनिधौ कुरु ॥

"जीवनाचें (उदकाचें— जीविकेस साधन जें द्रव्य त्याचें) अगर असणाऱ्या हे कूपा! तुला जर दातृत्वाची कीर्ति संपादन करायाची असेल, तर तूं आपल्याजवळ एक गुणवत् पात्र (दोरी लावलेलें भांडें—गुणवान् पुरुष) ठेव!"

(१४) गलच्चक्षु मिलज्जानु प्रस्वलच्च पदे पदे ।
मक्षिकालक्षसंयुक्तं भट्टतट्टू विराजते ॥

कोणी भटजींच्या तट्टाचें वर्णन करतोः—

"ज्याचे डोळे अर्धेमुर्धे मिटलेले आहेत, गुडघे एकमेकाला लागलेले आहेत, जें पावलोपावलीं अडखळतें आणि लाखों माशांनीं पीडलेलें, असें भट्टतट्टू विराजमान होतें!"

(१५) कृत्वा विग्रहमश्रुपातकलुषं शय्यासनादुत्थिता
क्रोधात्ताऽपि विगृह्य गर्भभवनाद्द्वारं रुषा प्रस्थिता ।
दृष्ट्वा चंद्रमसं प्रभाविरहितं प्रत्यूषवाताहता
हा रात्रिस्त्वरिता गतेति पतिता कांता प्रियस्योरसि ॥

"नवऱ्याशीं भांडून व रडून कढून फणकाऱ्यानें पलंगावरून उठली, आणि तशीच रागानें महालाच्या दाराकडे जाऊं लागली; पण इतक्यांत प्रभाविरहित झालेला चंद्र तिच्या दृष्टीस पडला व पहांटचा गार वारा आंगाला लागला, तेव्हां खेद पावून पुनः माघारी आली आणि 'रात्र ही किती लवकर गेली' असें ह्मणून कांतास आलिंगिती झाली!"

(१६) युगपत्स्वगंडचुंबनलोलौ पितरौ निरीक्ष्य हेरंबः ।
तन्मुखमेलनकुतुकी स्वाननमपनीय परिहसन् पायात् ॥

"शिव व पार्वती या दोघांस आपल्या चुंबनाविषयीं एकदम उत्सुक पाहून गणपतीनें काय केलें कीं आपलें तोंड एकदम मागें घेतलें; तेव्हां त्यांचींच मुखें परस्पर मिळालेलीं पाहून हसणारा जो हेरंब तो तुमचें रक्षण करो!"

(१७) मय्येव जीर्णतां यातु यत्त्वयोपकृतं कपे ।
नरः प्रत्युपकारार्थं विपत्तिमभिवांछति ॥

रामाची मारुतीप्रत उक्तिः—

"हे कपे! तुझे जे मजवर उपकार आहेत ते माझेच ठायीं जिरून जावोत, ते फेडण्याची मी इच्छा करीत नाहीं; कां कीं प्रत्युपकार करायाचा ह्मटला ह्मणजे दुसऱ्याच्या विपत्तीची आशा करावी लागते!"

(१८) उडुराजमुखी मृगराजकटिर्गजराजविराजितमंदगतिः ।
यदि सा वनिता हृदये निहिता क्व जपः क्व तपः क्व समाधिगतिः॥

" चंद्रासारखें जिचें वदन, सिंहाच्या सारखी कंबर, आणि गजराजाप्रमाणें विराजमान अशी मंद गति, अशी वनिता जर हृदयस्थलीं प्राप्त झाली, तर जप कोणीकडे, तप कोणीकडे आणि समाधि कोणीकडे !"

( १९ ) सच्छिद्रो मध्यकुटिलः कर्णः स्वर्णस्य भाजनम् ।
धिग्दैवं विमले नेत्रे पात्रं कज्जलभस्मनः ॥

" काय दैवाची कृति आहे पहा ! कीं जो कर्ण सच्छिद्र आणि मध्यें वाकडा त्याला सुवर्णभूषण मिळतें, आणि विमल जीं नेत्रें तीं बिचारीं काजळाला पात्र झालीं आहेत !" ' सच्छिद्र,' ' कुटिल,' आणि ' विमल ' यांचीं अर्थांतरें प्रसिद्धच आहेत.

( २० ) विश्वेश्वरस्तु सुधिया गलितेऽपि भेदे भावेन भक्तिसहितेन समर्चनीयः ।
प्राणेश्वरश्चतुरया मिलितेऽपि चित्ते चैलांचलव्यवहितेन निरीक्षणीयः ।

" जो सुधी आहे त्यास आत्मज्ञान होऊन जीवेश्वरांच्या मधील भेद त्याचा जरी गलित झाला, तरी त्यानें विश्वेश्वराची पूजा भावानें व भक्तीनें अवश्य करावी; कीं ज्याप्रमाणें चतुर स्त्री ही परस्परांचें मन मिळालें असतां ही वस्त्राच्छादित होत्सातीच आपल्या वल्लभाच्या दृष्टीस पडते !"

( २१ ) तव विरहमसहमाना सा तु प्राणान् विमुक्तवती ।
किंतु तथाविधमंगं न सुलभमिति ते न मुंचंति ॥

" तुझा विरह सहन करण्यास असमर्थ होत्साती ती तर प्राणांस टाकण्यास तयार झाली; पण असलें सुंदर शरीर आपणांस मिळायाचें नाहीं या लोभानें ते प्राणच तिला सोडीनात !"

( २२ ) दोषागमनमाशंक्य रविरेष तिरोहितः ।
कथमिंदुः समायाति कुतः शंका कलंकिनः ॥

" दोषागमन ( रात्रीचें येणें—दोषप्राप्ति ) पुढें होणार तों अगोदरच सूर्य आपला क्षितिजाखालीं दडून राहिला, पण त्याच समयास इंदूनें वर डोकें काढलें; ठीकच आहे, जो मुळींच कलंकयुक्त ( दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत ) त्यास शंका कोठून प्राप्त होणार !"

( २३ ) तप्तं कैर्न तपोभिः फलितं तद्गोपनारीणाम् ।
लोचनयुगले यासामंजनमासीन्निरंजनं ब्रह्म ॥

"आजपर्यंत तपश्चर्या कोणीं केल्या नाहींत? पण एका गोपींचीं तपें मात्र फळाला आलीं असें ह्मटलें पाहिजे; कां कीं त्यांच्या नेत्रयुगीं निरंजन जें परब्रह्म तें अंजन होऊन बसलें!"

( २४ ) आश्लेषशेषा रतिरंगनाना-मामोदशेषा कुचकुंकुमश्रीः ।
तूणीरशेषः कुसुमायुधोऽपि प्रभातशेषा रजनी बभूव ॥

"स्त्रियांच्या रतांतील केवळ आलिंगन मात्र शेष राहिलें, कुचांवर केलेल्या केशरलेपापैकीं केवळ सुगंध मात्र शेष राहिला, मदनापाशीं शेष काय तो भाता मात्र, आणि रात्रीपैकीं पहाट मात्र उरली!"

( २५ ) ललिता गलिता रदावली लवलीवद्धवलीभवंति केशाः ।
न तथापि कथा रथांगपाणेः श्रवणप्रीतिकरीति मंदरीतिः ॥

"सुंदर जी दंतपक्ति ती गळून गेली, व केश हे लवलीप्रमाणें पांढरे होत आहेत; तथापि चक्रपाणि जो कृष्ण त्याची कथा कानास आवडत नाहीं;—अशीच मूर्खांची रीति होय!"

---

**विनोद, मद्दारूख्यायिका**—( **आत्मसंयमन** )— एका गृहस्थास मद्याचें अतिशयित व्यसन होतें. तो एकदां आपल्या मित्रांस ह्मणाला, "आतां हें व्यसन अगदीं सोडून द्यावयाचें, तुह्मीच कांहीं दिवसांनीं पहाल." पुढें एके दिवशीं एकजण त्याजकडे गेला, तेव्हां त्याच्या चाकरानें सांगितलें कीं, स्वारी बाहेर गेली आहे. गृहस्थ विचारतो, "काय रे, तुझ्या धन्यानें दारूची सवय अद्याप टाकली कीं नाहीं?" चाकर उत्तर करतो, "हो, टाकली तर काय झालें, आजच दोन तीन वेळां टाकली!"

## आरोपीचा बचाव.

एकानें आपल्या शेजाऱ्यावर असा दावा केला कीं, यानें आमचा हांडा मागून नेऊन तो फुटलेला परत केला. पुढें चौकशीअंतीं आरोपीच्या वकिलानें कोर्टापुढें येणेंप्रमाणें पांडित्य केलें:—"आह्मी आपले तीन मुद्दे कोर्टापुढें मांडतों, त्यांकडे कोर्टानें मेहेरबानीनें लक्ष द्यावें. पहिला मुद्दा हा कीं, आह्मी जेव्हां हांडा मागून आणला तेव्हांच त्याला चीर गेली होती; दुसरा हा कीं, तो

आह्मीं जेव्हां परत केला तेव्हां चांगला धड होता; आणि तिसरा असा कीं, हांडा मुळींच आह्मी मागून घेतला नाहीं!"

## सांगकाम्या.

एक गृहस्थ एका कलालाच्या दुकानाशीं उतरला आणि तेथील एका चाकराला ह्मणाला, "मी आंत जाऊन एक ग्लास घेतों, तोंपर्यंत या घोड्यावर तुझी नजर असूंदे." चाकरानें होय ह्मणून उत्तर केलें. अंमळशानें तो गृहस्थ बाहेर येऊन जों पाहतो तों घोडा नाहीं. तेव्हां त्यानें चाकरास घोडा कोठें गेला ह्मणून विचारलें. चाकर उत्तर करतो, "तो गेला पळून." गृहस्थ त्याजवर रागावून त्यास ह्मणतो, "अरे, त्याजवर नजर ठेवण्याविषयीं तुला मी बजाविलें होतें ना!" चाकर उत्तर करतो, "खरें, महाराज, मी ही नजर ठेवली होती; पण ती कोठवर ठेवूं! तो नजरेच्या पार निघून गेला!"

## वीरोक्ति.

स्वीडन् देशचा राजा बारावा चार्लस् हा विलक्षण शूर होता. त्यास काळीज ह्मणून नव्हतेंच. त्याच्या व रशियाचा पहिला झार* पीटर् दि ग्रेट् याच्या कित्येक मोठ्या निकराच्या लढाया झाल्या. नार्वा या मुक्कामीं जी लढाई झाली तींत पीटर्चे लोक ८०००० व चार्लस्चे अवघे १०००० होते, तरी त्यानें रशियनांचा अगदीं मोड केला. ही लढाई जुंपण्याच्या पूर्वीं स्वीडन्च्या राजास कोणीं कळविलें कीं, शत्रु आपल्या तिप्पट आहेत. तें ऐकून राजानें उत्तर केलें, "असें काय? तर मग आज मोठी बहार आहे. हवे तितके मारायाला, हवे तितके धरायाला, आणि हवे तितके पिटून लावायाला सांपडतील!"

## तारतम्य.

एका गृहस्थानें चांभारास आपल्या पायांजोगते बूट करायास सांगितले. चांभारानें माप घेतलें तेव्हांच त्यास वरील गृहस्थानें ताकीद दिली कीं, माझा एक पाय अंमळसा मोठा आहे, तर एक बूट दुसऱ्यापेक्षां अंमळ मोठा कर.

---

* रशियाच्या बादशाहास 'झार' म्हणतात. हा शब्द 'सीजर' शब्दाचा अपभ्रंश होय. रोमची बादशाही सीजर नांवाच्या महाप्रतापी पुरुषानें स्थापल्यावरून रूमवाल्यास वरील किताब असे. तो आलीकडे रशियन लोकांच्या बादशाहानें घेतला. वरील शब्दाचा फारसी अपभ्रंश 'केसर्' (केसर्-इ-हिंद) हा होय. 'केसर्' म्हणजे बादशाहा.

चांभारानें हुकुमाप्रमाणें एक लहान व एक मोठा असे बूट तयार करून आणले. मग वरील गृहस्थ ते ठीक होतात कीं नाहींत ह्मणून पाहायाला लागले. पहिल्यानें धाकटा पाय त्यांनीं थोरल्या बुटांत घातला; आणि मग थोरल्या पायावर धाकटा बूट चढवूं लागले, तों तो कांहीं केल्या चढेना. तेव्हां चांभारावर चरफडून स्वारी त्यास शिव्या देऊं लागली;—"काय द्वाड चांभारडा! लेकाच्याला एक बूट मोठा आणि एक लहान करायाला सांगितला, तो यानें एक केला लहान आणि दुसरा केला मोठा!"

## स्थानांतर.

एकजण आपल्या शिपायी बाण्याच्या व मर्दुमकीच्या गोष्टी नेहेमी सांगत असे. एके प्रसंगीं हे बहादर तकट धूम ठोकताहेत असें त्यांच्या गोष्टी ऐकलेल्यांपैकीं एकानें पाहिलें. तेव्हां तो, पळपऱ्या शिपाईबोवांस विचारतो, "अहो, हें काय, आपण आपल्या शूरपणाच्या व अवसानाच्या गोष्टी इतक्या सांगत असां, आणि आज तर धूम पळत सुटलां आहां!" शिपाई पळतांपळतांच उत्तर करतो, "बाबा, माझें सारें अवसान सध्यां पायांत उतरलें आहे!"

## टारगेपणास योग्य शासन.

विलायती हजामतीचा प्रकार आमच्या वाचकांच्या हा एक तर लक्षांत येईलच, कीं, तेथील हजामत ह्मटली ह्मणजे कायती दाढीपुरती. दुसरा प्रकार सर्वांस माहीत असण्याचा संभव नाहीं, तो हा कीं तेथें हजामांचीं दुकानें असून तेथें लोक हजामतीला जात असतात.* अशा दुकानीं एक टारगें पोर गेलें आणि हजामतीला बसलें. हजाम पाहतो तों कोवळें पोर, पुरती मिसरू सुद्धां फुटली नाहीं, आणि थाटानें येऊन खुर्चीवर बसलें आहे. तेव्हां त्यानें विचार केला कीं आयतें गिऱ्हाईक आलें आहे, तें परत कशाला लावावें! तर याची अशीच कांहीं खुबीनें फजीती केली पाहिजे. मग त्यानें त्याच्या गळ्याभोंवता कपडा घालून साबण तयार केला, आणि दोन हात हनवटीवरून व गालांवरून फिरविले. इतका पूर्वविधि आटपून हजाम मुकाट्यानें उठला आणि दारापुढें मोकळी

* युरोप खंडांत प्राचीन काळीं ही वरीलच प्रघात होता. हजामांचीं दुकानें चवाठ्यावर असायाचीं आणि सारी बातमी अगोदर तेथें यावयाची. अथीनियन् लोकांचा सिसिली बेटाच्या किनाऱ्यावर जो मोठा पराभव झाला;—कीं ज्यापुढें तें शहर पुनः सांवरलेंच नाहीं;—त्याची पहिली बातमी वरील गटारयंत्रावर येऊन धडकली असें इतिहासांत आढळतें!

जागा होती तेथें सहज इकडे तिकडे आपला फेऱ्या घालूं लागला. इकडे हें पोर हातांत वर्तमानपत्र घेतलें होतें त्यांतच चूर होऊन गेलें आहे! त्याला काय वाटलें कीं हा हजाम वस्तरा वगैरे आणायाला गेला असेल. पण अंमळशानें पाहतो तों हजामाची स्वारी खुशाल हातांत हात घालून इकडून तिकडे व तिकडून इकडे फेऱ्या घालते आहे! तेव्हां पोर त्रासून तेथून ओरडतें, "काय रे, तिकडे काय करतो आहेस, आह्मांस येथें असेच थंडावत ठेवून?" हजाम तेथूनच मुकाट्या-नें उत्तर देतो, "रावसाहेब, आपली दाढी उगवण्याची वाट पाहत आहें!"

## चुकती बाकी.

युरोपांतील खाणावळींचा प्रकार मागील अंकांतील एका गोष्टींत सांगित-लाच आहे. अशा एका मोठ्या खाणावळींत चौघे अट्टल चोर येऊन उतरले; दोन च्यार दिवस यथास्थित चंगळ मारून स्वाऱ्या जावयास निघाल्या. पण चौघे ही खंक, खाणावळवाल्याची बाकी चुकती करून द्यावयास एकाजवळ ही छदाम नाहीं. तेव्हां चौघांनीं मिळून पुढील कावा योजला. खाणावळ-वाल्यास हाक मारली, आणि बिल मागितलें. त्यानें तें आणून देतांच एकजण खिशांत हात घालूं लागला;—जणों काय पैशाची पिशवीच बाहेर काढतो आहे! तितक्यांत दुसरा ह्मणतो, "हं हं, तुह्मी देऊं नका, मी सगळ्यांचा पैसा चुकता करून देतों." तो असें ह्मणतो तों तिसऱ्यानें येऊन त्याचा हात धरला, आणि मोठ्या खुषींत येऊन स्वारी ह्मणते, "छे छे, या खेपेचें सारें बिल आपण एकटे भरणार! आणा तें बिल इकडे." चवथ्यानें ही असेंच सोंग करून स्वतः सारी बाकी फेडण्याविषयीं आपला आग्रह दाखविला. हा चौघांचा विलक्षण अट्टाहास पाहून खाणावळवाला आपल्या ठिकाणीं स्तब्ध होऊन राहिला. शेवटीं एकानें पुढील तडजोड पाडली, ती ही कीं, खाणा-वळवाल्याचे डोळे बांधावे, आणि तो पहिल्यानें ज्यास पकडील त्यानें बिलाची भरपाई करून द्यावी. ही गोष्ट सर्वांनीं मान्य केली. मग त्याप्रमाणें केलें असतां खाणावळवाला अंधळी कोशिंबीर खेळूं लागला. तों ही मंडळी भराभर एकामागून एक बाहेर पडून पार निघून गेली!

## लबाडास जिंकणें.

एक जण लबाड बोलणारा मोठा बहादर होता. एके प्रसंगीं वरील गोष्टी-चीच मोठी फुशारकी वाटून तो मंडळींत सांगूं लागला "आपण बोवा आज-

पर्यंत खरी गोष्ट ह्मणून कधीं तोंडावाटे काढलीच नाहीं !" त्यास एकजण उत्तर करतो, "तर मग या खेपेस तरी आपण खरें बोललां यांत संशय नाहीं; व असें केल्यानें प्रतिष्ठा मिरवायाला आपल्याला जी एकच जागा उरली होती ती ही गमावलीत !"

## ताठ्याचा परिणाम.

गर्विष्ठ मनुष्यांस कोणी ही स्नेही मिळत नाहींत. त्यांची भरभर असते तोंवर ते कोणास विचारीत नाहींत; भरभर गेली ह्मणजे त्यांस ही कोणी विचारीत नाहीं !

## स्वाधीन झोंप.

कोणा एका मनुष्यास पैशाची फार निकड लागून तो आपल्या शेजाऱ्याकडे गेला, शेजारी त्या वेळेस नुकताच लवंडून अर्ध्यामुर्ध्या झोंपेंत होता. त्यानें त्यास हालवून विचारलें, "अरे, झोंप लागली कीं काय !" शेजारी जागा होऊन विचारतो, "कां बरें?" हा उत्तर करतो, "दुसरें कांहीं नाहीं; या वेळेस कांहीं रुपयांची गरज करशील कां ?" शेजारी डोळे मिटून उत्तर करतो, "छे छे, असें आहे तर आह्मांला झोंप लागली आहे बोवा !!"

---

## पत्रें.

### मोरोपंत.

इह मुख्यकलोपेतः कोऽभवत्कविनायकः ।
इति मीमांस्यमाने तु मयूरेशः स्मरत्यलम् ॥

विठोबा अण्णा.

रा. रा. निबंधमालाकर्ते यांसः—

वि. वि. अलीकडे आपल्या पुस्तकांत या कवीच्या कृतीविषयीं अनेक प्रकारची चर्चा होत असते तीवरून या कवीच्या भक्तांस उल्हास होऊन पंतांविषयीं त्यांस माहित असलेल्या गोष्टी आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां ते पाठवीत असतात व आपणही त्यांचा स्वीकार करीत असतां हें पाहून मलाही पुढील चार ओळी आपणांकडे पाठविण्याची प्रेरणा झाली. तर या पत्रास आपल्या सवडीनुरूप स्थल मिळावें.

पंतांविषयीं आजपर्यंत जी माहिती आहे ती फारच अपुर्ती आहे. आपल्या देशाच्या दुर्भाग्यामुळें असले इतिहास लिहून ठेवण्याची लोक पर्वा करीत नसत, व गरजही बाळगीत नसत, ह्मणूनच आजला अशा जगद्विख्यात व लौकिकवान् कविवर्यांची अशी दशा दृष्टीस पडते. पण आतां वेळ गेली त्यास उपाय नाहीं. जें राहिलें आहे तितक्यांतच तृप्त असावें हा उत्तम पक्ष. परंतु त्यांतही निराश होऊन न बसतां या संबंधानें जितकें जास्ती मिळण्यासारखें असेल तितकें मिळविण्याविषयीं सर्वांहीं यत्न करावा हें ठीक दिसतें.

पंतांविषयीं लोकांस जी काय माहिती आहे ती 'नवनीत,' 'कविचरित्र' व 'हिंदुस्थानकथारस' या तीन ग्रंथांवरून. त्यांतही बहुतकरून 'नवनीता'वरूनच बाकीच्या दोन पुस्तककारांनीं घेतली आहे. 'नवनीतां'तील कवींचें वर्णन लिहिणारांनीं आपणांस पंतांविषयीं जशी माहिती मिळावी तशी मिळाली नाहीं याचें कारण असें लिहिलें आहे कीं, 'नवनीता'च्या ज्या आवृत्तींत हें वर्णन पाहिल्यानेंच प्रसिद्ध झालें ती लवकर छापून प्रसिद्ध करण्याची जरूरी होती, ह्मणून जरी त्यांस जास्ती माहिती मिळण्यासारखी होती तरी शोध करण्यास त्यांस फुरसत मिळाली नाहीं. परंतु पुढील आवृत्तीच्या वेळेस याविषयीं आणखी शोध करूं ह्मणून त्यांहीं अभिवचन दिलें होतें. त्यावर 'नवनीता'च्या इतक्या आवृत्ति निघाल्या तरी त्यांपैकीं एकींतही हें अभिवचन पूर्ण केल्याचें कोठें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, पण अलीकडच्या कांहीं आवृत्तींतून तर होती ती सुद्धां माहिती अजीबाद गाळून टाकिली. एवंच आपण 'नवनीता'च्या पहिल्या आवृत्तीच्या वेळेस जेथें होतों त्याच पायरीवर या संबंधानें अजूनही उभे आहों. त्यापेक्षां एक पाऊलही आपलें पुढें पडलें नाहीं. असो. तर आतां तरी ज्यांस अशा प्रकारची माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांहीं ती मिळविण्याचा यत्न करावा हें योग्य होय.

अशा प्रकारची माहिती अजून किती मिळण्यासारखी आहे हें पुढील उताऱ्यांवरून दिसून येईल. मोरोपंताचे ग्रंथ सहज चाळीत असतां जी माहिती सांपडली ती आपल्या पुस्तकांतून प्रसिद्ध झाली असतां आपल्या वाचकांपैकीं बहुतेकांस नवीन वाटेल व त्यांच्या बुद्धीसही अशा प्रकारचे शोध करण्याचें स्फुरण येईल अशी आशा राखून हें पत्र लिहिलें आहे. असेच उद्योग अनेक विद्वज्जनांकडून सुरू झाले असतां थोडे काळानें सहज कार्यसिद्धि होणार आहे. परंतु ही आजची माहिती देण्याच्या पूर्वीं आजपर्यंत

'नवनीत' वगैरे ग्रंथांतून दिलेल्या माहितीचें येथें दिग्दर्शन केल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटून आधीं तसें करितों.

मोरोपंतांचा जन्म शके १६५१ या वर्षीं झाला. पुण्याजवळ बारामतींत बाबूजी नाईक जोशी ह्मणून कोणी जहागीरदार गृहस्थ होते, त्यांच्या पदरीं बापुजीपंत ऊर्फ रामचंद्रपंत पराडकर ह्मणून कारकून होते, त्यांचे हे चिरंजीव. जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण. राहणार कोल्हापुरानजीक पन्हाळा ह्मणून गांव आहे तेथले. पंत संस्कृत शिकून मोठे विद्वान् झाले. पुढें पन्हाळ्याच्या किल्ल्यावरील जामदार-खान्याकडे यांस कारकुनीची असामी मिळाली. एथेंच ती सर्वप्रसिद्ध 'पाव आण्या'ची चुकी झाली, कीं जेणेंकरून आपला कवितारूप प्रसाद सर्व जनांवर करण्याचा पंतांस प्रसंग आला. पुढें पंत पुराण सांगूं लागले. यांचें पुराण ऐकून बाबूजी नाईक खुष झाले व सालिना ५०० रुपये वेतन करून पंतांस त्यांनीं आपल्या एथें पुराण सांगण्यास ठेविलें. पुढें शके १७१०त पंत काशीस गेले. तेथें त्यांनीं आपली कविता बरोबर नेली व ती काशीवासी पंडितांस पसंत पडली. पंत आपल्या वयाचे ६५ वे वर्षीं ह्मणजे शके १७१६ आनंदनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ मंगळवार रोजीं मरण पावले. याप्रमाणें 'नवनीतां'त इतिहास आहे.

आतां आजच्या विषयास ह्मणजे खुद्द पंतांनीं स्वतांविषयीं किंवा स्वकृत ग्रंथांविषयीं आपल्या कवितेंत जे कांहीं प्रसंगोपात्त उल्लेख केले आहेत ते सादर करण्यास आरंभ करूं:—

(१). प्रथमतः पंतांच्या वडिलांचें व मातोश्रींचीं नांवें— पैकीं पित्याचें नांव तर पंतांनीं आपल्या काव्यांच्या इतिश्रींत "रामसुत मयूर," "रामनंदन मयूर," "रामात्मज मयूर" इत्यादि प्रकारें दिलेलें असतेंच, पण पुढील आर्येंत तर तीं स्पष्टपणें दिलीं आहेत:—

धन्य **श्रीराम** पिता धन्या **लक्ष्मी** प्रसू जगीं झाली ।
आली सत्यवतीची कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ॥ ४२ ॥

'स्वर्गारोहणपर्व.' अ० २ रा.

(२). पंतांचें गोत्र कोणतें हें

नमितों पाय वसिष्ठा शरणागत **जामदग्न्य** हा बा मी ॥ ७ ॥

'महद्विज्ञापना.'

यावरून समजेलच; परंतु पुढील आर्या जास्ती खात्री होण्याकरितां पहाः—

वा पाव **जामदग्न्या** रामा तूं शत्रु मृगकुळीं हरिसा ।
मज तव गोत्रोत्पन्ना पीडिति कामादि नित्य हे अरि सा ॥ १२ ॥

'महद्विज्ञापना.'

( ३ ). पंतांचे उपाध्याय किंवा गुरुः—

नमिला सद्भावें म्यां **श्रीमदनंता**ख्य जो उपाध्याय ।
मूर्त श्रीगीतेच्या अकराव्याचाचि तो उपाध्याय ॥ १०७ ॥

'सन्मणिमाला.'

श्रीगीतेच्या एकादशसंख्याचा जसा उपाध्याय ।
केवळ भक्तिरसमय **श्रीमदनंता**ख्य जो उपाध्याय ॥ ३८ ॥
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता ।
निजतेजें श्री देउनि पंकरुहा जेविं विप्रभा सविता ॥ ३९ ॥
बहुशोभाप्रद झाला श्रीविठ्ठलभक्तरायकवनातें ।
जेविं ऋतूंचा करिता प्रकट गुण वसंत नायक वनातें ॥ ४० ॥
पाहे प्रणता तोका न व्यास महाकवि प्रसादास ।
विप्राच्या दे न करी नव्यासम हाक विप्र सादास ॥ ४१ ॥

'स्वर्गारोहणपर्व.' अ० २ रा.

या उपाध्यायांचें नांवही एका आर्येंत गुंफलें आहेः—

अवनीशा संस्कारी तद**नंत**र साप्त तो निघे जाय ।
साधुगुह भरद्वाजानुमतें स्वस्वामिचे नमी पाय ॥ २९ ॥

'सन्नामगर्भरामायण.'

केशव गणेश हेही कोणी पंतांच्या उपाध्यायवर्गांतील असावेत असें पुढील आर्यावरून दिसतेंः—

श्रीमदुपाध्यायोत्तमकविवर**केशवगणेश**पादरजा ।
धरुनि शिरीं हें सद्यश लिहिलें पीताति साधु सादर ज्या ॥ ३४ ॥

'स्वर्गारोहणपर्व.' अ० २ रा.

पुढील आर्येंत यांचें नांव पंतांनीं ग्रथित केलें आहेः—

साकेतीं दूत कुशळ धाडूनि वसिष्ठ आणखी भरता ।

तो गति जाणोनि ह्मणे धिक् शतदा तीस जी कुलेभरता ॥ २८ ॥
'सन्नामगर्भरामायण.'

( ४ ). पंतांनीं आपल्या यजमानांविषयीं केलेले उल्लेखः—

श्रीमत्सदाशिवात्मज **बाबूजी नायक** प्रभु ज्ञानी ।
धन्य ह्मणावें ज्याला शुद्धगुणश्रवणतृप्तसुज्ञांनीं ॥ ७३ ॥
[ देवब्राह्मणपूजनरत वेदपुराणसत्कथासक्त ।
श्रीगोदातटवासी श्रीमत्सिद्धेश्वरप्रवरभक्त ॥ ]
दाता वक्ता योद्धा तेजस्वी मानधन असामान्य ।
अतुलें पितृप्रसादें मंडित देवव्रता असा मान्य ॥ ७४ ॥
या साधुसंगसुदिरें मुदित श्रीरामसुतमयूर कृती ।
नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती ॥ ७५ ॥
'कर्णपर्व.' अ० ५० वा.

जो धीरवीरहीर श्रीसिद्धेश्वरमहादयापात्र ।
श्रीमान् **बाबूराय** प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३५ ॥
भीष्मद्रोणसमगुणें शांडिल्यसुगोत्रपद्मरवि दे हा ।
आश्रय शंकर जैसा उपमन्युमना मयूरकविदेहा ॥ ३६ ॥
'स्वर्गारोहणपर्व.' अ० २ रा.

यावरून पंतांच्या यजमानांचें नांव बाबूजी किंवा बाबूराय सदाशिव नाईक, त्यांचें गोत्र शांडिल्य, कुलदैवत श्रीसिद्धेश्वर, आणि बाबूजी नायकाच्या आश्रयाखालीं पंत होते व एथेंच पंतांनीं 'महाभारत' हा ग्रंथ रचिला, इतक्या गोष्टी समजल्या. या यजमानाचेंही नांव एका आर्येंत पंतांनीं ग्रथित केलें आहे:—

**बा**धा हरि अंबूद्भवसे पुर रवि **राम** तनयसा भरत ।
पावे प्रजा **सदा शिव** सर्व प्रभुचरणभक्तिलाभरत ॥ १०५ ॥
'सन्नामगर्भरामायण.'

या बाबूजी नायकाचा पुत्र पांडुरंगराय. हाही पित्याप्रमाणेंच उदारमनाचा व स्वधर्मरत होता.

शीलजितामरचंदन तन्नंदन **पांडुरंगराय**हि तें ।
यश मिरवितो प्रजांचीं करि दशरथसा न राम काय हितें ॥ ३७ ॥
'स्वर्गारोहणपर्व.' अ० २ रा.

या पांडुरंगरायानें पंतांस 'हरिवंश' रचावयास लाविलें.

श्रीपांडुरंगरायें असकृत् प्रेमेंकरूनि सांगावें ।
भगवन्निदेश जाणुनि सुयश यथाबुद्धि मग न कां गावें ॥ २ ॥

'हरिवंश.' अ० १ ला.

(५). पंतांनीं भारत रचिलें त्या वेळीं त्यांचे आईबाप स्वर्गवासी झाले होते असा पुढील आर्येत उल्लेख आहे:—

सज्जन मातें देवू संग जसा गरुड दे कदंबातें ।
देणें मीच न गाइल बहु नाकीं मत्पिता मदंबा तें ॥ १०० ॥

'अनुशासनपर्व.' अ० ८ वा.

(६). पंतांनीं कित्येक काव्यें लोकांच्या शिफारसीवरून रचिलीं हें पुढील उताऱ्यांवरून दृष्टोत्पत्तीस येईल:—

(क.) लिहिलें सुयश मयूरें या हेतु सदाशिवाख्य गोसांवी ॥ १३ ॥

'ब्रह्मोत्तरखंड.' अ० १२ वा.

साधु सदाशिववदनें आज्ञा ज्या ईश्वरें मला केली ।
त्या लिहुनि वाहिला हा शिवकीर्तिग्रंथ .... .... .... ॥ ७६ ॥

'कित्ता' अ० २२ वा.

(ख.) श्रीमद्गुरुपुत्रांहीं आज्ञा केली निरोप पाठवुनी ।
श्रीरामसुतमयूरें लिहिलें........ ........ .... ॥ ७२ ॥

'मदालसोपाख्यान.' अ० ६ वा.

(ग.) श्रीमदनंतप्रभुची गावी प्रेमेंकरूनि पुण्यकथा ।
भाग्यें संदेश असा आला हरिजनमुखें स्वकर्णपथा ॥ १ ॥
यास्तव भगवद्भक्तप्रेरित मी गातसें यथाबुद्धि ॥ २ ॥

'अनंतव्रतकथा.'

(७). पंतांनीं सदाशिव गोसांवी यांच्या सांगण्यावरून 'ब्रह्मोत्तरखंड' लिहिलें त्या वेळेस पंत नवीनच कविता करायास लागले होते असें पुढील आर्येत सुचविलेलें आहे:—

विनवितसें साधूंतें अणिकहि देऊनि हाक विनवीन ।
कीं आशी शुचि होऊ सद्यश सेवूनि हा कवि नवीन ॥ ८० ॥

'ब्रह्मोत्तरखंड.' अ० २२वा.

(८).पुढील आर्येंत पंतांनीं आपली कविता काशीस पाठविल्याचें लिहिलें आहे:—

श्रीरामसुतमयूरें श्रीगंगाप्रार्थनार्थ या आर्या ।
पाठविल्या काशीप्रति . . . . . . . . . . ॥ १७ ॥

'गंगाप्रार्थना.'

(९).'मंत्रभागवत' लिहिल्यानंतर पंतांनीं 'हरिवंशास' सुरवात केली:—

श्रीमंत्रभागवत या नामानें ग्रंथ जो तयांत करी ।
निजचरिताचा संग्रह कांहीं येथेंहि करिल तोचि हरी ॥ ९ ॥

' हरिवंश ' अ० १ ला.

( १० ).'नामरसायन' हें काव्य लिहिण्याच्या पूर्वीं पंतांनीं कोणकोणते ग्रंथ लिहिले होते त्यांपैकीं कित्येकांचा तपशील:—

'श्रीमद्भागवत' श्रीदशमस्कंधान्त दिव्य कृष्णकथा ।
त्या नूतन लिहिल्या मीं .... .... .... .... .... ॥ १०४ ॥
श्रीमद्विष्णुपुराणीं पाहुनि अत्यंत आदरें रचिला ।
'प्रल्हादविजय' नाम ग्रंथ .... .... .... .... .... .... ॥ १०५॥
जैमिनिकृताश्वमेधस्थित'कुशलवचरित' वर्णिलें आहे ।
बा हे रीति पहावी .... .... .... .... .... ॥ १०६ ॥
वाचीन 'मंत्ररामायण' आधीं मीच मग तुह्मी वाचा ॥ १०७ ॥
'संशयरत्नावलि' सत् सत्कृति 'केकावली' 'चषकआर्या' ॥ १०८ ॥
'आर्यामुक्तामाला' दावीन .... .... .... .... ॥ १०९ ॥

'नामरसायन.'

यांपैकीं 'प्रल्हादविजय,' 'कुशलवचरित, ' व ' चषकआर्या, ' हीं काव्यें आपण आपल्या मालेच्या २८ व्या अंकांत पंतांच्या न छापलेल्या ग्रंथांची याद दिली आहे त्यांत आहेत व 'आर्यामुक्तामाला' तर आपल्या मालेंतून प्रसिद्ध झाली आहे. बाकीचीं सर्व काव्यें प्रसिद्धच आहेत.

पंत हनुमंतास ह्मणतात:—

येइल मनासि तरि द्या आज्ञा गाया स्वबाहुमहिम्यातें ॥ १११ ॥

' नामरसायन.'

ही आज्ञा पंतांस मिळून यांनीं हनुमंतबाहुमहिमा आपल्या सदर्हु अंकांतील यादींत दिलेल्या 'हनूमत्स्तुति' या काव्यांत गाइला असें वाटतें.

( ११ ). पुढील आर्यांत कोणाविषयीं काय लिहिलें आहे हें हळूहळू शोधाअंतींच समजणार आहे. सध्यां तर त्या बहुशः संदिग्धच आहेत.

दाखविलें निजकवन श्रीमदनंताख्यसाधुसहि म्या तें ॥ १११ ॥
रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला ।
प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ॥ ११२ ॥
श्रीनारायणभट्ट ज्ञाते श्रीपांडुरंगपदभक्त ।
शेजारी मी त्यांचा पुसतां कथितील वृत्त ते व्यक्त ॥ ११३ ॥
नित्य पुराणकथांचें यांसि तुह्मांसहि असे सम व्यसन ।
करितिल अनंत नारायणबाबा सर्वगुणसमुल्लसन ॥ ११४ ॥

'नामरसायन.'

याप्रमाणें सर्वसंग्रह वगैरे ग्रंथांत प्रसिद्ध झालेल्या काव्यांतून मिळालेली माहिती ही पाठविली आहे. पंतांचीं अजून पुष्कळ काव्यें प्रसिद्ध होण्याचीं आहेत, त्यांतूनही कांहीं आणखी गोष्टी मिळण्याचा संभव आहे. तो उत्तरोत्तर सिद्धीस जाईलच.

पत्रविस्ताराची माफी असावी. लोभ असावा हे विज्ञापना.

मुंबई,ता० १० मार्च }
सन १८७९ इसवी. }

आपला मित्र,
**का० पां० प०**

---

## रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि० वि०. आपला **डॉक्टर जानसन्**वरील निबंध मीं समग्र लक्ष लावून वाचला, व इंग्रजी ग्रंथकारांनीं सर्व चरित्रांत आद्यस्थानापन्न केलेलें **बॉसवेल्**कृत **जॉनसन**चें चरित्र ही बहुतेक वाचलें आहे. त्यावरून जे विचार अल्प मतीस सुचले ते सादर केले आहेत. यांची यथोचित व्यवस्था व्हावी.

आजपर्यंत महाराष्ट्र भाषेत जितकीं चरित्रें छापून प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत इंग्रजींतील कांहींचीं भाषांतरें खेरीज करून, अशा प्रकारचें फार विरळा पाहण्यांत येतें. एतद्देशीय पुरुषांचीं जीं चरित्रें प्रसिद्ध आहेत त्यांत तर असें ळींच नाहीं. मग त्यांच्या स्वरचित चरित्राचें तर नांव दूरच. ही मराठी भाषेंत मोठी अहितोत्पादक उणीव समजली पाहिजे; कारण मनुष्याच्या सुधारणुकेस

व त्याची स्वाभाविक अनुकरणेच्छा जागृत ठेवण्यास असें दुसरें साधन नाहीं. इंग्रजींत अगदीं सामान्य लोकांचीं व पुस्तकवाल्यांचीं देखील चरित्रें छापून निघतात; परंतु आपल्या भाषेंत सर्वप्रसिद्ध राजकारणी व शूर लोकांचीं चरित्रें ही ह्मणण्यासारखीं प्रसिद्ध नाहींत. फार तर काय, पण मराठ्यांचे इतिहासांत ज्यांचें चातुर्य व पराक्रम वाचून सर्व केवळ थक्क होऊन जातात, त्यांचीं अशा प्रकारचीं चरित्रें कोणीं लिहूं ह्मटलें, तर अशा कृत्यास जी सामग्री अवश्य पाहिजे ती आजला मिळण्याचा संभव मुळींच नाहीं. ते कामकाज पाहूं लागल्यावर व बहुतेक बऱ्याच नांवालौकिकास चढल्यावर त्यांच्या नांवाचा उल्लेख जुन्या हस्तलिखित मराठी बखरींत सांपडतो व तोहि सरकारी कामापुरताच मात्र. त्यांची खासगी माहिती त्यांत फार कमी असते. कित्येकांचा तर जन्मकाळही बरोबर सांपडत नाहीं. त्या वेळेस एका राजाखेरीज कोणाची ही रोजनिशी, किंवा आपले अंतर्गत विचार वगैरे स्वत: लिहून ठेवण्याची चाल नसल्यानें उत्तम चरित्रांत जितक्या प्रकारची माहिती देणें जरूर आहे तितक्या प्रकारची आतां मिळण्यास मार्ग राहिला नाहीं, ही शोचनीय गोष्ट आहे. आतां त्यांच्या उत्कर्षानंतरचा कांहीं वृत्तांत लिहितां येईल व प्रस्तुत जीं चरित्रें प्रसिद्ध आहेत तीं अशींच आहेत. मराठी कवींची ही अशीच स्थिति आहे. बहुतेकांचें चरित्र पराकाष्ठा केली तरी पांच सात पानांबाहेर जावयाचें कठीण. त्यांजविषयीं तोंडीं माहितीही कालगतीनें नाहींशी होत चालली आहे.

ही गोष्ट पूर्वींच्या लोकांविषयीं झाली. परंतु अलीकडील सुधारलेल्या काळांत ही वरील स्थिति पालटली नाहीं. ही भाषेंतली उणीव काढून टाकण्याचें कोणीं ही मनांत आणलें नाहीं हें पाहून सखेदाश्चर्य वाटतें. मासिक पुस्तकांत 'चरित्र' हें सदर कोरडेंच राहिलें आहे असें आपण एके ठिकाणीं ह्मटलेंच आहे. पूर्वींच्या काळास वरील सबब आहे, परंतु आतां तशी गोष्ट नाहीं.

जुन्या व नव्या विद्वन्मंडळांत कित्येक कैलासवासी झाले, परंतु त्यांपैकीं कोणाचें ही वृत्त चरित्ररूपानें दृष्टीस पडलें नाहीं. त्यांत कोणीही अशा मानास योग्य नाहीं काय? मराठी गद्य ग्रंथांचे जनक माजी **सदाशिव काशिनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर** इत्यादि आद्यविद्वज्जन—ज्यांनीं या भाषेस रुळीस लावलें—अशांचीं चरित्रें मराठी वाचकांस मनोरंजक व हितावह होणार नाहींत काय! त्यांच्या वेळचे कित्येक गृहस्थ अजून आहेत

व त्यांच्या शिष्यवर्गांपैकीं कित्येकांस त्यांजविषयीं बरीच माहिती ही असेल, आणि अशांनीं त्यांचीं चरित्रें लिहूं ह्मटलें तर त्यांचा वास मुंबईसारख्या शहरांत असल्यामुळें बरींच साधनें ही त्यांस मिळण्यासारखीं असून, तसें करण्याची योग्यताही त्यांच्या अंगीं आहे. तसेंच थोड्या वर्षांपूर्वीं परलोकवासी झालेले **डाक्टर भाऊ दाजी, रा० ब० भास्कर दामोदर पाळंदे, विष्णु परशुराम रानडे, परशुरामपंत तात्या गोडबोले** व नुकतेच निवर्तलेले पुण्यांतील लोकप्रिय **अध्यक्ष** यांजविषयीं ही या संबंधांत शोचनीय अनास्था नजरेस पडते. याविषयीं दोन मासिक पुस्तकांत कांहीं सूचना केल्या होत्या परंतु त्यांचें चीज झाल्याचें समजलें नाहीं. कित्येकांचें स्मारक कृत्य करण्याबद्दल वर्गणी ही जमा करण्याचा क्रम सुरू झाला, परंतु हें करणें स्मारक कृत्याचा एक भाग आहे असें कोणासही वाटत नाहीं. वरील सद्गृहस्थांपैकीं दुसऱ्याचें चरित्र लिहिणारास एका श्रीमान गृहस्थानें ७५ रुपये बक्षीस देऊं ह्मणून इंदुप्रकाशांत जाहिरात दिली होती, पण व्यर्थ.* तसेंच तिसऱ्याचे सर्व लेख व त्याचा जीवनवृत्तांत प्रसिद्ध करण्याचेंही एकानें पतकरलें होतें. पण त्याचें फळ कांहींच दृष्टोत्पत्तीस अजून आलें नाहीं.

चांगल्या चरित्रवाचनापासून उपयोग काय याचें विवेचन मराठींत पुष्कळ ठिकाणीं आढळतें. तथापि या संबंधांत रा० शालिग्राम यांनीं केलेल्या **बापूगोखले** यांचे चरित्राच्या प्रस्तावनेंत जे मार्मिक विचार सादर केले आहेत त्यांचा उल्लेख या ठिकाणीं केल्याशिवाय राहवत नाहीं. **जॉनसन्**नें आपल्या निबंधावळींत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, 'चरित्रांत स्वरचित चरित्र उत्तम होय.' परंतु तसें नसल्यास प्रख्यात मनुष्याचें चरित्र त्याच्या मागें लवकरच प्रसिद्ध व्हावें हें चांगलें, कारण त्यास जीं साधनें अवश्य लागतात—ह्मणजे चरित्रनायकाशीं समकालीनत्व, त्याच्याशीं सलगी, किंवा त्याचा चांगला परिचय, त्याजबद्दल लोक-मत इत्यादिकांचा कालगतीनें ऱ्हास व्हावयास लागून मग तें चरित्र इतकें चांगलें होण्याचा संभव राहत नाहीं. चरित्रकारानें आपल्या नायकाचे समग्र लेख लक्ष लावून वाचले पाहिजेत. ह्याच्या मनांत नायकाविषयीं अतिशय प्रेम किंवा मत्सर यांतून एक ही कामाचें नाहीं, कारण ज्याप्रमाणें

* कै० भास्कर दामोदर पाळंदे यांचें लहानसें चरित्र नुकतेंच छापून प्रसिद्ध झालें आहे हें वरील पत्र लिहिणारास माहित नव्हतें असें दिसतें. रा. रा. भास्कर बल्लाळ निमकर, जगन्नाथ शंकरशेटच्या शाळेंतील फर्स्ट असिस्टंट, यांनीं वरील पुस्तक तयार केलें आहे असें कळतें.

नि. मा. क.

पहिल्या मनोविकाराच्या योगानें त्यास नायकाचे दोष ही गुण वाटून त्याच्या हातून त्याचा सर्व वृत्तांत सत्यतेनें निवेदन होणें कठीण, त्याप्रमाणेंच दुसऱ्या मनोविकारानें त्याच्या हातून नायकाच्या खऱ्या गुणाचा लोप होऊन त्याजविषयीं असद् बुद्धि व खोटीं मतें यांचा मात्र जनांत प्रसार होईल. निःपक्षपात हा गुण चरित्रकाराचे ठिकाणीं अवश्य असला पाहिजे. त्याचें काम नायकाची निंदा किंवा स्तुति करण्याचें नव्हे, तर त्याची खरी योग्यता व वास्तविक स्वरूप जगास प्रगट करणें हें होय. चरित्रांत नायकाचा अथपासून इतिपर्यंत वृत्तांत खुलासेवार असून शिवाय, त्याचे विचार कशा प्रकारचे होते, त्याचीं मतें काय होतीं, याचें ही त्यांत कथन असावें. याखेरीज त्यांत त्याचा स्वभाव, गृहाचार, आयुष्यक्रम वगैरेविषयीं मनोवेधक वर्णन असावें. चरित्रकारानें आपल्या नायकाच्या बाह्य गोष्टींपेक्षां (कारण त्यांची थोडीबहुत माहिती सर्वांस असतीच) गृहसंबंधी व खासगी माहितीकडे विशेष लक्ष द्यावें व त्याजविषयीं बारीक सारीक गोष्टी ही वगळतां कामास नये; कारण याजकडेच वाचकांची विशेष प्रवृत्ति व अभिरुचि आढळते, व यावरूनच नायकाची खरी परिक्षा करितां येते. चरित्र अशा रीतीनें लिहिलेलें असावें कीं, तें वाचीत असतां, वाचकांस आपण जणुं काय नायकाच्या संगतींतच आहोंत असें वाटावें. इंग्रजींत **बासवेलकृत जॉनसन्**चें चरित्र, **जॉनसन्**कृत **साव्हेज**चें चरित्र, **इर्विंग**कृत **गोल्डस्मिथ**चें चरित्र व कांहीं स्वरचित चरित्रें यांस उत्तम लेखितात. अशा प्रकारचें एतद्देशीय पुरुषाचें चरित्र एकही मराठी भाषेंत अद्याप नाहीं. सध्यांची स्थिति अशी आहे कीं ज्यांस तें लिहिण्याची उत्सुकता व हौस हीं वाटतात त्यांस पूर्वोक्त साधनें अनुकूळ नाहींत, व तीं ज्यांस उपलब्ध आहेत ते त्यांजविषयीं केवळ उदासीन आहेत असा एकंदर फलितार्थ दिसतो.

असो; ही सूचना करण्याविषयीं कित्येकांनीं मत दिल्यावरून आपल्याकडे ती पाठविली आहे. तींत कांहीं तथ्य आहे असें वाटल्यास, किंवा नवीन होतकरू ग्रंथकारांसही उपयोगी आहे असें दिसल्यास आपल्या लोकप्रिय पत्रांत ही अवश्य छापावी. कळावें, लोभ असावा ही विनंती.

मु० महत्पुर, ता० १३–१–७९.

**मालेचा भक्त.**

# निबंधमाला.

## अंक ५६.

### मोरोपंताची कविता.

कनकभूषणसंग्रहणोचितो यदि मणिस्त्रपुणि प्रणिधीयते ।
न स विरौति न चापि हि शोभते भवति योजयितुर्वचनीयता ॥*

१ मागील अंकांत डॉ० विल्सन् साहेबांचा प्रस्तुत कवीविषयींचा लेख वाचकांस सादर केला. आतां त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

२ वरील विचार करण्यापूर्वीं युरोपियन व विशेषत: मिशनरी लोकांच्या संबंधानें कांहीं गोष्टी वाचकांस कळविणें जरूर आहे; त्या लक्षांत आणल्या असतां प्रस्तुत लेखाचें स्वरूप वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. आमच्या देशांत पाश्चात्त्यांचें प्रभुत्व झाल्यापासून एक मोठा चमत्कार दृष्टीस पडूं लागला आहे कीं, ज्ञानसंपादन हें पूर्वीं जें महत्प्रयासाचें काम असे तें आलीकडे एकाएकीं अत्यंत सुगम झालें आहे ! आलीकडे यंत्रविद्या उत्कृष्ट दशेस येऊन पूर्वींचे हिन्यामहिन्यांचे प्रवास हल्लीं जसे एकेका दिवसांत सहज उरकतात, त्याप्रमाणेंच विद्यादेवीच्या मुलखांत ही अशा कांहीं यांत्रिक योजना सुरू झाल्या आहेत कीं काय कळे ! पूर्वीं शास्त्राध्ययनास ह्मटलें ह्मणजे तपांचीं तपें लागत असत; ह्मणजे बारा बारा चोविस चोविस वर्षें घालवावीं तेव्हां दोन चार शास्त्रांत गति होत असे ! हल्लींचा प्रकार पाहिला तर चार वेद, साहा शास्त्रें, अठरा पुराणें या सर्वांचें ज्ञान होण्यास पराकाष्ठा चार पांच वर्षें ! हें तर काय, पण एशिया खंडांतील सारी विद्या सुद्धां एका मनुष्यास तादृश प्रयास न पडतां पटकावतां येते ! युरोपांतील स्थिति पाहिली तर तेथील विद्या अद्याप इकच्या सारख्या सुगम झाल्या आहेतसें दिसत नाहीं. तेथील विद्यालयांतून जुन्या ग्रीक व रोमन विद्यांचा जरी अभ्यास सतत चालू आहे, व इकडे संस्कृताचें

---

* "सोन्याच्या दागिन्यांत घालण्यास योग्य असें जें रत्न तें जर शिशाच्या कोंदणांत बसविलें, तर तें रत्न रडतें असें नाहीं, व तेथें शोभा पावतें असें ही नाहीं; तर योजकाच्या चातुर्याची मात्र चर्चा होते !"

जसें होत चाललें आहे त्याप्रमाणें तिकडे सामान्यतः पाहतां ग्रीक व ल्याटिन या भाषांचें ज्ञान जरी पुष्कळांच्या ठायीं आढळतें, तरी वरील दोन विद्यांत महापंडित ह्मणून आजपर्यंत गाजलेले फारच थोडे निघतील ! नुसत्या इंग्लंडांत पाहिलें तर असलीं विद्वद्रत्नें आजपर्यंत फार तर चारपांचच झालीं असतील ! उघडच आहे; इकडे पेशवाईंत शास्त्रविद्येस इतकें उत्तेजन होतें, पण सगळ्या कारकीर्दींत साऱ्या देशभर गाजलेले भट्टाचार्य किती निपजले असतील ? पण हल्लींच्या मन्वंतरांत ती स्थिति अगदीं बदलून गेली आहे. एकोणिसाव्या शतकांत पंडित बनवण्याची कृति फारच सुलभ झाली आहे. सरासरी व्युत्पत्ति पैदा करावी, युरोपियन लोकांनीं रचलेल्या पांचपन्नास ग्रंथांतून सटरफटर गोळा करावें, जुने एक दोन पंडित जवळ करावे कीं आटपलें ! मग व्याख्यान देण्याचा प्रसंग येवो, ग्रंथरचना करण्याचें अगत्य पडो, कांहीं ही असो; वरील सामग्री जवळ असली ह्मणजे मग कसली ही पंचाईत नाहीं ! सारांश, अर्वाचीन पांडित्य हें सरासरी गौडबंगाल झालें आहे. पण इतकें असून तें सामान्य लोकांस उमगण्याचा मार्ग राहिला नाहीं. कांकीं, आलीकडील लोकांस स्वतः तर त्यांत मुळींच गम्य नाहीं, तेव्हां 'सर्वान् पुच्छवतो हयानिति वदंस्तत्राधिकारे स्थिताः' अशी त्यांची स्थिति झाली आहे. ज्या थोड्या लोकांस ह्मणजे जुन्या पंडितांस वरील लटपट कळण्याचा संभव ते तर अगोदर दिवसेंदिवस नाहींसेच होत चालले आहेत. जे कोणी थोडे कोठें कोठें आढळतील त्यांस अगोदर इकडची वार्ता ही कळण्याचा संभव नाहीं; ह्यांतून कोणास कळलीच तर त्या बिचाऱ्यांचें आलीकडील 'जुक्ती' पुढें काय चालणार ? "शास्त्रीबोवा, पृथ्वीवर समुद्र किती आहेत!" ह्मणून प्रश्न केल्याबरोबर शास्त्रीबोवांच्या ज्ञानाची तेव्हांच परीक्षा होणार ! तर याप्रमाणें आमच्या प्राचीन विद्यांत निष्णात ह्मणविणाऱ्या मंडळीची स्थिति आहे.

३ डॉ० विल्सन्सारख्या मिशनरींची तर वरच्याहूनही अधिक पायरी. त्यांनीं इंग्लंडचें व हिंदुस्थानचें मोठेंच काम पतकरलें असल्यामुळें पाश्चात्त्य व प्राच्यविद्या त्यांस केवळ करतलामलकवत् असल्या पाहिजेत ! इकडील एकाद्या शिष्यानें तिकडची कोणती ही गोष्ट विचारली तरी ती त्यांस सांगतां आली पाहिजे; व तिकडच्या कोणी पंडितानें किंवा मंडळीनें इकडची कोणत्या ही तऱ्हेची माहिती पुसली तरी ती ही त्यांस माहीत नसतां उपयोगी नाहीं. तेव्हां

दोन्ही खंडांच्या संबंधाचें हरएक प्रकारचें ज्ञान असावें तेव्हां शुभवर्तमानाच्या प्रेषिताचा जम चांगला बसणार आहे हें उघड आहे.

पण वरील सर्वज्ञता ही शुभवर्तमानाच्या कृत्यास किती ही आवश्यक असली तरी ती साध्य कशी व्हावी ? ‘ अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बह-वश्च विघ्ना:’ ही जी इहलोकची स्थिति आहे ती कशी बदलेल ? कोणी केवढ्या ही अचाट बुद्धीचा असला तरी विद्यांची सीमा कोणाच्यानें गांठवणार आहे ? त्याप्रमाणेंच आयुष्याची स्वल्पता व विघ्नांचें बाहुल्य यांच्यापुढें तरी कोणाचें काय चालणार आहे ? तेव्हां यावरून पाहतां कोणी ही मनुष्यानें फार मोठी हाव बांधतां उपयोगी नाहीं हें उघड आहे. ती बांधली असतां बदामाच्या गोष्टींत जशी पोराची अवस्था झाली तशी व्हावयाची! त्यांतून कोणी तितक्यांतून ही अनेक विद्यांचें प्रभुत्व संपादन करण्याची खटपट चालविलीच तर ज्याप्रमाणें धातूचा पत्रा जितका ठोकठोकून लांब करावा तितका लांब होत जातो खरा पण तितकें जाडीचें मान कमी कमी होत जातें, त्याप्रमाणें जितक्या अधिक विद्यांचा हव्यास धरावा तितकी प्रत्येक विषयांतील गति कमी होते; तेव्हां इकडून तिकडून क्षेत्रफळ सारखेंच! नाहीं ह्मणायाला इतकी मात्र तफावत होते कीं, थोडेच विषय घेऊन त्यांवरच जो व्यासंग चालवतो त्याचे ते पक्के होतात आणि वरील हव्यासी मनुष्याचें ज्ञान विषयबाहुल्यास्तव चोहोंकडे गुडघाभरच पाणी अशा तऱ्हेचें होतें; व त्यामुळें अनेक प्रमादांस मात्र तो पात्र होतो.

असो; आतां वरील सिद्धांताच्या प्रत्ययार्थ डॉक्टर मजकुरांच्या लेखांतील सत्यासत्यतेचें विवेचन करूं. हें विवेचन त्यांच्या शिष्यवर्गास वगैरे कदाचित् आवडणार नाहीं, व येवढ्या सर्वमान्य पंडिताच्या लेखावर दूषणें दिल्याबद्दल आह्मांवर कदाचित् धृष्टतेचा ही आरोप येईल. पण जोंपर्यंत आमच्या दूषणाची अयथार्थता आह्मांस कोणी दाखवणार नाहीं तोंपर्यंत वरील आरोप आह्मी खुशाल पतकरूं.

४. पहिल्या वाक्यांत पहिल्या पेशव्याच्या अधिकाराचा सन १७१७ ह्मणून दिला आहे तो चुकीचा आहे हें आमच्या सर्व वाचकांच्या ध्यानांत येईलच; कां कीं बाळाजी विश्वनाथ यास सन १७१४ त पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं हें सुप्रसिद्ध आहे. आमच्या कवीचा जन्मशकही वरील वर्ष नसून सन १७२८ त तो जन्मला. शूद्रकवीचा उदय शिवाजीच्या कारकीर्दींत झाला ही गोष्ट ही

खरी नाहीं. कां कीं, प्रस्तुत पंडितानें दिलेला सन जरी घेतला,* तरी शिवाजीच्या कारकीर्दीला पुष्कळच अवकाश राहतो. त्याचा राज्याभिषेक तर १६७४ त झाला; व नुसता तो आपणास राजा ह्मणवूं लागला ही गोष्ट ही १६६४ त झाली. सन १६४९ त ह्मटलें ह्मणजे त्याचा नुकता उदय होऊं लागला होता. त्या वेळेस त्याची सत्ता धोंड्या वाघ किंवा उमाजी रामोशी यांच्या बेताचीच सरासरी होती! हें केवळ शकांच्या संबंधानें झालें. आतां सदरील वाक्यांतील अभिप्रायाविषयीं जर विचार केला, तर तो अशा तऱ्हेचा दिसतो कीं राज्यक्रांति झाली कीं मोटे कवि निपजायाचेच! हा सिद्धांत कांहीं अंशीं खरा आहे, व सर्व देशांच्या इतिहासावरून त्यास बराच आधार मिळतो. तरी ज्याप्रमाणें बीजारोपण झालें न झालें तों फलोत्पत्ति संभवत नाहीं, त्याप्रमाणेंच राज्यक्रांतीची वेळ व कवींच्या जन्माची वेळ ही ही एककालिक संभवत नाहीं. त्यांतून आमच्या महाराष्ट्र कवींची गोष्ट तर इतर देशांतील कवींच्याहून अगदींच निराळी. त्यांचें धोरण केवळ परमार्थाचें असल्यामुळें ऐहिक राज्यांच्या घडामोडींनीं ह्यांच्या स्फूर्तीस साह्य व्हावें असा मुळींच प्रकार दिसत नाहीं. आमचे कवि भर यवनी अमलांत व भर मराठी कारकीर्दींत जन्मलेले आहेत; तरी एका स्थितीमुळें त्यांच्या वाणीस तेज चढलें आहे किंवा दुसरीच्यामुळें तें उतरलें आहे असें बिलकुल नजरेस येत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, **तुकाराम** हा जन्मला त्याच्यापूर्वी शें दोनशें वर्षें जरी जन्मता, तरी त्याची अभंगवाणी झाली आहे तशीच प्रगट होती. त्याप्रमाणेंच **ज्ञानदेव** व **मोरोपंत** हे कालांतरीं जरी जन्मास येते तरी त्यांची कविता आहे तशीच उदयास येती. येवढें मात्र झालें असतें कीं, 'जाणिजे,' 'सागरू' इत्यादि रूपें व 'पढियंतें,'

---

* हा सन १६४९ असा दिला आहे. तेव्हां तुकारामाच्या शेवटल्या वर्षी शिवाजी राजा एकवीस वर्षांचा होता असें होतें.— तुकारामाच्या जन्ममरणाच्या शकांच्या संबंधानें मोठा घोंटाळा दिसून येतो. 'नवनीतां'त मागीं भास्कर दामोदर पाळंदे यांनीं जो वृत्तांत दिला आहे त्यांत वरील दोन शक १५१० व १५५१ (फाल्गुन वद्य १२) असे दिले आहेत. गाथ्यांत तेच शक १५३० व १५७१ (फा० व० २) असे आढळतात. हे दोन्ही शक शिवाजीच्या संबंधानें मुळींच जुळत नाहींत. पहिला शक मानिला असतां तुकारामाच्या अंतसमयीं शिवाजी एक वर्षाचा होता असें होतें; दुसरा मानला तरी एकवीस वर्षांचा होता असें निघतें. कोणीकडून पाहिलें तरी 'गाथ्यांतील शिवाजीकडे पाठविलेल्या अभंगांचा जम बसत नाहीं.'

'चववी', 'साचोकारें' इत्यादि शब्द ज्ञानदेवाच्या कवितेंत येते ना; व मोरोपंताची कविता आहे तशी संस्कृत शब्दांनीं व प्रयोगांनीं गजबजून न जाती, आणि 'काच स्मृतिरपि तापसि मैवं प्रलपात्र भूभुजः सदसि' किंवा 'पकडो लियो हकालो वे बिसवामितर भाग जावेगा' हा चमत्कार ही तींत दृष्टीस न पडता !

कऱ्हाडे ब्राह्मणांविषयीं विल्सन् साहेब जें ह्मणतात, कीं त्यांस 'महाराष्ट्र देशांत मोठीशी मान्यता नाहीं' हें ही आह्मांस कसें तें नीट समजत नाहीं. अन्नोदकादिक व्यवहार किंवा स्नेहसंबंध हे प्रकार कऱ्हाड्यांशीं होत नाहींत असें तर मुळींच नाहीं; किंवा ते कोणत्या ही प्रकारें हीन होत असें ही कोणी समजत नाहीं. त्यांजवर पूर्वींपासून एक मोठा अपवाद आहे खरा; पण त्याच्या योगानें त्यांची मान्यता कमी झाली आहे असें कोठें ही आढळत नाहीं.* 'क' कारांची कावेबाजपणाबद्दल ख्याति असल्यावरून किंवा देशस्थांची धामेपणाबद्दल प्रसिद्धि असल्यावरून त्यांच्या लोकमान्यतेंत जसा कमीपणा येत नाहीं त्याप्रमाणेंच वरील ज्ञातीची ही गोष्ट होय. त्यांतून ज्या सालीं साहेब मजकुरांचा वरील लेख प्रगट झाला त्या सालीं एका कऱ्हाड्या बाईचें नांव साऱ्या देशभर गर्जत होतें, त्यावरून ही विल्सन् साहेबांसारख्या शोधक पंडिताचा वरील भ्रम कसा निघाला नाहीं याचें आह्मांस आश्चर्य वाटतें ! मोरोपंताची प्रसिद्धि त्याच्या मरणोत्तर झाली, व ज्ञातिजन्य ग्रह मोडण्यास पुष्कळ काळ लोटावा लागला, हे दोन्ही उल्लेख ही अत्यंत विस्मयास्पद होत! आमच्या कवीविषयीं साहेब मजकुरांनीं जर उगीच कोणापाशीं थोडीशी विचारपूस केली असती, तरी त्यांस तेव्हांच कोणींही सांगितलें असतें कीं,

---

* 'Indian caste' ( हिंदुस्थानांतील जातिभेद ) या नांवाचा जो ग्रंथ वरील साहेबांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला त्यांत त्यांनीं वरील ब्राह्मणांविषयीं फार निराळ्या तऱ्हेचा मजकूर लिहिलेला आढळतोः—

"They ( The Karhadas ) appear in every way as respectable as their neighbours. The great Marathi poet Moropant belonged to their caste. To them, too, belonged one of the most learned natives who has yet appeared in Western India, the late distinguished Bála Gangádhar Shástri Jámbhekar, professor in the Elphinstone Institution. What is generally said of the intelligence of the Konkanasthas is applicable to the Karhadas, with whom they are generally on friendly terms."

**मोरोपंता**ची कीर्ति त्याच्या हयातींत ही चोहोंकडे पसरली होती, त्याच्या नूतन कवितेस श्रोतेमंडळीची मान डोलल्यावांचून बहुतकरून एक ही दिवस जात नसेल, पेशव्यांचे आप्त जे बारामतीकर जोशी त्यांच्यापाशीं प्रस्तुत कवीचें वास्तव्य होतें, आणि सोलापुरकर जोशीबोवा तर त्याच्या आर्यांवरून इतके लुब्ध होऊन पडले कीं त्यांचें नाचेपोर सुटून ते ततःपर परमार्थपरायण झाले! पण इतकें सर्व असतां माजी परशुरामपंत तात्यांनीं **पंता**ची तारीफ केलेली पाहून साहेबांस आश्चर्य वाटलें, आणि त्यांचा सिद्धांत झाला कीं, ज्यापेक्षां कोंकणस्थ पंडिताच्या लेखांत या कऱ्हाड्या कवीची प्रशंसा केलेली आढळते, त्यापेक्षां कवीनें आपल्या देशबंधूंचा जातिभेदजन्य दुराग्रह मोडून टाकला यांत संशय नाहीं! हा तर्क किती समंजस आहे बरें! **पोप**कवीच्या 'इलियडा'ची प्रख्याति पाहून किंवा **गोल्डस्मिथ्**च्या काव्यांची तारीफ ऐकून जर कोणी एतद्देशीय पंडितानें असेच तर्क बांधले,– कीं ज्या अर्थी क्याथलिक धर्माच्या कवीचें काव्य येवढें सर्वमान्य झालें आहे त्या अर्थी **पोप**ची शहामत खरी, कीं त्याच्या पदलालित्यानें धर्मभेदजन्य दुराग्रहाचें ही खंडन केलें. त्याप्रमाणेंच **गोल्डस्मिथ्** कवीची ही धन्य, कीं तो ऐर्लंडदेशचा असतां आज इंग्लंडांतील लहानथोरांस त्याचे ग्रंथ परमप्रिय झाले आहेत! याप्रमाणेंच **स्कॉट्** यास सर्व कादंबरीकारांत अग्रगण्य लेखतात, **बर्क** यास साऱ्या वक्त्यांत श्रेष्ठ मानतात, **वेलिंग्टन्** यास साऱ्या इंग्लिश सेनापतींत पहिली पायरी देतात, इत्यादि शेंकडों गोष्टींवरून ही वरच्यासारखीं अनुमानें शतशः होणारीं आहेत! पण हीं किती यथार्थ होत हें पाहण्यास विलायतेस जावयास नको; येथें इंग्रेजी शिकलेले विद्यार्थी ही त्यांत तथ्य कितपत आहे तें सांगूं शकतील. उघडच आहे कीं, कोणाच्या कवित्वाची पारख कोणी त्याच्या धर्मावरून किंवा जातीवरून करतात काय? मिशनरी लोकांनीं पहिल्यापासून आमच्या देशांतील जातिभेदाचा बोभाटा ऐकला आहे, व जातिभेद हा पराकाष्ठेचा अनर्थावह होय हें त्यांच्या मनानें एकदा घेतलें आहे. तेव्हां तो नाहीं तेथें आडवा येणारच! कोणी कसा ही कारागीर असो, कोणाच्या अंगीं कांहीं ही गुण असो, त्याच्या जातभाईंखेरीज त्याच्या कारागिरीची वाहवा किंवा त्याच्या गुणाची चहा ह्मणून व्हावयाची नाहीं! विल्सन् साहेबांनीं येवढा जातिभेदजन्य दुराग्रह आमच्या देशाच्या कोणत्या भागांत पाहिला

असेल तो असो ! आमच्या वाचकांपैकीं थोडयांच्याच आढळांत तो कोठें आला असेल तर असेल !

पुढें आमच्या कवीवर साहेबांचा असा आक्षेप आहे कीं, 'रामायण,' 'महाभारत' आणि 'भागवत' या ग्रंथांच्या आधारें त्यानें कविता केली आहे, पण सदरील ग्रंथांपेक्षां अधिक सरस वर्णन किंवा त्यांहून प्रौढ अर्थ-रचना हीं त्याच्या काव्यांत फार करून कोठें ही आढळत नाहींत. वरील वाक्यावर अनेक प्रत्याक्षेप येणारे आहेत. एक तर प्रथमत: अशी शंका उद्भवते कीं, साहेबमजकुरांनीं वरील तिन्ही ग्रंथ व आमच्या प्राकृत कवीचीं काव्यें हीं सर्व येवढ्या बारकाव्यानें वाचलीं असतील काय ? 'महाभारत' एक लक्ष, 'रामायण' चोवीस हजार, आणि 'भागवत' अठरा हजार, येवढाच ग्रंथसमूह पाहिला तरी सरासरी दीड लक्षाची भरती झाली. ही सर्व संख्या एका पारडयांत, आणि दुसऱ्यांत आमच्या कवीच्या तीन लक्ष आर्या ! मग येवढीं जड पारडीं उचललीं असतां कांटा केसभर ही इकडे कीं इकडे कलत नाहीं असें साहेबांच्या नजरेस आलें काय ? हें एक झालें. दुसरें असें कीं, जरी घटकाभर असें कबूल केलें, कीं वरील दोन्हीं पारडीं अगदीं तंतोतंत भरलीं, तरी यामुळें आमच्या कवीकडे कांहीं मोठें गौणत्व येतें असें आह्मांस वाटत नाहीं. मिशनरी साहेबांस इकडील ग्रंथ सरासरी सारेच अप्रयोजक, तेव्हां आमच्या आदिकवीच्या सारखी किंवा इतिहासकाराच्या बरोबरीची ग्रंथ-रचना करणें ह्मणजे त्यांच्या दृष्टीनें कांहीं मोठें दुष्कर कृत्य आहे असें नाहीं हें उघडच आहे; पण आह्मा नेटिवांच्या दृष्टीनें वरील साम्य ह्मणजे मोठीच पदवी होय.* साहेब मजकुरांस **शेक्सपीयर**च्या तोडीचें नाटक लिहिणें, किंवा

* **गोवर्धना**सारख्यांनीं वरील ग्रंथांविषयीं आपली पूज्यत्वबुद्धि येणेंप्रमाणें प्रगट केलेली आढळते:--

विहितघनालंकरणं विचित्रवर्णावलीमयस्फुरणम् ।<br>
शक्रायुधमिव वक्रं वल्मीकभुवं कविं नौमि ॥<br>
व्यासगिरां निर्यासं सारं विश्वस्य भारतं वंदे ।<br>
भूषणतयैव संज्ञां यदंकितां भारती वहति ॥<br>
श्रीरामायणभारतबृहत्कथानां कवीन् नमस्कुर्मः ।<br>
त्रिस्रोता इव सरसा सरस्वती स्फुरति यैर्भिन्ना ॥<br>
अतिदीर्घजीविदोषाद् व्यासेन यशोऽपहारितं हंत ।<br>
कैर्नोच्येत गुणाढ्यः स एव जन्मांतरापन्नः ॥

होमरच्या तोडीचें काव्य रचणें हें जितपत सुसाध्य वाटणार आहे तितपतच वाल्मीकिव्यासप्रभृति कवींनीं साधलेला रस आपल्या काव्यांत उतरणें हें इकडील कवींस ही वाटणारें आहे. तर हें ध्यानांत आणून विल्सन् साहेबांनीं मूळ 'रामायणा'दि ग्रंथांवर आमच्या कवीच्या हातून तान झाली नाहीं या अपराधाबद्दल त्याची कांहीं गय करायाची होती. असो; पण वस्तुत: पाहिलें असतां साहेबांचा आक्षेप तर मुळींच लागू पडत नाहीं. तो कसा हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. गेल्या ४६ व्या अंकांत व १२ व्या अंकाच्या आरंभीं जें विवरण केलें आहे त्यावरून सहज लक्षांत येणारें आहे कीं, महाराष्ट्र कवींनीं व्यासादिकांचें आयतेंच भांडार लुटलें आहे, त्यांत त्यांच्या पदरचें ह्मणून कांहीं नाहीं, हें आलीकडील सर्वसंमत मत केवळ अज्ञानमूलक होय. 'रघुवंशा'दि महाकाव्यांस 'स्वतंत्र ग्रंथ' ह्मणतांना जसें फारसें चांचरायाला नको, त्याप्रमाणेंच तुकारामाची अभंगवाणी किंवा मोरोपंताची आर्यावाणी या प्राय: स्वत:सिद्धच होत असें ह्मणतांना ही फारशी कांकूं करणें नलगे!

यापुढील वाक्यावर गेल्या ९२ व्या अंकांत चर्चा केलीच आहे. तेव्हां येथें त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं.

पुढील दोन वाक्यांत साहेबांचा असा मतलब दिसतो कीं, मोरोपंत हा मूळचा विष्णुभक्त असतां पेशव्यांची शिवोपासना पाहून शिवाविषयीं आपली भक्ति प्रगट करूं लागला. इतर महाराष्ट्र कवींच्या पदरीं ही वरील मतलबी भक्ति साहेबांनीं बेलाशक घालून दिली आहे. ज्या मिशनरी साहेबांची अशी ख्याति होती, व ती स्वमुखानें ही ते सांगत असत, कीं आमच्या देशांतील राजापासून रंकापर्यंत त्यांचें दळणवळण असे; व सकाळीं बडोद्याच्या सयाजी महाराजांबरोबर भाषण केलें तर संध्याकाळीं नांगर हाकणाऱ्या कुणब्याशीं त्यांचें बोलणें होत असे, त्यांच्या लेखांत आमच्या कवींविषयीं असल्या विलक्षण गैरसमजुती दृष्टीस पडाव्या हें खरोखर मोठें आश्चर्यकारक होय! हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर पाय ठेवण्याच्या पूर्वीं विलायतेंत ही विल्सन् साहेबांच्या कानावर हा मजकूर आला नसेल काय, कीं हिंदुलोक हे ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांस मुख्य दैवतें मानतात? त्याप्रमाणेंच हिंदूंचे देव किती अपरंपार आहेत व ते त्या सर्वांस भजतात, हें ही त्यांच्या कानीं कधीं आलें नाहीं काय?

जर मोरोपंताची सर्व देवांविषयीं ऐक्यभावना असून तो सर्वांस सारखेच पूज्य मानीत असे, व प्रत्येक क्षेत्राच्या देवतेवर, प्रत्येक तीर्थावर, प्रत्येक साधूवर त्यानें स्तुतिपर आर्या केल्या आहेत, तर शिवासारख्या प्रधान देवतांस आमचा कवि आपल्या ग्रंथांत मानतो, हें सांगण्यांत येवढा कोणता अर्थ असेल तो असो. महाराष्ट्रांत वीस वर्षें वास्तव्य असतां, व 'हिंदुधर्माचा कृत्रिम कोट' फोडण्याची स्तुत्य मनीषा निरंतर मनांत वागवून त्याविषयीं पुरती माहिती मिळविण्याविषयीं साहेबांचीं इतकीं वर्षें सारखी खटपट चालली असतां, त्यांस सर्वप्रसिद्ध गोष्टींची ही माहिती व्हावयाची कशी राहिली हें आह्मांस कळत नाहीं ! आमच्या देशांत महाएकादशी जशी सर्व आबालवृद्ध करतात त्याप्रमाणेंच शिवरात्रीचें ही व्रत सर्व पाळतात, आमच्या पंचायतनांत शालिग्रामशिलेच्या शेजारींच शिवाचा बाण ही दृष्टीस पडतो, ज्या कवीनें 'हरिविजय' केला त्यानेंच 'शिवलीलामृत' ही केलें, तसेंच विष्णूचीं, शिवाचीं, देवीचीं, गणपतीचीं वगैरे देवालयें आमच्या देशांत अगदीं शेजारीं शेजारीं असून त्यांच्या संबंधानें कोठें लोकांच्या मारामाऱ्या झालेल्या, खून पडलेले, किंवा नुसती शिवीगाळ ही झालेली कधीं ही ऐकण्यांत येत नाहीं, या सर्व गोष्टी विल्सन् साहेबांसारख्या विद्वान् व शोधक पंडितास ठाऊक नसाव्या याचा आह्मांस फारच आश्चर्य वाटतो ! पेशव्यांचें जरी शिव हें दैवत असलें, तरी इतर देवतांविषयीं त्यांचा विरोध असल्याविषयीं आमच्या मिशनरी साहेबांस कोठें प्रमाण मिळालें होतें काय ? त्याप्रमाणेंच त्यांनीं प्रस्तुत कवीवर व इतरांवर ही उपासनांतर केल्याचा किंवा निदान आपल्या लेखांत तरीं आपल्या उपास्य देवतेव्यतिरिक्त अन्य देवतांविषयीं वरकांती भक्ति प्रगट केल्याचा जो आरोप बेलाशक केला आहे, तें तरी केवढें साहस होय ! आमच्या बारामतीकर कवीचा आणि पेशव्यांचा तर बिलकुल संबंध नव्हता. त्याचीं सारीं काव्यें धुंडलीं तरी त्यांत पेशव्यांपैकीं एकाचें ही नांवसुद्धां सांपडायाचें नाहीं; मग त्यांचें स्तवन तर कोठलें*! त्यानें सारा जन्म ज्या यजमानांच्या समागमें घालविला त्यांविषयीं सुद्धां त्यानें उल्लेख केलेले त्याच्या साऱ्या कवितेंत कोठें आठ

---

* मोरोपंताविषयीं बराच सविस्तर वृत्तांत 'काव्येतिहाससंग्रहा'च्या येत्या अंकांत येणार आहे. त्यांतील कांहीं आख्यायिकांवरून आमच्या कविसिंहावर मिशनरी साहेबांनीं ग्रामसिंहवृत्तिचा जो आरोप केला आहे त्याची यथार्थता चांगली लक्षांत येईल.

दाहा ठिकाणीं आढळले तर नशीब ! मग इतकी ज्याची निस्पृहता त्यावर केवळ राजप्रीतिसंपादनार्थ मतांतर केल्याचा आरोप करणें हें केवढें धारिष्ट ह्मणावें ! इतर महाराष्ट्रकवींवर साहेबांनीं हाच आरोप जो मोघमपणें केला आहे तो तरी अशाच प्रकारचा होय. अगोदर पेशव्यांच्या आमदानींत कवि झाले तरी किती ?—अमृतराय, मोरोपंत, रघुनाथपंडित आणि रामजोशी. मग यांपैकीं स्वदेवतात्याग करून पेशव्यांची खुषामत करायाला कोण तयार झाले असतील ते असोत ! लोकांत तर वरील चौकडींतून एकाविषयीं ही अशा प्रकारचा कांहीं एक बोभाट नाहीं. मग असें झालें असेल तर नकळे, कीं एकाद्या क्याथलिक पाद्रीनें वरील कवींच्या मरणकाळीं गुप्तपणें त्यांच्याजवळ जाऊन त्यांची शेवटली जबानी घेतली असेल, व ती आपल्या धर्मबंधूंस कळण्याकरतां इंग्रजींत कोठें प्रसिद्ध केली असेल ! अशी कांहीं कल्पना केल्याखेरीज वरील कवींच्या लबाडीची बातमी मिशनरी मजकुरांस कशी कळली असावी हें कांहीं उमगत नाहीं. आतां आमच्या साहेबांस यहुदी कवींची जर तारीफ करणें होती, व त्यांनीं 'जिवंत देवा'चे जे एकदां पाय धरले ते धरलेच, त्यांच्या पवित्र भूमीचें प्रभुत्व अनेक राष्ट्रांकडे गेलें असतां त्यांची दिव्य स्फूर्ति यहोहवावांचून अन्य देवाकडे वळलीच नाहीं, इत्यादि प्रकारें जर वरील देवप्रिय लोकांची स्तुति करणें त्यांस अवश्य वाटलेंच होतें, तर ती त्यांनीं खुशाल करायाची होती ! पण त्यांच्या स्तवनार्थ आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्र कवींवर स्वकपोलकल्पित दूषणें देण्याची काय गरज होती ? त्यांतून साहेबांनीं हें ही मनांत आणायाचें होतें कीं, हिंदु लोकांची भक्ति जर इतकी कोंवळी असती कीं पाहिजे तिकडे तिनें सहज वळावें, तर मिशनरी खातें आमच्या देशांत येण्याचीच मुळीं गरज उरतीना ! भाकरीच्या तुकड्याबरोबर कुतरें नाचवावें तसें नाचतें अशीच जर येथील लोकांची स्थिति असती तर आमचा देश केव्हांच सारा इमाममय बनून जाता. त्याप्रमाणेंच साहेबांच्या भाकिताप्रमाणें आजपर्यंत कोणी तरी ख्रिस्ती तुकाराम किंवा वामन आमच्या देशांत निपजता. पण अद्याप तर तीं चिन्हें कोठेंही बिलकुल दृष्टीस पडत नाहींत !*

* विलसन् साहेबांनीं महाराष्ट्र कवींचा वृत्तांत संपवून शेवटीं पुढील पवित्र आशा प्रगट केली आहे:—

पुढील वाक्यांत साहेबांच्या हातून दोन प्रमाद घडले आहेत. मोरोपंताचें मरणकालीं वय ६० वर्षांचें होतें असें ह्मटलें आहे; तें खरोखरी ६५ वर्षांचें होतें. त्याप्रमाणेंच त्यास निवर्तून सुमारें शंभर वर्षे झालीं असें ह्मटलें आहे तें ही बरोबर नाहीं; १८९७ सालीं वरील गोष्टींस अवघीं ६३ वर्षें झालीं होतीं. साहेबांनीं 'नवनीत' उलटून पाहिलें असतें किंवा त्यांच्या एतद्देशीय स्नेह्यांपैकीं कोणापाशीं उगीच चौकशी केली असती, तरी वरील खरी माहिती मिळण्याचा त्यांस संभव होता. पण ते स्वतःच मुळीं सर्वांस गुरुस्थानीं व जातीनें सर्वज्ञ; त्यांतून त्यांच्या वज्रलेखावर कोणाची लेखणी चालणार! तेव्हां त्यांस वरील खटपट करण्याची जरूर दिसली नाहीं हें ही नीटच होय.

शेवटील वाक्यांत विल्सन् साहेब सांगतात कीं, 'केकावलींत मुख्यतः कृष्णाचा महिमा वर्णिला आहे. या वाक्याचा अर्थ ही आमच्या ध्यानांत चांगलासा उतरत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यानें 'केकावली' समग्र वाचली आहे, व ती ज्यास साद्यंत समजली आहे, त्याच्या हातून प्रस्तुत काव्यावर साहेबांच्या सारखा शेरा सहसा पडणार नाहीं. या काव्यांतील मुख्य विषय कृष्ण किंवा इतर कोणी ही देव नसून कवीचा स्वोद्धार हाच होय. कोणी कवीनें लिहिलें आहे:—

तनू भववनीं त्रितापदवपावकें कावली ।
ह्मणूनि करुणस्वरें करि मयूर केकावली ।

तर संसारांतील तापत्रयानें पीडित होत्सात्या मयूरानें 'दयामृतघना'च्या वृष्टीविषयीं अत्यंत सोत्कंठ होऊन टाहो फोडला, व 'इसापनीतीं'त त्या लाडक्या पक्ष्यानें आपल्या धनिणीपाशीं जसें गाऱ्हाणें गाइलें आहे त्याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यांतही पहिल्यापासून शेवटपर्यंत

---

( मागील पृष्ठावरून. )

"The Mahrathas declare that the spirit of poetry has left their country. It may soon appear that in this opinion they are mistaken; even though it may not be expected that Hinduism, with its grotesque and impure gods and heroes, will again inspire the bards of the country."

तसाचि उरलों कसा पतित मी नसें काय कीं ।
दयामृतघना अहो हरि वळा मयूराकडे ।
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे ।

असाच मयूराचा केकारव आढळतो. प्रसंगवशात् त्यानें मधें मधें बऱ्याच भराऱ्या ही मारल्या आहेत. तेव्हां एकंदरींत पाहतां प्रस्तुत काव्यांत कोणत्या हीं देवतेचें विशेष वर्णन आहे असें नाहीं, व त्यास 'स्तोत्र' हा शब्द ही यथास्थितपणें लागणारा नाहीं. असें असून विल्सन् साहेबांनीं वर जो शेरा मारला तो सरासरी अनमानधक्क्यानें मारला ह्मणावा, किंवा पहिली तेवढी केका कधीं कानावर आल्यावरून तिजवरून स्थालीपुलाकन्यायेंकरून त्यांनीं साऱ्या काव्याचें स्वरूप लक्षांत आणलें असावें असें आह्मांस वाटतें.*

याप्रमाणें वरील दोघां पंडितांचे प्रस्तुत कवीविषयींचे अभिप्राय दाखल करून त्यांवर आह्मीं आपले विचार प्रगट केले. आतां प्रस्तुत अंक आटपण्यापूर्वीं विद्वद्वृंदांत **मोरोपंता**च्या संबंधानें सामान्यतः आणखी ज्या कित्येक समजुती आढळतात त्यांचा ही कांहीं उल्लेख करतों. एक तर सर्वसाधारण मत हें कीं, **मोरोपंत** हा मुळीं कवीच नव्हे, तर केवळ पद्यांची जुळवाजुळव करणारा

---

* साहेबमजकुरांनीं इतर महाराष्ट्र कवींविषयीं जें निरूपण केलें आहे त्यांत ही वर दाखविल्यासारखा अप्रमाण उल्लेखांचा प्रकार बराच आढळतो. त्याचीं उदाहरणें येथें दाखल करतों. ते **नामदेवास ज्ञानोबा**च्या अगोदर ढकलतात; यास त्यांस काय प्रमाण मिळालें असेल तें असो! **रामदासा**चा अंतकाळ सन १६६०त ह्मणून दिला आहे, पण या कवीनें 'शिवबा'च्या मरणोत्तर त्याच्या पुत्रास जें पत्र लिहिलें आहे त्यावरून पाहतां वरील काळ फार चुकीचा ठरतो. **तुकारामा**च्या कवितेस 'अभंगनाटक' (नाटाचे ?) अशी संज्ञा आहे; **अमृतराया**नें पद या छंदांत कविता रचिली आहे, तिचा विषय अध्यात्म असल्यामुळें ती कोणास फारशी आवडत नाहीं; **रामजोशी** हा पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत होता, व त्यानें 'लावण्या ह्मणजे शृंगारपर कविता' केली आहे; **अनंतफंदी** हा शेवटल्या पेशव्याची व त्याचा शूर सरदार बापू गोखला याची खुषामत करणारा होता; **कल्याणमल्ला**नें महाराष्ट्र भाषेंत 'अनंगरंग' ह्मणून एक चावट ग्रंथ केला आहे;— इत्यादि विलक्षण उल्लेख मोलस्वर्थकृत कोशाच्या प्रस्तावनेंत आढळतात. बिचाऱ्या **तुकारामावर** तर साहेबांनीं जें तर्कट रचलें आहे तें कांहीं पुसूंच नये! एकंदरींत बड्या नांवावर किती चुका व किती अप्रमाण लेख खपले जातात याचा प्रत्यय सदरील प्रस्तावनेवरून चांगला येणारा आहे!

होय. त्याच्या वेळचे लोक अज्ञान व अरसिक, त्यामुळें त्याची कविता त्या काळीं खपली गेली, किंबहुना सर्वमान्य ही झाली; हल्लींच्या सुधारलेल्या काळांत तिची योग्यता कोणास ही कांहीं वाटणार नाहीं. कित्येकांचें ह्मणणें असें पडतें कीं, **मोरोपंत** हा महाराष्ट्र कवींतला **पोप** होय. या इंग्रेजी कवीची त्याच्या हयातींत जशी अतिशयित प्रख्याति झाली, व सर्व त्यास कविमुकुटमणि ह्मणून समजत असत, पण चालू शतकांत त्याच्या कवितेचें बंड मोडून तो अगदीं नादान ठरला आहे, तीच गत **मोरोपंताची** ! कोणी ह्मणतात, **वामन** हा महाराष्ट्र कवितेंतला **ड्रायडन्** व **मोरोपंत** हा **पोप** होय. खरें कवित्व पाहिलें तर तें पहिल्यांत जसें आढळतें तसें दुसऱ्यांत आढळत नाहीं. दुसऱ्याचें काव्य ह्मटलें ह्मणजे सारें यमकमय, शब्दचमत्काराच्या पलीकडे त्यांत कांहीं नाहीं. याप्रमाणें ज्यास जसें मनास येईल त्याप्रमाणें तो वेलाशक आमच्या कवीविषयीं हवा तसा अभिप्राय ठोकून देतो !

वरील मतांविषयीं तूर्त विचार करीत नाहीं. प्रस्तुत कवीविषयीं आमच्या काय समजुती झाल्या आहेत त्या ज्या वेळेस दाखल करूं त्या वेळेस वरील अभिप्रायांतील ताथ्यातथ्याविषयीं ही सहज विवेचन करावें लागेलच.

---

**उत्कृष्ट उतारे**—( पुढील उतारा 'मंत्ररामायणां'तील आहे. बिभीषणानें आपल्या ज्येष्ठबंधूस सदुपदेश केला असतां 'पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम्' या न्यायानें रावणाचा क्रोध मात्र उसळला. तेव्हां बिभीषणाचा धिक्कार व स्ववीर्याची विकत्थना त्यानें येणेंप्रमाणें केली:——)

ऐसें निजानु[१]जन्मा वदतां विहित स्वलोक-कीर्ति-हित ।
अहित गणुनि अ[२]हि तैसा फिरला बंधूवरि क्षमा-रहित ॥ १ ॥

अंगार-सं[३]चय-प्रभ-दृक् दशमुख तो शुभ-स्वभावास ।
भावास ह्मणे करिशी इतरांच्या आज अस्[४]वभावास ॥ २ ॥

---

१ त्याचा धाकटा भाऊ ( बिभीषण ). २ सर्प. ३ निखाऱ्यांच्या ढिगाप्रमाणें लाल. ४ प्राणनाश.

बहुबहु पैरासि[5] वर्णिसि मज निंदिसि यातुधान[6]-जन-नीचा।
कां तुज घडलें नाहीं गर्भापासून पतन जननीच्या ॥ ३ ॥

राक्षसभक्ष्य मनुष्यें[7] स्वजनत्यक्त प्लवंग-सख[8] यास ।
स्तविशी निंदिसि बंधुस राजास प्रभुस गुरूस सखयास ॥ ४ ॥

हरि[9]-वरुण-श्रीद-यम-ज्वलन-श्वसन-ग्रहेश-सोमांतें ।
मीं जिंकिलें अशातें उपदेष्टा काय तूं शिशो[10] मातें ॥ ५ ॥

मी त्रिभुवनराजा मी शास्ता मी वंद्य रत्नभोक्ता मी ।
मी ज्ञानी मी मानी मी प्रभु मी स्तुत्य मी तुझा स्वामी ॥ ६ ॥

तूं दुर्बल पामर खल पंडित[11]-मानी भयाज्ञतागार[12] ।
क्लीबा[13] तेजस्विकुळीं अयोग्य रत्नाकरीं जसी गार ॥ ७ ॥

तूं रिपु अनुज[14]-छद्म ज्ञातीचा कोण धरिल विश्वास ।
दायाद[15] व्यसनांतें[16] इच्छिति हें ठावुकेंचि विश्वास ॥ ८ ॥

मच्छत्रु-विजय इच्छिसि दुष्टा बंधुत्व हें तुझें जळलें ।
बहु सांत्वन केलें तरि असती स्त्री टाकिती मला कळलें ॥ ९ ॥

त्या राम-पामराला तरवेल विशाल सिंधुपाल कसा ।
दुसरा मद्बलसागर मज हरिलें[17] तो कुरंगबालकसा ॥ १० ॥

ज्या मस्तककमलातें धरिता झाला शिरीं स्वयें शिव तें ।
मनुजा[18]ऽधम-चरणांतें कैसें रे मृत्युच्या भयें शिवतें ॥ ११ ॥

जिंकुनियां भुजवीर्यें सुरे[19]-त्रिलोकी क्षणांत वश केली ।
रामा वनेचरी[20] जरि हरिली हे तों समस्त-नृप-केली[21] ॥ १२ ॥

---

५ शत्रूस ( रामास). ६ राक्षस. ७ राम. ८ वानरांचा मित्र. ९ इंद्र–वरुण–कुबेर-यम-अग्नि-वायु-सूर्य-चंद्र. १० मुला! ११ पंडितंमन्य. १२ भय आणि अज्ञान यांचें घर. १३ षंढा! १४ भावाचा वेष घेतलेला. १५ भाऊबंद. १६ संकटास. १७ सिंहाला. १८ रामाच्या पायांस. १९ देवलोक. २० अरण्यांत फिरणारी. २१ क्रीडा.

या परि अन्याय-प्रिय रावण कोप-स्मर-ज्वरें वरळे ।
सरळेचि वक्र दिसती कालानें दृष्टि जेधवां तेरळे[22] ॥ १३ ॥

केवळ अग्रज[23]-वाक्यें अवमान सभेंत जेधवां झाला ।
तो मानधन[24] विभीषण जाय शरण शीघ्र रामराजाला ॥ १४ ॥

शिखि-दीप्तालय[25] जैसें त्यजिती प्राणार्थि-लोक हाहि तसा ।
सचिव-चतुष्टय घेउनि जाय पुरींतूनि वन्हि-दाहितसा ॥ १५ ॥

---

**अर्थसादृश्य**—(१) अथ सा पुनरेव विव्हला वसुधालिंगनधूसरस्तनी ।
विललाप विकीर्णमूर्धजा समदुःखामिव कुर्वती स्थलीम् ॥*

कुमारसंभव.

“ And now she beats her heart, whereat it groans,
That all the neighbour caves, as seeming troubled,
Made verbal repetition of her moans;
Passion on passion deeply is redoubled.
‘ Ay me ! ’ She cries, and twenty times, ‘woe, woe!’
And twenty echoes twenty times cry so. ”

*Venus and Adonis.*

( २ ) आदाय बकुलगन्धानन्धीकुर्वन्पदे पदे भ्रमरान् ।
अयमेति मन्दमन्दं कावेरीवारिपावनः पवनः ॥‡

‘साहित्यदर्पण.’

---

२२ फिरतें. २३ ज्येष्ठ बंधूच्या वचनानें. २४ मानी. २५ आग लागलेलें घर.

* “ नंतर ती रति पुन्हा शोकविव्हल होऊन भूमीवर पडल्यानें जिचा वक्षःप्रदेश मलिन झाला आहे, व जिचे केंस विखुरले आहेत. अशी होत्साती त्या वनप्रदेशास जणों काय आपणाप्रमाणें दुःखित करती झाली !”

‡ “ बकुलपुष्पांचा गंध हरण करणारा व त्यांतील रजांच्या योगानें पदोपदीं भ्रमरांस आंधळे करणारा असा हा कावेरीच्या उदकास पावन करणारा पवन मंदमंद वाहात आहे. ”

" Like a rose embowered
In its own green leaves,
By warm winds deflowered,
Till the scent it gives
Makes faint with too much
sweet these heavy-winged theives. "

*Shelley.*

( ३ ) दृशः पृथुतरीकृता जितनिजाब्जपत्रत्विषः
चतुर्भिरपि साधु साध्विति मुखैः स्समं व्याहृतम् ।
शिरांसि चलितानि विस्मयवशाद् ध्रुवं वेधसो
विधाय ललनां जगज्जनललामभूतामिमाम् ॥*

रत्नावली.

" You were sure the chief, and best of human race.
So perfect that the gods who formed you wondered
At their own skill, and cried, a lucky hit
Has mended our design."

*Dryden.*

---

सुभाषित– ( १ ) वागुच्चारोत्सवं मात्रं तत्क्रियां कर्तुमक्षमाः ।
कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालका इव ॥

" सांप्रत कलियुगांत वेदांत बोलणारे पंडित कसे भासतात ? कीं जशीं शिमग्यांतलीं पोरें तोंडानें यथेच्छ बडबड मात्र करतात, पण त्यांतील गम्य म्हणून त्यांस बिल्कुल माहित नसतें !

---

* " साऱ्या जगाचें केवळ नाक अशी ही स्त्री निर्माण झाली असतां, ब्रह्मदेव खरोखर अगदीं चकित होऊन राहिला असेल !– आपल्या आसनाच्या कमलाच्या पत्रांहून आपले डोळे मोठे करून तो हिजकडे पाहूं लागला असेल; चारी मुखांनीं एकदम 'वाः' 'वाः ' असें केलें असेल; आणि आश्चर्यांत बुडून जाऊन त्यानें आपलीं मस्तकें डोलविलीं असतील!"

( २ ) तुंगासनास्तुंगतराः समर्था
मनोरथान्पूरयितुं न नीचाः ।
धाराधरा एव धराधराणाम्
निदाघदाहं शमितुं न नद्यः ॥

" उंच पदवीचे व स्वभावानें थोर असे लोक हेच लोकांचे मनोरथ पुरविण्यास समर्थ होतात; जे मुळींच नीच त्यांच्या हातून तें कार्य घडत नाहीं. पहा कीं, वृक्षांचा संताप दूर करण्याचें सामर्थ्य मेघांचेच ठायीं असतें; नद्यांचे ठायीं असत नाहीं."

( ३ ) हरेः पदाहतिः श्लाघ्या न श्लाघ्यं खररोहणम् ॥
स्पर्धाऽपि विदुषा युक्ता न युक्ता मूर्खमित्रता ॥

" सिंहाचा पादप्रहार ही श्लाघ्य होय, गर्दभावर आरोहण केलेलें ही श्लाघ्य नव्हे; याप्रमाणेंच विद्वान्पुरुषावरोबर स्पर्धा ही श्रेयस्कर होय; परंतु मूर्खावरोबर मैत्री कामाची नाहीं."

( ४ ) निर्गुण इति मृत इति च द्वावेकार्थाभिधायिनौ विद्धि ।
पश्य धनुर्गुणशून्यं निर्जीवं यदिह शंसन्ति ॥

" निर्गुण मनुष्य हें मेल्यासारखेंच समजावयाचें; पहा, गुणरहित ( श्लेषार्थ हा उघडच आहे ) असें जें धनुष्य तें असून नसून सारखेंच."

( ५ ) कर्कशतर्कविचारव्यग्रः किं वेत्ति काव्यहृदयानि ।
ग्राम्य इव कृषिविलग्नश्चंचलनयनावचोरहस्यानि ॥

" मनाला कठोरत्व देणारे जे तर्कविचार त्यांतच सदां जो गढलेला त्याला काव्याचें हृदय तें काय कळणार ? जसें, नांगर धरणाऱ्या कुणब्यास चतुर कामिनीच्या भाषणांतील मर्म काय समजणार !"

( ६ ) अंतःप्रतप्तमरुसैकतदह्यमान-
मूलस्य चंपकतरोः क्व विकासचिंता ।

प्रायो भवत्यनुचितस्थितिदेशभाजां
श्रेयः स्वजीवपरिपालनमात्रमेव ॥

" अतिशय तापलेलें जें मारवाडांतील वाळवंट त्याची धग ज्याच्या मूळाशीं निरंतर आहे अशा चंपकवृक्षाचा पुष्पविकास होईल ही आशा कशाला पाहिजे? अयोग्य स्थानीं जे जाऊन पडले त्यांनीं आपला प्राण रक्षण करून ठेवला म्हणजे त्यांचें भाग्य समजावें ! "

( ७ ) तथाभूदस्माकं प्रथममविभक्ता तनुरियं
ततोऽनु त्वं प्रेयानहमपि हताशा प्रियतमा ।
इदानीं नाथस्त्वं वयमपि कलत्रं किमपरं
मयाप्तं प्राणानां कुलिशकठिनानां फलमिदम् ॥

" पूर्वी आपली अशी स्थिति होती कीं, दोघांचीं शरीरें जणूं काय एकच होतीं; पुढें तूं माझा वल्लभ आणि मी दुर्भाग्या प्रियतमा इतका दोघांत भिन्नभाव झाला; आणि आतां तर तूं पति आणि मी स्त्री इतकाच संबंध राहिला आहे. तेव्हां वज्राप्रमाणें कठीण असे जे माझे प्राण त्यांचें हें फळ मला प्राप्त झालें आहे. "

( ८ ) निर्मित्सुः सुदतीमजो विरचिते वक्त्रे शशिभ्रांतितः
कोशीभूतनिजांबुजासनमधिष्ठातुं न शक्तो विधिः ।
मध्यं विस्मृतवान् कुचौ च कठिनौ पीनौ नितंबौ कचान्
वक्रान् निर्मितवान् मतिः स्फुरति हि स्वस्थे नृणां चेतसि ॥

" ब्रह्मदेव या स्त्रीस जेव्हां निर्माण करूं लागला तेव्हां त्यानें प्रथमतः हिचें मुख केलें; त्याच्या योगानें काय झालें कीं चंद्राची शंका वाटून त्याच्या आसनाचें कमळ मिटूं लागलें;—– तेव्हां आसनसंकोचामुळें पीडित होत्साता विधीनें राहिलेली सर्व रचना भराभर घाईनें आटपून टाकली. ती अशी कीं, स्तन आणि नितंब हे होते तसेच जाडी ठेवले, केस वांकडेच राहिले, आणि कंबर करायास

तर तो मुळींच विसरला ! एकंदरींत चित्त अस्वस्थ असलें ह्मणजे कोणतें ही काम. नीट होत नाहीं !"

( ९ ) देव त्वत्करनीरदे दिशि दिशि प्रारब्धपुण्योन्नतौ
चंचत्कांचनरत्नराजि तडिति स्वर्णामृतं वर्षति ।
स्फीता कीर्तितरंगिणी समभवत्तृप्ता गुणिग्रामभूः
पूर्णं चार्थिसरः शशाम विदुषां दारिद्र्यदावानलः ॥

"हे राजा ! तुझा हस्तरूप मेघ दिशादिशांचे ठायीं उत्कृष्ट उन्नति पावला असतां, आणि स्फुरण पावणारीं जीं रत्नजडित सुवर्णकंकणें त्यांची विद्युल्लतेसारखी प्रभा पडून सुवर्णरूप उदकाचा वर्षाव झाला असतां, कीर्तीरूप नदीस पूर येऊन ती चोहोंकडे पसरली आहे, गुणिजनरूप भूमि वृष्टीनें तृप्त झाली आहे, याचकसमूहरूप सरोवरें तुडुंबलीं आहेत, आणि विद्वज्जनांचा दारिद्र्यरूप दावानल विझून गेला आहे."

( १० ) यद्दुर्गामटवीमटंति विकटं क्रामंति देशांतरं
गाहंते गहनं समुद्रमटनक्लेशं कृषिं कुर्वते ।
सेवंते कृपणं पतिं गजघटासंघट्टदुःसंचरं
सर्पंति प्रधनं धनांधितधियस्तल्लोभविस्फूर्जितम् ॥

"दुर्गम अरण्यांतून जाणें, भयंकर परदेशांतून फिरणें, गहन जो समुद्र त्यावर पर्यटन करणें, शेतकीची दगदग करणें, कृपण धन्याची सेवा करणें, हत्तींच्या गर्दीमुळें संचार करण्यास भीतिदायक अशा रणांगणीं मरण पावणें, इतके सर्व प्रकार धनलुब्ध लोक जे करतात हा लोभाचा प्रभाव होय !"

( ११ ) व्यासादीन् कविपुंगवाननुचितैर्वाक्यैः सलीलं हसन्
उच्चैर्जल्प निमील्य लोचनयुगं श्लोकान् सगर्वं पठन् ।
काव्यं धिक्कुरु यत्परैर्विरचितं स्पर्धस्व सार्धं बुधै-
र्यद्यभ्यर्थयसे श्रुतेन रहितः पांडित्यमाप्तुं बलात् ॥

"जर तुला अंगीं विद्वत्ता नसतां ही फुकाची पंडितगिरी मिरवायाची असेल

तर पुढील गोष्टी कर:— व्यासादिक महान् महान् कवींविषयीं हवा तसा चारगटपणा करून त्यांची थट्टा कर, मोठ्यानें बोल आणि डोळे मिटून मोठ्या डौलानें श्लोक ह्मण, दुसऱ्यानें केलेल्या काव्याची निंदा कर, आणि पंडित जनाशीं नेहेमीं स्पर्धा करीत जा."

( १२ ) मूर्खत्वं सुलभं भजस्व कुमते मूर्खस्य चाष्टौ गुणाः
निश्चितो बहुभोजकोऽतिमुखरो रात्रिंदिवं स्वप्नभाक् ।
कार्याकार्यविचारणांधबधिरो मानापमाने समः
प्रायेणामयवर्जितो दृढवपुर्मूर्खः सुखं जीवति ॥

"रे वेड्या! मूर्खत्व संपादन करण्यास कांहीं आयास पडत नाहींत, व त्यापासून पुढील आठ लाभ ही आहेत, तर हेंच आपल्या ठायीं दृढ ठेव. आठ गुण येणेंप्रमाणें:— निश्चितपणा, यथेष्ट भोजन, अतिमुखरत्व, रात्रंदिवस झोंप, कार्याकार्यविचाराविषयीं अंधत्व व बधिरत्व, मान व अपमान हे दोन्ही सारखे, प्राय: शरीरास आरोग्य असून गलेलठ्ठ होऊन पडणें,— इत्यादि प्रकारें मूर्ख हा सुखेंकरून राहतो!"

( १३ ) अनाकाशे चंद्रः सरसिजदलद्वंद्वसहितो
गृहीतः पश्चार्द्धे कुटिलकुटिलैः सोऽपि तिमिरैः ।
सुधां मुंचत्युच्चैरनिशमथ संमोहजननीं
किमुत्पातालीयं वदत जगतः कर्तुरुदिता ॥

"ब्रह्मदेवानें ही उत्पातपरंपरा निर्माण केली आहे काय? कोणती, तर आकाशाशिवाय चंद्र, त्यावर कमलपत्रांची जोडी, मागें कुटिल अंधकारसमूहानें तो बद्ध केलेला, आणि असा चंद्र नेहेमीं अमृताचा वर्षाव करणारा, कीं ज्या अमृतवृष्टीनें उज्जीवन जें व्हावयाचें तें न होतां उलटें संमोहन होतें (पक्षीं, मूर्च्छा येते)!"

( १४ ) पुण्येषोरभिषेकहेमकलशौ हारप्रभावाहिनी-
चक्राव्हौ मदनोन्मदद्विपपतेः कुंभौ रतेः कंदुकौ ।

कंदौ बाहुमृणालिकायुगुलयोर्लीलालतासत्फले
नव्यौ रत्नसमुद्गकौ वहति सा लावण्यपूर्णौ स्तनौ ॥

स्तनयुगुलावर उत्प्रेक्षाः—

"मदनास सार्वभौमाभिषेक करण्याचे हे सुवर्णकलश आहेत काय? अथवा मुक्ताहारप्रभारूप नदींतील हे चक्रवाक आहेत काय? किंवा मदनरूप मदोन्मत्त हत्तीचें गंडस्थल, रतीचें क्रीडाकंदुक, बाहुरूप कमलनालांचे कांदे, लीलारूप लतेचीं दोन उत्कृष्ट फलें, किंवा लावण्यानें भरलेले हे नवे रत्नकरंडक आहेत काय?"

( १९ ) तन्वंग्या गुरुसंनिधौ नयनजं यद्वारि संस्तंभितं
तेनांतर्गलितेन मन्मथशिखी सिक्तो वियोगोद्भवः ।
मन्ये तस्य निरस्यमानकिरणस्यैषा मुखेनोद्गता
श्वासायाससमागतालिसरणिव्याजेन धूमावली ॥

"स्त्रियेनें गुरुजनांच्या समोर डोळ्यांतील अश्रु जे तसेच संस्तब्ध करून ठेवले ते आंतल्या आंत जिराल्यामुळें वियोगजन्य जो मदमाग्नि त्यावर ते पडले त्या योगानें तो किंचित् विझून त्याची जी धूमावली निर्माण झाली ती निश्वास-सुगंधास लुब्ध झालेल्या भ्रमरमालेच्या रूपानें जणों काय बाहेर पडली!"

( १६ ) तरुमूलादिषु निहितं जलमाविर्भवति पल्लवाग्रेषु ।
निभृतं यदुपक्रियते तदपि महांतो वहंत्युच्चैः ॥

"वृक्षांच्या मूळाशीं जें उदक घालावें तें त्यांच्या पल्लवाग्रांवर प्रगट होतें; ठीकच आहे कीं जे थोर आहेत ते गुप्तपणें केलेल्या उपकारास ही प्रसिद्धपणें मिरवतात."

## पत्रें.

रा. रा. निबंधमालाकर्ते यांस—

वि० वि०. आपले निबंध वाचतांना जो हर्षातिशय होतो व जो मनास आल्हाद होतो तो कोठवर लिहावा! आपल्या लिहिण्याच्या शैलीची कीर्ति दिगंतीं गेलीच आहे व मोठमोठ्या लोकांनीं त्यांस झालेला आनंद आपल्यास वेळोवेळ पत्रें पाठवून मोठ्या उत्साहानें जगास दाखविलाच आहे, त्याचप्रमाणें मला झालेला आहे हें मला सांगणें नको.

आज लिहिण्याचा उद्देश इतकाच आहे कीं आपले अगदीं पहिल्यापासून तों परवांच्या अंकापर्यंत सर्व अंक मी वाचले आहेत, त्यावरून पहिल्या तीन साडे तीन वर्षांचे अंकांत आपले निबंध निबंधमालेच्या नांवास शोभणारे असे आहेत, ह्मणजे निबंध-मालेचा प्रधान अवयव जो 'निबंध' तो अप्रधान नव्हता. परंतु आलिकडे—त्यांतून विशेषत: मोरोपंताच्या निबंधापासून—आपले निबंध-मालेंत मालेच्या नांवास न शोभणारे जे इतर अंगभूत विषय ते प्रधानत्वानें येऊं लागले ही गोष्ट मनाच्या आनंदवृत्तीला व्याघात करते. आपण पहिल्या अंकाच्या वेष्टनावर सूचनेंत असें लिहिलें आहे कीं, "निबंध—माला" नांवाच्या पुस्तकांत नाटकांचीं काव्यांचीं भाषांतरें, कल्पित कथा, देशवर्णनें, इत्यादि विषय शोभणार नाहींत हें उघड आहे. यास्तव या मासिक पुस्तकाच्या नांवाप्रमाणें यांत निबंध मात्र छापले जातील." पुढें " पण वाचकांस एकच लांबलचक विषयाचा त्रास येईल यास्तव पुस्तकाच्या शेवटीं दरखेपेस विशेषत: मनोरंजन होण्यासारिखा '**कांहीं मजकूर**' घालण्याचा आमचा बेत आहे."

यावरून या इतर बाह्यांगाविषयीं आपलें मत दिसोन येतें कीं तीं आलींच तर शुभ्र व सुवासिक पुष्पांच्या हारांत (माळेंत) जशीं शोभेसाठींच मधून मधून गुलाबांचीं फुलें गुंफतात—तीं अशा थाटानें येणार. परंतु वरील मालाकार जर वरच्या हारांत एक शुभ्र व एक गुलाबी पुष्प घालील तर त्या गुलाबांनीं त्या हारास शोभा तर येणार नाहींच पण उलटें पाहणाराच्या नेत्रांस चमत्कारिक वाटेल. तद्वतच आलिकडील माळेंत आपण करतां असें मला वाटतें.

आतां रुचिवैचित्र्य व मतवैचित्र्य चोहोंकडे आहेच हें मला अवगत आहे पण माझ्या अल्पबुद्धीनें मला असें वाटतें कीं हा प्रकार एक वर्षाची तूट भरून काढण्याची ही एक झोकदार खुबी असेल. आपल्या पुस्तकाच्या अनियमितपणाचा आपल्यास कदाचित् राग येऊन आपण हें, झपाट्यानें पाडलेलें खरखटें काढून टाकण्यास कंबर बांधली आहे असें दिसतें. पण त्या घाईत इकडे थोडीशी चूक होते ती लक्ष्यांत यावी येवढाच हें पत्र लिहिण्याचा माझा उद्देश आहे. सुभाषित व विनोद महदाख्यायिका ह्या अति सर्वोत्कृष्ट असतात हें मला माहित आहे व ते चुटके व तीं सुभाषितें, हीं मला फार आवडतात हें मला सांगण्यास आनंद होतो पण निबंधाकडे विशेष लक्ष असल्यानें दोघांसही चांगलें. माझ्या लिहिण्यांत शुद्धाशुद्धें फार असतील यांत तिळमात्र संदेह नाहीं व तीं आपण दुरुस्त करावीं असा तुमचा व माझा संबंधच आहे परंतु या पत्रांत प्रमाद झाले असल्यास शिष्यावर क्रोधदृष्टि होऊं नये येवढी सविनय प्रार्थना आहे ही विनंती. (आपण हें पत्र इष्ट वाटल्यास छापावें किंवा ॥ ३ ॥
पावें त्याबद्दल मजकडे कांहीं नाहीं. आपल्यास सूचनार्थ लिहून ठे ॥ ४ ॥
आहे. लोभ करावा ही विनंती). सीं ॥ ५ ॥

तारीख ५ माहे मार्च सन १८७९. पुणें.

आपला
**वामन**

मार्गी ॥ १ ॥
गोची ज्ञानी ॥ २ ॥
जावे ॥ ३ ॥

---

## रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि. वि. पृथ्वीस 'मेदिनी' हें नांव कशामुळें मिळालें व 'मृत्ति ॥ ४ ॥
ठरली या दोहोंचें मूळ साधार आढळलेलें आपल्याकडे पाठविलें आहे. प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी.

श्रीमत् देवीभागवत नामक पुराणांत अशी कथा आहे कीं, एके वेळीं संपूर्ण ॥ चराचर जलमय असतां विष्णूच्या कानांतून दोन मळ्या पडल्या त्यापासून मधु व कैटभ नांवाचे दोन मोठे दानव उत्पन्न झाले. संपूर्ण जल व त्यांतच आपली

संस्थिति पाहून त्या उभयतां दानवांस मोठा विस्मय झाला. इतक्यांत कमलारूढ विधात्यावर त्या द्वयाची नजर पोंचली. 'युद्ध कर, नाहींपेक्षां तूं आपलें पद सोडून दे' असें ते त्यास ह्मणूं लागले. ब्रह्मदेव भिऊन विष्णूकडे गेले. नंतर विष्णूंनीं त्या दैत्यांचा वध केला.

रथांगेन तदाच्छिन्ने विष्णुना प्रभविष्णुना ।
जघनो परिवेगेन प्रकृष्टे शिरसी तयोः ॥ ८२ ॥
गतप्राणौ तदा जातौ दानवौ मधुकैटभौ ।
सागरः सकलो व्याप्तस्तदा वै मेदसा तयोः ॥ ८३ ॥
मेदिनीति ततो जातं नाम पृथ्व्याः समंततः ।
अभक्ष्या मृत्तिका तेन कारणेन मुनीश्वराः ॥ ८४ ॥

देवीभागवत. प्रथमस्कंध. अध्याय ९.

...ासास "द्वैपायन" नांव मिळण्याचें कारण—

मालेंत म.
इत्युक्त्वा निर्ययौ व्यासः सापि पित्रांतिकं गता ।
लागले ही ग..
द्वीपे न्यस्तस्तया बालस्तस्माद्द्वैपायनोऽभवत् ॥ ४१ ॥
काच्या वेष्टनावर ६
किंत्ता—अध्याय २.
पुस्तकांत नाटकांचीं
शोभणार नाहींत हें ...ळ—
यांत निबंध मात्र छा... दृष्टं शुकीरूपं घृताच्याः संभवे तदा ।
विषयाचा त्रास ये... ...ति नामपुत्रस्य चकार मुनिसत्तमाः ॥ २० ॥
होण्यासारिखा
किंत्ता—अध्याय १४.

यावरून ...म जाहलें असून त्याच्या स्त्रीचें नांव पीवरी होतें असें याच पुराणांत तर शुभ्र आहे. सदरहु माहिती जिज्ञासु वाचकांच्या आदरास पात्र होण्यास ...गुला... आहे असें वाटल्यावरून आपल्या सुंदर पत्रांत प्रसिद्ध होण्यास्तव आपवयास तसदी देत आहें.

वांई. तारिख १ }
मार्च १८७९ }

केशव बा० कानिटकर.

---

रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

वि. वि. आपल्या पुस्तकाचा अंक ४७ याच्या शेवटीं एका इंदूरकर 'ढ' चें पत्र छापलें आहे. त्यांत त्यानें आपल्या शूद्रकवीविषयीं अशी आख्यायिका दिली आहे कीं, 'ते चंद्रभागेंत उभे राहून ईश्वरस्तव करीत असतां एकदम अदृश्य झाले.' या समयीं त्यांनीं कित्येक अभंग केले आहेत ते कोठें न मिळाल्याविषयीं वरील पत्रकारानें लिहिलें आहे. ते हल्लीं माझ्या हातास आल्यावरून आपणांकडे पाठवीत आहें, तर त्यांची आपल्या पुस्तकाच्या द्वारें प्रसिद्धि होईल अशी आशा आहे.

१

जन्माचें तें मूळ पाहिलें शोधुनी । दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥ १ ॥
पापपुण्य करुनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येऊनी हानी केली ॥ २ ॥
सत्व रज तम तिहीं ज्याचे आंगीं । याचि गुणीं जगीं वायां गेलें ॥ ३ ॥
तम ह्मणिजे काय नरकाचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें सत्वाचें सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निसीं ॥ ५ ॥

२

अहर्निसीं सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गीं ॥ १ ॥
आडमार्गीं जन कोणी जे जातील । त्यांतुनी काढील तोची ज्ञानी ॥ २ ॥
तोचि ज्ञानी खरा तारी दुर्जेयासीं । वेळोवेळां त्यासी शरण जावें ॥ ३ ॥
शरण गेल्यानें काय होतें फळ । तुका ह्मणें कुळ उद्धरती ॥ ४ ॥

३

उद्धरीलें कुळ आपण तरला । तोचि एक जाला त्रैलोक्यांत ॥ १ ॥
त्रैलोक्यांत जाला द्वैतभाव निमाला । ऐसे जे सिद्धीला साधन बरें ॥ २ ॥
बरें तें साधन सुख शांती तो मना । क्रोध नाहीं जाणा तिळभरी ॥ ३ ॥
तिळभरी नाहीं चित्तासी तो मळ । तुका ह्मणे जळ गंगेचें तें ॥ ४ ॥

४

जैसी वाहे गंगा तैसें त्याचें मन । भगवंत जाण तयाजवळीं ॥ १ ॥
तयाजवळीं देव भक्तीभावें उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे ॥ २ ॥
तया दिसे रूप अंगुष्ठाप्रमाण । अनुभवीं खूण जाणसील ॥ ३ ॥
जाणसील खूण स्वात्मा अनुभवीं । तुका ह्मणे पदवी ज्याची त्याला ॥ ४ ॥

५

ज्याची त्याला पदवी येराला न साजे । संताला उमजे आत्मसुख ॥ १ ॥
आत्मसुख पहा उघडा ज्ञानदृष्टी । वांयावीण चावटी करूं नका ॥ २ ॥
करूं नका कांहीं संतसंग धरा । पूर्वींचा तो दोरा उगवेल ॥ ३ ॥
उगवेल प्रारब्ध संतसंगें करूनी । प्रत्यक्ष पुराणीं वर्णीयेलें ॥ ४ ॥
वर्णियेलें कीर्तीरूप नाम घोष । जातील रे दोष तुका ह्मणे ॥ ५ ॥

६

जातील रे दोष अनंता जन्मींचे । पाय ते देवाचे न सांडावे ॥ १ ॥
ना न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आणा सारंगधरा धरोनियां ॥ २ ॥
धरोनी केशव आणा भावबळें । पापिया नकळे कांहीं केल्या ॥ ३ ॥
कांहीं कळे देव संतसेवेकरूनी । वासना जाळूनी शुद्ध करा ॥ ४ ॥
शुद्ध करा मन व्हारे देहातीत । वस्तुतें ओळखा तुका ह्मणे ॥ ५ ॥

७

वस्तुतें वोळखा सांडारे कल्पना । नका आडराना जाल झणीं ॥ १ ॥
झणीं नाल कोठें बुडवाल हीत । विचारी मनांत आपुलिया ॥ २ ॥
आपुलिया जिवें शिवासी पहावें । आत्मसुख घ्यावें वेळोंवेळां ॥ ३॥
वेळोवेळां घ्यावें आत्मस्वरूपीं मिळावें । भूतीं लीन व्हावें तुका ह्मणे ॥ ४॥

८

भूतीं लीन व्हावें सांगावें नलगेची । आतां अहंकाराची शांति करा ॥ १ ॥
शांति करा तुह्मीं ममता नसावी । ह्रदयीं असावी भूतदया ॥ २ ॥

भूतदया ठेवी तया काय उणें । प्रथम साधन हेंची असे ॥ ३ ॥
ऐसें जें साधन जया चित्तीं वसे । मायाजाळ नासे तुका ह्मणे ॥ ४ ॥

९

मायाजाळ नासे या नामें करूनी । प्रीती चक्रपाणी असों द्यावी ॥ १ ॥
असों द्यावी प्रीती साधूच्या पायांसी । कदा कीर्तनासी सोडूं नये ॥ २ ॥
सोडूं नये कीर्तन पुराण श्रवण । मनन निजध्यास साक्षात्कारू ॥ ३ ॥
साक्षात्कार जालिया सहज समाधि । तुका ह्मणे उपाधि गेली त्याची ॥४॥

१०

गेली त्याची जाणा तोचि ब्रह्म जाला । अंतरीं निमाला पूर्णपणें ॥ १ ॥
पूर्णपणें जाला राहतो कैशा रीती । त्याची आतां स्थिती सांगतों मी ॥२॥
सांगतों मी त्याचें ऐका मनोगत । राहतो मूर्खवत् जगामाजी ॥ ३ ॥
जगांत पिशाच अंतरीं शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ॥ ४ ॥
निमग्न तो सदा जैसा मकरंदु । अंतर बाह्य भेदु वेगळाले ॥ ५ ॥
वेगळाले भेद तृप्ती ज्या असती । हृदय त्याचें चित्तीं नकळे कोणा ॥ ६ ॥
न कळे कोणाला तयाचे ते धर्म । योगि जाणे वर्म खूण त्याची ॥ ७ ॥
खूण त्याची जाणे जे का तैसे असती । दुजियाला भ्रांति तुका ह्मणे ॥८॥

११

दुजियाला भ्रांती भाविकाला शांती । साधूचिया वृत्ती लीन जाल्या ॥ १ ॥
लीन जाल्या वृत्ती ब्रह्मीं ते मिळाले । जळांत आटलें लवण जैसें ॥ २ ॥
लवण जैसें पुनः जळाचे बाहेरी । येत नाहीं खरी त्यांतूनियां ॥ ३ ॥
त्यासारिखी जाणा धरा साधुवृत्ती । पुनः ते न येती मायाजाळीं ॥ ४ ॥
मायाजाळ त्यासी कदारे बाधीना । सत्यसत्य जाणा तुका ह्मणे ॥ ५ ॥

१२

सत्य सत्य जाणा त्रिवाचा निश्चय । अनुभव पाहे पदोपदीं ॥ १ ॥
पदोपदीं पाहें श्रीमुख चांगलें । प्रत्यक्ष पाउलें विठोबाचीं ॥ २ ॥

विठोबाची भेटी घडे हे वाचितां । तुह्मालागीं आतां सांगितलें ॥ ३ ॥
सांगितलें खरें विश्वासाचें हीत । अभंग वाचीत जे का नर ॥ ४ ॥
ते नर पठणें जीवन्मुक्त झाले । पुन्हा नाहीं आले संसारासी ॥ ५ ॥
संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका ह्मणे ॥ ६ ॥

१३

चार कोटी एक लक्षाचा सेवट । चौतिस सहस्र स्पष्ट सांगीतले ॥ १ ॥
सांगितलें इतुके तुका कथोनियां गेला । बारा अभंगांला सोडूं नका ॥ २ ॥
सोडूं नका तुह्मां सांगितलें वर्म । भवपाश कर्म चुकतील ॥ ३ ॥
चुकतील यातायाती विठोबाची आण । करितां पठण जिवें भावें ॥ ४ ॥
जीवेंभावें करितां होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका ह्मणे ॥ ५ ॥

१४

स्वर्ग लोकाहून ऐसे हे अभंग । धाडियेले सांग तुह्मासाठीं ॥ १ ॥
नित्यनेम यासी पढतां प्रतापें । जळतिल पापें जन्मांतरिंचीं ॥ २ ॥
तया मागे पुढें रक्षी नारायण । मांडिल्या निर्माण उडी घाली ॥ ३ ॥
बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्भक्ती येणें पंथें ॥ ४ ॥
सद्भक्ती जालीया सहज साक्षात्कार । होईल उद्धार पूर्वजांचा ॥ ५ ॥
साधतील येणें इहलोक परलोक । सत्य सत्य भाक माझी तुह्मा ॥ ६ ॥
वर उपकारालागिं मागीतलें देवा । प्रसादिक मेवा ग्रहण करा ॥ ७ ॥
येणें भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ॥ ८ ॥
टाळ आणि कंथा धाडिली निशाणीं । घ्यारे ओळखुनी सज्जन हो ॥ ९ ॥
माझें दंडवत तुह्मां सर्व लोकां । देहासहीत तुका वैकुंठासी ॥ १० ॥

## रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—

महाराष्ट्रभाषेचा अभिमान धरून तिच्या अभिवृद्ध्यर्थ आपला सोत्कंठ व दृढ परिश्रम चालला आहे हें पाहून सारज्ञांस अत्यंत आनंद होत आहे हें ठिकठिकाणीं जी आपली योग्य प्रशंसा होते तिजवरून उघड व स्पष्ट होत आहे. आपण उत्साहपूर्वक असाच सतत व दृढ उद्योग दीर्घकालपर्यंत चालवाल तर आपली ही अडाणी ह्मटलेली महाराष्ट्र भाषा उत्कृष्ट परिपक्वदशेस येईल यांत संशय नाहीं.

आपल्या मालेच्या एका अंकांत रावबहादूर रानडे यांच्या मनांत मोरोपंतकृत केकावली काव्यांत अनेक अर्थत्व आहे हें कशावरून आलें ह्मणून आपण मोठ्या बुचकळ्यांत पडलां आहां असें दिसतें. पण मला वाटतें कीं, आपल्यास याबद्दल अगदीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं; कारण रा० माधवरावजीचा सर्व जन्मभर व्यासंग पाहिला तर इंग्रेजी भाषेवर चालला आहे; व त्यांत त्यांची उत्कृष्ट पारंगतता आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. इंग्रजी भाषेंत गद्यग्रंथांत तर नकोच पण पद्यग्रंथांतही श्लेष मिळणार नाहीं. श्लेषविमुखतेविषयीं इतकें कडकडीत व्रत सर्वांनीं (इंग्रजी कवींनीं) पाळलें असतां इंग्रजींतील कविशिरोमणि मिलटन् बोवा यांणीं आपल्या सर्वप्रसिद्ध 'प्यारेडाइज लास्ट' नामक काव्याच्या ६ व्या सर्गांत पांच साहा स्थळीं श्लेष झोंकून दिले आहेत हें पाहून त्यांचे काव्यप्रकाशकांस मोठी लाज वाटून व अति चीड येऊन खालीं टिपेंत लिहितात, 'Some of the *Puns* (if such they be) are as discreditable to Milton's taste as to Poetry. I have ventured to italicise them, lest they should perish unperceived. तर याप्रमाणें श्लेषाच्या सोवळेपणाच्या बाजाराचें माहात्म्य इंग्रजीभाषेंत आहे. मग रावबहादूर तर इंग्रजींतील मोठे पंडित ह्मणून त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. तेव्हां ते या मतास अनन्य भावानें भजत असतील यांत आश्चर्य काय! दुसरी गोष्ट अशी आहे कीं, इंग्रजी भाषेपुढें गरीब बिचाऱ्या स्वभाषेवर रानडे यांचा व्यासंगही तितपतच असणार आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. मग

हरदासाच्या तोंडून केव्हां केव्हां वेडेवांकडे कसे तरी श्लेष निघतात तोच आधारभूत टेंका धरून केकावलीविषयीं त्यांणीं आपलें मत कशावरून झुगारलें नसेल ! शिवाय संस्कृतांत तर भरपूर श्लेष असतात हें रावबहादुरांसच काय पण अडाण्यापर्यंत देखील माहित आहे. असो, या व दुसऱ्या कारणावरून संस्कृत व प्राकृत कविता ह्मटली कीं तींत श्लेष असावयाचेच असें मत ठरून गेल्यामुळें मोरोपंताचें काव्य तर काय सर्व मराठी भाषेचें सर्वस्व, त्यांत श्लेष नाहींत असें कसें होईल ? या तर्कावर रावबहादुरांनीं शेरा लिहिला असावा यांत संशय नाहीं.

नि० मा० अंक ४९ पृष्ठ २२ सुभाषित श्लोक १६ यांत 'शालूक' ह्मणजे कमलांचा कांदा असा अर्थ असतां आपण चिखलांतील गवत असा अर्थ केला आहे ह्यास आधार काय ? तसेंच सदरहु श्लोकाचे भाषांतरांत 'परोपकारक मेघा' याचे जागीं 'परोपकारी मेघा' असें असलें पाहिजे. असें मला वाटतें.

मुक्काम वाई. आपला

तारीख २९ फेब्रुआरी १८७९. के०बा०का०

---

## रा० रा० निबंधमालाकर्ते यासः—

वि. वि. आपण आपल्या निकृष्टावस्थेस पोहोंचलेल्या भाषेच्या पुनरुज्जीवनार्थ सतत परिश्रम करून तिला उच्चपदारूढ करण्यास झटत आहां हें पाहून जो आनंद होतो तो कांहीं पुसूं नये. रुक्ष व ओसाड अरण्यांत फिरून एकाद्या मनुष्याचे त्रस्त डोळ्यांस हिरवेंगार मैदान दृष्टीस पडल्यास जसा आनंद होतो त्याप्रमाणेंच आपल्या निकृष्टावस्थेस आलेल्या मराठी भाषेंत पर्यटन करितांना आपल्या "माले"सारखीं मासिक पुस्तकें दृष्टिगोचर झालीं ह्मणजे अंतःकरणास फारच आल्हाद होतो. असो; मी पुढील गोष्ट एका वृद्ध मनुष्यापासून ऐकिली ती आपल्याकडे पाठविली आहे. योग्य वाटल्यास छापण्याची मेहेरबानगी व्हावी.

श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचे कारकीर्दींत बखतराम ह्मणून एक मोठा कारागीर होऊन गेला. याचें नांव आपले वाचकांपैकीं बहुतेकांस अवगत

असे ञ्च. याच्या अजब कारागिरीची साक्ष बारामतीचे काळे यांच्या देवीची मूर्ति व खुन्या मुरलीधराची मूर्ति ह्या अजून देत आहेत. एकदां असें झालें कीं, श्रीमंतांनीं बखतरामास एक मोठें पोंवळें देऊन गणपतीची मूर्ति करण्यास सांगितलें. गणपती तयार झाला परंतु अकस्मात् त्याचा एक हात गळून खालीं पडला. हें पाहून बखतरामाची पांचांवर धारण बसली; परंतु तो मोठा वस्ताद असल्यामुळें त्यानें मालमसाला घालून हात बेमालूम जडवून दिला. याप्रमाणें ह्यानें ही वेळ मारून नेली परंतु हें सगळें पुढें उघडकीस आलें. गणपतीची स्थापना झाल्यावर रोज अभिषेक होत असे. असें होतां होतां दोन तीन वर्षांनीं मालमसाला निघून गेल्यामुळें तो हात फिरून गळून पडला. हात पडलेला पाहिल्यावरोबर भटजी बोवाची "दे माय धरण[illegible]ाय" अशी अवस्था झाली. पुढें ही गोष्ट श्रीमंतांचे कानांवर आली. [illegible] पाहिल्यावर भटजी बावास आश्वासन दिलें कारण त्यांस द[illegible]बगिरी तेव्हांच कळून आली, व भटजीकडे कांहीं अपराध नाहीं अ[illegible]सून आलें. श्रीमंतांनीं बखतरामाचा उजवा हात (ज्या हातानें त्यानें गणपति केला तो) तोडण्याचा हुकूम फर्माविला. बखतरामानें हुकूम ऐकिल्याबरोबर पवबारा केला, व बारामतीस जाऊन श्रीमंत गोविंदराव काळे यांचे पाय धरिले. काळे यांनीं ह्यास अभयवचन दिलें. नंतर काळे यांनीं बखतरामास दुसरें एक मोठें पोंवळें आणून दिलें; व एक उत्कृष्ट गणपति तयार करण्यास सांगितलें. बखतरामानें फार काळजीनें एक उत्कृष्ट गणपति बनविला. पुढें काळे यांनीं श्रीमंतांची मर्जी सुप्रसन्न पाहून ह्या वेळेस ती मूर्ति श्रीमंतांकडे नेली. श्रीमंत मोठे खुष झाले. काळे यांनीं ही मूर्ति निजाम सरकाराकडून नजर आली आहे असें श्रीमंतांस सांगितलें. नंतर श्रीमंत ह्मणाले, बखतराम असता तर उलट नजराणा पाठवितां आला असता. नंतर काळे यांनीं अभयवचन असल्यास सगळी खरी हकीकत सांगतों असें श्रीमंतांस सांगितलें. श्रीमंतांनीं अभयवचन दिल्यावर काळे यांनीं सगळा वृत्तांत श्रीमंतांस सांगितला. मग ते काळे यांस असें ह्मणाले कीं बखतरामाचा हात तर तुटूं नये व माझा हुकूम तर मोडला जाऊं नये अशी शक्कल तुह्मी काढा. तेव्हां काळे

ह्मणाले कीं बखतरामानें अतःपर उजवी अस्तनी घालूं नये; असें केलें असतां आपला हुकूम मोडणार नाहीं व बखतरामाचा हातही कायम राहील. ही मसलत श्रीमंतांचे पसंतीस पडली. तेव्हांपासून बखतरामाचा हात उघडा असे असें ह्मणतात.* चुकयांची दुरस्ती होऊन छापण्याची मेहेरबानगी व्हावी. कळावें, हे विनंति.

मु० डेक्कनकालेज.
१०।४।७९

आपला एक विद्यार्थी.

---

* बखतरामाचा उजवा हात तोडला होता व खुन्या मुरलीधराची मूर्ति त्यानें डाव्या हातानें केली असें लोकांचे सांगण्यांत आहे.

Harda Native General Library.

# विषयक्रम.

(१) विषयोपन्यास (२) मोरोपंताच्या तर्फेची मंडळी (३) त्याच्या कवितेंतील मोठा विशेष (४) हा त्याच्या कीर्तीच्या प्रसारास कारण (५) यावरून त्याचें महाकवित्व कितपत ठरतें या विषयीं विचार (६) मोरोपंताच्या कवितेचें गहनत्व व दुर्बोधत्व (७) वरील मताची यथार्थता.


उत्कृष्ट उतारे .... .... .... .... .... १७

विनोद, महदाख्यायिका.... .... .... .... १९

पत्रें .... .... .... .... .... .... २८

# निबंधमाला.

## अंक ५७.

### मोरोपंताची कविता.

परकृत अपमान जसा त्वत्कृत बहुमान हा तसा मातें ॥
अश्वमेध पर्व.

१. येथवर प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांविषयीं विवेचन झालें. आतां त्याच्या तर्फेची जी मंडळी आहे तिच्या तोंडून त्याचा गुणानुवाद जो ऐकूं येतो तो कितपत यथार्थ होय याविषयीं विचार करावयाचा.

२. **मोरोपंता**च्या तर्फेची मंडळी कोण हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. जुनें विद्वन्मंडल व नवें विद्वन्मंडल हीं दोन्ही प्रस्तुत कवीच्या प्रतिपक्षिवर्गांतच प्रायः येतात. पहिल्यांच्या दृष्टीनें प्राकृत हें जितकें हलकें तितकेंच दुसऱ्यांच्या दृष्टीनें व्हर्नाक्युलर (एतद्देशीय भाषा) हें होय; व 'नैषध' कार आणि 'चंपू' कार सोडून **मोरोपंता**कडे मेहेर नजर करण्यास पहिल्यांस जितके प्रयास, तितकेच दुसऱ्यांस **शेक्सपीयर** किंवा **पोप** सोडून महाराष्ट्र कवितेवर येण्यास! या दोहोंशिवाय बाकी राहिलेला सारा जनसमूह प्रस्तुत कवीच्या तर्फेचाच ह्मणायास हरकत नाहीं. त्यांतून त्याचे चाहते व सेवक ह्मटले ह्मणजे हरदास हे होत. यांनींच आमच्या 'कवीश्वराच्या मनःपयोनिधिसुते' चा आविर्भाव होतांच मोठ्या उत्साहभरानें तिचें अभिनंदन केलें, आणि लवकरच साऱ्या महाराष्ट्रीय जनांच्या हृदयांत तीस अढळ पदीं बसवून टाकिलें. तर याच मंडळीच्या तोंडून प्रस्तुत कवीविषयीं जे उद्गार ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याचें विवेचन केलें पाहिजे.

३. **मोरोपंता**ची कविता वाचतांना सकृद्दर्शनीं ही कळून येणारा तिचा एक मोठा विशेष ह्मटला ह्मणजे लांब लांब यमकें हा होय. हा यमकांचा प्रकार प्रथमतः **वामना**नें सुरू केला. त्याच्यापूर्वीं महाराष्ट्र कविता ही केवळ

ओवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता; आणि त्यांतून वरील कवींपैकीं कोणीही पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतही यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं.* पण पुढें वामनानें जेव्हां गणवृत्तें महाराष्ट्र कवितेंत आणलीं, तेव्हां तीं यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें तो यत्न त्यानें केला.† नंतर मोरोपंतानें तर वरील शब्दालंकार साधण्यास फार सोईचें जें आर्यावृत्त ‡ तें उचलून त्यांत प्रकृत शब्दचमत्काराची अगदीं कमाल करून सोडली. तीन तीन चार चार अक्षरांचें यमक तर सामान्यत: सर्व आर्यांत असून कोठें कोठें तर साहा साहा आठ आठ अक्षरेंही यमकबद्ध आढळतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर दुसरा व चवथा चरण बहुधा एकाच अक्षरांनीं बांधलेला आढळतो. याप्रमाणें यमकरचनेचा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत सर्वसाधारण असून शिवाय जागोजाग अनुप्रासाचाही चमत्कार त्यानें केलेला आहे.§

---

* अनुष्टुप् छंदांत ही शब्दालंकार साधलेले पाहणें असल्यास 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध' 'नैषध' वगैरे काव्यांत ते दृष्टीस पडतील. महाराष्ट्र भाषेंतील प्रकार पाहणें असल्यास मोरोपंताच्या 'अनुष्टुप् रामायणा' त तो दृष्टीस पडेल.

† मोरोपंतानें 'वामनपंडितस्तुतीं' त म्हटलें आहे:—

अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं।
केली भाषाकवि जे त्यांची तों गर्वहानि यमकांहीं ॥

‡ प्रस्तुत कवीची आर्यावृत्ताविषयक प्रीति सर्वप्रसिद्धच आहे.—

आर्या आर्यांसि रुचे ईच्याठायीं असे जशी गोडी।
आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥

§ असें सांगतात कीं, बारामतींत मोरोपंताची बसावयाची जी खोली असे तींत चोहोंकडे भिंतींवरुन यमकबद्ध अक्षरें लिहून ठेविलेलीं होतीं. म्हणजे कवीस रिकाम्या वेळीं एकादा यमक सुचला कीं तो त्यानें भिंतीवर लिहून ठेवावा. पुढें काव्यरचनेच्या वेळीं जे जे यमक त्या त्या प्रसंगाला उपयोगीं पडतील ते ते त्यानें घ्यावे. हा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत जें अपूर्व यमकचातुर्य आढळतें (कीं जें पाहून घटकर्पर कवीस खापराचा घडा घेऊन पाणीच वहावें लागतें!) यावरून पहातां केवळ संभाव्य दिसतो. 'अगा राया' आणि 'अगारा या'; 'हानिकर' आणि 'हा निकर' इत्यादि शेकडों ठरीव यमकांवरुन ही वरील गोष्टीस बळकटी येते.

४. आतां हा जो **मोरोपंता**च्या कवितेंत आढळणारा विशेष वर सांगितला तो त्याची प्रसिद्धि प्रथमतः त्वरित होण्यास कारणभूत होऊन पुढें त्याची कीर्ति स्थिरावल्यावरही तीस मुख्यतः आधारभूत होऊन बसला. अजून पाहिलें तरी प्रस्तुत कवीची जी चहा आढळते ती पुष्कळ अंशीं वरील विशेषावरूनच होय. इंग्लंडांत **पोप**ची प्रख्याति त्याच्या अपूर्व पदलालित्यावरून जशी झाली, व वीस वर्षांच्या वयांतच वरील कवि तत्कालीन कवींत अग्रगण्यत्व पावून पूर्वींच्या महाकवींशीं टक्कर मारूं लागला,* किंबहुना त्यांच्याहूनही एकंदर लोकांस अधिक प्रिय झाला, त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रकवीचेंही झालें असावें. बारामतींतून त्याच्या आर्या जेव्हां प्रथमतः बाहेर पडूं लागल्या असतील, तेव्हां महाराष्ट्रकवितावधूचा हा नवीन थाटमाट पाहून तत्कालीन जन मोठे चकित होऊन राहिले असतील! 'उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः', किंवा 'उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व भारविः'† अशाच प्रकारचा त्यांस अनुभव घडला असेल! आपल्या धर्मपित्याच्या आश्रमांत तपस्विकन्येप्रमाणें वाढलेली जी शकुंतला तिनें पूर्वस्थितींतील वल्कलें टाकून देऊन महिषीपदोचित राजवेष धारण केला असतां तिच्या स्वरूपांत जसें विलक्षण अंतर दिसलें असेल, त्याप्रमाणेंच जी कविता

---

* वरील वयांत त्यानें Essay on Criticism ('काव्यविवेचनावर निबंध') हें लहानसें काव्य रचिलें. आडिसन्चा 'स्पेक्टेटर' याच वेळेस चालू होता, त्यांत वरील काव्याची फार तारीफ केलेली आढळते. (स्पे० अंक २५३). जॉन्सन्चा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे:--

"One of his greatest, though of his earliest works, is the "Essay on Criticism"; which, if he had written nothing else, would have placed him among the first critics and the first poets, as it exhibits every mode of excellence that can embellish or dignify didactic composition,—selection of matter, novelty of arrangement, justness of precept, splendour of illustration, and propriety of digression. I know not whether it be pleasing to consider that he produced this piece at twenty, and never afterwards excelled it; he that delights himself with observing that such powers may be soon attained, cannot but grieve to think that life was ever at a stand."

† 'सूर्य उगवला असतां काजव्याचा उजेड रद्द होतो व चंद्राचा ही फिक्का पडतो'; 'नैषधकाव्य निर्माण झालें असतां **माघ**कवि कोणीकडे व **भारवि** कोणीकडे?

पूर्वी ओवी व अभंग या छंदांत असून प्रायः अलंकारविरहितच होती तिला

झणत्कार जीच्या पदीं नूपुरांचा
रुणत्कार जीच्या करीं कंकणांचा ।

असें स्वरूप एकदम प्राप्त झालेलें पाहून सारा जनसमूह अत्यंत विस्मित होऊन गेला असेल ! गीर्वाणवाणीच्या सुवर्णसूत्रांनीं जागोजाग विणून काढलेलें व अनुप्रासानें स्थलविशेषीं विचित्रित-केलेलें असें उज्ज्वल वस्त्र परिधान केलेली वरील अभिनव कविता जनमनःप्रांगणीं जेव्हां नटीप्रमाणें अवतीर्ण झाली असेल, तेव्हां तिचा अलंकारांचा थाटमाट पाहून व चरणांत रुणझुणणाऱ्या यमकरूप पैंजणांचा कर्णमनोहर नाद ऐकून **जोशीबोवांसारखी** मंडळी तल्लीन होऊन गेली यांत काय आश्चर्य ?

तर प्रस्तुत कवीची लवकरच जी चोहोंकडे प्रसिद्धि झाली, व पूर्वींच्या महाराष्ट्र कवींत तो तेव्हांच सामील झाला, किंबहुना त्या सर्वांस त्यानें लोपवून टाकलें, हें सर्व वरील रचनाविशेषाचें फल होय. जगांतील रीत पहातां सामान्यतः अशीच आढळते कीं, अंतरंगाकडे दृष्टि फार थोड्यांची ; ‘ बाह्यरंगप्रसंगेन के के नानेन वंचिताः ’ हाच प्रकार प्रायः आढळणारा ! निदान सकृद्दर्शनीं तरी बाह्यरंगाला जशी मंडळी भुलते व त्याच्या योगानें छाप बसून जाते, तसें अंतर्गत गुणाच्या योगानें होत नाहीं. तेथपर्यंत दृष्टि जी पोंचायाची ती प्रथमतः तर फार करून कोणाची पोंचत नाहींच ; पोंचलीच तर जे अत्यंत मार्मिक असतील त्यांचीच पोंचते. बाकी एकंदर लोकांची रीत ह्मटली ह्मणजे जें वरकांती दृष्टीस पडेल त्यास भुलावें, किंवा फार झालें तर प्रमुख ह्मणून जे निवडले असतील त्यांचें अनुसरण करावें. आतां हें खरें आहे कीं, एका इंग्रजींतील ह्मणीप्रमाणें* केवळ बाह्य चाकाचक्याचा फार दिवस टिकाव निघत नाहीं ; आंत कांहीं तत्व असल्याखेरीज नुसता बाहेरचा डामडौल फार दिवस निभत नाहीं. कालें करून खरें नाणें कोणतें व खोटें कोणतें हें उघडकीस येतेंच. पण हा तत्त्वनिर्णय निरनिराळ्या प्रकरणांत कमज्यास्त अवकाशानें होतो, व तो होणें हें ही कांहीं कांहीं प्रकरणीं अवघड

* वरील म्हण येणेंप्रमाणें :—

‘ An empty sack cannot long stand upright ’ (रिकामें पोतें किती वेळ ताठ उभें राहणार ?)

असतें. साक्षात् प्रत्ययावह जीं शास्त्रें आहेत त्यांतील प्रकरणांचा व व्यवहारांतील गोष्टींचा जसा खरेखोटपणा तेव्हांच निवडतां येतो, त्याप्रमाणें केवळ मांनसगोचर ज्या वस्तु त्यांचा निवडतां येत नाहीं. खरा वैद्य किंवा खोटा वैद्य, खरा ज्योतिषी किंवा खोटा ज्योतिषी, खरा शिपाई किंवा खोटा शिपाई ही परीक्षा जशी औषधक्रियेवरून, ग्रहणादि वर्तविण्यावरून, व मर्दुमकीच्या प्रसंगावरून तेव्हांच करतां येण्यासारखी असते, तशी कवित्वाची किंवा तत्त्वज्ञतेची गोष्ट नाहीं. यामुळेंच **पोप** कवि आहे कीं नाहीं याविषयींचा वाद आजपर्यंत चालला आहे, व मानसशास्त्रांतील अनेक प्रमेयें अद्याप जशींचीं तशींच संदिग्धावस्थेंत आहेत !

तेव्हां **मोरोपंताची** प्रख्याति लवकरच जी सार्वत्रिक झाली ती त्याच्या कवितेच्या बाह्य स्वरूपावरून झाली. याच्या उज्ज्वलत्वानें लोकांचे डोळे इतके दिपून गेले कीं अंतर्गत स्वरूपाची परीक्षा करणें दुर्घट झालें. किंबहुना ती करण्याचें त्यांस अगत्यही वाटलें नाहीं. **मोरोपंता**सारखा कवि मागें झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं, इत्यादि प्रकारांनीं त्याची वाहवा सर्वांच्या तोंडीं जी झाली ती वरील कारणांवरूनच होय. अजून तरी प्रस्तुत कवीची एकंदरींत जी चहा आहे व त्याची प्रसंगविशेषीं जी तारीफ ऐकूं येते तिचें बहुधा दुसरें कांहीं कारण नाहीं. हरदासांच्या तोंडून बहुधा सर्वांनीं असे उद्गार ऐकिले असतील कीं, 'वाः ! काय **पंतांचें** चातुर्य ! असा कवि दुसरा नाहींच!' पण या उद्गारांचें मूळ पाहूं जातां चमत्कारिक प्रास किंवा यमक यांच्याहून निराळें फार करून आढळणार नाहीं. इतर लोकांतही प्रायः अशीच समजूत दृष्टीस पडते, कीं ज्याची भाषेवर येवढी सत्ता कीं अमुक अमुक अक्षरें चरणाच्या शेवटीं आणायाचींच तर तीं सहज आणायाचीं, तऱ्हे तऱ्हेचे प्रास मधें साधायाचे, रामायणें रचलीं आहेत तर राजाधिराजांचें जसें ऐश्वर्य दृष्टीस पडतें कीं चंदनाचा महाल तर जिकडे तिकडे चंदनच, बिलोरी महाल तर येथून तेथून बिलोरच, संगमरवरी दगड तर चोहोंकडे तोच, त्याप्रमाणें लघ्वक्षर रामायण ह्मटलें कीं सारी एकमात्रक अक्षरांचीच गर्दी, निरोष्ठ रामायण ह्मटलें कीं तें खुशाल विडा खाऊन वाचावें, दामरामायणांत पहावें तों आर्यार्धाचे शेवटले वर्ण व पुढल्याचे आद्य वर्ण शेवटपर्यंत सारखे गुंफलेले,—याप्रमाणें हव्या त्या तऱ्हेवर ज्या नाट्याचार्यानें वाग्देवीस नर्तकीप्रमाणें नाचवावी, त्याचें काव्यचातुर्य काय वर्णावें !

९ आतां वरील रचनाचातुर्य हें कवित्वाचा मोठा भाग होय असें समजून त्यावरून प्रस्तुत कवीची महाकवींत गणना करणें हें किती समंजस आहे याचा विचार करूं. गेल्या सत्तेचाळिसाव्या अंकांत शब्दालंकारांच्या योजनेच्या संबंधानें जें विवेचन केलें आहे त्यावरून व इतर ठिकाणीं ही प्रसंगवशात् जे उल्लेख केले आहेत त्यांवरून आमच्या वाचकांस कळलेंच असेल कीं शब्दालंकारांची योग्यता अर्थालंकारांहून फार कमी आहे. शब्दालंकार हे वस्तुतः दोषमय नाहींत, व मोठमोठ्या सर्वमान्य कवींनींही त्यांचा प्रयोग केलेला आढळतो, हें खरें; तरी वस्तुतः पाहतां त्यांच्या घटनेस कवित्वाचें अंग मानितां येईल असें नाहीं. केवळ यमक प्रास जुळणाराची आणि कवीची स्पर्धा ह्मटली ह्मणजे 'घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः' * अशासारखीच होय. केवळ छंदाची रचना व यमक प्रास यांची जुळणी हीं दोन्हीं सामान्यतः पाहतां व्यवहारोपयोगी शिल्पकर्माप्रमाणेंच श्रमसाध्य होत. सुतारकाम शिवणकाम वगैरे ज्याप्रमाणें केवळ सामान्य बुद्धीच्या मनुष्यास हीं श्रमसाध्य होय, व त्या कामांत त्याची जसजशी अधिक मेहनत होईल तसतशी त्याची वाकबगारीही वाढेल, त्याप्रमाणेंच पद्यरचनेची ही गोष्ट आहे. हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण अंमळ विचार केला असतां वरील उल्लेख अयथार्थ वाटणार नाहीं. पहा कीं, शाळेंतील मुलांस इतर विषय जसे शिकवतां येतात,—ह्मणजे चांगलें वळणशुद्ध अक्षर, हिशेबठिशेब ठेवणें वगैरे, त्याप्रमाणेंच पद्यरचना करणें हें ही त्यांस मोठेंसें कठीण जातें असें नाहीं. एकादा विषय दिला असतां त्यावर गद्यरचना करणें जसें त्यांस सुलभ असतें त्याप्रमाणेंच छंदोबद्ध रचना ही थोड्या परिश्रमा अंतीं त्यांस सुसाध्य असते. त्यांतून कविता रचण्याचा व वाचण्याचा ज्यास पुष्कळ नाद असतो त्यास तर यमक प्रास साधण्यास ही मोठेसे आयास पडत नाहींत. आमच्या देशांत वाचणारांची संख्या थोडी, आणि त्यांतून ग्रंथ विकत घेऊन वाचणारे तर फारच थोडे, त्यामुळें कविता करण्याचा धंदा ज्यारीनें चालत नाहीं; पण तेंच विलायतेंत पाहिलें तर दर वर्षास शेकडों नवीं काव्यें प्रसिद्ध होत असतात व त्यांच्या शेकडों हजार प्रती उडत असतात ! याविषयीं प्रमाण पाहिजे असल्या-

* "घट निर्माण करणारा कुंभार आणि त्रिभुवनास निर्माण करणारा ब्रम्हदेव यांची झटापट." वरील चरण ज्या श्लोकाच्या शेवटीं आहे तो प्रस्तुत पुस्तकाच्या ४ थ्या अंकाच्या मोहोऱ्यावर आहे.

स जॉन्सन्चें ‘ कविचरित्र ’ किंवा पोपचें ‘ डन्सिअड् ’ हें पहावें. पहिला ग्रंथ जॉन्सन्नें लंडन शहरांतील पुस्तकवाल्यांच्या विनंतीस मान देऊन रचला,* व पुस्तकवाल्यांनीं जे कवि निवडून काढले ते त्यानें हातीं घेतले. ही निवडानिवड पुस्तकवाल्यांनीं अर्थातच दुकानांतील विकरीच्या मानावर केलेली होती; ह्मणजे ज्या कवींचे ग्रंथ चांगले विकले व त्यांस चांगली किफायत झाली तेच त्यांनीं पुढें केले; मग त्यांची वास्तविक योग्यता कांहीं ही असो !† वरील गोष्टीस हल्लीं बरोबर एक शतक लोटून गेलें आहे. पण इतक्यांत काय चमत्कार झाला आहे पहा, कीं पारसीकांचा राजा झर्सीज् यानें उंच मनोऱ्यावर चढून तेथून आपलें अफाट सैन्य पाहिलें असतां त्यास जसा आमच्या अर्जुनाप्रमाणें अत्यंत विषाद झाला आणि वाटलें कीं, अरेरे ! येवढ्या अवाढव्य समुदायांतून शंभर वर्षां अंतीं एक ही जगणार नाहींना ! त्याप्रमाणेंच जॉन्सन्नें ज्या मंडळीचीं चरित्रें लिहिलीं त्यांची अवस्था झाली आहे ! येवढ्या पंडिताच्या हातून त्यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं यास्तव त्यांचें नांव बुडण्याचें आतां तादृश भय नाहीं येवढें खरें; पण एरवीं पाहिलें असतां वरच्यांतली निम्मेशिम्मे मंडळी इतक्यांतच गळून गेली आहे. कोठले ‘ किंग् ’ आणि आणि ‘ ड्यूक् ’ ? खरे राजे व खरे ड्यूक आजपर्यंत जसे शेकडो धुळीस मिळून गेले त्याप्रमाणेंच वरील नामधारी ‘ किंग् ’ व ‘ ड्यूक् ’ हे केवळ नामशेष होऊन बसले आहेत ! पोपच्या ‘ डन्सिअड् ’ काव्यांतील

---

* अंक २७ पृष्ठें १६–१७ पहा.

† वरील चरित्रलेखनाचें काम जॉन्सन्नें केवळ सांगकाम्याप्रमाणें केलें. इंग्रजी कवींत अग्रगण्य जे शेक्सपीयर चॉसर स्पेन्सर हे सदरील कविमालेंत मुळींच नाहींत, व त्या वेळच्या कित्येक प्रसिद्ध कवींस ही असाच फांटा दिला आहे. वर सांगितलेली खोगीरभरती मात हवी तितकी आहे. या संबंधानें बॉस्वेल्चा व जॉन्सन्चा सवालजबाब झालेला आहे:--

"I was somewhat disappointed in finding that the edition of the 'English poets', for which he was to write prefaces and lives, was not an undertaking directed by him, but that he was to furnish a preface and life to any poet the booksellers pleased. I asked him if he would do this to any dunce's work, if they should ask him. Johnson. "yes Sir; and say he was a dunce!"

मंडळीची तर याहूनही दुर्दशा! ‘ डन्स् ’ शद्बाचा अर्थ ‘ शंख ’ असा आहे, व वरील काव्यांत सारे शंखमणि ओंवले आहेत ह्मणून वरील नांव त्यास दिलें आहे. **पोप** हा लवकरच कवित्व सिंहासनावर आरूढ झाला असतां त्या वेळचे शेकडों छोटेखानी कवि रविघूकन्यायानें त्याचा मत्सर करूं लागले व अनेक तऱ्हांनीं त्यास त्रास देऊं लागले. शेवटीं त्यानें साऱ्या मंडळीस एका दावणींत घालून तिजवर आपला विनोदप्रतोद चालू केला. हा प्रतोद वरील काव्य होय.* असो; तर वरील उदाहारणांवरून हें लक्षांत आणायाचें कीं पद्यरचना ही श्रमसाध्य होय, व इतर श्रमसाध्य कलांप्रमाणें हींत ही परिश्रमानुरूप बरीच निपुणता साधतां येते.

आतां येवढें खरें आहे कीं, यमकप्रासादि चमत्कार जरी श्रमसाध्य असले तरी **मोरोपंतानें** ते जितक्या तऱ्हेचे केले आहेत तितके करणें व तितक्या सहज रीतीनें करणें हीं दोन्हीं कृत्यें प्रायः दुर्घटच होत. सरस्वतीच्या ज्यास प्रसाद असेल, ह्मणजे सारी भाषा ज्याच्यापुढें जशी काय हात जोडून उभी असेल, त्यासच वरील गोष्ट साध्य होय. तरी हें भाषाप्रभुत्व बुद्धिमत्त्वाचें जितकें दर्शक होय तितकें कवित्वाचें नाहीं हें वाचकांनीं लक्षांत आणलें पाहिजे. प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत व इतरत्रही प्रसंगोपात वरील दोहों गुणांच्या भिन्नत्वाविषयीं विवेचन केलें आहे; त्यावरून सहज समजण्यासारखें आहे कीं, शद्बचमत्कारघटनेचें चातुर्य आणि सहृदयत्व यांचा परस्पर कांहीं संबंध नाहीं. दोहोंचें सामानाधिकरण्य क्वचित् संभवेल,—जसें प्रस्तुत कवीचेठायीं; पण त्यांचा नित्य संबंध ह्मणून बिलकुल नाहीं. ज्याप्रमाणें जो उत्कृष्ट कसरती तो मोठा बळकट असला पाहिजे असा नेम नाहीं, किंवा जो मोठा पहिलवान त्यास दोरीवरून चालतां आलें पाहिजे असेंही नाहीं; त्याप्र-

---

* वरील ग्रंथ सन १८२८ त प्रसिद्ध झाला. **पोपनें** कुकविसत्र आरंभल्याची वार्ता अगोदर चोहोंकडे पसरलेलीच होती; यास्तव सदरील काव्य विकावयाला काढावयाच्या वेळेस सारी ‘ शंख ’ मंडळी पुस्तकवाल्याच्या दुकानाशीं जमली, आणि त्यास पुस्तकें बाहेर काढूं देईनात! ही मौज **पोपच्या** ‘ चरित्रां ’त काढलेल्या एका चित्रावरून दिसून येते.—**पोपचें** व्रत अद्याप ही इंग्लंडांत चालूच आहे. **मेकॉले** साहेबांनीं एकास कुकवित्वाबद्दल कसें खरमरीत बक्षीस दिलें आहे तें कित्येक वाचकांस माहीत असेलच. हे कविवर्य रॉबर्ट मॉन्टगॉमेरी होत. (**मेकॉलेचा** निबंध ( एप्रिल १८३० ) पहा.)

माणेंच जो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें यंत्रें, कूटें, निरनिराळे बंध वगैरे रचील त्यास सरस काव्य करतां येईलच, किंवा जो सरस कवि त्यास वरील यंत्रादि प्रकार अवश्य साधतीलच असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां **मोरोपंताच्या** कवितेंत यमकप्रासादिकांचे जे चमत्कार आहेत त्यांवरून त्याची गणना महाकवींत करणें हें असमंजस होय. तेवढ्यांवरून जर येवढ्या पायरीवर त्यास चढवावें तर मग ' रामकृष्णविलोमकाव्य, ' ' नलोदय, ' ' राघवपांडवीय ' इत्यादि प्रबंधांत कवित्वाचें सर्वस्व उतरलें आहे असें ह्मणणें भाग येईल !

६. तर याप्रमाणें प्रस्तुत कवीविषयीं यमकादि प्रकारांवरून झालेली जी समजूत तिजविषयीं विचार झाला. आतां **मोरोपंताची** कविता ह्मटली म्हणजे मोठी गहन, जो संस्कृतज्ञ पंडित असेल त्यासच ती लागेल, इत्यादि जे प्रवाद सामान्यतः ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

वरील समजुती कशावरून उत्पन्न झाल्या हें मागील निरूपणावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. **मोरोपंताची** प्रख्याति मागें सांगितल्याप्रमाणें जेव्हां चोहोंकडे झाली असेल तेव्हां त्याचें संस्कृत पद्धतीचें काव्य पाहून लोकांच्या मनांत वरच्यासारख्या कल्पना भरल्या असतील याची कल्पना करणें मोठें कठीण आहे असें नाहीं. नैषधकार, चंपूकार यांच्या बरोबरच हरदासांच्या कीर्तनांत या नव्या आर्याकाराचें काव्य जेव्हां निघूं लागलें असेल, तेंव्हां वरील कवींविषयींच्या सर्व समजुती या नव्या कवीसही जडल्या असतील हें सहजच आहे. त्यांतून **मोरोपंताची** कविता ' प्राकृतसंस्कृतमिश्रित ' असल्यामुळें व अशिक्षित लोकांस तात्काल कळण्याजोगी नसल्यामुळें वरील अनेक भ्रम माजण्यास विशेषच कारण झालें हें उघड आहे.

७. आतां वरील समज कितपत खरे आहेत याविषयीं विचार करूं. प्रथमतः कवीविषयींच पाहिलें तर तो **श्रीहर्ष, जगन्नाथराय, अप्पय्यादीक्षित** यांसारखा पंडित होता असें मुळींच नाहीं. तो केवळ पुराणीक होता. पुराण सांगतां येण्यास कितपत काव्यव्युत्पत्ति लागते हें बहुधा पुष्कळांस माहीत असेलच. आदिकवीच्या ' मधुर कूजितां ' त आणि **भारवीच्या** ' नारिकेलफलतुल्य वचनां ' त सुबोधतेच्या दृष्टीनें पाहतां किती अंतर आहे हें बहुधा कोणासही सांगायास नको. तेव्हां आमच्या कवीचा अत्यंत परिचय ज्या ग्रंथाशीं ते वरील आद्यकाव्याच्या तोडीचे अत्यंत सुबोध ग्रंथ होत. ते सोडून त्यानें तज्जातीय इतर ग्रंथांकडे नुसतें अवलोकनही केलेंसें दिसत नाहीं. आज-

पर्यंत जेवढा म्हणून प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचा भाग आमच्या पाहण्यांत आला तेवढ्यांत असें एकही स्थल आम्हांस आठवत नाहीं कीं ज्यावरून संस्कृतांतील पंचमहाकाव्यांशीं किंवा नाटकांशीं **मोरोपंता**चा परिचय होता असें अनुमान करतां येईल ! **कालिदासादिकां**चे अर्वाचीन काव्यग्रंथ जरी सफई बुडून जाते तरी प्रस्तुत महाराष्ट्रकवीचे ग्रंथ सध्यां जसे निपजले त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचे निपजतेना असें आम्हांस खास वाटतें. तर जी काव्यव्युत्पत्ति पांडित्याचा केवळ निकृष्ट भाग, किंबहुना मुळींच भाग ही नव्हे, ती आमच्या कवीची वर सांगितलेल्या तऱ्हेची ह्मणजे पौराणिक पद्धतीचीच केवळ होती. हें सांगितल्यावर मग पांडित्याचा शिरोभाग जीं न्यायमीमांसादि शास्त्रें त्यांत तर त्याची कितपत गति असावी हें सांगायाला नकोच ! * तेव्हां एकंदरींत प्रस्तुत कवि हा महापंडित होता ही जी सामान्यतः त्याच्या प्राकृतसंस्कृतमिश्रित काव्यावरून लोकांची समजूत झालेली आहे ती अगदीं खोटी आहे. महाराष्ट्र कवींत पंडित असा एक **वामन** मात्र होता; बाकीच्यांस वरील संज्ञा लावणें हें अप्रशस्त होय.

---

***मोरोपंता**ची एक आर्या प्रसिद्धच आहे.—

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती ।
वैकुंठपेठ मोठी नांवावरि हीनदीन खटपटती ॥

या आर्येवरून प्रस्तुत कवीस वरील शास्त्रांची कितपत अभिज्ञता असावी याचें कांहीं अनुमान करण्यास जागा आहे. शिवाय त्याच्या खुद्द ग्रंथांतही प्रस्तुत प्रकरणीं निर्णायक होण्यासारखीं कांहीं स्थलें आहेत. उदाहरणार्थः—

ऐसें ह्मणता स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे आधी ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ॥

आदिपर्व २९

तीस ह्मणे द्रुहिण अये देवि त्रैलोक्यसुंदरि पुनीते ।
वारीं ताप जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते ॥

किता-२६

आमचा कवि जर वैयाकरण असता तर 'अनुष्ठितुं' व 'पुनीते' अशीं रूपें तो न लिहिता हें उघडच आहे. इतर महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतून व्याकरणशुद्धतेचा प्रकार कितपतसा दृष्टीस पडतो हें प्रस्तुत पुस्तकाच्या १० व्या अंकाच्या शेवटीं एका टिपेंत कांहीं उदाहरणें दाखल केलीं आहेत त्यांवरून लक्षांत येईल.

मोरोपंताच्याच ग्रंथांवरून पाहतां तो आपणास पंडित समजत असे किंवा या पदावर चढण्याविषयीं त्याची हाव होती असाही प्रकार बिलकुल नजरेस येत नाहीं. तो आपली पदवी ओळखून तींत संतुष्ट होता असें दिसतें. आपलें कवित्व कोणत्या तोलाचें आहे हें पक्केपणीं जाणून तो त्याविषयीं योग्य अभिमान बाळगीत असे, व दूषकांच्या आक्षेपांची पर्वा करीत नसे, हें त्याच्या कांहीं उल्लेखांवरून दिसतें खरें; तरी **जगन्नाथरायाप्रमाणें** ‘ पंडितराज ’, ‘पंडितपति’, ‘ पंडितराजराजितिलक ’ इत्यादि विशेषणें त्यानें आपणास घेतलेलीं कोठेंही आढळत नाहींत. फार तर काय, पण **रामजोशाप्रमाणें** ‘कविराय ’, किंवा **जयदेवाप्रमाणें** ‘कविराजराज ’ अशा उपपदांचा ही त्यानें प्रयोग केलेला नसून स्वतः विषयींचा उल्लेख केवळ ‘ मयूर ’, ‘ मोर ’, ‘मयूरेश ’अशा साध्या पदांनींच त्यानें केलेला आढळतो. शिवाय पांडित्य मिरविण्याचा दुसरा जो प्रकार असतो, ह्मणजे शास्त्रीय प्रकरणांस अनुलक्षून काव्यांत उल्लेख करायाचे, किंवा अर्थबाहुल्याचा चमत्कार करायाचा, तो ही प्रकृत कवीच्या कृतींत कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण आपल्या अंगीं पंडितत्व वसत नसल्यामुळें आपलें काव्य पंडितांच्या दोषदृष्टीस पात्र होईल हा धाकही आमच्या कवीनें वागविलेला कोठें कोठें नजरेस येतो !*

८. हें एक झालें. आतां याच्याच अनुषंगानें राहणारा दुसरा भ्रम जो कीं **मोरोपंताचें** काव्य जो संस्कृतज्ञ असेल त्यासच कळेल, किंबहुना स्थलविशेषीं मोठमोठ्या पंडितांस ही तें समजण्याची मुष्कील पडते,—यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

---

* कथांसि उपमा दिली सुरभिची दिसे नीट ती
परंतु बहुमंद मी म्हणुनि सत्कृती वीटती ।
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा शुद्धतें
नव्हे चि न विचारिलें बुधजनांशिं म्यां उद्धतें ॥

‘ केकावली ’

असें हि उपदेशिती गुरु रहस्य मंदा रुचे
निजस्तव जसा तसा अगुण घे न वंदारुचे ।
ह्मणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों
परंतु हृदयीं महाजनभयासि मी मानितों ॥

किंवा

या भ्रमाचा निरास करण्यापूर्वी अर्वाचीन काळीं लोकांच्या मनास बळकट जडून राहिलेल्या एका मिथ्या कल्पनेचा ऱ्हास केला पाहिजे. ही कल्पना अशी कीं, काव्य जितकें जितकें दुर्बोध तितकें तितकें तें चांगलें. आपण कविता केली आणि ती वाचणारास किंवा ऐकणारास चटदिशी कळली ह्मणजे मग आपली करामत व आपलें चातुर्य तें काय? खरें काव्य ह्मटलें ह्मणजे तें, कीं ज्यांतील पदें येथून तेथवर सबंध वाचलीं असतां बोध ह्मणून बिलकुल होऊं नये. पोरींच्या उखाण्यांतला 'काय तुझ्या मनांत सांग माझ्या कानांत' हा जसा प्रकार, किंवा विठ्ठलकवीच्या कोड्यांतला 'षण्मासच्या वायद्या'चा प्रकार, तशी जेव्हां वहार असेल तेव्हां तें काव्य!* ही समजूत अत्यंत असमंजसपणाची व अरसिकतेची आहे. काव्याचा उद्देश जर मनोरंजन आहे, व रस हा त्याचें केवळ तत्व होय, तर वरील दुर्बोधपणा हा काव्याचा गुण नसून उलटा दोषच होय; कांकीं, जेथें अर्थज्ञानच दुर्लभ तेथें मनोरंजन कसलें व रसोत्पत्तीचा संभव तरी कसचा? शिवाय अर्थगांभीर्य व उत्तानार्थत्व हे गुण स्वभावतः परस्परविरोधी नव्हेत हें तत्व ही वरील अरसिक मंडळीस कळत नसतें. उत्कृष्ट पाणी जसें स्वच्छ असतें आणि खोल ही पण असूं शकतें, त्याप्रमाणें ज्या काव्याचीं पदें प्रसादयुक्त ह्मणजे अत्यंत व्यक्त आहेत त्यांत अर्थ ही पण मोठा सखोल असूं शकेल! हें मर्म न समजून वरच्यासारखे लोक साध्या कवितेस भिकार समजतात, व मोठमोठे संस्कृत शद्ब आणि लांब लांब समास योजून रचलेल्या काव्यास प्रौढ व गहनार्थक मानतात. केवळ सुबोधत्वावरून व दुर्बोधत्वावरून वरील कल्पना बांधणें हें केवळ स्वच्छपणावरून किंवा गढूळपणावरून पाण्याच्या खोलीचें अनुमान करण्यासारखें असमं-

---

* सर्व देशांतील महाकवींच्या पद्धतिप्रमाणें **कालिदासाचें** काव्य प्रसादगुणविशिष्ट आहे; तरी 'नलोदय' या नांवाचें एक अत्यंत क्लिष्ट काव्य त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहे. याचें कर्तृत्व आलीकडील मंडळी दुसऱ्या एका **कालिदासाकडे** देतात. जुन्या मंडळींत वरील काव्याच्या अप्रसन्नतेची अशी उपपत्ति करतात कीं, तें आमच्या कविमुकुटमणीनें लोकांच्या सांगीवरून लिहिलें. आपलें उत्तानार्थक काव्य हवें त्यास समजतें, तर असें नसून जें गहन अर्थाचें काव्य नुसत्या पंडितांसच लागेल असें रचावें असें लोकांनीं सांगितल्यावरून **कालिदासानें** 'नलोदय' रचलें अशी एक गोष्ट ऐकण्यांत आहे. **मोरोपंताच्या** 'बृहद्दशमा' विषयींही अशीच आख्यायिका आहे. या दोहोंत संभाव्यता कितपत आहे हें सांगायास नकोच!

जस होय. दोन हातच खोल आहे पण आंतील गोटे बिलकुल दिसत नाहींत अशा गढूळ डबक्यास भारी खोल मानून ज्यांतील रत्नसंचय वरून लखलख दिसतो आहे अशा सागरास वरील स्वच्छतेवरूनच केवळ उथळ मानला असतां तें किती समंजस होईल !

असो; आतां प्रस्तुत महाराष्ट्र कवीचे ग्रंथ वरील दोहोंपैकीं कोणत्या प्रकारांत येतात तें पाहूं. सदर्हू प्रकरणीं आजपर्यंत कोणत्या समजुती लोकांच्या मनांत दृढ होऊन बसलेल्या आहेत हें या पूर्वींच्या विवेचनावरून वाचकांस कळलेंच आहे. त्या ह्या कीं, मोरोपंताचें काव्य ह्मणजे दुर्बोध; जसा असोल्या नारळ असतो, कीं त्यास फोडायास कुऱ्हाडच आणली पाहिजे, तशी प्रस्तुत कवीची कविता; संस्कृत साहित्यांत सांगितलेल्या नारिकेलपाकाचें उत्कृष्ट उदाहरण ती होय. खरी कविता ह्मटली ह्मणजे द्राक्षापाक या तऱ्हेची असावी; कीं द्राक्षांत जसा अंतर्गत रस बाहेर लखलखीत दिसत असतो, व द्राक्ष तोंडांत घालण्याचा अवकाश,—कीं तें विरघळून गेलेंच, त्याप्रमाणें कवितेच्या अंगीं सुबोधपणा असावा! पण मोरोपंताचें तर याच्या अगदीं विरुद्ध. हा प्रस्तुत कवीच्या प्रतिपक्ष्यांचा त्यावर भडिमार. त्याच्या तर्फेच्या मंडळीची प्रशंसा पाहिली तरी ती याच मुद्यावर. पंतांचें काव्य ह्मणजे काय हो! किती गहन, मोठमोठ्या पंडितांसही तें उकलण्याची पंचाईत,* एकेका आर्येत दहा दहा अर्थ!! एकूण दोहों पक्षांचें भांडण तर खरें, पण मुद्याची गोष्ट एक,—कीं मोरोपंताची कविता दुर्बोध. या दुर्बोधत्वामुळें

---

* दादोबांनीं मोरोपंताची श्रीहर्षाशीं जी तुलना केली आहे तिजवरून वरीलच भ्रम उत्पन्न होणारा आहे. शिवाय त्यांचा इंग्रजी व मराठी प्रस्तावनेंत जो उल्लेख आहे तो येणेंप्रमाणें :—

"Experience has perfectly satisfied me that even among Sanscrit scholars in this country, few can pretend to the full and easy comprehension of this little poem without mental efforts of no ordinary kind."

"त्यांत आणखी पंतांच्या काव्यांत निष्णात म्हणून वाखणालेल्या पुरुषांमध्यें ही बहुतेकांस 'केकावलि' हा ग्रंथ साद्यंत लागत नाहीं, असा ही बोभाटा माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणांवरून मोरोपंताच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढला."

कितीएक जणांची अशी प्रसिद्धी झालेली आहे, कीं मोरोपंताची कविता लावणें झाली तर त्यांनींच लावावी. अशा मंडळीस ' आर्यापंडित ' ही लौकिक संज्ञा आहे.

आतां ही जी मोरोपंताच्या कवितेच्या संबंधानें हाकाहाक आहे ती पुष्कळ अंशीं निवळ व्यर्थ आहे हें कोणासही सकृद्दर्शनीं सुद्धां दिसणार आहे. पहा कीं, मोरोपंताची कविता मराठी पांचव्या व साहाव्या यत्तेच्या पोरांसही चांगली समजते. कीर्तनसमयीं हरदास मोरोपंताच्या आर्या ह्मणतात ; पण या आर्या निघाल्या कीं श्रोतेमंडळी डुकल्या घ्यावयाला लागली किंवा उठून जावयाला लागली असेंही कोठें आढळत नाहीं. हरदास तरी जातीनें मोठे विद्वान् व महापंडित असतात असें नाहीं. महाराष्ट्र कवितेचें ज्ञान व तिची चांगली उपस्थिति, आणि सामान्य प्रकारची व्युत्पत्ति येवढी सामग्री असली ह्मणजे त्यांचें काम चांगलें चालतें. मग अशांस ही जी कविता स्वतः समजायास व श्रोतृजनांस समजावयास मोठीशी कठीण जाते असें नाहीं तिच्या दुर्बोधतेची प्रसिद्धि किती पोकळ म्हणावी ! असें तर आजपर्यंत कोणाच्या पाहण्यांत आलें नसेल, कीं आज अमुक अमुक आख्यान लावायाचें तर त्यावरील आर्यांची कोणा महापंडितापाशीं जेव्हां संथा घेऊन फोड करून घ्यावी तेव्हां मग हरदासानें कीर्तनाला उभें राहावें ! शिवाय, हेंही पुष्कळांस माहीत असेल कीं छापण्याचा प्रचार इकडे सुरू झाल्याच्यापूर्वीं प्रस्तुत कवीचे ग्रंथ इतर महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांप्रमाणें लोक हस्तलिखित प्रती करून संग्रहास ठेवीत, व पुष्कळांचा प्रस्तुत कवीच्या आर्यांविषयीं छंद असल्याविषयींही लौकिक असे. तर या सर्व प्रकारांवरून प्रस्तुत प्रकरणाचा काय निकाल होतो तो वाचकांनींच पाहावा !

कवीविषयींच पाहिलें तर त्याच्या ग्रंथांतही आपलें काव्य मोठें गहन आहे व तें उकलणें हें पंडितांशिवाय इतर कोणाच्यानेंही होणार नाहीं अशा प्रकारची कोठेंही प्रौढी झोकलेली आढळत नाहीं. स्वतः विषयींचे जे त्याचे कोठें कोठें उल्लेख आहेत त्यांत आपल्या कृतीच्या सरसत्वाविषयींच त्यानें लिहिलेलें

आढळतें.* उलटा एके ठिकाणीं ('मंत्ररामायणा'च्या प्रस्तावनेंत) असा मात्र उल्लेख आढळतो:—

कोठें दूरान्वित पद कोठें चुकली असेल यतिमात्र ।
अतिमात्र दोष ऐसे न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥

जो कवि दूरान्वयाच्या योगानें वाचकांस काव्य समजतांना अडचण पडूं नये याविषयीं येवढा संकोच बाळगीत होता तो आपलें काव्य होईल तितकें दुर्बोध करण्याविषयीं झटेल कीं काय याचें अनुमान कोणासही सहज होणार आहे !

आतां येवढें मात्र खरें आहे कीं, मोरोपंतांचें कवित्व केवळ द्राक्षापाकाच्याच वर्गांत येणार नाहीं. साऱ्या महाराष्ट्र कवींत त्यांचें काव्य समजण्यास अंमळ श्रम लागतील खरे. तरी जो बहुश्रुत आहे ह्मणजे ज्यास संस्कृत शब्द बरेच माहीत असून समासांची मोडणी समजली आहे, आणि प्रस्तुत कवीची पद्धतिही ज्यास थोडीशी ठाऊक झाली आहे, त्यास ह्मणजे दरएक आर्येशीं अर्थबोध होण्याकरतां थबकून राहावें लागेल असें मुळींच नाहीं. बहुतेक आर्या त्यास वाचतां वाचतां सहज उलगडतील. क्वचित् ठिकाणीं मात्र, कीं जेथें यमकामुळें प्रासामुळें वगैरे वाक्याची रचना अंमळ अव्यवस्थित झाली असेल, तेथें थोडासा विचार करावा लागेल; तरी ज्याप्रमाणें सूर्याच्या आड

---

* उदाहरणार्थ पुढील आर्या पहा:—

हें भीष्मपर्व पावो साधुश्रुतिशष्कुलीनभा सावें ।
श्रीव्यासकृत मयूरेश्वर-विलसित वेगळें न भासावें ॥
रसिक कवि परम सज्जन भगवद्भक्त प्रसन्न होताल ।
न गमेल यापरिस हित तो जो वदनांत अमृत ओतील ॥
भारत

जैमिनिकृताश्वमेध-स्थित कुशलवचरित वर्णिलें आहे ।
बा हे रीति पहावी मग तों वाटे सुधानदी वाहे ॥
नामरसायन

पद्माकांतपदींच कृष्णविजयग्रंथांबुजन्मांजळी
भावें वहुनि अर्पिला हरिजनांमध्यें किती जे अळी ।
ते याचा रस सेवितीलचि शिरीं वाहेल सन्मंडळी
हा स्वस्वामिपदप्रसाद खळ तों भीतील जैसा कळी ॥
बृहद्दशम

आलेला ढग त्याच्या बिंबावरून निघाला असतां अंधार जाऊन एकदम चक्क होतें, किंवा धुराचा भपकारा वर निघून जाऊन अग्नीची ज्वाला प्रगट होते; त्याप्रमाणें वरील ठिकाणीं एकदम अर्थव्यक्ति झाली असतां मनास चमत्कार व आल्हाद होतो! तसेंच कांहीं थोड्या ठिकाणीं अर्थ खरोखरच दुर्बोध ही असेल. 'नवनीतां' तही अशीं कांहीं स्थलें आहेत; तीं आमच्या वाचकांपैकीं पुष्कळां-च्या लक्षांत असतीलच. पण हा दुर्बोधपणा वाचकांस मुद्दाम घोळांत पाड-ण्याकरितां कवीनें आणलेला असतो किंवा यमकादिरचनेमुळें झालेला असतो असें ह्मणवत नाहीं. कांकीं असला प्रकार वहुतेक कवींच्या ग्रंथांत, आणि त्यांतून ज्यांनीं ग्रंथरचना पुष्कळ केली त्यांच्यांत तर आढळायाचाच. प्रस्तुत कवीविषयीं असें ऐकण्यांत आहेकीं तो एका बैठकीस शंभर शंभर दीडशें दि-डशें आर्या रचीत असे, व त्याच्या हातच्या पंढरपूरच्या प्रती ज्यांनीं पाहिल्या आहेत ते सांगतात कीं त्यांत एकही अक्षर कोठें खोडलेलें आढळत नाहीं. यावरून स्पष्ट दिसतें कीं, कित्येक इंग्रेजी कवींचा जसा प्रघात असे, कीं आप-ली कृति जितकी उत्कृष्ट व जितकी निर्दोष करवतां येईल तितकी झाली व शेकडों वेळां तिजवरून नजर व लेखणी फिरली ह्मणजे मग ती बाहेर काढा-याची, तसा प्रकार मोरोपंताचा नसावा. तर शेक्सपीयर, ड्रायडन् इत्यादि कवींप्रमाणें जें एकदां पहिल्या तडाक्यास लिहून टाकलें तें टाकलें, त्यांत पुनः फार करून फेरफार व्हावयाचा नाहीं, ही त्याची तऱ्हा असावी. तर या कारणामुळें प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत कोठें कोठें दुर्बोध स्थलें राहिलीं असावीं असें वाटतें.* या खेरीज अपपाठ हेही स्थलविशेषीं अर्थभ्रम होण्यास

---

* रचनाचापल्याच्या योगानें होणाऱ्या दुर्बोधत्वाचें एक चमत्कारिक उदाहरण स्कॉट्-च्या 'लेडि आफ् दि लेक्' नामक काव्यांत आहे. याच्या पहिल्या सर्गांत एके ठिकाणीं वनश्रीच्या वर्णनांत पुढील दोन ओळी आढळतात:—

Fox-glove and night-shade, side by side,
Emblems of punishment and pride.

या ओळी कवीस स्वतःच्या स्वतःस कळेनात याविषयीं एके ठिकाणीं पुढील चम-त्कारिक लेख आढळतो:—

"Soon after the publication of the Lady of the Lake, and whilst his fame was at its highest, Scott received a visit from an old and valued friend. Their conversation naturally turned on the successful poem, and the friend,

कारणभूत होत असतील; कांकीं, इंग्लंडांत जसें आहे, व हल्लीं इकडेही चालू झालें आहे, कीं छापण्याच्या सोईमुळें ग्रंथकारानेंच खुद्द तयार केलेली प्रत वाचकांस मिळते,—तसा प्रकार अर्थांतच जुन्या महाराष्ट्र कवींस लागू नाहीं. तेव्हां लेखकपरंपरेच्या योगानें झालेल्या प्रमादांचें प्रायश्चित्त बिचाऱ्या कवींस भोगणें येतें ! *

---

**उत्कृष्ट उतारे**—( पुढील उतारा 'आदिपर्वा'तील आहे. धृतराष्ट्राचा मंत्री कणिक त्यास पांडवांचा युक्तीनें नाश करण्याविषयीं मसलत देत आहे; आणि 'इसापनीतीं' त † ज्याप्रमाणें मोठ्या राजकारणाच्या प्रसंगीं मोठमोठ्या

---

( मागील पृष्ठावरून चालू. )

delighted with the work as a whole, still declared that some lines were quite unintelligible to him. Picking up a copy of the book, he opened it at this passage, and pointed it out to Scott, saying, 'There, I have puzzled over those two verses for hours, and I can't see your meaning.' "Well," replied the poet, with his broad smile and accent, "it would have been a strange thing if you had seen my meaning, for I could never see it myself." This anecdote is related on the authority of the son of Scott's friendly critic."

---

* वरील गोष्टीचा प्रत्यय 'मंत्रमय भागवता' वरून आम्हांस आला. याची एक जुनी प्रत आम्हांस मिळाली होती. ती व पंढरपुरची प्रत यांत अनेक ठिकाणीं विलक्षण तऱ्हेचे फेर आढळले. वरील अस्सल प्रतीखेरीज पुष्कळ ठिकाणचा अर्थ कांहीं कळला नसता ! वरील रामायण हें हल्लीं 'काव्येतिहास संग्रहा' त छापत आहे.

† 'महाभारता' त 'इसापनीतीं' तल्या सारख्या पशुपक्ष्यांच्या पुष्कळ गोष्टी आहेत हें वरील पहिल्या आर्येतील उल्लेखावरून कळून येईलच. तसेंच नीतिबोधाचा हा प्रकार आमच्या देशांतही फार प्राचीन काळापासून आहे हेंही वरील गोष्टीवरून स्पष्ट दिसतें. त्यांतून विशेष चमत्काराची ही गोष्ट आहे कीं, इकडील व युरोपातील गोष्टी पुष्कळ अंगदीं बरोबर जमतात. 'हितोपदेश' व 'पंचतंत्र' यांतील कथांचें वरील ग्रीक ग्रंथतील कथांशीं पुष्कळ साम्य आढळतें हें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस सांगायास नकोच. **मोरोपंता**च्या 'भारता' तही एके प्रसंगीं वरील ग्रंथांतील एका कथेसच अनुलक्षून लिहिल्यासारखें दिसतें:—

धर्मासि ह्मणे धरिता झाला व्रत मूषकार्थ ओतू तें ।
स्वीकारिलें ह्मणुनियां आलें तत्साम्य देत ओ तूतें ॥

उद्योगपर्व १२

वरील उक्ति दुर्योधनानें धर्मराजाकडे पाठविलेल्या उलूकनामक दूताची आहे.

मुत्सद्यांनीं कल्पित गोष्टी सांगितल्या आहेत, त्याप्रमाणेंच प्रस्तुत प्रसंगीं कुटिल नीतीच्या उदाहरणार्थ वरील मंत्र्यानें पुढील गोष्ट सांगितली आहे. 'कर्णपर्वा'-त याप्रमाणेंच शल्यानें कर्णास हंसाची व कावळ्याची गोष्ट सांगितली आहे हें मराठी सहाव्या पुस्तकावरून पुष्कळांस माहीत असेलच. )

राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ असेंचि बोलिला कणिक ॥
तत्कथित जंबुककथा मात्र कथिन कौतुकें न मी अणिक ॥ १ ॥
कोठें व्याघ्रवृकनकुळ जंबुक मूषक सखे वनीं होते ॥
बहु जपले परि एका मृगकुलपतिला न पावले हो ते ॥२ ॥
जपति जसे पाडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विटे ॥
तेहि तसेचि परि करी विफळाचि तद्यत्न सर्व काळविट ॥३॥
चिंता करितां जंबुक त्यांस ह्मणे आचराल जरि सारे ॥
सांगेन सुयुक्ति तुह्मीं स्वेष्टफलप्रद मदुक्ति परिसा रे ॥ ४ ॥
या आखुनें करावा क्षतखुर जेव्हां असेल तो सुप्त ॥
व्याघ्रें मग मारावा मृगवर पर मंत्र हा करा गुप्त ॥५॥
करितां तसेंचि कोल्हा त्यांसि ह्मणे स्नान करुनि या खाया ॥
तोंवरि सावध बसतों येथें मी या मृगासि राखाया ॥६ ॥
तो स्वार्थपंडित असें सांगे तें जेंवि अंबु कमळाला ॥
त्यांच्या मना रुचे दे न दिसों कपटींद्र जंबुक मेळाला ॥७॥
न्हाउनि येउनि पाहुनि दीन पुसे व्याघ्र वद नवा घाला ॥
पडलासा कां दिससी सांगे तो म्लानवदन वाघाला ॥८॥
फेरु ह्मणे परिसावें वदला जें किमपि आखु खोटीं तें ॥
धिग् व्याघ्रातें माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें ॥९॥
व्याघ्र ह्मणे हें नलगे घालिन मृगयूथपीं नवा घाला ॥
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि पीन वाघाला ॥ १० ॥

---

१ वाघ, लांडगा, मुंगुस, कोल्हा, आणि उंदीर. २ हरिणांच्या कळपांतील पुढारी (काळवीट). ३ जार (दुष्ट लोक). ४ आपला इष्ट हेतु साधणारी. ५ उंदरानें. ६ कुरतुडले आहेत पाय ज्याचे. ७ निजलेला. ८ स्वार्थाविषयीं कुशल. ९ कपटाला. १० कोल्हा. ११ कपटी. १२ काळविटांवर. १३ पुष्ट (पुष्कळ).

गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडोनी ॥
तों आला आखु तया फेरु ह्मणे साध्य-भाव जोडोनी ॥११॥

वदला व्याघ्रामिष विष तुज खाऊं दे असोचि मुंगस खा ॥
ऐसें कसें ह्मणो मी लघु परि तूं मेरूहूनि तुंग सखा ॥१२॥

हें ऐकतांचि वंचक- वंचन शरण जाय तो बिळाला हो ॥
चित्तीं ह्मणे न मेलों हाचि महालाभ मज मिळाला हो ॥१३ ॥

वृक ही आला त्याला फेरु ह्मणे मज मृगासि रक्षाया ॥
ठेवुनि गेला व्याघ्र स्त्रीसह येणार सर्व भक्षाया ॥१४ ॥

वांच मरसि कां लोभें मांसाशा शीघ्र सांड गा जा गा ॥
हें ऐकतांचि निसटे झाला तत्काळ लांडगा जागा ॥ १५ ॥

मग मुंगसासहि ह्मणे आखु वृक व्याघ्रराय ही नकुळा ॥
त्यां जिंकोनि पळविलें तेथें तुज काय लाभ हीनकुळा ॥ १६ ॥

युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे कवळ खाया ॥
मी श्वापदवर आहें परि तुज नाहीं विवेक वळखाया ॥ १७ ॥

नकुळ ह्मणे आखु वृक व्याघ्र हि जिंकोनि पळविले जेणें ॥
तेणेंसीं न झगडणें येणेंचि भलें न या मृतें एणें ॥ १८ ॥

ऐसे मंत्रबळें वृक- नकुळव्याघ्राखु मोहुनी चवघे ॥
जंबुक निर्भय चित्तें मृगमांसाची वनीं सुखें चव घे ॥ १९ ॥

---

**विनोद, महदाख्यायिका**—( **नाटककार मंडळी** )–इंग्लंडांत एका खेडेगांवांत एका गांवठी नाटककार मंडळीचा खेळ होता. खेळाला एकंदर मंडळी सात आली होती ! असल्या वसुलाच्या मंडळींत पात्रें किती नामी असतील हें सांगायास नकोच. या पात्रांपैकीं एकाचा अभिनय फारच वाईट होत असल्यामुळें श्रोतेमंडळीचा धीर निघेना. त्यांनीं शिळा वाजवून व हुश्श करून त्यास पिटाळून देण्याचा उद्योग आरंभला. शेवटीं सूत्रधारानें आपले भरतपुत्र सारे रंगभूमिवर आणून त्यांजकडून तोच प्रकार करविला, आणि कचेरीची वचेरी करून सोडली !

---

१४ वाघाचें मास. १५ उंच. १६ कोल्ह्याचें बोलणें. १७ लांडगा. १८ घांस. १९ फसवून.

## तडजोड.

एका सावकारानें आपल्या कुळास कर्जाबद्दल तुरुंगांत अडकवून ठेवलें असतां एके दिवशीं त्याजकडून त्यास असा निरोप आला कीं, मी एक नवी तडजोड योजली आहे, तींत दोघांचेंही हित आहे. सावकार तें ऐकून मोठ्या आशेनें त्याच्याकडे आला. तेव्हां कर्जदार म्हणतो, " अहो, मी येथें उगीच रिकामा पडून राहिलों आहे, व तुह्मांस दररोज तीन आण्याच्या खर्चाखालीं आणतो, याचें मला फार वाईट वाटतें. असा क्रम चालू ठेवल्यापासून दोघांसही नफा नसून तुमच्या अंगावर विनाकारण अतिशय खर्च मात्र चढणार आहे ! तर मी असें म्हणतों कीं, तुम्ही मला खुला करून द्या, आणि दररोज तीन आणे देतां त्यांच्या जागीं मला दोनच आणे देत चला, आणि राहिलेल्या आण्यांतून आपला पैसा फेडून घ्या ! "

## दृग्भ्रम.

इंग्लंडांतील एका कोर्टांत एक रंगारी साक्षीस उभा राहिला असतां न्यायाधीशानें त्यास हात वर कर ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केलें असतां हात काळाकुट्ट पाहून न्यायाधीश ह्मणतो, " अरे, मोजा कशाला, तो काढून टाकून नुसता हात दाखव. " रंगारी उत्तर करतो, " महाराज, आपण नुसत्या डोळ्यांनीं पाहत आहां, त्यापेक्षां चष्मा लावाल तर बरें पडेल ! "

## कृतघ्नपणा.

एका दरवडेखोरानें ऐर्लंड देशाच्या दक्षिण प्रांतांत फार पुंडावा मांडला होता. शेवटीं त्यास धरून वधस्तंभाकडे चालविला असतां त्याच्या ओळखीचा एक सराफ त्यास ह्मणतो, " भलें झालें, तुझी ही गति केव्हां तरी होणार हें मी भाकीत केलेंच होतें." त्यास चोर उत्तर करितो, " अहो, आपणही मजवर फिरलां काय ? आपण विसरलां वाटतें, कीं आपल्या हातच्या नोटांस कोणी शिवत नसतां मी मात्र त्या खपवीत होतों ! "

## खूण पटणें.

एका बाईचे मुलगे दूर देशीं जाऊन फार दिवस राहिले होते. एके दिवशीं तिला एक पत्र डाकेंतून आलें, तें त्यांच्या पैकीं कोणाचे तरी असावें असें समजून तिनें तें मोठ्या उत्सुकतेनें आपल्या शेजाऱ्यापाशीं नेलें, आणि त्यास वाचायास सांगितलें. शेजाऱ्यानें वरील मुकाम व तारीख वाचून "माझे

आवडते आई " इतकीं अक्षरें वाचलीं आणि थांबला,---खालचीं अक्षरें त्यास लागेनात ! तें पाहतांच आई ह्मणते, " हां, हा आमचा त्राब्याच, तोच बोलतांना लागत असतो !"

## लढवय्या.

यरोपांत द्वंद्वयुद्धाची एक चमत्कारिक चाल आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. दोन बाणेदार गृहस्थ भांडाभांडीला येऊन अट्टीला पडले कीं त्यांचा वादनिर्णय मैदानावर पिस्तुलांच्या द्वारें व्हावयाचा ! एकदां याप्रमाणेंच दोन उमराव हातघाईवर येऊन नेमलेल्या ठिकाणीं चालले होते. तेथें जाऊन पोंचतात तोंच त्या वाटेनें एक प्रेतरथ रिकामा माघारी जातांना दोघांनीं पाहिला. तेव्हां एकजण त्या रथवाल्यास हाक मारून ह्मणतो, " अरे, अंमळ उभा राहाशील, तर तुला लवकरच भाडें लावून देईन. " दुसरे उमराव शेंदाड शिपाई होते. त्यांनीं वरील भाषण ऐकतांच अशी धास्ती घेतली, कीं लागलींच आपल्या वैऱ्याची माफी मागून तेथून पाय काढला, आणि धडपणीं घरीं येऊन पोंचले.

## चमत्कारिक चिकित्सा.

एका मनुष्यानें आपल्या चाकरास आपणास औषध देण्यास सांगितलें. चाकर मोठा हुशार माणूस होता. त्यानें भलतीच शिशी काढून आपल्या धन्यास औषधाच्या ऐवजीं शाई दिली. धन्याच्या तें कशानें लक्षांत येणार ? त्यानें चटकर औषध घेऊन टाकलें ;—पण तें कसेंसेंच लागलें ! पुढें कोणत्या शिशींतून औषध ओतलें ह्मणून शोध करतां शाईची बाटली उमगली. तेव्हां चाकर मोठा खजील झाला व माफी मागूं लागला. धनी जरासा थट्टेबाज होता ; चाकरानें वाईट तोंड केलेंसें पाहून त्यास ह्मणतो, " अरे, कांहीं मोठी फिकीर नाहीं ; थोडासा टिप्या कागदाचा तुकडा दे ह्मणजे झालें, तो गिळला कीं सारी शाई शोषून येईल !"

## सूक्ष्म भेद.

एक गृहस्थ भोकें पडलेलेच पायमोचे वापरीत असे. त्यास कोणीं एकदां विचारलें, " अहो, असे पायमोचे जे भिकाऱ्यासारखे तुह्मी घालतां त्यापेक्षां रफू कां करवून आणाना ? रफूला तें काय पडणार आहे ?" मोचेवाला उत्तर करतो, " तुह्मांला यांतली मख्खी कळली नाहीं. भोक तसेंच राहूं दिलें तर

कोणाला वाटेल कीं हें सहज कोठें धसका लागून पडलेलें आहे; पण रफू दृष्टीस पडला कीं लागलीच पाहणारास खास वाटणार आहे कीं हा कफल्लक आहे!"

### चतूर शहाणा.

ऑस्ट्रिया देशाची राजधानी व्हायना येथें एक इंग्रेजी सरदार येऊन त्याची व वरील देशच्या राणीची मुलाखत झाली. राणीनें त्यास विचारलें, "काय हो, इटालीच्या राजाची कन्या मोठी रूपवती आहे, तिच्या इतकी देखणी बायको दुनियेंत नसेल, असें ह्मणतात तें खरें काय?" उमरावानें मोठें खुबीचें उत्तर दिलें, "होय, काल मला तसें वाटलें खरें!"

### स्वभाववादी.

एक इंग्रेजी पाद्री व एक फ्रेंच गृहस्थ यांची एका खाणावळींत गांठ पडली असतां धर्मप्रकरणीं बोलणें निघालें. फ्रान्स देशांत नास्तिकवादाचा मोठा प्रचार आहे. वरील गृहस्थ सदरील मताचाच होता. यास्तव त्यानें आपल्या तर्फेच्या अनेक कोट्या पाद्रीबोवांवर ठेवून दिल्या. पाद्रीसाहेब त्या वेळेस कांहीं बोलले नाहींत. पुढें दोघेजण जेवायाला बसले असतां अनेक उत्कृष्ट उत्कृष्ट पदार्थ मेजावर येऊन पडले. पाद्रीसाहेब ह्मणतात, "काय हो, ही कढी फारच नामी झाली आहे!" स्वभाववादी उत्तर करतो, "खरेंच, फार शानदार झाली आहे." पाद्री विचारतो, "काय हो, सैंपाक्या ह्मणून कोणी असतो असें तुम्हाला वाटतें काय?"

### पोपचें महाकाव्य.

**पोप**नामक प्रख्यात इंग्रेजी कवीनें ग्रीस देशचा आद्यकवि **होमर** याच्या 'इलियड्' नामक महाकाव्याचें इंग्रेजींत भाषांतर केलें आहे हें यापूर्वीच्या प्रसंगोपात्त उल्लेखांवरून आमच्या वाचकांस माहीत असेलच. या भाषांतराच्या संबंधानें वरील कवीनें पुढील चमत्कारिक गोष्ट सांगितली आहे:—

"'इलियड्' चीं पहिलीं दोन तीन बुकें (सर्ग) तयार झाल्यावर लॉर्ड हालिफाक्स (त्या वेळचा एक उमराव) यांनीं मला अशी सूचना केली कीं, आपण केलेलें भाषांतर आमच्या येथें येऊन आपण वाचाल तर आमची ऐकण्याची इच्छा आहे. ही गोष्ट मान्य करून मी त्यांच्या घरीं गेलों. त्या वेळेस **आडिसन्, कॉन्ग्रीव्** आणि **गार्थ्** हे तेथें येऊन बसले होते. वाचतां

वाचतां चार पांच ठिकाणीं लॉर्ड साहेबांनीं मला मोठ्या अदबशीरपणानें हटकलें, आणि दरवेळेस फार करून पुढील शब्दच ते मला ह्मणत गेले, "पोपसाहेब, तुम्हांस हटकल्याबद्दल माफ करा; पण हें जें तुम्ही आतां वाचलें हें माझ्या मनांत चांगलेंसें भरत नाहीं; तर मेहेरबानी करून येथें खूण करून ठेवा, आणि पुन: यावर अमळ विचार करा. माझी खात्री आहे कीं या स्थलीं तुह्मांस आणखी बहार करतां येईल." वाचन झाल्यावर मी गार्थ्च्या गाडींत परत आलों. वाटेनें मी गार्थ्साहेबांस म्हटलें कीं, लॉर्ड हालिफाक्स् यांनीं मघांशीं ज्या मोघम सूचना केल्या त्यांविषयीं मी पुष्कळ विचार करीत आहें, पण माझ्या भाषांतरांत त्यांस काय गैर दिसलें तें मला बिलकुल कळत नाहीं; तेव्हां पुन: त्यांची माझी गांठ पडली असतां मोठी पंचाईत होणार आहे! माझ्या मित्रास माझ्या बोलण्याचें मोठें हसूं आलें. तो म्हणाला, "एकून तुम्ही मोठ्या फिकिरींत पडलां आहां! अहो, तुम्हांस लॉर्ड साहेबांची खुबी अजून माहीत झाली नाहीं. तुम्ही घरीं गेलां, म्हणजे दुसरें कांहीं करूं नका; मुकाट्यानें हा हस्तलिखित ग्रंथ टेबलांत ठेवून द्या. मग चांगले दोन तीन महिने जाऊं देऊन पुन: एकदां त्यांची भेट घ्या. त्यांस सांगा कीं, आपल्या सूचनांबद्दल मी आपला फार आभारी आहें, व पुष्कळ विचार करून तीं तीं स्थलें मी सुधारून नीट केलीं. असें सांगून तीं आज जशीं आहेत तशींच पुन: वाचून दाखवा;-कीं पहा साहेब लागलींच खूष होऊन जातील!" मग मी त्याप्रमाणें केलें असतां गार्थ्नें भाकीत केलें होतें त्याप्रमाणेंच झालें. पूर्वींचेंच भाषांतर एक शब्दही इकडचा इकडे न करतां जरी मी वाचलें तरी हालिफाक्स् साहेब अत्यंत संतुष्ट होऊन म्हणाले, "ठीक! आतां सर्व नीट आहे, भाषांतर म्हणावें तर याला!"

### सदाचरण आणि दुराचरण.

या दोहोंत किती फरक आहे पहा! पहिल्याच्या पायीं विपत्ति प्राप्त झाली असतांही चित्तास समाधान होत असतें; दुसऱ्याच्या योगानें सुखप्राप्ति झाली असतांही मनच आपलें आपणास खात असतें!

### वीरोक्ति.

कोणी सेनापति आपल्या शिपायांस म्हणाला, "मी पुढें घुसलों, कीं माझी पाठ सोडूं नका; मी मागें पाय काढूं लागलों, कीं मला ठार करून टाका;

मी पडलों कीं माझा सूड उगवा ! " कोणत्याही कामांत पुढारी असला तर अशा अटीचा असावा !

### वकिलोक्ति.

कोणी बारिस्टर आपल्या कुळाच्या तर्फेनें भांडत असतां इनसाफ करायास तीन न्यायाधीश बसले होते. या तिघांत एक मात्र कायद्यांत निपुण असून बाकीचे दोघे सरासरी खोगिरभरतीदाखल होते. बारिस्टराचें या तीन न्यायमूर्तींच्या पुढें कांहीं न चालून फैसला विरुद्ध पक्षासारखा झाला. तेव्हां तो आपल्या एका मित्रापाशीं म्हणाला, " अहो, न्यायासनावर शंभर न्यायमूर्ती बसल्या असतांना, आणि त्या साऱ्या माझ्याविरुद्ध असतांना, माझ्या तर्फेनें न्याय व्हावा कसा ? " मित्रानें पुसलें, " काय ? शंभर न्यायाधीश ! ! " बारिस्टर उत्तर करतो, " हो, शंभर तर काय ? एकाचा आंकडा आणि वर दोन पूज्यें ! *"

### फ्रेंच सुभाषित.

**फॉन्टेनेल्** म्हणून एक मोठा नामांकित फ्रेंच पंडित होता. त्यास राजदरबारांत एका स्त्रियेनें विचारलें, " घड्याळांत आणि बायकोंत अंतर काय ? " वरील पंडितानें उत्तर केलें, " घड्याळाकडे पाहिलें ह्मणजे वेळ समजतें, आणि स्त्रीकडे पाहिलें ह्मणजे कालाचें भान नाहींसें होतें ! "

### नैवेद्य समर्पण.

**बेंजामिन् फ्रांक्लिन्** हा कोण होता हें बहुधा आमच्या वाचकांपैकीं थोड्यांसच सांगावें लागेल. अमेरिकेंतील लोकसत्तात्मक राज्याच्या मुख्यस्तंभांपैकीं हा एक होता. प्रख्यात सेनापति व पहिला प्रेसिडेंट **वॉशिंग्टन्** याच्या खालची पायरी **फ्रांक्लिन्**ची. यानें फ्रान्स देशास जाऊन आपल्या राष्ट्राच्या तर्फेनें राजदरबारीं वकिली केली, आणि फ्रेंच लोकांची कुमक मागून घेतली. विद्युद्वाहक यंत्राची कल्पना ही याच कल्पक पुरुषानें काढली. याचें चरित्र एकंदरींत मोठें चित्तवेधक आहे.

---

* संस्कृतांत एक सुभाषित असें आहे:—

मुख्यमेकं पुरस्कृत्य शून्यात्मानोऽपि साधकाः ।
भवंति तं विना नैव यथा संख्यांकबिंदवः ॥

अंक २५ पृष्ठ १६ पहा.

फ्रांक्लिन्चा बाप मोठा धार्मिक होता. आमच्या जुन्या लोकांप्रमाणें सर्व धर्मसंबंधी विधि यथासांग करण्याविषयीं तो तत्पर असे. फ्रांक्लिन् हा लहानपणीं हूडच होता, व पूर्ववयांत त्याची ख्रिस्ती धर्मावरील श्रद्धा ही उडाली होती. एके समयीं घरांतील तळघरांत दारूचा नवा पुरवठा त्याचा बाप करून ठेवीत असतां मुलगा जवळ उभा होता. सगळी मंडळी मेजाभोंवतीं बसली असतां प्रभूची प्रार्थना व अन्नसमर्पणविधि यांत दररोज किती वेळ जातो हें ध्यानांत आणून मुलगा बापास विचारतो, "बाबा, दररोज जो जेवणाच्या वेळेस विसुपर्णविधि करायाचा तो आतां सगळ्या पुरवठ्याचाच एकदम करून ठेवला तर पुष्कळ वेळ वांचणार नाहीं काय ?"

### फजिती.

इंग्लंडांत 'डूरी लेन् थियेटर' या नांवाचें एक मोठें विख्यात नाटकगृह आहे. ग्यारिक्चा सर्वोत्कृष्ट अभिनय यांतच होत असे. यांत एकदां असें झालें कीं, दोघे नवा स्नेह जडलेले गृहस्थ येऊन खुर्चीवर बसले. त्यांच्या मागून दोन स्त्रिया आल्या. त्यांपैकीं एकीकडे पाहून वरच्यांपैकीं एकजण दुसऱ्यास विचारतो, "कोणहो ती सटवी हातांत पंखा घेतलेली ?" दुसरा गृहस्थ उत्तर करतो, "ती माझी बहीण !" हें ऐकून पहिला गृहस्थ भारी वरमला; पण आपल्या स्नेह्याच्या लक्षांत आपली फजिती येऊं नये ह्मणून सांवरून घेऊन त्यास ह्मणतो "छे हो ! ती नव्हे. ती दुसरी तिच्या शेजारी थेरडी आहे ती !" "ती माझी आई !" ही दुसरी ही गोळी चुकल्यावर मग वरील गृहस्थाची काय स्थिति झाली असेल ती वाचकांनींच पहावी !

### चौकस लोक.

कित्येक लोकांस नसत्या चौकशा करण्याची भारी उठाठेव असते. ते चार चौघांत गेले असतां उगे कधीं राहायाचे नाहींत. हें कसें आहे, तें कसें आहे, याप्रमाणें त्यांचे प्रश्नावर प्रश्न चालायाचे ! असले पृच्छक संभाषणास फार उपयोगी ; ते नसराळ्यासारखे होत. नसराळ्याचें काम जसें येवढेंच, कीं जें एका पात्रांत असेल तें दुसऱ्या पात्रांत नेऊन पोंचवायाचें, स्वतःला ह्मणून संस्कार बिलकुल नाहीं, तशीच वरील मंडळी होय !

### विजयचिन्हें.

फ्रान्स देशांत राज्यक्रांति होऊन भोंवतालचीं राष्ट्रें त्याजवर उठलीं असतां

नेपोलियन बोनापार्ट यास एका टोळीचा नाईक* नेमला होता. एके समयीं एक शिपाई त्याजकडे येऊन त्यास सांगूं लागला कीं, माझ्या आंगरख्याच्या अगदीं चिंध्या झाल्या आहेत, तर मला नवा देण्याविषयीं हुकूम व्हावा. नवीन स्थापन झालेल्या प्रजासत्ताक राज्यास खर्चाची केवढी ओढगस्त आहे हें नेपोलियन यास माहीत होतें, व एकाचा अर्ज ऐकला असतां सगळयांची झड पडेल हेंही त्यास पक्कें ठाऊक होतें. यास्तव त्यानें वरील अर्जदाराची कुरकुर मिटविण्यास पुढील युक्ति केली ;—त्यास आश्चर्ययुक्त मुद्रेनें ह्मणाला, "काय ! नवा आंगरखा ! अरे पण नवा आंगरखा घातला असतां हरएक प्रसंगीं छाती भिडावून जे वार तूं आपल्या अंगावर घेतले आहेत ते दिसेनातसे होतीलना ! " आपल्या नाईकानें केलेली येवढी तारीफ ऐकून शिपाई खूष झाला आणि तसाच चालता झाला.

## नांगऱ्या.

ऑक्सफर्ड युनिवर्सिटींतील दोघा महापंडितांचा वाद चालला असतां एक नांगऱ्या तेथें येऊन बसला. हा बोलून चालून नांगऱ्याच ; यास वरील वाद्यांचा विषयही माहीत नव्हता व भाषा ल्याटिन असल्यामुळें तीही समजत नव्हती. असें असतांही तो त्यांचा वादविवाद मोठ्या उत्सुकतेनें व मोठें लक्ष लावून ऐकत होता. तें पाहून वरील विद्यालयांतील एक विद्यार्थी वरील श्रोत्यास विचारतो, " अरे, तुला यांत मौज ती काय वाटते आहे ? कोणीं वाद जिंकला हे तुला काय कळणार ? " गांवठी मनुष्य उत्तर करतो, " दादा, मजपाशीं एक युक्ति आहे, तिच्या योगानें कोणाची सरशी झाली हें मला तेव्हांच उमागतें. मला ठाऊक आहे कीं, जो पहिल्यानें रागावतो त्याची बाजू घसरली ह्मणून समजावें ! "

## मद्यपी नवरा.

एक गृहस्थ दारू झोकून व आपल्या मेळ्यांत. चैन उडवून फार रात्र करून घरीं आले. बायकोनें दार उघडून त्यांस आंत घेतलें, आणि चरफडत म्हणाली, " झाली कां घरची आठवण ? तीन तीन वाजेतों बाहेर राहावें, कांहीं जिवाला वाटतें कां ! " नवरा उत्तर करतो, " अगे, तूं काय मला सांगतेस ? तीन वाजले कां,—आतां सारा एक वाजला ! तूं एकदांच घड्या-

* अंक ६–पृष्ठ १८ टीप पहा.

ळ ऐकिलें असशील, पण मी एकाचा ठोका तीनदां ऐकला, समजलीस ! ! ”

## दुर्बिणीचें सामर्थ्य.

एकजण आपल्या मित्रास दुर्बिणींतून किती लांबलांबचे पदार्थ किती जवळ दिसतात ह्मणून मोठ्या आश्चर्यानें सांगत होता ;—म्हणाला, “ परवां आम्हीं आपली दुर्बीण समोरच्या डोंगरावर धरली होती, तर काय सांगूं ! डोंगरावरची झाडें व झाडांवर बसलेलीं पाखरेंही कशीं लख्ख दिसत होतीं ! ” दुसरा त्यास उत्तर करतो, “ अंः, यांत येवढें विलक्षण तें काय आहे ? मी एके दिवशीं आपली दुर्बीण एका देवळावर लावली होती ;—तर काय सांगूं ! आंतली सारी मंडळी गीतें गात होतीं तीं मला सर्व स्पष्ट ऐकूं येत होतीं ! ”

## अज्ञानगोपन.

एका शेतकऱ्याकडे त्याच्या एका स्नेह्याकडून एक चिट्ठी आली. या स्नेह्याचीं मुलें जवळच्या गांवास कोठेंशी जावयाचीं होतीं, यास्तव त्यानें चिट्ठींत असें लिहिलें होतें कीं, आपला गाढव चार दिवस आह्मांस पाहिजे आहे तर तो गड्याबरोबर पाठवून द्यावा. पाटीलबोवांस लिहिण्या वाचण्याच्या नांवानें आनंदच होता ; पण मंडळी जवळ होती त्यांस आपली गोम उमगूं नये यास्तव उगीच चिट्ठी वाचल्यासारखी करून त्यांनीं चाकरास जबाब दिला कीं, “ जा, जाऊन आपल्या धन्यास सांग कीं, मीच जातीनें घटकाभरानें तुमच्याकडे येणार आहें ! ”

## चालतें चित्र.

एक गृहस्थ मोठा भाविक क्याथलिक होता. त्यानें एका प्रख्यात चिताऱ्याकडे जाऊन त्यास सांगितलें कीं एक वनाचा देखावा काढून त्यांत एक पर्वताची गुहा आहे आणि आंत जेरोम साधु बसला आहे, असें चित्र मला तयार करून दे. चिताऱ्यानें ती कामगिरी पतकरून वनप्रदेश, पर्वताची गुहा, व तींत जेरोम बसलेला, अशी तजबीर तयार केली. ती वरील गृहस्थानें पाहिली, पण त्याच्या मनास येईना. तो ह्मणाला, “ वनप्रदेश व गुहा हीं दोन्ही ठीक आलीं आहेत, पण जेरोम साधु गुहेंत असावा ह्मणून मी सांगितलें होतें तसें या तजबिरींत नसून तो तिच्या तोंडाशीं उभा आहे असें येथें दाखविलें आहे, तें बरोबर नाहीं. ” चिताऱ्यास ‘ पर्स्पेक्टिव् ’ चें ह्मणजे यथा-

दर्शन चित्र कसें काढावें या विद्येचें चांगलें ज्ञान होतें; यास्तव त्यानें गुहेला आणखी थोडीशी छाया देऊन वरील साधु गुहेच्या आंत उभा आहे असें दाखविलें. पण त्याच्या ग्राहकास तेंही पसंत पडेना. यथादर्शन चित्रलेखनाची त्यास मुळींच कल्पना नसल्यामुळें त्यास वाटे कीं, हा साधु मला दिसतो आहे मग तो गुहेंत कसा असेल! यास्तव त्यानें पुन: पहिल्याप्रमाणेंच चिताऱ्यापाशीं तकरार केली. चिताऱ्यानें लागलींच जेरोमबोवांचें चित्रच मुळीं तजविरींतून काढून टाकलें, आणि तजवीर मालकाच्या हवालीं केली. ती यावेळेस मात्र त्याचे मनांत अगदीं भरली. मग पुढें आपल्या इष्टमित्रांस वरील गृहस्थ ती तजवीर जेव्हां दाखवी, तेव्हां ते त्यास विचारीत कीं, साधुमहाराज कोठें आहेत? तसवीरवाला उत्तर करी, "अहो, जेरोमबोवांस मी गुहेच्या दाराशीं उभे असतांना पाहिलें व आंत जातांनाही पाहिलें; तेव्हां आतां ते आंत जाऊन बसले आहेत याविषयीं मला मुळींच संशय नाहीं!"

---

## पत्रें.

**निबंधमालाकर्ते यांस:—**

वि० वि० आपल्या ह्या महाराष्ट्र देशांत जे अत्यंत विख्यात साधु व भगवद्भक्त होऊन गेले त्यांत अत्यंत प्रसिद्ध जे तुकारामबावा त्यांची श्रेष्ठत्वेंकरून गणना आहे. तुकाराम व इतर साधु यांजविषयीं पुष्कळ दंतकथा आपले लोकांत प्रसिद्ध आहेत. महिपतीकृत 'भक्तिविजय' नांवाच्या ग्रंथांत तर नामदेव, तुकाराम आदिकरून पुष्कळ साधूंविषयीं चमत्कारिक व अत्यंत मनोरंजक गोष्टी लिहिल्या आहेत. प्रस्तुत पाठविलेला मजकूरही चमत्कारिक आहे. तो एका वृद्ध अशिक्षित गृहस्थाच्या तोंडून ऐकला, तसाच लिहून पाठविला आहे. सदरहू अभंग या गृहस्थास मुखपाठ होता; तो कित्येक ठिकाणीं बरोबर समजत नाहीं.

एके वेळीं रंगनाथस्वामी काशीस भागीरथीस्नानार्थ गेले. त्यावेळीं गंगा प्रत्यक्ष मूर्तिमंत स्वामीपुढें आविर्भूत होऊन म्हणाली, "महाराज! आज माझी धन्यता आहे! कारण आपल्या सारख्या भगवद्भक्ताचें दर्शन झालें!" रंग-

मूर्ति म्हणाली, " मी काय मनुष्यप्राणी ! पामर ! मला कशास एवढी थोरवी ! " त्यावर सुरापगा म्हणाली, " भगीरथानें मला आणल्या दिवसापासून मजमध्यें सर्व लोकांचा मल (पातक) येत आहे ; व यामुळें माझी मोठी कठीण अवस्था झाली आहे. जर एखादा महान वैष्णव मजमध्यें स्नान करील तर मी पवित्र होईन ! पण असा महान वैष्णव प्रल्हाद, नारदासारखा पाहिजे. तो प्रस्तुत कलियुगांत तुकाराम वाणी आहे. तो जर मजवर कृपा करील तर माझे भाग्यास पारावार नाहीं. पण तुकाराम इकडे येतो कसा ! त्याची एकविधा भक्ति मोठी कडकडीत असल्यामुळें तो पंढरीशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहीं. त्यास तुम्ही कृपा करून माझें विनंतीपत्र त्याजला घेऊन जाल तर मजवर उपकार होईल." रंगनाथस्वामींनीं 'होय' म्हणून सांगितल्यावर भागीरथीनें पुढील मजकुराचें पत्र तुकारामास देण्यासाठीं दिलें तें:—

चारी वेद जहाले तेथूनी निर्माण । तो हा नारायण बाप माझा ॥
मुख ते ब्राम्हण बाहु तेराजन्य । ऊरूजन्म जाण वर्ण वैश्य ॥
चरणींचा वास आहे त्या शूद्रासी । तेथें जळराशी भागीरथी ॥
मजमाजी प्राणी पवित्र जे होती । ते मळ लागती माझे आंगा ॥
माझे रे अंगीचा मळ काढी कोण । एका तुजवांचून विष्णुदासा ॥
आजीचा दिवस धन्य मज झाला । सद्गुरू भेटला पत्रासवें ॥
ऐका रंगमूर्ति सांगावें निरोपा । नमस्कार बापा तुकोबाशी ॥ १ ॥

रंगनाथस्वामींनीं हा भागीरथीचा निरोप तुकारामबोवास पोंचविला ; आणि स्वामी तुकारामास म्हणाले ' काशीस चलत असल्यास चलावें, ' त्यावर तुकारामानीं उत्तर केलें, " मला पाप्याला भागीरथी कशी होईल ! माझाही उलट निरोप घेऊन जावा. " तो येणेंप्रमाणें:—

परिसी जे माते ! माझी विनवणी । सकळ स्वामिणी तिर्थांचिये ॥
भागिरथी महादोष निवारिणी । मस्तक चरणीं तुझीये माझा ॥
जिता भुक्ती मेल्या मुक्ति तुझे तिरीं । ऐशी आहे थोरी तुझी माते ॥
तुका विष्णुदास संताचा पोसणा । वाक्पुष्प तेणें पाठविलें ॥

पुढील अभंगांत प्रल्हाद, उद्धव, नामदेव मीच होतों असें तुकाराम म्हणतात असें लिहिलें आहेः—

कृतयुगीं माजी होतों मी प्रल्हाद । जाहलों त्रेतायुगीं अंगद ॥
द्वापारयुगामाजी होतों मी उद्धव । म्हणून माधव संतोषला ॥
कलियुगामाझी रूपें जहालीं दोन । नामें शतकोटी उच्चाराया ॥
तेथें जरी झाला होता एक पण । नामया ह्मणून अवतरलों ॥
करवां करवितां उरली हो बाकी । तीही सुखें आली तुका ह्मणे ॥

चमत्कारिक सुभाषित पद्यें आढळलीं तीं पाठविलीं आहेतः—

(१) अम्बा कुप्यति न मया न स्नुषया सापि नाम्बया न मया ।
अहमपि न तया न जायया वद राजन्ऽकस्य दोषोऽयम् ॥ १

कोणी कवि श्लोकद्वारें चमत्कारिक अर्थानें राजास आपलें दारिद्र्य निवेदन करतोः—

" माझी आई रागावते; पण मजकडून किंवा सुनेकडून कांहीं अवज्ञेस्तव नव्हे; ती ( सून ) ही रागावते, पण माझी आई किंवा मी त्यास कारण नाहीं; मीहि रागावतों, पण माझी आई किंवा माझी स्त्री इच्यामुळें नव्हे ! तर हे राजा हा दोष कोणाचा तें सांग बरें ? "

(२) अनेके फणिनः सन्ति भेकभक्षणतत्पराः ॥
एक एवहि शेषोऽयं धरणीधरणक्षमः ॥

" बेडकांचा फडशा उडविणारे पुष्कळ सर्प आहेत. परंतु पृथ्वीचा भार वाहण्याविषयीं एक शेषच मात्र समर्थ !" ही अन्योक्ति असून सहज समजणारी आहे.

(३) संग्रामेषु भटेन्द्राणां कवीनां कविमण्डले ।
दीप्तिर्वा दीप्तिहानिर्वा मुहूर्तेनैव जायते ॥

" संग्रामांच्या ठायीं शूरांचा, आणि पंडितांचे सभेंत पंडितांचा उत्कर्ष किंवा अपकर्ष क्षणांत होतो. "

कालिदासाची व भोजराजाची प्रथमतः भेट झाली त्यावेळीं कालिदास भोजाची प्रशंसा करतातः—

महाराज श्रीमन् जगति यशसा ते धवलिते
पयःपारावारं परमपुरुषोऽयं मृगयते ।
कपर्दी कैलासं करिवरमभौमं कुलिशभृत्
कलानाथं राहुः कमलभवनो हंसमधुना ॥

भोजप्रबंध.

" हे महाराज ! हे श्रीमन् ! आपल्या कीर्तीच्या योगानें हें जगत् शुभ्र झालें असतांना सांप्रत भगवान् विष्णु आपला क्षीरसमुद्र शोधूं लागला, महादेव कैलासास, वज्रधारी इंद्र दिव्य ऐरावतीस, राहू चंद्रास आणि कमलस्थ ब्रह्मदेव हंसास याप्रमाणें शोधूं लागले आहेत ! "

शुद्धाशुद्ध पाहून छापण्याची मेहरबानी व्हावी.

मुक्काम वाई.
ता० १० जून १८७९

आपला
केशव बा० कानिटकर.
कठापूरकर.

---

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—**

वि० वि० आपल्या 'माले' च्या ५३ व्या अंकांत " शकावली " नामक पुस्तकाविषयीं अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. अशा तऱ्हेच्या पुस्तकांचे आवश्यकतेविषयीं कांहीं मजकूर लिहून आमच्या नवीन मंडळीनें आपलें काम योग्य रीतीनें बजवावें आणि **मिल्टन्, कालिदास, शंकराचार्य** यांच्या उदाहरणांवरून सद्बोधाचें ग्रहण करावें असें सुचविलें आहे. या स्थळीं "**मोरोपंतानें** जात्यावर ह्मणण्याकरितां ओवी रामायण रचलें " असा आपला उल्लेख आहे. " ओवी रामायण " वाचून पाहिले असतां तें जात्यावर ह्मणतां येणार नाहीं असें दिसतें. " ओवी रामायणांत " ओवी व आर्या या दोन्हीं

छंदांची एकाच पद्यांत योजना केली आहे. या रामायणाच्या आरंभीं पंतांनीं पुढील उल्लेख केला आहे:—

आर्या ओवींत दिसे ओवी आर्येत पाहतां नीट।

बायकांना जात्यावर अथवा झोपाळ्यावर बसून म्हणतां यावें म्हणून पंतांनीं "सीता गीत" आणि "रुक्मिणीहरण गीत" हीं दोन लहान काव्यें तयार केलीं असें ऐकून माहित आहे. हीं लहान काव्यें माजी 'सर्वसंग्रहांत' छापून प्रसिद्ध झालीं आहेत. (सर्वसंग्रह पृ० ६००।५९५ पहा) वृद्ध मनुष्यांचें तोंडून असें ऐकिलें आहे कीं, हीं काव्यें **मोरोपंतानें** आपल्या मुलीकरितां रचिलीं. या काव्याची रचना पुढील उताऱ्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईल:—

"बाई काय सांगो, स्वामीची ती दृष्टी, अमृताची वृष्टी, मज होय"

"अत्रीच्या आश्रमी, नेलें मज वाटे, माहेरची वाटे खरें खरें"

**मोरोपंताविषयीं** कांहींशी नवीन माहिती ऐकण्यांत आली आहे ती येथें दाखल केली असतां अनुचित होईल असें वाटत नाहीं. **मोरोपंतांनीं** "सन्माणिमालें" त अनेक साधूंचीं वर्णनें केलीं आहेत. त्याशिवाय **तुळसीदास, नामदेव, रामदास, तुकाराम, एकनाथ** इत्यादिकांचीं स्वतंत्र वर्णनेंहीं केलीं आहेत. यांतून कांहीं छापून प्रसिद्ध झालीं आहेत व कांहीं अप्रसिद्ध आहेत. **मोरोपंतानीं "बृहत्सन्मणिमाला"** या नांवाचा एक विस्तृतवर्णनपर ग्रंथ केला असून तो ग्रंथ त्यांच्या वंशजांकडे पंढरपुरीं आहे व तो येथील एका गृहस्थानें स्वतः पाहिलाही आहे. आतां असा ग्रंथ मिळवून प्रसिद्धीस आणण्याच्या कामीं पंतांच्या भक्तांनीं यत्न केला असतां अपूर्व लाभ होणार आहे. तर या सूचनेकडे त्यांचें लक्ष लागावें असें इच्छितों.

नागपुर, ता० २९।३।७९ } आपला

वा० दा० ओ०

# निबंधमाला.

## अंक ५८.

### मोरोपंताची कविता.

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ।*

१. गेल्या अंकांत मोरोपंताच्या संबंधानें जे कित्येक विलक्षण समज लोकांत आहेत त्यांविषयीं बहुतेक विचार झाला. आतां त्यांतील एक मात्र कलम राहिलें आहे. हें कलम कोणतें तर प्रस्तुत कवीचें श्लेषप्रियत्व, म्हणजे त्याच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात, हें होय.

२. लोकांची सामान्यतः प्रवृत्ति अशी आढळते कीं, जो समज एकदां होऊन बसला तो 'पीछेसी आई' या न्यायानें केवळ अंधपरंपरेनें पुढें चालवायाचा. एकंदर राष्ट्राच्या मानानें कोणत्याही देशांत पाहतां विद्वज्जनांची संख्या थोडीच असल्यामुळें, आणि त्यांतून रायचंदाच्या टिपेवर निर्वाह न करतां आपणाजवळ आपला खाजगी कांटा बाळगून सत्यासत्य तोलणारी मंडळी तर वरच्याहूनही फारच थोडी असल्यामुळें, वरचा गतानुगतिकत्वाचा प्रकार सर्वत्र आढळण्यांत येतो. आमच्या देशांत वेदांविषयीं काय समजूत आहे ती कोणासही सांगावयास नकोच;—कीं त्यांचा अर्थ केवळ अगम्य आहे. जसा नीलनदीच्या उगमांचा शोध अद्याप लागला नाहीं, व तो लागण्याचा उद्योगही 'नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ' या वचनाप्रमाणें निषिद्ध होय; त्याप्रमाणेंच अनादि जी श्रुति तिचा अभिप्राय परम दुराप असून त्याविषयीं परिश्रम करणेंही व्यर्थ व साहसात्मकच होय! पण हा समज कितपत खरा आहे याविषयीं अलीकडे कोणासही संशय उरण्यास जागा राहिली नाहीं. आमचे रेणानदीकांठचे पाश्चात्त्य आर्यबंधु तर रूपावळी झाली कीं प्रथमतः 'अग्निमीळे' वर धडाका उडवतात! आणि एकंदरींत

---

* "जग हें गतानुगतिक आहे, म्हणजे जिकडे एक गेला तिकडे दुसऱ्यांनीं डोळे मिटून जावयाचें; परमार्थ म्हणजे वास्तविक गोष्ट काय आहे तिच्याविषयीं कोणी शोध करीत नाहीं."

पाहतां ऋग्वेदाचा अर्थ कोणासही होत नाहीं हें म्हणणें 'रामायण' किंवा 'राजा शिवाजी' हीं काव्यें कोणासही कळत नाहींत असें ह्मणण्याप्रमाणेंच अत्यंत असमंजस होय. पण लोकांच्या मनाचा असा एक चमत्कारिक स्वभाव आहे,—तो येथेंच नव्हे, तर चोहोंकडेही असाच आढळतो—कीं जें दृश्य व परिचित त्यापेक्षां जें अदृश्य व अपरिचित त्यास अधिक मान!* तेव्हां या स्वभावास अनुसरूनच जो वेद येवढा परमपूज्य त्याचा अर्थ येवढा उत्तान† असेल हें लोकांच्या मनाच्यानें घेववत नाहीं. असो; दुसरें उदाहरण मूर्तिपूजेचें घ्या. हा मार्ग वेदविहित आहे किंवा नाहीं, खऱ्या 'जिवंत' देवास मूर्तीची चीड येते किंवा नाहीं, वगैरे विचार एकीकडे ठेवले असतां

---

* वरील प्रमेयाचें पुढील दोन सुभाषितांत दृष्टांतसहित निरूपण केलें आहे:—

अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते ॥

अति परिचय खोटा मान राहात नाहीं
प्रगट दिसत भानू तो जगीं तुच्छ पाहीं ।
लघु शशि द्वितियेचा वंदिती सर्व भावें
म्हणवुनि सखया रे दूर देशीं रहावें ॥

† वेदाचा अर्थ सुगम आहे, व युरोपियन लोक प्रथमतःच ऋग्वेद हातीं धरतात, या दोन्ही गोष्टी पुष्कळ वाचकांस कदाचित् विलक्षण वाटतील. पण वेदाचें दुर्बोधत्व त्यास कशामुळें प्राप्त झालें आहे हें समजलें असतां वरील विस्मय नाहींसा होईल. 'ज्ञानेश्वरी' च्या दुर्बोधतेचें जें कारण तेंच वेदाच्या दुर्बोधतेचें होय. 'ज्ञानेश्वरी' ची भाषा जुनाट असल्यामुळें अर्वाचीन महाराष्ट्र भाषा जाणणारांस वरील ग्रंथ जसा अवघड लागतो, त्याप्रमाणेंच पंच महाकाव्यांशींच ज्याचा परिचय त्यास ऋग्वेदाची भाषा ही अत्यंत अपरिचित वाटते. हल्लींच्या इंग्रेजी भाषेंत व चॉसर कवीच्या भाषेंत तसाच फ़रक आढळतो. शिवाय 'सप्तसिंधू' च्या तीरीं यज्ञयाग करणाऱ्या प्राचीन आर्यांच्या काळांत व हल्लींच्या मनूंत जमीन अस्मानचें अंतर असल्यामुळें पूर्वींच्या पद्धति आतां बिलकुल कळेनाशा झाल्या आहेत हें ही वरील दुर्बोधतेचें एक दुसरें मोठें कारण होय. तरी ज्या अर्थीं पारशी लोकांच्या प्रमाणें आमचे जुने ग्रंथ नाहींसे झाले नाहींत, व प्राचीन आर्यांचे वंशज आम्ही या देशांतल्या देशांत अद्याप असून पूर्वींची परंपराही अद्याप केवळ विच्छिन्न झालेली नाहीं, त्या अर्थीं 'जेंदावेस्ता' ग्रंथाप्रमाणें आमच्या वेदांस निवळ दुर्बोधत्व आलें नाहीं! त्यांची रचना साधी असल्यामुळें व विषयही सुगम असल्यामुळें आणि त्यांतून भाष्यादि साधनें अनुकूल असल्यामुळें, अर्थाची फोड होण्यास मोठेसे प्रयास आहेत असें नाहीं.

केवळ इतिहासज्ञानावरून कोणासही कळणार आहे कीं, मांजरांस व सुसरींस भजणाऱ्या लोकांनीं पर्वतप्राय मनोरे बांधले, जुपिटराच्या एका भक्तांनीं साऱ्या पृथ्वीभर आपलीं गरुडांकित निशाणें फडफडावलीं व दुसऱ्यांनीं सर्व विद्यांचें व कलांचें सार्वभौमत्व संपादन केलें, मारया देवीच्या भजकांतच अत्युत्कृष्ट मूर्तिकार चित्रकार व मंदिरकार जन्मले आहेत, खुद्द आमच्या देशांतच पाहिलें असतां गाईच्या भजकांनीं साऱ्या आर्यभूमीचें अधिपत्य संपादन केलेलें आहे, व तुळशीच्या पायां पडणाऱ्या बायांनींही वेळोवेळां राज्याचें सुकाणूं हातीं धरलेलें आहे, किंबहुना रणमंडळांत गर्जनाही केली आहे ! तसेंच एकंदरींत पाहतां आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास आलीं त्यांतील बहुतेक मूर्तिपूजकच होतीं, व आज जगांत जी सुधारणा दृष्टीस पडते आहे तीही फार करून वरील लोकांपासूनच आलेली आहे. पण हें सर्व सर्वांच्या येवढें डोळ्यांसमोर ढळढळीत असतां पाद्रींचें व्याख्यान किंवा सामाजिकांची युक्ती ऐकली असतां त्यांत मतलब काय आढळतो,—कीं मूर्तिपूजेसारखा घोर पापमार्ग दुसरा कोणता नाहीं ; जेथें मूर्तिपूजा आहे तेथें विद्या नाहीं, कला नाहीं, नीति नाहीं, शौर्य नाहीं, दया नाहीं,—कांहीं नाहीं ! चोरी, चाहाडी, शिंदळकी, मारामाऱ्या, खून, रक्तपात, या अनर्थपरंपरेची मात्र रगाडी ! मूर्तिपूजा असली कीं तेथें सुखाचें वारें सुद्धां लागायाचें नाहीं, व विद्येची वार्ताही ऐकूं यावयाची नाहीं ! या सर्व उद्गारांचें मूळ पाहूं जातां यहुदी, ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत उपदेशिलेला जो मूर्तींचा द्वेष तो आज हजारों वर्षें अनेक राष्ट्रांच्या मनांत बिंबून जाऊन 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानें पितृपुत्रपरंपरेनें पुढें चालत गेला हें होय. आमच्या देशांतही मिशनरींनीं मूर्तिपूजेच्या नांवानें शतशः आरोळ्या मारल्या असल्यामुळें तेंच तुणतुणें पुढें ब्रह्मोंनीं, सामाजिकांनीं, दयानंदभक्तांनीं व शेवटीं सत्यशोधकांनींही चालविलेलें आढळतें ! *

३. तर प्रस्तुत कवीच्या काव्याच्या अनेकार्थत्वाविषयीं आज सुमारें शंभर वर्षें लोकांत जी बोलवा आहे ती वरील कलमांतील दोन सिद्धांतांप्रमाणें निवळ बाजारगप्प आहे. तिला आधार ह्मणून बिलकुल नाहीं. **मोरोपंताचे** ग्रंथ उगीच चाळून जो पाहील त्यास सुद्धां कळून येईल कीं वरील गोष्टीस

* परवां जो आगीचा भयंकर कहर उसळला त्याच्या संबंधानें एक पत्रिका या शहरांत दुसरे दिवशीं वांटली गेली. ती आमच्या वांचकांपैकीं फारच थोड्यांच्या पाहण्यांत आली असेल यास्तव तिचें पूर्वार्द्ध येथें उतरून घेतों—

शेंडा ना बुडखा ! आतां इतके दिवस चालत आलेल्या प्रवादाविषयीं व राव-बहादुरांसारख्यांच्या अभिप्रायाविषयीं येवढें निक्षून जें आह्मी मत प्रगट करतों तें कशावरून हें सांगणें अवश्य आहे.

४. एक तर ही गोष्ट प्रथमतः लक्षांत आणली पाहिजे कीं, मोरोपंत हा

---

( मागलि पृष्ठावरून पुढें चालू. )

" सूचना—ता० १३ व १४ मे १८७९ दिवशीं पुणें शहरात जो अग्निप्रळय झाला, आणि तेणेंकरून जी लोकास भयंकर स्थिती प्राप्त झाली, त्यावरून आमच्या मनात अशी कल्पना उत्पन्न झाली कीं, आज चाळीस वर्षांपासून ह्या पुणें शहरांतल्या लोकास तारक जो प्रभु येशूख्रिस्त याजकडे फिरण्याविषयीं बहुत बोध व सूचना मिळत असतांना लोक येशूख्रिस्ताचा धिःकार करून आपल्याच गर्वानें फुगून पापामध्यें राहिले आहेत. म्हणून त्याजवर देवाचा भयंकर क्रोध पेटलेला आहे; आणि त्याच क्रोधाग्नीनें सदहू दिवशीं आपल्या पुढें होणाऱ्या शिक्षेचा थोडासा मासला दाखविला. तर पृथ्वीवर राहणाऱ्यांच्या दुष्टपणाचें शासन करायाला परमेश्वर आपले स्थानातून निघाला आहे. त्यानें सूप आपले हातात घेतलें आहे. आणि तो आपलें खळें निर्मळ करील. गहूं कोठारात साठवील, आणि भुस न विझणाऱ्या अग्नींत जाळून टाकील. जसा रात्रीं चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल, आणि कुशल व सर्व सलामत आहे असें जेव्हां मनुष्यें ह्मणतील तेव्हां जसी प्रसूतीची वेदना स्त्रीला लागते तसा त्यांचा अकस्मात नाश होईल. आणि ते निभावणार नाहींत."

नुकता जो साऱ्या दक्षिण हिंदुस्थानभर भयंकर दुष्काळ पडला होता त्याच्या संबंधानेंही वरच्यासारखेच विलक्षण लेख ख्रिस्ती वर्तमानपत्रांतून येत असत हें आमच्या वाचकां-पैकीं कित्येकांस आठवत असेलच. बंगाल्यांतले प्रख्यात मिशनरी डॉक्टर डफ् यांचा 'हिंदुस्थांतील बंड' या नांवाचा पत्ररूप ग्रंथ आह्मीं नुकताच वाचला, त्यांत तरी वरी-लच चमत्कार आढळला. सदरील ग्रंथांतील एक मोठें प्रमेय हें होय कीं, वरील सालीं येवढा बंडावा व येवढा रक्तपात झाला याचें कारण काय ?—काडतूस प्रकरण, राजेरज-वाड्यांची दगाबाजी, रशियन लोकांनीं केलेली चिथावणी, वगैरे प्रभृति इतिहासकारांनीं वर्णिलेलीं कारणें नव्हत,—तर ईश्वराचा माजी कंपनी सरकारावर कोप ! तो कशाक-रता ?—तर हिंदुधर्माचें उन्मूलन करण्यांत त्यांच्याकडून जी कसर होत गेली तिजवरून ! ! बक्लूच्या इतिहासाच्या तिसऱ्या भागाच्या सेवटीं सन् १८५२ सालच्या महामारीबद्दल इंग्रजी प्रधानमंडळीचा व स्कॉटलंड येथील धर्माध्यक्षांचा जो चमत्कारिक पत्रव्यवहार झाला तो दाखल केला आहे ; तोही प्रस्तुत प्रकरणीं समजूत पडण्याकरतां वाचकांनीं वाचण्यासारखा आहे.

पंडित नव्हता. त्याची विद्वत्ता कोणत्या तऱ्हेची होती याविषयीं गेल्या अंकांत कांहीं निरूपण केलेंच आहे. त्याच्या वेळीं मराठी बादशाहीचा कळस झाला असल्यामुळें एतद्देशीय जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रचार हल्लीं जसा इंग्रेजी विद्येचा झाला आहे तसा सर्वत्र झाला होता खरा, तरी प्रस्तुत कवि तिजविषयीं केवळ उदासीन होता. पौराणिक व्युत्पत्तीच्या पलीकडे त्यानें कधीं हाव बांधिली नाहीं. तो शास्त्रांच्या अध्ययनास लागता तर त्यांत पारंगत होऊन भट्टाचार्य पदवीला पोंचता यांत संशय नाहीं, पण त्याच्या मनाची प्रवृत्तीच निराळी पडली. **तुकारामास** दिल्लीपद देऊं केलें असतें तर तें त्यास जितपत पसंत पडलें असतें, किंवा **रामदासांच्या** पायांवर त्यांच्या दिग्विजयी शिष्यानें आपल्या कमाईची नवी बादशाही वाहिली असतां तिजविषयीं त्यांनीं जितपत लोभ प्रगट केला, तितपतच आमच्या कवीस ही कणाद, पाणिनि, जैमिनि इत्यादि शास्त्रकारांच्या वाङ्मयाचें सार्वभौमत्व संपादन करण्याची हौस होती. तेव्हां 'घटपटादि खटपटीं'त न पडतां प्रस्तुत कवीनें परमार्थसाधनास जेवढा व्युत्पत्तीचा भाग अवश्य तेवढाच संपादन केला. बहुतेक महाराष्ट्र कवींची पंडितता कितपत होती याविषयीं पूर्वीं अनेक वेळां लिहिलेंच आहे, व त्यांपैकीं 'पंडित' हें उपपद कोणत्या कवीस मात्र यथार्थत्वानें लागू पडतें हें ही गेल्या अंकांत सांगितलेंच आहे. या पंडित कवीस ही पुढें स्वपांडित्याचाच पश्चात्ताप होऊन तें ओझें भगवद्भक्तीच्या पायीं उतरून ठेवावें लागलें; व बाकीच्यांचा तर पांडित्यावर केवढा कटाक्ष होता हें त्यांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसून येतें.* मग असलें पांडित्य जोडून आपल्या मुख्य उद्देशास बळेंच व्याघात करून घेण्याचा उद्योग **मोरोपंतानें** केला नाहीं हें सहजच आहे. वरील उद्देश त्याचा दोन प्रकारचा होता. एक तर 'दयामृतघना' ची प्रसादवृष्टि आपणावर होण्याची आपल्या अंगीं

---

* तुकारामाचा एक अभंग पूर्वीं दिलेला आहे. तोच येथें दाखल करतों:—

बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेचि असतों मेलों ॥
भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पाया ॥
विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥
सेवा चुकतों संताची । नागवण हे फुकाची ॥
गर्वे होता ताठा । जातों यमपंथें नाटा ॥
तुका ह्मणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥

पात्रता यावी, आणि दुसरा हा कीं आपल्या देशबंधूंस ही वरील लाभ होण्यास साधनीभूत असा नूतन कवित्वप्रकार दाखवावा. या दोहोंखेरीज त्याचा आणखी कोणताही हेतु नव्हता हें त्याच्या सर्व ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें.*

९. आतां प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचें ज्यांनीं उगीच वरवर अवलोकन केलें

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

रामदासानें म्हटलें आहे—

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ।

रंगनाथाचें एक पद आहे—

श्रुतिपारायण शास्त्र सुभाषित उत्तम पंडित झाला रे ।
योगकळा सकळा अनुलक्षित वायु समग्र हि प्याला रे ॥
भूतभविष्य गमे समयीं यमनियम हि वश्य तयाला रे ।
भुललरि भुललरि प्राणी भुलला या आभासा रे ॥
आत्मकळा नकळे भ्रमला नर व्यर्थ पराक्रम गेला रे ॥ ध्रु० ॥

पंतांनीं ही 'अकराव्या स्कंधां'त म्हटलें आहे—

गलिताहंकार्ति जाणे बंधा मोक्षासि अनभवीं चढला ।
तो पंडित इतर नव्हे जरि पुष्कळ सर्व शास्त्र हीं पढला ॥

* 'विविधज्ञानविस्तारा' च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या अंकांत पुढील विलक्षण मजकूर आढळतो:—

"**मोरोपंत** वैराग्यामुळें जर कारकूनीचा धंदा टाकून कविता करावयाला लागला असता, तर त्याणें एकनाथ ज्ञानेश्वर प्रभृति साधूं प्रमाणें भक्तिमार्ग धरिला असता, व एकनाथ ज्ञानेश्वर रामदास याप्रमाणें केवळ पारमार्थिक विषयांवर ग्रंथ केले असते; किंवा वामनासारिखे तरीं कांहीं ग्रंथ इतर विषयांवर व कांही नुस्ते पारमार्थिक विषयांवर केले असते. परंतु त्या प्रकारचें कांहींच नाहीं. त्याणें जी कविता केली. ती सर्व स्वताचे कीर्तिसाठीं केली, परमेश्वराचें गुणवर्णन करण्याकरितां रचली नाहीं. सूक्ष्म पाहिलें असतां असें वाटतें कीं. मोरोपंत ईश्वराला फारच थोडा मान देत असे."

वरील 'सूक्ष्म दृष्टि' आक्षेपकाची नजर पुढील पद्यावर गेली असती तर 'स्वतःचे कीर्तीसाठीं कविता केल्या' चा भयंकर आरोप तो आमच्या बिचाऱ्या कवीवर बहुधा न घालता !—

हरि ज्याचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितों भावें ।
वाटे चरित त्यांचें कांहीं आपण तरावया गावें ॥

'आदिपर्व'

आहे त्यांची अशी समजूत होणें सहज आहे, कीं ज्या कवीनें संस्कृत शब्दांची भरपूर योजना, समासांची रचना, आणि यमक व प्रास यांचा थाटमाट हें सर्व आपल्या कवितेंत आणून तीस संस्कृत कवितेचें साम्य आणिलें त्यास ही स्फूर्ति पंचकाव्यांवरून व विशेषेंकरून ' नैषधा ' वरून, तसेंच ' लक्ष्मीसहस्र, ' ' वासवदत्ता, ' ' कादंबरी ' वगैरे ग्रंथांवरून झाली असावी. रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत व ' यशोदा पांडुरंगी ' च्या प्रस्तावनेंत मोरोपंताची श्रीहर्षाशीं जी तुलना केली आहे ती वरील समजुतीवरूनच होय. पण वस्तुतः पाहतां वरील साम्य अत्यंत भ्रामक होय. तें इतक्या पुरतें मात्र खरें धरतां येईल, कीं संस्कृत भाषेचें अत्यंत उज्ज्वल स्वरूप जसें ' नैषधां ' त दृष्टीस पडतें तसें मराठीचें मोरोपंताच्या काव्यांत आढळतें. ' नैषधां ' त जशी अनुप्रासाची गर्दी आढळते व रचनेची कृत्रिमता नजरेस येते त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रकवीच्या कवितेंतही अनुप्रास व यमक हीं दोन्हीं भरपूर असून पदरचनाही प्रायः केवळ सुगम नसते. पण येवढ्याखेरीज बाकी कोणत्याही प्रकारचें सादृश्य वरील दोघां कवींत किंवा त्यांच्या कवितेंत बहुधा आढळणार नाहीं. श्रीहर्ष केवढा पंडित होता हें त्याच्या महाकाव्याच्या शेवटीं त्यानें स्वरचित नानाशास्त्रविषयक ग्रंथांचे जे उल्लेख केले आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें ; आमच्या महाराष्ट्र कवीच्या पांडित्याविषयीं मागें लिहिलेंच आहे. श्रीहर्षाच्या काव्यांत पदलालित्य उत्कृष्ट

---

( मागील अंकावरून पुढें चालू. )

ज्यांच्या गानें व्हावें प्रेमाश्रु-क्षपित-चंदन मयूरें ।
आर्या समर्पिल्या हरि-चरणीं श्रीरामनंदन मयूरें ॥

' स्वर्गारोहण पर्व '

सुयश न जयांत हरिचें चित्र हि गुणभवन कवन तें अशुचि ।
त्यांत सुमति नर न रमति पळ ही बहु मानिती तया पशुची ॥

' भागवत '

पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥

' केकावली '

ज्या कवीनें भगवद्यशोवर्णनपर ग्रंथांत ही मंत्ररचना केली, एक रामायण पुरेसें न वाटून अष्टोत्तरशत रामायणें रचण्याचा विलक्षण खटाटोप केला, व केवळ लोकहितपर बुद्धीनें रामायणभारतादि ग्रंथांचें सार प्राकृत वाणीनें सर्वांस समर्पण केलें, त्याच्याविषयीं वरील उल्लेख करणें हें केवढें धार्ष्ट्य होय, केवढें अज्ञान होय, किंवा केवढा दुराग्रह होय !!

प्रकारचें आढळतें; आमच्या मराठी कवींपैकीं तर एकानें ही वरील गुण साधण्याविषयीं विशेष परिश्रम केलेले दिसत नाहींत. 'नैषधां' त तेराव्या सर्गांत पांच नलांचें वर्णन करतांना कवीनें श्लेषाची कमाल करून सोडली आहे.—एक अर्थ नलाकडे, एक इंद्राकडे ; पुनः एक नलाकडे, दुसरा अग्नीकडे, याप्रमाणें नलाचें व चार लोकपालांचें एकेकाच श्लोकांत वर्णन केलें आहे ; पुनः उलट घेऊन एकेका लोकपालाचें व नलाचें श्लेषेंकरून वर्णन केलें आहे ; आणि शेवटीं एका श्लोकांत तर नलाचें व चारी दिक्पालांचें वर्णन केलें आहे !* आमच्या प्राकृत मयूरकवीच्या नलोपाख्यानांत पाहिलें तर वरच्यासारखी कांहीं एक गडबड नसून मूळ भारतकाराचाच त्यानें साधा कित्ता वळविला आहे. श्लेषाच्या संबंधानें पाहिलें तर साऱ्या उपाख्यानांत एका आर्येंत मात्र एक लहानसा श्लेष केलेला आढळतो.† बाकी जो कविताप्रदेश वरील संस्कृत कवींच्या वाग्देवीनें पदलालित्यपूर्वक नृत्य करून सारा अलक्तकांकित करून सोडला, व रसिककामिजनांच्या हृदयाचा भेद करणाऱ्या कटाक्षशरांनीं मदनाचें पंचशरत्व सार्थ करून कालिदासानें वर्णिल्याप्रमाणें

श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै-
र्वातेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः । ‡

---

* रघुनाथ पंडितानें 'नैषधा' चें अनुकरण करून शारदेकडून चारी लोकपालांचें व नलाचें सश्लेष वर्णन करविलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहित असेलच. 'नलोपाख्याना' तील २२७–२३१ श्लोक पहा.

† वरील आर्या ही होय:—

अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे न नळ ।
होइल केवळ तापद कीं जो नर नल न होय तो अनल ॥

‡ दशरथ राजाच्या मृगयेचें वर्णन—

तत्प्रार्थितं जवनवाजिगतेन राज्ञा
तूणीमुखोद्धृतशरेण विशीर्णपंक्ति ।
श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै-
र्वातेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः ॥

"चपल घोड्यावर बसलेला आणि भात्यांतून ज्यानें वर बाण ओढलेला आहे असा तो राजा त्या कळपाच्या मागें लागला असतां सारीं हरणें विसकटून त्यांनीं तो वनप्रदेश आपल्या भयचंचल दृष्टिपातांनीं काळा सांवळा करून टाकला;—जणों काय वाऱ्यानें उडालेल्या अशा जलार्द्र नील-कमलपत्रांनींच !"

अशी स्थिति तिनें ज्याला आणली, त्याच प्रदेशावरून पंतांची वाग्वधू कुलस्त्रीप्रमाणें दृष्टिचांचल्य मुळीं प्रगट न करतां केवळ मर्यादशीलपणानें नीट गेली आहे! तेव्हां एकंदरींत पाहतां प्रस्तुत महाराष्ट्र कवीची वरील संस्कृत कवीशीं तुलना करणें हें यथार्थ नव्हे.

दुर्बोधतेच्या संबंधानें तर प्रकृत कविद्वयाची तुलना वरच्याहूनही असमंजस होय; कां कीं दोघांवरही वरील आक्षेप म्हणण्यासारखा लागू पडत नाहीं. जो सामान्य व्युत्पन्न आहे त्यास 'नैषधा' चे श्लोक अगदींच कळणार नाहींत असें नाहीं; व ज्याचा महाराष्ट्र कवितेशीं बराच परिचय झाला असेल त्यास **मोरोपंताच्या** आर्या मुळीं लागणार नाहींत असेंही नाहीं.* येवढें मात्र म्हणतां येईल खरें, कीं एका पक्षीं **कालिदासाच्या** किंवा **बाणभट्टाच्या** कवितेंतील प्रसाद जसा प्रायः आढळणार नाहीं, त्याप्रमाणेंच दुसऱ्या पक्षीं **वामन**

---

* दादोबांनीं 'यशोदा पांडुरंगी' च्या प्रस्तावनेंत पुढील अभिप्राय प्रगट केला आहेः—

"कालिदास, भवभूति, माघ, आणि श्रीहर्ष, यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं प्रसिद्ध महाकाव्यें आहेत, त्यांमध्यें शब्दांच्या काठिन्यावरून आणि अर्थान्वयाच्या गूढत्वावरून श्रीहर्षाचें जें शेवटलें नैषध काव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे तसेंच ज्यांस संस्कृत भाषा अवगत नाहीं, अशा प्राकृत जनांस मोरोपंताच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें, साहजिक त्या शब्दांच्या अपरिचयामुळें, आणि प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निवळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृतभाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यत्वामुळें, मोरोपंताचें काव्यहि दुर्बोध आणि कठिण म्हणून बहुधा सर्वजनांस अनुभूत आहे."

वरील अभिप्रायांपैकीं दुसऱ्याविषयीं येथें कांहीं लिहावयास नकोच. पहिल्याचें यथार्थत्व पुढील उताऱ्यावरून कळून येईलः—

"With the structure or frame of the poem our delight is nearly unqualified. The language is highly elaborate, bearing the mirror's polish. It never becomes common-place, and bears throughout a sustained tone of sprightliness and elevation. Although we find a continual play upon words for many verses together, yet, not only is the sense not lost in a mere jingle of syllables, but the general effect is often much enhanced by the harmonious contrast of open and concealed meanigs."

Dr. Roer.

किंवा मुक्तेश्वर यांच्यासारखें सुगमत्वही बहुधा सांपडायाचें नाहीं. तसेंच एका पक्षीं पंचनली प्रकरणांतून पार पडण्यास जसें टीकाकाराचें थोडें बहुत तरी साहाय्य घ्यावें लागेल, त्याप्रमाणेंच 'बृहद्दशमा' ची फोड करतांनाही केवळ प्राकृत वाचकास संस्कृतज्ञाची मदत घेतल्याशिवाय फार करून चालणार नाहीं. तरी ज्याप्रमाणें 'किरातार्जुनीया' च्या व 'शिशुपालवधा' च्या एकेका सर्गावरून साऱ्या काव्यावर दुर्बोधतेचा दोष आणणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणेंच वरच्यासारख्या प्रसंगोपात्त दुर्गम स्थलांवरून वरील दोघां कवींचे ग्रंथ डोंगराळ प्रदेशांप्रमाणें मोठे अडचणीचे आहेत असें ह्मणणेंही उचित नव्हे !

तेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांत भरपूर श्लेष आहेत हा जो लोकप्रवाद आजपर्यंत चालत आला आहे तो खरा असण्याचा कितपत संभव आहे हें वरील निरूपणावरून लक्षांत येईल. आतां प्रत्यक्ष प्रमाणावरून काय सिद्ध होतें तें पाहूं.

६. आमच्या वाचकांस माहीत असेलच, कीं यापूर्वीं अनेक वेळां प्रस्तुत विषयाच्या संबंधानें उल्लेख करून मोरोपंताच्या आर्यांच्या अनेकार्थत्वाचें प्रत्यक्ष उदाहरण दाखविण्याविषयीं आम्हीं सूचना केल्या आहेत. पण गेल्या ९३ च्या अंकांतील एका पत्राखेरीज आजपर्यंत कोणाकडूनही वरील संबंधाचा कांहींएक मजकूर आलेला नाहीं. तेव्हां यावरून निदान आज तरी इतकें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं, कीं ज्याअर्थीं आजपर्यंत निदान दोन अर्थांची तरी एकही आर्या कोणाकडून दाखविण्यांत आली नाहीं, त्याअर्थीं पंतांच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात ही लोकवार्ता पृथ्वीवर सिंहाचें एकच जोडपें आहे, वेरूळचीं लेणीं हीं पांडवकृत्यें होत, अग्निपुराणांत आगगाडी आहे, शतपथ ब्राम्हणांत तारायंत्र आहे, या गप्पांपैकींच एक गप्प होय !

आतां आम्ही आपल्या तर्फेचें जें प्रत्यक्ष प्रमाण दाखविणार तें दोन प्रकारचें आहे. एक 'नवनीता' च्या दोन भागांवरून व मोरोपंताचा अत्यंत मान्य ग्रंथ जो 'केकावली' त्यावरून. आणि दुसरा प्रकार वर सांगितलेल्या पत्रांत दाखल केलेल्या आर्येचें बहुलार्थत्व कितपत यथार्थ होय हें दर्शविण्यांत येईल हा होय.

तेव्हां प्रथमतः 'नवनीता' चे दोन भाग घ्या. पहिला भाग तर प्रसिद्धच आहे; दुसरा कदाचित् सर्वांस माहीत नसेल, यास्तव त्याविषयीं इतकें सांगणें अव-

ज्य दिसतें कीं, तो कै० परशुरामपंत तात्या यांनींच केलेला आहे.* हा भाग पहिल्याच्या सरासरी तिसरा हिस्सा असेल नसेल, तरी एकंदरीनें पाहतां यांतील वेंचे पहिल्यांतल्यांपेक्षां सरस आहेत. आतां हे जे दोन भाग आहेत यांत साऱ्या महाराष्ट्रकवींचें स्वरूप बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झालें असेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं; कां कीं साऱ्या महाराष्ट्रकवितेचें आलोडन करून जें सार निघालें तें वरील ग्रंथकर्त्यानें दोनदां रसिकजनांस अर्पण केलेलें आहे. त्यांतून **मोरोपंता**च्या काव्यावर तर रा० गोडबोले यांची विशेषच भक्ति असल्यामुळें तदनुरूप त्यावर त्यांचा विशेष व्यासंग झाला असेल हें उघडच आहे.† **मोरोपंतास** निवर्तून अद्याप फार काळ लोटला नसल्यामुळें व त्यानें ग्रंथही पुष्कळ लिहून ठेवला असल्यामुळें त्याच्या इतका भरणा फार करून दुसऱ्या कोणत्या ही महाराष्ट्रकवीचा दिसत नाहीं. या दोन कारणांस्तव 'नवनीता'-च्या दोन्ही भागांत वरील कवींतील वेंचे चांगले भरपूर आलेले आहेत. यास्तव त्याच्या कवित्वाचें स्वरूप सदरील दोन ग्रंथांत जसें प्रगट झालें आहे तसें इतर कोणत्याही महाराष्ट्र कवीचें झालें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तर प्रस्तुत वादांत बऱ्याच अंशीं निर्णय होण्यास वरील दोन ग्रंथांतील वेंचे उपयोगीं पडतील हें उघडच आहे.

'नवनीत' भाग पहिला यांत श्लेषात्मक ह्मणून जीं स्थलें आह्मांस आढळलीं तीं येणें प्रमाणें:—

तूं 'मलिन' 'कुटिल' 'नीरस' 'जड' हि 'पुनर्भव'पणें हि कचसाच ।
'धरिला शिरीं' हि न स्व– प्रकृतिगुण त्यजिसि नाम 'कच' साच ॥

'कचोपाख्यान'

---

* वरील दुसऱ्या भागाच्या शेवटीं असें पद्य आहे:—

जरि याचा जन आदर करितिल घेतील हा पहायास ।
तरि उत्तेजन होइल मज तिसरा भाग तो करायास ॥

ही आशा कितपत सफळ झाली हें सांगायाला नकोच. तिसऱ्याची गोष्ट तर दूरच, पण दुसरा भाग ही करण्याची विशेष जरूर नव्हती असें सदरील ग्रंथकारास बहुधा लवकरच वाटलें असावें !

† परशुरामपंत तात्यांच्या पद्यमय ग्रंथांवरून तर वरील भक्ति व्यक्त होतेच; कां कीं त्यांतील धाटणी प्रस्तुत कवीपासूनच उचललेली आहे. शिवाय असेंही ऐकण्यांत असे कीं, रात्रींतून दिवसांतून जो वेळ रिकामा सांपडे तो बहुधा **मोरोपंता**चें काव्य वाचण्यांतच वरील पंडिताचा जात असे.

बृहदश्व ' द्विजराज ' श्रीधर्माच्या समीप आला जो ।
ताप उरींचि न दे जो त्यासि विधु न कां म्हणोनि हा लाजो ॥

' नलोपाख्यान '

अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे न नल ।
होइल केवळ तापद कीं जो नर नल न होय तो ' अनल ' ॥

कित्ता

लेश हि शरदमल न भा धवली अमृतांशुची ही शरदमलनभा ।
'अंबर' सितरुचि रजनी–विलासिनी धरि भ-मौक्तिकें रुचिर जनीं ॥

' रासारंभींच्या आर्या '

हा सीते हा लक्ष्मण ऐसें मरतां ह्मणोनि मोक्यानें ।
' अमृत ' प्रदीं करावें अहिनें केलें तसेंचि खोक्यानें ॥

' भारती रामायण '

मोहूत ' भुजग ' मोहा कैंवि तुम्ही मज सम स्तनग हो तें ।
तुमचें हि सुकृत सरलें कां सांगा मज समस्तनग हो तें ॥

कित्ता

हा सीते मज देतो त्वन्मुखजितचंद्र ताप हा सीते ।
हा सीते करितो ' द्विज– राज ' हि ह्मणवूनि ताप हा सीते ॥

कित्ता

वरील आर्यांपैकीं पहिलींत मात्र भरपूर श्लेष असून बाकीच्यांत ज्या शद्बांभोंवतीं अवतरणचिन्ह केलें आहे तेवढे मात्र श्लिष्ट आहेत.

' नवनीत ' भाग दुसरा यांतील वेंच्यांत कोठेंही बिलकुल श्लेष नाहीं.

' केकावली ' त म्हणण्यासारखा श्लेष पुढील केकेंतील एका शब्दावर मात्र आहेः—

तुझ्या गुणकथा महासुरभि त्यांत ही रासभी
शिरे विषयवासना जशि शुका अहीरास भी ।
तशी न इतरास भी इस ' सदंड ' ही हाकिती
तथापि बहु लाथळी मग अदंड मी हा किती ॥

बाकी लहानसान श्लेष पुढील कांहीं स्थलीं आहेत.—

गमो मधुर हें विष स्तवन सेवितां माजवी
करि मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी ।
हरापरिस तूं वरा प्रभुवरा सदा जो पिशी
असा रस समर्पिया ‘ अमृत ’ आपुलें ओपिशी ॥

ह्मणोनि कवितासुता तुज समर्पितों साजरी
नसे बहु तशी गुणी कनकपीतवासा जरी ।
तरी न इतरा वरी हरि करीं इला किंकरी
मयूर हि निजात्मग्रह*–विमुक्त जैसा करी ॥

तिला हि बरवी ह्मणा उचित होय तोषाकरें
असेल सजली यथारुचि तयीं स्वयोषा करें ।
जशी पदरजें शिला परि असे न हे शापिली
धवें ‘ हरिमनोहराकृति ’ सती अघें व्यापिली ॥

कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती
शिशूंस जरठांस ही निरखितां ‘ रसें ’ दाटती ।
दुहोत भलते सदा तरि न लेश ही आटती
स्ववत्स-‘मल’ भक्षिती परि न सर्वथा बाटती ॥

तुझ्यासमचि हें गुणें अणु उणें नसे नाम हा
दिसे अधिक ही तसा गुण तुला असेना महा ।
सदैव भलत्यास ही सुलभ आणखी गायका
‘ छळी ’ न न ‘ अधोगति ’ क्षण हि दे जगन्नायका ॥

---

* ‘ निजात्मजेचा आग्रह ’ आणि ‘ निजात्मजारूप ग्रह ’ अशीं दोन प्रकारचीं पदें वरील समासांत पडण्यासारखीं आहेत. ‘ किरातार्जुनीय ’ सर्ग १ यांतील पुढील श्लोकांत अशा प्रकारचा पदच्छेद आहे:—

अवंध्यकोपस्य विहंतुरापदां
भवंति वश्याः स्वयमेव देहिनः ।
अमर्षशून्येन जनस्य जंतुना
न जातहार्देन न विद्विषा–‘दरः’ ॥

वरि प्रकट शांतिला धरि परंतु मीना बकी
गिळी तशि तुला टपे सुकृतबुद्धिहीना बकी ।
जिणें गरळ पाजिलें ' अमृत ' पाजिलें तीस तां
खळांसि न दिसो भलेपण खरें भल्या दीसतां ॥
सुरासुरनरोरगां भुलवुनी कथा न त्यजी
न भेद करि पंक्तिचा ' अमृत ' पाजिती सत्य जी ॥
तिणें जरि सुधारस स्वरतमानसां पाजिला
वधी अमृत घोटितां द्रव न येचि वापा जिला ॥

तर वर सांगितलेल्या तीन ग्रंथांत श्लेषप्रयोगाचीं उदाहरणें वर दाखल केल्या इतकींच काय तीं आहेत. यांखेरीज इतरत्र जीं आमच्या वाचण्यांत आलीं तीं येणेंप्रमाणें:—

नमुनि जरत्कारि ह्मणे नसतां अपराध टाकितां दासी ।
' द्विजराज ' तुम्ही या अप–राधें कैं द्याल हर्ष चांदासी ॥
' आदिपर्व '

करुनि प्रदक्षिणा धनु उचलोनि ख्याति तो करी मोठी ।
चापाच्याचि न केवळ नरवीरांच्या हि वांकवी ' कोटी ' ॥
कित्ता

झाली झाला केवल ' कृष्णा ' पोषूनि अंधकारा ती ।
जाणों सुयशोऽर्थ तमो–गुण धाडी तेथ अंधकाराती ॥
' विराटपर्व '

भीमें पाठविला शर दुसरा हि सुषेण-जीवनाचमना ।
कर्ण तयास हि खंडी ये 'मार्गण'-फल-विघात हाच मना ॥
' कर्णपर्व '

जरि 'शुचिमूर्ति' 'सुवृत्ता' मान्या 'श्रवणोचितें गुणें' मुक्ता ।
विद्धा जडाहि ते हे अगुणा ही तीस करि उणें मुक्ता ॥
' सन्मणिमाला '

वर जीं उदाहरणें दाखविलीं त्यांवरून **मोरोपंताची** दहा दहा अर्थांविषयींची जी सार्वत्रिक प्रसिद्धि, व मोठ्या पंडितांचीं ही त्याच्या काव्याच्या

संबंधानें चिरकाळ दृढ होऊन बसलेलीं मतें,* हीं दोन्हीं कितपत यथार्थ होत याविषयीं आमच्या वाचकांची खात्री होईलच. त्यांस दिसून येईलच, कीं साऱ्या आर्येभर श्लेष असा काय तो वर दोनच आर्यांत आहे. पहिली 'कचोपाख्यानां' तील व शेवटली 'सन्मणिमाले' तील! बाकी साऱ्या पद्यांतून एखादें पद श्लिष्ट आहे, व तोहि श्लेष अप्रसिद्ध किंवा बळें ओढून ताणून आणलेला अशांपैकीं मुळींच नसून अगदीं परिचयांतला असा आहे.

७. आतां शेवटलें व्यतिरेकप्रमाण ५३ व्या अंकांतील आर्येचें. ही आर्या पुढील होय:—

---

* रावबहादुर रानडे यांचें 'केकावली' च्या अनेकार्थत्वाविषयीं येथढें दृढ मत ज्यावरून झालें त्या स्थलांचें स्वरूप पुढील दोन उताऱ्यांवरून बरेंच लक्षांत येईल:—

(केका १)—**गदारिदरनंदकांबुजधरा**—**गदा**-अहंकृतिजन्यप्रपंचमिथ्याज्ञानसद्बुद्धीतें जागृत करणारी जो भगवच्चिच्छक्ति तिचें उपलक्षण **अरी** – चक्र – सत्ज्ञानरूप जा अंत:प्रकाश त्याचें उपलक्षण **दर** – शंख – नादमूलक जो प्रणव – ओंकार त्याचें प्रतिरूपक **नंदक** – विष्णूचें खड्ग – अज्ञानरूप अथवा संशयरूप जी हृदयग्रंथी तिचें छेदक जें आत्मज्ञान त्याचें प्रतिरूपक **अंबुज** – कमल–संसारदु:खें करून पीडित जो जन त्याच्या म्लान आणि आकुंचित अंत:करणाचें भगवद्भक्तिजन्यप्रेमानंदानें जें विकाशन त्याचें निदर्शन; या सर्व चिन्हांतें धारण करणारा, अर्थात् या सर्व उपलक्षणांनीं उपलक्षित परब्रह्मरूप जो भगवान् त्याचें संबोधन;—असा सच्चिदानंदरूप जो तूं त्या.

(केका ३३)—"**हरिमदाग्रहें**—हरि–सूर्य–अर्थात् सूर्यासारखे उग्रप्रतापी जे रावणकंसासारिखे; अथवा. हरि – सिंह – अर्थात् सिंहा सारिखे पराक्रमी जे हिरण्यकशिपुबलिदुर्योधनादिकां सारिखे भूपाल अथवा, हरि – शुक – पोपट – अर्थात् क्रियाहीन असतां केवळ पोपटासारिखे वाचाळमात्र असे जे वाग्पंडित अथवा, हरि – अग्नि – अर्थात् अग्नी सारिखे दुसऱ्याच्या अंत:करणास पोळणारे जे दुष्ट जन — अथवा सर्व गोकुळाचा नाश करणारा जो दावाग्नि तो या सर्वांचा मद – गर्व त्याचा नाश करणारा जो तूं त्या त्वां; अथवा हरि – यम – कृतांतरूप जो काल त्याचा, मीं सर्व भुवनत्रयाचा संहार करणारा म्हणून. जो मद म्ह० गर्व; अथवा हरि – इंद्र – हा एकदा अतिवृष्टि पाडून सर्व गोकुळाचा नाश करण्यास उद्युक्त झाला होता तेव्हां त्वां आपल्या आंगठीनें गोवर्धन उचलून त्याच्या छत्रा खालीं सर्व व्रजवासी प्राण्यांचे रक्षण करून तेणेंकरून त्या इंद्राच्या मदाचा त्वां नाश केला अशी जगप्रसिद्ध तुझी कीर्ति आहे, अशा —

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ।
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे ॥

हो आर्या कोणत्या प्रसंगाची आहे व हिचा अर्थ काय हें मराठी शाळां-तील शेवटल्या यत्तेंतील पोरेंही सांगतील. पण प्रकृत अर्थ येवढा उत्तान असतां अरसिक व छांदिष्ट मंडळीनें या बिचाऱ्या आर्येचा जो धुडगुस मांडला आहे व हिजवर जे कांहीं आपल्या पांडित्याचे तारे तोडले आहेत तें कांहीं पुसूं नये ! आमच्या मयूरकवीच्या येवढ्या एका पराशींच अर्वाचीन, प्राकृत पंडित येवढे कां बागडतात हें कांहीं समजत नाहीं ! या एका आर्येंत मी काय-ती वहार सांठवून ठेविली आहे, व सोरटी सोमनाथाची पिंडी सुलतान महदानें फोडली असतां अपरिमित अर्थसंचय जसा खळ्दिशीं बाहेर पडला त्याप्र-माणें सरस्वतीची ऐन जिनगी काय ती या एका पद्यांत लिकवून ठेवली आहे असा एकादा गुप्त लेख तर पंतांनीं कोणा भक्तापाशीं ठेवला नाहींना ! काय असेल तें असो ! आह्मांस तर याच एकल्या आर्येची अशी दुर्दशा कां व्हावी हें कांहीं कळत नाहीं. एक कारण मात्र दिसतें, कीं भोजनादि प्रसंगीं प्रस्तुत कवीच्या ज्या आर्या ह्मणण्यांत येतात त्यांतील ही एक असल्यामुळें हिजकडे कल्पक मंडळीचें विशेष लक्ष लागलें, व हिच्या कांहीं पद्यांशीं कल्पनेचा वि-हार होण्याजोगा असल्यामुळें हिजविषयीं परंपरेनें प्रसिद्धि पडत गेली.

रा० लोंढे हे पनवेलकर बोवांच्या वाक्प्रवाहासरसे एकदम वाहवत जाऊन अगदीं भांबावून गेले ही कांहीं अशीं आश्चर्याचीच गोष्ट ! तसेंच बोवांच्या हातचलाखीनें केवळ चकित होऊन जाऊन ‘ केकावली ’विषयींही आपला भ्रम असाच नसेलना, तर काय भानगड असेल ती आपली आपण पाहून घ्या, याप्रमाणें सदरील पत्रकारानें दोहों कानांवर हात ठेवले आहेत, या गो-ष्टीचीही आह्मांस मोठी मौज वाटते ! एकंदरींत ‘ गतानुगतिक ’त्वाचा प्रकार लोकांत किती प्रबळ आहे, व धडधडीत उघड दिसणाऱ्या गोष्टीविषयीं ही लोकमताच्या विरुद्ध अभिप्राय प्रगट करण्याचें साहस किती थोडें आढळतें, ही गोष्ट सदरील पत्रावरून स्पष्ट दिसते. असो ; आतां वरील आर्येविषयीं विचार करूं.

आमच्या पनवेलकर मित्रानें जो अर्थ सांगितला आहे त्याहीपेक्षां आणखी दोन तीन निरनिराळे अर्थ आह्मी हरदासाच्यांच तोंडून ऐकिलेले आहेत. ते असे:—

(१) " अर्जुनास कोणी सुभद्रेविषयीं बातमी सांगितली, कीं 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य ' म्हणजे उपवर झाली आहे ; तें ऐकून तो विषादपूर्वक ह्मणतो, " तें खरें, पण ती सुभद्रा 'जाहली ' म्हणजे मोठी ' जलाल आहे ' ह्मणून ऐकतों ; शिवाय ' हलधर तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे. "

(२) " अर्जुन ह्मणतो, ' कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य. ' त्यावर त्यास कोणी त्याचा मित्र सांगतो, असें आहे तर तूं ' जा, हरी ( रलयोरभेदः ) आहे, ' म्हणजे तूं गेलास तर कृष्ण तुझी शिफारस करील. अर्जुन उत्तर देतो, " पण, ' तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे, ' तेव्हां धाकल्या भावाची शिफारस कशी लागू पडणार ? "

(३) " अहो ' हलधर ! ' ' कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे, तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्या, ' परंतु ' वया पाहे, ' कांहीं वयाकडे पहा ! "

तेव्हां एकंदरींत वादविषयक आर्येवर पांच अर्थ तर बसले ! ' नैषध ' काराचें आणि आमच्या महाराष्ट्र कवीचें साम्य तर अगदीं तंतोतंत जुळलें ! आतां दुसरी एक आर्या पहा——

आर्या आर्यांसि रुचे ईच्याठायीं असे जशी गोडी ।
आहे इतुरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥

हिचाही साधा सरळ अर्थ आबालवृद्धांस श्रुत आहे. पण त्यांत कांहीं बहार नाहीं. खुबीदार अर्थ पुढेंच आहे——" स्त्री ही जे श्रेष्ठ आहेत त्यांस आवडते ; स्त्रीच्या सुखासारखें दुसरें सुख नाहीं ; इतर छंदांत बहार नाहींशीं नाहीं, पण हिची सर त्यांस येणार नाहीं. " एकंदरींत कवीचा हृद्गतार्थ असा कीं, " बाबांनो, तुह्मांस खरी चैन भोगायाची असेल तर इतर फंदांत पडूं नका ; शांभवी देवी, बाटलीबाई, वगैरे सर्व या शोकापुढें तुच्छ ! "

अनेक अर्थांविषयीं प्रसिद्ध अशा तूर्त आह्मीं दोनच आर्या ऐकिल्या आहेत, व वर जितके अर्थ सांगितले तेवढेच वरील आर्यांतून निष्पन्न होतात अशी आजच्या घटकेला आमची समजूत आहे. हें येथें लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, न जाणों कदाचित् उद्यां एखादा नवा पंडित निघून तो वरच्यासारख्या आणखी आर्या व त्यांतील आणखी अर्थ शोधून काढील !* असो ;

* वरील वाक्य लिहून गेल्यास फार दिवस निघून गेले नाहींत तांच एक पत्र येऊन धडकलें. तें पुढील अंकांत वाचकांस सांपडेल.

आतां वरील पांडित्यप्रकारावर आमच्या मनांत कांहीं आक्षेप उद्भवतात ते येथें प्रगट करून हें श्लेषप्रकरण आटपतों.

(१ ला अर्थ)—पंतानीं प्रश्नोतरें आर्येत ग्रंथित केल्याचा हा नवाच मासला आहे. याचें दुसरें उदाहरण आम्हांस तर अद्याप कोठेंही आढळलें नाहीं. 'कृष्णा' हें संबोधन असतां 'अनुजा' शद्वाशीं त्याचा संधि केलेला पंतास कसा खपला? 'धृतराष्ट्र' ह्मणजे 'पंडु' हा अर्थ पनवेलीस नवा निर्माण झाला असल्यास नकळे; पण साऱ्या भारतवर्षांतले लोक तर वरील अर्थ ऐकून आमच्या पत्रकाराप्रमाणें भांबावून जातील यांत संशय नाहीं! 'धृत आहे राष्ट्र ज्यानें' असा यौगिक अर्थ घेऊन प्रस्तुत शद्ब जर बिचाऱ्या पंडूवर बळेंच लागू करावयाचा असेल तर मग आमचे सध्यांचे प्रतिनिधी नेकनामदार लॉर्ड लिटन् साहेब यांनींही जपूनच असलें पाहिजे; कां कीं उद्यां कोणी नवा टीकाकार उत्पन्न होऊन त्यानें नेकनामदारांची 'हलधरा'शीं सोयरीक बनवून दिली तर करतां काय? त्यांतून वरील आप्तसंबंध जडण्यास पूर्वींचा मुळींच आधार नाहीं असेंही नाहीं. प्रख्यात 'विलासतरंगिणी'कार यांनीं आपला नायक सूर्यकुलोत्पन्न कमलनाभ यास आंग्लो-मुसलमीन क्षत्रिय महंमद जॉन्सन् याची कन्या दिल्याची पूर्वींची परंपरा वरील शरीरसंबंधास अनुकूलच होय! (शालापत्रक—१८७४ जानेवारी पहा)

(२रा अर्थ)—यावर विशेष आक्षेप घेण्यासारखा नाहीं. एकंदर अर्थाचा अप्रयोजकपणा स्पष्टच आहे.

(३रा अर्थ)—किता.

(४था अर्थ)—'कांहीं वयाकडे पहा' याचा अर्थ काय? अर्जुन मात्र ऐन पंचविशीच्या भरांतला आणि दुर्योधन ऐंशी वर्षांचा थेरडा असा तर कांहीं प्रकार नव्हता; मग 'वया' कडे काय पहावयाचें? आम्हांस खास वाटतें कीं अशी अर्जुनाची तरफदारी करणाराच्या डोकींत 'हलधर' बोवा नांगर घालायास चुकतेना! आणि सदरील अर्थकार नांगराला योग्यही खरेच!

याप्रमाणेंच दुसऱ्या आर्येतील दुसरा आषकपर अर्थ ही केवळ अप्रयोजक होय. तो अर्थ जर खरा मानावा, तर 'उभाभ्यामुतते नमः' व 'प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्' इत्यादि श्रुतींचे दुसरे अर्थ व 'हस्तादेनेचेरस्तेये' या पाणिनीय सूत्राचें अर्थांतर हीं सर्व खरीं मानलीं पाहिजेत!

असो; एकंदरींत पाहतां प्रस्तुत कवीची अर्थबाहुल्याच्या संबंधाची प्रसिद्धि केवळ अज्ञानानें व अंधपरंपरेनें झालेली आहे. त्यांतून 'जाहली आहे,' 'ज्ञा हली आहे,' 'जा हरी आहे' वगैरे पदच्छेद करणें ह्मणजे तर निवळ पोरखेळ आहे! आकाशांतील ढगांकडे पाहून हत्तीचा उंट झाला, उंटाचें गाढव झालें, गाढवाचा राक्षस झाला वगैरे रूपांतरें बघत बसणें यांत जितपत अर्थ आहे तितपतच वरील शब्दक्रीडेंत होय! किंबहुना वरील आकाशप्रेक्षण ही एक्या अर्थी बरें; कां कीं तें कर्मणुकीच्या सदरांत तरी ओढतां येईल. पण सत्कवींच्या कृति छिन्नभिन्न करून त्यांत मौज वाटणें यास मनुष्यभक्षक रानटी लोकांचा जो प्रेतांशीं विनोद चालतो* त्याचीच उपमा साजेल! आणि त्यांतून वरील पोरखेळावरून कवीचा अभिप्राय तसाच होता म्हणून त्यावर बालिशत्व आणूं पाहणें, आणि या बालिशत्वावरून त्याची महाकवींत गणना करणें म्हणजे तर अरसिकत्वाचा व असमंजसपणाचा कडेलोटच होय!!!

---

## पत्रें.

**रा॰ रा॰ निबंधमालाकर्ते यांसः—**

वि॰ वि॰ बाकी राहिलेल्या साहा राशींचीं कथानकें या पत्रा सोबत पाठवीत आहें. तरी यांस येते अंकीं जागा देण्याची कृपा करावी.

### तुला—कथानक.

ह्या राशींत ५१ तारे आहेत. त्यांपैकीं २ दुसऱ्या प्रतीचे, व १२ चवथ्या प्रतीचे आहेत.

ह्या राशींत सूर्य असतांना दिवस व रात्री यांचे मान सारखें होतें व पृथ्वीचे पृष्ठभागावरील सर्व प्रदेशांत हवेची उष्णता इतर ऋतूंपेक्षां या दिवसांत सारखी

---

* पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यभक्षक लोकांची वस्ती अद्याप आहे. 'राबिन्सन् क्रूसो नामक अति विख्यात इंग्रेज कादंबरीचें मराठींत भाषांतर झालें आहे, त्यावरून वरील प्रकाराचें स्वरूप आमच्या मराठी वाचकांच्या ही लक्षांत येणारें आहे. पासिफिक महासागरांतील बेटांकडचा बोभाटा ही कधींमधीं वर्तमानपत्रद्वारें कानावर येतोच,—कीं नुकतेच अमुक अमुक मिशनरी सागरस्थ लोकांनीं गट्ट करून टाकले!

असते हें दाखविण्याकरितां ह्या राशीस तुला ( तागडी ) असें नांव दिलें असें बहुतेक ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. कित्येक राशि-चक्राच्या जुनाट नकाशांत फक्त तराजूची दांडी मात्र आढळते. यावरून कित्येक ग्रंथकारांचें असें अनुमान आहे कीं, ह्या राशींत सूर्य असतांना नील नदीस पूर येत असे. त्याची उंची मोजण्याकरितां ज्या काठीचा उपयोग ते करीत असत तिच्या प्रतिमेची त्यांहीं राशिचक्रांत योजना केली. मागें कन्याराशीचे कथानकांत ह्या राशीचा उल्लेख आला आहे त्यास उद्देशून एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"But when Astrœa's balance hung on high,
Betwixt the nights and days divides the sky,
Then yoke your oxen, sow your winter grain.
Till cold December comes with driving rain."

खेरीज ग्रीक लोकांचें असें मत आहे कीं, वजनें व मापें हीं प्रथम प्रचारांत आणणारा जो मोकस (Mochus) त्याचें नांव चिराकाळ चालावें ह्मणून राशि-मंडळांत तागडीची योजना झाली. इंग्लिश-कवि-मुकुटमणि मिल्टन् यानें "पॅरेडैज लास्ट" या काव्याचे चवथे सर्गांत तुला राशीविषयीं असा उल्लेख केला आहे :—

"The Extreme to prevent such horrid fray,
Hung forth in Heaven his golden *scales*, yet seen
Betwixt Astrea and the Scorpion sign,
Wherein all things created first he weighed.

## वृश्चिक-कथानक

ह्या राशींत ४९ तारे आहेत. त्यांपैकीं एक* पहिल्या प्रतीचा, एक दुसऱ्या प्रतीचा, व ११ तिसऱ्या प्रतीचे आहेत.

ह्या राशीचे स्थानीं कचित् सर्प किंवा मगर याचें चित्र आढळतें. तथापि विंचवाचें चित्र पुष्कळ स्थळीं आढळण्यांत येतें.

शरदृतूंत समशीतोष्ण कटिबंधांत फळें पुष्कळ उत्पन्न होतात. तीं सेवन केल्यानें जे अनेक व्याधि जडतात ते दर्शविण्याकरितां ईजिप्त देशी किंवा

* हा तारा ज्येष्ठाचे तीन ताऱ्यां पैकीं मधला होय. यास इंग्रजींत Antares ( आंटारिज ) अथवा heart of scorpion ( वृश्चिकहृदय ) असें ह्मणतात.

ख्यालडी लोकांनीं ह्या राशीस विंचवाचें नांव दिलें असावें असें पुष्कळांचें मत आहे.

आव्हिड (Ovid) कवीच्या ग्रंथांत या राशीविषयीं असें लिहिलें आहे कीं, ओरायान (Orion) ह्मणून एक पुरुष होता. त्यानें पृथ्वीवरील पशुपक्षिकीटकादि सर्व प्राण्यांचें दमन केलें. तेणें करून त्यांस फार गर्व झाला. तेव्हां जूनो (Juno) देवीनें पृथ्वीपासून एक विंचू आपल्या सामर्थ्यानें उत्पन्न केला. त्यानें ओरायानाचे पायास दंश करतांच तो प्राणास मुकला. तेव्हां त्या विंचवास राशिचक्रांत जागा मिळाली. हीच गोष्ट पुढील पद्यांत वर्णिली आहे :—

"Words that provoked the gods once from him fell,
'No beasts so fierce,' said he, 'but I can quell.'
When lo! the earth a baleful scorpion sent,
To kill Latone was the dire intent;
* Orion saved her though himself was slain,
But did for that a spacious place obtain
In heaven, 'to thee my life' said she, 'was dear,
And for thy merit shine illustrious there.'"

---

* ज्या तारका-समूहास आपले लोक मृग ह्मणतात तोच हा ओरायान होय. मृगाचे पोटांत जो आडवा शर तारकात्रयात्मक आहे तो ओरायानाचा कमरपट्टा व मागचे दोन पायांतून जाऊन जो ताराघटित शर पोटांत उभा शिरला आहे तो ओरायानाचा कमरपट्ट्यांत लटकविलेला खड्ग होय असा पाश्चात्यांचे ग्रंथांत लेख आढळतो. ओरायानाचे खांद्यावर जे तीन बारिक तारे आढळतात त्यास आपण मृगशीर्ष म्ह० मृगाचें डोकें असें म्हणतों. ओरायान अथवा मृग हा तारकापुंज मोठा भव्य व रमणीय आहे. हा एकदा पाहिल्यावर कोणीही विसरणार नाहीं इतका ठळक आहे. याचे खालचे बाजूस व्याध नांवाचा अति तेजस्वी तारा आहे त्यास इंग्रजींत sirius अथवा dog-star असें म्हणतात. ओरायान व वृश्चिक यांचा इतका द्वेष आहे कीं एक उगवला असतां दुसरा अस्तास जातो कारण दोहोंमध्यें अंतर १८०° अंश आहे म्हणजे दोन्ही समोरासमोर आहेत. मृगाचें डोकें उत्तरेस व पुच्छ दक्षिणेस आहे. मृगाचे चार पायांचे स्थळीं चार तारे आहेत. त्यांपैकीं पूर्वेकडील पुढचे पायाचे ठिकाणीं जो तारा आहे त्यास आर्द्रा म्हणतात. हा तारा रंगानें लाल आहे.

## धनु:कथानक

ह्या राशींत ६९ तारे आहेत. त्यांपैकीं ५ तिसऱ्या प्रतीचे व १० चव-थ्या प्रतीचे आहेत.

स्याटर्न (Saturn) व फिलिरा (Phylira) यांचा कायरान (Chiron) ह्मणून एक पुत्र होता. आपली बायको ऱ्हिया (Rhea) हिला आपली ओळख पटूं नये ह्मणून त्यानें घोड्याचें रूप धारण केलें. वैद्यक, मृगया व संगीत ह्या विद्यांत हा निष्णात होता. वनस्पति व वल्ली यांचा औषधाचे कामीं उपयोग करण्यास यानेंच आरंभीं मनुष्यांस शिकविलें. त्या काळाच्या सर्व प्रसिद्ध वीरांचा हा गुरु होता. यानें एस्क्युलेपियस ( Aesculapius ) यास वैद्यक शिकविलें; आपालो यास संगीत शिकविलें; व हर्क्युलीस यास ज्योतिष शिकविलें. आकिलीज (Achilles) जेसन (Jason) व ईनि-यस (Aeneas) हे याचे शिष्य होते. हर्क्युलीस (Hercules) हा नुक्ताच लग्न करून आला असतां त्याचे नव्या नवरीचा यानें अपमान केला. त्या-मुळें हर्क्युलिसानें एव्हेनस (Evenus) नदीचे तीरीं ह्यावर बाण सोडून यास घायाळ केलें असें पुढील पद्यांत आव्हिड ह्मणतो:—

"Thou monster double shaped, my right set free
Swift as his words, the fatal arrow flew;
The Centaur's back admits the feathered wood,
And through his breast the barbed weapon stood;
Which, when in anguish, through the flesh he tore,
From both the wounds gushed forth the spumy gore."

हर्क्युलिसानें मारलेला बाण लर्निया वनांतील शतमुखी नागाच्या (Hydra) विषानें चोपडलेला असल्यामुळें वैद्यशास्त्रांत निष्णात व प्रतिधन्वंतरीच असा जो कायरान याचे हातून सुद्धां ती आपल्या शरीरांतील जखम बरी होईना. तेव्हां दु:खाचा अंत व्हावा ह्मणून आपलें अमरत्व नाहींसें करून आपणांस मरण द्यावें ह्मणून ज्युपिटराची त्यानें विनवणी केली. ती मान्य करून ज्युपि-टरानें त्यास राशिचक्रांत ठेविलें.

"Midst golden stars he stands refulgent now,
And thrusts the scorpion with his bended bow."

याप्रमाणें धनुर्धराचें कथानक ग्रीक ग्रंथकारांनीं वर्णिलें आहे. ईजिप्त, एस्ने* (Esne), व हिंदुस्थान या ठिकाणचे राशिचक्रांतही ही रास याच चिन्हानें दाखविलेली आढळते. यावरून प्राचीन लोकांकडून या राशीचें स्वरूप कळल्यावर तदनुरूप आपले पुराणांतील पुरुष घेऊन ही कथा ग्रीक ग्रंथकारांनीं रचिली असें दिसतें. जुन्या पुष्कळ राशींविषयींही ग्रीक ग्रंथकारांनीं अशीच लटपट केल्याचें आढळून येतें.

## मकर-कथानक

ह्या राशींत ५१ तारे आहेत. त्यांपैकीं तीन तिसऱ्या प्रतीचे व तीन चवथ्या प्रतीचे आहेत.

प्यान (Pan) ऊर्फ बेकस (Bacchus) हा इतर देवां सहवर्तमान नीलनदीचे तीरीं क्रीडा करीत असतां टायफान (Typhon) नामक भयंकर दैत्य एकाएकीं तेथें प्रकट झाला. तेव्हां सर्व देवांनीं आपापलीं रूपें बदलून आपल्या जिवाचें रक्षण केलें. त्या प्रसंगीं प्यान यानें मकराचें ( बोकडाचें ) रूप धारण केलें होतें. तोच मकर राशिचक्रांत स्थान पावला. याविषयीं आव्हिड म्हणतो:—

"How Typhon, from the conquered skies, pursued
Their routed godheads to the seven-monthed flood,
Forced every god,(his fury to escape)
Some beastly form to take, or earthly shape.
Jove ( sings the bard ) was changed into a ram,
From whence the horns of Lybian Ammon came;
*Bacchus* a *goat*; Appolo was a crow;
Phæbe a cat; the wife of Jove a cow,
Whose hue was whiter than the falling snow;
Mercury to a nasty ibis turned—
While Venus from a fish protection craves,
And once more plunges in her native waves."

ह्या प्रसंगीं बेकस यानें नदींत प्रथम उडी टाकिली. तेव्हां त्याच्या शरीराचा जेवढा भाग पाण्यांत बुडाला तेवढा मत्स्याकार झाला व पाण्यावर जेवढा

---

* हें शहर ईजिप्त देशाच्या वरच्या भागीं ह्मणजे न्यूबियाचे लगत्यास आहे.

होता तेवढा मेषाकार ( मृगाचे आकाराचा ) च राहिला. ह्या प्रसंगाचें विस्मरण न व्हावें ह्मणून जुपिटरानें मकराला राशिचक्रांत ठेविलें.

कांहीं ग्रंथकारांचें असें ह्मणणें आहे कीं आमाल्थिया (Amalthea) नामक शेळीनें आपलें दूध पाजून बाळपणीं जुपिटर देवाचे पोषण केलें. ते उपकार स्मरून जुपिटरानें आपले मातोश्रीस म्ह० त्या मृगीस राशिचक्रांत ठेविलें.

## कुंभ(धारि)-कथानक

ह्या राशींत १०८ तारे आहेत. त्यांपैकीं अति तेजस्वी जे चार ते तिसऱ्या प्रतीचे आहेत. एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

> " His head, his shoulders, and his lucid breast,
> Glisten with stars; and where his urn inclines,
> Rivers of light brighten the watery track."

ट्रॉय (Troy) शहरचा राजा ट्रॉस (Tros) याचा सुंदर पुत्र ग्यानीमेड हा आपल्या बापाचीं गुरें आयडा (Ida) पर्वतावर चारीत असतां त्याला जुपिटरानें स्वर्गीं नेलें. नंतर देवांचा चषक ( पान-पात्र ) बाळगण्याचें काम हीबी (Hebe) इजकडे होतें तें तिजकडून काढून ग्यानीमेड यास सांगितलें. पुढें जुपिटराचे कृपेनें त्यास राशिचक्रांत जागा प्राप्त झाली. ल्युशियन (Lucian) याचें असें मत आहे कीं ग्यानीमेड याचा बाप ट्रॉस नव्हे तर डारडेनस (Dardanus) हा होता.

कित्येकांचें असें मत आहे कीं, ख्रिस्तापूर्वी १५०० वर्षांचे सुमारास जलप्रलय झाल्यानंतर थिसेली (Thessaly) चा राजा ड्युकेलियन (Deucalion) हा मोठा भक्तिमान् असल्यामुळें त्यास राशिचक्रांत जागा प्राप्त झाली. तोच हा कुंभ-धारी होय.

कित्येकांचें असें मत आहे कीं, ईजिप्त देशांतून ग्रीस देशांत येऊन ज्यानें आथेन्स शहरची स्थापना केली आणि कलाकौशल्य व शास्त्रीय ज्ञान यांचीही ज्यानें स्थापना केली असा जोनेतीक्राप्स (Cecrops) तोच हा कुंभ-धारी होय.

प्राचीन ईजिप्त देशी लोकांची अशी समजूत होती कीं, कुंभराशींत सूर्यानें प्रवेश केला ह्मणजे प्रत्यहीं अस्ताचे समयीं कुंभ पाण्यांत बुडाल्यामुळें नील नदीचें पाणी फुगत असे.

## मीन-कथानक.

व्हीनस् (Venus) देवी व तिचा मुलगा क्युपिड (Cupid) हीं उभयतां युफ्रेटिस नदीचे तीरीं असतां टॉयफान (Typhon) नामक दैत्य तेथें एका एकीं प्रकट झाला. तेव्हां घाबरून दोघांहीं नदींत उडी टाकतांच दोघें ही मीन (मत्स्य) झाली. या प्रसंगाचें विस्मरण न व्हावें ह्मणून मिनर्व्हा (Minerva) देवीनें दोन मत्स्यांची राशि-चक्रांत स्थापना केली.

आव्हिड, होमर, व व्हर्जिल यांनीं या टायफन दैत्याचें असें वर्णन केलें आहेकीं, त्याला सर्पाचे फडे सारखीं शंभर मुखें होतीं; त्याचे मुखांतून व डोळ्यांतून अग्नीच्या ज्वाळा निघत असत; जन्मास येतांच त्यानें देवांबरोबर युद्ध मांडलें. तेव्हां सर्व देव भयभीत होऊन पळाले आणि रूपांतर करून लपून बसले. त्या प्रसंगीं ज्युपिटर हा मेंढा झाला; मर्क्युरी इबिस (Ibis) पक्षी झाला; आपालो कावळा झाला; जूनो गाय झाली; बेकस् बकरा झाला; डायना भाटी झाली; व व्हीनस् ही मासा झाली. सरते शेवटीं सर्व देवांचा बाप ज्युपिटर यानें त्या दैत्यास एटना पर्वता खालीं चिरडून टाकिलें.

या राशींपैकीं बहुतेकांचा उल्लेख मिल्टन कवीनें आपल्या महाकाव्याचे दहावे सर्गांत पुढें लिहिल्याप्रमाणें केला आहे.

..................................some say the sun
Was bid turn reins from the equinoctial road
Like distant breadth to Taurus, with the seven
Atlantic * sisters, and the Spartan Twins.
Up to the Tropic Crab; thence down amain
By Leo, and the Virgin, Scales,
As deep as Capricorn, to bring in change
Of seasons to each clime.

या बारा राशींचे स्वरूपाचें वर्णन वराहमिहिराचार्य यांनीं बृहज्जातकांत येणें प्रमाणें केलें आहेः—

मत्स्यौ घटी नृमिथुनं सगदं सवीणम्
चापी नरोऽश्वजघनो मकरो मृगास्यः ।

---

* Pleiades=कृत्तिका. आपले पुराणांत कृत्तिका साहा आहेत असा लेख आहे, व त्या साहांचा पुत्र षडानन हें सर्वप्रसिद्धच आहे.

तौली ससस्यदहनप्लवगा च कन्या
शेषाः स्वनामसदृशाः खचराश्च सर्वे ॥ ५ ॥

अध्याय १

**अर्थः**—मीन राशींत दोन मत्स्य आहेत; मिथुनापैकीं एकाचे हातीं गदा व दुसऱ्याचे हातीं वीणा आहे; धनुर्धराचे हातीं चाप असून त्याचें तोंड मनुष्या-सारखें व कमरेखालचा भाग घोड्यासारखा आहे; मकराचें तोंड मृगाचें (बो-कडाचे) तोंडासारखें असून मागचा भाग मत्स्यासारखा (मकरासारखा) आहे; तुला (तागडी) हातांत घेतलेला मनुष्य आहे तो तौली होय; कन्या ही नौकारूढ असून तिचे एका हातांत धान्य व दुसऱ्यांत अग्नि आहे; बाकीच्या राशी आपापले नांवाप्रमाणें आहेत म्हणजे मेष मेंढ्यासारखा, वृषभ बैला सारखा इ०.

मागें आह्मीं ग्रीक पुराणांचे आधारें वर्णिलेलें राशि-स्वरूप व हें वराहमि-हिराचार्यांनीं वर्णिलेलें राशि-स्वरूप या दोहोंत इतका सारखेपणा आहे कीं, एकानें दुसऱ्याचे ग्रंथांतून राशिस्वरूप-वर्णन उतरून घेतल्याचा भास होतो. ग्रीक लोकांनीं भरतखंडस्थांपासून हीं राशींचीं नांवें व स्वरूप-वर्णन हीं घेतलीं कीं भरतखंडस्थांहीं ग्रीक लोकांपासून घेतलीं याचा खातरी होण्यासारखा निर्णय करण्यास बलवत्तर प्रमाणें फारशीं नाहींत. तथापि वेदांत व त्याच्या आलीकडील ग्रंथांत ताऱ्यांविषयीं व नक्षत्रांविषयीं कथानकें आढळतात तशीं मेषादिकांविषयीं कोठें आढळत नाहींत. यारून आमचे पूर्वजांनीं मेषादिकांचीं नांवें व स्वरूपें ग्रीकांपासून घेतलीं असें वाटतें.

मु० रत्नांगिरी
ता० २ जून १८७९.

आपला मित्र.
ज० बा० मो०

---

रा० रा० निबंधमालाकर्ते यांस :—

वि० वि० यद्यपि आपला माझा प्रत्यक्ष परिचय नाहीं तथापि माझ्या कि-त्येक मित्रांच्या योगानें व विशेषतः आपल्या मालेच्या योगानें तो झाला आहे, असें म्हणण्याला तादृश प्रत्यवाय नाहीं; आणि असें जरी नसतें तरी ह्मणजे आपलें दर्शन घेण्याला कांहीं अडचण होती असें नाहीं. कारण 'मैत्री स्या-दर्शनात्सताम्'! अस्तु. तर कृपा करून माझ्या ह्या धाष्ट्यांकडे लक्ष न देतां आजच्या माझ्या एवढ्या कृतीला आपले सुंदर मालेमध्यें पुष्पस्थानीं नकोच,

पण सूत्रस्थानीं तरी आश्रय मिळेल अशी बलवत्तर आकांक्षा आहे, ती सफल करणें आपणाकडे आहे.

तारीख १३ माहे मे रोजीं जो या आपल्या पुणें शहरांत अग्निप्रलय झाला तो प्राय: जगद्विश्रुतच आहे; व त्या संबंधानें लोकांचे जे खेदोद्गार निघतात त्यांनीं चित्ताची स्थिति कशी होत आहे, ती सर्वानुभूतच आहे. मागें श्री० नारायणराव सा० मारले गेले, किंवा पेशवाई बुडाली इ० जे अनेक अनर्थ झाले त्यांच्याच तोडीचा हा विद्यमानकालिक अनर्थ आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आतां अशा महत्प्रसंगांचें वर्णन इतिहासांतरी असावयाचेंच व प्रस्तुत कालीं तें इतिहासांत राहील यांत संशय नाहीं. पण अशाच प्रसंगांचें वर्णन कविता रूपानें जर ऐकिलें किंवा वाचिलें तर त्यापासून जो कांहीं मनावर ठसा उठतो तो माझ्या मतें इतिहासापेक्षां फार अधिक आहे; व इतिहासाचे पुस्तकापेक्षां कवितारूपानें केलेलें वर्णन मुखपरंपरेनें ही आबालवृद्धांचे तोंडीं राहण्याचा विशेष संभव आहे. तसेंच त्या कवितेमध्यें ही श्लोक आर्या इ० छंद जर असतील तर तें काव्य कदाचित् विद्वानांच्या उपयोगी पडेल, परंतु अशिक्षितांना त्यापासून थोडाच फायदा होईल. म्हणून तें जर गाण्याच्या छंदामध्यें असेल तर त्याच्या योगानें सर्वांचें रंजन होईल, ह्यांत संशय नाहीं; असा विचार करून जसे मागील कित्येक सद्गृहस्थांनीं खरड्याची लढाई, पाणिपतची लढाई इ० प्रसंगांस उद्देशून पवाडे केले आहेत, तसाच सदरील प्रसंगास उद्देशून एक पवाडा मी यथामती रचून आपणाकडे पाठविला आहे. तर त्याचें पर्यालोचन होऊन शुद्धाशुद्ध पाहून इच्छेप्रमाणें तजवीज व्हावी.

### पवाडा.

"या विषयाच्या पायिं बुडाले कितीक लक्षापती ॥ तूं एक खंडीमाधिं पाव रति" ह्या चालीवर

[ नैव स्वल्पापि वाक्शक्तिस्तथाप्येतत्प्रणीयते ।
श्रोतुमर्हंति तत्सर्वं साधवः सदसद्विदः ॥ ]

शहर पुण्यामधिं काय अवस्था कसा प्रळय वर्तला ॥ लोक बहू हळहळती त्याला ॥ एका एकीं बहुत जनांवर कसा अग्नि कोपला ॥ लोक बहू० ॥ धृ०॥

शके अठराशें एक सालच्या माधव मासांत ॥ अष्टमी मंगळवार रात ॥ बारांवरती एक वाजतां झाला आकांत ॥ घरोघर लोक होते सुस्त ॥ बुधवारा-मधिं आग भडकली इतक्यामधिं अवचित ॥ मग लोक धाउन आले बहुत ॥ केले अनेक उपाय परंतु नाहिं चालला हात ॥ ज्वाळा गगनाला भिडत ॥ चा० ॥ सांगतों सविस्तर याची हकीकत साची ॥ मन लावुन ऐकायाची, हकीक० ॥ जुन्या पेशवाइ खूणांची, हकीक० ॥चा० प० ॥ बुधवारा सारखाच वाडा अधिं विश्रामबाग पेटला ॥ लोक बहू हळहळती त्याला ॥ शहर० ॥ १॥

अकरा वाजायाच्या सुमारा विश्रामबागेंतुन ॥ धुर फार येउं लागला धुमसुन ॥ तेव्हांच दैवें गोष्ट अशीकीं झालि राव ध्या ऐकुन ॥ दीक्षीतांचे वाड्यांतुन ॥ बाहेर आला एक गृहस्थ त्यानें धूर पाहुन ॥ ठोकिली बोंब मग सडकुन ॥ त्यासरसे लोक धांउन आले एकदम चहुंकडुन ॥ पोलीसही आले तयार होउ-न ॥ चा० ॥ बातमी कळाले सर्वांला, डान्युएल साहेब आला ॥ लोक लाविले विझवायाला, देउन बंबाला ॥ झाली एकच गर्दी हल्ला, परि वाडा अर्धा जळला ॥ चा० प० ॥ हायस्कुलांतिल विद्यार्थ्यांनिहि पुष्कळ श्रम केला* ॥ लोक बहु० ॥ शहर पु० ॥ २ ॥

हा वाडा जों विझला न् विझला तों झाली हाक ॥ धांवा हो धांवा हो लोक॥ ऐकतांच विश्रामबाग टाकून धांवले लोक ॥ पडला सर्वांला धाक ॥ पहाती तों खुब धूर चालला दार नाहीं खुलें एक ॥ फोडली खिडकी वेलाशक ॥ त्या खिडकीच्या वाटे आली ज्वाला बेधडक ॥ भडकलें कचेऱ्यांचें सर्वक[१] ॥ चाल॥ झाला एकचि हलकल्लोळ, चालला आगिचा लोळ ॥ नाहीं कांहीं उपाय चाले, तेव्हां लोक पळूं लागले ॥ गर्दींत कितिक घाबरले, कितिकानिं मारिले डल्ले ॥ चा० प० ॥ अशा प्रकारें लोकांवरती मोठा कहर गुजरला ॥ लोक बहु० ॥ शहर० ॥ ३ ॥

---

* श्रम शब्दाचा एकवचनी प्रयोग फारसा करीत नाहींत ; परंतु येथें छंदानुरोधानें केला आहे. व क्वचित् अन्यत्रही होईल.

१ डेपो, लायब्ररी वगैरे.

मोठ्या घडाळ्यावरती ठोका तिहिंचा जों पडला ॥ तोंच तें आलें धरणीला ॥ इतक्यामध्यें ढमढेऱ्यांचा वाडा भडकुन गेला ॥ माल मुळिं नाहिं बाहेर आला ॥ सर्व दुकानांतून राकॉएल् कागद सांठवला ॥ त्याणें मदत झालि आगिला ॥ काळे गोरे बहुत शिपाई आले बंदोबस्ताला ॥ मारती चाबुक लोकांला ॥ चा० ॥ नाहिं छाति उभें रहाण्याची, कोठें विझवायाची ? ॥ झालि कुंठित गति बंबाची, कोठें घागरी तांब्याची ! ॥ वांटे राख होते गगनाची, कशि राहिल शहराची ! ॥ वाड्यांपैकीं एकहि कागद नाहिं हाता लागला ॥ लोक बहु० ॥ शहर० ॥ ४ ॥

घरवाल्यांची दुकानदारांची हानी जी झाली ॥ ती कोण सांगु शकेल वहिली ? ॥ हमालांना दुप्पट चौपट मजुरी जरि पोंचली ॥ जागचीं ओझिं नाहिं ढळलीं ॥ कैकांचे दागिने, रोख, धान्याचिं पोति हरवलीं ॥ आझुन त्यांचि नाहिं दाद लागली ॥ कितेक नगे फटिंग झाले कोण त्यानां वाली ? ॥ अधिकाऱ्यांचिं तोंडें सुकलीं ॥ चा० ॥ असो ; झालि गर्दि घनदाट, आला दिवस घडि आठ ॥ साहेब बहादुर फ्लंकेट, केला एकच नेट ॥ अजमासें * तीनशें साठ, ग्यारिसन्स आणिला थेट ॥ चा० प० ॥ संध्याकाळचे तीन वाजत तों कांहिं अग्नि शमविला ॥ लोक० ॥ श० ॥ ५ ॥

संध्याकाळीं पिटवुन दौंडी केला बंदोबस्त ॥ रात्रीं स्वारांची गस्त ॥ आठ वाजल्यापुढें कोणिही सांपडल्या रस्त्यांत ॥ बसवुन ठेवावा गेटांत ॥ बारकाइनें गुन्हेगारांचा शोध केला शहरांत ॥ गुन्हेगार तिन ठरले सेशनांत ॥ बापलेकानां काळेंपाणी दिलें मरण पावत ॥ तिसऱ्या दहा वर्षें मुदत ॥ चा० प० ॥ दुःखांमधिं सुख हें फार, विश्रामबागे शेजार ॥ कोणि नाहिं दगावला फार, लहान कीं थोर ॥ विनवि जोडुनि कर, आठल्ये हा शशिशेखर ॥ चा० प० ॥ एकदां हरपलि अपूर्व वस्तु येइल काय हाताला ? ॥ लोक बहु० ॥ शहर० ॥ ६ ॥

हें वर्णन जरी सर्वोपरी वाईट असेल ह्यांत संशय नाहीं, तरी ह्याच्या यो-

---

* दर रांगेमध्यें ५ शिपाई अशा, बुधवार वाड्यापासून बेलबागेचे समोरचे रस्त्यापर्यंत ३६ रांगा होत्या ; व आणखी तितक्याच मागें असाव्या असें वाटल्यावरून हा अजमास केला आहे.

गानें दुसरें एकादें सुंदर वर्णन एखाद्या सद्गृहस्थाचे हातून दृष्टीस पडण्याचा संभव आहे. तेव्हां तेवढ्याला जरी हें कारणीभूत झालें तरी माझा वरती दर्शविलेला उद्देश सिद्धीस गेला असें मी मानीन.

गुणदोष दाखविण्याबद्दल वेगळी प्रार्थना करणें नकोच. पत्रविस्ताराची क्षमा असावी ; कृपा असावी हे विज्ञप्ति.

मि० ज्येष्ठ वद्य १० शके १८०१.

मु० पुणें—ब्रो० हा०

---

( भवोहि लोकाभ्युदयाय तादृशाम् )

**रा० रा० निबंधमालाकर्ते यांस:—**

वि० वि० पत्रकर्ते महाराज, दिवसें दिवस थोर पुरुषांच्या चरित्रसंबंधी माहिती दुर्मिळ होत चालली होती, परंतु आपल्या सारख्यांच्या मनांत ही उणीव दूर करण्याचें आलें ही गोष्ट मोठी अभिनंदनीय समजली पाहिजे. आपण आज सुमारें पांच वर्षेपर्यंत नाना प्रकारचीं विघ्नें मध्यें आलीं असतां त्यांस न जुमानितां आपल्या भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ यथाशक्ति झटतां आहां हें पाहून कोणत्या आर्यजननीचे पुत्रास आनंद होणार नाहीं? वरील थोर पुरुषांचें इतिहासरूपजीवन मनमुक्त न मिळाल्यामुळें आपलें विद्यावन सुकून चाललें होतें ; परंतु आपण वारिसिंचन करण्याचें काम पतकरिल्यामुळें बाकीचे लोकांनींही लाजेकाजेनें ह्मणा किंवा कसेंही ह्मणा आपल्यास मदत करण्याकरितां कंबर बांधिली. या योगानें आपल्या विद्यावनास फिरून टवटवी येत चालली आहे. बरें असो ; पत्रकर्ते महाराज, पुढील आख्यायिका योग्य वाटल्यास छापण्याची मेहेरबानगी व्हावी.

महाराज, सहज देशपर्यटन करित असतां एका वृद्ध मनुष्याची गांठ पडली. कोणत्याही वृद्ध मनुष्याची गांठ पडल्यास मी त्यापासून नेहमीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न करितों. वरील वृद्ध मनुष्यापाशीं बोलत असतां त्यानें पुढील सगनभाऊविषयीं आख्यायिका सांगितली. सगनभाऊचें नांव आपल्या बहुतेक वाचकांस श्रुत असेलच. हा शिकलगार होता. याचे वंशज पंढरपुरीं

आहेत. या सगन भाऊस एक मुलगा होता. तो ऐन तारुण्याचे भरांत आला असतां एकाएकीं मरण पावला. त्या मुलास पुरण्याचे वेळेस सगनभाऊनें तत्काळ मोठ्या बहारीची व करूणरसमय अशी एक लावणी केली. ही लावणी म्हटल्यानंतर त्यानें आपल्या पुत्राचे प्रेतावर हार घातला. सगळा विधि-आटपल्यानंतर सगनभाऊची स्वारी घरीं परत आली. यानंतर सगनभाऊ फार दिवस वांचला नाहीं. पुत्रशोकवन्हि फारच तीव्र आहे; जसें ईश्वर राखील तसें राहिलें पाहिजे. एकंदरींत "भवितव्यता बलवती" असें म्हणणें भाग पडतें. असो; हें कवन या वृद्ध मनुष्यास सगळें येत नव्हतें. त्यानें या लावणीचें मूळ सांगितलें तें असें.

लाल गया संसार गया:——

मी ही सगळी लावणी मिळविण्याचे कामांत आहे. आपले शोधक वाचकही हिचा तलास लावितील अशी आशा आहे. कळावें, लोभ असावा ही विज्ञप्ति.

मु० डेक्कनकालेज } १८।६।७९ }

आपला विद्यार्थी
य० ना० रा०

---

रा० रा० निबंधमालाकर्ते यांस:—

वि० वि० तुकाराम बोवांनीं चंद्रभागेंत उभें राहून अदृश्य होतांना केलेले अभंग आपल्या मालेच्या ५६ व्या अंकांत छापिले आहेत. परंतु ते वांचून पाहतां तुकाराम बोवा भजन करितांना गुप्त झाले, किंवा चंद्रभागेंत गुप्त झाले, याबद्दलचा त्यांवरून निकाल होत नाहीं: ह्मणून हे पुढील अभंग पाठविले आहेत. यांवरून वरील गोष्टीचा अंशतः तरी निकाल होईल असें वाटतें.

॥ ९ ॥

येतों काकूळती धरावें हें चित्तीं। आमुचिये प्रीति अर्थ धरा ॥ १ ॥
आमुचे पाशीं नाहीं जकातीचें नाणें। सद[illegible] आहे तेणें काय दंड ॥२॥
आले विष्णुदूत आली विठ्ठलमूर्ति। अवसान चित्तीं सांपडलें ॥ ३ ॥
आला पाठमोरा इंद्रायणी जवळी। नामघोषें टाळी वाजविली ॥ ४ ॥
प्रथम तों पाय घातला पाण्यांत। राहिली ते मात तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ १३ ॥

आह्मी येतों आतां कृपा असों द्यावी । विनंती सांगावी सकळिकां ॥ १ ॥
वाढवेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठीं श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥
अंतकाळीं आह्मां विठ्ठल पावला । कुडी सहित झाला गुप्त तुका ॥ ३ ॥

या दोन अभंगांवरून वरील गोष्टीचा निकाल झाला. परंतु शेवटीं एक अभंग आहे तो थोडासा वेगळा आहे तो असाः—

॥ १९ ॥

शालिवाहनशके पंधराशें एकाहत्तर । विरोधी नामसंवत्सर उत्तरायणीं ॥१॥
फाल्गुन वद्य द्वितीया दिवस सोमवार । प्रथम प्रहर प्रातःकाळ ॥ २ ॥
तये दिवशीं शेवट कीर्तन करितां । ह्मणे मज आतां निरोप द्यावा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नमन साधुसंत पायां । ऐसें बोलोनियां गुप्त झाले ॥४॥

यावरून तुकारामाचे मरणाचा शक, महिना, तीथ, वार, प्रहर सुद्धां सर्व कळतें. असो, योग्य वाटल्यास पत्राचा स्वीकार करावा.

नेरे ता० पनवेल
ता० २९ मे १८७९

आपला एक
वाचक
मोरो गणेश लोंढे.

# निबंधमाला.

## अंक ५९.

### मोरोपंताची कविता.

सश्वेतःकैरवांतें विकच करि जगत्ताप संपूर्ण टाळी
अज्ञानध्वांत सारें हरि रसिकचकोरांसि अत्यंत पाळी ।
नाना वस्तु प्रकाशी कविहृदयपयोराशिसंतोषहेतू
काव्येंदु स्वप्रभेनें खलविरहिजनीं होतसे धूमकेतू ॥

'मंत्ररामायण'

१. येथवर मूळ संकल्पाप्रमाणें प्रस्तुत विवेचनाचे दोन भाग झाले. एक प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांवर विवरण; आणि दुसरें, त्याजविषयींच्या प्रशंसापर उद्गारांविषयीं विचार. आतां राहिलेला तिसरा भाग ह्मटला ह्मणजे प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या होत. त्या यापुढें दाखल करतों.

२. **मोरोपंता**च्या संबंधानें पहिला मोठा वाद ह्मटला ह्मणजे हा होय कीं, त्याला 'कवि' ही संज्ञा देतां येईल कीं नाहीं. हा वाद अर्थातच नव्या विद्वन्मंडळांत उत्पन्न झालेला आहे; जुन्यांस या वादाचा अर्थ ही फार करून कळावयाचा नाहीं. नव्या लोकांत तरी **मोरोपंत** हा कवि आहे कीं नाहीं ही चर्चा कशावरून निघाली याचा जर विचार केला, तर ती प्रख्यात इंग्रेजी कवि **ड्रायडन्** व **पोप्** यांच्यावरून निघाली आहे हें उघडच आहे. अर्वाचीन मंडळीची ही एक चमत्कारिक प्रवृत्ति सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं युरोपांतल्या व इकडल्या गोष्टींत सकृद्दर्शनीं साम्य आढळून आलें कीं लागलींच देशकालभेदाकडे बिलकुल लक्ष न पुरवतां, व वरील साम्य वस्तुतः बरोबर आहे कीं नाहीं याचाही फारसा विचार न करतां, तिकडच्या सारखी कृति इकडे उठवून द्यावयाची! युरोपाच्या इतिहासांत आढळलें, कीं मार्टिन्

लूथर हा *पोपवर उठून त्यानें धर्मक्रांति केली; कीं लागलींच इकडे शंकराचार्यांवर हत्यार धरून मंडळी सरसावलीच! पण साऱ्या युरोपाला दरारा घालणारा, आणि जॉन् राजास पदच्युत करून खुद्द नेपोलियनावर बहिष्कार घालणारा पोप कोणीकडे, आणि आमचे भिक्षावृत्ति गरीब बिचारे जगद्गुरु कोणीकडे हा कांहीं विचार नाहीं! 'स्कोलास्टिसिजम्' ह्मणून एक पांडित्यप्रकार युरोपांत कांहीं शतकांपूर्वीं मोठा जारी चालू होता, त्यापासून लॉर्ड बेकन्नें लोकांचीं मनें परावृत्त केलीं; हें ऐकल्याबरोबर आमच्या नवीन मंडळीस येथील शास्त्रविद्येंच व वरील प्रकाराचें पूर्ण साम्य दिसून येऊन न्यायमीमांसादि शास्त्रांचें शुष्कत्व तेव्हांच कळून येतें! † मूर्तिपूजेच्या संबंधानें आलीकडील विद्वत्समूहांत व विशेषत: नवीन सामाजिकांचे ठायीं कशा समजुती आढळतात याविषयीं गेल्या अंकाच्या आरंभीं थोडासा उल्लेख केलाच आहे. असो; तर प्रस्तुत वादाचें जें बीज,—कीं **मोरोपंत** हा कवि नव्हे,—हें **ड्रायडन्** व **पोप्** यांचें साम्य आमच्या महाराष्ट्र कवीशीं बळेंच घालून दिल्याचें फळ होय.

३. **ड्रायडन्** हा **मिल्टन्**शीं समकालीन होता. त्यानें अठ्ठावीस नाटकें रचलीं व अनेक लहान मोठीं काव्यें लिहिलीं. ल्याटिन् भाषेंतील महाकाव्य जें 'ईनियड्' त्याचें यानें इंग्रेजींत भाषांतर केलें. याच्या कवितेंतील मोठा विशेष म्हटला म्हणजे पदालालित्य हा गुण होय. पूर्वींचे **शेक्सपीयर**प्रभृति महाकवि व त्याशीं समकालीन असणार **मिल्टन्** वगैरे यांची काव्यशक्ति त्याच्याहून फार मोठी खरी, पण वरील गुण इंग्रेजी कवितेंत जो विशेषेंकरून दृष्टीस पडला तो प्रथमत: याच्या काव्यांत.‡ याच्यापुढें वरीलच काव्यपद्धति **पोप्**

---

* रोमन क्याथलिक लोकांचा रोम शहरांत राहणारा धर्माध्यक्ष पोप याचा व वरील कवीचा कांहीं संबंध नाहीं हें आमच्या मराठी वाचकांस सांगणें जरूर आहे. इतकें मात्र होतें कीं, वरील कवि क्याथलिक धर्माचा होता.

† वरील उल्लेख सकृद्दर्शनीं अतिशयोक्तिरूप वाटण्यासारखा आहे. पण त्याजविषयींची खात्री करून घेणें असल्यास 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' पाहावा किंवा रा. ब. देशमुख व रानडे यांचीं व्याख्यानें ऐकावीं. त्याप्रमाणेंच **मेकॉले**चा 'लॉर्ड बेकन्' हा निबंध वाचला असतां जुन्या ग्रीक व रोमन लोकांच्या तत्ववेत्त्यांचीं साहेब बहादुरांनीं कशी टर उडवून दिली आहे तें समजेल!

‡ **ड्रायडन्**नें इंग्रेजी भाषेवर कोणकोणते उपकार करून ठेवले हें **जॉन्सन्** पुढील उताऱ्यांत सांगतो:—

"Of Dryden's works it was said by Pope, "that he could select from them

यानें चालू केली. ड्रायडन्‌विषयीं पोप्‌ची पराकाष्ठेची पूज्यबुद्धि होती. पूर्वी होऊन गेलेल्या साऱ्या कवींमध्यें त्यानें वरील स्वकालीन कवीस पसंत करून त्याची पद्धति पुढें चालू करण्यांत व ती पूर्णदशेस आणून पोंचविण्यांत आपल्या आयुष्याचा व्यय केला. या परिश्रमांचें फळ 'इलियड्' चें भाषांतर व दुसरे पुष्कळ नानाविषयात्मक काव्यग्रंथ यांच्या रूपानें प्रादुर्भूत झाले. पोप्‌चा मोठा कवित्वगुण तरी पदलालित्य हाच होय. या गुणांत त्यानें इतकी कमाल करून टाकली आहे कीं, आतां त्याहून कोणी वरचढ होऊं पाहील तर तें प्राय: केवळ असाध्य होय. * पोप्‌चें माहात्म्य त्याच्या काळांत इतकें होतें कीं, त्याच्यापूर्वी ड्रायडन्‌ची जशी सर्वतोमुख ख्याति झाली होती, व पुढें जॉन्सन्‌चें जसें अतोनात प्रस्थ माजलें, त्याप्रमाणें लोकांची त्याजविषयींची समजूत 'न भूतो न भविष्यति' अशाच प्रकारची बहुतेक झाली होती. या वेळचे सर्व मोठमोठे ग्रंथकार हे त्याच्या आर्जवानें होते. काव्यकलेच्या संबंधानें पाहतां तर ती पोप्‌नेंच पूर्ण उदयास आणली अशी

---

( मागील पृष्ठावरून चालू. )

better specimens of every mode of poetry than any other English writer could supply." Perhaps no nation ever produced a writer that enriched his language with such a variety of models. To him we owe the improvement, perhaps the completion, of our metre, the refinement of our language, and much of the correctness of our sentiments. By him we were taught *sapere et fari*, to think naturally and express forcibly. Though Davis has reasoned in rhyme before him, it may be perhaps maintained that he was the first who joined argument with poetry. He showed us the true bounds of a translator's liberty. What was said of Rome, adorned by Augustus, may be applied by an easy metaphor to English poetry embellished by Dryden, *lateritiam invenit marmoream reliquit.* He found it brick, and left it marble."

---

* " It is remarked by Watts, that there is scarcely a happy combination of words, or a pharse poetically elegant in the English language, which Pope has not inserted into his version of Homer. New sentiments and new images others may produce; but to attempt any further improvement of versification will be dangerous. Art and diligence have now done their best, and what shall be added will be the effort of tedious toil and needless curiosity."

Johnson.

सर्वत्र प्रसिद्धि होऊन त्याचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति तेव्हांपासून जी पडली ती अद्याप ही दृष्टीस पडते. जॉन्सन्नें जीं दोन लहानशीं काव्यें रचलीं तीं वरील प्रवृत्तीचेंच उदाहरण होत.* वरील ग्रंथकारास साऱ्या इंग्रजी कवींत वरील दोघांचेंच काव्य फार आवडत असे; त्याच्या 'कविचरित्रां' त त्यांजविषयींचा वृत्तांत फार सविस्तर दिलेला असून दोघांची त्यानें फार चमत्कारिक तुलना केलेली आहे.†

प्रस्तुत शतकास आरंभ झाल्यापासून इंग्लंडांत अनेक विषयांवर मतांतरें सुरू झालीं. प्रकृत विषयाच्या संबंधानें तसेंच होऊन नवीन उपस्थित झालेल्या 'एडिन्बर्ग रिव्ह्यू' वगैरे त्रैमासिकांतून वरील कवींविषयीं विरुद्ध मजकूर येऊं लागला. जॉन्सन्सारख्या रसिकांनीं ज्या कवींची येवढी तारीफ केली होती, व ज्यांस कवित्वसिंहासनावर आरूढ करवून सर्वांच्या अभिवंदनास त्यांस पात्र करून ठेविलें होतें, त्यांस **मेकॉले**प्रभृति अर्वाचीन निबंधकारांनीं पदच्युत करून 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायानें **जॉन्सन्**प्रभृति मोठेल-

---

* अंक ३२ पृष्ठें ६।७ पाहा.

† वरील तुलना **पोप**च्या चरित्राच्या शेवटीं शेवटीं आहे. ती फारच लांब आहे यास्तव शेवटला उपसंहार मात्र येथें उतरून घेतों:—

"Of genius, that power which constitutes a poet; that quality without which judgment is cold, and knowledge is inert; that energy which collects, combines, amplifies, and animates; the superiority must, with some hesitation, be allowed to Dryden. It is not to be inferred, that of this poetical vigour Pope had only a little, because Dryden had more; for every other writer since Milton must give place to Pope; and even of Dryden is must be said, that, if he has brighter paragraphs, he has not better poems. Dryden's performances were always hasty, excited by some external occasion, or extorted by domestic necessity; he composed without consideration, and published without correction. What his mind could supply at a call, or gather in one excursion, was all that he sought, and all that he gave. The dilatory caution of Pope enabled him to condense his sentiments, to multiply his images, and to accumulate all that study might produce or chance might supply. If the flights of Dryden, therefore, are higher, Pope continues longer on the wing. If of Dryden's fire the blaze is brighter, of Pope's the heat is more regular and constant. Dryden often surpasses expectation, and Pope never falls below it. Dryden is read with frequent astonishment, and Pope with perpetual delight."

वाल्यांसही त्यांच्याबरोबरच खालीं ओढलें. तेव्हां आलीकडे सर्वानुमतें एकंदर असें ठरलें आहे कीं **पोप**प्रभृति कवि नादान व **जॉन्सन्**प्रभृति टीकाकार ही नादान ! कवित्वाचें तत्त्व दोघांसही माहीत नसून केवळ टुमदार रचना व नोंकझोंक या बाह्यगुणांवरूनच ते कवितेची पारख करीत ! या नवीन मतांचा विशेष प्रसार व दृढीकरण हें **वर्ड्स्वर्थ** नामक अर्वाचीन विख्यात कवीनें केलें. त्यानें आपल्या काव्यांस पूर्वींच्या वेळोवेळीं लिहिलेल्या प्रस्तावना एकत्र करून ज्या जोडल्या आहेत त्यांत अठराव्या शतकांतील कवींस व रसिकांस खऱ्या कवित्वाचें स्वरूप कितपत समजत होतें तें दाखविलें आहे. शिवाय प्रस्तुत विषयाच्या संबंधानें नुसतीं मतेंच प्रगट न करतां आमच्या 'रसगंगाधर'कार **पंडितरायांनीं** ज्याप्रमाणें स्वकृत व्याख्यानाचें पूरण स्वरचित उदाहरणांनीं केलें आहे, त्याप्रमाणें आपल्या स्वतःच्या नवीन कवितेच्या रूपानें वरील कवीनें आपल्या मतांचें समर्थन केलें आहे.

आतां वरील गोष्टींचें सादृश्य आमच्या मराठी कवितेकडे कसें लागतें तें पहा. **ड्रायडन्**विषयीं **मिल्टन्**नें एकदां अशी उक्ति प्रगट केली कीं, 'तो काय नुसता यमक्या आहे, कवि कसचा !' **पोप्**विषयीं ही पुष्कळांनीं अशाच प्रकारचा अभिप्राय दर्शविला आहे. या दोन गोष्टींवरून **मोरोपंता**विषयीं नवीन मंडळींचें मत ठाम ठरून गेलेंच,—कीं हा कवि कसचा ? हा बोलून चालून यमक्या; प्रास जुळावे, यमक साधावे, या गोष्टींकडे ज्याचें सदासर्वदा लक्ष लागून राहिलेलें, व यांतच ज्याची काय ती प्रतिष्ठा, त्याचें कवित्व तें काय असणार ? **जॉन्सन्**नें वर सांगितल्याप्रमाणें **ड्रायडन्**ची व **पोप्**ची तुलना करून **ड्रायडन्** यास **पोप्**हून वरची पायरी दिली आहे. हें पाहतांच इकडे **वामन** व **मोरोपंत** यांच्याविषयीं मत उत्पन्न झालेंच,—कीं कवि ह्मटला तर **वामन**च, **मोरोपंता**चा नुसता थाटमाटच पाहून घ्यावा ! पुढें मूषकमंडूकन्यायानें **ड्रायडन्** व **पोप्** या दोघांस ही उचलून भरारी मारणारा जसा **वर्ड्स्वर्थ** इंग्लंडांत निपजला, त्याप्रमाणेंच इकडे आमच्या देशांत ही **वामनास** वामनत्व देणारा व **मयूरा**चा पिच्छभार उतरवणारा एक महाकवि निपजून त्यानें सारा महाराष्ट्र देश दणाणून दिला आहे ! सारांश, आमच्या माजी पडलेल्या जगद्गुरूंच्या ह्मणण्याप्रमाणें इंग्रेजी व मराठी कवितांचें साम्य एकंदरींत 'ठीकसें ठीक' जुळून बसतें !

तर याप्रमाणें **मोरोपंता**च्या मुळीं कवित्वावरच जी आलीकडे धाड येऊन

पडली आहे तिचें कारण वर सांगितलेला ड्रायडन् व पोप् यांच्या संबंधानें उत्पन्न झालेला वाद होय. तिकडचें अनुकरण करून इकडे ही तिकडच्या सारखी कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची ही जी आधुनिक प्रवृत्ति तिचेंच केवळ फळ वरील वाद होय. बाकी ज्या पंडितांच्या तोंडून वरील कलमांत दाखल केलेले अनेक सिद्धांत ऐकूं येतात त्यांनीं ह्मणजे पोप्चीं किंवा ड्रायडन्चीं शेंदोनशें तरी पानें वाचलेलीं असतात किंवा आमच्या इकडच्या महाराष्ट्र कवींच्या वाङ्मयाशीं ते विशेष परिचित असतात असा मुळींच अर्थ नाहीं. एखाद्या मिशनरीस 'वेदां' विषयीं व्याख्यान देण्याची हुक्की आल्यास त्यास जितपत संहितेचें पारायण करावें लागतें,* 'षड्दर्शनां' विषयीं अभिमान प्रगट करतांना 'ज्ञानोदया' सारख्या पत्रांच्या प्रकाशकांस जितपत कणाद जैमिन्यादि अपवित्र शास्त्रकारांची ओळख करून घ्यावी लागते,+ मेकॉलेप्रभृति बहादरांस प्राच्यदेशांतील कोणत्याही कोनाकोपऱ्याविषयीं लिहावयाचें असल्यास त्यांस जितपत परिश्रम करणें अवश्य होतें,‡ किंवा आमच्या अर्वाचीन महापंडितांस

---

* वरील वेदव्याख्यानाचा एक मासला परवां येथें दृष्टीस पडला. अहमदनगरचे मिशनरी रे० टेलर साहेब यानीं नुकतें येथील पाद्रीशाळेंत वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. मिशनरी मजकुरास मराठी भाषेचें ज्ञान बऱ्यापैकीं आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसून आलें; पण याखेरीज सदरील व्याख्यानांत दुसरा कोणताही गुण दृष्टीस पडला नाहीं. मुख्य विषयाचें विवेचन ह्मटलें तर कांहीं इकडच्या तिकडच्या दहा वीस ऋचा व श्लोक गोळा करून टिपून आणले होते, व वेदांत किती विरोध आहेत हें दाखविण्याकरितां ते सर्वांस वाचून दाखविले, इतकेंच काय तें. आलीकडे शिक्षणाचा फैलावा पुष्कळ झाल्यामुळें पहिल्यासारखें 'पल्लवग्राहि पांडित्य' हल्लीं पुण्यासारख्या ठिकाणीं तरी चालणार नाहीं हें रेवरेंड साहेबांच्या सारख्यांसही कसें कळत नाहीं कोण जाणें! तरी सदरील व्याख्यानाच्या शेवटीं एका तरुण सभासदाकडून व्याख्यानकारास जें एक बरेंच खरमरीत उत्तर मिळालें त्यावरून त्यास कळलेंच असेल कीं आपलें पवित्रशास्त्रीय बोज येथें फारसें रुजलें नाहीं व रुजण्यासारखेंही नाहीं!

+ अंक ३१ पृष्ठ ३१ पहा.

‡ वरील ग्रंथकारानें एके प्रसंगीं आमच्या राममोहनरायाविषयीं असें म्हटलें:—

"Is it not notorious that the profundity of one age is the shallowness of the next; that the profundity of one nation is the shallowness of a neighbouring nation? Rammohun Roy passed, among Hindoos, for a man of profound Western learning; but he would have been but a very superficial member of this institute." 'Literature of Britain.'

जेंदावेस्ता आणि वेद, वेद आणि कुराण, कुराण आणि पवित्र शास्त्र, पवित्र शास्त्र आणि धम्मपद, धम्मपद आणि गुलामगिरी यांची झांगड घालून देतांना जितपत पंचाईत पडते,* तितपतच वरील कवित्वाची तुला धारण करणाऱ्या रसिकमंडळीस ! यास्तव या केवळ स्वकपोलकल्पित साम्याच्या संबंधानें येथें कांहीं लि-

---

(मागील पृष्ठावरून चालू.)

या ठिकाणीं विद्वत्तेच्या खोलीचें व उथळपणाचें जें माप घेतलें आहे त्या मापानें आमच्या पाश्चात्य पंडितांचें इकडील विषयाचें ज्ञान कितीसें भरेल ? ब्रम्हसमाजाच्या आद्यस्थापकास इंग्लिश भाषेचें व इंग्रजी विद्यांचें जितपत ज्ञान होतें तितपत संस्कृताचें ज्ञान व शास्त्रांची माहिती किती प्रोफेसरांच्या ठायीं आढळेल ? आणि त्यांतून ज्या पंडितवर्यांनीं प्राच्य व पाश्चात्य विद्यांच्या योग्यतेवर बेधडक मिनिट झोकून दिलें त्यांच्या ज्ञानाची गर्हरिता तर कोठवर वर्णावी ! ! ( अंक ३० पृष्ठें २०।१ पहा. )

---

* वरील श्रेणीपैकीं पहिल्या विषयावर एक बडें व्याख्यान आह्मांस कांहीं दिवसांपूर्वी मुंबापुरस्थ आर्यसमाजांत ऐकायास सांपडलें. व्याख्यान कोणत्या तऱ्हेचें होईल याची कल्पना आह्मांस पूर्वी झालीच होती, पण मुंबईकरांस व विशेषत: दयानंदजींच्या जुक्तिवाल्यांस तें कितपत रुचतें हें पहाण्याची आमची इच्छा होती. पाहिलें तों सर्व यथास्थित चाललें होतें ! व्याख्यात्यांनीं हिंदुस्थानावरून पार्सदेशावर, पार्सदेशावरून रूमशामच्या मुलखावर, रूमशामावरून शार्मण्य देशावर, याप्रमाणें उड्डानावर उड्डान चालवून शेवटीं स्वारी ऐलॅंडावर जाऊन थांबली, व या सर्व देशांतून आर्यधर्म चालू होता असें आपल्या गुरुबंधूंस व परम भाविक श्रोत्यांस त्यांनीं कळविलें ! इंग्रेजी बहुमानार्थक संबोधन 'सर' याचीही त्यांनीं नवीच उत्पत्ति आपल्या प्रिय समाजबंधूंस सादर केली ; ती ही कीं, वरील शब्द 'आर्य' शब्दाचा अपभ्रंश होय ! ! या अजब चिजा ऐकून आह्मी तर अगदीं थक्क होऊन गेलों, पण आमच्या मुंबईकर आर्यबंधूंच्या चेहऱ्यावर आश्चर्याचें वगैरे कांहींएक चिन्ह नजरेस आलें नाहीं. जें जें आलें तें ते त्यांनीं खुशाल कान पसरून बहुमानपूर्वक ऐकून घेतलें. ठीकच आहे, ज्या महाभाविकांस 'आदम' ( आदिमः ), 'पूजारी' ( पूजेचा अरी ) या व्युत्पत्ति महागुरूंच्या मुखावाटे निघाल्या असतां चांगल्या ग्राह्य झाल्या, ज्यांच्या माजी अध्यक्षांनीं वि●यतेंत छापलेल्या गीताभाष्याच्या उपोद्घातांत 'कौवरव' ( कौरव ) शब्द 'कुंवार' शब्दापासून निघालेला आहे म्हणून प्रतिपादन केलें आहे, ती मंडळी 'सर' शब्दाच्या मूळशोधिकेला कशाला नाक मुरडील ! आह्मांस खास वाटतें कीं, 'आर्य: ' याचें इंग्रेजी रूपांतर Sirrah असें करून जरी व्याख्यात्यांनीं आपल्या प्रिय बंधूंस सादर केलें असतें तरी तें चाललें नसतें असें नाहीं !

हिणें अवश्य आहे असें वाटत नाहीं. त्यांतून वरील तुलनेचा एक पक्ष आमच्या मराठी वाचकांस अगदींच अपरिचित पडल्यामुळें आह्मी जरी वरील खटपट केली तरी व्यर्थ खटाटोप मात्र होणार !

वास्तव **ड्रायडन्** आणि **वामन**, **पोप्** आणि **मोरोपंत**, **वर्ड्स्वर्थ्** आणि 'वीररसप्रधान काव्यां'चे कर्ते, या युग्मत्रयांत परस्पर कितपत साम्य आहे याविषयींचें विवेचन तूर्त एकीकडे ठेवूं. प्रस्तुत वादाचा निर्णय होण्यास सध्यां वेवढेंच बस आहे कीं, **मोरोपंत** हा कवि नव्हे असें जे प्रतिपादन करतात त्यांच्या आक्षेपांचें निरसन करून आमच्या स्वतःच्या मतांचीं कारणें पुढें वाचकांस सादर करतों.

४. **मोरोपंत** हा कवि नव्हे या प्रमेयावर सविस्तर उपपादन ज्यांत केलें आहे असा ग्रंथ अद्याप मुळींच झाला नाहीं. मराठी कविता वाचणारे आपल्या लोकांत किती आहेत याचा विचार केला असतां वरील गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं; आणि त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्रकवीचें काव्य वाचून वरील निर्णय करणारा मनुष्य तर थोडाच आढळेल असें वाटतें ! ज्यांस शोध न करितां मतें भराभर झोकून देण्याची भारि हौस, जे केवळ दुसऱ्याच्या अभिप्रायाचा अनुवाद करणारे, किंवा ज्यांचा एकाद्या गोष्टीविषयीं एकादा ग्रह एकदां होऊन बसला ह्मणजे बसला; अशाच मंडळीच्या पायीं आजपर्यंत आमच्या बिचाऱ्या देशाची एकंदरींत विटंबना झालेली आहे. असो; तर वरील सविस्तर ग्रंथाच्या अभावीं प्रस्तुत विषयावर कोठें कोठें जे दोन चार उल्लेख आमच्या आढळण्यांत आले आहेत त्यांचें येथें अवतरण करून त्यांविषयीं विवेचन करतों.

'विविधज्ञानविस्तारा' च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या व सातव्या अंकांत 'मोरोपंत' या सदराखालीं कांहीं मजकूर लिहिलेला आहे हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्यांतील पुढील तीन उतारे घेतोंः—

"नलाख्यानांत कोठें एक आर्या आहे ती अशी—

राधाप्राप्त्यर्थ जसा
तो स्वकरगतामला यशा शिनळ ॥
सोडी दमयंत्यर्थ
क्षिप्रचि अतिदुर्लभा तशाशि नळ ॥

यमक जोडण्यासाठीं ज्याणें भगवंताला शिनळ असें विशेषण दिलें, त्याची भक्ति केवढी होती ती सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भागवतांत दुष्टांनीं जी परमेश्वराची निंदा केली आहे त्या श्लोकांचा टीकाकारानें प्रथम वास्तविक अर्थ सांगून, नंतर टीकेच्या योगानें भगवंताची निंदा आपल्या ही तोंडांतून झाली ह्मणून दोषशमनार्थ पुनः त्याच श्लोकांचा अर्थ ओढूनताणून स्तुतिपर केला आहे. **मोरोपंताला** हें ठाऊक असून त्याला तें अभद्र भाषण करण्यास अगदीं संकोच वाटला नाहीं; किंबहुना लज्जा देखील वाटली नसावी.

येथें श्रीकृष्णाला शिनळ ह्मणून, त्याणें राधेसाठीं आपलें निर्मळ यश घालविलें असें कवि ह्मणतो. असें जर आहे तर त्याचे गुण कां गावे? श्रीमद्भागवतांत कृष्णाची आणि गोपींची क्रीडा शुकाचार्यानें वर्णिली आहे. परंतु शुकाचार्य एवढा साधु आणि ऊर्ध्वरेता असून त्याणें ती क्रीडा कधीं दूषिली नाहीं; परंतु त्या कृत्यांला भगवंताचीं यशें असें ह्मटलें आहे. **मोरोपंताला** तीं कृत्यें वाईट वाटत होतीं असें ही कोठें आढळत नाहीं. दुसरें, जर श्रीकृष्ण जार, तर त्याची उपमा नळाला साजत नाहीं. कारण नळानें हंसाला पाठविलें तें जारकर्माच्या हेतूनें नव्हे."

" विराटपर्वांत अर्जुन उत्तरास सांगतोः—

न्यावा चमूवरि तुवां
रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥

वीररसांत श्रृंगाररस मिसळल्यानें काव्यास कशी गोडी येत असते ती एक **मोरोपंताचे** भक्तच केवळ जाणत असतात; इतरांस अतर्क्य. अशाच एका प्रतींचें उदाहरण देऊन होरेशियस् नामें रोमी कवि ह्मणतोः—

Risum teneatis, amici ?. 'मित्रहो, हें पाहून तुम्ही हंसल्याशिवाय रहाल काय ?"

" **मोरोपंतानें** रामायणांत कोठें एक उत्प्रेक्षा केली आहे ती अशीः—

सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली जशी वृकें एणी ।
त्या लंकेची श्रीभू देवीनें ओढिली असे वेणी ॥

रामचंद्रानें शिलासेतु बांधला, तो कवि म्हणतो सेतु नव्हे, तर काय? आपली

कन्या जानकी रावणानें नेली या कारणानें पृथ्वीनें त्या रावणाची लंकारूप जी स्त्री तिची वेणी धरून ओढिली आहे.

काय हा अलंकार ! रावणानें जर दुसऱ्याची बायको आणली, तर त्याच्या स्त्रियेला तें बरें वाटेल काय ? सहसा वाटणार नाहीं. तर मग तिची उगीच कां वेणी धरून ओढावी ?

रा० ब० भास्कर दामोदर यांणीं नवनीताचे प्रस्तावनेंत ह्या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्यांला तीजमध्यें काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचें मत तर अगदीं भिन्न.''

' अनेक विद्या मूलतत्वसंग्रहांत एके ठिकाणीं असा लेख आहे:—

"वाक्याचा किंवा त्यांतील शद्बांचा अर्थ दोहोंकडे लागत असला म्हणजे श्लेष नामक अलंकार होतो. जसें;

तूं मलिन कुटिल नीरस
जडहि पुनर्भवपणें हि कच साच ।
धरिला शिरींहि न स्व—
प्रकृतिगुण त्यजिसि नाम कच साच.

**मोरोपंत.** कचोपाख्यान.

ह्या स्थळीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं केंसासही लागतात. साधारण कवि ह्या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यांस दुर्बोधता आणितात, व त्यांच्या ग्रंथांत एका शद्बाचे दोन अर्थ होत असतात, एवढ्यानेंच त्यांस व किती एक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात: पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत. हें आमचेंच मत आहे असें वाचणाऱ्यांनीं समजूं नये ; तर मोठमोठ्या सुज्ञ ग्रंथकारांचें ही मत असेंच आहे.''

आतां अनुक्रमें करून वरील चारी स्थलांविषयीं विचार करूं.

(१) प्रस्तुत आर्या वनपर्वांतर्गत नलोपाख्यानांतील आहे. तिचा अर्थ उघडच आहे, कीं नलराजाच्या हातीं हंस सांपडला असतां तो त्यास सोडून देता झाला ; कसा ? तर जसें कृष्णानें राधेशीं रमण्याची इच्छा धरून आपल्या हातचें निर्मल यश घालविलें. या आर्येंत नलाचें आणि कृष्णाचें,

दमयंतीचें आणि राधेचें, हंसाचें आणि यशाचें, असें तीन प्रकारचें साम्य कवीनें वर्णिलें आहे, व उपमालंकार केला आहे. वरील तीन साम्यांपैकीं चित्तास चमत्कार देणारें साम्य ह्मटलें ह्मणचे हंस आणि यश यांचें होय, व उपमेचा मुख्य भाग ह्याच होय. कृष्ण आणि राधा यांच्या जागीं आणखी कोणाची योजना केली असती तरी चालली असती; कारण त्यांचें नल आणि दमयंती यांशीं जें सादृश्य वर्णिलें आहे तें केवळ गौण आहे. मुद्याची गोष्ट कायती अमूर्त* जें यश त्याशीं संस्कृत कवींच्या संकेतास † अनुसरून मूर्त जो परमशुभ्र हंस त्याची तुलना करून दोहोंशीं 'सोडणें' या क्रियेचा चमत्कारिक रीतीनें अन्वय करून दिला आहे ही होय. ही तुलना यथार्थ असली ह्मणजे कवीचें काम झालें; व जो खरा रसिक आहे त्याचें लक्ष तिच्या पलीकडे तिळमात्रही जाणार नाहीं. आमच्या टीकाकर्त्यानें कृष्णास 'शिनळ' हें विशेषण लावणें बरोबर आहे कीं नाहीं, शुकाचार्याचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय होता व **मोरोपंताचा** कसा होता, हंसाला जो दमयंतीकडे पाठविला तो जारकर्माच्या हेतूनें नव्हे, अतएव श्रीकृष्णाची उपमा नळाला साजत नाहीं,—वगैरे जें पांडित्य केलें आहे तें निवळ अरण्यरोदन आहे. त्याचा वरील आर्येतील उपमेशीं बिलकुल संबंध नाहीं. **मोरोपंताच्या** धर्मसं-

---

* उपमा ह्मणजे दोन वस्तूंचें चमत्कारिक सादृश्य असल्यामुळें सजीव व निर्जीव, मूर्त व अमूर्त, अशांचें सादृश्य विशेष चमत्कारास्पद होय हें उघडच आहे. प्रस्तुत शतकाच्या आरंभीं विलायतेंत त्रैमासिकांची जी नवी तऱ्हा निघाली तींतील पहिलें जें 'एडिन्बर्ग रिव्ह्यू' (अंक २८ पृ० ११-२ पहा) त्याचा मुख्यस्थापक व प्रकाशक जो विख्यात टीकाकर्ता **जेफ्री** त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे :—

"It has always been our opinion that the very essence of poetry—apart from the pathos, the wit, or the brilliant descriptions which may be embodied in it, but may exist equally in prose—consists in the fine perception and vivid expression of that subtle and mysterious analogy which exists between the physical and the moral world, which makes outward things and qualities the natural types and emblems of inward gifts and emotions."

† संस्कृत कवींचे संकेत अनेक आहेत. ते येणेंप्रमाणें :—कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व; तरुण स्त्रियांच्या मद्यगंडूषानीं बकुलवृक्षाचें फुलणें; हत्तींच्या गंडस्थळांत मोतीं; चकोरांचें चंद्रकिरणसेवन; चक्रवाकपक्ष्यांचा सूर्यास्ताबरोबर वियोग व सूर्योदयाबरोबर संगम; इ० इ०

बंधी मतांविषयीं जर विचार कर्तव्य असता, तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व ऊहापोह यथायोग्य होता ; पण जोंपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेंच विवेचन आहे तोंपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय !

(२) विराटपर्वांत उत्तरगोहरण प्रसंगींची पुढील आर्या आहे:—

बैस रथीं तूं माझा सारथि हो तरणिचा जसा अरुण ।
न्यावा चमूवरि तुवां रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥

या आर्येंत वीररसांत श्रृंगाररसाची भेसळ झाली आहे ती आमच्या आक्षेपकास खपत नाहीं. वरील रससंकराच्या योगानें त्याच्याठायीं हास्यरसाची उत्पत्ति होऊन तो जों वाहवत गेला आहे तों टैबर नदींत जाऊन पडला आहे ! आह्मी रोमकभाषानभिज्ञ असल्यामुळें होरेशियस् बोवांचें काय रससूत्र आहे व वरील हास्यरसोद्धार त्यांनीं कोणत्या संबंधानें प्रगट केला आहे हें आह्मांस माहीत नाहीं. तरी गीर्वाणभाषेच्या आयुधागारांतील पुढील कालिदासीय अस्त्र आमच्या बिचाऱ्या प्राकृत कवीचा बचाव करील असें वाटतें—

राममन्मथशरेण ताडिता
दु:सहेन हृदये निशाचरी ।
गंधवद्रुधिरचंदनोक्षिता
जीवितेशवसतिं जगाम सा ॥*

हें पद्य ' रघुवंशा ' च्या अकराव्या सर्गांतलें आहे. प्रसंग ताटकावधाचा असून वरील पद्यांत ताटकेवर श्लेषकरून अभिसारिकेचें रूपक केलें आहे हें उघडच आहे.

आतां श्रृंगारांत वीराचें मिश्रण असल्याचा प्रकार पहा—

शांते मन्मथसंगरे रणभृतां सत्कारमातन्वती
वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुंडलम् ।
बिंबोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्योरणत्कंकणे
पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बंधक्रम: ॥ †

---

* " ( ताटकापक्षीं ) रामाच्या दु:सह शरानें हृदयाचे ठायीं विद्ध झालेली ती राक्षसी दुर्गंधयुक्त रक्तानें न्हालेली होत्साती यमसदनास गेली. "

" ( अभिसारिकापक्षीं ) मदनाच्या दु:सह शरानें विद्धहृदय होत्साती ती अभिसारिका सुगंधयुक्त रक्तचंदनाचा लेप केलेली अशी प्राणेशाच्या संकेतस्थानीं गेली. "

† अंक ४१ पृष्ठ २२ पहा.

वरील दोन उदाहरणांवरून वाचकांस कळून येईलच, कीं शृंगार आणि वीर यांचा परस्पर केवळ विरोध आहे असें नाहीं. येवढें मात्र खरें आहे कीं, कोणी वीर रणावेशानें भरून गेला असतां त्याच्या तोंडून शृंगारोक्ति वदविणें, किंवा कोणी अनंगरंगमग्न झाला असतां त्यानें वीरश्रीचें भाषण करणें, हें शोभणार नाहीं ; पण उपमेकरतां शृंगारांत वीररस आला किंवा वीरांत शृंगार आला तर तो हास्यास्पद होतो असें नाहीं. लौकिक भाषेंतही ‘ रतियुद्ध ’ आणि ‘ रणनवरा ’ या शद्बांवरून वरीलच प्रमाण मिळतें.*

त्यांतून ज्या प्रसंगविशेषीं वरील शृंगारोपमा योजली आहे तेथें तर ती विशेष शोभते असें आह्मांस वाटतें. ज्या महावीरानें पंजरस्थ सिंहाप्रमाणें बारा वर्षें वनवास काढला, व तेराव्या वर्षीं तर ज्यास क्लीबवेष धारण करून स्ववीर्याचा निन्हव करणें भाग पडलें, आणि भावी समरप्रसंगाची ज्यास नुसती वार्ता कळल्याबरोबर—

उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी ।

अशी ज्याची अवस्था झाली, त्यास चिरकांक्षित जें शत्रुसेनेचें दर्शन तें घडलें असतां केवढा हर्ष होणारा आहे व रणतुंबळ करण्याविषयीं केवढें प्रबळ बाहुस्फुरण होणार आहे ! वरील बाहुस्फुरणास आमच्या मतें एकच अत्यंत समर्पक दृष्टांत होय ! †

---

* गीर्वाणकविमुकुटमणीच्या ग्रंथांत ही पुढील उपमा आढळतात :—

स निर्विश्य यथाकामं तटेष्वालीनचंदनौ ।
स्तनाविव दिशस्तस्याः शैलौ मलयदुर्दुरौ ॥

असह्यविक्रमः सह्यं दूरान्मुक्तमुदन्वता ।
नितंबमिव मेदिन्याः स्रस्तांशुकमलंघयत् ॥

रघुवंश ४.

† प्रख्यात इंग्रजी कवि **स्कॉट्** याच्या अत्युत्कृष्ट काव्यांत पुढील उल्लेख आढळतो. हा तर वादविषयक आर्येबरोबर अर्थसादृश्याच्या सदराखालीं देण्यासारखा आहे:—

“Twice have I sought clan-Alpine's glen
In peace ; but when I come agen,
I come with banner, brand and bow,
As leader seeks his mortal foe.
For *love-lorn swain, in lady's bower,*
*Never panted for the appointed hour,*
As I, until before me stand
This rebel Chieftain and his band.”

*Lady of the Lake—V.*

( ३ ) आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कीव आली आहे. या किंववरून त्याची सदयता प्रकट होते, पण सहृदयता होत नाहीं. पहिल्या आक्षेपांत कृष्णभक्ति अस्थानीं प्रकट होऊन ती जशी प्रस्तुत रसिकाच्या यथार्थ दर्शनास विघातक झाली त्याप्रमाणेंच येथें वरील हृदयवृत्ति झाली आहे. लंका ही रावणाची स्त्री यास्तव तिजविषयीं सीतेची माता जी भूदेवी तिची अत्यंत द्वेषबुद्धि होणें हें स्त्रीस्वभावास अनुसरूनच आहे, व आपल्या कन्येचा ज्या दुष्टानें विनाकारण छळ आरंभला आहे त्याच्यावर कसा तरी प्रतीकार घडो अशी इच्छा तीस होणें हें ही सहजच आहे. द्वेषाचें व प्रेमाचें मनुष्यापासून मनुष्याकडे किंबहुना पदार्थाकडे ही कसें संक्रमण होत असतें हें मनुष्यस्वभावाकडे ज्यानें अंमळ लक्ष पुरविलें असेल त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे. आमचे कविकुलगुरु यक्षाच्या मुखें मेघास सांगतात——

भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः । *

"बा मेघा ! तुजकडे शिवगण मोठ्या प्रेमानें बघत राहतील. कां ? तर तुझा वर्ण त्याच्या स्वामीच्या कंठासारखा आहे ह्मणून !" तर हृदयवृत्तीच्या संक्रमणाचा इतका प्रभाव आहे. आतां हें खरें आहे कीं, रावणानें आपली मुलगी चोरून नेली तर त्याच्या बायकोकडे काय अपराध आहे, तिला तर घरांत सवत आल्यानें वाईटच वाटणार आहे, वगैरे गोष्टींचा विचार आमच्या आर्यभूमीनें करणें जरूर होतें. पण हा तीस कसा झाला नाहीं कोण जाणें ? असो; स्वतः क्षमा खरी, पण या प्रसंगीं तीच आमच्या

---

* भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः
पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धाम चंडीश्वरस्य ।
धूतोद्यानं कुवलयरजोगंधिभिर्गंधवत्या-
स्तोयक्रीडानिरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥

'मेघदूत'

( महाकाल [illegible] त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें
प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघतिल भावें ।
तया स्थलींचा बालोद्यानें हलवी मारुत मंद
विलसित पद्मां डोलवूनि जो हरी तयाचा गंध ॥ )

'पद्यरत्नावली.'

रीसकाच्या क्षमेस पात्र आहे ! आमच्या कवीच्या हातून तरी वरील चूक कशी घडली हें ही चांगलेंसें कळत नाहीं. पण पुढील शतकांत सगळेंच पारडें फिरून जाऊन नवे प्रभु, नवी विद्या, नवे महाकवि, नवे रसिक, अशी गर्दीच गर्दी होऊन जाणार आहे, व उपमा उत्प्रेक्षा वगैरे जोखण्याचे विलायती कांटे या देशांत येऊन थडकणार आहेत हें तरी त्या बिचाऱ्याच्या कोठून लक्षांत यावें !

वरील उत्प्रेक्षेची प्रशंसा केल्याबद्दल कै० भास्कर दामोदर पाळंदे यांजवर ही प्रस्तुत टीकाकर्त्याचा शेवटचा फटकारा गेला आहे. पण माजी रावबहादुरां- सारख्या खऱ्या रसिकास चमत्कार वाटण्याजोगें वरील उत्प्रेक्षेंत कांहींच ना- हीं असें आह्मांस वाटत नाहीं. एक तर केशाकर्षणाचा प्रकार स्त्रियांच्या कृतीस अनुसरून असल्यामुळें स्वभावोक्तिरूप होय; आणि शिवाय सेतूचें आणि वेणीचें सादृश्य कृष्णत्वास्तव, दैर्घ्यास्तव, आणि संवीतत्वास्तव अत्यंत समर्पक व हृदयंगम होय !

यापमाणें ' विविधज्ञान विस्तारां ' तील आक्षेपांचें निरसन झालें. यावरू- न आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच, कीं जे आक्षेप कित्येक पंडितंमन्य प्रस्तुत कवीवर आपल्या विद्वत्तेच्या घमेंडींत झोकून देतात त्यांविषयीं यथार्थ बुद्धीनें विचार केला असतां ते प्राय: असेच नाहींसे होणार आहेत. त्यांतून कवींचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखू पाहणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय !

असो; आतां शेवटला जो ' अनेकविद्यामूलतत्वां ' तील उतारा त्याविषयीं विचार करायाचा. हा हातीं घ्यावयाचें आह्मांस मोठें भय वाटतें. यापूर्वी आह्मी आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांविषयीं, इंग्रेजी ग्रंथकारांविषयीं, विलायती धर्माविषयीं वगैरे जें जें लिहिलें त्या सर्वांवरून राजद्रोहाचा व सद्धर्मद्रोहाचा जबरदस्त चार्ज आह्मांवर आला, व वरील महापातकांची निष्कृति आह्मी अ- द्याप करीतच आहों. तेव्हां यावरून पाहतां वरील पुस्तकांतील लेखाविरुद्ध अभिप्राय प्रगट केल्यानें तर केवढा भयंकर गुन्हा होणार आहे याची कल्पना ही करवत नाहीं ! जर इंग्रेज लोकांस न रुचण्यासारखें कांहींही लिहिल्यानें राजनिष्ठेचा लगेच चुराडा होऊन जातो; आणि तो कां, तर ते आमच्या देशाचें राज्यसूत्र हातांत वागवून आमचें रक्षण करताहेत व त्यांच्या कृपेनें आम्हांस ज्ञानप्राप्ति झाली आहे म्हणून; तर मग मुळीं जन्मलाभच जेथपासून

त्या ठिकाणीं विरोध प्रगट करणें हें तर केवढें धार्ष्ट्य व केवढा अधमपणा होय ! आपले राज्यकर्ते जें जें करतील त्यास नेहमीं मान डोलवीत जायची ही जर राजनिष्ठा, इंग्रेज ग्रंथकारांच्या पेनांतून जें जें निष्पन्न होईल तें तें शिरसावंद्य करायाचें ही जर सत्यनिष्ठा, पाद्री साहेब जें जें सांगतील त्यास 'आमेन्' (तथास्तु) या एकच्या पदानेंच उत्तर करायाचें ही जर धर्मनिष्ठा, तर मग 'बाबावाक्यं प्रमाणम्' हेंच पितृभक्तीचें परमस्वरूप होय ! या कडकडीत व्रताची दीक्षा घेऊन तें आजन्म अबाधित पाळण्याचा ज्यांचा कृतसंकल्प असेल व त्यांत ज्यांस धन्यता वाटत असेल त्यांस ती सुखेनैव वाटो. आमच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति तर अगदीं निराळ्या प्रकारची आहे; व आम्हीं आजपर्यंत जेवढें वाचलें व ऐकलें त्यावरून वरील प्रवृत्तीचें दोषरूपत्व ही अद्याप आमच्या लक्षांत आलें नाहीं. शिवाय हें हीं सांगणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं, कीं ज्या महापंडिताचा पितृनामानें निर्देश करण्याचा अधिकार जगदीशाच्या कृपेनें आमच्याकडे आहे, ज्याचें पूर्ववय गदाधरादिकांच्या समागमें जाऊन उत्तरवय मिल्प्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या संगतीनें गेलें, रविकूरगतकमलन्यायानें ज्याच्या विकासप्रद सान्निध्याचा अमूल्य लाभ आजपर्यंत इतका काळ आह्मांस लाभला, आणि ज्याचें स्वभाषाभिवृद्धीचें व्रत आज पांच वर्षें यथाशक्ति चालवून देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगीकार ही ज्याच्या पद्धतीस अनुसरून आम्हांस अवश्य करणें आहे,—त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आम्हांस पूर्ण खात्री आहे. तर आतां येवढी प्रस्तावना करून व परमपूज्य श्रीमत्पितृपदीं प्रमाण करून पूर्वोक्त अवतरणाविषयीं आमचे विचार वाचकांस सादर करतों.

सदरील उताऱ्यांतील मुख्य गोष्ट 'हवा तेथें प्रयोग' ही होय. ह्मणजे मोरोपंतानें ज्या प्रसंगीं वरील आर्येत श्लेषाची योजना केली आहे तो प्रसंग श्लेषरचनेस उचित नव्हे हा त्यावर आक्षेप होय. आतां वरील श्लेष अप्रासंगिक कां याचा जर विचार केला तर येवढेंच कारण दिसतें कीं, देवयानीचें बोलणें रोषाचें आहे, यास्तव चित्तवृत्ति कलुष झाली असतां श्लेषाची स्फूर्ति कोठून होणार? मिरवणुकीच्या वेळची घोड्याची ऐटदार चाल जशी रणांगणावर अप्रासंगिक होईल, त्याप्रमाणेंच क्रोधाच्या शोकाच्या वगैरे भाषणांत श्लेष तर काय, पण सामान्यतः कोणताही अलंकार शोभणार नाहीं ! पण असें असतां सर्वमान्य महाकवींच्या ग्रंथांतून पाहिलें असतांही शोकाच्या क्रो-

धाच्या वगैरे आवेशांत केलेलीं भाषणें ही केवळ अलंकारविरहित असतात असें नाहीं. काव्याचा मुख्य हेतु मनोरंजन असल्यामुळें अलंकाराचा थोडा-बहुत प्रयोग वरील प्रसंगींही केलेला आढळतो. उदाहरणार्थ पुढील श्लोक पहा—

स्वप्नांतरेऽपि खलु भामिनि पत्युरन्यं
या दृष्टवत्यसि न कंचन साभिलाषम् ।
सा संप्रति प्रचलितासि गुणैर्विहीनं
प्राप्तुं कथं कथय हंत परं पुमांसम् ॥

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालंकृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।
सा मामकीनकवितेव मनोभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥ *

वरील पद्यें जगन्नाथकृत 'भामिनीविलासा'च्या 'करुण' नामक तृतीय विलासातील आहेत. पहिल्या पद्यांत 'गुण,' आणि 'पर पुमान्' हे शब्द श्लिष्ट आहेत; व दुसऱ्याचा तर सगळाच अर्थ श्लेषमय आहे.

तेव्हां वादविषयक आर्येत श्लेषाच्या प्रयोगाबद्दल जर आमच्या कवीवर दूषण आलेंच, तर तें वरील महारसिकावर व महाकवीवर ही तितक्याच मानानें येणार आहे !

शिवाय हें ही लक्षांत आणलें पाहिजे कीं, निर्भत्सनेच्या भाषणांत नामाच्या यथार्थत्वाविषयींचा किंवा अयथार्थत्वाविषयींचा उल्लेख येणें हें अगदीं साहजिक आहे. कोणी गोरा मनुष्य असतां त्यास उद्देशून रागानें बोलतांना 'तूं बाहे-

---

* न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा
स्पृहायुक्तें चित्तें जितकमलनालोत्तमभुजा ।
सुशीला तूं ऐशी पर पुरुष जो निर्गुण तया
कशी पाहूं जाशी हरिणनयने सत्वरतया ॥

गुणांनीं जी पूर्णा अणुसम नसे दोषहि जिला
अलंकारीं साजे रस वसत जे जींत पहिला ।
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां
वसे ती पद्माक्षी मम हृदयिं जेंवी सुकविता ॥

'पद्यरत्नावली'

र जितका गोरा आहेस तितका आंतून काळा आहेस,' किंवा तो वर्णानें काळा असल्यास 'तूं आंत बाहेर सारखाच काळा आहेस' अशी बोलण्याची प्रवृत्ति लोकव्यवहारांत सुद्धां आढळते. मग काव्यांत तर हा प्रकार आढळेलच आढळेल. 'गीतगोविंदां'त विप्रलब्धा नायिका नायकास रोषपूर्वक ह्मणते:——

बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनं ।
कथमथ वंचयसे जनमनुगतमसमशरज्वरदूनम् ॥

"हे कृष्णा! तूं बाहेरून जसा अत्यंत मलिन (काळा) आहेस त्याप्रमाणेंच तुझें मन ही आहे असें वाटतें; एरवीं मदनसंतापानें पीडलेल्या अशा स्वानुरक्त जनाचें वंचन तुझ्या हातून कसें होईल?"

कृष्णास व बलरामास धनुर्यागप्रेक्षणार्थ बोलवायास कंसाकडून अक्रूर आला असतां गोपी भग्नमनोरथ होत्सात्या अक्रूरास शिव्या देतात:——

यमदूतशतक्रूर हि स्वमुखें अक्रूर ह्मणवितो मेला ।
आला गांव वधाया परि बाई हा न लेश कोमेला ॥

तेव्हां वरील प्रमाणांवरून पाहतां वादविषयक आर्येंतील श्लेषावर अप्रासंगिकत्वाचा जो दोषारोप केला आहे तो दूर होईल असें वाटतें.

वरच्याखेरीज इतर जीं दूषणें प्रस्तुत कवीवर वरील लेखांत सामान्यत: दिलेलीं आहेत त्यांविषयीं यापूर्वीं विचार झालेलाच आहे. श्लेषाचा प्रयोग आमच्या कवीस कितीसा प्रिय होता व तो त्याच्या कवितेंत कितीसा आढळतो, तसेंच जीं थोडींबहुत अशीं स्थलें आहेत त्यांस श्लेषरचनेच्या योगानें दुर्बोधत्व कितीसें आलें आहे, याविषयीं येथें कांहीं निराळें लिहिणें नकोच. वरील सर्व गोष्टींचा विचार झाला असतां प्रस्तुत महाराष्ट्र कवीची 'साधारण कवि' या पदांनीं जी अवगणना केली आहे ती ही सहजच निराधार होणार आहे! *

---

* आमच्या वडिलांचा प्रस्तुत महाराष्ट्र कवीवर शेवटपर्यंत मोठा कटाक्ष असे. सुमारें पंधरा वर्षांपूर्वीं आह्मा शाळेंतील पाठाच्या आर्या त्यांजपाशीं वाचीत होतों तेव्हांपासून तों परवां 'नवनीता'च्या नवीन आवृत्तीच्या वेळीं कांहीं मंडळी त्यांजकडे कांहीं दुर्बोध आर्या घेऊन आली होती तोंपर्यंत त्यांचा रोख प्रस्तुत कवीवर सारखा होता. इतर

सुभाषित—(१) हृदयं कौस्तुभोद्भासि हरेः पुष्णातु वः श्रियम् ।
राधाप्रवेशरोधाय दत्तमुद्रमिव श्रिया ॥

"कौस्तुभानें शोभा पावणारें असें विष्णूचें हृदय तुमचें कल्याण करो; कीं ज्याचे ठायीं वरील रत्नाच्या मिषानें लक्ष्मीनें जणों काय मोहोरच करून ठेवली आहे, कीं राधेनें आंत प्रवेश करूं नये ह्मणून!"

(२) पिनाकफणिबालेंदुभस्ममंदाकिनीयुता ।
तथापि भव ते मूर्तिरपवर्गानुसारिणी ॥

"हे शंभो! तुझी मूर्ति पिनाक (धनुष्य), फणी (सर्प), बालेंदु (बालचंद्र), भस्म, आणि मंदाकिनी (स्वर्गंगा) यांनीं युक्त असतांही अपवर्गातें ह्म० मोक्षातें देणारी आहे." पिनाक, फणी, बालेंदु, भस्म, आणि मंदाकिनी या शब्दांचीं आद्याक्षरें अनुक्रमानें पवर्गांतील आहेत हें उघडच आहे.

(३) द्रुतं यस्यालोकाद्विरहिजनशोकापनयनं
यदंके सानंदं नयनमरविंदं विहरति ।
न यस्यापीति श्रीः कचनिचयराहोरपि पुनः
समे खेदं रामावदनहिमधामा शमयतु ॥

स्त्रीमुख व चंद्र यांचें व्यतिरेकवर्णन—

"ज्याच्या आलोकानें (अवलोकनानें; प्रकाशानें) विरहिजनांच्या शोका-

---

(मागील पृष्ठावरून चालू.)

विषयांवर त्यांच्या मतांची चलबिचल झालेली आमच्या लक्षांत आहे; पण प्रकृत विषयावर मात्र त्यांचा अभिप्राय जो एकदां ठाम बसून गेला होता तो होता! जुन्या व नव्या पंडितांचें बिचाऱ्या **मयूर**कविविषयींचें अप्रेम त्यांच्या ठायीं एकवटलेलें होतें. **मोरोपंत** मुळीं कवीच नव्हे, तर पुराणांतील अर्थ घेऊन तो शुद्ध प्राकृत भाषेंत त्यानें आर्यारूपानें ग्रथित केला येवढीच काय ती त्याची करामत, हें त्यांचें ठरीव मत होतें. महाराष्टकवींत 'कवि' ही संज्ञा एका **मुक्तेश्वरा**ला मात्र बरोबर रीतीनें लागेल असें ते नेहमी म्हणत असत. सन १८६६ सालच्या ट्रेनिंग कॉलेजांतील परीक्षेंत पुढील प्रश्न आढळतो:—

"(३ प्र०)—मुक्तेश्वर व मोरोपंत या दोघांनींही शकुंतलाख्यान लिहिलें आहे; त्यांत तुम्हांस विशेष चांगलें कोणतें वाटतें तें सांगून त्याचीं कारणें लिहा."

शालापत्रक—जुलै १८६६

चें हरण तेव्हांच होतें ; ज्याच्यापाशीं नयनरूप कमल आनंदानें विहार करतें, आणि कचकलापरूप जो राहु त्याच्या योगानेंही ज्याचें तेज कमी होत नाहीं, तो स्त्रीमुखरूप चंद्रमा माझ्या संतापास दूर करो!" विरहिजनांचा ताप खऱ्या चंद्राच्या योगानें वाढतो, कमलें संकुचित होतात, व राहुग्रासाची त्यास भीति असते, या तीन गोष्टी प्रसिद्धच आहेत.

(४) मौलौ किंनु महेश मानिनि जलं किं वक्त्रमंभोरुहं
किं नीलालकवेणिका मधुकरी किं भ्रूलता वीचिका ।
किं नेत्रे शफरी किमु स्तनयुगं प्रेंखद्रथांगद्वयं
साशंकामिति वंचयन् गिरिसुतां गंगाधरः पातु नः ॥

शिवानें गंगेस मस्तकीं धारण केली असतां त्याचा व पार्वतीचा संवाद—

"हे महेशा! हें मस्तकावर काय?—हे मानिनि! हें जल आहे; तोंड दिसतें आहे तें?—तें कमल आहे; नील केशपाश दिसतो आहे हा?—तो मधुकरींचा समूह आहे; भ्रूलता दिसते आहे,—तो तरंग आहे; डोळे?—ते दोन मासे आहेत; स्तनयुग?—तें जलविहार करणारें चक्रवाकांचें जोडपें आहे;—याप्रमाणें साशंक झालेली जी पार्वती तिचें वंचन करणारा गंगाधर आमचें रक्षण करो!"

(५) धन्यास्ते कवयो यदीयरसना रूक्षाध्वसंचारिणी
धावंतीव सरस्वती द्रुतपदन्यासेन निःक्रामति ।
अस्माकं रसपिच्छिले पथि गिरां देवी नवीनोदयत्
—पीनोत्तुंगपयोधरेव युवतिर्मांथर्यमालंबते ॥

"ते कवि धन्य होत, कीं ज्यांच्या जिव्हारूप कोरड्या ठणठणीत रस्त्यावरून सरस्वती ही भराभर पावलें टाकीत धांवतच निघून जात असते; पण आमची स्थिति अशी आहे कीं, जिचे पीनोत्तुंग पयोधर नवे उद्भेद पावले आहेत अशी युवति निसरड्या जागेवरून जात असतां जशी जपून हळूं हळूं चालते, त्याप्रमाणें आमची वाग्देवी रसानें परिप्लुत अशा मार्गावरून मंद मंद पदांनीं गमन करते!" 'रस' आणि 'पद' या शब्दांचे दोन दोन अर्थ सुगमच आहेत.

(६) समये पयोधराणामपतितया नैव शक्यते स्थातुम् ।
उत्कंठिताऽसि बाले नहि नहि सखि पिच्छिलः पंथाः ॥

" या पयोधरकालीं ( वर्षासमयीं ) अपतिता मोठी दुःसह होय, ह्मणजे पतिसमागमाशिवाय दिवस कंठणें मोठें कठीण आहे. ही कोणा एका तरुणीची उक्ति ऐकून तिची सखी तीस विचारते, ' अगे, उत्कंठित झाली आहेस काय ? ' बाला उत्तर करते, " छे छे ! चोहोंकडे चिखल झालेला म्हणून अपतितावस्था ह्मणजे पडल्याशिवाय राहणें कठीण आहे असें मी ह्मणतें ! " हें छेकापन्हुतीचें उदाहरण होय.

(७) भीतिर्नैव भुजंगपुंगवविषात्प्रीतिर्न चंद्रामृतात्
नाशौचं नृकपालकंठलुलनाच्छौचं न गंगाजलात् ।
नोद्वेगश्चितिभस्मनो नच सुखं गौरीस्तनालिंगनात्
आत्मारामतया हिताहितसमः स्वस्थो हरः पातु वः ॥

" ज्याला गळ्यांतील महासर्पांच्या विषापासून भीति नाहीं, व शिरस्थ चंद्राच्या अमृतापासून आनंद नाहीं; गळ्यांत नरकपालांची माला रुळत असल्यानें ज्याला अपवित्रता नाहीं, व जटाजूटस्थ गंगेच्या जलापासून पावित्र्य नाहीं; ज्याला चिताभस्म अंगास फासल्यापासून उद्वेग नाहीं, व गौरीच्या स्तनालिंगनापासून सुख नाहीं;—असा इष्टानिष्टांविषयीं उदासीन व आत्मस्थितीस पावल्यामुळें सदोदित स्वास्थ्य अनुभवणारा शिव तुमचें कल्याण करो ! "

(८) नायं प्रयाति विकृतिं विरसो न यः स्यात्
न क्षीयते बहुजनैर्नितरां निपीतः ।
जाड्यं निहंति रुचिमेति करोति तृप्तिं
नूनं सुभाषितरसोऽन्यरसातिशायी ॥

" सुभाषितरसाची दुसऱ्या कोणत्या ही रसास सर येणार नाहीं ; पहा कीं, इतरांप्रमाणें हा कधीं ही विकार पावत नाहीं, विरस होत नाहीं, बहुतांनीं सेवन केला असतां ही कमी होत नाहीं, जाड्याचें ( मूर्खत्वाचें ) हरण करतो, रुचीची वृद्धि करतो, आणि आनंददायक होतो ! "

(९) दुर्जनहुताशदग्धं काव्यसुवर्णं विशुद्धिमुपयाति ।
दर्शयितव्यं तस्मान्मत्सरिमनसः प्रयत्नेन ॥

" काव्यरूप सुवर्ण दुर्जनरूप अग्नींत दग्ध झालें असतां अत्यंत शुद्ध होतें; यास्तव मत्सरी मनाच्या मनुष्यांस तें आदरून दाखवावें ! "

(१०) तएव पदविन्यासास्तएवार्थविभूतयः ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥

" तीच शब्दांची योजना व तेंच अर्थाचें गौरव, तथापि पदरचनेच्या चातुर्यानें काव्य नवेंसें भासूं लागतें ! "

(११) इह तुरगशतैः प्रयांतु मूर्खाः
धनरहिता विबुधाः प्रयांतु पद्भ्याम् ।
गिरिशिखरगताऽपि काकपंक्तिः
पुलिनगतैर्न समत्वमेति हंसैः ॥

" मूर्ख हे शंभर घोड्यांवर बसून फिरोत, व पंडित हे निर्धन होत्साते पायांनींच चालोत; तरी पंडित जे श्रेष्ठ ते श्रेष्ठच; पहा कीं, पर्वतशिखरावर बसलेली काकपंक्ति ही नदीच्या वाळवंटावर फिरणाऱ्या हंसांची बरोबरी करूं शकत नाहीं ! "

(१२) कतिचिदुद्धत्तनिर्भरमत्सराः
कतिचिदात्मवचस्तुतिशालिनः ।
अहह केऽपि निरक्षरकुक्षय-
स्तदिद संप्रति कं [illegible] श्रमः ॥

" कोणी पाहावे, तर त्यांच्या ठायीं मत्सर परिपूर्ण नांदत असून वरचेवर उचंबळत असतो; कोणी पाहावे, त्यांस आपल्या स्वतःच्या कवितेखेरीज इतर कोणाची ही पसंत नसून तिची कायती नेहेमीं प्रशंसा; बाकी पुष्कळ तर विचारे अक्षरशत्रूच; तेव्हां काव्य जें करायाचें तें कोणासाठीं ह्मणून करावें ?"

(१३) स्थिरा शैली गुणवतां खलबुद्ध्या न बाध्यते ।
रत्नदीपस्य हि शिखा वात्ययाऽपि न नाश्यते ॥

" जे स्वभावतःच सज्जन त्यांचें शील खलांच्या उपदेशानें बिघडत नाहीं; कसें ? तर ज्याप्रमाणें रत्नदीपाची ज्योत वावटळीच्या ही वाऱ्यानें विझत नाहीं !

(१४) केनांजितानि नयनानि मृगांगनानां
को वा करोति रुचिरांगरुहान् मयूरान् ।
कश्चोत्पलेषु दलसन्निचयं करोति
को वा करोति विनयं कुलजेषु पुंसु ॥

" हरणींच्या डोळ्यांत कोणीं अंजन घातलें आहे ? मोरांचे पिसारे चित्रविचित्रित कोणीं केले आहेत ? नीलकमलांस पत्रशोभा कोणीं दिली ? कुलज जे पुरुष त्यांच्या ठायीं विनय कोणीं आणला ? "

(१५) माभूत्सज्जनयोगो यदि योगो मा पुनः स्नेहः ।
स्नेहो यदि विरहो मा यदि विरहो जीविताशा का ॥

" प्रथमतः सज्जनांची गांठच पडूं नये, पडली तर स्नेह जडूं नये, तो ही जडलाच तर मग विरह तरी होऊं नये; कां कीं विरह झाल्यावर मग जीविताची आशा कशाला हावी ?"

(१६) अनुकुरुतः खलसुजनावग्रिमपाश्चात्यभागयोः सूच्याः ।
विदधाति रंध्रमेको मुद्रणमस्यापरोऽपि विदधाति ॥

" खल आणि सज्जन हे सुईच्या पुढल्या व मागल्या भागांप्रमाणें होत; रंध्र पाडणें हें पहिल्याचें काम व त्याचें आच्छादन करणें हें दुसऱ्याचें ! "

(१७) यदमी दशंति दशना रसना तत्स्वादुसौख्यमनुभवति ।
प्रकृतिरियं विमलानां क्लिश्यंति यदन्यकार्येषु ॥

" हे दांत जें चावतात त्याचें मधुर सौख्य जिव्हा अनुभवते ; निर्मल अंतःकरणाचे जे सज्जन त्यांचा स्वभावच हा, कीं दुसऱ्याच्या कल्याणाकरितां कष्ट सोसावे !"

(१८) लक्ष्मीर्यादोनिधेर्यादो नादो वादोचितं वचः ।
बिभेति या धीवरेभ्यो जडेष्वेव निमज्जति ॥

"लक्ष्मी ही समुद्रांतील जलचर आहे हें वचन वादास्पद नव्हे ; कां कीं, ती धीवरांस ( पक्षीं, बुद्धिमान् पुरुषांस ) भिते, व जडांचे ठायीं निमज्जन पावते ! " ह्मणजे बुद्धिमंतांस प्राप्त होत नाहीं, व जड म्हणजे मूर्ख यांजपाशीं वास करते. 'ड' आणि 'ल' यांच्या साम्यास्तव 'जलांत बुडून राहते' हा श्लेषार्थ उघडच आहे.

(१९) एकेन तिष्ठताऽधस्तादन्येनोपरि तिष्ठता ।
दातृयाचकयोर्भेदः कराभ्यामेव सूचितः ॥

" दाता आणि याचक यांजमधील भेद पालथा आणि उलथा हात येवढ्यानेंच सूचित होतो ! "

(२०) लक्ष्मीपयोधरोत्संगकुंकुमारुणितो हरेः ।
धन्यो बलिः स येनास्य भिक्षापात्रीकृतः करः ॥

" बलीची धन्यता काय वर्णावी ? कीं ज्यानें लक्ष्मीकुचाभोगकुंकुमानें रंगलेला जो हरींचा हस्त त्यास दानग्रहणार्थ भिक्षापात्र करविला ! "

(२१) दुर्जनसहवासादपि शीलोत्कर्षं न सज्जनस्त्यजति ।
प्रतिपर्व तपनवासी निःसृतमात्रः शशी शीतः ॥

" दुर्जनांचा सहवास घडला असतांही साधु आपलें उत्तम शील टाकीत नाहीं ; पहा कीं, प्रति अमावास्येला चंद्राला सूर्याचा सहवास घडतो, पण त्याजपासून निघाला पुरे, कीं लागलींच आपलें शीतलत्व प्रकट करतो ! "

(२२) विगृहीतः पदाक्रांतो भूयोभूयश्च खंडितः ।
माधुर्यमेवावहति सुश्लोकइव सज्जनः ॥

" उत्कृष्ट श्लोकाचा जसा विग्रह केला, पदें पाडलीं, किंवा पुनः पुनः निरनिराळा अन्वय लावला तरी त्याचें सौंदर्य कमी होत नाहीं, त्याप्रमाणेंच सज्जनाशीं विग्रह (कलह) केला, त्यास पदाक्रांत केला ( ह्म० त्याची अवज्ञा केली ), किंवा त्याची वारंवार खंडना केली, तरी त्याचें नैसर्गिक शील ढळत नाहीं ! "

(२३) अपूर्वः कोऽपि कोपाग्निः सज्जनस्येतरस्य च ।
एकस्य शाम्यति स्नेहाद्वर्धते ऽन्यस्य वारितः ॥

" सज्जन व दुर्जन यांचा कोपाग्नि किती विलक्षण तऱ्हेचा आहे पहा ! कीं एक स्नेहाच्या योगानें शमला जातो, व दुसरा वारला असतां वृद्धि पावतो ! " 'स्नेह' शब्दाचा दुसरा अर्थ 'तेल' हा होय ; व 'वारित' याचा अर्थ 'पाण्यापासून' असा होतो. तेलानें विस्तव विझणें व पाण्यानें वाढणें हें विलक्षण आहे हें उघडच आहे.

(२४) जलनिधौ जननं धवलं वपुः
मुररिपोरपि पाणितले स्थितिः ।
इति समस्तगुणान्वित शंख भोः
कुटिलता हृदये न निवारिता ॥

" हे शंखा ! तुझें जन्म समुद्रांत झालें, तुझें शरीर पांढरें शुभ्र आहे, मुरारीच्या हस्ततलीं तुला सदोदित वास घडतो, याप्रमाणें समस्त गुणांनीं तूं युक्त असतां तुझ्या हृदयाच्या ठायींची कुटिलता कांहीं निघाली नाहीं ! " शंखाचें अभ्यंतर वक्र असतें हें प्रसिद्धच आहे.

(२९) यत्रात्मीयो जनो नास्ति भेदस्तत्र न विद्यते ।
कुठारैर्दंडनिर्मुक्तैर्भिद्यंते तरवः कथम् ॥

" जेथें घरचा भेद्या मिळाला नाहीं तेथें फूट पडत नाहीं ; जर कुऱ्हाडीचे दांडे काढून घेतले तर झाडें कशीं तुटलीं जातील ? "—' कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ' ही ह्मण प्रसिद्धच आहे.

---

**विनोद, महदाख्यायिका**—( फाजील शहाणपण )—एक इंग्लंडांतील ड्यूक पारिस शहरांत गुप्तपणें जाऊन राहिला होता. एके समयीं त्यास राजवाड्यांत जावयाचें होतें ; यास्तव बरोबर एक हबशी चाकर घेऊन तो तिकडे निघाला. वाटेनें त्यानें आपल्या काळ्या चाकरास बजावून ठेविलें कीं, जर वाड्यांत मजविषयीं तुझ्यापाशीं कोणी विचारपूस केली, तर माझा धनी येथलाच (फ्रान्सचाच) रहिवाशी आहे असें तूं सांगत चल. धन्यानें बजावल्याप्रमाणें विचारपूस राजवाड्याच्या तोंडींच झाली. तेव्हां शिदी चाकरानें उत्तर केलें, " माझा धनी येथला रहिवाशी आहे, व मीहि येथलाच आहें ! "

## नवा शिलिंग.

एक गृहस्थ लंडन शहरांतून चालला असतां एका गाडीवाल्यास हाक मारून ह्मणाला, " अरे, सरकारी ब्यांकेपर्यंत मला पोंचविशील काय ? " गाडीवाला हो ह्मणाला, व तेथपर्यंतचें भाडें एक शिलिंग घेईन असें त्यानें सांगितलें. गृहस्थ गाडींत बसला व गाडी चालू झाली. पण वरील ठिकाणापर्यंत न जातां मधेंच एका सरकारी आफिसापुढें गाडी उभी करून गाडीवाल्यानें दार उघडलें, आणि वरील गृहस्थास उतरावयास सांगूं लागला. गृहस्थ ह्मणतो, " अरे, ब्यांकेच्या बंगल्यापाशीं उतरावयाचें ह्मणून कबूल करून येथेंच कोठें उतरवतोस ? " गाडीवाला ह्मणतो, " महाराज, याच कचेरीला आम्ही ब्यांक म्हणतों. " गृहस्थ मुकाट्यानें खालीं उतरला, आणि

खिशांतून सहा पेन्स काढून त्यानें गाडीवाल्याच्या हातावर ठेवले, आणि म्हणाला, "याला आम्ही शिलिंग म्हणत असतों!"

### न्यायाची समदृष्टि.

अमेरिकेंतील एका शहरांत एका नीग्रोला जाणूनबुजून चोरीचा माल विकत घेतल्याबद्दल फटके मारण्याचा हुकूम झाला. तो हुकूम ऐकून नीग्रो न्यायाधीशास म्हणतो, "महाराज, माझेंही थोडें बोलणें ऐकून घेत असाल तर मी बोलतों." न्यायाधीशानें बोल म्हणून सांगितलें. शिद्दी म्हणतो, "सरकार, मला जर आपण शिक्षा करतां तर मग गोऱ्या लोकांना कां करीत नाहीं?" कोर्ट उत्तर करतें, "जर त्यांच्यापैकीं कोणी तुझ्यासारखा गुन्हा केला, तर त्यांसही असेंच शासन होईल!" आरोपी म्हणतो, "तर मग या माझ्या धन्याला पकडा, मी चोरीचा माल आहें असें नाहीत असतां त्यानें मला विकत घेतलें!" बिचाऱ्या नीग्रो लोकांवर युरोपांतील ख्रिस्तभक्तांची केवढी कृपा होत असे व त्यांचा पशूंप्रमाणें क्रयविक्रय कसा चालत असे हें आमच्या वाचकांपैकीं कोणासही बहुधा सांगायास नकोच.

### बहिरा आणि मुका.

इंग्लंड हें जरी आलीकडे संपत्तीचें केवळ अगर होऊन बसलें आहे तरी खुद्द लंडन शहरांतही हजारों लोक अन्नावांचून भटकत असतात. यांपैकीं कित्येकजण मोठे लबाड असतात; शरीराची व्यंगता बळेंच धारण करून भोळ्या धार्मिक लोकांजवळून ते पैसे उपटतात. वरील प्रकारचा एक भावार्थी मनुष्य एकदां रस्त्यानें जात असतां एका भिकाऱ्यानें मोठ्या दीन स्वरानें त्याची काकळूत केली, आणि कांहीं पोटाला द्या म्हणून त्याजपाशीं त्यानें भारी गळ घेतली. या गृहस्थानें पाहिलें तों भीक मागणारी स्वारी चांगली गलेलठ्ठ आहे व शरीरासही कांहीं व्यंगाबिंग बिलकुल नाहीं! तेव्हां तो त्यास म्हणतो, "अरे, तूं तर चांगला दांडगा दिसतोस, तुला भीक मागायाला काय झालें आहे? कोठें कारखान्यावर काम धरीनास!" भिकारी उत्तर करतो, "महाराज, काय करूं! आज सात वर्षें झालीं, कानांनीं ऐकूं येईनासें झालें आहे व तोंडानें बोलतांही येत नाहीं; मजसारखा बहिरा व मुका कामाला काय उपयोगी?" ती त्याची आपत्ति पाहून वरील भल्या मनुष्यास भारी वाईट वाटलें, व 'गरीब बिचारा!' असा खेदोद्गार काढून त्यानें त्याच्या हाता-

वर एक गिनी ठेवला. घरीं आल्यावर वरील भाविक गृहस्थानें आपल्या बायकोस त्या भिकाऱ्याची विपन्नावस्था निवेदन केली, आणि हळहळून म्हणाला, " अरेरे ! श्रवणशक्ति व वाक्‌शक्ति या दोन्ही नाहींशा होऊन मनुष्यानें मृत्पिंड होऊन पडणें हें केवढें दुःखास्पद आहे बरें ? " बायकोनें पुसलें, " हा मनुष्य आज सात वर्षें अशा अवस्थेंत आहे हें तुह्मांस कसें समजलें ? " नवरा उत्तर करतो, " अगे, कसें समजलें म्हणजे ? त्यानेंच खुद्द सांगितलेंना ! "

## ताजा विद्वान्.

इंग्लंडांतील एका श्रीमंत शेतकऱ्यानें आपला मुलगा विद्याभ्यासाकरतां विद्यालयांत ठेविला होता. कॉलेजास सुट्टी झाल्यावर चिरंजीवांची स्वारी घरीं आली. बाप जुन्या काळचाच असल्यामुळें श्रीमंतीचीं नवीं ढगें त्यानें घरांत चालू केलीं नव्हतीं; आपल्या पूर्वस्थितीचें स्मरण ठेवून जेवणाखाणाचा बेत त्यानें पहिल्यासारखाच साधा ठेविला होता. एके दिवशीं संध्याकाळच्या उपहाराला तो, त्याची बायको, व मुलगा अशीं तिघें बसलीं असतां मेजावर दोनच पदार्थ वाढले होते. ते पाहून मुलगा बापास ह्मणतो, " बाबा, न्यायशास्त्र आणि गणितशास्त्र यांच्या योगानें हीं दोन खाद्यें तीन आहेत असें मी सिद्ध करून देईन ! " बाप ह्मणाला, " ठीक आहे, कर सिद्ध पाहूं. " मग मुलानें आपलें शास्त्रीय ज्ञान प्रगट करून येणेंप्रमाणें कोटिक्रम लढविला;— ह्मणाला, " पहा ! हा पदार्थ एक; एक झाला ?–हा दोन; दोन झाले ?— आणि एक न् दोन तीन ! ! ! " तें गौडबंगाल पाहून आईबापांस मोठें कौतुक व समाधान वाटलें. मग बाप वरील **गौतमपुत्रास** ह्मणतो, " वा ! ही क्लृप्ति तर मोठी उत्तम काढलीस ! ठीक आहे, आतां हा एक पदार्थ मी आपल्याला घेतों, हा दुसरा तुझ्या आईला देतों, आणि राहिलेला तूं उचल म्हणजे झालें ! ! "

## वैद्याची पारख.

एका मनुष्याचा दांत हालूं लागून त्यांत फार पीडा होऊं लागली; यास्तव तो आपल्या गांवाहून एका मोठ्या शहरीं आला, आणि एका प्रसिद्ध दंतवैद्याकडून त्यानें आपला दांत उपटविला. सर्व क्रिया आटपल्यावर गांवठी मनुष्य डाक्तरास ह्मणतो, " बरें, आतां आपल्या शस्त्रकर्माबद्दल आपणांस काय

द्यावयाचें ? आपला या कामाकडे फारसा वेळ गेला नाहीं, यास्तव वेळेच्या मानानें काय सांगायाचें तें सांगा." डाक्तरानें पांच शिलिंग दिले पाहिजेत म्हणून सांगितलें. तें ऐकून गांवढळ मनुष्य चकित होत्साता ह्मणतो, "काय, पांच शिलिंग! किती फी सांगितलीत ही! अहो, दोन वर्षांपूर्वी आमच्या गांवीं एक शस्त्रवैद्य आला होता; त्यानें माझे दोन दांत उपटून काढले. त्या कर्माला त्याला पुरे दोन तास लागले; आणि जो अटाट पडला तो तर कांहीं पुसूं नये! त्यानें मला साऱ्या खोलीभर नाचविलें, आणि पांच सहा वेळां त्याचा चिमटा सांडला. पण इतकें सर्व होऊन त्यानें मजपासून सारा एक शिलिंग घेतला! मग एका मिनिटाच्या कामाबद्दल तुम्ही पांच शिलिंग मागतां हा चमत्कार नव्हे काय? मला तर वाटतें, तुम्ही माझी मस्करी करीत आहां!"

## वर्गणीचा निकाल.

एका अमेरिकन वर्तमानपत्राची वर्गणी एका मोठ्या अंमलदाराकडे फार दिवस थकली होती. तिजबद्दल त्याजकडे अनेकवेळां मागणी केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं एके दिवशीं वरील पत्राच्या व्यवस्थापकाची व अंमलदार मजकुरांची एके ठिकाणीं गांठ पडून समक्ष बोलणें झालें. त्यावेळेस असें ठरलें कीं, उद्यां वर्गणीच्या रकमेचा फडशा करायाचा. व्यवस्थापकानें वरील गृहस्थास निक्षून विचारलें कीं, हें तरी बोलणें अगदीं निश्चयाचें आहे काय? कां मागल्यांसारखीच आणखी एक थाप! अंमलदारानें सांगितलें कीं, मागें झालें तें झालें, उद्यांचें वचन कधीं टळायाचें नाहीं; जर उद्यांच्या उद्यांच मेलों तर उपाय नाहीं, पण जर जिवंत असेन तर पैसा पोंचल्याखरीज कधीं राहायाचा नाहीं! येवढी जिवावरची अट जेव्हां वरील थोर गृहस्थानें सांगितली, तेव्हां आतां सहसा हा आपलें वचन फिरवणार नाहीं असें म्यानेजर मनांत समजले, आणि उगीच राहिले. दुसरा दिवस उजाडला,—अस्तमान झाला; वर्गणीचा ठिकाण नाहीं! तिसऱ्या दिवशीं वरील वर्तमानपत्राचा दिवस होता. पत्र नेहेमीप्रमाणें साऱ्या वर्गणीदारांकडे गेलें, तसेंच वरील थोर गृहस्थांकडेही आलें. लिफाप फोडून आंत वांचूं लागतात तों भले लांबलचक दोन कॉलम काळे दृष्टीस पडले! कोण एकाएकी गचावलें म्हणून पाहतात तों आपलेंच नांव मोहोऱ्यावर आहे! तो सर्व विचित्र प्रकार पाहून सदरील मनुष्यास केवढा आचंबा वाटला असेल हें सां-

गणें नकोच ! वरील काळ्या कालमांत त्याचा अथपासून इतिपर्यंत अवघा वृत्तांत दिला असून त्याच्या गुणांचेंही वर्णन केलें होतें ; एक मात्र दोष त्यांत काढला होता कीं, वर्तमानपत्रांची वर्गणी वेळचे वेळेस भरण्यांत लोकांतरास गेलेल्या गृहस्थांकडून कसूर होत असे ! असो ; वरील मृतलेख वाचून सदर्हू अंमलदारास भारी चटपट लागली ; मग तसाच सकाळच्या न्याहारीची वाट न बघतां वरील वर्तमानपत्राच्या कचेरीकडे तडक निघाला. वाटेनें त्याच्या दुसरी एक अशी मौज दृष्टीस पडली कीं, पुष्कळ ओळखीची व स्नेही मंडळीही त्याला भेटली ; पण कोणीही त्याला पाहून बिलकुल आश्चर्य दाखविलें नाहीं. तेव्हां तो मोठ्या बुचकळ्यांत पडला कीं, हें आहे तरी काय ? माझे स्नेहीही मला इतक्यांत इतके विसरून गेले काय ? याप्रमाणें अगदीं भांबावून गेलेली वरील स्वारी छापखान्यांत येऊन दाखल झाली. त्यांच्याकडे पाहतांच म्यानेजर मोठें आश्चर्य दाखवून त्यांस म्हणतो, " अं ! एकून तुम्ही मेलां नाहीं तर ; वा: ! आमची भलतीच समजूत झाली ! " अंमलदार विचारतो, " अहो, माझ्या मरणाची कल्पना तरी तुमच्या मनांत आली कशी ? " व्यवस्थापक उत्तर देतो, " कां बरें ? तुम्ही परवां काय बोललां होतां तें इतक्यांत विसरलां काय ? तुम्हींच सांगितलेंना, कीं जर—" हे शब्द ऐकतांच एकंदर गोष्ट मृतोत्थित गृहस्थांच्या लक्षांत येऊन चुकली. मग तावडतोब तेथल्या तेथें आपल्याकडील बाकी चुकती करून त्यांनीं म्यानेजरापाशीं विनंति केली कीं, पुढील अंकांत मागील चुकीची दुरुस्ती मेहेरबानी करून झाली पाहिजे. म्यानेजर हंसत म्हणतो, " छे हो ! चुकी कसची आणि दुरुस्ती कसची ? सदरील मजकूर काय तो तुमच्या प्रतींत मात्र मुद्दाम दाखल केलेला होता ! "—ही बळकट मात्रा पोंचल्यापासून पुढें खरोखर मृत्यु येईपर्यंत मशारनिल्हेंची वर्गणी वेळच्या वेळेस येण्यांत अर्धी अंतर पडलें नाहीं.

**पक्की खूण.**

टेम्स् नदीवर दोन आगबोटींची टक्कर होऊन कांहीं मनुष्यें दगावलीं. ती बातमी समजतांच लंडन शहरांतलीं माणसें ती मौज पाहण्याकरितां हजारों गोळा झालीं. कोणी आपल्या इष्टमित्रांविषयीं ही पूसतपास करूं लागले. त्यांत एकजण एका बोटीवरील कपतानास विचारतो, " या बोटींत माझा काका आला काय ? " कपतानानें उत्तर केलें, " अरे तुझा काका म्हणजे ? पुष्कळ काका आले असतील त्यांत तुझाही असेल ! " पृच्छक पुनः विचा-

रतो, " माझा काका शरीरानें चांगला मजबूत, चांगला पोषाक केलेला, असा आहे ; आज तीन दिवस त्याची येण्याची वाट होती ; तर वरील खुणांवरून त्याचा शोध लागेल काय ? " कपतान ह्मणतो, " अरे, पण त्याची एकादी पक्कीशी खूण सांगशील कीं नाहीं ; तशी एकादी खूण असेल तर पलीकडे मुडदे ठेवलेले आहेत त्यांत जाऊन बघ, तो कदाचित् त्यांत सांपडेल." पुतण्या उत्तर करितो, " एक बोवा मोठी खूण आहे; कोणती ? तर माझा चुलता अगदीं बहिरा आहे; त्याच्या कानांशीं घांट बडविली तरी तीही त्यास ऐकूं यावयाची नाहीं! "

## लेसिंग्.

वरील नांवाचा एक विख्यात पंडित जर्मनी देशांत होऊन गेला. हा विचार करण्यांत सदोदित इतका मग्न असे कीं आपल्या आसपास काय चाललें आहे याचें त्यास फार करून भान राहत नसे. एके दिवशीं संध्याकाळीं स्वारी रपेट करून घरीं आली. दाराला आंतून कडी लावली होती, यास्तव त्यांनीं दार ठोठावलें. दार कोण ठोठावतें आहे ह्मणून घरच्या चाकरानें वरून खिडकींतून पाहिलें ; पण अंधारामुळें कोण आहे तें त्यास उमगलें नाहीं. यास्तव आपल्या धन्याकडे कोणी आलें असेल अशा तर्कानें त्यानें वरून ओरडून सांगितलें कीं, लेसिंग् साहेब घरीं नाहींत, बाहेर गेले आहेत. ही सेवकोक्ति ऐकतांच यजमान तेथून निघाले, आणि ह्मणतात, " बरें आहे, दुसऱ्या एकाद्या वेळेस येऊन भेट घेऊं. "

## केशाकर्षण.

एक नीग्रो रस्त्यानें जात असतां एका घराचें काम चाललें होते त्याच्या परांच्यांखालून जाऊं लागला. परांच्यांवर गवंडी काम करीत होते. त्यांपैकीं एकाच्या हातून एक वीट निसटली ती नेमकीच वरील परद्वीपस्थ गृहस्थाच्या डोक्यावर आदळली. पण झालें काय ? विटेचे दोन तुकडे होऊन गेले ! तेव्हां वरील कामकरी लोकांकडे पाहून शिद्दी ह्मणतो, " ए गोऱ्यांनो, तुमच्या विटा कायम राहाव्या असें जर तुमच्या मनांत असेल तर माझ्या डोक्यावर त्या पडूं देऊं नका ! "—' दगडापेक्षां वीट मऊ ' अशी आमच्या भाषेंत ह्मण आहे ती कांहीं खोटी नाहीं.

# पत्र.

रा० रा० निबंधमालाकर्ते यांस:—

वि० वि० मालाकार, आमच्या दयाळू सरकारी अधिकाऱ्यांच्या कृपेनें आमच्या या खेडेगांवीं आपल्या मालेचें आगमन होत असतें. इकडे जितके वेळां तिचें येणें झालें, तेवढ्यावरूनच तिचें सत्यशील, औपकारिक बुद्धि, दृढ निश्चय, तिची मधुर वाणी इत्यादि सद्गुण पाहून तिचेविषयीं पूर्ण पूज्यभाव उत्पन्न होऊन तिच्या पुनरागमनाची उत्कंठा फारच लागून राहते. आमच्या आर्यजननीस अशा प्रकारचें कन्यारत्न पाहून मोठा संतोष व अभिमानही वाटतो. असो.

मालेच्या ९३ वे अंकीं पृष्ठ ३०।३१ यांजवर पंतांच्या कवितेचे दोन दोन तीन तीन अर्थ होतात या गोष्टीचे सिद्ध्यर्थ एका आर्येचे दोन अर्थ केलेले आपल्या एका वाचकानें दिले आहेत. त्यावर माझ्या अल्प मतीस कांहीं विचार सुचले ते आपलेकडे पाठविले आहेत. तथ्य असल्यास जागा मिळावी.

अशा प्रकारचे अर्थ हे कांहीं कवीचे हृद्गत नसावेत; विलक्षण तर्कानें ह्व्या त्या कवितेचे किंवा शद्बाचे हवे तसे अर्थ निघण्याचा संभव आहे. तर्कशक्तीचा केवढा प्रभाव पाहा! एका हरिदासानें 'मास्तर' या शद्बाची साधनिका, अर्थ, वगैरे सांगितला. मासंतरंतरतीति मास्तरः म्हणजे आतांच मास्तर महिना झाला कीं फीसाठीं तरतरले. वः! समास विग्रह सर्व कांहीं बरोबर जुळलें ना? कित्येक तर्कटी येवढे हुषार असतात कीं यशोदेच्या कृष्णास बाप्तिस्मा देऊन हां हां ह्मणतां येशुख्रिस्त बनवितात. महा-अरि-राष्ट्राची तर आपणांस पूर्ण ओळख आहेच. तेव्हां अशा प्रकारच्या तर्कशक्तीनें "कृष्णानुजा सुभद्रा इ०" या आर्येचे दोन कां आह्मीं तर एका बोवांचे मुखें तीन अर्थ ऐकले आहेत. या आर्येच्या पूर्वींची आर्या,

तीर्थें हिंडत गेला, धर्मानुज अर्जुन प्रभासाला।
आप्तमुखें निजमातुळ, कुळवृत्तांतास ऐकता झाला॥

पंत म्हणतात, प्रभास तीर्थीं अर्जुनास आपल्या मातुळ कुळाची वार्ता समजली, ती कोणती? तर—

'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे' इ० कृष्णाची धाकटी बहिण सुभद्रा ही लग्नाला योग्य झाली आहे आणि बलरामानें तिला धृतराष्ट्राचे मुलास देण्याची ठरविली आहे. प्रस्तुत स्थळीं हाच अर्थ शोभतो. या

ठिकाणीं सवाल जबाब अगदीं शोभत नाहींत. बरें या सवाल जबाबास शब्द अभिप्राय वगैरे पदरचे किती घालावे लागतात ! यदा कदाचित् जयाच्युतांस संवाद कर्तव्य असता किंवा आमचे कवीचे मनांतून त्यांजकडून करविणेचाच असता तर इतक्या शब्दादिकांची भिक्षा मागणेसाठीं ते आमच्या हरिदासाकडे गेले नसते. दुसरें 'धृतराष्ट्र' याचा 'पंडु' असा अर्थ घेऊन निर्वाह केला. बरें पंडूच्या मुलास (अर्जुनास) मुलगी द्यावयाची असा बलरामाचा निश्चय, व हा निश्चय कृष्णास माहीत असून अर्जुनासही कळला ; मग खुळ्या अर्जुनानें 'तांबड्या पांढऱ्या करारनाम्या' प्रमाणें यतिवेष धारण करून 'जशा एकाद्या खऱ्या चोरा' प्रमाणें कन्यारत्न हरून नेण्याच्या भानगडींत कां बरें पडावें ? तेव्हां 'आपला वाचक' यांनीं दिलेल्या अर्थानें मागील व पुढील संदर्भ जुळत नाहीं.

आणखी एका बोवांनीं या आर्येचा तिसरा अर्थ असा केला.

**अन्वय.**

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य. हलधर स्वमतें तीतें धृतराष्ट्र सुतासि द्यावया पाहे ( पण तो काय ? ) हली आहे (तूं) जा.

**अर्थ.**

प्रभास तीर्थी लोक अर्जुनास सांगतातः—"बा अर्जुना ! कृष्णाची धाकटी बहिण लग्नाला योग्य झाली आहे आणि बलरामानें तिला आपमतलबानेंच धृतराष्ट्र पुत्रास देणेंची ठरविली आहे. पण किती केलें तरी तो हली म्हणजे नांगऱ्या, कुणबी; त्याची अक्कल कांहीं तडीस जाणार नाहीं; तूं खुशाल जा म्हणजे ती तुलाच प्राप्त होईल"

याचप्रमाणें "तूं सागर करुणेचा" या आर्येचे तीन चार अर्थ करितात. पण असले तर्कटी अर्थ काय कामाचे ! यथेष्ट मिष्टान्न भोजन होऊन तृप्त झालेल्या भटजीस बळेंच पात्रावर बसवून तोंडांत ग्रास घालण्यांत काय अर्थ आहे ? असो, विस्तार फार झाला; प्रकृतीस बरें नसल्यानें व बाळबोध लिहिण्याची संवय नसल्यानें बिगाराप्रमाणें लेखणी मागें पाऊल घेऊं लागली ; व जन्मादारभ्य थोरांचा सहवासही नाहीं सबब भीतीस्तव पुरे करितों. आपण गुणग्राहकच आहां, तेव्हां व्याकरणादिकांचे कांहीं दोष असतील, ते काढालच.

| | |
|---|---|
| तारीख १० माहे जुलै सन १८७९. | मल्हार सखाराम जां० मु० सांगरूळ पे० करवीर इलाखा कोल्हापूर. |

# निबंधमाला.

## अंक ६०.

### तारा नाटक.

एकेन स्मितपाटलाधररुचो जल्पंत्यनल्पाक्षरं
वीक्षंतेऽन्यमितः स्फुटत्कुमुदिनीफुल्लोल्लसल्लोचनाः ।
दूरोदारचरित्रचित्रविभवं ध्यायंति चान्यं धिया ।
केनेत्थं परमार्थतोऽर्थवदिव प्रेमास्ति वामभ्रुवाम् ॥*

१. प्रस्तुत अंकाचा वरील विषय पाहून आमच्या वाचकांस बराच आचंबा वाटेल असें वाटतें. कां कीं, पूर्वींच्या क्रमास अनुसरून ह्मटलें ह्मणजे हा अंक उपसंहाररूप असायाचा. यांत एकंदर वर्षाचा आढावा दाखवून आमची आमच्या प्रतिपक्ष्यांकडे किती बाकी फिरते व त्यांची आमच्याकडे किती निघते हें वाचकांस समजावून द्यावयाचें. पण यंदां तसें करण्यास फारशी सवड नाहीं. गेल्या सालची जबरदस्त वेसण साऱ्यांच्या नाकांतून सारखीच ओंवली गेल्यामुळें ह्मणा, अगर गेल्या अकरा अंकांतील विषय अंमळ निराळ्याच पद्धतीचे पडल्यामुळें ह्मणा, आमच्या लेखांवर दूषणें मुळींच कोठें ही आलीं नाहींत.† गतवर्षींच्या आक्टाचा प्रभाव चोहोंकडे दृष्टीस पडूं लागल्यापासून आमच्या देशास पुराणांतरीं वर्णिलेल्या ऋषींच्या आश्रमांची किंवा प-

---

* "स्मिताच्या योगानें अधरोष्ठाची लाली मोडून त्यावर आरक्तता आली आहे अशा होत्साता एका पुरुषाशीं पुष्कळपणीं बोलतात,—पूर्ण विकास पावलेल्या कमलांसारख्या सुप्रसन्न नेत्रांनीं दुसऱ्याकडे पाहतात,—आणि अत्यंत कीर्तिमान् व भाग्यवान् असणाऱ्या तिसऱ्यावर मन ठेवतात,—तेव्हां स्त्रियांचें वास्तविक प्रेम असतें तरी कोणावर ह्मणावें ?"

† गेल्या बारा अंकांतील मुख्य विषय जो मोरोपंतांचें काव्य त्याच्या संबंधानें वरील उल्लेख केला आहे. बाकी आमच्या पुस्तकाविरुद्ध लेख ह्मटला तर 'विविधज्ञानविस्तारा' त नुकतें आलेलें 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' पुस्तकाचें मंडन हें होय. याविषयीं पुढील अंकांत विवेचन करण्याचा आमचा संकल्प आहे.

वित्र शास्त्रांत वर्णिलेल्या भावी सहस्त्रवार्षिक युगाची* बरोबरी येत चालली आहे. ह्मणजे वाघ आणि गाय यांनीं एकाच ओहोळावर पाणी प्यावें, लांडग्यानें कोकराच्या गळ्याला मिठी मारावी, कोकरानें लांडग्याच्या मारावी, इत्यादि प्रकार जसे वसिष्ठादिकांच्या आश्रमाभोंवतीं दृष्टीस पडत, व पुढें कधीं काळीं खिस्तराज्यांत पडणार आहेत, त्याप्रमाणेंच हल्लीं या देशांत ही साऱ्या तंट्याबखेड्याचें मूळ एकदम मोडून चोहोंकडे मध्यरात्रीप्रमाणें अगदीं सामसूम होऊन गेलें आहे. काळोखांत ज्याप्रमाणें उंच सखल, सुरेख विद्रूप, रंगी बेरंगी हे सर्व भेद अस्तास जातात, त्याप्रमाणेंच मेकॉलेप्रभृति उदार बुद्धीच्या पुरुषांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं जें स्वातंत्र्य या आर्यभूमीस अर्पण केलें होतें त्यास गेल्या सालीं एकाएकीं अकाल राहूनें ग्रासून टाकल्यामुळें सद्धर्म. अधर्म, राजनिष्ठा राजद्रोह, सत्य असत्य, इत्यादि भेद चट सारे एका क्षणांत लोपून गेले. परवां या पुण्यजननगरीवर लंकेसारखा अकांत गुदरून अग्निनारायणानें कृपा केली असतां ज्याप्रमाणें हजारों लवाद कोर्टांचे हातून होतेना असें काम प्रहर दीड प्रहरांत चोख होऊन गेलें, व सावकार, कूळ, आणि वकील या त्रिपुटीचा

* यास इंग्रेजींत Millenium असें नांव आहे. खिस्ती लोकांच्या पैगंबराचा शेवटचा इतिहास सर्वांस माहीतच आहे, कीं त्यास रोमी सरकारानें यहुदी लोकांच्या फिर्यादीवरून सुळावर चढविलें. हें कृत्य झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीं येशूचें पुनरुत्थान झालें. नंतर तीन आठवडेपर्यंत आपल्या शिष्यवर्गासमवेत काळक्रमणा करून त्यांनें स्वर्गारोहण केलें. तेव्हांपासून तो भूलोकावर अद्याप प्रगट झाला नाहीं. तथापि 'नव्या करारां'तील शेवटल्या भागांत सांगितल्याप्रमाणें येशू खिस्ताचा पुन: एकवार अवतार होणार आहे. त्यावेळेस तो सैतानास बांधून नरकाग्नींत टाकून देईल व साऱ्या पृथ्वीभर हजार वर्षे त्याचें राज्य चालेल. या भविष्यत्कालीन महोत्सवाचें पोपनें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे :—

"The lambs with wolves shall graze the verdant mead,
And boys in flowery bands the tiger lead;
The steer and lion at one crib shall meet,
And harmless serpents lick the pilgrim's feet.
The smiling infant in his hand shall take
The crested basilisk and speckled snake,
Pleased the green lustre of the scales survey,
And with their forky tongue shall innocently play!"

*Messiah.*

एकदम लय झाला, त्याप्रमाणेंच बादशाही दरबारांतून सुटलेल्या वरील वट-हुकुमाअन्वयें आमची आमच्या प्रतिपक्ष्यांच्या खात्यांवरील बाकी व आमच्या खात्यांवरील त्यांची बाकी या दोन्ही एकदम शून्य होऊन गेल्या आहेत. हा प्रकार कोठपर्यंत कायम राहील किंवा एकदां झाला तो झालाच, याविषयीं कांहीं सांगवत नाहीं; पण हा जोंपर्यंत राहील तोंपर्यंत बहुधा या खेपेप्रमाणेंच आह्मांस शेवटच्या अंकाला कांहीं निराळा विषय शोधावा लागेल, व यापूर्वी आमच्या फाल्गुन महिन्याप्रमाणें किंवा ख्रिस्ती नाताळाप्रमाणें जसा एकंदर वर्षांचा हूडपणा पुरवून घेण्यास सरतेशेवटीं अवकाश सांपडे तसा फार करून सांपडणार नाहीं असा सुमार दिसतो !

तरी एके तऱ्हेनें पाहतां आमच्या प्रतिपक्षिवर्गानें या वर्षी जो अत्यंत मूक-भाव धोरण केला तो कांहीं अंशीं आश्चर्यास्पदच होय. कां कीं, या सालचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे ' जॉनसन्‌पुराण ' नव्हते किंवा ' इंग्रेजी भाषा ' नव्हती; तर एका पत्रकारानें सुचविल्याप्रमाणें सर्वांस समजणारा, सर्वांच्या माहितींतला व सर्वांनीं ज्यावर अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय अनेक वेळां प्रगट केलेले अशा प्रकारचा तो होता. तेव्हां असा विषय निघाला असतां ग्रीक भाषेंतील आदिकाव्यांत उपनायकभूत जो आकिलीसचा जिवलग मित्र प्याट्रॉक्लस् तो रणांत पडला असतां त्याच्या प्रेताभोंवतीं जसें रणमंडळ माजलें, किंवा येशूची येरुशलेम शहरीं जी कबर आहे तिच्या प्रीत्यर्थ जसें दोनशें वर्षें ख्रिस्तभक्तांचें व महंमदभक्तांचें युद्ध चालू होतें, तसा प्रकार खरोखरीं पाहतां गेल्या सालीं नजरेस यावयाचा होता. त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या व त्याच्या टीकाकर्त्याच्या तर्फेनें विरुद्ध पक्षांतील रथी महारथी मंडळीवरही आम्ही बिलकुल कसर न करतां यथास्थित प्रहार केले होते. पण इतकें असून अ-द्याप दुसऱ्या बाजूस अगदीं सामसूम आहे. याचें काय कारण असेल तें असो. आमच्या ख्रिस्ती बंधूस ही या वर्षी गुपचुप राहण्यास बिलकुल सवड नव्हती. ' पाद्री खात्याकडील अशुद्ध पत्र आपल्या सोंवळ्या घरांत येऊं देणें त्यांस बरें वाटत असलें तर त्यांनीं मोबदला करण्यास आरंभ करावा ' या आमच्या वडील बंधूच्या वचनास मान देऊन या सालच्या आरंभापासून आमची सद्धर्मद्रोही माला ' ज्ञानोदय ' कचेरीच्या टेबलावर जाऊन पडत आहे, व आमचे शुभवर्तमानी बंधुही दर आठवड्यास नियमानें आमची भेट घेत असतात. पण मौज काय झाली आहे पहा ! जोंपर्यंत आमची व आ-

मच्या पवित्रधर्मी बंधूंची गांठ घालून देण्यास मध्यस्थ मित्राची गरज लागत असे, तोंपर्यंत आह्मांस कडकडून भेटण्याची आमच्या बंधूंस भारी हौस असे व असा भेटीचा योग थोडा बहुत तरी आल्याखेरीज फार करून उभें वर्ष सुनें जात नसे. पण आतां मध्यस्थाची गरज न राहतां परस्पर दळणवळण चांगलें पडलें असतां पूर्वींचा आदर शिथिल झाला. याचें कारण आह्मांस कांहींच उमगत नाहीं. गेल्या सालच्या भयंकर आक्टाच्या तडाक्यानें आमच्या बंधूंची 'चपळ लेखणी बोथटून गेली' असेल ह्मणावें तर तें मुळींच शोभणार नाहीं. कां कीं, एक तर त्यांच्या अंगीं सद्धर्माचे योगानें संचरलेलें अढळ धैर्य वास करीत आहे, व शिवाय आकाशांतील प्रभूचें त्यांस बळकट पाठबळ आहे कीं, 'जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्मांबरोबर सर्वकाळ आहे.' मग 'खऱ्या व जिवंत देवा' ची येवढी जबरदस्त सनद त्यांजपाशीं असतां नवळ्या आक्टासारखे छप्पन्न आक्ट ते बगलेंत मारणार नाहींत काय? बरोबर आहे! शिवाय हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जरी यदाकदाचित् असें झालेंच,—कीं पवित्रशास्त्रीय शांति व सभ्यता विसरून आमच्या बंधूंनीं हिंदूंस टोंचण्यासारखा मजकूर आपल्या पत्रांत प्रसिद्ध केलाच, व सुप्रीम कौंसिलांत त्याविषयीं विचार झालाच, तरी आक्टाचें अतिक्रमण केल्याबद्दल आमच्या बंधूंस जी अद्दल घडेल तिचा प्रकार एका महाराष्ट्र कवीनें वर्णिल्याप्रमाणें—

पैं मोहाचिये सांगडें लासी पिली धरी तोंडें ।
तेथ दांताचे आगरडें लागती जैसे ॥

अशासारखाच बहुधा होणार! तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां आमच्या बंधूंच्या मौनाची वरील उपपत्ति मुळींच संभवत नाहीं. बरें, असें जर ह्मणावें कीं गेल्या अकरा अंकांत आमच्या बंधूंनीं मधें पडावें असा मुळीं प्रसंगच आला नाहीं, तर तसेंही नाहीं. कां कीं, ५२ व्या व ५६ व्या अंकांत त्यांचे सन्मान्य गुरु रे० डॉक्टर विल्सन् साहेब यांच्या लेखांवर आमच्या अल्पबुद्धीस जे विचार सुचले ते दाखल केले होते. ते डाक्टर मजकुरांच्या शिष्यवर्गास मोठेसे आवडण्यासारखे नव्हते हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच. तरी असें असतां आमचे वृद्ध बंधु उगाच राहिले. साहेबांचा बचाव करण्याची त्यांस जरूर दिसली नाहीं किंवा त्यांजविषयींची गुरुभक्ति त्यांची इतक्यांतच कमी झाली, हें कांहीं कळत नाहीं!

असो; तर या खेपेची अशी हालहवाल आहे. यास्तव आतां वरील ग्रंथाच्या परीक्षणास लागूं.

२. 'तारा नाटक' हें शेक्सपीयरच्या 'सिंबलैन्' नामक नाटकाचें भाषांतर आहे. या इंग्रेजी कवीचीं एकंदर सदतीस नाटकें प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं यापूर्वीं 'आथेल्लो,' 'टॅंपेस्ट,' 'ज्यूलियस् सीजर' (विजयसिंग), 'कॉमेडी ऑफ् एरर्स' (भ्रांतिकृत चमत्कार—भुरळ), 'मर्चंट् ऑफ् व्हेनिस्' (व्हेनिस् शहरचा व्यापारी), आणि 'रोमिओ अर्यांड् ज्युलियेट्' (रोमकेतुविजया) इतकीं मराठींत झालीं आहेत. प्रस्तुत नाटक कांहीं अंशीं वरील सर्वांपेक्षां निराळ्या तऱ्हेचें आहे. हें रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए., उमरावती हायस्कूलचे हेडमास्तर, यांनीं तयार केलें असून मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीच्या विद्यमानें प्रसिद्ध झालें आहे.*

३. आतां प्रथमतः सदरील नाटकाचें संविधानक येथें देतों. त्यावरून मूळ ग्रंथाची व भाषांतराचीही वाचकांस बरीच कल्पना होऊन पुढील गुणदोषविवेचन लक्षांत येण्यास मार्ग होईल.

सुवर्णपुर नामक नगराचा संभाजी नामेंकरून एक वृद्ध राजा होता. याची पहिली बायको मरण पावली असून त्यानें द्वितीय संबंध केला होता. पहिल्या बायकोपासून त्यास तीन अपत्यें झालीं होतीं; दोन मुलगे व एक मुलगी. हे दोन मुलगे लहानपणींच कोणीं चोरून नेले होते, व त्यांचा मुळीं पत्ताच

---

* वरील उल्लेख केवळ प्रकृत पुस्तकाच्या मुखपत्रावरूनच केला आहे. खरोखरी पाहतां तें ग्रंथोत्तेजक मंडळानें छापलें नाहीं व प्रसिद्ध ही केलें नाहीं. ग्रंथकार आमचे परिचित असल्यामुळें आम्हांस खासगी रीतीनें असें कळलें आहे कीं, सदरील पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचा हक्क त्यांनीं 'नेटिव्ह् ओपिनियन्' च्या मालकास देऊन टाकून त्याजकडून तें छापविलें. छापल्यानंतर कांहीं प्रती सदरील मंडळीनें आपल्या वर्गणीदारांस देण्याकरितां घेतल्या असें समजतें. मंडळीच्या नांवाबर प्रसिद्ध झालेलें पहिलें शेतकीवरील पुस्तक याची ही अशीच हकीकत आहे म्हणून ऐकतों. एकंदरींत बिचाऱ्या महाराष्ट्रीय लोकांच्या हितार्थ हा जो दोघां रावबहादुरांनीं नवा उद्योग आरंभिला तोही जुन्याच्याच भेटीस जाऊं पाहत आहे यानें आम्हांस फार वाईट वाटतें. पुढें समयानुसार प्रकृत मंडळीची जी हकीकत आम्हांस माहीत आहे व तिच्या उद्योगाविषयीं आमच्या व पुष्कळ मंडळीच्या मनांत जे विचार आले आहेत ते वाचकांस सादर करण्याचा आमचा मानस आहे.

नव्हता. राहिलेली मुलगी तारा; ही प्रस्तुत नाटकांतील नायिका होय.

तारेला तिची सावत्र आई निग्र पाण्यांत पाहत असे. संभाजी राजा हा स्वभावानें भोळसर असल्यामुळें त्याजवर तिनें असा पगडा बसवून टाकिला होता कीं राजकीय प्रकरणांतही तिच्या सत्तेवांचून कांहीं चालत नसे. मुरारराव म्हणून तिच्या वहिणीचा मुलगा होता, त्याजवर तिचा अतिशय लोभ होता. याचें तारेशीं लग्न व्हावें व संभाजीच्या पश्चात् दोघांनीं राज्य करावें असा तिचा मानस होता.

मुरारराव हा मूर्खशिरोमणि होता. त्याच्या अंगीं कर्तृत्व मुळींच नसून तो केवळ मावशीच्या जोरावर अरेरात्र होऊन बसला होता. त्यानें तारेचें मन आपणाकडे लागावें एतदर्थ पुष्कळ खटपट केली, व त्याच्या मावशीनेंही आपला स्वार्थ साधावा येवढ्यास्तव त्यास अनेक प्रकारें साह्य केलें. पण दोहोंचाही कांहीं एक उपयोग झाला नाहीं. हंबीरराव म्हणून एक सरदाराचा मुलगा होता, त्याचीं आईबापें लहानपणींच वारलीं असल्यामुळें संभाजी महाराजांनीं त्याचें पुत्राप्रमाणें पालन केलें होतें. हा तारेचा बालमित्र होता, यास्तव लहानपणापासूनच दोघांचा स्नेह अत्यंत दृढ झाला असल्यामुळें तारुण्यदशेंत त्याच स्नेहास त्या दशेस अनुरूप असें अमळ निराळें स्वरूप प्राप्त झालें. तरी हें परस्परविषयक प्रेम त्यांनीं कोणास कळूं न देतां गुप्त प्रीतिविवाह केला.* ही गोष्ट पुढें जेव्हां प्रगट झाली तेव्हां राजास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें हंबीररावास आपल्या मुलुखांतून घालवून दिलें व तारेस तिच्या महालांत कोंडून ठेविलें. इतकें झालें तरी ज्याप्रमाणें जलप्रवाहास रोध केला असतां फार झालें तर त्याची गति कुंठित होईल पण ती उलटी कधींही व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें तारेची आणि हंबीररावाची तुटातूट मात्र झाली; राणीचा येवढें कवटाळ रचण्यातला जो उद्देश—कीं हंबीररावाकडून तिचें मन निघून आपल्या भाच्याकडे लागावें तें मात्र बिलकुल झालें नाहीं.

---

* विलायतेंतील लग्नाची चाल आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहित असेलच, कीं वधूवरांचा संबंध देवळांत पाद्रीच्या हातमार्फत होतो. दोघांचे हस्त एकत्र करून पाद्री त्यांस आशीर्वचन देतो; आणि त्यांचीं नांवें पटावर दाखल करतो. जेव्हां स्त्रीपुरुषांचा चोरून विवाह कर्तव्य असतो, म्हणजे आईबापांच्या वगैरे हरकतीमुळें उघडपणें देवळांत जाऊन लग्न करतां येत नाहीं, तेव्हां पाद्रीस घरीं बोलावून आणून वरील विधि गुप्तपणें करतात.

येवढें मात्र उलटें झालें कीं, हंबीररावाची विशेष प्रसिद्धि होऊन लोक त्याच्या गुणांची विशेष तारीफ करूं लागले, व तारा आपल्या बापासही जुमानीनाशी होऊन मुराररावाचा उघडपणें तिटकारा करूं लागली.

हंबीरराव आपल्या प्रियेची गुप्तपणें गांठ घेऊन देशोधडीस गेला. ही गांठ राणीनेंच पाडून दिली होती; तिचा मतलब काय कीं, आपल्या मनांत दोघांविषयीं कांहीं विषम नाहीं असें त्यांस व सर्वांस कळावें. हा कृत्रिम स्नेह ती सर्वांस दाखवी; पण सर्व तिला पक्केपणीं ओळखून होते. हंबीरराव सुवर्णपुराहून निघाला तो विजयपुरास जाऊन राहिला. तेथें त्याच्या बापाच्या वेळचा एक सरदार होता; त्यानें आपल्या जुन्या स्नेह्यास स्मरून हंबीररावास आपल्या घरीं राहून घेतलें. एके दिवशीं चार मंडळी बसली असतां स्त्रियांविषयीं बोलणें निघून हंबीररावाचा व खंडूजी नांवाचा एक विजयपूरचा गृहस्थ होता त्याचा वाद पडला. हंबीररावास आपली प्रीतिविवाहानें वरिलेली स्त्री तारा हिच्या अढळ सत्वाविषयीं पक्का विश्वास होता, आणि खंडूजी हा मूळपासून लफंगा असल्यामुळें 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः' या मतास अनुसरणारा होता. दोघे बोलण्याच्या भरांत आवेशांत आले आणि शेवटीं दोघांनीं असें ठरविलें कीं, हंबीररावच्या हातचें पत्र घेऊन खंडूजीनें सुवर्णपुरास जावें आणि तारेशीं ओळख करून घ्यावी. नंतर जेवढी आपली लफंगबाजी असेल तेवढी लढवून तीस वश करण्याचा प्रयत्न करावा. या कार्यांत जर त्याची सिद्धि झाली तर हंबीररावानें आपल्या हातांतील आंगठी त्यास द्यावी व त्याउपर तारेचें नांव घेऊं नये; पण जर करतां मसलत अंगावर आली तर खंडूजीनें दहा हजार रुपये हरावे व प्रतिष्ठित स्त्रीची अब्रू घेतल्याबद्दल समरांगणांत हंबीररावास जबाब देण्यास तयार व्हावें. हा विलक्षण व भयंकर पण ठरल्यावर खंडूजी हंबीररावाच्या हातचें पत्र घेऊन सुवर्णपुरास यावयास निघाला.

येऊन पोंचल्यावर त्यानें तारेस तिच्या नवऱ्याचें पत्र दाखविलें. तें पहातांच तिला मोठा आनंद होऊन हा आपल्या नवऱ्याचा परम मित्र आहे असें ती समजली, व तिनें त्याचा मोठा सत्कार केला. मग हंबीररावाविषयीं ती हालहवाल विचारणार तों खंडूजी भलतेंच कांहीं असंबद्ध भाषण आपणाशींच बोलूं लागला. तारेस त्याचा कांहींच उमज पडेना. मग जें काय बोलत आहां तें मला कळेसें स्पष्ट बोला असें तारेनें सांगितलें असतां त्यानें तीस

कळविलें कीं, तुमचा नवरा मोठा बदफैली निघाला आहे व सुवर्णपुरची तर त्यास कधींच आठवणही होत नसून तो तिकडेच नीच वेश्यांशीं रममाण होऊन बसला आहे. याप्रमाणें हंबीररावाविषयीं भलताच मजकूर तारेच्या कानावर घालून खंडूजीनें तिच्या चित्तास भ्रंश पाडण्याचा उद्योग केला, आणि नंतर तीस तो सांगूं लागला कीं, "आपण तरी असल्या बेइमानाशीं कशाला इमान ठेवतां? मी आपला दास आहें, माझ्या जिवांत जीव आहे तोंवर मी आपणांवर प्रेम ठेवीन." हें त्याचें पाजीपणाचें व धट्टाईचें बोलणें ऐकून तारा संतापली, व तिनें त्याची खूप निर्भर्त्सना केली. ती ऐकतांच या विजयपुरी फक्कडाची धुंदी उतरून त्यानें तारेची क्षमा मागितली व आपलें प्रेम हंबीररावावर कितपत दृढ आहे हें पाहण्याच्या उद्देशानें मी हा उपक्रम केला होता असें त्यानें प्रांजलपणें कबूल केलें. इतकें झाल्यावर खंडूजी निघून गेला. पण जाण्यापूर्वी त्यानें तारेपाशीं एका गोष्टीविषयीं विनंति केली कीं, "विजयपुरच्या महाराजांकरतां कांहीं जडावाचे दागिने व नकशीचीं चांदीचीं भांडीं मी तयार करविलीं आहेत, यवढ्या किमतीचा माल बिऱ्हाडीं सुरक्षित रहावयाचा नाहीं, तर तो पेटींत घालून मी आपणाकडे पाठवून देईन. पेटी रातोरात आपल्यापाशीं असूं द्यावी. उद्यां मी जाईन तेव्हां घेऊन जाईन."

त्या रात्रीं तारा नित्याच्या क्रमाप्रमाणें पोथीचा पाठ आटपून व ईश्वरस्मरण करून निजली. तिला पहाटेस उठावयाचें होतें यास्तव दासीस दिवा तसाच जळत ठेवण्यास तिनें सांगितलें. मध्यरात्रीच्या सुमारास जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर तिच्या महालांत आणून ठेवलेल्या पेटीचें दार आपलें हळूंच उघडलें,—आणि खंडूजींची स्वारी आंतून मुकाट्यानें बाहेर पडली! त्याचा बेत उघडपणें जेव्हां साधेना तेव्हां त्यानें ही पेटीची युक्ति लढविली. मग खोलींतील सामानाच्या, पलंगाच्या वगैरे झटापट सर्व खाणाखुणा टिपून घेऊन या कपटपटूनें तारेच्या हातांतील एक कांकण हळूंच काढून घेतलें; व इतका कारभार आटपून पुनः स्वारी पेटींत जाऊन बसली. हंबीररावाच्या स्त्रीचें सत्व हरण करण्याची त्याची प्रतिज्ञा जरी शेवटास गेली नाहीं, तरी आपला पण जिंकण्यास आतां कांहीं हरकत नाहीं असें समजून खंडूजी आपल्या ठिकाणीं मोठा कृतार्थ झाला. त्यांतून वरील कृतार्थताबुद्धीचें पूर्णत्व होण्यास दुसरी एक मोठी गोष्ट दैवयोगानें अशी घडली कीं, तारेच्या हातांतील कंकणाचा

फांसा काढीत असतां तिचें दिव्य स्वरूप जेव्हां त्यानें समग्र न्याहाळलें, तेव्हां तिचा पदर झोपेंत अस्ताव्यस्त पडला असतां तिच्या स्तनमध्यभागीं असणारा तीळ त्याच्या दृष्टीस पडला ! या मुद्याचा उपयोग किती झाला हें पुढें कळेलच.

वर सांगितल्याप्रमाणें खंडूजी आपला हेतु कपटानें साधून विजयपुरास परत आला. हंबीरराव व ज्यांच्या समक्ष वरील पण ठरला होता ते सर्वजण त्याची वाट पाहातच होते. तो इतक्या लवकर आलासा पाहून हंबीररावास वाटलें कीं याची पहिल्या सपाट्यास फटफजिती उडाली असेल तेव्हां निराश होत्साता हा चटदिशी माघारां आला. याप्रमाणें त्यानें त्यास विनोदपूर्वक बोलून ही दाखविलें. पण क्रमाक्रमानें ही त्याची वृत्ति पालटत गेली. खंडूजी महालाच्या पलंगाच्या वगैरे एकएक खुणा जशजशा सांगत गेला तसतसा संशयाचा विषार त्याच्या शुद्ध व ऋजु अंतःकरणांत भिनायाला लागला. त्यानें तारेच्या हातांतील कंकण पुढें टाकलें तेव्हां तर हंबीरराव मनांत फारच चरकला ; कां कीं, तें त्यानें प्रस्थानसमयीं आपल्या प्रियेच्या हातांत स्वतः घातलें होतें, व तिनें त्या समयींच वर सांगितलेली पणास लावलेली आंगठीहि त्यास दिली होती. पण सरतेशेवटीं तिळाची खूण जेव्हां खंडूजीनें दिली तेव्हां तर बिचाऱ्या हंबीररावाची जी दशा झाली ती कांहीं पुसूं नये ! तो रागानें वेडा होऊन गेला, व अवघ्या स्त्रीजातीवर त्यानें जो शिव्यांचा भाडिमार केला तो कांहीं विलक्षण ! मग त्यानें सदोबा या नांवाचा एक आपला विश्वासू चाकर तारेपाशीं ठेविला होता त्याजकडे पत्र पाठवून त्यास कळविलें कीं, तुझ्या धनिणीच्या जारकर्माची माझी खात्री होऊन चुकली आहे, तर या सोबतचें माझें पत्र तिला दाखवून तीस तूं जामगांवीं घेऊन ये, आणि तेथें आल्यावर खरा मजकूर सांगून तिचा वध कर ; आणि याबद्दलची निशाणीहि मजकडे पाठवून दे.

सदोबास वरील पत्र पाहून मोठें आश्चर्य वाटलें व खेदही झाला. पण करतो काय ? धन्याची आज्ञा प्रमाण ! तेव्हां तिजप्रमाणें त्यानें तारेपाशीं बहाणा करून व तीस हंबीररावाचें पत्र दाखवून तीस जामगांवीं नेलें, व तेथें पोंचल्यावर तिला हंबीररावाचें पत्र दाखविलें. तें पाहिल्यावर तिची काय अवस्था झाली असेल हें सांगावयास नकोच ! ज्याची मूर्ति तो गेला तेव्हांपासून तिच्या डोळ्यांपासून कधीं ढळलीच नाहीं, व ज्याच्या समागमाविषयीं

तिची इतकी आतुरता कीं ऊन्ह न ह्मणतां तान्ह न ह्मणतां ती त्या पावलींच रानावनांतून जावळी महालाकडे जावयास निघाली, त्यानेंच ऐन भेटीच्या सोहळ्याच्या वेळीं तिजवर जारकर्माचा आरोप करून तिची पत्रद्वारें अत्यंत निर्भर्त्सना करावी, हा प्रसंग केवढा दुर्धर होय ! तारा वरील मजकूर वाचतांच मूर्छित होऊन पडली. मग सावध झाल्यावर व सदोबाच्या सांत्वनानें अंमळ शांत झाल्यावर तिनें असा निश्चय केला कीं आतां परत सुवर्णपुराकडे ह्मणून जावयाचेंच नाहीं. तर पुरुषवेषानें विजयपुरास जाऊन तेथेंच हंबीररावाची गांठ घेऊन त्याच्या मनावरील संशयपटल दूर करावें असा तिचा बेत ठरला. हा सल्ला तीस सदोबानेंच दिला, व तिचा निरोप घेते समयीं त्यानें तिच्या हवालीं एक डबी केली. या डबींत औषधाच्या गोळ्या होत्या. वाटेच्या शीणभागानें प्रकृति बिघडली असतां या तुम्हांस उपयोगीं पडतील असें सदोबानें जातांना तीस सांगून ठेविलें.

आतां इकडे संभाजी महाराजांच्या दरबारीं काय हालहवाल चालली आहे ती पाहूं. संभाजी हा विजयपुरच्या बादशाहाचा* मांडलिक होता. त्याजकडून दरसाल दोन कोट रुपये खंडणी विजयपुरास जात असे. ही वहिवाट संभाजीच्या बापापासून चालत असतां ती अलीकडे त्यानें राणीच्या मसलतीवरून बंद केली होती. या गैरशिस्त वागणुकीबद्दल कानउघाडी करण्याकरितां विजयशिंग नांवाचा वकील विजयपुरच्या बादशाहाकडून संभाजीकडे या वेळेस आला होता. त्यानें आपल्या धन्याचा निरोप कळवून संभाजीस पुष्कळ सांगून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. निकरावर गोष्ट येऊन लढाईचा बेत ठरला. सैन्याचें आधिपत्य राणीच्या शिफारशीवरून मुराररावयास द्यावयाचें होतें. पण इतक्यांत काय झालें कीं, तारा वाड्यांतून निघून गेल्याचा बोभाटा झाला. तो ऐकून व ती कोठें गेली याचा तल्लास सदोबाकडून काढून मुराररावांची स्वारी तारेच्या शोधार्थ व हंबीररावाच्या शासनार्थ बाहेर पडली. सदोबा हिकमती होता; त्याचें अंतःकरण जरी हंबीरराव व

---

* विजयपुर व सुवर्णपुर हीं नांवें यथानुक्रम रोम व लंडन या शहरांचीं भाषांतरकारानें ठेविलीं आहेत. नाटकांतील काळ ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमाराचा आहे. सीजर नामक प्रख्यात रोमन सरदारानें ब्रिटन देश जिंकून रोमच्या अंमलाखालीं आणला होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. पुढें ऑगस्टस्च्या बादशाही अमलांत ब्रिटनचा राजा अर्थातच रोमचा मांडलिक होता.

ताराबाई त्यांच्याकडेच सर्वथा होतें, तरी बाहेरून राजा राणी व मुरारराव यांशींही त्यास सलोखा ठेवावा लागत असे. तेव्हां या प्रसंगींही त्यानें वरील कावा योजून हंबीररावाकडून आलेलें पत्र मुराररावास दाखविलें व त्यावरून त्यास भासवून दिलें कीं, आतां आपण जर जामगांवीं गेलों तर हंबीरराव व ताराबाई या दोघांचाही समाचार घ्यावयास सांपडेल. मुरारराव दुष्टशिरोमणीच ! त्यानें सदोबाकडून हंबीररावाचे कपडे मागून घेतले, आणि असा बेत केला कीं हंबीररावास मारून नंतर त्याचे कपडे वापरून ताराबाईकडे जावयाचें व त्या कपड्यांनीं तिला फसवून तिजशीं संभोग करायाचा. हा त्याचा संकल्प कितपत सिद्धीस गेला हें पुढें कळेलच.

तारा मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या नवऱ्याकडे जावयास जी निघाली ती सदोबानें दुरून दाखवून दिलेला मार्ग विसरली, आणि भलतीकडेच आडरानांत शिरली. जातां जातां ती एका गुहेपाशीं आली. या गुहेंत तिचे दोघे भाऊ राहत होते. कोणते म्हाणाल तर जे लहानपणीं कोणीं चोरून नेले होते ते. चोरून नेणार संभाजीच्या पदरचा सरदार होता. यानें त्याची चाकरी इमानें इतबारें केली असतां त्यावर फितुरीचा आरोप ठेवून संभाजीनें त्यास हद्दपार केलें होतें. या अन्यायाचा सूड वरील सरदारानें असा घेतला कीं, जातांना राजाचे दोन मुलगेच चोरून नेले ! असो ; तर या प्रसंगीं निर्जन अरण्यांत ज्या तिघा माणसांची तारेची गांठ पडली तीं तिघेजणें वरील दोन राजपुत्र व त्यांचें पालन पोषण ज्यानें केलें तो वरील हद्दपार केलेला सरदार अशीं होत. तारेनें वेषांतर केलेलें असल्यामुळें व विश्वासराव हें नांव धारण केल्यामुळें अर्थातच तिचें स्त्रीत्व वरील तिघांस कळून आलें नाहीं. मग तीं तिघें भांवडांप्रमाणें त्या गुहेंत राहत असतां एकदां असें झालें कीं तारा आजारामुळें तेथेंच पडून राहिली व तिचे दोघे भाऊ शिकारीस गेले. तारेच्या आजाराचें कारण अर्थातच शरीराला झालेली दगदग व चित्ताची अस्वस्थता हीं होत. मागें सांगितलेंच आहे कीं, सदोबानें जातांना एक औषधाची डबी तिच्या हवालीं केली होती. या डबींतलीच एक गोळी या वेळेस तारेनें घेतली. या गोळ्यांची हकीकत अशी होती कीं, त्या राणीकरितां राजवैद्यानें विषारी म्हणून तयार करून दिल्या होत्या. खरोखरी त्या विषारी नव्हत्या ; वैद्यानें राणीचा मतलब जाणून त्यांत येवढी मात्र खुबी करून ठेवली होती कीं, त्या पोटांत गेल्या असतां कांहीं वेळ मनुष्यानें मृतवत् पडावें;

पण प्रहराभरानें पुनः चांगलें सावध व्हावें. राणीस ही वैद्याची हिकमत कळून आली नाहीं. तिनें वरील गोळ्या विषयींच समजून एके प्रसंगीं गोडींत आल्यासारखें दाखवून डबीची डबी सदोबास बहाल दिली, व त्यास सांगितलें कीं या गोळ्या मोठ्या गुणकारी आहेत, कसलेंही दुखणें असलें तरी तें यांनीं हटतें. तर वरच्यांपैकींच एक गोळी तारेनें या वेळेस जेव्हां घेतली तेव्हां तिचा परिणाम काय झाला तें सांगायाला नकोच. तिचे भाऊ शिकार खेळून घरीं जों येतात तों ही मरून पडली आहे! अगोदरच शिकारींत एक भयंकर गोष्ट घडून आली होती. ती ही कीं, वरील राजपुत्रांपैकीं एकाची व हंबीररावाचा पोषाक करून आलेल्या मुराररावाची रानांत गांठ पडून दोघांची बोलाचाली झाली, व हातघाईवर गोष्ट येऊन राजपुत्रानें मुराररावाचें डोकें उडविलें. तें घेऊन तो घराकडे येत असतां त्याच्या भावानें व त्यांच्या बरोबरच्या वृद्ध सरदारानें तें कृत्य जेव्हां पाहिलें तेव्हां या सरदारास मुराररावाची ओळख पडून मोठी धास्ती पडली. त्यास वाटलें कीं, आपली गुप्त जागा संभाजी राजास बहुधा कळली असावी, व या कृत्याचा शोध लागला असतां आपली धडगत राहणार नाहीं. तेव्हां वरील प्रसंग डोळ्यांपुढें असतां तारेचें निश्चेष्ट शरीर पाहून तर त्याच्या हृदयास केवढा धक्का बसला असेल हें सांगायासच नको! दोघे तरुण राजपुत्र हे लोकव्यवहारानभिज्ञ, पण त्यांसही या पुरुषवेषधारी त्यांच्या भगिनीनें थोडक्याशा काळांत इतके आपलेसे करून टाकले होते कीं, तिच्या भासमान प्रेतावर ते दुःखाच्या लहरींत मूर्च्छागत होऊन पडले. असो; शेवटीं शोक आंवरून त्यांनीं तारेस प्रेतसंस्कार करून झाडींत नेऊन ठेवली.

गोळीचा अंमल उतरल्यावर तारा जागी होऊन पाहते तों आपण कोठें आडरानांत आहों असें तीस आढळलें. येथें आपणास कोणीं आणून टाकलें, व दिसतें आहे हें सारें खरें आहे कीं स्वप्न आहे, अशा प्रकारचे अनेक विचार तिच्या मनांत येऊं लागले, व ती अगदीं गोंधळून गेली. अंमल पुढें जाऊन इकडे तिकडे पाहूं लागली तों तिच्या दृष्टीस हंबीररावाचें पागोटें पडलें. तें पाहून तर तिला अतिशयित दुःख झालें. तिला असें वाटलें कीं सदोबानें मुराररावाशीं मसलत करून हा मोठा घात केला! पण अंमळशानें तिनें आपल्या जिवाला असा धीर दिला कीं नुसतें पागोटें पाहिल्यावरून भलभलत्या कल्पना मनांत आणणें हें बरोबर नाहीं; या गोष्टीचा पक्का शोध लावला

पाहिजे. असा निश्चय करून ती मार्गक्रमण करूं लागली. तों पुढें लवकरच विजयपुरचा वकील विजयशिंग याच्या लवाजम्याची व तिची गांठ पडून ती त्याच्यापाशीं चाकरीस राहिली. ही चाकरी पतकरण्यांत तिचा मतलब असा होता कीं, विजयपुरच्या लष्करांत आपला नवरा इकडे येईलच, तर या योगानें त्याची व आपली गांठ पडेल.

पुढें सुवर्णपुर व विजयपुर या दोन्ही संस्थानांचीं दळें समरांगणांत उभीं ठाकून मोठें निकराचें युद्ध झालें. संभाजीकडे कोणी मोठा सरदार नसल्यामुळें त्याचा मोड होण्याचा रंग आला होता ; पण त्याच्या तर्फेनें त्याचे दोन पुत्र व त्यांजबरोबर असणारा सुवर्णपुरचा जुना सरदार हे लढल्यामुळें, व या तिघांनीं त्या दिवशीं खूप तरवार गाजविल्यामुळें, विजयपुरच्या सैन्याचा केवळ पराभव झाला. विजयपुरचा सरदार विजयशिंग, त्याचा हुजऱ्या विश्वासराव ( म्हणजे वेषांतर केलेली तारा ), आणि हंबीरराव या तिघांस पकडून राजदरबारीं नेलें. हंबीरराव हा रणभूमीवर वेषांतर केलेला होत्साता संभाजीच्या तर्फेनें लढला. तारेच्या वधाचा वृत्तांत सदोबानें त्यास खोटाच कळविला, तेव्हांपासून त्यास आपल्या क्रौर्याचा परम अनुताप होऊन तो जिवास सुद्धां कंटाळला होता. यास्तव वरील समरप्रसंगीं कसा तरी मृत्यु यावो अशी तो वाट पाहत होता. पण रणभूमीवर जेव्हां त्याचा हेतु साध्य झाला नाहीं, तेव्हां तो बळेंच शत्रूच्या पक्षांतला म्हणून सुवर्णपुरच्या शिलेदारांच्या स्वाधीन झाला. त्यांनीं त्यास कैद करून सुवर्णपुरास नेल्यावर तेथें कांहीं वेळ त्यास कारागृहांत ठेवून नंतर चौकशीकरितां दरबारीं नेलें. तेथें सुवर्णपुरचा जुना सरदार व त्याजबरोबरचे दोघे राजपुत्र यांसही राजानें मोठ्या आदरानें सत्कारार्थ बोलाविलें होतें. तसाच हंबीररावाचा प्रतिपक्षी खंडूजी व इमानी चाकर सदोबा हे दोघेही त्या प्रसंगाला दरबारीं हजर होते.

याप्रमाणें सर्व मंडळी एके ठिकाणीं जुळल्यावर पुढल्या प्रकारें सर्वांची आपआपसांत ओळख पडली. संभाजीनें विजयशिंगास निक्षून सांगितलें कीं, तुम्ही आतां आमचे हातांत सांपडलां आहां, तर तुम्हांस व विजयपुरवाल्या सर्व बंदिवानांस आम्ही देहान्त शासन देणार. विजयशिंगानें उत्तर केलें कीं, ज्या अर्थीं आम्ही आपल्या कबजांतच आहों, त्याअर्थीं आमचें आपणास जें वाटेल तें करण्यास आपण मुकत्यारच आहां, पण एक मात्र गोष्ट मी मागून घेतों कीं, हा जो मजबरोबर हुजऱ्या आहे हा आपल्याच मुलखांतला आहे व

अत्यंत सुशील आहे, तर याला मात्र जीवदान द्यावें. हें भाषण ऐकून संभाजीनें ती गोष्ट मान्य केली, व हुजऱ्यास आपणाजवळ बोलाविलें. त्यास पाहतांच राजाच्या हृदयांत स्वाभाविक उमाळा आला, आणि तो त्यास म्हणाला, "मुला, तुजवर माझें प्रेम ओढवतें, आजपासून तूं माझाच झालास; तुला जीवदान तर दिलेंच आहे, याखेरीज आणखी तुला कांहीं मागायाचें असेल तर बोल." मुलगा आपल्या नेणत्या बापाजवळ जाऊन त्यानें ही गोष्ट मागून घेतली कीं, त्या खंडूजीच्या हातांत आंगठी आहे ती तुला कोठून मिळाली येवढें आपण त्यास विचारावें म्हणजे झालें. नंतर संभाजीनें वरील प्रश्न केला असतां एकंदर गोष्टींचा उलगडा झाला. खंडूजीनें आंगठीची व कंकणाची सारी हकीकत सर्वांसमक्ष बोलून दाखविली; ती ऐकून हंबीररावाचा हृदयक्षोभ अनावर होऊन तो तारेच्या नांवानें शोक करूं लागला व आपली निर्भर्त्सना करून घेऊं लागला. पुरुषवेषी तारा त्यास आंवरण्याचा यत्न करूं लागली, तों त्यानें रागावून फाडकन् तिच्या तोंडांत भडकावली. त्यासरशी ती खालींच पडली. तो अनर्थ पाहून सदोबा पुढें झाला, आणि त्यानें तो मुलगा कोण याचा पुकारा केला. याप्रमाणेंच क्रमाक्रमानें संभाजीच्या पक्षानें लढलेले तिघे योद्धे कोण याचाही निकाल लागला. शेवटीं राजवैद्य येऊन त्यानें राणीची अखेरची बातमी येऊन दरबारांत सांगितली. या वेळेस त्यानें जो वृत्तांत सांगितला त्यावरून राजास आपल्या बायकोच्या दुष्टपणाचें स्वरूप पुरतेपणीं समजून आलें. मुराररावाचा कसा अंत झाला ती हकीकत ही राजपुत्राच्या तोंडून राजास अगोदर कळलीच होती. तेव्हां याप्रमाणें दुष्टांस विपत्ति प्राप्त होऊन चिरवियुक्त सज्जनांचा सरतेशेवटीं समागम झाला, व सर्व तेव्हांपासून आनंदानें काळक्रमण करूं लागलीं.

याप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें कथासूत्र आहे. हें मूळ इंग्रजी नाटकाच्या अगदीं बरहुकूम जरी नाहीं, तरी बहुतेक अंशीं मूळच्यासारखेंच आहे. देशकालानुरोधास्तव कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र भाषांतरकारास फेरफार करावा लागला आहे. हा प्रकार कोणकोणत्या ठिकाणीं केला आहे हें पुढें सांगण्यांत येईलच. तूर्त वरील संविधानकाच्याच गुणदोषांचें विवेचन करूं.

संविधानकचातुर्य हा नाटककाराच्या करामतीचा एक मोठाच भाग आहे. इमारतीस जसा नकाशा, तसें नाटकास किंवा कादंबरीस संविधानक होय. ज्याप्रमाणें उत्कृष्ट कारागीर म्हटला म्हणजे त्यास इमारतीचा प्रत्येक भाग

जितका सुंदर व भव्य करतां येतील तितका करूनच बसतां उपयोगी नाहीं, तर एकंदर घाट डौलदार साधण्याविषयींहि त्यानें पहिल्यापासून धोरण ठेविलें पाहिजे ; त्याप्रमाणेंच नाटककारानें व कादंबरीकारानेंहि आपल्या कृतीचें केवळ अवयवशः मनोरमत्व साधणें पुरे नव्हे, तर सामग्र्येंकरून पाहतांही तींत उणेपणा कोठें दिसूं नये याविषयीं सुद्धां त्यानें खबरदारी ठेवणें जरूर आहे. शेक्सपीयरच्या नाटकांत पाहतां प्रस्तुत गुण प्रायः पूर्णपणें आढळत नाहीं. कथासूत्रांत ठिकठिकाणीं गुंतागुंत झालेली दृष्टीस पडते, व कोठें कोठें असंबद्धत्वही नजरेस येतें.* प्रकृत नाटकांतील संविधानक बरेंच मौजेचें आहे, तरी त्यांत पुष्कळ ठिकाणीं अनेक प्रकारचे दोष आहेत. ते कोणते ते अनुक्रमानें पुढें सांगतों.

प्रथमतः उपोद्घातच पहिल्या प्रवेशाचें स्थल राजवाड्याच्या पिछाडीचा बाग योजला आहे. या बागेंत दोघा गृहस्थांचें परस्पर जें भाषण झालें आहे त्यांत पुढील नाटकांतील मुख्य पात्रांविषयींची माहिती श्रोत्यांस किंवा वाचकांस होण्याची कवीनें तजवीज केली आहे. या तजविजीच्या संबंधानें पाहतां वरील संवाद ठीक आहे. पण त्याच्या संबंधानें पहिल्यानें ही शंका येते कीं, वरील दोघे संवादक राजाच्या बागेंत कसे शिरले ! त्यांच्या भाषणावरून तर ते राजपुरुष असावेत असें दिसत नाहीं ; कां कीं, त्यांतील एक तर

---

* जॉन्सन्चा अभिप्राय असाच आहे :—

"The plots are often so loosely formed, that a very slight consideration may improve them, and so carelessly pursued, that he seems not always fully to comprehend his own design. He omits opportunities of instructing or delighting, which the train of his story seems to force upon him, and apparently rejects those exhibitions which would be more affecting for the sake of those which are more easy.

It may be observed, that in many of his plays the latter part is evidently neglected. When he fouud himself near the end of his work, and in view of his reward, he shortened the labour to snatch the profit. He therefore remits his efforts where he should most vigorously exert them, and his catastrophe is improbably produced or imperfectly represented."

*Preface to Shakspere.*

जसा काय नुकताच सुवर्णपुरांत येऊन ठेपलासा दिसतो, त्यास राजाच्या अप-त्यांविषयीं देखील माहिती नाहीं. बरें, हे दोघे राजसेवक नव्हेत ह्मणावें, तर राजवाड्याच्या पिछाडीच्या बागेंत यांचा रिघाव झाला कसा ? याप्रमाणें वरील प्रवेशावर दोहोंकडून अडचण येते. पहिल्या व दुसऱ्या अंकांत खंडूजीची व हंबीररावाची पैज, तारेचें विलोभन, खंडूजीचा कपटोपक्रम, आणि त्याची पूर्ण सिद्धि, इतक्या गोष्टी मुख्य आहेत. आतां सर्वांत मुख्य गोष्ट जी पैजेची,—कीं जी साऱ्या नाटकाचें जणों काय कळसूत्रच आहे—तिजविषयीं येथें कांहीं लिहीत नाहीं ; तिच्या संबंधानें पुढें विचार करावयाचा आहे. बाकी खंडूजीचा व तारेचा जो प्रसंग झाला तो नीट मनांत आणला असतां त्यावर कित्येक आक्षेप निघण्यासारखे आहेत. एक तर खंडूजी आपणास अट्टल सोदा ह्मणवीत असतां त्यानें प्रथम दर्शनींच तारेशीं लघाळपणा आरंभला, व आपली शोभा करून घेतली ; तसेंच एक प्रयत्न निष्फळ होतांच त्यानें येवढी जिवावरील पैज मारली असतां तिचा नाद तेव्हांच अगदीं सोडून दिला, या दोन्ही गोष्टी नीटशा जमत नाहींत. शिवाय साऱ्या जन्मभर ज्यानें लफंगबाजी केली त्याची वृत्ति केवळ एका निर्भर्त्सनेनें अगदीं पालटून जावी, व पतिव्रतेचें तेज त्यास केवळ दुःसह व्हावें, हेंही प्रायः असंभाव्यच ! त्यांतून खंडूजीनें तारेच्या महालांत येण्यास पेटीची जी योजना केली ती, तर फारच विलक्षण दिसते. जडावाचे दागिने व नकशीचीं रुप्याचीं भांडीं ठेवावयाची पेटी कितीशी मोठी असणार ? मग खंडूजीसारख्या बाप्यास ज्यांत आंत गुपचुप बसतां येई असा सपाटा जड पेटारा जेव्हां तारेच्या महालांत आणून चाकरांनीं ठेविला असेल तेव्हां तीस मुळींच संशय कसा बरें आला नाहीं ? शिवाय तारेनें पेटी आपल्या हवालीं घेतांना आंत काय आहे हें पाहिलेंच नाहीं काय ? निदान यजमानांनीं राजाकडे पाठविण्यास येवढ्या जिनसा तरी कोणत्या तऱ्हेच्या करविल्या आहेत ही ही स्वभाविक उत्कंठा तीस कशी झाली नाहीं कोण जाणें ! पेटीस मोहोर केलेली असेल ह्मणावें तर तीस नुसता कोइंडा ही नव्हता ; कांकीं, झांकण वर करून खंडूजींची स्वारी बाहेर पडली आहे व पुनः तें लावून घेऊन आंत जाऊन बसली आहे असें आढळतें ! एकंदरींत हें सर्व प्रकरण गोंधळाचेंच आहे. बरें, आतां एकंदर राजवाड्यांतील व्यवस्था पहा. एक तर खुद्द राजाचेच मुलगे चोरून नेले असतां ह्यांचा बिलकुल पत्ता नाहीं. ही ढिलाई जरी असें करतां जरी संभाजी म-

हाराजांच्या माथीं मारतां आली, तरी पुढें राणी बायजाबाई हिच्या हातीं सारें राज्यसूत्र आलें असतां व ती येवढी दक्ष असतांही राजवाड्यांतील अव्यवस्था मोडली असें आढळत नाहीं. तारेला कोंडून ठेवली असतां खंडूजी खुशाल तिच्याकडे येतो जातो, त्याची कोणी फारशी विचारपूसही करीत नाहीं. तारेस हंबीररावाचें कपटाचें पत्र आल्यावरून ती सदोबाबरोबर निघून जाते, आणि हें वर्तमान पुढें कांहीं दिवसांनीं राजास कळतें ! तेव्हां हाही या नाटकांत घोंटाळ्याचाच प्रकार आहे. याप्रमाणेंच सदोबा येवढा वस्ताद असतां,—कीं इकडे आपल्या धनिणीची व धन्याची एकनिष्ठपणें सेवा करायाची व त्यांस संकटांतून सोडवायाचें, व इकडे राणी व मुरारराव यांचीही मर्जी जाऊं द्याव-याची नाहीं,—असें असतां राणीच्या गोळ्या त्यानें मुकाट्यानें घेऊन त्या बिनदिक्कत तारेच्या हवालीं वाटेच्या आजाराला उपयोगी ह्मणून कराव्या, त्या गोळ्यांची अगोदर परीक्षा करण्याचें त्यास मुळींच सूचूं नये, हें मोठें आश्चर्य नव्हे काय ? त्यास राणीच्या स्वभावाची माहिती असून येवढा गाफी-लपणा त्याचे हातून कसा झाला ? शेवटल्या अंकांत तारा आपल्या बापासमोर उभी राहिली असतां तिची त्यास ओळख पटत नाहीं, आणि मुाररावाची सोळा वर्षांमागची ओळख जुना सरदार मल्हारराव यास बरीक तत्क्षणींच पडते ! याप्रमाणें एकंदरींत बऱ्याच ठिकाणीं प्रस्तुत नाटकांत विरोध व असं-भाव्यता हीं दृष्टीस पडतात.

वरच्याप्रमाणेंच इतर कांहीं ठिकाणींही बरेच आक्षेप निघण्यासारखे आहेत. प्रकृत नाटकांतील मुरारराव हें पात्र बहुतेक अंशीं 'मृच्छकटिकां' तील प्रतिनायक शकार याच्या सारखें आहे. दोघे ही मूर्खशिरोमणि, दोघे ही दुष्ट, दोघांचें ही नाटकांतील नायिकेविषयीं प्रेम व त्या प्रेमाचें दोघांस ही ब-क्षीस ह्मटलें ह्मणजे तिरस्कार, एक राणीचा भाऊ व एक राणीचा पूर्वसंबंधा-चा पुत्र, दोघांचेंही वरील संबंधाच्या जोरावर उद्धताचरण व क्रूर वर्तन, या प्रमाणें अनेक गोष्टींमध्यें दोघांचें इतकें साम्य आहे कीं एक मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिल्याबरोबर दुसरी राहते ! पण एका ठिकाणीं मात्र या इंग्रेजी शका-रानें अप्रयोजकपणाची अगदीं कमाल करून सोडली आहे. दुसऱ्या अंकांत तारेच्या वशीकरणार्थ त्यानें एक मोठा गमतीचा उपाय योजला आहे. गवयांस बोलावून आणून त्यांजकडून प्रभातगीत ह्मणविलें आहे, कीं त्या गाण्यास भुलून तारेनें मुराररावाच्या गळींच येऊन पडावें ! ही लाखी मसलत 'राव मुरारीं'स

कोणीं दिली असेल ती असो! एकंदरींत तारा खोलींत कडी लावून बसली आहे, व मुरारराव, गवई, राजा, राणी ही सर्व मंडळी बाहेर दाराशीं अर्जदारां-प्रमाणें किंवा रिणकऱ्यांसारखी उभी आहे हा प्रवेश फारच मजेचा दिसत असेल! त्यांतून शेवटीं मुरारजींनीं जी अक्कल खर्चली आहे तीस तर तोंडच नाहीं;—तेथल्या तेथेंच आपल्या हृदयंगमेच्या दासीशीं संधान करून आपलें वकीलपत्र पतकरण्याविषयीं ते तिला गळ घालताहेत! जी तारा आंतून प्रभा-तगीत ऐकून दाराशीं उभा राहिलेल्या नंदीवर सुप्रसन्न होणार तीच आपला व दासीचा संवाद ही ऐकेल ऐवढें सुद्धां त्यास कळून येऊं नये काय? असो; पांचव्या अंकांत हंबीररावास झालेला परम अनुताप व त्या वैतागांत जीवितत्यागा-विषयीं केलेला पूर्ण निश्चय या त्याच्या वृत्ति दाखविल्या आहेत. पण या दोन्ही त्या ठिकाणीं विशेष शोभण्यासारख्या नाहींत. असें आह्मांस वाटतें. सदरील अंकाच्या शेवटीं खंडूजीनें आपल्या अधमपणाचा उच्चार केला त्या समयीं त्यास परमोद्वेग झाला आहे व शोकवृत्ति उच्छृंखल झाली आहे तें ठीक आहे; पण जोंपर्यंत तारेच्या जारकर्माविषयीं त्याची पूर्ण खात्री होऊन चुकले-ली होती तोंपर्यंत त्यानें आपला धिक्कार करून घ्यावा व जिवास कंटाळून जावें हें स्वाभाविक दिसत नाहीं. 'उत्तररामचरितां' त रामास उद्वेग व शोक झाला आहे तो यथार्थ आहे, कांकीं सीतेचा परित्याग त्यानें केवळ अप-वादनिरसनार्थ व लोकाराधनास्तव केला होता, तिच्या शुद्धतेविषयीं तो स्वतः निःसंदेह होता. त्याप्रमाणेंच आथेल्लोनें शेवटीं आपणास मारून घेतलें व खोट्या दोषारोपावरून ज्या आपल्या आवडत्या पत्नीचा त्यानें नुकताच अवि-चारानें वध केला तिच्या प्रेतावर पडून त्यानें प्राण सोडला, हें ही मनुष्यस्वभा-वास अनुसरूनच आहे. पण प्रस्तुत नाटकांतील नायकाच्या हृदयांत उद्वे-गादि वृत्ति येवढ्या प्रबळ होण्यास तसें कांहीं कारण दिसत नाहीं. सदरील पांचव्या अंकांत दोघा तरुण राजपुत्रांचा अलौकिक पराक्रम वर्णन केला आहे तो ही केवळ अत्युक्तिरूप असल्यामुळें असंभाव्य होय. सुवर्णपुरच्या लोकां-चा बहुतेक मोड होऊन ते पळूं लागले असतां एका म्हाताऱ्यानें व दोघा कु-मारांनीं शत्रुसैन्याचा लोटचा लोट मागें फिरवावा हें कृत्य केवळ अमानुष दिसतें. 'उत्तररामचरितां'त एकटा लव साऱ्या रामसैन्याशीं लढला आहे, 'इलियड्' मध्यें ट्रोजन् लोक ग्रीक लोकांच्या जहाजांपर्यंत येऊन ठेपून त्यांस आग लावण्याच्या बेतांत आलेले असतां आकिलिसूनें त्यांस माघारे पिटून ला-

वलें व त्यांच्या सेनानायकास मारून त्यांचा अगदीं मोड केला आहे, 'जुन्या करारां' तला सामसन् यानें मेलेल्या गाढवाच्या दाढेनें हजारों अविंधांस झोडपून काढलें आहे, हें सर्व खरें; पण वरच्या सारखीं वर्णनें प्रस्तुत सारख्या नाटकांत शोभत नाहींत. जसा विषय असेल तशी त्याच्यावर रचना करायास पाहिजे. महाभारतांतील विषय घेऊन त्यावर रचलेल्या नाटकांत जशीं काडतुसें, बेगनटें, हडेल् हप् वगैरे प्रकार शोभणार नाहींत, त्याप्रमाणेंच सत्तावन्न सालच्या बंडावरील नाटकांत ही नानासाहेबानें पर्वतास्त्र सोडलें असतां त्यावर हावलाक् साहेबानें वज्रास्त्र सोडलें, तात्या टोप्याचें व सर ह्यू रोजूचें गदायुद्ध झालें, इत्यादि वर्णन ही अप्रयोजक होईल. तर या रीतीनें पाहतां प्रस्तुत नाटकाचा काळ ऑगस्टस् सीझरची कारकीर्द असतां तीन वीरांनीं साऱ्या सैन्याचा पराभव केल्याचा प्रकार कवीनें यांत जो घालून दिला आहे तो असमंजस होय. याप्रमाणेंच तारेस पातिव्रत्यापासून भ्रष्ट करण्याचा जो खंडूजीनें प्रयत्न केला आहे तो ही नीट साधला नाहीं. 'अथेल्लो' नाटकांत यागोनें अथेल्लोस जसा मोठ्या शिताफीनें व युक्तिप्रयुक्तीनें गोत्यांत आणला आहे त्याप्रमाणेंच कांहीं खंडूजीनें करायास पाहिजे होतें. पण तसें कांहींच नाहीं. खंडूजी प्रतिज्ञा करून निघतो कोणत्या आवेशानें, आणि पुढें त्याच्या अजागळपणानें सारा विभु एका क्षणांत ढांसळून काय जातो! एकंदरींत 'फटाटापो भयंकरः' या वचनाची प्रतीति येते! *

५. याप्रमाणें मूळ इंग्रेजी नाटकांतील संविधानकांत जे दोष आढळले ते दाखविले. यांबद्दल अर्थातच भाषांतरकाराकडे कांहीं जबाबदारी नाहीं. भाषांतरकर्त्याचें काम मूळ ग्रंथांत चांगला किंवा वाईट कोणत्याही तऱ्हेचा फेरफार करण्याचें नाहीं. जसें मूळांत असेल त्यासारखें त्यानें अन्यभाषेंत उतरून दिलें ह्मणजे झालें. आतां प्रस्तुत भाषांतरकारानें सदरील ग्रंथ मराठींत उत-

---

* जॉन्सन्चा 'सिंबलेन्' नाटकाविषयीं येणेंप्रमाणें अभिप्राय आहे:—

"The play has many just sentiments, some natural dialogues, and some pleasing scenes, but they are obtained at the expense of much incongruity. To remark the folly of the fiction, the absurdity of the conduct, the confusion of the names, and manners of different times, and the impossibility of the events in any system of life, were to waste criticism upon unresisting imbecility, upon faults too evident for detection, and too gross for aggravation."

रतांना पुष्कळ ठिकाणीं बदल केला आहे हें खरें; पण हा बदल फार करून मूळचा इंग्रेजी पेहेराव काढून त्याच्या जागीं मराठी घालण्यापुरताच आहे. हें वेषांतर कोणत्या तऱ्हेनें केलें आहे व तें कितपत साधलें आहे या विषयीं आतां विचार करूं.

मूळ नाटकांत राणी पुनरूढा आहे; ह्मणजे बायजाबाई ही संभाजी राजाची दुसरी बायको, व संभाजी हा तिचा दुसरा नवरा. राणीस पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा मुराररात्र होय. मराठ्यांत पाटाचा प्रकार जरी सुरू आहे तरी तो प्रतिष्ठित धरलेला नाहीं, व उंच प्रतीच्या लोकांत तो चालू ही नाहीं; यास्तव वरील ठिकाणीं दोन फेरफार केले आहेत. ते हे कीं, राणीचा प्रथम संबंधच ठेवून मुराररावास तिचा भाचा केला आहे. पात्रांच्या परस्पर संबंधांत केलेला बदल काय तो येवढाच आहे. इकडील देशांत स्त्रियांचा व्यवहार तिकडच्या पेक्षां फार मर्यादेचा व आड पडद्यांतला असतो; यास्तव मूळ नाटकांत राणी जशी भर दरबारांत विजयपुरच्या वकिलाशीं बोलते आहे तसें येथें दाखविलें नाहीं. तिचें आणि राजाचें भाषण होण्याकरतां निराळ्या प्रवेशाची योजना केली आहे. शेवटल्या अंकांतील शेवटल्या प्रवेशांत तारेचें व तिच्या नवऱ्याचें जें पुनरभिज्ञानानंतर भाषण झालें आहे त्यांत ही वरील देशाचारास अनुसरूनच फेरफार केला आहे. जाधळी महालांतील रानांत मुराररावानें घातलेलें हंबीररावाचें पागोटेंच तेवढें तारेस दाखविलेलें आहे; मूळ नाटकांत मुराररावाचें धड पडलेलें जसें तिच्या दृष्टीस पाडलें आहे तसा प्रकार भाषांतरांत केलेला नाहीं. याचें कारण उघडच आहे, कीं इकडील देशाचाराप्रमाणें नवऱ्याच्या प्रेताबरोबर तीस सहगमन करणें प्राप्त होतें. तारेच्या भासमान मरणाच्या प्रसंगीं ही भाषांतरकारास मुळापेक्षां निराळा मजकूर घालून द्यावा लागला आहे. नाटकांतील काळ रोमन लोकांच्या वेळचा असल्यामुळें त्या वेळेस ब्रिटन् बेटांत मूर्तिपूजेचा धर्म चालू होता; यास्तव त्या धर्माप्रमाणें प्रेतसंस्काराच्या वेळचा गायनाचा वगैरे प्रकार मूळ ग्रंथांत आढळतो. तारेस मेलेली पाहून एका राजपुत्रानें प्रेतवाद्य वाजविण्यास आरंभ केला आहे, व तो स्वर ऐकून त्याचा भाऊ व त्यांनीं मानलेला बाप असे दोघे गुहेकडे आले आहेत. पुढें प्रेत जमिनीवर ठेवल्यावरही दोघांनीं त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें गाणें ह्मटलें आहे, व प्रेतावर पुष्पें टाकलीं आहेत. हें सर्व भाषांतरकारास बदलावें लागलें आहे, व इकडील आचारास जुळेसा कांहीं नवा मजकूर

ही घालावा लागला आहे. याप्रमाणेंच हंबीररावास तुरुंगांत पडलेलें स्वप्न. मूळ नाटकांत हंबीररावाच्या स्वप्नसृष्टींत त्याची आई, बाप, व बंधु इतके आले आहेत, व यांशिवाय ज्युपिटरानें ( विष्णूनें ) दर्शन दिलें आहे. भाषांतरांत केवळ विष्णुदर्शनाचा प्रसंग मात्र घातला आहे. हे येथवर प्रकृत भाषांतरांत केलेले मोठमोठे फेरफार झाले. यांखेरीज बारीक सारीक अदलाबदल जी मधें मधें अनेक ठिकाणीं करावी लागली आहे ती तारेच्या महालाचें वर्णन, भूपाळी, वगैरे स्थलांकडे अंमळ लक्ष पुरविलें असतां सहज लक्षांत येणारी आहे. शेक्सपीयर च्या वेळच्या लोकांची अभिरुचि दांडग्या तऱ्हेची असल्यामुळें येथील फाल्गुन मासास शोभतशीं भाषणें त्याच्या नाटकांतून व काव्यांतून रग्गड आहेत,* तसाच प्रकार कांहीं थोड्या ठिकाणीं प्रस्तुत नाटकांत ही आहे.† हा प्रकार अर्थांतच भाषांतरांत मुळींच गाळून टाकला आहे. त्याप्रमाणेंच मिल्फर्ड् बंदर, रोमन लोकांचीं जहाजें, वगैरे समुद्राच्या खाणाखुणा ही भाषांतरांत अगदीं बुजवून टाकल्या आहेत. तिसऱ्या अंकांतील शेवटला प्रवेश बहुतेक नवा करून घातल्यासारखाच आहे.

याप्रमाणें प्रस्तुत भाषांतरांत ग्रंथकारानें इकडील रीतरिवाजाशीं जम बसण्याकरितां मूळ नाटकांत कोणकोणते फेरफार केले आहेत ते सांगितले. आतां या रूपांतराच्या योगानें इष्ट हेतूची सिद्धि कितपत झाली आहे ती पाहूं.

६. रा० महाजनी यांनीं प्रस्तावनेंत आरंभीं असें लिहिलें आहे कीं, " जे परदेशीय आचार विचार आपल्या रीतींस जुळत नाहींत त्यांचा या पुस्तकांत अव्हेर केला आहे. मूळ ग्रंथांत जेवढा भाग आपल्या देशस्थितीस अनुसरून आहे तेवढा मात्र ठेविला आहे. बाकीचा भाग बदलला आहे." ही प्रतिज्ञा जर सामान्यतः घेतली तर ती प्रस्तुत पुस्तकांत बऱ्याच रीतीनें शेवटास गेली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं; ह्मणजे हें आपण इंग्रेजी नाटक वाचीत आहों येवढी गोष्ट ध्यानांत धरून चाललें असतां वाचणारास प्रस्तुत ग्रंथ वाचीत असतां विशेष अडखळायाला नको. कां कीं, हंबीररावास आपल्या प्रियेच्या हातांत कांकण घालतांना पाहून व तिची आंगठी आपल्या बोटांत

---

* याचा मासला पाहणें असल्यास 'आथेलो' नाटकाचा पहिला प्रवेश पाहावा. तशींच प्रस्तुत कवीचीं दोन तीन लहान काव्यें आहेत तीं ही पहावीं.

† मूळ 'सिंब्लीन्' नाटकाच्या दुसऱ्या अंकांतील हंबीरराव व खंडूजी यांचें भाषण, व शेवटची हंबीररावाची स्वोक्ति, हीं दोन स्थलें पहा.

घालतांना पाहून वरील तत्व लक्षांत ठेवणाऱ्या वाचकास किंवा प्रेक्षकास मुळींच आचंबा वाटणार नाहीं. इंग्रेज लोकांचा वरील रिवाज आहे हें तो वरील प्रसंगीं तेव्हांच ध्यानांत आणील; व आंगठीचा आणि कांकणाचा एकंदर संविधानकाशीं अत्यंत निकट संबंध जडून राहिला असल्यामुळें हा इंग्रेजी रिवाज भाषांतरकारास बदलतां येईना ही सबब ही तो लक्षांत आणून तिचा फायदा प्रस्तुत पुस्तककारास देईल. पण वरील प्रतिज्ञेचा अक्षरशः अर्थ करून हें मराठीच नाटक आहे अशा बुद्धीनें जर कोणी 'तारा' वाचण्यास आरंभ करील तर तो जागोजाग भांबावून जाईल. 'साठे' 'गोखले' वगैरे आडनांवें ऐकून जर कोणी नवख्यानें गोमांतकस्थ ब्राह्मणांस आपल्या घरीं बोलाविलें, तर त्यांच्या विजारी व केस पाहून तो जसा वेडावून जाईल; त्याप्रमाणेंच तारेचा व हंबीररावाचा गुप्त विवाह, तिचें आपल्या गूढवल्लभाच्या तर्फेनें बापाशीं भांडण व तोंडास तोंड देणें, वगैरे विलक्षण प्रकार पाहून ही वरील भावड्या वाचकास असें होऊन जाईल कीं हे इंग्रेजी मराठे कोण्या मुलखाचे कोण जाणें ! ! त्यांतून साऱ्या संविधानकाचें मुख्य बीज जी पहिल्या अंकांतील पैज तिजविषयीं तर तो जितका आचंबा करीत राहील तितका थोडा ! *ज्या देशांतील राजस्त्रियांस जुनीं संस्कृत नांवें ह्मटलीं ह्मणजे 'अवरोध' 'असूर्यंपश्याः' अशा तऱ्हेचीं, व आलीकडील काळ घेतला तरी जेथील स्त्रियांस पराकाष्ठेची अटक, आणि त्यांतून मराठमोळ्याचा गोशा ह्मटला म्हणजे तर कांहीं पुसूंच नये—तेथेंच परक्या पुरुषानें नवऱ्याची चिठ्ठी आणून बायकोवर लावावी व नवऱ्यानें आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्याचा पण आपणच लावावा, या गोष्टी केवळ्या विलक्षण तऱ्हेच्या भासणाऱ्या आहेत ! ! संभाजी महाराजांच्या दरबारीं 'बॉल्' होऊन खंडूजीच्या बायकोच्या कंबरेला हात घालून हंबीरराव नाचतो आहे, व तारेच्या तोंडचें मद्यपात्र खंडूजी झोकतो आहे, इत्यादि प्रकार प्रस्तुत नाटकांत आले असते तर ते जितके इक-

---

* ही पैज एतद्देशीयांच्या दृष्टीनें जरी केवळ असंभाव्य व अत्यंत अप्रतिष्ठित वाटेल तरी युरोपांतील आचारास ती ह्मणण्यासारखी विलक्षण वाटणारी नव्हे. एक तर **बोकेशियो** नामक विख्यात इटालियन ग्रंथकाराच्या एका कथानकावरूनच **शेक्सपीयरनें** ती आपल्या नाटकांत घेतली आहे ; व शिवाय 'डॉन् क्विझोट्' नामक जगद्विख्यात स्पानिश कादंबरींत ही एक अशाच प्रकारचें उपकथानक आहे. याचें नांव 'The curious impertinent' असें इंग्रेजी भाषांतरांत आहे.

डोल रिवाजाला गोड दिसले असते तितकाच वरील पैजेचा प्रसंगही दिसत आहे !

७. असो ; येथवर प्रस्तुत नाटकाचा अवांतर गोष्टींच्या संबंधानें विचार झाला; ह्मणजे मूळ नाटक कोणत्या तऱ्हेचें आहे, त्यांत भाषांतरकारानें कोण कोणते फेरफार केलेले आहेत, वगैरेविषयीं विवेचन झालें. आतां सांप्रत पुस्तकापासून लोकांस कोणत्या तऱ्हेचा व कितपत उपयोग होण्यासारखा आहे तो पाहूं.

प्रथमतः विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस. विद्यार्थी म्हणजे जे लोक प्रकृत ग्रंथ 'सिंबलैन्' चें भाषांतर ह्मणून टीकेदाखल हातीं घेतील ते, व जिज्ञासु ह्मणजे ज्या लोकांचा इंग्रजींत प्रवेश नसल्यामुळें या भाषांतरावरून शेक्सपीयरच्या कवित्वगुणांची जे परीक्षा करूं जातील ते. या दोघांस प्रकृत पुस्तकापासून चांगलासा उपयोग होणार नाहीं. याचें कारण उघड आहे कीं, एक तर हें शब्दशः भाषांतर केलेलें नाहीं, व शिवाय पुष्कळ ठिकाणीं मूळांत व भाषांतरांत अतिशयित अंतर आहे. यास्तव 'आथेल्लो' व 'टेंपेस्ट' यांचा वरील दोन संबंधांनीं जितपत उपयोग होण्यासारखा आहे तितका प्रस्तुत नाटकाचा नाहीं हें सिद्धच आहे. दुसरा उपयोग सामान्य वाचकांस,—म्हणजे जे केवळ करमणुकीखातर इतर नाटकांप्रमाणें व कादंबऱ्यांप्रमाणें प्रस्तुत ग्रंथ वाचावयास घेतील त्यांस. या वाचकांकरितां प्रस्तुत ग्रंथकारानें मुख्यतः परिश्रम केलेले आहेत. त्यानें प्रस्तावनेच्या आरंभीं सांगितलेंच आहे कीं, आजपर्यंत जेवढीं शेक्सपीयरचीं नाटकें मराठींत झालीं आहेत तेवढीं सर्व निवळ भाषांतरादाखलच असल्यामुळें एतद्देशीय वाचकांस प्रायः दुर्बोध झालीं आहेत. यास्तव त्यांस समजेल व गोड लागेल अशा पद्धतीचें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत करण्याचा हा प्रथमच यत्न होय. इंग्रेजींत ज्यास adaptation (आडाप्टेशन्) ह्मणतात,—म्हणजे मूळ ग्रंथाच्या आधारावर दुसऱ्या भाषेंत स्वतंत्र रचना करायाची,—तशा तऱ्हेचा हा ग्रंथ होय. हें रूपांतर सिद्ध होण्यास किती खटपट करावी लागली आहे व ती कितपत सिद्धीस गेली आहे हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तेथें दर्शविल्याप्रमाणें 'प्रस्तुत' नाटकाच्या कथानकांत कित्येक मोठमोठाले दोष राहिले आहेत व त्यांमुळें एतद्देशीय वाचकांचा मनोभंग होणारा आहे हें खरें ; पण या गोष्टीस उपाय नाहीं. म्हीमस् देवीच्या कृपेनें तत्क्षणीं तरुणी बनलेली

' इसापनीतीं 'तील भाटी जशी ' स्वजातिर्दुरतिक्रमा ' किंवा ' मूळ स्वभाव जाईना ' या न्यायांस अनुसरून मूषकशब्द ऐकतांच गडबडून गेली, व प्रथम समागमाच्या सोहळ्याचा भंग करून व तिरस्करिणीचा तिरस्कार करून तिनें जशी उंदरावर झांप घातली ; त्याप्रमाणेंच आमच्या विदर्भदेशीय नाट्याचार्यानें आपल्याकडून जरी पुष्कळ मेहेनत घेऊन तारेस अगदीं मराठी ' लेडी ' बनवून दिली आहे, तरी तिच्या भाषणांत व आचरणांत मूळ इंग्रेजी झाक थोडी बहुत तरी मारायाचीच ! मूळच्या महानाट्याचार्यांच्या शिक्षेचा संस्कार नाक कान टोंचल्यानें व झग्याच्या जागीं साडी नेसवल्यानें कोठून समूळ नाहींसा होणार ? असो ; तर निवळ मराठी तऱ्हेचें नाटक या दृष्टीनें पाहतां भाषांतरकाराचा मुख्य जो उद्देश, कीं एतद्देशीय वाचकांचें मनोरंजन व्हावें, तो सदरील ग्रंथावरून चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल असें आह्मांस वाटतें. एक तर एकंदर संविधानक बरेंच मौजेचें आहे, व शेवटला उपसंहार तर फारच बहारीचा आहे; शिवाय शेक्सपीयरची मुख्य खुबी जी स्वभाववैचित्र्य व यथार्थ वर्णन तें ही प्रकृत नाटकांत उत्कृष्ट तऱ्हेचें आढळतें. नायकाचें व नायिकेचें गभीरोदात्तत्व ; प्रतिनायकाचें शकारसदृश मूर्खत्व, क्रूरत्व, नीचत्व; सदोबाची स्वामिभक्ति; राजाचें स्त्रीजितत्व; राणीचें आनंदीबाईच्या सवाई निष्ठुराचरण व कौटिल्य; खंडूजीचा मत्सरी स्वभाव; तरूण राजबिंड्याचें कुशलवांसारखें स्वाभाविक उन्नतत्व व वीर्यस्फुरण;—हीं सर्व प्रस्तुत नाटकाच्या मनोरमत्वास साधनीभूत असून या महाराष्ट्रीय प्रतिकृतींत ही वरील सर्व भाग यथास्थित उतरले आहेत. कांहीं ठिकाणीं वर्णनें ही शानदार आलीं आहेत. शिवाय प्रस्तुत ग्रंथकाराचा संस्कृत नाटकांशीं व काव्यांशीं चांगला परिचय असल्यामुळें जेथें जेथें शेक्सपीयरच्या वाणीचा व भवभूत्यादिकांच्या सरस्वतीचा परम हृद्य संगम झाला आहे तेथें तेथें इकडचा आयताच ओघ भाषांतरकारानें आपल्या कृतींत ओतून दिल्यामुळें ही ' तारा नाटका ' स मधें मधें फार रमणीयत्व आलें आहे.

प्रस्तुत नाटकाचा तिसरा उपयोग नाटककार मंडळीस. यांची सुधारणा करण्याकडे आपल्या नवीन मंडळीनें अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच लक्ष पुरविलें नसल्यामुळें त्यांच्याच अकलेनें जेथपर्यंत मजल पोंचवेल तेथपर्यंत त्यांनीं पोंचविली आहे. या मंडळ्यांस मुख्य उणीव ह्मटली ह्मणजे नाटकांचीच होय. आजपर्यंत एकंदर लोकांचें सज्ञान दशेंत विशेष पुढें पाऊल नसल्या-

मुळें. व इंग्रजी सुधारणुकेचीं जीं नाट्यप्रभृति अंगें त्यांशीं परिचयही चांगलासा झाला नसल्यामुळें, ‘रावणराज्यं महाराज’ ‘अल-ल-ल’ वगैरे प्रकार शोभून गेले. पण यापुढें वरील धांगडधिंगा खपला जाणार नाहीं. अलीकडील अभिरुचीस वरच्यापेक्षां कांहीं खुबीचा प्रकार पाहिजे. तेव्हां अशा संधीस प्रस्तुत सारखीं परभाषेंतील नाटकें किंवा देशभाषेंतच नवीं नाटकें झालीं असतां फार उपयोग होणारा आहे. जुन्या संस्कृत नाटकांचीं भाषांतरें ही या कामीं चांगलीं पडणार आहेत.* असो; प्रस्तुत नाटक तरी एका नाटककार मंडळीच्या सांगण्यावरूनच केलें असें भाषांतरकर्त्यांनें प्रस्तावनेंत सांगितलें आहे; व सदरील नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग होऊन तो लोकप्रिय झाला असेंही वरील ठिकाणींच लिहिलें आहे.‡ तर प्रयोगद्वारा लोकरंजन

* दक्षिणा प्रैज कमिटीच्या विद्यमानें बहुतेक संस्कृत नाटकांचीं महाराष्ट्र भाषेंत भाषांतरें आज बरींच वर्षें झालीं असतां तीं होऊन न झाल्यासारखींच झालीं आहेत हें पाहून अत्यंत खेद होतो. या नाटकांपैकीं फारच थोडीं हल्लीं कोणापाशीं शिलक असतील; बाकी त्यांचा बहुतेक अस्त झाल्यासारखाच आहे. विद्याखात्याकडे दरवर्षीं येवढी रक्कम खर्च होत असतां व Native literature encouragement fund (एतद्देशीय भाषांतून ग्रंथसमृद्धि व्हावी एतदर्थ झालेला खर्च) असें निराळें सदर विद्याखात्याच्या वार्षिक रिपोर्टांत घातलें असतां, वरील कमिटीच्या द्वारें आयता तयार होऊन पडलेला माल हीं आमच्या बिचाऱ्या बुभुक्षित ज्ञानेच्छु जनांस मिळत नाहीं ही गोष्ट मोठ्या चमत्काराची होय! कमिटीरूप यंत्रांतून सिद्ध झालेलें अन्न जसेंचें तसेंच वर्षानुवर्षें पडून रहावयाचें. तर मग येवढा भटारखाना आज पंचवीस तीस वर्षें सतत चालू ठेवण्यापासून तरी उपयोग काय? गरीब बिचाऱ्या भटांच्याच प्रीत्यर्थ जर सदरील पैशाचा पूर्वीप्रमाणें विनियोग होता तर काय वाईट होतें? तसेंच हल्लीं भूगर्भशास्त्र, प्राणिरचनाशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वगैरे गहन विषयांवर पुस्तकें बनवून तीं लोकांस समर्पण करण्याचा जो उद्योग जो चालू आहे, त्यापेक्षां वरच्या नाटकांसारखीं मनोरंजक पुस्तकें जर थोड्या किंमतीनें सर्वांस घेतां येण्याची सोय झाली तर ती हल्लींच्या स्थितीस विशेष श्रेयस्कर होण्यासारखी आहे असें आमच्या बुद्धीस वाटतें.

‡ वरील नाटककार इचलकरंजीकर मंडळी होय. हिनें वऱ्हाडांतील कांहीं मंडळीकडून ‘सिंबलैन्’ व ‘कॉमेडी ऑफ् एरर्स्’ या दोन इंग्रेजी नाटकांचीं भाषांतरें करून घेतलीं असून त्यांचा प्रयोग ती रंगभूमीवर दाखवीत असते. वरील नाटकें रंगभूमीवर फार चांगलीं वठतात. ‘तारा’ नाटकाच्या प्रयोग आमच्या एका मित्रानें नुकताच मुंबईस पाहिला; तो लोकांस चांगला पसंत पडतो हें त्याच्या सांगण्यावरून व सदरील प्रयोगाच्या वरील शहरीं झालेल्या पुनरावृत्तीवरून दिसून येतें. ‘कॉमेडी आफ् एरर्स्’.

करण्यास प्रकृत ग्रंथ साधनीभूत आहे हाही त्यापासून होणारा एक मोठा उपयोग आहे.

८. याप्रमाणें प्रस्तुत नाटकाच्या संबंधानें जे विचार वाचकांस कळविण्यासारखे होते ते कळविले. आतां केवळ मराठी ग्रंथ या रीतीनें पाहतां 'तारा नाटका' वर कांहीं आक्षेप येण्यासारखे आहेत खरे; पण त्यांच्या योगानें 'किरणेष्विवांकः' (जसा चंद्राच्या प्रकाशांत कलंक लोपून जातो) या न्यायानें त्याच्या सौंदर्यास विशेष बाध येतो असें नाहीं. सामान्यतः पाहतां परभाषेंतील विचार आपल्या भाषेंत उतरून देणें हें काम कठीणच; त्यांतून, कवितेचें भाषांतर तर विशेषतः दुर्घट; आणि त्यांतही शेक्सपीयर बोवांशीं गांठ ह्मटलें म्हणजे तर भाषांतरकारानें ठिकठिकाणीं हातच टेकायाला पाहिजेत. या गोष्टीचा अनुभव ज्यांनीं प्रस्तुत कवीचा एकादा ग्रंथ परीक्षेकरितां वगैरे चांगला लक्षपूर्वक वाचला असेल त्यांस विचारावा!* तर अशा ग्रंथका-

---

(मागील पृष्ठावरून चालू.)

(भ्रांतिकृत चमत्कार) याचा प्रयोग रत्नागिरीस असताना या वर्षाच्या आरंभीं आह्मीं पाहिला होता. तो आह्मांस फार मनोरम वाटून शेक्सपीयरच्या नाटकांचा एतद्देशीय वाचकांस व प्रेक्षकांस ही किती उपयोग करून देता येतील ही गोष्ट आमच्या मनावर वरील अभिनयावरून चांगल्या प्रकारें ठसली.

* जॉन्सनूनें शेक्सपीयरच्या नाटकांची एक आवृत्ति तयार केली हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. ही आवृत्ति निघण्यापूर्वी वरील पंडितानें एक प्रसिद्धिपत्रक काढलें होतें. त्यात पुढील मजकूर आढळतो:—

"But of the works of Shakspeare the condition has been far different: he sold them, not to be printed, but to be played. They were immediately copied for the actors, and multiplied by transcript; vitiated by the blunders of the penman, or changed by the affectation of the player; perhaps enlarged to introduce a jest, or mutilated to shorten the representation; and printed at last without the concurrenee of the author, without the consent of the proprietor, from compilations made by chance or by stealth out of the separate parts written for the theatre; and thus thrust into the world surreptitiously and hastily, they suffered another deprivation from the ignorance and negligence of the printers, as every man who knows the state of the press in that age will readily conceive.

It is not easy for invention to bring together so many causes concurring to vitiate the text. No other author ever give up his works to fortune and time with so little care; no books could be left

राच्या कृतीचें मराठीसारख्या अत्यंत विसदृश भाषेंत प्रतिबिंब उठवून द्यावयाचें ह्मणजे मोठ्या प्रयासाचें काम आहे यांत संशय नाहीं. तें प्रस्तुत ग्रंथकारानें इतपत उठवून दिलें आहे यावरून त्याचे परिश्रम व त्याचें चातुर्य हीं व्यक्त होतात. छापण्यास पाठविण्यापूर्वीं कित्येक मित्रांकडे सदरील पुस्तक पाठविलें होतें असें प्रस्तावनेच्या शेवटीं लिहिलें आहे ; या गोष्टीचें मर्म ही तज्ज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. असो ; पण या कृतीवर मूळ भाषांतरकर्त्याचे व इतरांचे इतके परिश्रम झाले असतां कांहीं ठिकाणीं तींत इंग्रेजीची झाक अद्याप राहिली आहे, व कोठें कोठें वाक्यरचनेचाही घोंटाळा राहिला आहे. तसेंच कांहीं ठिकाणीं प्रवेशादिनिर्देशांत ही नजरचूक झालेली आढळते. *

---

(मागील पृष्ठावरून चालू.)

in hands so likely te injure them, as plays frequently acted, yet continued in manuscript : no other transcribers were likely to be so little qualified for their task as those who copied for the stage, at a time when the lower ranks of the people were universally illiterate : no other editions were were made from fragments so minutely broken, and so fortuitously re-united; and in no other age was the art of printing in such unskilful hands."

* वरील दोषांचीं उदाहरणें येणेंप्रमाणें:—

( पृष्ठ ९ )—"हें ( कंकण ) मजकरतां तूं हातांत घाल."

( पृष्ठ ३५ )—"ते जेव्हां त्या रामपूरकराची थट्टा करतात, तेव्हां ती ऐकणें ह्मणजे एक मोठी गंमत आहे."

( पृष्ठ ३८ )—"मी ही हकीकत बाबांच्या कानावर घालतें, आणि त्यांना परक्या पुरुषानें येऊन असें अभद्र भाषण आपल्या मुलीशीं करावें हें आवडतें का बघतें !"

( पृष्ठ १०५ )—"तो हंबीरराव, बेवकूब, कीं ज्यापाशीं चांगुलपणाचा एक लेशही सांपडावयाचा नाहीं."

( पृष्ठ ८ )—"नको गे प्रिये ! डोळ्याला पुनः पाणी आणूं ! नाहीं तर तुला वाटेल हें हृदय नायकांपेक्षांही कोंवळें आहे."

( पृष्ठ १७ )—"अहो बाळासाहेब ! मी हंबीररावास सुवर्णपुरास पाहिलें नाहीं असें नाहीं. त्यावेळीं तो होतकरू दिसत असे ; आणि जसा त्याजविषयीं लोकांचा आज समज आहे, तशा प्रकारचा तो निघेल असें त्या वेळीं ही लोक ह्मणत ; परंतु मला मात्र कांहीं तसें वाटलें नाहीं. मला त्याचे गुण कळले नव्हते असें नाहीं. त्यावेळींच मला वाटे कीं, लोकांचा तर्क खोटा ठरेल."

( पृष्ठ २३ )—"असें बोलण्याची ही तुमची चाल असेल, परंतु मागें घेणार नाहीं असें वाटतें."

९. याप्रमाणें अभिप्राय देण्यास हातीं घेतलेल्या पुस्तकाचें सर्व प्रकारें गुणदोष विवेचन झालें. आतां सरते शेवटीं प्रकृत नाटकांतील कांहीं स्थलांचें येथें अवतरण करून हा लेख आटपतों. या अवतरणांचें प्रयोजन येवढेंच आहे कीं, त्यांवरून सदरील भाषांतर कोणत्या शैलीनें केलें आहे, व मराठींत तें कसें उतरलें आहे, याची आमच्या सर्व वाचकांस परीक्षा करतां यावी.

"( अंक २ प्रवेश २ )

( खंडूजी पेटीच्या बाहेर येतो )

खंडूजी—काय शांत वेळ ही! जिकडे तिकडे आतां सामसूम झालें आहे! दिवसाचा कामधंदा करून थकले भागले लोकांना गाढ झोंप लागली आहे! रात्रीचा किर्र शब्द ऐकूं येत आहे.—अशा मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या मनांत दुष्ट विचार कसे घोळत आहेत!—ही पहा चंद्रानना पलंगावर निजली आहे. त्या पलंगाला तिजमुळें किती शोभा आली आहे! वाः किती सुंदर ही कमलिनी! या कनकलतिकेला पाहून दिव्याची ज्योतिही मान डोलवीत आहे! तिचे नेत्र या वेळीं लागले आहेत, आणि ह्मणूनच या दिव्याचा प्रकाश पडला आहे! तिच्या या गौरवर्ण शरीरावर ही हिरवी वेलबुट्टी कशी शोभत आहे! पण माझा उद्देश काय, आणि मी हें काय बघत बसलों.— मला महालांतील खाणाखुणा टिपून घ्यायाच्या आहेत. या अमुक अमुक तसबिरी अमक्या ठिकाणीं टांगल्या आहेत. ही खिडकी या इकडल्या भिंतीला आहे. तिचा पलंग हा असा आहे. या भिंतीवर हीं चित्रें काढिलीं आहेत; पण या असल्या दहा हजार गोष्टी लिहून घेण्यापेक्षां तिच्या शरीरावरची एखादी खूण लिहून घेतली तर माझ्या बोलण्यावर विश्वास पटेल. अहा निद्रे! यावेळीं तूं

---

(मागील पृष्ठावरून चालू.)

( पृष्ठ ४५ )—यांत 'गजाऊ जवळच उभी आहे' असें प्रवेशारंभीं असून तारा तिला दूर असल्याप्रमाणें हाक मारते आहे.

( पृष्ठ ५३ )—यांत तारेच्या प्रवेशाच्या अगोदरच 'या पहा बाईसाहेबच आल्या,' असें दासी बोलते आहे.

( पृष्ठ ८९ )—यांत प्रवेशस्थल जामगांव असून तारा सदोबाला पुसते, 'अजून हें जामगांव किती दूर आहे?'

( पृष्ठ ९० )—यांत तारेच्या भाषणाच्या अगोदर 'सावध होऊन' असे शब्द असणें जरूर होतें.

माझें किती साहाय्य करीत आहेस! असेंच आणखी थोडा वेळ कर! चल नीघ कसें [ तिच्या हातांतील कंकण काढून घेतो. ] वा: ! किती लवकर याचा फांसा निघाला तरी! या कंकणावरून हंबीररावाची खातरीच होईल. तिचा हा पदर अस्ताव्यस्त झाला आहे, ह्मणून हा पहा तिच्या दोन स्तनांमध्यें असणारा तीळ चोळीच्या गांठीच्या वर दिसत आहे. माझ्या बोलण्याला याहून जास्त प्रमाण कशाला पाहिजे! या तिळावरून त्याची खातरी होईल कीं मी कुलूप तोडून तिच्या पातिव्रत्याचें भांडार लुटलें! बस पुरें आहे. आतां अधिक टिपून घेण्याची काय जरूर? तीळ लिहून घेण्याची तर मुळींच जरूर नाहीं. तो कां मी आतां विसरेन! ती पांडवप्रताप वाचीत होती असें दिसतें. ही पहा येथें खूण घालून ठेवली आहे. दुर्योधन दुःशासनादि कौरवांनीं तिचा छळ आरंभिला आहे आणि सती द्रौपदी द्वारकाधीश कृष्णाचा धांवा करीत आहे, येथपर्यंत हिनें वाचलें आहे!—हे सति तारे! तुझाही मी असाच छळ करणार ना! मी मोठा पातकी! पण काय करूं? असो. माझें काम झालें. चला, आपण पेटींत जाऊन बसावें आणि झांकण लावून घ्यावें."

"( अंक २, प्रवेश ४ )

खंडूजी—तिचा महाल! वा: ! काय त्याची शोभा! मी तेथें निजलों नाहीं, कबूल! पण असला सुंदर महाल पाहिल्यावर झोंप येते कसची? सर्व रात्रभर मी त्याची शोभा पहात बसलों होतों. भिंतीवरून चित्रें काढिलीं होतीं, आणि त्यांवर मळ पडूं नये म्हणून किनखापाचे पडदे सोडले होते. एका भिंतीवर दधिसमुद्रांत शेषशायी नारायणाची मूर्ति काढली आहे. त्याच्या नाभिस्थळापासून कमलाचा देंठ निघून त्यावर चतुर्मुख ब्रह्मदेव चारी वेद हातांत घेऊन बसला आहे. पायथ्याशीं कमलालया लक्ष्मी नारायणाचे पाय चुरीत आहे. उजव्या अंगाला गरुड हस्त जोडून उभा आहे, त्याला पाहून नागांची तारांबळ उडाली आहे. पलीकडे सनकसनंदन नारायणाची लीला गात आहेत. कोण त्या चित्रकाराचें कसब! मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभी आहे असें वाटतें!"

"(फिरून) खंडूजी—महालाला दक्षिणेकडे दोन खिडक्या आहेत, त्यांच्या वरच्या अंगाला तसबिरी लटकाविल्या आहेत. रावणानें अशोक वनांत सीतेला नेऊन ठेविलें आहे, आणि ती रामचंद्राच्या विरहानें एका अशोकवृक्षाखालीं स-

चित बसली आहे, आणि जवळच्या एका वृक्षावर हनूमान् बसला आहे, आणि रामनामांकित मुद्रा तिजजवळ टाकीत आहे, असें एका तसबिरींत दाखविलें आहे. या तरी चितार्‍याची खुबी मोठीच ! तसबीर पाहिली कीं त्या मूर्ति आपल्या समोर उभ्या आहेत, असा भास होतो !

"(अंक २, प्रवेश ५)

(इंदीरराव आपणाशीं बोलतो)

"हरहर !—पुरुष आणि स्त्री मिळून माझा देह झाला, तेव्हां यांतील कोणचा भाग बरें स्त्रीच्या अंशानें झाला आहे ! तो समजता तर मी या वेळेस छेदून टाकला असता ! कोणताही जरी दुर्गुण पुरुषांत आढळला तरी तो स्त्रीच्या अंशापासूनच आहे यांत संशय नाहीं ! अनृत, अविनय, साहस, माया, मूर्खत्व, अतिलोभ, कपट, चांचल्य, परनिंदाप्रीति, हे सर्व दोष जात्याच स्त्रियांत असतात, आणि त्यांच्यापासूनच पुरुषांस प्राप्त होतात. स्त्रिया जगांतून नाहींशा होत्या तर बरें झालें असतें ! काय स्त्रियांचें धाडस ! समुद्राच्या लहरींप्रमाणें यांचा स्वभाव चंचल ! यांची प्रीति तर संध्याकाळच्या ढगांवरील तांबड्या छटांप्रमाणें क्षणिक ! आज हा, उद्यां तो, परवां तिसरा, असा यांचा क्रम ! एकावर कधीं यांचें प्रेम असणार आहे काय ? बघतील एकाकडे, बोलतील एकाशीं, आणि प्रेम असेल कदाचित् तिसर्‍यावरच ! —धिक्कार असो यांच्या जातीला ! ब्रम्हदेवानें स्त्रीजाति निर्माण केली नसती तर खचितच नरकपुरी ओस पडली असती !—हे षडानना कार्तिकेया ! तूं मोठा शहाणा ! तुला मात्र यांचें कपट कळलें. बाकीचे सर्व देव स्त्रीपाशांत गुंतले ! बरें आहे. स्त्रियांचें तोंड पहावयाचें नाहीं हा कृतनिश्चय ! सांपडेल तेथें त्यांचा वध करावा ! आं—पण नाहीं करूं ! आपआपल्या हातांनींच त्या करून घेत आहेत, तेव्हां आपण तरी उगी कशास दोषी व्हावें ?

[जातो.]"

---

**निबंधमाला**—येथें आमच्या पुस्तकाचें पांचवें वर्ष समाप्त झालें. या ठिकाणीं पूर्वक्रमाप्रमाणें गेल्या सालची कांहीं हालहवाल लिहावयाची; पण तसें या खेपेस करवत नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, 'गेलें साल' हे शब्द प्रस्तुत समयीं अनर्थक होणार आहेत. गेल्या ४८ व्या अंकांत आम्हीं लि-

हिलें होतें कीं, साहा महिन्यांचा पडलेला खाडा भरून काढण्याची आह्मांस चांगली उमेद वाटते; पण पुढें येणाऱ्या अडचणींची कल्पना मनुष्यास अगोदर फार करून होत नसल्यामुळें वरील आमचा अजमास अगदीं चुकला. अनेक कारणांमुळें वरील तूट भरून येण्याचें एकीकडेच राहून आमच्या पुस्तकाच्या सालांत व खऱ्या सालांत अधिकाधिकच अंतर पडत चाललें. तेव्हां शेवटीं काळास आटपण्याची व्यर्थ यातायात सोडून देऊन पुष्कळांनीं उपदेशिलेली मंडूकप्लुति करण्याचाच विचार केला. सरकारी दरबारांत ही जर सहा वर्षांची नोकरी बजावल्यानंतर खुशाल सहा महिने घरीं राहण्यास मुभा असते, तर आमची प्रिय वाचकमंडळी ही पांच वर्षांच्या अखेर आह्मांस एका वर्षाची सुट्टी मंजूर करण्यास फारशी कुरकुर करणार नाहीं असें आह्मांस खास वाटतें. तर ही मंजुरी अमलांत आणून आज दोन वर्षें चहा प्यायलेलें आमचें घड्याळ येत्या सालच्या आरंभापासून आह्मी वेळेबरोबर लावणार. आयते साठ अंक झालेलेच आहेत; तेव्हां कांटा फिरविण्याचीही तसदी नलगे !

वर सांगितल्याप्रमाणें साठ अंक हिंडून आमच्या पुस्तकाचा कांटा मूळपदावर पुनः येऊन ठेपला आहे, व एक महिनाभर निश्चळ राहून नंतर तो पुनः मार्गक्रमणास लागणार; यास्तव या संधीस सिंहावलोकन करून आजपर्यंत क्रमलेल्या मार्गाचें क्षणभर पुनरालोचन केलें असतां तें विशेष अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं. सहा वर्षांपूर्वीं आह्मीं आपल्या पुस्तकास जेव्हां सुरवात केली, तेव्हां आमच्या देशाची व भाषेची स्थिति फार निराळी होती. पूर्वींपासून अबाधितपणें चालत आलेल्या मतांचा प्रचार तेव्हां जारीनें सुरू होता. आपल्या देशांत जें जें दृष्टीस पडतें तें तें प्रायः अप्रयोजक व निंद्य, व आपली देशभाषा ह्मणजे अडाणी व कोती, हीं दोन मुख्य तत्त्वें विद्वज्जनांस संमत असल्यामुळें व त्यांनीं त्यांचें नेहेमीं प्रणयन केल्यामुळें तीं लोकांच्या मनास बळकट खिळून राहिलीं होतीं. वरील दोन ग्रह आमच्या लेखांच्या योगानें शेकडों लोकांचे शिथिलित झाले असतील असें ह्मणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं. हल्लीं मराठींत ग्रंथरचना करण्याचा प्रघात किती वाढला आहे, व आमच्या आचारविचारांच्या संबंधानें ही लोकांत किती चलबिचल होऊं लागली आहे, या दोन गोष्टींकडे कोणाही शोधक मनुष्याचें लक्ष गेलें नसेलसें नाहीं. आम्हीं लेखणी हातीं धरण्याचे पूर्वीं ही ही एक चमत्कारिक गोष्ट आम्हांस आढळून येत असे कीं, नवीन मंडळींतून कोणाचे मनांत देशहितार्थ

ग्रंथरचना करण्याचें आलें असतां विषय सांपडणाचीच त्यांस मारामार पडे. लिहावयास विषय तरी काय आहे, बहुतेक लोकांस माहीत असणाऱ्या गोष्टींचेंच चर्वितचर्वण करायाचें कीं नाहीं, या प्रकारचे उद्गार कधींमधीं कानावर येत! जो लिहावयास लागेल त्यास सारा लोकव्यवहार व अवघी सृष्टि हीं अनंत वर्षें पुरण्यासारखें विषयभांडार होय, व संस्कृतादि प्राचीन भाषा व इंग्रजी वगैरे अर्वाचीन भाषा यांच्या ठायीं ज्ञानाचीं केवढालीं अपरंपार कोठारें आहेत या गोष्टी फार करून कोणाच्या ही मनांत येत नसत. इंग्रेजी भाषेंत आजपर्यंत हजारों हजार ग्रंथ होऊन गेले असून अद्याप कोणा ग्रंथकाराची लेखणी विषयाच्या अभावामुळें थांबली आहे असें आढळत नाहीं; आणि आमच्या इकडे अजून कशास कांहीं ठिकाण नसतां काय पंचाईत येऊन पडते पहा!! हें सर्व फळ आलीकडील चमत्कारिक शिक्षणपद्धतीचें होय. हिच्या योगानें मनुष्य चोहोंकडून गुंडा बनतो खरा; पण या गुंडपणाचे परिणाम ह्मटले ह्मणजे चोहोंकडे गुडघाभर पाणी, व विषयविशेषावर अरुचि, हे होऊन बसतात. असें झाल्यावर यापूर्वीं शेकडों वेळां उल्लिखित केलेले नवीन मंडळीचे दोष, जे पंडितम्मन्यता, कृतकृत्यताबुद्धि, श्रमविमुखता इत्यादि, ते सहजच उत्पन्न होतात. जे देशकार्यधुरीण त्यांची अशी स्थिति असल्यावर, मग त्यांच्या दृष्टीवर निर्वाह करणाऱ्या प्राकृतजनांची हालअपेष्टा तर काय विचारावी! तेव्हां वरील कारणांमुळें कांहीं वर्षांपूर्वीं अशी कांहीं चमत्कारिक लोकस्थिति होती कीं, एकादा मजकूर छापलेला असलेला, कोणी बड्या मनुष्यानें एकादें मत प्रगट केलें, आणि त्यांतून एकाद्या इंग्रेजी ग्रंथकाराचा एकादा उल्लेख असला, कीं मग पुढें बोलण्याची कांहीं सोयच उरली नाहीं! 'ब्रह्मवाक्यो जनार्दनः'! आमच्या पुस्तकाच्या आठव्या अंकांत मेकॉले, मिल्, मॉरिस् या त्रयीला कोर्टापुढील पिंजऱ्यांत आणून उभी करून त्यांवर जेव्हां आम्हीं दोषारोप केला, व डा० विल्सन्‌सारख्या महाचार्यांच्या संबंधानें आमचे विचार निर्भीडपणें प्रगट केले, तेव्हां आमचीं ख्रिस्ती भावंडें 'ज्ञानोदय' व 'सत्यदीपिका' यांनीं 'अब्रम्हण्यम् अब्रम्हण्यम्' 'शांतं पापं शांतं पापम्' असा आपल्या भाविक सद्धर्मी मंडळींत केवळ हाहाःकार करून दिला. अरे, हें आहे काय वर्तमान! मेकॉले आणि त्याच्या लिहिण्यांत चूक! मिल्साहेबांच्या प्रचंड इतिहासावर 'निबंधमाले' सारख्या टारग्या पुस्तकांत टीका! अरेरे, हें नेटिव लोकांस विद्यादान केल्याचें फळ बरें! आम्ही परम भाविक

कसें पहा बरें ; विल्सन् साहेब जें सांगतील तें आमच्या हिताचेंच सांगतील; त्यांत तिळप्राय दोष काळयत्रीं ही सांपडायाचा नाहीं, असा आमचा आपला पक्का विश्वास ; नाहीं तर हा धट्टाईचा व कृतघ्नपणाचा प्रकार पहा ! कॉलेजांतून मि० वर्ड्स्वर्थ् सारख्या नामधारी ख्रिस्त्यांच्या हाताखालीं तयार होऊन क्षुद्र खद्योतांप्रमाणें आपलें अत्यल्प तेज मिरवीत निघाले भराऱ्या मारायाला ! ईश्वरदत्त विवेचनशक्तीचा उपयोग ईश्वरदत्त पवित्रशास्त्रावर करणें, सरकारानें परमौदार्यानें दिलेलें ज्ञानांजन डोळ्यांत घालून सरकारचे दोष काढणें, इंग्रजी ग्रंथकारांच्या परिशीलनानें आलेलें बुद्धिप्रखरत्व त्यांचें दोषाविष्करण करण्याच्या कामीं लावणें, हीं कृत्यें केवढीं अधमपणाचीं होत ! ! इंग्रजी इतिहास वाचल्याचें हेंच फळ काय ? वॉशिंग्टन्, ग्यालिलियो, जॉन्सन् यांचीं चरित्रें वाचून त्यांचें हेंच चीज करायाचें काय ? असो ; याप्रमाणेंच बड्या नांवास भुलून हुरळून जाण्याचाही प्रकार आमच्या देशांत बराच आढळतो. दोन चार बड्या मंडळींनीं एकादा डोलारा कोणत्याही उद्देशानें उभारला, कीं दुल्हा करून मंडळी लागलीच मागें ! मग हें प्रकरण आहे काय, आपण काय करीत आहों, याचा कांहीं विचार नाहीं. न्यूयॉर्क्वासी मंडळीच्या कानीं आमच्या परमहंसांचा वेदघोष पासिफिक महासागरावरून गेला असतां तो ऐकून ते चकित होऊन राहिले तर मोठेंसें आश्चर्य नाहीं ; किंबहुना सहा हजार कोसांवरून त्यांनीं स्वामींच्या पायांवर लोटांगण घालून स्ववर्गीयांपैकीं एकाच्या प्रेतास आपल्या आर्यगुरूंकडून डाकमार्गें आलेल्या मंत्रांनीं अग्नीकरणसंस्कार करून त्याचे अस्थि महापवित्र मेक्सिकोतीर्थीं झोंकून दिले तर यांत ही विशेष नवल करण्यासारखी गोष्ट नाहीं ; कां कीं, 'दूरतः पर्वता रम्याः' या न्यायानें वरील दोन्ही गोष्टींची उपपत्ति तेव्हांच होण्यासारखी आहे.* पण पर्वताच्या

---

* मुंबईस कांहीं महिन्यांपूर्वीं 'थिओसोफिस्ट' नांवाची एक अमेरिकन मंडळी येऊन दाखल झाली आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुधा सर्वांस विदित असेलच. या मंडळीनें दयानंदजींस आपले गुरु केले आहेत, व त्यांच्या द्वारें वैदिक धर्माविषयीं शोध करण्याचा त्यांचा संकल्प असून तदनुसार त्यांचा उद्योगही चालू आहे. या लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा परित्याग केला असून त्याचें नांव काढल्याबरोबर त्यांच्या कपाळाला आठ्या पडतात. यांनीं इकडे येण्यापूर्वीं दयानंदजींस तिकडून जें अत्यंत नम्रभावपूर्वक पत्र लिहिलें होतें तें मोठें मासलेवाईक होतें. तें वर्तमानपत्रांतून वाचून पुष्कळ मंडळीस हंसें आल्याशिवाय राहिलें नसेल. वर सांगितलेला मंत्राग्नीचा प्रकारही कांहीं काळापूर्वीं अमेरिकेंत घडून आलेला वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला होता.

यथ्याशीं उभें राहून ही जर त्याचें विषमत्व व रूक्षत्व आपल्या लक्षांत येणार नाहीं, व दूरस्थ प्रेक्षकाप्रमाणेंच 'हा डोंगर काय गालिचासारखा मऊ आहे पहा!' अशी जर आपण ही त्याची प्रशंसा करूं लागलों, तर मग काय म्हणायाचें! दयानंदजींचें येथें चार वर्षांपूर्वी जें दोन तीन महिने प्रस्थ माजून राहिलें होतें त्यास आमच्या लोकांच्या वर सांगितलेल्या स्वभावाखेरीज दुसरें कांहीं कारण नाहीं. त्या वेळेस हिंदुधर्माचे लूथर ह्मणून जे चोहोंकडे गाजत होते ते आतां आकाशांतील धूमकेतूप्रमाणें अस्तंगत होऊन कोणीकडे जाऊन बसले आहेत कोण जाणें! त्यांच्या शिष्यांनीं भाकित केल्याप्रमाणें त्यांच्या समाजाची वृद्धि आजपर्यंत झालेली कोणाच्या कानीं येत नाहीं हें तर काय, पण त्यांचें नांव सुद्धां इतक्यांतच अर्धमुर्ध लोपून गेल्याप्रमाणें झालें आहे. वाहवा रे लूथर!! *

तर आमच्या गेल्या साहा वर्षांतील उद्योगापासून ही हो एक गोष्ट आम-

---

* आर्यसमाजाच्या जगद्गुरूंविषयीं आमची जी प्रत्यक्ष अनुभवावरून समजूत झाली, व जी आजपर्यंत या पुस्तकांत अनेक वेळां आम्हीं खात्रीनें दाखल केली, ती केवळ आमच्या दुराग्रहाचें फळ होय असें आमच्या कित्येक मित्रांस वाटलें आहे, व वरील लेख वाचून पुनः ही वाटेल. यास्तव पुढील थोडासा लेख येथें वाचकांस सादर करतों. तो कोणाच्या हातचा आहे हें बहुधा कोणासही कळावयाची जरूरी नाहीं.

"दयानंद सरस्वती—यांच्या अंगीं 'दूरस्थाः पर्वता रम्याः' याप्रमाणें दूरच्या लेखांवरून जी झाक दिसत होती ती येथें कांहींच प्रत्ययास आली नाहीं. आजवर प्रत्येक भेटीमध्यें अनेक सुज्ञांच्या प्रत्ययास जें काय आलें तें हेंच कीं, सर्वज्ञत्वाचा गर्व, औद्धत्य, वाचालत्व, असंबद्धप्रलापित्व, असत्यवाद, धूर्तता, इत्यादि इत्यादि. 'न भेतव्यं न बोद्धव्यं न श्राव्यं वादिनो वचः । झटिति प्रतिवक्तव्यं सभासु विजिगीषुभिः'. हा उपदेश यांजपाशीं पुरा वसत आहे. समक्ष गेल्यास हे यद्वातद्वा बोलतात, व लेखी प्रश्नांचे जबाब देण्यास टाळाटाळ करतात, असा अनुभव आह्मीं स्वतः घेतला आहे. यांचीं जीं मतें आम्हांस समजलीं आहेत त्यांतलीं कांहीं कांहीं आह्मांस मान्य आहेत, व त्यांचें कदाचित् हे व्याख्यानद्वारा प्रतिपादन करीत असतील; परंतु त्यांचें स्थापन करणाराच्या अंगीं गांभीर्य, शांति, सभ्यता वगैरे गुणांनीं युक्त असें अगाध पांडित्य असणें अवश्य आहे. या प्रकारचे गुण यांच्यांत मुळींच दिसत नाहींत. तर ते संपादन करण्यास दयानंद सरस्वतींनीं प्रथम प्रयत्न करून मग अशा प्रवासास निघावें हें बरें असें आम्हीं त्यांस केवळ प्रेमभावानें सुचवितों."

(इंदुप्रकाश, २३ नोवेंबर १८७३)